# अभंग-भारत

२

वा. शि. कोल्हटकर

[illegible]

ज्यांनी आजन्म[illegible] हे मराठे
राज्य राखले त्यांच्या [illegible]
सप्रेम भेट २०।५।८३
[illegible] [illegible]

ॐ

चैतन्य ग्रंथ-माला, पुष्प ११ वें

# अभंग-भारत

( महाभारताचा अभंगमय सुबोध भावार्थ )

## खंड २ रा

३ वनपर्व, ४ विराटपर्व, ५ उद्योगपर्व



ग्रंथकार

कीर्तनवाचस्पति वासुदेव शिवराम कोल्हटकर

संस्थापक—धर्मचैतन्य संस्था, पुणें २.

शके १८७२ ] मूल्य ७॥ रुपये [ मार्गशीर्ष शु. १

प्रकाशक :
वासुदेव शिवराम कोल्हटकर
धर्मचैतन्य संस्था, सदाशिव पेठ,
पुणे २.

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

मुद्रक :
कृष्णाजी देवराव इनामदार
श्रीशारदा मुद्रणालय,
२८१ बुधवार पेठ, पुणे २.

सादर समर्पण—

# पितृदेवो भव



पूज्य पितृपदां सादर वंदन । पित्यावीण अन्य देव नसे ॥ १ ॥
पितृदेवाहूनि गगन ठेंगणें । कथिलें धर्मानें सत्य सत्य ॥ २ ॥
ब्रह्मचर्यव्रतें आराधिले दत्त । खडतर कष्ट तीन तपें ॥ ३ ॥
गुरुपदीं अंतीं सर्वस्व अर्पितां । अनसूयासुता दया आली ॥ ४ ॥
लाभली चरणसेवा तेचि मज । 'अभंग-भारत' त्याचि पुण्यें ॥ ५ ॥
साक्षात् दत्तरूप तेचि वंद्य पाय । प्रकाशित कार्य करितील हें ॥६॥
'अभंग-भारत' खंड हा द्वितीय । धर्मकार्यधैर्य देवो जनां ॥ ७ ॥
ऐसा आशीर्वाद शिवरामतनय- । मागे वासुदेव, पितृदेवा ॥ ८ ॥

श्री

# प्रास्ताविक निवेदन

— ॐ नमो भगवते वासुदेवाय —

भगवान् श्रीव्यासमुनिप्रणीत श्रीमन्महाभारत हें शांतिसौख्याची अपेक्षा करणाऱ्या जगाचें सौभाग्य आहे. परिस्थितिपरवश झालेल्या दिङ्मूढ मानवाला या संसारारण्यांत इह-पर सौख्याच्या बुझलेल्या वाटा आजपर्यंत या ग्रंथानें अनेकवार दाखविल्या आहेत. प्रकाश हा जसा सर्वकाळ प्रकाशच, त्याच प्रमाणें त्या सिद्धांतद्रष्टया महामुनींचे सिद्धांत हे यावच्चंद्रदिवाकरौ सिद्धांतच रहाणार! सूर्य जसा कधीं जुना किंवा शिळा होत नाहीं, त्याचप्रमाणें त्या सिद्धांतांना कधीं बुरशीहि येत नाहीं, किंवा कूपोदकाप्रमाणें ते कधीं देश-काल-परिस्थितीनें दूषितहि होत नाहींत.

ढळलेल्या मानबिंदूंची पुनः प्रस्थापना करणें, तुटलेल्या ध्येयध्वजांना सन्मानानें पुनः गगनांत अखंड फडकावणें, परम मंगल आशा-आकांक्षारूपी लतांची गळलेली पालवी पल्लवित करणें, आणि कालानें जीर्णता पावलेल्या भक्तिप्रेमाच्या आणि ज्ञानविद्येच्या मंदिरांचा जीर्णोद्धार करणें, हीं सर्व अशक्य वाटणारीं पण अवश्य असलेलीं महान्कार्यें सिद्धीस नेण्याचें जर कोणांत सामर्थ्य असेल तर तें एकट्या एक महाभारताच्या क्रियाशील अभ्यासांतच आहे.

प्रपंच-परमार्थाची प्रेमळ हातमिळणी याच मार्गानें होईल. याच मार्गानें गेल्यास धर्म आणि राजकारण हे दुरावलेले सखे सवंगडी परस्पर प्रेमानें एकांतांत गुजगोष्टी करूं लागतील आणि व्यक्ति, समाज आणि राष्ट्र यांचीं खिळखिळीं झालेलीं नीतिबंधनें याच मार्गानें दृढ होतील.

चारित्र्यवान्, आरोग्यसंपन्न, नीतिमान्, दृढनिश्चयी, दीर्घोद्योगी आणि भक्ति-ज्ञान-वैराग्यसंपन्न अशी व्यक्तीच राष्ट्रमंदिरांतील खरी मूर्ति आहे. मंदि-

रांतील मूर्ति जशा भग्न झाल्या त्याच प्रमाणें भारतांतील सद्गुणसंपन्न व्यक्तीहि आज विचूर्णित झाल्या आहेत. त्या सचेतन मूर्ति पुनः पूर्ववत् नीट घडवून त्यांत शील, चारित्र्याची प्राणप्रतिष्ठा करणारा असा श्रीमन्महाभारत हा एकच अपूर्व मूर्तिकार आहे. महाभारताची महती आणखी काय वानूं ?

श्रीमन्मंगलमूर्तीच्या आणि व्यासांच्या कृपेनें सर्व फलदायी असा अभंग-भारतरूपी एकच प्रयत्न सर्व इष्ट आचारांना प्रेरक होईल. भारताचा अभ्यासच भारताचें विनष्ट होऊं पहाणारें भारतीयत्व पुनः संजीवित करील; आणि असंतोष, अहंकार, स्वार्थ इत्यादि राक्षस-पिशाचांनीं नाडलेल्या जगास धैर्याचा आसरा होऊन भारतच शांति आणि समाधान देईल, या एकाच परमपावन आशेनें भारतमय होऊन गेलीं पांच वर्षें मी आस्थेनें आणि दृढ श्रद्धेनें या ग्रंथराजाची ' अभंग-भारत ' रूपानें अनन्य आराधना आरंभिली आहे.

माझे पुण्याचे आबालवृद्ध प्रेमळ श्रोते या आराधनेंत बहुसंख्येनें आणि अत्यंत आस्थेनें भाग घेत आहेत. त्यामुळें माझी आशा अगदींच विफल जाणार नाहीं, असेंहि मला साधार वाटत आहे.

भावी काळांत या ग्रंथाचीं सर्वत्र पारायणें होऊन व्यावहारिकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या तोंडी विदुरनीति, राजकारणी लोकांच्या तोंडीं उद्योगपर्वांतील मुत्सद्यांचीं भाषणें, वीरांच्या तोंडीं विदुलेनें संजयास केलेला बोध, सर्वांच्या तोंडीं भगवद्गीता आणि ज्ञात्यांच्या तोंडीं सनत्सुजातांचा बोध आणि शांतिपर्वांतलि शांतिदायक अभंगवचनें वास करितील यांत मला लवमात्र शंका वाटत नाहीं.

## अभंग-भारतावर सुवर्णपुष्पवृष्टि

आजच्या काळांतहि या पुण्यपत्तनांत अभंग-भारताच्या आदि व सभापर्व हीं पर्वें असलेल्या पहिल्या खंडाच्या प्रकाशनाचे वेळीं अनेक विद्वानांनीं मंडित अशा सभेंत सहा कुमारिका, सहा सुवासिनी आणि सहा वैदिक-पंडित यांच्या हातून अभंग-भारतग्रंथावर १८ सुवर्णपुष्पें अर्पिलीं जावीं यावरून भारतीयांचें महाभारता-वरील उत्कट प्रेम आणि श्रद्धाच नाहीं कां व्यक्त होत ? ही श्रद्धाच भारतीयांना महाभारताचा अभ्यास करावयास लावील अशी आशा कां बाळगूं नये ?

अभंग भारताचा हा दुसरा खंड मी आज मराठी वाचकांना सादर अर्पण

करीत आहे. यांत महाभारतांतील वनपर्व, विराटपर्व आणि उद्योगपर्व अशीं तीन महत्त्वाचीं पर्वें आलीं आहेत. **वनपर्वांतील** अर्जुनाची पाशुपतास्त्रप्राप्ति आणि स्वर्गगमन, नलोपाख्यान, द्रौपदी-सत्यभामासंवाद, सत्यवान्-सावित्री इत्यादि कथा आणि नहुषधर्म-संवाद, मार्कंडेयधर्म-संवाद, व्याधगीता, यक्षप्रश्न इत्यादि सर्वत्र रत्नांप्रमाणें विखुरलेला बोध हा अभ्यसनीय आहे. **विराटपर्वांतील** धौम्यमुनींनीं धर्मास केलेला बोध आणि कीचकाच्या कथेंतील भीम-द्रौपदीचें भाषण, गोहरणसमयींचा अर्जुनाचा पराक्रम व उत्तरेचा विवाह इत्यादि प्रसंग अविस्मरणीय आहेत. **उद्योगपर्वांतर** अथ पासून इतिपर्यंत सर्वच साररूप आहे. '**भारते सारमुद्योगमितिवृद्धानुशासनम्**' असें ज्ञात्यांनींहि त्याचें वर्णन यथार्थच केलेलें आहे. त्यांत विराटाच्या सभेंतील यादव-पांडवांच्या अधिवेशनांत भगवान् श्रीकृष्णाचें पांडवांच्या पुढील कर्तव्याविषयींचें भाषण, शल्याचें वृत्त, इंद्रनहुषकथा, संजयाचें शमासाठीं धर्मसभेंत वक्तृत्वपूर्ण असें हेत्वाभासात्मक भाषण, त्यास धर्म व कृष्ण यांचीं उत्तरें, सुविख्यात अशी विदुरनीति आणि सनत्सुजातांचा ज्ञानबोध, श्रीकृष्णशिष्टाई आणि कुंतीचा धर्मास निरोप, विदुलेचा उपदेश आणि बिडाल व्रताख्यान हे सर्वच प्रसंग बहारीचे आणि राजनीतिपूर्ण असे आहेत. अशा या महत्वाच्या तीन पर्वांचा हा खंड प्रत्येकानें अवश्य अभ्यासण्यासारखा आहे.

वनपर्वांतील पांडव, विराटपर्वांतील पांडव, आणि उद्योगपर्वांतील पांडव उत्तम रीतीनें अभ्यासून जो वागेल त्याच्या जीवनाला विशिष्ट ध्येययुक्त वळण लागल्यावांचून रहाणार नाहीं.

## वाचकांसाठीं खुलासा

अभंग-भारतांतलि कथाप्रसंगच नव्हे पण शास्त्रीय विषयहि शक्य तितका सुलभ करण्याचा प्रयत्न केला आहे, हें मूळ विषय आणि अभंग-भारत हीं दोन्हीं ताडून पहाणाराच्या सहज ध्यानीं येईल. तरीहि कांहीं प्रसंगीं प्रथम वाचनाचे वेळीं अवघड वाटणारे विषय पुनर्वाचनाचे वेळीं त्याहून सोपे सोपे होत गेल्याचें प्रत्ययास येईल.

वनपर्वाच्या अंतीं यक्षप्रश्न आणि धर्मराजाचीं उत्तरें ज्या पद्धतीनें अभंगांत आणिलीं आहेत ती पद्धति एकदां ध्यानीं आली म्हणजे त्या अभंगांचा अवघड-पणा आपोआप नष्ट होईल. या अभंगांत आधीं यक्षाचे प्रश्न गोंवले असून लगेच

त्या प्रश्नांचीं धर्मानें दिलेलीं उत्तरें यथाक्रम दिलीं आहेत. जरा लक्षपूर्वक वाचल्यानें तें कोणाच्याहि ध्यानीं येईल.

उद्योगपर्वांतील विदुरनीति आणि सनत्सुजातपर्व हा भाग अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळें प्रत्येक अभंगावर त्या अभंगांतील भाग ज्या श्लोकांचा सारांश आहे त्या श्लोकांचे आंकडे दिले आहेत. त्याचा मुळ श्लोक पाहून अभ्यास करणारास चांगला उपयोग होईल. तसेंच हे अभंग एकदांच वाचून सोडून देण्यासारखे नाहींत, तर ते पुनः पुनः अभ्यासावयाचे आहेत. त्यामुळें कांहीं वेळां तरी वाचल्या वांचून त्यांतील मर्म सर्वांनाच ग्रहण करितां येईल असें नाहीं; हें आधींच सांगून टेविलेलें बरें. म्हणजे एकदां वर वर वाचूनच त्याच्या संबंधीं मत व्यक्त करणें इष्ट नाहीं असें टरविण्यास मदत होईल.

## विदुर

महाभारतांत पांडव-श्रीकृष्णावचून भीष्म, द्रोण, कर्ण इत्यादि अनेक महापुरुष आणि कुंती, द्रौपदी, आणि दमयंती, सावित्री इ० महान् स्त्रिया यांच्याप्रमाणें विदुराच्या जीवनाचाहि विशेष अभ्यास करण्यासारखा आहे. किंबहुना श्रीकृष्णावांचून जर प्रथम कोणाचें विशेषत्वानें नांव घ्या, असें मला कोणी सांगेल, तर प्रथम मी **विदुराचेंच** नांव घेईन. संपूर्ण महाभारतांत कोठेंहि पहा, जेथें जेथें विदुर बोलेल तेथें तेथें विवेकाचा झराच वाहूं लागल्याचा अनुभव येईल. 'विदुरनीति' हा तर व्यवहारज्ञानाचा सागरच आहे. उत्कृष्ट व्यवहारासाटीं 'विदुरनीति', उत्कृष्ट ब्रह्मज्ञानासाटीं 'सनत्सुजातांचा बोध' आणि ज्ञान आणि व्यवहार यांचा सुंदर संगम म्हणजे 'भगवद्गीता' अशीं हीं महाभारतांतील तीन महान् पुण्यतीर्थेंच आहेत. त्यांत व्यावहारिकांनी विदुरनीतिकडे जितकें अधिक लक्ष देवेल तितकें अधिक हितप्रद आहे. यासाठीं—

## चातुर्मास्य व्रत घ्या

अभंगभारतांतील विदुरनीतीचे १२६ अभंग रोज पठन करण्याचें व्रतच घेतलें म्हणजे चार महिन्यांत सर्व विदुरनीति मुखोद्गत होऊन जाईल. तसें झालें म्हणजे प्रत्येक व्यवहारप्रसंगीं कसोटी हातीं आल्याप्रमाणें त्याचा आपल्याला प्रत्यक्ष लाभ होऊन आपल्या व्यवहाराचा फुलबाग सुपुष्पित आणि सुगंधित झाल्याचा सात्विक आनंद आपणांस मनमुराद आस्वादावयास सांपडेल. ज्ञानदीपासूनीं सन-

सुजातपर्वांतील अभंगांचाहि असाच उपयोग केल्यास तो निश्चयानें तारकच ठरेल.

## युवक-युवतींनो

मनुष्य नेहमीं ज्याच्या सहवासांत असतो किंवा तो ज्याचें चिंतन करितो अथवा तो जें तीव्रतेनें इच्छितो तसा तो होतो किंवा होऊं शकतो.

आपण तेजस्वी, प्रामाणिक, पराक्रमी, ज्ञानी आणि लोकप्रिय व्हावें असें कोणास बरें वाटत नाहीं? सर्वांनाच वाटतें. पण खरें पाहूं गेलें तर त्या प्रमाणें चिकाटीचा यत्न मात्र फारच थोड्यांकडून होतो. जो ज्या मानानें प्रयत्न करितो त्या मानानें फलहि त्याच्या पदरांत पडत असल्याचेंच प्रायः दिसून येतें. पण चिकाटीचे यत्नच फार क्वचित ठिकाणीं पहावयास सांपडतात. रिकाम्या वेळांत सांपडलें तें पुस्तक वाचावें आणि मिळेल तें ज्ञान संपादावें असें जरी म्हटलें तरी मुद्दाम वेळ काढूनही सत्संगति आणि सद्ग्रंथवाचन नियमितपणें करावेंच लागतें, हें आज आपण जाणावें तितकें जाणीत नाहीं.

सत्संगति अमोघ असली तरी अगम्यच आहे. पण सद्ग्रंथ कांहीं भाग्यवशात् अजून दुर्लभ झाले नाहींत. आणि अनेक पुस्तकें नुसतीं वाचून संपवीत जाण्यापेक्षां भारतासारख्या जगद्वंद्य ग्रंथाचा अभ्यास-सातत्यानें वाचन आणि चिंतन-ठेवणें हें अत्यंत हिताचें आहे. उद्योगपर्वासारखें पर्व अभ्यासून पहा म्हणजे तेंच तेंच पुनः वाचून काय करायचें आहे असल्या शंकेला तुमचें तुम्हींच उत्तर द्याल.

तुम्हीं व्यवहारप्रिय असा किंवा परमार्थप्रिय असा. उद्योगपर्वांतील एकेका प्रसंगांत आणि एकेका वाक्यांतहि वेगवेगळ्या वेळीं, तुम्हांस वेगवेगळींच मनोरम आणि बोधप्रद प्रतिबिंबें दिसतील. आणि ज्ञानाचे पैलू झुंबराच्या तिकोनी किंवा पंचकोनी लोलकाप्रमाणें विविध रंगांनीं रंगून गेलेले पाहून तुम्हीं प्रहर्षित व्हाल. एकच सिद्धांत व्यक्ति, स्थल आणि काल यांच्या भेदानें कशीं विविध मनोहर रूपें धारण करितो आणि तरीहि आपलें मूळ अचल रूप कसें सोडीत नाहीं हें पाहिल्यानेंच मनाची विशालता आणि खोली वाढत असते. पण हें भारतासारख्या परमपवित्र ग्रंथाच्या अभ्यासावांचून प्रत्ययास येणें शक्य नाहीं.

करमणुकीसाठीं पांचशें लघुकथा किंवा शंभर कादंबऱ्या वाचल्या, अथवा भाराभर वर्तमानपत्रें चाळलीं, तरी दासबोध-ज्ञानेश्वरीसारख्या ग्रंथांतील थोडासाच

भागहि अभ्यासिल्यानेंच निःसंशय अधिक लाभ होईल. पण त्याला थोडी अधिक दूर दृष्टि आणि चिकाटी मात्र असावी लागते. तरच हा प्रत्यक्ष अनुभव घेतां येतो. यासाठीं भावी कालाच्या आधारस्तंभ अशा युवक-युवतींनो, थोडा अधिक विवेक करा आणि तारुण्यसुलभ अशा विकारयुक्त भावनांच्या आहारीं न जातां थोड्या निग्रहानें वागून ऐन तारुण्यांतच अवश्य असलेल्या उद्योगपर्वासारख्या महान् ग्रंथाचा चिकाटीनें अभ्यास करा आणि आपल्या पूर्वजांनीं आपल्यासाठीं शाश्वत बोधाचीं कशीं ज्ञानभांडारें भरून ठेविलीं आहेत तें पहा. म्हणजे आजहि त्याचा प्रत्यक्ष व्यवहारांत कसा उपयोग होतो त्याचा तुम्हांस अनुभव येईल.

## प्रौढांनो, वृद्धांनो आणि मातांनो.

सांप्रत कालाच्या कराल गर्जना तुम्हीं ऐकतच अहांत. सांप्रतकालीं धर्मरक्षणाची आपणा सर्वांवर केवढी मोठी जबाबदारी येऊन पडली आहे, तेंहि तुम्हीं जाणतां. धर्मराज म्हणतो—**नाहं राज्यसुखान्वेषी राज्यमिच्छाम्यपिक्षणम्। धर्मार्थं रोचये राज्यं**.........मीं सुखोपभोगासाठीं क्षणभरहि राज्य सुखाची इच्छा करीत नाहीं तर धर्मरक्षणासाठींच राज्याची इच्छा करितों. या धर्मराजाच्या इच्छेप्रमाणें धर्मराज्य प्रस्थापित करून जगांत आदर्श राज्यव्यवस्था निर्माण करणारे हिंदुस्थानांत अनेक राजे होऊन गेले आहेत. हें भारतावरूनहि सिद्ध होईल. तशा राज्यांतहि रामराज्य आणि धर्मराज्य हीं राज्यें जगप्रसिध्दच आहेत. त्या दोन्हींहि राज्यांचा—राज्यव्यवस्थांचा—अभ्यास केला तर त्यांत हेंच आढळून येईल कीं; धर्माचे नियम त्या पैकीं कोणीहि केले नसून पूर्वाचार्यांनीं अथवा ऋषि-मुनींनीं किंवा विरागी ज्ञात्यांनीं घालून दिलेले नियमच त्यांनीं कसोशीनें आमलांत मात्र आणिले आहेत.

योगायोगानें आज आपणा सर्वांच्या हातीं राज्यकारभार आला आहे. अशा वेळीं राज्यव्यवस्थेचें शुद्ध स्वरूप आणि धर्मराज्याची थोरवी ध्यानांत येण्यासाठीं श्रीमन्महाभारताचा अभ्यास हाच एकमेव उपाय आहे. **त्याच्या योगानें चिरसौख्यकारी सिद्धांत म्हणजे धर्म, आणि ते अमलांत आणण्यासाठीं स्वीकारलेले पद्धतशीर राजनियम म्हणजेच कायदे,** हें ध्यानांत येईल. आणि तसें झालें तरच आपल्या स्वैर विहाराला आळा बसेल

आणि ध्येयनिष्ठ राज्यव्यवस्था प्रस्थापित होऊन सर्वांना ज्याच्या त्याच्या अधिकारानुरूप आणि पात्रतेनुरूप आपापला मार्ग सुखानें चालतां येईल.

यासाठीं सर्वांनाच अत्यंत हितकर असें श्रीमहान्महाभारताचें वाचन त्यांचेकडून नियमितपणें व्हावयास पाहिजे. प्रत्येक दिवशीं या ग्रंथांतील कांहीं भाग तरी वाचल्यावांचून झोंपावयाचेंच नाहीं असा नियम करा, आणि आपल्या मुलां-मुलींस तसा नियम करायला लावा. म्हणजे महर्षींचे परम सिद्धांत आणि महापुरुषांची कल्याणकारक वागणूक ध्यानांत येईल आणि आपले व्यवहारहि कल्याणकारक असेच होऊं लागून भारताचें भाग्य उदयास येईल. **आपलें चारित्र्य सुधारल्यावांचून म्हणजे तें धर्मानुकूल झाल्यावांचून इतर कोणत्याहि उपायानें आपली वागणूक परस्परांस हिताची होणार नाहीं. आणि सत्संगतीनें किंवा सद्ग्रंथवाचनानें शास्त्रीय ज्ञान संपादून त्याप्रमाणें निर्धारानें आणि निरलसपणें आवडी-निवडीचा विचारही न करितां आचार सुरू केल्यावांचून चारित्र्यहि सुधारावयाचें नाहीं.** हें ध्यानीं घेऊन शास्त्रीय आचारांची आवड जडवून घ्या; म्हणजे आपल्या मनावर शास्त्रीय संस्कार होतील. तसें झालें तरच तें सुसंस्कृत झालें असें म्हणतां येईल आणि खरी सुसंस्कृतता आली म्हणजे '**धर्मादर्थश्च कामश्च**' हा सिद्धांत प्रत्ययास येईल, सर्व संशयांचा निरास होईल आणि इहपर सौख्याचा निश्चित मार्ग हातीं लागून चित्ताला परम शांति लाभेल. तसेंच आज धर्मनिष्ठ कार्यकर्त्यांचीहि वाण आहे. तीहि महाभारताच्या अभ्यासानेंच दूर होणें शक्य आहे. यासाठीं सर्वत्र भारताचा अभ्यास होणेंच अत्यंत अवश्य आहे.

## धर्म नकोसा झाला नाहीं

काल मोठा विपरीत आला आहे. धर्मावर कोणाची श्रद्धा नाहीं. आतां दिवसेंदिवस अशीच अंदाधुंदी माजायची. असें पुष्कळ लोक म्हणत असल्याचें ऐकूं येतें. कांहीं धूर्त तर 'आतां जातिभेद आणि चातुर्वर्ण्य उरलेलेंच नाहीं' असें मुद्दामच बोलूं लागले आहेत. आणि तेंच सत्य मानून पुष्कळ लोक निराश आणि निरुत्साहीहि झालेले दिसतात. परंतु अजून जनतेंतील धर्मश्रद्धा लवमात्रहि ढळलेली नाहीं. आणि कांहीं तथाकथित पुढाऱ्यांच्या व्यक्तिमत्वामुळें

जनतेचा तोल सुटल्याचा कित्येक वेळां भास झाला तरीहि जरा अंतरंगांत शिरलें म्हणजे तो केवळ भासच असल्याचेंहि तेव्हांच कळून येतें.

इंग्रजी विद्येपेक्षांहि पाश्चात्य वैभवाला व दिमाखाला हुरळून जाऊन मतिभ्रष्ट झालेले कांहीं नामधारी सुशिक्षित सोडून दिले तर, सर्व जनतेला धर्माची पूर्ण आस्था आहे असेंच आढळून येईल. इतकेंच नव्हे तर कै. लोकमान्यांनंतर महाराष्ट्राला चारित्र्यसंपन्न आणि धर्मनिष्ठ असा पुढारी अद्यापि लाभलाच नाहीं अशी लोकांस हळहळ वाटत आहे असेंच आढळून येईल.

## स्वानुभव

आमच्या पुणें येथील धर्मचैतन्य संस्थेच्या धर्मशिक्षणादि कार्यांच्या प्रचारार्थ आमचा लोकांजवळ नित्य संबंध येतो. त्यावेळींहि हाच अनुभव येतो. **सदाचारसंपन्न असे धार्मिक कार्यकर्ते लाभले तर आजहि जनता त्यांचा कोणताहि शब्द खालीं पडूं देणार नाहीं. नाइलाजानें दगडापेक्षां वीट बरी असें मानून आज लोक त्यांतल्यात्यांत निवड करून कालवलेल्या पिठासच दुधाचा मान देत आहेत इतकेंच.** पण तें लोकांना कळत नाहीं असें मात्र नाहीं. तेव्हां आजही लोकांना धर्म नकोसा झाला आहे असें मानण्याचें मुळींच कारण नाहीं.

## आभार आणि विनंती

शेवटीं अभंग-भारताच्या या द्वितीय खंडास ज्यांनीं ज्यांनीं देणगी दिली आणि जे आगाऊ ग्राहक झाले त्यांचेबद्दल दोन शब्द लिहिणें अत्यंत अगत्याचें आहे. एकट्या व्यक्तीला सर्वच दृष्टीनें अशक्य अशा या कामीं रात्रंदिवस तीव्र ध्यास घेऊन आणि तन्मयतेचा आस्वाद लुटीत कविता करणें जरी हाता वेगळें झालें तरी पुढील खटाटोप थोडा का आहे ! उलट कविता करण्यापेक्षां मला पुढील खटाटोपच रुक्ष आणि जिकीरीचा वाटत आहे. छापखान्याकरितां लिहिलेलीं हस्तलिखितें तपासणें, व मुद्रितें तपासणें हीं कामें किती जिकिरीचीं आहेत हें ज्ञात्यांस विदित आहेच. त्यावांचून मुख्य म्हणजे प्रकाशनासाठीं पैसा उभा करणें. पण सज्जनहो काय सांगूं ! मला एकट्यालाच हें सर्व करावें लागल्यामुळें त्रास होतो हें वेगळें, पण लोक या कामीं इतकी आस्था दाखवितात कीं ती पाहून पुष्कळ वेळां अंतःकरण भरून येतें. ग्रंथाचे आगाऊ ग्राहक होतां यावें म्हणून कित्येकांनीं प्रत्येक

महिन्याला आठ-बारा आणे बाजूला ठेवून सहा रुपये करावे तरी गोळा करावे व ते मोठ्या प्रेमानें आणून द्यावे, अशीं उदाहरणें पाहिलीं म्हणजे धर्मग्रंथांबद्दलचा हा लोकांचा आदर पाहून कोणाचें हृदय द्रवणार नाहीं!

उत्कृष्ट टिकाऊ कागद, सुबक छपाई आणि संपूर्ण कापडी बांधणी केलेला असा एवढा मोठा ग्रंथ आजच्या काळांत छापून, तो आगाऊ ग्राहकांस अवघ्या ६ रुपयांस देण्याची मनीषा धरून कामाला लागतांच कित्येक स्त्री-पुरुषांनीं व पुरुषांच्या संमतीनेंच पण विशेषतः स्त्रियांनीं ठिकठिकाणीं जें साह्य केलें, तें केलें नसतें तर इतक्या त्वकर हा भाग मला केवळ द्रव्याभावें प्रकाशितांहि करितां आला नसता. अशा या तळमळीच्या साहाय्यकर्त्यांचे आभार कोणत्या शब्दांत मानूं? हे सर्व साह्यकर्ते आणि आगाऊ ग्राहक मध्यम वर्गांतील आहेत हेंहि लक्षांत ठेवण्यासारखें आहे. धर्म-कार्याबद्दल ही जनतेची आस्था पाहून कार्यकर्त्यांस प्रोत्साहन यावें म्हणून मुद्दाम त्या देणगीदारांचीं नांवें मी पुढें दिलीं आहेत. तोंडानें कळकळ व्यक्त करणेंहि कठीणच, पण आर्थिकदृष्ट्या असह्य अशा आजच्या काळांतहि आर्थिक कळ सोसून कळकळ व्यक्त करणें मध्यम वर्गाला किती कठीण आहे याचा विचार करून पुढें छापलेल्या देणगीदारांची आस्था पहा, म्हणजे सत्कर्मांत आजहि लोक किती आस्थेवाईक आहेत याचा प्रत्यक्ष अनुभव येईल. हें सर्व केवळ माझ्या कीर्तनांतून अभंग-भारताच्या कार्याची माहिती ऐकून स्वयंस्फूर्तीनें अवघ्या तीन-चार महि-न्यांत झालेलें साहाय्य आहे.

## पुण्याच्या श्रोत्यांचें विशेष सहाय्य

पुण्याच्या माझ्या श्रोत्यांनीं तर या कामीं चंगच बांधला आहे. त्यांपैकीं ज्यांना ज्यांना जें जें शक्य झालें तें तें त्यांनीं अत्यंत आपुलकीनें केलें आहे व करीत आहेत. शक्य ते आगाऊ ग्राहक झाले, शक्य त्यांनीं देणग्याहि दिल्या आणि शिवाय कित्येकांनीं या भागाच्या प्रकाशनासाठीं घरोघर जाऊन साहाय्य मिळवून मला उपकृत करून ठेविलें आहे. या सर्व साहाय्यकर्त्यांचे मी मनोभावें आभार मानितों.

पुणें येथील श्रीशारदा मुद्रणालयाच्या चालकांनीं आणि कामगार बंधूंनी प्रथम खंडाप्रमाणेंच हा दुसरा खंडहि अत्यंत आपुलकीनें, इतक्या सुबक रीतीनें आणि वेळेवर छापून दिल्याबद्दल त्या सर्वांचेहि मी मनःपूर्वक आभार मानितों.

तसेंच पुण्यांतील नामवंत ब्लॉकमेकर श्री. गणपतराव मोघे यांनीं माझ्या पूज्य पिताजींच्या अस्पष्ट फोटोचाहि इतका सुबक ब्लॉक आपलेपणानें करून दिला याबद्दल त्यांचा मी मनःपूर्वक आभारी आहें.

त्याचप्रमाणें पुणें येथील चित्रशाळा मुद्रणालयाचे चालकांनीं या ग्रंथांत घालेलीं प्रत्येक पर्वांतील एकेक मिळून तीन चित्रें छापून देऊन ग्रंथाची शोभा वाढविली आहे. त्याबद्दल त्यांचेहि आभार मानणें अवश्य आहे.

## नम्र विनंती

अभंग-भारताच्या पहिल्या खंडाच्या प्रकाशनास जनतेनें, पुढाऱ्यांनीं आणि विद्वज्जनांनीं, तसेंच केसरी, काळ, सकाळ, अखंड-भारत इत्यादि वर्तमानपत्रांनीं इतकें प्रोत्साहन दिलें कीं, त्या प्रोत्साहनाच्या लोंढयांतच दुसऱ्या खंडाची मागणी सुरू झाली आणि त्या ओघांतच दुसऱ्या खंडाच्या कार्यास सुरुवातहि झाली. आणि भगवत्कृपेनें त्या खंडाचें कार्य पूर्ण होऊन हा खंड आज वाचकांच्या हातींहि दिला जात आहे. यापुढें उरलेले तीनहि खंड छापून प्रसिद्ध होण्याचें पुढील कार्य पूर्ण होईपर्यंत सर्वांनीं अशाच चिकाटीनें या कार्यावर प्रेम ठेऊन **पुढील खंडाच्या आगाऊ ग्राहकांत आपलीं नांवें त्वरित नोंदवावीं** आणि हस्तें-परहस्तें साहाय्य करून हें महान्कार्य तडीस न्यावें, अशी जनताजनार्दनास नम्र विनंती आहे. भगवान् गोपाळकृष्णच या सत्य संकल्पाचा दाता असल्यामुळें तोच हें सर्व कार्य तडीस नेईल यांत शंका नाहीं. यासाठीं त्याचेंच स्मरण करून हें प्रास्ताविक निवेदन पुरें करितों.

आपला नम्र,

धर्मचैतन्य संस्था, पुणें.
शके १८७२, कार्तिक व. ११

वा. शि. कोल्हटकर

अभंग-भारत खंड २ रा या ग्रंथाच्या प्रकाशनास

# देणगी देणारांचीं नांवें

५१ रुपये, श्री. रा. अविनाश राजाराम गोडबोले, पुणें
[ कै. पुरुषोत्तम काशिनाथ गोडबोले यांचे स्मरणार्थ ]

५१ ,, सौ. रखमाबाई भालचंद्र माडगांवकर, मुंबई

५१ ,, श्री. रा. राजाराम दामोदर पुरोहित, पुणें

५० ,, श्रीमती सत्यभामाबाई वैद्य, पुणें
[ कै. वासुदेव सदाशिव वैद्य, यांचे स्मरणार्थ ]

३१ ,, सौ. मथुराबाई जोशी, मुंबई

३१ ,, सौ. रेवतीबाई रामकृष्ण वासुदेव, मुंबई

३० ,, श्रीमती भागीरथीबाई बहुलीकर, पुणें

## प्रत्येकीं २५ रुपये देणारांचीं नांवें

### पुणें

श्रीमती पार्वतीबाई आंवळसकर, सौ. सरस्वतीबाई जनार्दन पाडवे, श्रीमती जानकीबाई वाडेकर, भारतसेवक रानडे, श्रीमती राधाबाई पळसुले, श्रीमती रखमाबाई केळकर [ कै. कमलाबाई लागू यांचे स्मरणार्थ ], कै. गणेश विनायक देव, श्रीमती गंगूबाई गणेश देव, श्रीमती यशोदाबाई विद्वांस, श्रीमती मालती विश्वनाथ सेठे, श्रीमती उमाबाई लेले, सौ. वेणूताई घाटे, श्रीमती सावित्रीबाई महाजन, श्रीमती सरस्वतीबाई नरहर पोतदार, श्रीमती कृष्णाबाई गोरे, श्रीमती आकुबाई गुरव, श्रीमती लक्ष्मीबाई भिडे, श्रीमती राधाबाई रानडे, सौ. द्वारकाबाई कुसूरकर [ कै. सौ. बगी कुसूरकर हिचे स्मरणार्थ ], श्री. रा. सी. जी. कीर्तीकर, 'श्र'

## मुंबई [ गिरगांव, ठाकुरद्वार, दादर, वगैरे. ]

श्रीमती गंगाबाई गोखले, सौ. शांताबाई म्हाळस, सेक्रेटरी दादर भगिनी समाज, सौ. मालतीबाई जोशी, सौ. बकुळ देवकुळे, सौ. वसुंधरा मराठे, श्रीमती गोदुबाई गोरे, श्रीमती मुईसाहेब दंडगे, सौ. सुमतीबाई जोशी, सौ. कमलाबाई जोशी, सौ. सत्यभामाबाई विष्णु नेरूरकर, श्रीमती इंदिराबाई गोपाळ लिमये, श्रीमती रखमाबाई ताम्हनकर, सौ. शांताबाई वाशीकर, सेक्रेटरी वनिता विकास मंडळ [ माटुंगा ], श्री. रा. शंकरराव दामले, सौ. सावित्रीबाई गोविंद अभ्यंकर, श्री. रा. कृष्णाजी महादेव दामले, श्रीमती लक्ष्मीबाई दत्तात्रेय साठे, श्री. रा. अनंत प्रभाकर जोशी, श्रीमती वैद्य लक्ष्मीबाई बोरवणकर आयुर्वेद विशारद [ मातुश्रींचे स्मरणार्थ ], सेक्रेटरी आर्य वनिता समाज, सौ. मंदाकिनी केशव मुळे, श्रीमती आनंदीबाई डोंगरे, सौ. सुशिला पद्माकर रेळे, श्री. रा. रामचंद्र दत्ताराम संझगिरी, श्री. रा. विष्णु वासुदेव धारूस, सौ. सुशिलाबेन पुरुषोत्तम नालावाला, श्री. रा. गौतम नारायण सुसळे [ कै. सौ. लक्ष्मीबाई अ. मुळे यांचे स्मरणार्थ ], सौ. जानकीबाई रामचंद्र केळकर, श्री. रा. स. ग. जोशी, श्रीमती लाडूबाई सावंत, श्री. रा. शंकर नारायण काणे [ मामा काणे ], सौ. गंगाबाई गोविंद मराठे, सौ. रमाबाई नारायण घांग्रेकर, श्रीमती लक्ष्मीबाई लिमये [ कै. यज्ञेश्वर दामोदर लिमये यांचे स्मरणार्थ ], श्री. रा. शंकर लक्ष्मण गोविंदेकर, सौ. यशोदाबाई श्रीधर अभ्यंकर, श्रीमती अन्नपूर्णाबाई लक्ष्मण काजरेकर, श्रीमती लक्ष्मीबाई वाड [ कै. गोपाळ जगन्नाथ वाड यांचे स्मरणार्थ ], सौ. कुसूम अनंत जठार, श्री. रा. अनंत सखाराम पटवर्धन, 'क्ष'.

## कुर्ला

श्री. रा. काशिनाथ महादेव किंचे, श्री. रा. विनायक रामचंद्र दातार, सौ. विजया गोखले, श्री. रा. दत्तात्रेय अनंत घोडके, सौ. मालतीबाई सहस्रबुद्धे, सेक्रेटरी भगिनी मंडळ, श्री. रा. बाळकृष्ण परशुराम बापट, श्री. रा. व्यंकटेश रघुनाथ भिडे, सौ. अन्नपूर्णाबाई भास्कर रास्ते.

## ठाणें

श्री. रा. नळिकंठ उर्फ शामराव पांडुरंग क्षीरसागर कुरवंडीकर [ मातुश्री कै. सौ. रुक्मिणीबाई यांचे स्मरणार्थ ], श्री. रा. मोरेश्वर नरहर पंडित [ कै. विष्णु नरहर पंडित यांचे स्मरणार्थ ], सौ. मीनाक्षी पुरुषोत्तम सावले [ मातुश्री कै. सौ. राधाबाई मुळे यांचे स्मरणार्थ ], सौ. आनंदीबाई वासुदेव जोशी, श्री. रा. प्रभाकर पांडुरंग उपाध्ये, [ कै. पांडुरंग गणेश उपाध्ये यांचे स्मरणार्थ ], श्रीमती पार्वतीबाई सदाशिव मोदगी [ कै. सदाशिव रंगनाथ मोदगी यांचे स्मरणार्थ ], श्री. रा. नारायण रामचंद्र जोशी [ कै. माधव नारायण जोशी यांचे स्मरणार्थ ], 'क्ष', सौ. लक्ष्मीबाई आपटे [ कै. ले. कर्नल पद्माकर कृष्ण चितळे यांचे स्मरणार्थ ] मुलुंड.

## विलेपार्ले

श्रीमती पार्वतीबाई गोडबोले, श्री. रा. शंकरराव लिमये, श्री. रा. वासुदेव दामोदर जोग, सौ. भागीरथीबाई गरूड [ बंधु कै. गोपाळराव भगवंत केसकर यांचे स्मरणार्थ ],

श्रीमती राधाबाई वा. भिडे [ शिव ] श्रीमती पार्वतीबाई बोडस कै. वामन महादेव बोडस यांचे स्मरणार्थ, [ शिव ] सौ. सुशिलाबाई यशवंत वैद्य [ डहाणू ], श्री. रा. सदाशिव बळवंत पिंपळखरे [ तारापूर ], श्री. रा. जगन्नाथ भास्कर मळेकर [ तारापूर ], सौ. गिरिजाबाई जोशी [ भिवंडी ], श्री. रा. डोंगरेबंधु दापोली ], श्री. रा. प्रद्युम्न दत्तात्रेय कुंटे [ महाड ].

[ वरील भारतप्रेमी परम उदार स्त्री-पुरुषांनी देणगी दिल्यामुळेंच हा खंड इतक्या अल्पावधींत प्रसिद्ध होऊं शकला. आणि हा किमान १२ रुपये मूल्याचा ग्रंथ आगाऊ ग्राहकांस ६ रुपयास मात्र आणि इतर सर्वांसहि अवघ्या ७॥ रुपयांसच देतां आला. यासाठीं वरील सर्व देणगीदारांचे मी कृतज्ञतेनें पुनः एकदां मनःपूर्वक आभार मानितों ].

लेखक

**अभंग-भारत खंड २ रा**

# —: विषयानुक्रमणिका :—


**आरण्यकपर्व १** अ. १ ते १० पृ. १-८

**अध्याय १** पांडवांच्या वनवासाविषयीं जनमेजयाचा प्रश्न, पांडवांचें प्रस्थान, पौरजनांचें अनुगमन, सत्संगति आणि कुसंगति यांचें वर्णन, युधिष्ठिराच्या प्रार्थनेनें पौरजनांचें दुःखानें परत फिरणें, पांडवांचें सूर्यास्तसमयीं वटवृक्षापाशीं आगमन, त्यांचें मुनिकृत सांत्वन. **अध्याय २** दुसऱ्या दिवशीं वनांत निघालेल्या धर्मराजाशीं ब्राह्मणांचा संवाद, शौनकाचा उपदेश, युधिष्ठिरकृत गृहस्थाश्रमवर्णन, शौनककृत प्रवृत्तिमार्गाची निंदा आणि निवृत्ति मार्गाची प्रशंसा. **अध्याय ३** विप्रपोषणासाठीं धौम्यकथितमार्गानें युधिष्ठिरानें केलेली सूर्याची स्तुति, आणि धर्मास स्थालिप्राप्ति, पांडवांचें काम्यकवनगमन. **अध्याय ४-६** खिन्न धृतराष्ट्राचा विदुरास प्रश्न, विदुराची स्पष्टोक्ति, धृतराष्ट्राचा क्रोध, विदुराचें पांडवांकडे गमन, धर्मराजाची शंका विदुराचें आगमननिमित्त कथन, धृतराष्ट्राचा पश्चात्ताप आणि विदुरास परत बोलावून आणणें. **अध्याय ७-९** विदुरागमनानें दुर्योधनादिकांचा क्रोध, पांडववधार्थ प्रस्थान आणि त्यांचें व्यासकृत निवारण, व्यासांचा धृतराष्ट्रास उपदेश, व्यासकथित इंद्र-सुरभि संवाद. **अध्याय १०** दुर्योधनास व्यासांनीं उपदेश करावा अशी धृतराष्ट्राची प्रार्थना, मैत्रेय बोध करील असें सांगून व्यासांचें गमन, मैत्रेयागमन, त्याचा उपदेश, त्याच्यासमोर उद्दामपणानें दुर्योधनाचें मांडी थोपटणें, मैत्रेयाचा दुर्योधनास शाप आणि त्याचें प्रयाण.

**किर्मीरवधपर्व २** अ. ११ पृ. ८-९

**अध्याय ११** धृतराष्ट्रास विदुरानें कथन केलेलें किर्मीरवधाचें सविस्तर वृत्त.

**अर्जुनाभिगमनपर्व ३** अ. १२-३७ पृ. ९-२४

**अध्याय १२-१३** पांडवदर्शनार्थ भोजादिकांचें आगमन, कौरववधार्थ श्रीकृष्णाची सिद्धता, त्याचें अर्जुनानें केलेलें निवारण, द्रौपदीचा शोक आणि

तिचें कृष्णकृत सांत्वन, द्यूतकालीं मी द्वारकेंत नसल्यामुळें हा प्रसंग आला असें कृष्णाचें युधिष्ठिरास कथन. **अध्याय १४-२२** श्रीकृष्णानें सांगितलेला शाल्व-वधाचा सविस्तर वृत्तांत. **अध्याय २३** इंद्रप्रस्थांतील नागरिकांचें आगमन, धनंजयानें केलेलें त्यांचें सांत्वन आणि त्यांचें स्वनगरीस प्रयाण. **अध्याय २४** पांडवांचें द्वैतवनांत गमन. **अध्याय २५** मार्कंडेयमुनींचें आगमन आणि सामर्थ्य असलें तरी सत्यानेंच लोकांना अनुकूल करून घ्यावें, अधर्म आचरूं नये असा पांडवांस उपदेश. **अध्याय २६** बकदाल्भ्यांचें आगमन आणि ब्राह्मण-क्षत्रियांच्या सहवासाचें फल. **अध्याय २७-२८** द्रौपदीचें दुःख आणि शत्रूला क्षमा न करण्याविषयीं आग्रह आणि क्षमा–दोषकथन. **अध्याय २९** युधिष्ठिरकृत क्षमेचें सविस्तर महात्म्यवर्णन. **अध्याय ३०** धार्मिकांचे क्लेश आणि अधार्मिकांचें वैभव पाहून उद्विग्न झालेली द्रौपदी विधात्याची निंदा करिते. **अध्याय ३१** मी धर्माचरण फलाशेनें करीत नसून कर्तव्यबुद्धीनेंच करीत आहें, असें सांगून युधिष्ठिरानें द्रौपदीस केलेला महत्त्वाचा उपदेश. **अध्याय ३२** द्रौपदीकथित बृहस्पतिनीतिकथन. **अध्याय ३३** द्रौपदीच्या भाषणास अनुमोदन देणारें भीमाचें युक्तियुक्त भाषण. **अध्याय ३४** युधिष्ठिराचें भीमास सखेद उत्तर. **अध्याय ३५** युधिष्ठिरास भीमाचा पुनः उपदेश. **अध्याय ३६** युधिष्ठिराचें भीमास उत्तर, व्यासांचें आगमन, आणि धर्मास 'प्रतिस्मृति विद्यादान' व्यासाज्ञेनें पांडवांचें काम्यकवनगमन. **अध्याय ३७** तपश्चर्येसाठीं अर्जुनाच्या प्रयाणाची सिद्धता, द्रौपदीकृत अभीष्टचिंतन, पार्थाचें हिमाचलगमन आणि तेथें त्यास झालेलें इंद्रदर्शन, शंकराला प्रसन्न करून घेण्याविषयीं इंद्राचा पार्थास उपदेश.

**कैरातपर्व ४** अ. ३८–४१ पृ. २४–२७

**अध्याय ३८-४०** अर्जुनाचें तप, अर्जुन–किरात युद्ध, अर्जुनाला शंकराचें दर्शन, शंकरापासून अर्जुनास अस्त्रप्राप्ति आणि शंकराचें अंतर्धान पावणें. **अध्याय ४१** अर्जुनास लोकपालांची भेट. त्यांच्यापासून अर्जुनास अस्त्रप्राप्ति आणि इंद्राचें आश्वासन.

**इंद्रलोकाभिगमनपर्व ५** अ. ४२–५१ पृ. २७–३३

**अध्याय ४२-४४** अर्जुनाचें स्वर्गगमन, तेथील अद्भुत चमत्कारदर्शन, इंद्रभेट आणि अस्त्रादिकांची प्राप्ति. **अध्याय ४५-४६** इंद्राज्ञेनें उर्वशीचा पार्थ-

भेटीचा संकेत, तिचें पार्थभवनांत आगमन आणि हेतुकथन, तिचा पूज्यभावानें पार्थकृत निषेध, उर्वशीचा पार्थास शाप, पार्थाचा खेद आणि इंद्रानें त्याचें केलेलें समाधान. **अध्याय ४७** लोमशाचें स्वर्गांत आगमन, इंद्रानें लोमशांबरोबर पांडवांस पाठविलेला संदेश, तीर्थयात्राप्रसंगीं पांडवांचें रक्षण करण्याविषयीं लोमशांची अर्जुनानें केलेली प्रार्थना. लोमशांची धर्मास भेट. **अध्याय ४८-४९** स्वर्गास्थित अर्जुनाचा वृत्तांत ऐकून धृतराष्ट्राचा संजयास प्रश्न, संजयकथित पार्थ पराक्रमवृत्त, आगामी अनर्थाविषयीं उभयतांचा संवाद. **अध्याय ५०** पांडवांच्या वनवासाचें संक्षिप्त वृत्तकथन. **अध्याय ५१** धृतराष्ट्राचा पश्चात्ताप, संजयानें त्याला दिलेला दोष आणि माधव-युधिष्ठिर-संवादकथन. शेवटीं विदुर वचनच सत्य होणार असा धृतराष्ट्राचा निर्धार.

## नलोपाख्यानपर्व ६ अ. ५२–७९ पृ. ३४–७१

**अध्याय ५२** भीमानें युधिष्ठिरास केलेला युद्धाग्रह, जशास तसें हें तत्त्व सांगणाऱ्या भीमास युधिष्ठिराचें उत्तर, बृहदश्वमुनींचें आगमन, त्यांच्याकडून युधिष्ठिराहून अधिक दुःखी अशा एका राजाच्या कथेचा प्रस्ताव. **अध्याय ५३-७९** निषधपति पुण्यश्लोक नल-दमयंतीची सुविख्यात संपूर्ण कथा, नलचरित्र-श्रवणाची फलश्रुति, युधिष्ठिरास अक्षविद्याप्राप्ति, विप्रमुखानें पार्थाच्या उग्र तपश्चर्येचें श्रवण.

## तीर्थयात्रापर्व ७ अ. ८०–१५३ पृ. ७१–१४०

**अध्याय ८०-८२** काम्यकवनांत पार्थवियोगानें उद्विग्न झालेल्या पांडवांचा अन्यत्र जाण्याचा विचार, नारदांचें आगमन, पृथ्वीप्रदक्षणेच्या फलाविषयीं पृच्छा, नारदांचें उत्तर आणि पुष्कर, प्रयागादि तीर्थांचें वर्णन. **अध्याय ८३-८५** कुरुक्षेत्र, धर्मतीर्थादिकांचें यात्राफल, गंगास्नानादि फल, तीर्थयात्रेविषयीं नारदांचें प्रोत्साहन. **अध्याय ८६** युधिष्ठिराची अर्जुनाविषयीं उत्कंठा आणि धौम्यमुनींस अन्य रम्यस्थानाविषयीं प्रश्न. **अध्याय ८७-९०** पूर्व, दक्षिण, पश्चिम आणि उत्तर या दिशांच्या तीर्थादिकांचें वर्णन. **अध्याय ९१-९२** स्वर्गांतून लोमशांचें आगमन, अर्जुनाचें कुशलवृत्त आणि इंद्रसंदेशकथन, अर्जुनसंदेश आणि तीर्थयात्रेस प्रोत्साहन, धर्माचा तीर्थयात्रेचा निश्चय, असमर्थ परिवाराचें निवर्तन. **अध्याय ९३** काम्यकवनांतील ब्राह्मणांची बरोबर नेण्याविषयीं प्रार्थना, व्यासादिकांचें दर्शन

त्यांचा उपदेश आणि तीर्थयात्राप्रस्थान. **अध्याय ९४** धार्मिकांचे क्लेश आणि अधार्मिकांचा उत्कर्ष याविषयीं युधिष्ठिराचा प्रश्न आणि लोमशांचें उत्तर. **अध्याय ९५** पांडवांची तीर्थयात्रा आणि गयाचा यज्ञ. **अध्याय ९६-९९** वातापि-इल्वलवृत्तांत, अगस्ति-लोपामुद्रेची कथा, अगस्ति पुत्रजन्म, भार्गवरामाच्या पुनःस्तेजोप्राप्तीचा वृत्तांत. **अध्याय १००-१०५** वृत्रवधासाठीं वज्रोत्पत्ति, वृत्राचा वध, कालेयांचा समुद्रप्रवेश आणि जगाच्या नाशाचा प्रयत्न, त्यांच्या नाशाविषयीं नारायणाची प्रार्थना, नारायणाच्या सांगण्यावरून समुद्र शोषणासाठीं देवांचें अगस्त्यांकडे आगमन आणि त्यांची स्तुति, अगस्तिकृत विंध्यपर्वतनिग्रह, समुद्रशोषण आणि कालेयांचा नाश. **अध्याय १०६-१०७** समुद्रपूर्तीच्या प्रसंगानें सगराची उपकथा, त्याचें पुत्रार्थ तप आणि वरलाभ, साठ सहस्र सगरांची उत्पत्ति, सागराचा यज्ञ, सागरांस कपिलांचें दर्शन, त्यांचा नाश, सगरपौत्र अंशुमानास कपिलांचा वर, सगरयज्ञसमाप्ति, सगर, अंशुमान आणि दिलीप यांना स्वर्गप्राप्ति. **अध्याय १०८-१०९** भगीरथाचें गंगाराधन आणि शिवप्रसाद, गंगावतरण आणि तिचा समुद्रसमागम. **अध्याय ११०-११३** युधिष्ठिराचें हेमकूट पर्वतावर प्रयाण, ऋष्यशृंगाचें जन्मवृत्त, लोमपादाच्या राज्यांत अनावृष्टि, तेथें ऋष्यशृंगास नेणें, ऋष्यशृंगास शांता नामक कन्येचें समर्पण, विभांडकाचा कोप आणि त्याचा उपशम. **अध्याय ११४** पांडवांचें कलिंगदेशगमन, वैतरणींत पितृतर्पण आणि वेदीवर आरोहण. **अध्याय ११५-११७** भार्गवचरित्र, रेणुकेस पुत्रप्राप्ति, रामकृत मातृवध, कार्तवीर्यवध, कार्तवीर्यपुत्रकृत जमदग्निवध, रामाचा विलाप, क्षत्रियांचा नाश, पितृतर्पण, त्याची पितरकृत क्रूरकर्मनिवृत्ति, पृथ्वीदान, धर्माला रामाचें दर्शन. **अध्याय ११८** समुद्रतीरावरील तीर्थावलोकन, प्रभासतीर्थागमन, वृष्णींशीं समागम. **अध्याय ११९-१२०** पांडवदुःखानें बळिरामाचा विषाद, सात्यकीचा कौरव-नाशार्थ संकेत, त्याचें कृष्ण व धर्मकृत समाधान व पुढील यात्रा. **अध्याय १२१** गययज्ञवर्णन, शर्यातियज्ञदेशदर्शन. **अध्याय १२२-१२५** च्यवनतपश्चर्या, सुकन्याकृत नेत्रवेध, सुकन्येची संपूर्ण कथा, शर्यातिकृतयज्ञ, मदराक्षसाची उत्पत्ति, अश्विनीकुमारांचें सोमपान, पांडवांचें वाराणसीकडे प्रयाण. **अध्याय १२६** युवनाश्व-तप, मांधात्याचा जन्म आणि त्याचा अतुल प्रभाव. **अध्याय १२७-१२८** जंतूपाख्यान, सोमकाचा एकपुत्रत्वाविषयीं शोक, यागांत जंतूची आहुति, सोमकाला शंभर पुत्रांची प्राप्ति, जंतूचा पुनर्जन्म; सोम

काचा ऋत्विजांसह नरकवास व स्वर्गवास. **अध्याय १२९** सोमकाश्रमवर्णन, त्याप्रसंगानें एक अख्यायिका. **अध्याय १३०-१३१** श्येन-कपोतीय आख्यान. **अध्याय १३२-१३४** अष्टावक्राची अद्भुत व बोधप्रद कथा, जनकराजसभेंत अष्टावक्र व बंदी यांचा वाद, बंदीचा पराभव, पितृप्रसादानें अष्टावक्रास सुंदर शरीरप्राप्ति. **अध्याय १३५-१३८** यवक्रीताख्यान, वालधीची कथा, यवक्रीताचें दुर्वर्तन व त्याचा वध, रैभ्यपुत्राच्या हातून चुकीनें घडलेला पितृवध, पाप-क्षालनार्थ भ्रात्याची योजना, गुरुहीन अध्ययनाहून गुरुमुखानें केलेल्या अध्ययनाची श्रेष्ठता. **अध्याय १३९** पांडवांचें मैनाकपर्वतावलोकन, युधिष्ठिराची द्रौपदी-रक्षणार्थ आज्ञा. **अध्याय १४०** द्रौपदीसह सपरिवार गंगाद्वारीं राहण्याविषयीं युधिष्ठिराचा भीमास उपदेश, सर्वांना खांद्यावर वाहून नेण्याचा भीमाचा संकल्प. **अध्याय १४१** अर्जुनदर्शनाची उत्सुकता, गंधमादनासमीप गमन. **अध्याय १४२** भौमासुराच्या अस्थि व त्याची कथा, वराह अवतारवर्णन. **अध्याय १४३-१४५** पांडवांचा गंधमादनावर प्रवेश, तेथें अतिवृष्टि व झंझावात, द्रौपदीची मूर्च्छा, घटोत्कचस्मरण व त्याचें आगमन, दैत्यस्कंधावरून बदरिकाश्रमीं गमन, पांडवांस नर-नारायणांचें दर्शन. **अध्याय १४६-१५१** द्रौपदीसाठीं भीमाचें कमळें आणावयास जाणें, मार्गांत हनुमंताची भेट, हनुमंताचा भीमास उपदेश, कृतादि युगांचें वर्णन, वर्णधर्मकथन, हनुमंताच्या उग्ररूपाचा उपसंहार, त्याचा भीमाला वर. **अध्याय १५२** गंधमादनावरील मार्गाचें वर्णन. **अध्याय १५३-१५६** भीमाचें कुबेर क्रीडास्थानीं गमन, त्याची जलक्रीडा, त्याचा कुबेर रक्षकांकडून प्रतिकार, भीमहस्तें त्यांचा संहार आणि कमळांचें ग्रहण, युधिष्ठिरास भयसूचक चिन्हें, धर्माचें भीमाजवळ आगमन, धर्मराजाचा कुबेर मंदिराकडे जाण्याचा बेत, आकाशवाणीनें केलेलें त्याचें निवारण, सर्वांचें नर-नारायणाश्रमास प्रत्यागमन.

**जटासुरवधपर्व ८** अ. १५७ पृ. १४१-१४२

**अध्याय १५७** विप्रवेषधारी जटासुराचा पांडव-आश्रमांत निवास, भीमाच्या अनुपस्थितींत त्यानें केलेलें द्रौपदी, धर्मादिकांचें हरण, भीमाचें आगमन आणि जटासुर वध.

**यक्षयुद्धपर्व ९** अ. १५८-१६४ पृ. १४३-१४८

**अध्याय १५८** पांडवांचा नर-नारायणाश्रमांत वास, पुढें वृषपर्व्याच्या

आश्रमांत गमन, परिवार तेथें ठेऊन पांडवांचें उत्तरेकडे गमन, हिमालय वर्णन, आर्ष्टिषेण मुनिदर्शन. **अध्याय १५९** युधिष्ठिरकृत मुनिसत्कार, तेथेंच राहून कुबेरदर्शन घेण्याचा मुनींचा धर्मास उपदेश. **अध्याय १६०-१६२** राक्षसवधार्थ द्रौपदीची भीमास प्रेरणा, भीमाचें शिखरारोहण, तेथें राक्षसांशीं युद्ध, युधिष्ठिराची चिंता, त्याचें शैलशिखरगमन, भीमास उपदेश, कुबेरभेट, त्याची पांडवांना कुबेर मंदिरांत रहाण्यास अनुज्ञा, भीमाला वरप्राप्ति, पार्थभेटीस्तव पांडवांचा तेथें निवास. **अध्याय १६३** आर्ष्टिषेण व धौम्य यांचें शैलशिखरावर आगमन, विविध पर्वत वर्णन, **अध्याय १६४** पांडवांचा गंधमादन पर्वतावर निवास, पार्थाचें आगमन.

निवातकवच युद्धपर्व १० अ. १६४–१७५ पृ. १४८–१५४

**अध्याय १६५** धर्मादिकांस पार्थाची भेट, मातलीचें प्रयाण, स्वर्गातील संक्षिप्त-वृत्तकथन. **अध्याय १६६** इंद्रागमन, त्याचा युधिष्ठिराला आशीर्वाद, काम्यक वनांत जाण्याचा उपदेश आणि त्याचें स्वस्थानीं प्रयाण. **अध्याय १६७** अस्त्रप्राप्तीविषयीं युधिष्ठिराचा अर्जुनास प्रश्न, किरातयुद्धकथन, पाशुपतास्त्र प्राप्ति. **अध्याय १६८** पार्थाला विप्ररूपानें इंद्रदर्शन आणि अस्त्रें प्राप्त करून घेण्याविषयीं अनुज्ञा, पार्थाचें इंद्रलोकीं गमन, निवातकवच्यांच्या वधाची आज्ञा, त्यास देवदत्त शंखाची प्राप्ति. **अध्याय १६९-१७३** पार्थाचें निवातकवच्यांशीं युद्ध, दानवांचा नाश, मातलीकृत अर्जुनप्रशंसा, पार्थाचा दैत्यनगरींत प्रवेश, हिरण्यपुराचें वर्णन, पार्थकृत दानवसंहार, नगरीचा नाश, आणि इंद्रलोकीं गमन, **अध्याय १७४** अर्जुनाला इंद्रापासून कवच-किरीट प्राप्ति, पार्थास परत जाण्याची अनुज्ञा, त्यास भ्रात्यांची भेट. **अध्याय १७५** युधिष्ठिराच्या इच्छेप्रमाणें अर्जुनाचा अस्त्रप्रदर्शन प्रयोग व त्यास नारदांनीं केलेला प्रतिकार.

आजगरपर्व ११ अ. १७६–१८१ पृ. १५५–१६१

**अध्याय १७६-१७७** युधिष्ठिर-भीम संवाद, पांडवांचें गिरीवरून खालीं उतरणें, त्यांचें विशाखयूपारण्यांत वास्तव्य. **अध्याय १७८-१८१** भीमास अजगरानें धरिलें, अजगररूपी नहुषाचें पूर्ववृत्त, युधिष्ठिराचें भीमशोधार्थ गमन, अजगर-युधिष्ठिरसंवाद, नहुषाची शापनिवृत्ति आणि स्वर्गगमन.

**मार्कंडेयसमास्यापर्व १२** अ. १८२–२३२ पृ. १६१–२०२

**अध्याय १८२** वर्षाकालवर्णन, शरदृतूच्या आरंभीं पांडवांचें काम्यक-वनगमन. **अध्याय १८३** पांडवांस मामा-कृष्णभेट, युधिष्ठिराचें कृष्णकृत सांत्वन, पुत्रांचें कुशल वृत्तकथन, मार्कंडेय व नारद यांचें आगमन, युधिष्ठिराचा कर्मफलविषयक प्रश्न व मुनिदत्त बोधप्रद उत्तर. **अध्याय १८४** हैहयवृत्त, अरिष्ट-मुनि-महात्म्य. **अध्याय १८५** वैन्यराजर्षीवृत्त, राजसभेंत वाद, सनत्कुमारांचा निर्णय, **अध्याय १८६** तार्क्ष्य-सरस्वती संवाद, सनातनतत्वनिरूपण. **अध्याय १८७** वैवस्वतमनूचें चरित्र. **अध्याय १८८** युधिष्ठिराचा प्रलयकालाविषयीं प्रश्न, चतुर्युगाचें वर्णन, कलींतील अधर्म, युगान्तींचा अनाचार, वटपत्रशायी बालकाचें मार्कंडेयांस दर्शन. **अध्याय १८९** परमात्मस्वरूपकथन, श्रीकृष्णच पर-मात्मा आहे असें निवेदन. **अध्याय १९०** कलियुगांतील अधर्मवर्णन आणि कल्कीचा अवतार. **अध्याय १९१** कल्किवर्णन, कृतयुगारंभवर्णन, युधिष्ठिरास धर्मोपदेश. **अध्याय १९२** परिक्षितराजा आणि मंडूककन्या यांची कथा. **अध्याय १९३** इंद्र-बकसंवाद, दीर्घायु लोकांचें सुख-दुःखवर्णन. **अध्याय १९४** औशीनर-सुहोत्रवृत्त. **अध्याय १९५** ययातीचें औदार्य. **अध्याय १९६** सेदुक-वृषदर्भवृत्त. **अध्याय १९७-१९८** श्येन-कपोतवृत्त, अष्टकाचे भ्राते व नारद यांचा संवाद, शिबीचें औदार्य. **अध्याय १९९** इंद्रद्युम्नाचें उपाख्यान. **अध्याय २००** निष्फल दानें, निष्फल जन्म, सत्पात्र दानें आणि यमलोक यांचें वर्णन, विप्रसत्कारमहात्म्य, ज्ञानसाधनें आणि दानवर्णन. **अध्याय २०१-२०४** धुंधुमाराचें उपाख्यान, उत्तंकाचें तप आणि वरलाभ, बृहदश्वसुत कुवलाश्ववृत्त, धुंधूदैत्यवधसंकेत, धुंधूचें वृत्त, मधुकैटभांना वर आणि त्यांचा वध, धुंधूचें तप, कुवलाश्व-धुंधुयुद्ध, धुंधुदैत्याचा वध. **अध्याय २०५-२०६** पतिव्रतामहात्म्य, पतिव्रता भिक्षेकरी-संवाद, ब्रह्मज्ञ लक्षणें, व्याधास परमधर्म विचारण्याचा ब्राह्मणाला उपदेश. **अध्याय २०७-२१६** ब्राम्हणाचें मिथिलेस गमन, धर्मव्याध भेट, व्याधोक्त स्वधर्म कथन [ व्याधगीत प्रारंभ ] शिष्ट व शिष्टाचार, हिंसानिर्णय, पूर्व कर्म, जीवाचें अमरत्व, पुण्या-पापाचानिर्णय, मोक्ष हेंच परमपद आणि त्याचीं साधनें, पाप-पुण्याचरणाचीं कारणें, ब्रह्मज्ञानोपदेश, पंचभूतांचे गुण, इंद्रियजय, शरीररथाचें रूपक, सत्वादि गुण व त्यांचें कार्य, मोक्षोपाय, प्राणादींचें कार्य, चित्तप्रसादलक्षण, ज्ञानाचें

परमसाधन, विप्रास व्याधाच्या वृद्ध माता-पितरांचें दर्शन, विप्राचें पूर्ववृत्त-कथन, व्याधास पूर्वजन्मांतील शाप, त्यास मुनीकृपेनें धर्मज्ञान, व्याधाचा पुनः उपदेश आणि संतुष्टविप्राचें स्वस्थानीं गमन. [ व्याधगीता समाप्त ] **अध्याय २१७-२३२** अंगिरसाख्यानाचा प्रारंभ, अंगिरास पुत्रप्राप्ति, बृहस्पतीचा जन्म व देवांचें गुरुत्व, अंगिरा त्याची पत्नी आणि त्यांचीं अपत्यें, बृहस्पति-अग्नीची संतति, अग्नीचा वंशवृत्तांत, इंद्रकृत देवसेना-संरक्षण, देवसेना वृत्त, अग्नीचा ऋषि-भार्याभिलाप, स्वाहादेवीचा अग्नि-समागम, कार्तिकेयजन्म आणि त्याचा पराक्रम, कार्तिकेयाचें सविस्तर चरित्र, त्याचें देवसेनापतित्व, देव-दानवयुद्ध, महिषासुराचा वध, देवांचें स्वस्थानीं गमन, कार्तिकेयाचीं नांवें, स्तुति व फलश्रुति.

**द्रौपदी-सत्यभामासंवादपर्व १३** अ. २३३–२३५ पृ. २०२–२०५

**अध्याय २३३-२३४** पतीवशीकरणाविषयीं सत्यभामेचा द्रौपदीस प्रश्न, द्रौपदीचें स्पष्ट उत्तर, ढोंगी मांत्रिकाच्या नादीं लागल्याचे दुष्परिणाम, द्रौपदीचे स्वदिनचर्याकथन, साध्वीधर्मकथन. **अध्याय २३५** सत्यभामेचें सांत्वनपर भाषण व भामेसह कृष्णाचें स्वनगरास प्रयाण.

**घोषयात्रा पर्व १४** अ. २३६–२५७ पृ. २०६–११७

**अध्याय २३६-२३७** धृतराष्ट्राला विप्रद्वारा पांडववृत्तबोध, धृतराष्ट्राचें दुःख, पांडवांस दुःख देण्यासाठीं कर्णाचा दुर्योधनाला द्वैतवनांत जाण्याविषयीं उपदेश. **अध्याय २३८-२३९** दुर्योधनाचा कर्णादिकांशीं संकेत आणि घोषयात्रेचा निश्चय, धृतराष्ट्राचा विरोध असतांहि त्याची अनुज्ञा मिळविणें. **अध्याय २४०-२४१** कौरवांचें द्वैतवनांत गमन, युधिष्ठिराचा यज्ञ, कौरवांची गंधर्वांशीं गांठ कौरव आणि गंधर्व यांचें युद्ध, कर्णाचें पलायन. **अध्याय २४२-२४३** कौरवअमात्यांची पांडवांस शरणागति, भीमकृत निर्भर्त्सना, युधिष्ठिराचा उपदेश, पार्थाची कौरवमुक्तीविषयीं प्रतिज्ञा. **अध्याय २४४-२४६** पांडवप्रयाण त्यांचें गंधर्वांशीं युद्ध, सर्वांचें धर्मराजापाशीं आगमन, युधिष्ठिराचा दुर्योधनास उपदेश व त्यास स्वस्थानीं जाण्याची अनुज्ञा. **अध्याय २४७-२४८** दुर्योधनाचा मार्गांत निवास, कर्णास युद्धवृत्तांतकथन. **अध्याय २४९-२५२** दुर्योधनाचा प्रायोपवेशनाविषयीं निर्धार, त्यास दुःशासन-कर्णादींचा उपदेश, दैत्यकृत दुर्योधन हरण आणि दुर्योधनाचें प्रायोपवेशनापासून निवारण, पुढें त्याचें स्वनगरास

गमन. **अध्याय २५३** दुर्योधनास भीष्मांचा उपदेश, कर्णाचें दिग्विजयार्थ प्रयाण. **अध्याय २५४** कर्णाचा दिग्विजय आणि प्रत्यागमन. **अध्याय २५५-२५६** दुर्योधनाचा राजसूयाविषयीं विचार, त्याचा पुरोहितकृत निषेध, दुर्योधनाचा यज्ञ. **अध्याय २५७** दुर्योधनाचा नगरप्रवेश, कर्णाची अर्जुनवध-प्रतिज्ञा आणि युधिष्ठिराची चिंता.

**मृगस्वप्नोद्भवपर्व १५** अ. २५८ पृ. २१७

**अध्याय २५८** युधिष्ठिराला स्वप्नांत मृगदर्शन, द्वैतवन सोडून जाण्याची प्रार्थना, पांडवांचें काम्यकवनांत गमन.

**व्रीहिद्रौणिकपर्व १६** अ. २५९-२६१ पृ. २१७-२२१

**अध्याय २५९** युधिष्ठिराच्या मनाचें अस्वास्थ्य, व्यासांचें आगमन आणि त्यांचा उपदेश, दान-तप श्रेष्ठत्वनिर्णय. **अध्याय २६०** मुद्गलाची शिलोञ्छवृत्ति, दुर्वासकृत त्याच्या अन्नाचा अपहार, मुद्गलाची निष्ठा, देवदेवतांचें आगमन, त्यास मुद्गलाचा स्वर्गाविषयीं प्रश्न. **अध्याय २६१** स्वर्गांतील गुणदोषांचें वर्णन. मुद्गलाचें स्वर्गसुखतुच्छ मानणें, त्यास परमपदप्राप्ति.

**द्रौपदीहरणपर्व १७** अ. २६२-२७१ पृ. २२१-२२८

**अध्याय २६२-२६३** दुर्योधनाकडे दुर्वासांचें आगमन, सेवासंतुष्ट मुनींना पांडवांचें सत्त्व पहाण्याविषयीं प्रार्थना, पांडवांकडे दुर्वासागमन, द्रौपदीचें कृष्णस्तवन, शाकान्नभक्षण, मुनींची तृप्ति आणि पलायन, श्रीकृष्णाचें प्रयाण, **अध्याय २६४-२७१** जयद्रथाला द्रौपदीचें दर्शन, तिच्याकडे कोटिकास्यप्रेषण. जयद्रथाला द्रौपदीवृत्तकथन, द्रौपदीहरण, पांडवागमन, जयद्रथाचा पाठलाग, त्याच्याशीं युद्ध, द्रौपदीची मुक्तता, जयद्रथावर चाल.

**जयद्रथविमोक्षणपर्व १८** अ. २७२ पृ. २२८-२२९

**अध्याय २७२** जयद्रथाची विटंबना आणि मुक्तता, त्याचें तप, शिवदर्शन, कृष्णमहात्म्यकथन, शंकराचा वर.

**रामोपाख्यानपर्व १९** अ. २७३-२९२ पृ. २३०-२४१

**अध्याय २७३** युधिष्ठिराचा विलाप, द्रौपदीचें गुणवर्णन, धर्माचा मार्कंडेयांस प्रश्न. **अध्याय २७४-२९१** रामादिकांचे जन्म. रावणादिकांचे जन्म,

आणि संपूर्ण राम-रावणयुद्धवृत्त. **अध्याय २९२** मार्कंडेयांनीं केलेलें युधिष्ठिराचें सांत्वन.

**पतिव्रतामाहात्म्यपर्व २०** अ. २९३–२९९ पृ. २४५–२५६

**अध्याय २९३** अश्वपतीचें अपत्यार्थ अनुष्ठान, सावित्रीजन्म, तिचें वरशोधार्थगमन. **अध्याय २९४** तिचें प्रत्यागमन, नारदद्वारां सत्यवानाचें अल्पायुष्यवृत्तकथन, सावित्रीचा निर्धार. **अध्याय २९५** सावित्री–सत्यवानविवाह आणि सावित्रीचें वनांत वास्तव्य. **अध्याय २९६-२९८** सावित्रीचें व्रताचरण, पतीसह अरण्यांत गमन, सत्यवानाचा असह्य मस्तकशूल, सावित्रीस यमदर्शन, सावित्री–यमसंवाद, यमाचे वर आणि त्याचें स्वस्थानीं गमन, सत्यवानाचें उत्थान, भाषण व आश्रमगमन, द्युमत्सेनास दृष्टिलाभ, पुत्रशोध, ऋषींचें आश्वासन, सत्यवान–सावित्रीचें आगमन आणि वृत्तांतकथन. **अध्याय २९९** द्युमत्सेनास राज्यप्राप्ति, यमाच्या वरांची फलद्रूपता, आख्यानाची फलश्रुति.

**कुंडलाहरणपर्व २१** अ. ३००-३१० पृ. २५६–२६१

**अध्याय ३००-३०२** कुंडलें न देण्याविषयीं सूर्याचा कर्णाला उपदेश, कर्णाचें उत्तर आणि सूर्याचा परोपरीनें उपदेश, कर्णाचा निश्चय, वासवी शक्ति मागून घेण्याचा सूर्याचा उपदेश. **अध्याय ३०३-३०५** कुंतिभोज राजकन्येची दुर्वाससेवेस योजना, कुंतीकृत दुर्वाससेवा आणि वरप्राप्ति. **अध्याय ३०६-३०८** कुंतीचें सूर्यास आवाहन, कुंती–सूर्यसंवाद, कर्णजन्म, बालक पेटींत घालून नदींत सोडणें, कुंतीचा विलाप आणि स्वस्थानीं प्रयाण. **अध्याय ३०९-३१०** राधेला पेटीची प्राप्ति, बालकाचा पुत्रत्वानें स्वीकार; कर्णाचें कौरवांशीं सख्य, विप्रवेषधारी इंद्राचें आगमन, कवच–कुंडलांची याचना, सशर्तवासवीशक्ति प्रदान, कवच कुंडलसमर्पण; कर्णावर पुष्पवृष्टि.

**आरणेयपर्व २२** अ. ३११–३१५ पृ. २६१–२७०

**अध्याय ३११** विप्रअरणीहरण, त्याचें युधिष्ठिरापाशीं आगमन, पांडवांचा अरणीशोध. **अध्याय ३१२** पांडवांचें दुःखकारण निवेदन, तृषित धर्मराजाचें उदक आणण्यासाठीं सहदेव प्रेषण, सरोवरावर सर्व बांधवां, चें पतन, त्यांच्या शोधार्थ युधिष्ठिराचें गमन. **अध्याय ३१३-३१४** युधिष्ठिराचा विलाप

जलप्राशनास यक्षाचा प्रतिबंध, यक्षाचे प्रश्न आणि त्यास धर्मराजानें दिलेलीं उत्तरें, यक्षाची प्रसन्नता, यक्षवरानें चारी पांडवांचें पुनरुत्थान, यमधर्मस्वरूपकथन, धर्मराजाला वरप्राप्ति. अध्याय ३१५ अज्ञातवासार्थ ब्राह्मणांची अनुज्ञा, धौम्यकृत युधिष्ठिरसांत्वन, ब्राह्मणांचें स्वस्थानीं प्रयाण, पांडवांचा एकांतांत विचार, वनपर्वाची फलश्रुति.

---

## ४ विराटपर्व

**प्रवेशपर्व १** अ. १–१२ पृ. २७१–२८०

**अध्याय १-३** अज्ञातवास संकेत आणि स्वस्ववेषांतराचें वर्णन. **अध्याय ४** पांडवपरिवाराचें द्वारकानगरींत गमन, धौम्यांचा पांडवांना हितोपदेश, पांडवांचें गुप्तप्रयाण आणि धौम्यांचें पांचालदेशीं गमन. **अध्याय ५-६** शमीवृक्षावर शस्त्रांचें आधान, विराटनगरींत प्रवेश, दुर्गास्तवन आणि देवीचा वर. **अध्याय ७-१२** कंक, बल्लव, सुदेष्णा, गोपाध्यक्ष, बृहन्नला आणि अश्वपाल या रूपांनीं द्रौपदीसह पांडवांचा विराटसदनीं निवास.

**समयपालनपर्व २** अ. १३ पृ. ८०–८१

**अध्याय १३** पांडवांचा विराटगृहीं दिनक्रम, जीमूतमल्लाचा वध.

**कीचकवधपर्व ३** अ. १४–२४ पृ. २८१–२९३

**अध्याय १४** कीचकाचें सुदेष्णेशीं संभाषण, द्रौपदीशीं भाषण, त्याची द्रौपदीकृत निभर्त्सना. **अध्याय १५** कीचकाचा सुदेष्णेशीं संकेत, कीचकगृहीं सैरंध्रीप्रेषण. **अध्याय १६** कीचकाचा सैरंध्रीशीं अतिप्रसंग, राजसभेंत तिची न्याय-याचना, युधिष्ठिराची तिला राणाच्या मंदिरांत जाण्याविषयीं आज्ञा. **अध्याय १७-२०** द्रौपदीनें घेतलेली भीमाची भेट, त्यांचा संवाद, आणि तिनें केलेलं युधिष्ठिरादींचें आणि स्वतःचें दुःखनिवेदन. **अध्याय २१-२२** भीमकृत द्रौपदीसांत्वन आणि कीचकवधाचें आश्वासन, कीचकाला नृत्यशाळेंत बोलावण्याचा संकेत, कीचक-सैरंध्री संवाद, कीचकवधाचें सविस्तर वृत्त, द्रौपदीनें द्वाररक्षकांना केलेलें कीचकवधवृत्तनिवेदन. **अध्याय २३-२४** अनुकीचकागमन, दहनार्थ

द्रौपदीबंधन, द्रौपदीकृत प्रार्थना, अनुकीचकांचा वध आणि द्रौपदीची मुक्तता, सुदेष्णेची सैरंध्रीला निघून जाण्याची आज्ञा, तिनें मागितलेली तेरा दिवसांची मुदत.

**गोहरण पर्व ४** अ. २५--६९ पृ. २९४-३२१

**अध्याय २५** पांडवशोधार्थ गेलेल्या हेरांकडून वृत्तकथन. **अध्याय २६-२९** दुर्योधनाची चिंता, कर्ण, द्रोण, भीष्म आणि कृपाचार्य यांनीं सांगितलेले उपाय आणि केलेला उपदेश. **अध्याय ३०** विराटनगरीवर चाल करण्याविषयीं त्रिगर्तांची प्रेरणा, कौरवांचें प्रयाण आणि गोहरण. **अध्याय ३१** गोपांनीं विराटाला कथन केलेलें धेनुहरणवृत्त, बल्लवादिकांना युद्धार्थ नेण्याची विराटाची आज्ञा व त्याचें सैन्यप्रयाण. **अध्याय ३२-३३** मत्स्य-त्रिगर्तांचें युद्ध, विराटबंधन, त्याच्या मुक्ततेसाठीं धर्माची भीमाला आज्ञा, विराटाची मुक्तता, सुशर्माबंधन, धर्माज्ञेनें त्याची मुक्तता. **अध्याय ३४** विराटानें केलेला पांडवांचा सत्कार, विराटनगरींत जयघोषणा. **अध्याय ३५** कौरवांचा विराटनगरींत प्रवेश, उत्तराला धेनुहरणवृत्तकथन. **अध्याय ३६-३७** विराटपुत्राची आत्मश्लाघा; बृहन्नलेला सारथी करण्याविषयीं सैरंध्रीची प्रशंसा; उत्तरेची बृहन्नलेस प्रार्थना, बृहन्नलेचें राजपुत्रापाशीं आगमन, वीरांचीं वस्त्रें हरून आणण्याविषयीं राजकन्येची प्रार्थना, बृहन्नलेसह उत्तराचें प्रयाण. **अध्याय ३८** कौरवसैन्य पाहून राजपुत्राचें पलायन, बृहन्नलादर्शनानें हा अर्जुन असावा अशी शंका, बृहन्नलेचें राजपुत्राला परत आणून युद्धार्थ रथारोहण. **अध्याय ३९** कौरवसैन्यांतील उत्पात. द्रोणकृत अर्जुनप्रशंसा कर्णानें केलेला निषेध. **अध्याय ४०-४३** अर्जुनाचें शमीवृक्षासमीप गमन, राजपुत्राला वृक्षावरील शस्त्रें काढण्याची प्रेरणा, उत्तराचें शंका-समाधान; गांडीवधनुष्यादि दिव्यास्त्रें पाहून विस्मित उत्तराचा प्रश्न आणि अर्जुनानें त्यास दिलेलें उत्तर. **अध्याय ४४** पांडव वास्तव्याविषयीं उत्तराचा प्रश्न, कंकादिकच पांडव आहेत असें अर्जुनाचें उत्तर, अर्जुनाचीं दहा नांवें. **अध्याय ४५** शमीवृक्षावरील शस्त्रग्रहण, क्लीबत्वनिवृत्तिपूर्वक अर्जुनाचें दिव्यास्त्रचिंतन. **अध्याय ४६** देवदत्तशंखध्वनीनें भयाकुल झालेला उत्तर; रथारूढ पार्थास पाहून द्रोणांचा दुर्योधनास उपदेश. **अध्याय ४७-४८** कर्णकृत-द्रोणनिंदा आणि आत्मश्लाघा, **अध्याय ४९-५१** कृपांचें नीतिवचन आणि कर्णाची निंदा, अश्वत्थमाकृत कर्णनिभर्त्सना, दुर्योधन आणि कर्ण यांनीं मागितलेली आचार्यांची क्षमा, द्रोणांचा हितोपदेश. **अध्याय ५२** अज्ञातवासकालाविषयीं भीष्मांचा निर्णय, दुर्योधनाला उपदेश,

भीष्मकृत व्यूहरचना. **अध्याय ५३** अर्जुनाचें चरणावर बाण सोडून द्रोणांना वंदन. पार्थ शंखनादानें विराटधेनूंचें राजनगरींत पलायन. **अध्याय ५४-६५** अर्जुनाचें कौरववीरांशीं तुमुल युद्ध आणि कृप, द्रोण, कर्णादिकांचें पलायन. **अध्याय ६६** अर्जुनाच्या संमोहनास्त्रानें भीष्माखेरीज सर्वांना मूर्छा आणि त्यांचें वस्त्रहरण, भीष्मवचनानें कौरवांचें स्वनगरगमन, दुर्योधनाचें किरीटच्छेदन. **अध्याय ६७** पांडवांचें वास्तव्य प्रगट न करण्याविषयीं उत्तरास निवेदन. शमीवृक्षावर शस्त्रांची स्थापना, उत्तराचा बृहन्नलेसह नगरप्रवेश. **अध्याय ६८** विराटाचा नगरप्रवेश, दूतांनीं केलेली उत्तराच्या जयाची घोषणा, उत्तराचें स्वागत, विराट व कंक यांचें द्यूत, कंकानें केलेली बृहन्नला प्रशंसा, विराटाचा क्रोध, कंकास अक्षताडन, रक्तस्राव, सैरंध्रीनें सुवर्णपात्रांत त्याचें केलेलें ग्रहण, उत्तरागमन, पुत्रवचनानें कंकाची क्षमा, विराटकृत पुत्राभिनंदन. **अध्याय ६९** देवपुत्रानें कौरवांस जिंकिलें असें उत्तराचें कथन, तो दोन दिवसांनीं प्रगट होईल असें उत्तराचें अभिवचन, हरण करून आणलेल्या वस्त्रांचें राजकन्येस समर्पण, पार्थ व उत्तर यांचा पुढील योजनेविषयीं संकेत.

**वैवाहिकपर्व ५** अ. ७०-७२ पृ. ३२१-३२६

**अध्याय ७०** पांडवांचें राजवेषानें विराटसभेंत गमन, युधिष्ठिराचें राजसिंहासनावर उपवेशन, विराटाचा आक्षेप, अर्जुनकृत युधिष्ठिरवर्णन, **अध्याय ७१** अर्जुननिवेदित धर्मादिकांचा परिचय, उत्तरकृत अर्जुनपराक्रमवर्णन, उत्तरेचें पाणिग्रहण करण्याविषयीं पांडवांची प्रार्थना. **अध्याय ७२** अर्जुनानें स्नुषात्वानें केलेला उत्तरेचा स्वीकार, विराटाचें अनुमोदन, पांडवांचें उपप्लव्य नगरींत वास्तव्य, श्रीकृष्णादिकांचें आगमन, अभिमन्यु-उत्तरा-विवाह, फलश्रुति.

---

## ५ उद्योगपर्व

**सेनोद्योगपर्व १** अ. १-१९ पृ. ३२७-३४०

**अध्याय १-६** यादव आणि पांडव यांचें विराटसभेंत अधिवेशन आणि पुढील कर्तव्याविषयीं कृष्ण, बलराम, सात्यकि आणि द्रुपद इत्यादिकांचीं अनुकूल प्रतिकूल भाषणें होऊन द्रुपदाच्या पुरोहिताचें हास्तिनापुरीं प्रेषण. **अध्याय ७**

दुर्योधन आणि अर्जुन यांचें एकाचवेळीं द्वारकेंत आगमन आणि उभयतांची श्रीकृष्णास युद्धाच्या मदतीविषयीं मागणी. **अध्याय ८** शल्याचें पांडवसहाय्यार्थ प्रस्थान, दुर्योधनाचें कपट, शल्य-पांडव भेट, कर्ण तेजोभंगाविषयींच्या विनंतीचा स्वीकार. **अध्याय ९-१८** शल्यधर्मसंवाद, इंद्राचें पूर्ववृत्त, वृत्रवधकथा, इंद्राचा जलप्रवेश, नहुषाला इंद्राभिषेक, त्याची इंद्राणीविषयीं अभिलाषा, इंद्राणीला बृहस्पतीचें अभयदान, अगस्त्यशापानें पतन होईपर्यंतचें नहुषाचें सर्व वृत्त, इंद्राचें देवलोकीं गमन, शल्यकृत पांडवांचें सांत्वन, या कथेची फलश्रुति आणि शल्याचें दुर्योधनाकडे प्रयाण. **अध्याय १९** सात्यकीप्रभृति वीरांचें युधिष्ठिराकडे ससैन्य आगमन आणि भगदत्तादिकांचें दुर्योधनाकडे गमन.

**संजययानपर्व २** अ. २०-३२ पृ. ३४०-३५३

**अध्याय २०** द्रुपदपुरोहिताचें कौरवसभेंत गमन आणि द्रुपदवचन-कथन. **अध्याय २१** पुरोहितवचनास भिष्मांचें अनुमोदन, कर्णाचा आक्षेप, भीष्मकृत अर्जुनप्रशंसा आणि धृतराष्ट्राचें संजयप्रेषणाचें अश्वासन, **अध्याय २२** धृतराष्ट्रकृत दुर्योधननिंदा, पांडवप्रशंसा आणि संजयप्रेषण. **अध्याय २३-२५** पांडवसभेंत संजयाचा सत्कार, संदेशश्रवणाविषयीं संजयाची विनंती, युद्धाचा निषेध आणि संक्षिप्त संदेश कथन. **अध्याय २६-३०** युधिष्ठिराचें स्व-परहित विवेचन आणि राज्य देऊन शम-करण्याविषयीं प्रतिसंदेश, गुरुजनांचा वध करून राज्य मिळवणें हा अधर्म आहे असा संजयाचा परिणामकारक उपदेश, धर्मानेंच राज्य मिळवूं असें युधिष्ठिराचें भाषण, श्रीकृष्णाचें भाषण, चातुर्वर्ण्यधर्मकथन, कौरवनिषेध, महाद्रुमाचें रूपक, युधिष्ठिरकृत संजयप्रशंसा, सर्वांचें कुशल विचारणें, पुनः दुर्योधनाला संदेश. **अध्याय ३१-३२** भीष्मादिकांना संधि करण्याविषयीं प्रार्थना, पांच गांवें तरी देण्याविषयीं दुर्योधनाला संदेश, संजयाचें धृतराष्ट्राकडे रात्रीं आगमन, कुशल कथन; धृतराष्ट्रनिंदा आणि स्वगृहीं प्रयाण.

**प्रजागरपर्व ३** अं. ३३-४० पृ. ३५४-३९३

**अध्याय ३३-४०** धृतराष्ट्राचें विदुराला रात्रौ पाचारण, राजाचा चिंतेनें निद्राभंग, त्याविषयीं विदुराला प्रश्न, विदुराचें सविस्तर उत्तर ( यालाच ' विदुर नीति ' असें म्हणतात. या विदुरनीतींत धर्ममूलक व्यवहाराचें सर्वोत्कृष्ट संकलित ज्ञान आलें असल्यामुळें या नीतीच्या अभ्यासावांचून आणि आचारावांचून कोणा-

सहि भगवद्गीतेसारखें तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ अनुभविण्याचा आणि अन्य शिण्याचाहि खरा अधिकार प्राप्त होणार नाहीं, इतका महत्त्वाचा सर्वांना उपयोगी पडणारा व्यवहार बोध या विदुरनीतींत आलेला आहे. )

**सनत्सुजातपर्व ४** अ. ४१–४६ पृ. ३९४–४१०

**अध्याय ४१-४६** धृतराष्ट्राचा विदुरास ब्रह्मतत्त्वविषयीं प्रश्न, विदुराचें स्वशूद्रत्व ध्यानांत घेऊन केलेलें सनत्सुजातस्मरण, मुनींचें आगमन, विदुराची त्यांना धृतराष्ट्राला ब्रह्मबोध करण्याविषयीं प्रार्थना, धृतराष्ट्राचा मृत्यूविषयीं प्रश्न आणि सनत्सुजातांचें त्यास विस्तृत उत्तर. ( या पर्वांत सनत्सुजातांनीं केलेला बोध हा ब्रह्मविद्येच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा असून या विषयावरील श्रीमदाद्यशंकराचार्यांचें भाष्यहि प्रसिद्ध आहे.)

**यानसंधिपर्व ५** अ. ४७–७१ पृ. ४१०–४२६

**अध्याय ४७** पांडवसंदेशश्रवणार्थ राजाचें कौरवसभेत आगमन. **अध्याय ४८** संजयकथित अर्जुनाचा संदेश. **अध्याय ४९** कृष्णार्जुन हे नरनारायणच होत या विषयीं भीष्मकथित पुरातनकथा, कर्णनिंदा, द्रोणांचा उपदेश. **अध्याय ५०** धृतराष्ट्राचा प्रश्न; संजयमूर्छा; संजयकृत पांडवयोद्ध्यांचें वर्णन. **अध्याय ५१-५३** खिन्न धृतराष्ट्रकृत भीमवर्णन; अर्जुन पराक्रमस्मरण, युधिष्ठिर सात्यक्यादिकांच्या स्मरणानें अनुताप आणि स्वपुत्रांना शमाचा उपदेश. **अध्याय ५४** कौरवांचा क्षयच होणार असें संजयकथन. **अध्याय ५५** दुर्योधनाचें स्वबलाधिक्यवर्णन, आणि आत्मश्लाघा. **अध्याय ५६** संजयकृत पांडवसैन्य वर्णन. **अध्याय ५७** पांडवपक्षीयांच्या भिन्न भिन्न योद्ध्यांच्या वधार्थ केलेल्या प्रतिज्ञांचें कथन, दुर्योधनाची पुनः आत्मश्लाघा, धृष्टद्युम्नाचा कौरवांना संदेश. **अध्याय ५८** धृतराष्ट्राचा उपदेश, दुर्योधनाची शम न करण्याची प्रतिज्ञा, धृतराष्ट्राचा विलाप. **अध्याय ५९** धृतराष्ट्राचा प्रश्न. संजयकथित कृष्णवचन निवेदन. **अध्याय ६०-६१** पांडवप्रेमामुळें देवता त्यांना साहाय्य होतील असें धृतराष्ट्रवचन, त्याला दुर्योधनाचें उत्तर. **अध्याय ६२** कर्णाचो आत्मश्लाघा, भीष्मकृत कर्णनिंदा, कर्णाचा सभात्याग, भीष्मकृत कर्णोपहास. **अध्याय ६३** कर्णादिकांच्या साह्यानेंच पांडवांचा वध करण्याविषयीं दुर्योधनवचन, विदुरोक्त शमप्रशंसा. **अध्याय ६४** भांडणाऱ्या पक्ष्यांची आख्यायिका, मधाच्या पोळ्याचा दृष्टांत. **अध्याय ६५**

धृतराष्ट्रकृत पांडव पराक्रमवर्णन, त्यांना अर्धराज्य देण्याविषयीं उपदेश. **अध्याय ६६** संजयकृत अर्जुन संदेशकथन. **अध्याय ६७** राजांचें स्वस्थानीं गमन, सैन्याच्या बलाधिक्याविषयीं धृतराष्ट्राचा प्रश्न, व्यास आणि गांधारीचें सभेंत आगमन. **अध्याय ६८** कृष्णाअर्जुनांचें यथार्थ स्वरूपवर्णन. **अध्याय ६९** संजयकथित कृष्णमहात्म्य, धृतराष्ट्राचा उपदेश, गांधारीकृत पुत्रनिर्भत्सना. भगवत्प्राप्त्युपाय कथन. **अध्याय ७०** श्रीकृष्णनामांची व्युत्पत्ति. **अध्याय ७१** धृतराष्ट्रकृत श्रीकृष्ण स्तवन आणि शरणागति.

**भगवद्यानपर्व** ६ अ.७२-१५० पृ. ४२६-४७७

**अध्याय ७२-७३** भगवद्यानाचा उपोद्घात. गमनांतील गूढ हेतूचें युधिष्ठिरास कथन. **अध्याय ७४-७५** मृदुभाषणानें शम करण्याविषयीं भीमाची विनंति, श्रीकृष्णकृत भीमोपहास, **अध्याय ७६** क्षुब्ध भीमाचें स्वपौरुषकथन. **अध्याय ७७** श्रीकृष्णकथित दैवोद्योगांचें बलाबल. **अध्याय ७८-७९** अर्जुनाची कर्तव्य-निश्चयाविषयीं श्रीकृष्णाची प्रार्थना, श्रीकृष्णाचें उत्तर. **अध्याय ८०** उचित निश्चय करण्याविषयीं नकुलाची प्रार्थना. **अध्याय ८१** युद्धच घडवून आणण्याविषयीं सहदेवोक्ति, त्याला सर्वांची संमति. **अध्याय ८२** दुर्योधनाला योग्य शासन करण्याविषयीं द्रौपदीची प्रार्थना, भगवंताचें आश्वासन. **अध्याय ८३** अर्जुनाचा निरोप, सात्यकीस रथसिद्धतेची आज्ञा, कृष्णप्रस्थान, कुंतीला आश्वासन देण्याविषयीं युधिष्ठिर प्रार्थना, श्रीकृष्णास मार्गांत महर्षिदर्शन. **अध्याय ८४** मार्गांतील श्रीकृष्णाचे शुभशकुन. **अध्याय ८५** मार्गांतील दुर्योधननिर्मित निवासस्थानें, श्रीकृष्णाचें हस्तिनापुरगमन. **अध्याय ८६** श्रीकृष्ण-स्वागताची धृतराष्ट्राची सिद्धता. **अध्याय ८७** कृष्ण-पांडव भेद करणें अशक्य असल्याचें विदुरवचन, पांडवांस पुत्रवत् वागविण्याचा धृतराष्ट्रास उपदेश **अध्याय ८८** कृष्णसत्काराविषयीं दुर्योधनाचा विरोध, भीष्मांचा उपदेश. कृष्णाला बद्ध करण्याचा दुर्योधनाचा विचार, भीष्मकृत निषेध, **अध्याय ८९** हास्तिनापुरांत श्रीकृष्णाचा प्रवेश, त्यांचें स्वागत आणि विदुरगृहीं निवास. **अध्याय ९०** कुंतीची भेट, विलाप, तिला श्रीकृष्णानें दिलेलें आश्वासन, **अध्याय ९१** श्रीकृष्णास कौरवांचें भोजनार्थ आमंत्रण, श्रीकृष्णकृत निषेध, विदुरगृहीं भोजन. **अध्याय ९२-९३** कौरवसभेंत न जाण्याविषयीं विदुरकृत प्रार्थना, श्रीकृष्णाचें उत्तर. **अध्याय ९४** कौरवसभाप्रवेश, सभेंत ऋषींचें आगमन.

**अध्याय ९५** पुत्रनिग्रह करून पांडवांचें राज्य त्यांना देण्याविषयीं श्रीकृष्णाचा धृतराष्ट्राला बोध, पांडव युद्ध व शम या दोहोंलाहि सिद्ध असल्याचें निवेदन. **अध्याय ९६** जामदग्न्योक्त दंभोद्भवाख्यान, कृष्णार्जुन हे नर-नारायणच होत असें कथन. **अध्याय ९७-१०५** कण्वमुनिकथित मातलीवरान्वेषणाचें सविस्तर वृत्त, गरुडाचें गर्वहरण, गर्व करूं नकोस असा कण्वांचा दुर्योधनास उपदेश, दुर्योधनकृत उपहास. **अध्याय १०६-१२३** नारदाचा दुर्योधनाला उपदेश, गालवाख्यान, सर्व दिशांचें वर्णन, गालवाचें पूर्वेकडे गमन, शाण्डिलीचा प्रभाव, ययातीकडून माधवीची प्राप्ति, तिच्या दानानें गालवास अश्वप्राप्ति, माधवीचें वनवासगमन, ययातीचा स्वर्गवास, अहंकारामुळें ययातीचें पतन, अहंकारत्यागाविषयीं नारदाचा दुर्योधनास उपदेश. **अध्याय १२४** धृतराष्ट्रवचनानें श्रीकृष्णाचा दुर्योधनास उपदेश. **अध्याय १२५-१२६** भीष्म-द्रोणांचा पुनः पुनः उपदेश. **अध्याय २७** पांडवांस सुईच्या अग्राइतकीहि भूमि न देण्याविषयीं दुर्योधनाची प्रतिज्ञा. **अध्याय १२८** श्रीकृष्णकृत दुर्योधन निर्भर्त्सना, दुःशासनाचें भाषण, राजांसह दुर्योधनसभात्याग, भीष्मकृत दुर्योधन निंदा, श्रीकृष्णाचा भीष्मादिकांस दुर्योधनत्यागाविषयीं उपदेश. **अध्याय १२९** गांधारीचें सभेंत आगमन, तिनें धृतराष्ट्राला दिलेला दोष, तिच्या आज्ञेनें दुर्योधनाचें सभेंत पुनरागमन, गांधारीचा दुर्योधनास उपदेश. **अध्याय १३०** दुर्योधनाचा सभात्याग, कृष्णबंधनसंकेत, त्या गुप्त संकेताचें सात्यकीनें केलेलें निवेदन, श्रीकृष्णाचें भाषण, धृतराष्ट्रकृत पुत्रनिर्भर्त्सना, विदुरकृत निषेध, **अध्याय १३१** श्रीकृष्णाचें विश्वरूप दर्शन, धृतराष्ट्राला दिव्यचक्षूंची प्राप्ति, श्रीकृष्णाचें कुंतीच्या गृहाकडे प्रयाण. **अध्याय १३२-१३६** कुंतीस सर्व वृत्तकथन, तिने केलेला स्वपुत्रनिषेध. मुचकुंदाची कथा, युद्ध करून राज्य मिळविण्याविषयीं संदेश, विदुलेचा तेजस्वी उपदेश, (संपूर्ण विदुलाख्यान) आख्यानाची फलश्रुति. **अध्याय १३७** कुंतीचा पुत्रांना उपदेश. श्रीकृष्णाचा कर्णास उपदेश. उपप्लव्य नगरीस प्रयाण. **अध्याय १३८** भीष्मादिकांचा दुर्योधनाला उपदेश, **अध्याय १३९** भीष्मांचें दुःखोद्गार, द्रोणांचा पुनः उपदेश. **अध्याय १४०-१४१** धृतराष्ट्र-संजय संवाद, कर्णाला कृष्णाचा उपदेश व कर्णाचें उत्तर. **अध्याय १४२-१४३** कृष्णकर्णसंवाद आणि कर्णाचें स्वस्थानीं प्रयाण. **अध्याय १४४-१४६** विदुर-पृथासंवाद, कुंतीचें कर्णाकडे गमन, त्यास त्याच्या जन्माचें वृत्तकथन, कौरव पक्ष न

सोडण्याचा त्याचा निश्चय, अर्जुनावांचून चारहि पांडवांचा वध न करण्याविषयीं कुंतीला आश्वासन, **अध्याय १४७-१५०** श्रीकृष्णाचें पांडवांकडे प्रत्यागमन, भीष्मांचें पूर्ववृत्तकथन आणि हस्तिनापुरांतील सर्व वृत्तनिवेदन.

**सैन्यनिर्याणपर्व** ७ अ. १५१-१५९ पृ. ४७८-४८३

**अध्याय १५१** पांडवांची सेनापतींची योजना, ससैन्य कुरुक्षेत्रप्रवेश, **अध्याय १५२** पांडवशिबिराचें वर्णन. **अध्याय १५३** कौरवांची सज्जता. **अध्याय १५४** धर्माची शंका, कृष्णकृत समाधान, युद्धाचा निश्चय. **अध्याय १५५** कौरवसेनावर्णन. **अध्याय १५६** सेनाध्यक्ष होण्याविषयीं भीष्मांची प्रार्थना, कर्णाची युध्द न करण्याची प्रतिज्ञा, भीष्मांना सेनापत्याभिषेक, कौरवांचें कुरुक्षेत्रीं प्रयाण. **अध्याय १५७** पांडवांकडील सेनापतींना अभिषेक, बलरामाचें आगमन, त्याचें तीर्थयात्रेस प्रयाण. **अध्याय १५८** पांडवसाह्यार्थ रुक्मीचें आगमन, त्याचें स्वनगरीस प्रयाण. **अध्याय १५९** धृतराष्ट्राचा दैवाला दोष, संजयाचें उत्तर.

**उलूकदूतागमनपर्व** ८ अ. १६०-१६४ पृ. ४८३-४८६

**अध्याय १६०-१६३** दुर्योधनाचा संकेत, पांडवांकडे उलूकप्रेषण, बिडालाख्यान, सैन्यसागराचें रूपक, उलूकोक्त संदेशकथन, कृष्णाचें उत्तर, पांडवांचा दुर्योधनाला संदेश, कौरवांची युध्दघोषणा. **अध्याय १६४** पांडवांचे रणांगणगमन, विभाग योजना.

**रथातिरथसंख्यानपर्व** ९ अ. १६५-१७२ पृ. ४८७-४९०

**अध्याय १६५** दुर्योधनाचा पांडवांच्या बलाबलाविषयीं प्रश्न. **अध्याय १६६-१६७** कौरवसैन्यांतील रथातिरथांची गणना आणि श्रेष्ठ योध्दयांचें वर्णन. **अध्याय १६८** कर्णाची अर्धरथ्यांत गणना, त्याची युध्द न करण्याची प्रतिज्ञा, भीष्मकृत निर्भत्सना आणि दुर्योधनोक्त सांत्ववचन. **अध्याय १६९-१७२** पांडवांकडील रथीअतिरथी आदि योद्धे, त्यांचें वर्णन आणि शिखंडी व पांडव यांचा वध न करण्याची भीष्मप्रतिज्ञा.

**अम्बोपाख्यानपर्व** १० अ. १७३-१९६ पृ. ४९०-५००

**अध्याय १७३-१९२** शिखंडीच्या अवध्यत्वाविषयीं दुर्योधनाचा प्रश्न

आणि भीष्मकथित शिखंडीचें सर्व पूर्ववृत्त असलेलें सविस्तर अम्बोपाख्यानवर्णन, शिखंडीला आजन्म पुरुषत्वप्राप्ति, शिखंडीशीं युद्ध न करण्याची भीष्मांची प्रतिज्ञा. **अध्याय १९३** शत्रुसैन्याचा किती काळांत नाश कराल असा दुर्योधनाचा प्रश्न, त्यास भीष्म-द्रोणादिकांचें उत्तर, कर्णाचा उपहास. **अध्याय १९४** युधिष्ठिराचा भ्रात्यांशीं संवाद, धनंजयाची प्रतिज्ञा. **अध्याय १९५** कौरवसेनेचें नगरांतून निर्गमन, त्यांचा शिबिरप्रवेश. **अध्याय १९६** पांडव सेनेचें निर्गमन आणि सेनाविभागवर्णन.

---

॥ श्री ॥

**अभंग भारत खंड १ ला —**

# विद्वानांचे अभिप्राय

— रूपांतर कौशल्यानें करण्यांत तुम्ही पूर्णपणें यशस्वी झालां आहांत. माझी अशी खात्री आहे कीं प्राचीन भारतांतील नामवंत कवि मुक्तेश्वर मोरोपंतांच्या कलाकृतीच्या तोडीचा तुमच. हा ग्रंथ होऊन यानें मराठी वाङ्मयांत अमोल भर पडेल.

आपला

**माधव श्रीहरि अणे.**

— अभंगांची भाषा सुलभ, रसानुकूल आणि प्रासादिक असून ते अभंग कंठगत करण्याला फारसे परिश्रम लागणार नाहींत. —हा उपक्रम स्तुत्य व उत्तेजनार्ह आहे.

**केसरी**

— गद्याची सुलभता, पद्याचें गेयत्व, काव्याचें माधुर्य, आणि अभंगांतील प्रसाद हे या मराठीकरणाचे मुख्य गुण या पुस्तकांत उत्कटतेनें अनुभवास येतात.

**सकाळ**

—अभंगभारताची रचना करून सर्व महाराष्ट्र भाषाभाषी लोकांवर बुवांचे अत्यंत उपकार झाले आहेत.

**अखंड भारत**

# अभंग-भारत खंड १ ला, प्रकाशन समारंभ



अभंग भारताचा प्रथम खंड धर्मचैतन्य संस्था पुणें येथें प्राचार्य सोनोपंत दांडेकर यांचे अध्यक्षतेखालीं प्रसिद्ध झाला. त्यावेळीं ग्रंथावर १८ सुवर्णपुष्पें अर्पण करण्यांत आलीं. त्यावेळचें छायाचित्र. ( श्रावण व.८ शके १८७१ ).

-ॐ नमो भगवते वासुदेवाय-

# अभंग-भारत

( महाभारताचा अभंगमय सुबोध भावार्थ )

## ३ वनपर्व

### आरण्यकपर्व १

नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ॥
देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत् ॥ १ ॥

अध्याय १ ला                अभंग १ ला

वैशंपायनासी म्हणे जनमेजय । वनामाजी काय पुढती झालें ॥ १ ॥
प्रपितामह ते कैसे राहियेले । कैसे कंठियेले दिवस त्यांनीं ॥ २ ॥
मुनि म्हणे जातां पांडव वनासी । नागरिक जाती मागोमाग ॥ ३ ॥
म्हणती सुख कैसें दुष्टांच्या राज्यांत । राहूनि आम्हांस प्राप्त होई ॥ ४ ॥
धर्मात्मे पांडव, त्यांच्या मागें जाऊं । आनंदानें राहूं तयांसह ॥ ५ ॥
चिंतूनियां ऐसें म्हणती पांडवांसी । त्यागूनि आम्हांसी जाऊं नका ॥ ६ ॥
सर्वदा वीरांनों होईल कल्याण । तुम्हांसंगें दिन कंठूं आम्हीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे फल संगतीचें । कथिती धर्मातें जन ऐका ॥ ८ ॥

२

वस्त्र जल तिल भूमि । सुगंधित तीं सुमानीं ॥ १ ॥
मोहकारी मूढसंग । सुजन दाविती सन्मार्ग ॥ २ ॥

विद्या, कुल, पूर्वप्रज्ञा, । शुद्ध आचार, जयांनां ॥ ३ ॥
व्हावी तयांची संगती । शास्त्राहूनि श्रेष्ठ साची ॥ ४ ॥
दुष्ट स्पर्श तें दर्शन । सहवास संभाषण ॥ ५ ॥
भ्रष्ट करी धार्मिकासी । दुष्ट सहवास जांची ॥ ६ ॥
घडो धर्माचा सहवास । इच्छा हेचि सकळांस ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे जन । म्हणती सज्जनचि धर्म ॥ ८ ॥

३

धर्म म्हणे जनां पाहूनि हें प्रेम । आम्हीं धन्य धन्य झालों जगीं ॥१॥
विनविंतों तुम्हां स्वस्थळासी जावें । सुहृदांसी द्यावें आमुच्या सौख्य॥
ठेव ती आमुची सांभाळा कृपेनें । शपथ धर्मानें घातली त्यां ॥ ३ ॥
श्रेष्ठ कार्य हेंचि जाणावें आमुचें । विनवी जनांतें धर्मराज ॥ ४ ॥
ऐकूनि वचन फिरले माघारीं । निंदिती अंतरीं कौरवांसी ॥ ५ ॥
रथारूढ वीर जान्हवीच्या तीरीं । वटवृक्षातळीं प्राप्त झाले ॥ ६ ॥
शुद्ध आचमनें रात्र कंठियेली । विप्र भोंवतालीं वसले बहु ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे श्रेयस्कर वन । कथूनि सांत्वन करिती मुनि ॥ ८ ॥

अध्याय २ रा

४

प्रातःकाळीं वीर चालले काननीं । भिक्षाजीवी मुनि पुढती उभे ॥
राव म्हणे आतां जातों वनामाजीं । वन्य वस्तु राजी करिती आम्हां ।
राज्यहीन आम्हीं सत्कार विप्रांचा । करावा तो कैसा हेंचि दुःख ॥
दोषयुक्त वन हिंस्र पशु सर्प । वसती वनांत रात्रंदिन ॥ ४ ॥
यास्तव सुखानें जावोनि माघारीं । इच्छित सुस्थळीं वास करा ॥५
म्हणती विप्र आम्हीं भक्त तुझे राजा । त्यागिसी कां ऐसा आम्हांलागीं ।
पोषणाची चिंता नको वाहूं मनीं । कष्टें संपादूनि राहूं आम्हीं ॥७॥
वासुदेव म्हणे कथा, होम, जप । करूनियां तोष म्हणती देऊं ॥८॥

५

धर्म म्हणे हाय विप्र मजसाठीं । क्लेश भोगिताती न घडो ऐसें ॥१॥
धिक्कृत असो ही हीनावस्था माझी । बैसला तो ऐसी वदूनी वाचा ॥
पाहूनि तें दुःख वदला शौनक । मोह निवर्तक वचन ऐका ॥ ३ ॥

जागोजागीं शोक दुःख तें मूढासी । न शिवे ज्ञात्यासी कदाकाळीं ४
यज्ञ दानार्थ हा करिसी जरी शोक । नाहीं तेणें मोक्ष जाण बापा ॥
तितिक्षा ते नाशी दुःखें मानसिक । विवेक हा स्थिर तुझ्याठाईं ॥६॥
मनःस्थैर्यकारी श्लोक जनकाचे । कथितों ते ऐकें युधिष्ठिरा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे शौनकाची वाणी । ऐकूनियां ध्यानीं नित्य धरा ॥८॥

६

रात्रंदिन श्रम अनिष्टाचा लाभ । इष्टाचा वियोग तेंवी व्याधि ॥ १ ॥
क्लेशकारी ऐसीं कारणें जनांसी । निवारूनि त्यांसी सुखी व्हावें ॥२
व्याधीसी औषध, अन्य विषयानें- । आधि, निश्चयानें दूर होई ॥३॥
तप्तायः पिंडानें जलतप्त होई । देह दुःख तेंवी मनाधीन ॥ ४ ॥
ज्ञानेंचि तें शमे मानसिक दुःख । वासुदेव क्लेश हरती तेणें ॥ ५ ॥

७

स्नेह आधीचें कारण । विषयासक्ति मूळ जाण- ॥ १ ॥
प्रीति, संकल्प पुढती । संकल्पाची महाख्याति ॥ २ ॥
अग्नि वृक्षकोटरींचा । समूळचि नाशी वृक्षा ॥ ३ ॥
धर्म, अर्थ, तैं आसक्ति । त्वरित समूळ ते छेदी ॥ ४ ॥
त्याग सत्य न वियोगें । अनासक्त जो संयोगें ॥ ५ ॥
राया तोचि खरा त्यागी । आसक्ति न ज्याची भोगीं ॥ ६ ॥
भोग्य अनित्य, हा भाव । तारी म्हणे वासुदेव ॥ ७ ॥

८

रम्यदर्शनें ज्या सुप्रसन्न चित्त । इच्छी तेंचि होत, पुढती तृष्णा १
उद्वेगाचें मूळ निमित्त पापाचें । जराजर्जरातें न सुटे तृष्णा ॥ २ ॥
प्राणांतिक व्याधि आदिअंतशून्य । तृष्णा, त्यागें धन्य होई नर ॥३॥
अव्यक्त अनल जाळी जैं काष्ठासी । तेंवी हे देहासी दग्ध करी ।४।
वासुदेव म्हणे तैसाचि हा लोभ । आमिषाचा मार्ग नित्य धरी ।५।

९

अर्थसाधनें तीं मोहकारी जाण । आयव्ययें श्रम संरक्षणें ॥ १ ॥
परस्परनाश होई धनासाठीं । असंतुष्ट चित्तीं मूढ सदा ॥ २ ॥

संतोषचि जनीं सर्वोत्तम सुख। रूप धनादिक अनित्य तीं ।। ३ ।।
संचयी न कोणी उपद्रवशून्य। संचय त्यागून सुखी व्हावें ।। ४ ।।
यदृच्छा लाभानें तोषे अयाचक। प्रशंसेना अर्थे अन्याचा तो ।।५।।
धनसाध्य तैसा शमसाध्य धर्म। श्रेष्ठ बहु अन्य धर्म जाणा ।। ६ ।।
फांसूनियां पंक मग कां धुवावा। बोध हा ठसावा जनकाचा ।।७।।
वासुदेव म्हणे धर्मइच्छा तरी। चित्त धनावरी ठेऊं नये ।। ८ ।।

१०

तृण जल मधुर वाणी। स्थान सज्जन सदनीं ।। १ ।।
अतिथीसी मधुर अन्न। देव पितर पूजन ।। २ ।।
आदराचें अवलोकन। विघस अमृत सेवन ।। ३ ।।
ऐसा धर्म गृहस्थाचा। व्हावा नित्य हेचि इच्छा ।। ४ ।।
धन इच्छितां यालागीं। लवहि आसक्ति न भोगीं ।। ५ ।।
वासुदेव म्हणे धर्म। विनवी शौनकालागून ।। ६ ।।

११

प्रकाशित करी वृत्ति विषयांसी। उत्पत्ति मनाची होई तदा ।। १ ।।
ग्राह्य त्याज्य किंवा उपेक्ष्य तें चिंती। तयावेळीं पुष्टि लाभे तया २
संस्कारांसमान निर्णय तयाचा। ग्राह्य अग्राह्यता अथवा योग्य ।३।
हाचि प्रादुर्भाव जाणावा मनाचा। पुढती विषयाचा ध्यास घेई ४
उतावीळ होतां होतसे प्रवृत्त। पुढती पतंग दग्ध होई ।। ५ ।।
अविद्या, कर्मांनें, तृष्णा वाढतसे। पुढती जन्माचे अटळ फेरे ।। ६ ।।
वासुदेव म्हणे श्रेष्ठ ते प्रवृत्ति। त्याहूनि निवृत्ति श्रेष्ठ जाणा ।। ७ ।।

१२

शत संवत्सर क्रियाचि करावी। स्वरूपाची व्हावी प्राप्ति त्यागें ।।१।।
ऐशा प्रमुख या असती श्रुति दोन। मध्यभागीं जाण असती राया ।।
यज्ञ अध्ययन तप तेंवी दान। अलोभता दम सत्य क्षमा ।। ३ ।।
निरभिमानें पूर्व चतुष्टय करा। पुढील तो खरा मोक्षमार्ग ।। ४ ।।
अंतरिंद्रियांचा निग्रह तो शम। संकल्पाचा जाण तोचि जय ।। ५ ।।
बहिरिंद्रियांचा निग्रह तो दम। अहिंसा, तें जाण गुरुसेवा ।। ६ ।।

हित मित तेंवी पवित्र तें अन्न । विध्युक्त अध्ययन कर्मत्याग ॥ ७ ॥
ऐसीया मार्गानें होई चित्त शुद्धि । मनोरथ सिद्धि तपें होय ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कथिती शौनक । पूर्ण मनोरथ करुनी घेई ॥ ९ ॥

अध्याय ३ रा

१३

राव म्हणे मुनिवरा । कैसे सांभाळूं या विप्रां ॥ १ ॥
कैसे विन्मुख करावे । सत्वहीन कैंवी व्हावें ॥ २ ॥
मुनि म्हणे अन्नाधिप–। प्रार्थी प्रेमें तो आदित्य ॥ ३ ॥
सूर्य अर्यमा तो पूषा । सनातन पिता माता ॥ ४ ॥
पितामह अरविंदाक्ष । चराचरात्मा मैत्रेय ॥ ५ ॥
ऐसें प्रार्थितां तयासी । पुरवी सर्व कामनांसी ॥ ६ ॥
मनोभावें धर्म प्रार्थी । झालें दर्शन तयासी ॥ ७ ॥
अर्पूनियां ताम्रस्थाली । गेला सविता स्वस्थळीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कार्य । सिद्ध, स्तवितां ठेऊनि भाव ॥ ९ ॥

१४

कार्य सिद्ध होतां धौम्यांसी वंदिलें । भ्राते अलिंगिले प्रेमभरें ॥ १ ॥
पांचाळीनें केलें सिद्ध अल्प अन्न । स्थालींत ठेऊन वाढियेलें ॥ २ ॥
‘ विघस ’ तें सेवी युधिष्ठिर मोदें । द्रौपदी आनंदें पुढती जेवी ॥३॥
यज्ञयागामाजी पांडव ते रत । धर्मासी तें इष्ट प्राप्त होतां ॥ ४ ॥
स्वस्त्ययन पुढें करिती धौम्यमुनि । जाती काम्यकवनीं संतोषानें ॥५॥
वासुदेव म्हणे थोरांची कसोटी । विविध संकटीं लागतसे ॥ ६ ॥

अध्याय ४ था

१५

खिन्न प्रज्ञाचक्षु पाचारी क्षत्त्यासी । म्हणे प्रजा कैसी आम्हां वश ॥
विदुर म्हणे राजा जग धर्माधीन । तुझें दुर्वर्तन नडतें तुज ॥ २ ॥
मान पांडवांचा अवमान शकुनीचा । हाचि मार्ग तुझा साह्यकारी ॥
क्षमा द्रौपदीची मागावी दुष्टांनीं । धर्मासी स्थापूनि राज्यावरी ॥४॥
कृतार्थ तूं येणें विदुर म्हणे राजा । क्रोध येई अंधा ऐकूनि तें ॥५॥
परी हितालागीं स्वदेहाचा त्याग । कैसा घडे सांग राव म्हणे ॥६॥
पक्षपाती नित्य वाटे तूं तयांचा । होसील परका कधींतरी ॥ ७ ॥

निघूनियां जाईं आजचि तूं कोठें। अथवा राहीं एथें इच्छेसम ॥८॥
अंतर्गृहामाजी राव गेला क्रोधें। विदुर म्हणे माझें कुल नव्हे ॥९॥
वासुदेव म्हणे पांडवांची वाट। चालला त्वरित महाज्ञाता ॥ १० ॥

अध्याय ५ वा १६

वेगें विदुर वनांत। आला बैसोनि रथांत ॥ १ ॥
वीर काम्यकवनासी। पाहताती त्या रथासी ॥ २ ॥
धर्म म्हणे वृकोदरा। कां रे धाडिलें विदुरा ॥ ३ ॥
काय पुनरपि द्यूता। पाचारण करी क्षत्ता ॥ ४ ॥
क्षुद्रबुद्धि तो शकुनि। शस्त्रें घेईल हरूनि ॥ ५ ॥
करूनियां उत्थापन। विदुरासी सन्मानून ॥ ६ ॥
कुशल प्रश्न करितां क्षत्ता। सांगे सकळ वृत्तांता ॥ ७ ॥
हितवचनें राव क्रुद्ध। मज न ठेवी सदनांत ॥ ८ ॥
क्षत्ता उपदेशी धर्मा। हर्ष वासुदेव मना ॥ ९ ॥

अध्याय ६ वा १७

दुःखानें विदुर वनामाजी जातां। राव करी चिंता मनामाजी ॥ १ ॥
नीतिज्ञ, मुत्सद्दी, वीरहि ज्या पक्षा। विजय तयांचा खचित होई २
ऐसें चिंतूनियां व्याकुळ जाहला। पाठवी वनाला संजयासी ॥ ३ ॥
म्हणे विदुरासी आणीं रे सत्वरीं। संजय नगरीं नेई तया ॥ ४ ॥
राव म्हणे क्षमा करीं रे विदुरा। आलिंगी तयाला प्रेमभरें ॥ ५ ॥
क्षत्ता म्हणे माझें दीनांवरी प्रेम। करिती सांत्वन परस्पर ॥ ६ ॥
आकर्षण करी परस्पर भाव। म्हणे वासुदेव जनांलागीं ॥ ७ ॥

अध्याय ७ वा १८

विदुरागमनें दुर्योधन क्रुध्द। पुनरपि सिध्द मरणा होई ॥ १ ॥
शकुनि म्हणे राया सावध असावें। कर्ण म्हणे व्हावें द्यूत पुनः २
ऐसीया वचनें नसे समाधान। पाहोनियां कर्ण वदला क्रोधें ॥ ३ ॥
वीरहो जावोनि वधूं पांडवांसी। असहाय तोंचि कार्य साधूं ॥ ४ ॥
कर्णाचें वचन मान्य सकलांसी। बैसोनियां रथीं सज्ज झाले ॥५॥

अंतर्ज्ञानें व्यास हेतु हा जाणिती । वासुदेव कथी सकल वृत्त ॥६॥

अध्याय ८ वा १९

द्वैपायन म्हणे राजा । ऐकें हितबोध माझा ॥ १ ॥
आंवरूनि स्वसुतांसी । स्नेह करा पांडवांसी ॥ २ ॥
जन्मस्वभाव जाईना । अनुवृत्त अन्य जन्मा ॥ ३ ॥
बोध ऐकें गुरुजनांचा । टाळीं नाश वैभवाचा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे व्यास । बोध करिती धृतराष्ट्रास ॥ ५ ॥

अध्याय ९ वा २०

धृतराष्ट्र म्हणे मुनींसी वंदून । पुत्रांचें हें कर्म न रुचे मज ॥ १ ॥
भीष्म द्रोण क्षत्ता तैसी हे गांधारी । मजसी निवारी सर्वकाळ ॥२॥
पुत्रमोहें परी असमर्थ झालों । शरण मी आलों तुजलागीं ॥ ३ ॥
मुनि म्हणे नाहीं मित्र पुत्रासम । शत्रुही न जाण तया ऐसा ॥ ४ ॥
पुत्र क्लेशें करी सुरभि रूदन । विचारी कारण इंद्र तदा ॥ ५ ॥
धेनु म्हणे दीन दुर्बल हा पुत्र । व्याकुळ अंतर तेणें माझें ॥ ६ ॥
हलधारी तया होई पीडाकारी । वर्षाव तैं करी इंद्र बहु ॥ ७ ॥
तेणें मुक्त झाला सुरभीचा सुत । राया हा वृत्तांत ध्यानीं घेईं ॥८॥
वासुदेव म्हणे पांडव ते दीन । म्हणोनियां प्रेम तयांवरी ॥ ९ ॥

अध्याय १० वा २१

राव म्हणे द्वैपायना । बोध करीं दुर्योधना ॥ १ ॥
सत्य सत्य तुझी वाणी । पटते सकलां या स्थानीं ॥ २ ॥
सकल ज्ञात्यांचें जें मत । कथिलेंसी तूंहि आज ॥ ३ ॥
जरी दया बाळांवरी । बोध ठसवीं त्यां अंतरीं ॥ ४ ॥
येती इतुक्यांत मैत्रेय । वंदी तयां वासुदेव ॥ ५ ॥

२२

व्यास मुनि तदा बोलले राजासी । मैत्रेय तुम्हांसी करिल बोध ॥१॥
ऐसें बोलूनियां स्वस्थानासी गेले । कुशल पुशिलें मैत्रेयासी ॥ २ ॥
यात्रामिषें जातां काम्यकवनासी । पाहिलें धर्मासी वसतां तेथें ॥३॥

ऐकिला वृत्तांत द्यूताचा समग्र । जाहलों मी व्यग्र अंतर्यामीं ॥ ४ ॥
दुर्योधनालागीं बोलले मुनींद्र । पांडवांसी वैर करूं नको ॥ ५ ॥
मैत्रेयांचा ऐसा बोध तो ऐकूनि । अंक थोपटूनि बसला राजा ॥ ६ ॥
दर्प तो पाहूनि क्रुद्ध मुनि बोले । भग्न हा प्रहारें होई अंक ॥ ७ ॥
राजा म्हणे द्यावा उःशाप सुतासी । सख्य पांडवांसी, मार्ग म्हणे ॥८॥
किर्मीराचा वध केला त्या वीरांनीं । कथा ते ऐकूनि पुढती घेई ॥९॥
वासुदेव म्हणे विदुर ते कथी । कथा किर्मीराची म्हणूनि गेला ॥१०॥

---

## किर्मीरवधपर्व २

अध्याय ११ वा

२३

विदुर म्हणे धृतराष्ट्रा । कैसें मारिलें राक्षसा ॥ १ ॥
वृकोदरें, तो वृत्तांत । कथितों नीट घे ध्यानांत ॥ २ ॥
अहोरात्र तीन दिन । गेले पांडव चालून ॥ ३ ॥
मध्यरात्रीं काम्यकवनीं । दैत्य पाहिला वीरांनीं ॥ ४ ॥
उल्का प्रदीप्त करांत । घेऊनियां अडवी वाट ॥ ५ ॥
भयानक दाढा अष्ट । दिसती तयाच्या सुस्पष्ट ॥ ६ ॥
उभे केश मस्तकींचे । तडिद्युक्त मेघ भासे ॥ ७ ॥
असुरमाया ते निर्मूनि । केला भयंकर ध्वनि ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे स्थळ । नभ व्यापीतसे धूळ ॥ ९ ॥

२४

पाहूनि पांडवां मार्ग अडविला । मैनाक भासला महादैत्य ॥ १ ॥
कमलनयना भयभीत झाली । अभय त्या वेळीं देती वीर ॥ २ ॥
अंगावरी वृक्ष दैत्यानें फेंकिला । भीमानें झेलिला वरचेवरी ॥ ३ ॥
रक्षोघ्न सूक्तांनीं धौम्य तया ठाया । आंवरिती माया राक्षसांची ॥४॥
पाहोनि तें कर्म संतप्त किर्मीर । वटारुनि नेत्र पुढती धांवे ॥ ५ ॥
धर्म म्हणे वीरा कोण तूं कोणाचा । येरु म्हणे भ्राता बकाचा मी ॥
पांडवांचें वृत्त ऐकूनि पातलों । पाहूनि तोपलों भीमालागीं ॥ ७ ॥

एकचक्रेमाजीं भ्रात्यासी वधिलें । आनंद पावलें मन आजी ॥ ८॥
थोपटूनि दंड भीम सिद्ध झाला । आनंद पावला वासुदेव ॥ ९ ॥

२५

झालें घोर द्वंद्वयुद्ध । करपाशें होतीं बद्ध ॥ १ ॥
आंवळिती आपटिती । धके चपेटे मारिती ॥ २ ॥
दग्ध वेळूचा जें स्फोट । तैसा येई महानाद ॥ ३ ॥
उचलिती आपटिती । दोघे गरगरां फिरविती ॥ ४ ॥
वृकोदरें वुकलिलें । अंतीं वाचाळ त्या केलें ॥ ५ ॥
कटिप्रदेशीं मोडून । घेतलासे त्याचा प्राण ॥ ६ ॥
विघ्न विप्र, गोपालांचें । भीमें निवारिलें ऐसें ॥ ७ ॥
विदुर म्हणे काम्यकवनीं । म्यालों प्रेत तें पाहोनि ॥ ८ ॥
दीर्घश्वास सोडी राव । वृत्त सांगे वासुदेव ॥ ९ ॥

---

# अर्जुनाभिगमनपर्व ३

अध्याय १२ वा

२६

भोज, अंधक ते भेटीसी पातले । पांचालादि आले वहुत राजे ॥ १ ॥
कृष्णासमवेत वैसले भोवतीं । केशव मानसीं खिन्न झाला ॥ २ ॥
दुर्योधन कर्ण शकुनी दुःशासन । कपटी हे जाण कृष्ण म्हणे ॥३॥
रुधिर तयांचें प्राशील हे भूमि । वध्य दुष्ट जनीं, धर्म भोळा ॥ ४ ॥
जनार्दन क्रुध्द पाहोनि अर्जुन । प्रेमानें स्तवन करी त्याचें ॥ ५ ॥
अप्रमेय, सत्य अमित तेजस्वी । नाथ हा तपस्वी विष्णु, कृष्ण ॥६॥
गंधमादनासी केलें तप थोर । तैसेंचि पुष्कर-हिमाचलीं ॥ ७ ॥
सरस्वतीतीर प्रभासतीर्थासी । आचरी तपासी अच्युत हा ॥ ८॥
ब्रह्मा विष्णु तूंचि थोर यज्ञकर्ता । वासुदेव त्याचा दास म्हणे ॥९॥

२७

वामन तू अदितीचा, । विष्णु, भ्राता त्या इंद्राचा ॥ १ ॥
घेऊनियां अवतार । केला धर्माचा उद्धार ॥ २ ॥
सागरांत द्वारावती । स्वय बुडवी श्रीपती ॥ ३ ॥
युगान्तीं हें अखिल जग । लीन जयांत होईल ॥ ४ ॥
नाभीकमलोद्भव ब्रह्मा । पाळी सर्वकाल आज्ञा ॥ ५ ॥
मधु कैटभ ब्रम्हासी । पीडा देतां क्रुद्ध होसी ॥ ६ ॥
क्रोधें तदा शूलपाणी । झाला ललाटापासूनि ॥ ७ ॥
वाळिभद्रासनें दैत्य । देवा वधिलेसी असंख्य ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । ऐसें स्तवूनि झाला स्वस्थ ॥ ९ ॥

२८

कृष्ण म्हणे पार्था माझा तू मी तव । जयासी तूं प्रिय तया मीहि ॥
पार्था तुझा द्वेष्टा तोचि माझा वैरी । असो भूतमात्रीं भगवद्भाव ॥
अजिंक्य तूं नर, नारायण कृष्ण । पातला धरून हेतु मनीं ॥ ३ ॥
मुक्तात्मा जो जीव तोचि जाण ईश । घट मठाकाश एक जैसें ॥४॥
सकळ नृपाळ कृष्णाचें वचन । ऐकूनि उद्विग्न, क्षुब्ध होती ॥ ५ ॥
शरण जाऊनि कृष्णासी पांचाळी । दुःखानें बोलली काय ऐका ॥
वासुदेव म्हणे धृष्टद्युम्नादिक । ऐकती समस्त वीर तेव्हां ॥ ७ ॥

२९

स्तवूनि कृष्णासी याज्ञसेनी म्हणे । विश्वेश्वरा जाणें हेतु माझा ॥१॥
सकलांची गति तूंचि हे अच्युता । जगाचा नियंता व्यापक तूं ॥२॥
पांडवांची भार्या भगिनी कृष्णाची। दीन सभेमाजी कैसी झाली ॥३॥
अभिलाष माझा धरिला दुष्टांनीं । जिवंत असोनि पांचाळादि ॥ ४ ॥
समक्ष मी तुझ्या देवा, पांडवांचा । धिक्कारचि साचा करितें दुःखें ॥
भार्येचें रक्षण असूनि हा धर्म । जातांहि शरण घडलें नाहीं ॥ ६ ॥
कृष्णा काय सांगूं यातना मनींच्या । सजीव तो कैसा दुष्ट नृप ॥ ७ ॥
परोपरी केला छळ आजवरी । बाळपणीं चारी विष भीमा ॥ ८ ॥
याज्ञसेनी सांगे कळस हा झाला । खिन्नता पावला वासुदेव ॥ ९ ॥

३०

यज्ञभूमीमाजी जन्म जे पावली । धाय ते मोकली सभेमाजी ॥१॥
पांडवांची कांता वीरांची माउली । धायते मोकली सभेमाजी ॥२॥
पांडूची ते स्नुषा हाय दीन झाली । धायते मोकली सभेमाजी ॥३॥
श्रीकृष्ण जियेची उदार साउली । धाय ते मोकली सभेमाजी ॥४॥
कथूनियां वृत्त ढळढळां रडे । बेभान तों पडे धरणीवरी ॥ ५ ॥
रुद्धकंठें देवी पुनरपि बोले । कोणींहि रक्षिलें नाहीं मज ॥ ६ ॥
पति, पुत्र, भ्राते, बांधवहि कोणी । देवा तूंहि जनीं नससी माझा ॥
संबंध, गौरव प्रभुत्व तें सख्य । आणूनि मनांत रक्षीं आतां ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे भेदक हे शब्द । ऐकूनि गोविंद द्रवला मनीं ॥ ९ ॥

३१

कृष्ण म्हणे वो भगिनी । ऐक ऐक माझी वाणी ॥ १ ॥
करूं नको ऐसा शोक । ऐकशील तो विलाप ॥ २ ॥
नष्ट होतील ते दुष्ट । तुजसी दिधले ज्यांनीं कष्ट ॥ ३ ॥
राज्य लाभेल पांडवां । तदा सौख्य या माधवा ॥ ४ ॥
कोसळेल हें आकाश । हिमगिरीचाहि नाश ॥ ५ ॥
आटतील ते सागर । शकलें भूमीचीं होतील ॥ ६ ॥
परी मिथ्या माझी वाणी । त्रिकालीं न ध्यानीं आणीं ॥ ७ ॥
पार्थ देई अनुमोदन । धृष्टद्युम्न द्रोणां यम ॥ ८ ॥
पुढती म्हणे वासुदेव । वदला धर्मासी केशव ॥ ९ ॥

अध्याय १३ व १४ वा

३२

कृष्ण म्हणे युधिष्ठिरा । नव्हतों द्वारावती पुरा ॥ १ ॥
असतों तरी ऐसें विघ्न । जातें सहज वितळून ॥ २ ॥
दावितांहि द्यूत दोष । तयाचीच येती हौस- ॥ ३ ॥
तरी निग्रह तयांचा । स्वबळेंचि घडता तदा ॥ ४ ॥
कथितां सात्यकीनें वृत्त । आलों धांवोनि वनांत ॥ ५ ॥
शाल्व उन्मत्त जाहला । वधी वृष्णि-कुमारांला ॥ ६ ॥

गेलों तयाच्या नाशार्थ । इकडे जाहला अनर्थ ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण । झाला मनीं बहु खिन्न ॥ ८ ॥

अध्याय १५ वा ३३

युधिष्ठिर म्हणे कृष्णा शाल्ववृत्त । कथावें समस्त मजलागीं ॥ १ ॥
कृष्ण म्हणे शाल्व आला आम्हांवरी । चालूनि सत्वरी दुष्टपणें ॥ २ ॥
' सौभनगरी ' तें विमान तयाचें । जाऊनि नभातें युद्ध करी ॥ ३ ॥
सिद्धता सकळ केली द्वारकेची । वीर ते युद्धासी सिद्ध झाले ॥ ४ ॥
संकटीं सर्वांनीं मदिरा त्यागिली । निम्नोन्नत केली सकल भूमि ॥
सकळ जनांसी सुवर्ण वेतन । अर्पूनियां मन तुष्ट केलें ॥ ६ ॥
संरक्षिली ऐसी द्वारावती पुरी । हर्षित अंतरीं वासुदेव ॥ ७ ॥

अध्याय १६ ते १८ वा ३४

वृष्णिवीर वेगें युद्धार्थ निघाले । क्षणांत जुंपलें घोर युद्ध ॥ १ ॥
निज सचिवाचा संहार जाहला । शाल्व क्रुद्ध झाला बहुत मनीं ॥२॥
प्रद्युम्नासीं त्याचें रण थोर झालें । वशुध्द पाडिलें प्रद्युम्नासी ॥३॥
सारथ्यानें त्याचा रथ मागें नेला । शुध्दीवरी आला पुढती वीर ॥४॥
रथ पाहूनियां दूर, क्रुध्द झाला । सूतासी बोलला कां रे ऐसें ॥ ५ ॥
सूत म्हणे वीरा सारथ्याचा धर्म । आचरिला वर्म ओळखूनि ॥६॥
पलायन निंद्य वृष्णिकुलोद्भवां । ऐसें बोलूनियां रणीं आला ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे अलौकिक वीर । धांवे शाल्वावर पुनरपि ॥ ८ ॥

अध्याय १९ वा ३५

पाहतां पाहतां पातला रणासी । भिडला शाल्वासी सामर्थ्यानें ॥
शाल्व करी तदा वर्षाव शरांचा । भेद क्षणीं त्यांचा करितो वीर ॥
सौभपति करी मायेचा आश्रय । अस्त्रांच्या वर्षाव करीतसे ॥ ३ ॥
प्रद्युम्नानें केली ब्रह्मास्त्र योजना । शाल्वासी त्या क्षणा विद्ध केलें ॥
प्रखर शरांसी ओढितां त्या क्षणीं । नारद येवोनि कथिती तया ॥
शाल्वाचें मरण नसे तुझ्या हस्तें । देई विधात्यातें यश वीरा ॥ ६ ॥

नारदवचनें मागें घेई शर । शाल्व हरिपुर सोडीतसे ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे शाल्वाचें मरण । कृष्णाच्या आधीन पुढती होई ॥

अध्याय २० वा

३६

कृष्ण म्हणे युधिष्ठिरा । तदा पातलों नगरा ॥ १ ॥
राजसूय आटोपूनि । वृत्त ऐकीयेलें कानीं ॥ २ ॥
केला निश्चय मनांत । संहारावें या शाल्वास ॥ ३ ॥
दुंदुभीचा नाद झाला । महावीर झाले गोळा ॥ ४ ॥
सकलांचें अनुमोदन । स्वस्ति पुण्याहवाचन ॥ ५ ॥
झाला पांचजन्य नाद । दुमदुमे अवघें नभ ॥ ६ ॥
गेलों 'मार्तिक' देशासी । शाल्व सोडी स्वस्थानासी ॥ ७ ॥
सागराच्या तीरीं गेला । नभीं अदृश्य जाहला ॥ ८ ॥
तेथूनियां सोडी शर । मग जुंपलें समर ॥ ९ ॥
शाल्व दावी वहुमाया । नवल वाटे वासुदेवा ॥ १० ॥

३७

क्षणांत अंधार क्षणांत प्रकाश । क्षणीं उष्ण, शीत क्षणीं भासे ॥१॥
अग्नीचीं किटाळें शस्त्रें बहु सोडी । ओळखूनि ओढी कृष्ण धनु ॥२॥
निवारण करी सकल मायेचें । वायु कार्पासातें उडवी जैंवीं ॥ ३ ॥
पुनरपि तदा जाहला प्रकाश । उठती रोमांच अंगावरी ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे तुमुल समर । कृष्ण तैं प्रज्ञास्त्र सोडीतसे ॥ ५ ॥

अध्याय २१ वा

३८

तदा पुनरपि रणीं आला शाल्व । सोडी दीप्त शूल शतघ्नी त्या ॥१॥
रथ अश्व तैसा सारथी झांकिला । विव्हल तो झाला शराघातें ॥२॥
इतुक्यांत कोणी द्वारकानिवासी । वृत्त मज कथी कंठरवें ॥ ३ ॥
वधिलें पित्यासी द्वारावतीमाजी । अनर्थचि आजी शाल्व करी ॥
ऐकूनियां गेलें भांबावूनि मन । काय गतप्राण वलरामादि ॥ ५ ॥
पतन पित्याचें सौभपुरांतूनि । पाहिलें नयनीं तयावेळीं ॥ ६ ॥
पाहूनि तें दृश्य जाहलों विव्हळ । होई हाहाःकार सैन्यामाजीं ॥७॥

करिती प्रहार दैत्य जें पित्यासी । यातना मनासी बहुत झाल्या ॥८
निवारिलें अंतीं जाणूनि ते माया । वासुदेव पायां वंदीतसे ॥ ९ ॥

अध्याय २२ वा ३९

पुनरपि घोर युद्ध । केला महा शब्दवेध ॥ १ ॥
शाल्वें झांकिलें मजसी । होई निराशा जनांची ॥ २ ॥
अंतीं दिव्य सुदर्शन । दिधलें क्रोधानें फेंकून ॥ ३ ॥
सौभनगरच्छेदिलें । पुनरपि करीं आलें ॥ ४ ॥
सोडितांचि शाल्वावरी । कार्य सफल तें करी ॥ ५ ॥
गेले पळूनि दानव । हर्षे पावले यादव ॥ ६ ॥
वासुदेव आनंदित । पुढती सांगतसे वृत्त ॥ ७ ॥

४०

कृष्ण म्हणे धर्मा गुंतलों त्या वेळीं । तया योगें आली ऐसी वेळ ॥१॥
अनावर जल फुटतां धरण । व्यर्थ हें बोलून काय लाभ ॥ २ ॥
पुढती सदनीं निघाला श्रीकृष्ण । करूनि वंदन धर्मालागीं ॥ ३ ॥
अभिमन्यूसह भगिनीसी घेई । द्वारकेसी जाई गदाधर ॥ ४ ॥
द्रौपदीपुत्रांसी धृष्टद्युम्न नेई । रेणुमतीतेंही धृष्टकेतु ॥ ५ ॥
केकय सदनीं जाई शुक्तिमती । कांता आवडती सहदेवाची ॥ ६ ॥
विप्र न सोडिती युधिष्ठिराप्रति । स्यंदन सारथी सिद्ध करी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पांडवांचें वृत्त । ऐकूनियां चित्त शुद्ध होई ॥ ८ ॥

अध्याय २३ वा ४१

देवकीनंदन जातांचि भेटूनि । बैसले स्वस्थानीं वीरश्रेष्ठ ॥ १ ॥
दक्षिणा अर्पिली विप्रांसी बहुत । जाती द्वारकेंत शस्त्रें यंत्रें ॥ २ ॥
नागरीक दुःखें करिती रूदन । म्हणती हा धर्म कोठें जाई ॥ ३ ॥
मयसभा कैसी त्यागी हा महात्मा । धनंजय त्यांनां अभय देई ॥ ४ ॥
योग्य समई हा येईल फिरोनी । घेईल हरूनि अपुलें सर्व ॥ ५ ॥
नागरीक तेव्हां घेऊनि निरोप । जाती खिन्न चित्त स्वस्थानासी ॥६॥
वासुदेव म्हणे कौरवांची निंदा । स्तविती धर्मराजा सकलजन ॥

अध्याय २४ वा ४२

धर्म म्हणे आतां सुस्थळ गांठावें। द्वैतवन व्हावें अपुलें स्थान ॥ १ ॥
फलपुष्पयुक्त शोक–मोहहीन। निवडिलें स्थान पांडवांनीं ॥ २ ॥
साल, ताल, आम्र असंख्य त्या स्थानीं। मधुर पिकांनीं रम्य दिसे ॥
गजयूथ बहु त्या वनीं हिंडती। सिद्ध मुनि किती वसती तेथें ॥ ४ ॥
तया वनीं जातां वंदिलें सिद्धांसी। मुनि सत्कारिती पांडवांसी ॥५॥
विशाल कदंब आश्रय तयांचा। वासुदेव वाचा ऐका पुढें ॥ ६ ॥

अध्याय २५ वा ४३

धौम्य मुनींसह द्वैतवनीं वीर। राहिले उदार पुण्यकर्में ॥ १ ॥
मार्कंडेयमुनि एकावेळीं येती। पांडव पूजिती तयांलागीं ॥ २ ॥
सहज हांसले पाहोनी धर्मासी। कारण तें पुशी राव तयां ॥ ३ ॥
म्हणती मुनि, राया दाशरथी राम। आठवे पाहून तुजलागीं ॥ ४ ॥
नाभाग, भगीरथ, अलर्कादि वीर। धर्माचे किंकर जनीं झाले ॥५॥
बलाढ्यहि वीर उल्लंघूनि धर्म। इच्छीति न धन, सौख्य, जनीं ॥
मत्त गज, सर्प पाळिती मर्यादा। दर्पयुक्त कदा होऊं नये ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ‘ लाभेल वैभव ’ कथूनि मार्कंडेय निघुनी गेले ॥ ८ ॥

अध्याय २६ वा ४४

घुमतसे वनीं नित्य वेदघोष। मुनि बकदाल्भ्य प्राप्त झाले ॥ १ ॥
आंवरूनि बैसे राजा सायंकर्म। बोलती वचन विप्रराज ॥ २ ॥
आश्रय लाभला श्रेष्ठ ब्राह्मणांचा। भाग्यलाभ साचा तेणें होय ॥३॥
विप्र क्षत्रियांचें सहकार्य होतां। अग्नीसी भेटतां वायुसम ॥ ४ ॥
घातक जैं गज अंकुशा वांचूनि। विप्रांविण जनीं राव तैसे ॥ ५ ॥
दृष्टि ब्राह्मणांची क्षत्रियांचें बल। होतां अनुकूल सौख्य जनीं ॥६॥
ऐकोनि ते वाणी आनंदले द्विज। द्वैपायनादिक श्रेष्ठमुनि ॥ ७ ॥
सन्मान धर्माचा करिती आनंदें। वासुदेव मोदें कथितो लोकां ॥८॥

अध्याय २७ वा ४५

कोणे एके काळीं कृष्णा । म्हणे पुण्यवंता धर्मा ॥ १ ॥
दुरात्म्यांसी दुःख नसे । जातां वनामाजी भ्राते ॥ २ ॥
तृणशय्या हे पाहोनि । येई वैभव तें मनीं ॥ ३ ॥
आठवूनि कंठ दाटे । सिंहासनीं जो विराजे ॥ ४ ॥
उटी जया चंदनाची । मलीन तो धुळीमाजी ॥ ५ ॥
नित्य विप्रां दे भोजन । तोचि वनामाजी खिन्न ॥ ६ ॥
अहा भीम अर्जुनांचे । क्लेश सह्य होती कैसे ॥ ७ ॥
नकुल सहदेवां पाहोनि । वसते कैसी क्षमा मनीं ॥ ८ ॥
वीर क्रोधाविण वसे । नकळे काय हें पाहतें ॥ ९ ॥
अतिक्रम हा क्षमेचा । राया करिसी तूं कैसा ॥ १० ॥
वासुदेव म्हणे कृष्णा । दुःखें विनवीतसे धर्मा ॥ ११ ॥

अध्याय २८ वा ४६

कृष्णा म्हणे धर्मा वळीसी प्रल्हाद । करीतसे वोध पूर्वकाळीं ॥ १॥
राहूं नये नित्य क्षमाशील जनीं । क्रोधही तो मनीं नित्य नसो ॥ २॥
नित्य क्षमाशील भोगीतसे दैन्य । पराभूत जाण होई नित्य ॥ ३ ॥
सेवक अवज्ञा करिती तयाची । पुत्र, भृत्य, दासी सकल जन ॥ ४ ॥
अपहार स्त्रीचा इच्छिती सेवक । लवहीन धाक स्त्रियांलागीं ॥ ५ ॥
दंडाभावें स्वैर वर्तती त्या स्त्रिया । दुष्ट होवूनियां भ्रष्टताती ॥६॥
सर्वकाल क्षमा ऐसी दोषयुक्त । वासुदेव स्पष्ट कथितो जनां ॥ ७ ॥

४७

क्षमेसम नित्य अक्षमाहि निंद्य । सर्वकाल क्रोध त्याज्य जनीं ॥ १ ॥
द्रव्यनाश तैसा धिक्कार संताप । अनादर, द्वेष, मोह तया ॥ २ ॥
पाहूनियां जन उद्विग्न जयासी । कैसा उत्कर्षासी चढेल तो ॥ ३ ॥
उपकार जेणें केला तयावरी । नित्य क्षमा करी तोचि श्रेष्ठ ॥ ४ ॥
मूढ आश्रितांसी क्षमा निरंतर । कपटी जो नर दंड्य जाण ॥ ५ ॥
बुध्दिपूर्वक जो करील अपराध । तयावरी क्रोध इष्ट जाण ॥ ६ ॥

प्रथम अपराध, अजाणतां कर्म । सर्वत्रचि साम श्रेष्ठ जनीं ॥ ७ ॥
देशकाल ज्ञानें वर्तन करावें । योग्य वेळीं व्हावें प्रगट तेज ॥ ८ ॥
प्रल्हादाची ऐसी वाणी आणीं ध्यानीं । समय जाणूनि शौर्य दावीं ।
याज्ञसेनी ऐसें विनवी धर्मासी । वासुदेव चित्तीं चिंतीतसे ॥ १० ॥

अध्याय २९ वा

४८

पांचाळीसी म्हणे महाराज धर्म । क्रोधासी जिंकून ज्ञाता राही ॥
विनाशाचें मूळ क्रोधचि जाणावा । कैसा स्वीकारावा क्रोध आम्हीं
वाच्यावाच्य तैसा कार्याकार्यभेद । न धरीचि क्रोध कदाकाळीं ॥३॥
क्रुद्धासी जो क्रुद्ध न होई सर्वथा । तारक जनांचा तोचि होय ॥ ४॥
आत्महत्या तैसी परहिंसा जाण । क्रोधयुक्त जन करीतसे ॥ ५ ॥
समर्थीहि ज्ञानी सहन जो करी । सौख्य तया वरी इहपर ॥ ६ ॥
सत्य, दया श्रेष्ठ मानिती सज्जन । तेजस्वी तो जाण क्रोधजेता ॥७॥
सकल मर्यादा सोडीतसे क्रोध । होई हीनतेज क्रोधवश ॥ ८ ॥
पराभवशक्ति उपायचिंतन । शीघ्रत्व हे गुण नष्ट त्याचे ॥ ९ ॥
क्रोध नव्हे तेज नित्य ध्यानीं धरा । धर्मराज खरा मार्ग सांगे ॥१०॥
वासुदेव म्हणे क्षमाशील नर । श्रेष्ठ तोहि थोर म्हणती ज्ञाते ॥११॥

४९

पृथ्वीसम क्षमाशील । तेचि विश्वाचे आधार ॥ १ ॥
पिता माता बंधु भार्या । क्रोध नष्ट करी सर्वां, ॥ २ ॥
नाशी दांपत्य प्रेमासी । क्षमा संरक्षी जनांसी ॥ ३ ॥
जनीं जन्म त्याचा सार्थ । क्षमा ज्याचें नित्य व्रत ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐसा । श्रेष्ठ बोध काश्यपाचा ॥ ५ ॥

५०

मूढ, क्रूर स्वभावाचा । अंतीं पूर्ण नाश त्याचा ॥ १ ॥
यज्ञ, धर्म-शास्त्रज्ञान । क्षमाचि ते स्वयें जाण ॥ २ ॥
क्षमा तेंचि परब्रह्म । त्रिकालींचें तप जाण ॥ ३ ॥
तेज, तप, सत्य, यज्ञ । संन्याशांचा तोचि शम ॥ ४ ॥

क्रोध क्षमेनें जो जिंकी । वंद्य परात्परलोकीं ॥ ५ ॥
शांतनव, क्षत्ता, द्रोण । कृष्णासहि क्षमा मान्य ॥ ६ ॥
व्यास बोध करी तोचि । धरिली कांस मी क्षमेची ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे क्षमा, । वृत्त, दया धर्म जाणा ॥ ८ ॥

अध्याय ३० वा

५१

पांचाळी बोलली धर्मराजाप्रति । ईश विधात्यासी नमन असो ॥१॥
मोहकारक तो ईश्वर वंदिला । विधिघटनेला नमीतसें ॥ २ ॥
कर्माधीन ईश अर्पीतसे फळ । पुरुष विफल करूं पाहे ॥ ३ ॥
धर्म, दया, क्षमा, आर्जव कोणासी । नेई उत्कर्षासी ऐसें नाहीं ॥४॥
ध्यानीं, मनीं, स्वप्नीं न सोडितां धर्म । आपत्ति धांऊन कैसी आली ॥
व्यथित हें मन त्यागी विवेकासी । कृष्णा हें धर्मासी वदली दुःखें ॥
वासुदेव म्हणे दुःख प्रसंगांत । क्षमाशील चित्त कठिण कर्म ॥ ७ ॥

५२

विश्वचालकाच्या हातीं सकलहि सूत्रें ॥
खेळ रंगवितो स्वयें ईश इच्छामात्रें ॥ १ ॥
वास अंतर्यामीं त्याचा नकळे कोणासी ॥
गुप्तरूपें करीतसे प्रेरणा जनांसी ॥ २ ॥
सामर्थ्यें जयाच्या होई जड देहकर्म ॥
इच्छा, ज्ञान, क्रियाशक्ति अर्पी कर्मासम ॥ ३ ॥
अश्मकाष्ठां लोह जैसें छेदी आपणासी ॥
मायावश भूतें तैसीं वधिती भूतांसी ॥ ४ ॥
क्रीडासक्त बालासम क्रीडा हे प्रभूची ॥
वासुदेव म्हणे ऐसी मति द्रौपदीची ॥ ५ ॥

५३

मायबापांसम न भासे मजसी । दुःख सकलांसी देई ईश ॥ १ ॥
नसे हा दयाळु निर्दयचि वाटे । सौख्य दुर्जनातें देई सदा ॥ २ ॥
शीलवंतालागीं अन्नही न लाभे । शीलभ्रष्ट राज्यें भोगिताती ॥ ३ ॥
आपत्ति धर्माची कौरवांचें सुख । विधात्याचा दोष वाटे मज ॥ ४ ॥

कृतकर्म जरी कर्त्याशीं संबद्ध । तरी तो स्वयंभ दोषी ठरे ॥ ५ ॥
दोष जरी त्यासी न लागे सर्वथा । क्षम्य बलवंता तरी सर्व ॥ ६ ॥
कींवचि करावी नित्य दुर्बलाची । वासुदेव कथी साध्वी वच ॥७॥

अध्याय ३१ वा

५४

मनोहर वाक्यें ऐकूनि सतीचीं । धर्म म्हणे बुद्धि नास्तिक हे ॥ १ ॥
सुखास्तव जरी धर्माचा व्यापार । करितां, हे बोल सत्य तुझे ॥२॥
आत्मलाभ इच्छा घडे स्वधर्मानें । भाग्य कामनेनें न लाभे हें ॥ ३ ॥
वेदवचनीं जो साशंक या जनीं । पशुपक्षियोनी लाभे तया ॥ ४ ॥
तयाहूनि श्रेष्ठ तस्करहि जाणा । स्वधर्मवचना न मानी जो ॥ ५ ॥
व्यास, वसिष्ठादि समर्थ ते मुनि । प्रत्यक्ष पाहूनि भ्रमसी कैसी ॥६॥
करूं नये निंदा धर्म विधात्याची । वासुदेव प्रार्थी सकळांलागीं ॥७॥

५५

तत्त्वज्ञासी मूढ म्हणती उन्मत्त । प्रमाण तयांस नसतें कांहीं ॥ १ ॥
दुर्बुद्धि तयांची प्रमाण तयांसी । सत्य या जगासी मानिती ते ॥२॥
अतींद्रिय धर्म न कळे तयांसी । प्रायश्चित्त त्यांसी नसे जगीं ॥ ३ ॥
वेद शिष्टाचार मान्य नसे ज्यासी । इहपर त्यासी चुकती दोन्हीं ॥
श्रेष्ठ साधन हें ' सनातन धर्म ' । जाणूनियां मन स्थिर करीं ॥ ५ ॥
नौकेसम जनां धर्मचि तारक । प्रमाण प्रत्यक्ष महाज्ञाते ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे धर्मराज ज्ञाता । स्वधर्म कथितां न्यून काय ॥ ७ ॥

५६

निष्फळ न धर्म प्रिये ध्यानीं धरीं । अभावचि तरी परमार्थाचा ॥१॥
प्रत्यक्ष अनुमान वेद प्रमाणें तें । साफल्य धर्माचें ध्यानीं आणीं ॥२॥
तप, ब्रह्मचर्य, स्वाध्याय, दानानें । पूर्वज त्या पुण्यें तरले बहु ॥३॥
निष्फळ न मानीं धर्माधर्म दोन्हीं । स्मरें याज्ञसेनी जन्म तुझा ॥४॥
अन्नाच्छादनें ते संतुष्ट धार्मिक । अधार्मिक नित्य असंतुष्ट ॥ ५ ॥
अविद्येसी विद्या, पाप तेंचि पुण्य । मानिती दुर्जन सर्वकाळ ॥ ६ ॥
देवगुह्य ऐसें जाणिती सज्जन । शंका निरसन होवो तुझें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे धर्माची हे वाणी । ऐकावी देऊनि लक्ष सुखें ॥ ८ ॥

५७

ठेवीं धर्मावरी श्रद्धा। तेणें उद्धारचि तुझा ॥ १ ॥
नको होऊं तूं नास्तिक। निंदूं नको देवादिक ॥ २ ॥
नको निंदू जगन्नाथा। सर्व जगाचा जो शास्ता ॥ ३ ॥
मर्त्य होई अमर जनीं। कृपा ऐसी ध्यानीं आणीं ॥ ४ ॥
शास्त्र-आचार्यां वंदून। घेई तत्त्व तें जाणून ॥ ५ ॥
नको निंदू देवदेवा। बोध ठसो वासुदेवा ॥ ६ ॥

अध्याय ३२ वा

५८

कृष्णा म्हणे महाराजा। न करीं अवमान धर्माचा ॥ १ ॥
तैसी निंदा ईश्वराची। मम मुखें होई कैसी ॥ २ ॥
आर्त प्रलाप हे माझे। ऐकें राया शांत चित्तें ॥ ३ ॥
कर्म न टळे कोणासी। वृक्षां अथवा पशुपक्षांसी ॥ ४ ॥
वत्स करी दुग्धपान। जन्म पावतांचि जाण ॥ ५ ॥
पूर्व संस्कारांचें फळ। परंपरा हे अटळ ॥ ६ ॥
संस्काराचें मूळ कर्म। तेणें संस्कारांचा जन्म ॥ ७ ॥
न दिसे कारण भोगांचें। मूळ तया गतजन्मींचें ॥ ८ ॥
यथापूर्व सृष्टि करी। ईश, नियम ध्यानीं धरीं ॥ ९ ॥
कृतनाश अकृतप्राप्ति। दोष अविचारें येती ॥ १० ॥
वासुदेव म्हणे ऐसें। महत्त्व त्या प्राक्तनाचें ॥ ११ ॥

५९

दैवासम राया कर्माचेंहि बळ। कर्माविण फल नसे कांहीं ॥ १ ॥
प्रत्यय दैवाचा कर्माविण नसे। रक्षण, वृद्धि ते कर्में घडे ॥ २ ॥
केवळ भोगानें क्षयाचि पावेल। जरी हिमाचल वैभवाचा ॥ ३ ॥
प्राप्त स्थितीमाजी सौख्य न पावणें। सुखवृद्धि यत्नें व्हावी सदा
कर्माविण प्रजा विनाश पावेल। होतांहि निष्फळ करिती कर्म ॥
केवळ अदृष्ट मानिती कौलिक। म्हणती चार्वाक अकृत लाभे ॥
दोघेहि ते शठ, दैव उद्योगांसी। समान लेखिती बुद्धिमंत ॥ ७ ॥
हठ, दैव, कर्म, स्वभाव हीं चार। दिसती परी पूर्वकर्माचि तें ॥

कर्तव्यानिश्चय पूर्वकर्मे होई । प्रवृत्तीसी पाही मूळ यत्न ॥ ९ ॥
तिळामाजी तेल, दुग्ध गाईमाजी । सिद्ध काष्ठामाजी अग्नि दैवें ॥
उपायेंचि लाभ होतसे जनांसी । प्रावल्य कर्मासी येई तेणें ॥ ११ ॥
वासुदेव म्हणे मनूचें वचन । पुरुषार्थेंचि कर्म आचरावें ॥ १२ ॥

६०

यत्नहीन पराभूत । यत्नें हेतु होई सिद्ध ॥ १ ॥
अलक्ष्मी ते आलस्यानें । फलप्राप्ति उद्योगानें ॥ २ ॥
ऐसा अनुभव जनीं । संशयानें अर्थहानि ॥ ३ ॥
यत्नें फल न लाभतां । दोष नसे आपुल्या माथा ॥ ४ ॥
जाणोनि हें यत्न करा । पुढती खेद न अंतरा ॥ ५ ॥
यत्नाविण कर्मसिद्धि । असिद्धि वा न ठरे जगीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सती । धर्मराजालागीं प्रार्थी ॥ ७ ॥

६१

पांडववळाची लागतां कसोटी। यशायश अंतीं कांहीं घडो ॥ १ ॥
भूमी नांगरूनि पेरणी करितां । कृषीवल चित्ता समाधान ॥ २ ॥
प्रयत्न उत्साह सिद्धीचीं कारणें । वहु निमित्तानें कार्यसिद्धि ॥ ३ ॥
गुणहीना यश यत्नें न्यूनाधिक । यत्नाविण व्यर्थ शौर्यादि ते ॥ ४ ॥
उपाय योजूनि विक्रम करावा । दंडचि योजावा दुष्टांप्रति ॥ ५ ॥
स्थानच्युति शक्य सागर-पर्वतां । मर्त्यांचा हा लेखा कोण करी ॥
न गणीं आपणा असमर्थ कदा । योग्य कालावस्था तेंचि यश ॥ ७ ॥
विप्र कोणी एक सांगे हें पित्यासी । कळलें तें मजसी महद्भाग्यें ॥
वासुदेव म्हणे द्रौपदी धर्मासी । बृहस्पतिनीति ऐसी सांगे ॥ ९ ॥

अध्याय ३३ वा

६२

भीम म्हणे राया द्रौपदीवचन । ऐकूनियां यत्न करीं वेगें ॥ १ ॥
व्यर्थ धर्म धर्म वोलूनियां क्लेश । महा व्यसनास म्हणसी धर्म ॥
धर्म, अर्थ, काम सेवावे एकत्र । कदापि एकेकी सेवूं नये ॥ ३ ॥
पूर्व-मध्यदिनीं धर्म-अर्थ जाण । कामाचें सेवन व्हावें अंतीं ॥ ४ ॥
पूर्व-मध्य वय जावें काम-धनें । अंत्य वय धर्में नियम ऐसा ॥ ५ ॥

अभ्युदय मोक्ष कांहींहि न आम्हां । जाणोनि हें यत्ना करीं वेगं ॥
निर्धनासी धर्म अशक्य या लोकीं । धर्म क्षत्रियासी बलोत्साह ॥
ईश्वरचि धर्म बोलती सज्जन । ऐश्वर्य जोडून धर्म करीं ॥ ८ ॥
व्याध, शल्यकाची नीति आचरूनि । जिंकिलें देवांनीं आसुरांलागीं
संवत्सर शब्द दिनार्थ जाणावा । संग्राम करावा दुर्जनांसी ॥ १० ॥
वासुदेव म्हणे भीमाची गर्जना । व्यर्थ ही प्रतिज्ञा कपटद्यूतें ॥

६३

अल्प धर्मत्यागें बहुधर्म साधीं । पालन सविधि तपचि तें ॥ १ ॥
श्वानचर्मीं दुग्ध, शूद्रमुखीं वेद । तस्करासी बोध व्यर्थ जनीं ॥ २ ॥
स्त्रियांचें तें बल दुर्योधन राज्य । बोलताती त्याज्य बालवृद्ध ॥ ३ ॥
जिवंत असोनि व्यर्थ आम्हीं झालों । दैन्य हें पावलों हाय राजा ॥
वृत्रावरी इंद्र तैसा होईं सज्ज । करोनियां युद्ध विजयी होईं ॥ ५ ॥
असह्य हा वेग भीम अर्जुनांचा । उत्साह कोणाचा न टिके एथें ॥६॥
संपादूं फिरूनि आपुलें वैभव । वंदी वासुदेव भगवंतासी ॥ ७ ॥

अध्याय ३४ वा ६४

क्रुद्ध भीमाचें वचन । शांतपणें ऐके धर्म ॥ १ ॥
माझा अपराध थोर । तेणें संकट हें घोर ॥ २ ॥
कपटद्यूतहि पाहूनि । पराङ्मुख झालों नाहीं ॥ ३ ॥
धैर्यनाश करी क्रोध । कठिण चित्ताचा निरोध ॥ ४ ॥
केली प्रतिज्ञा सभेंत । कैसा होऊं लोभासक्त ॥ ५ ॥
होतां प्रतिज्ञा त्या स्थानीं । बोललासी न हे वाणी ॥ ६ ॥
जातां समय तूं कैसें । टोंचूनियां वदसी ऐसें ॥ ७ ॥
आतां प्रतीक्षा करावी । योग्य संधि येवों द्यावी ॥ ८ ॥
नको इहपर सौख्य । सत्य सर्वांहूनि श्रेष्ठ ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे धर्म । समयीं करूं म्हणे यत्न ॥ १० ॥

अध्याय ३५ वा ६५

चिरंजीव तेणें प्रतीक्षा करावी । त्वरा स्वीकारावी मर्त्य जीवें ॥ १ ॥
क्षीण होतां कैसा होइल विक्रम । करोनि संग्राम सौख्य भोगीं ॥ २ ॥

द्रौपदीसमेत संतप्त मी झालों । संकटीं पडलों भीम म्हणे ॥ ३ ॥
मंदबुद्धि कैसा जाहलासी राया । अजगरचि ठाया एका वैसे ॥४॥
अंधारांत सूर्य लपे तरी कैसा । शक्य ती गुप्तता कैसी आम्हां ॥५॥
मास त्रयोदश तेचि वर्षे तेरा । जाणोनियां वीरा मार्ग क्रमीं ॥ ६ ॥
दोषचि मानिसी तरी वृषभ पोशीं । तेणें तूं निर्दोषी शास्त्र म्हणे ॥
युद्धाविण भीमा धर्म नच ठावा । प्रिय वासुदेवा 'जयग्रंथ' ॥ ८ ॥

अध्याय ३६ वा ६६

भीम वचन ऐकूनि । राव चिंतीतसे मनीं ॥ १ ॥
वळी म्हणोनि केवळ । कैसें सिद्ध करूं दळ ॥ २ ॥
भीमा विचारावांचूनि । कर्म करितां दुःख जनीं ॥ ३ ॥
महाबळी भीष्म-द्रोण । तैसे नृपाळ सन्मान्य ॥ ४ ॥
कर्ण धनुर्धर श्रेष्ठ । भीमा युद्ध नसे इष्ट ॥ ५ ॥
इतुक्यामाजी येती व्यास । धैर्य देती ते सकलांस ॥ ६ ॥
नेती एकांतीं धर्मासी । 'प्रतिस्मृति विद्या' देती ॥ ७ ॥
दिव्य अस्त्रें संपादून । विजयी होईल अर्जुन ॥ ८ ॥
रुद्र, वरुण, महेंद्र । यमधर्म तो कुवेर ॥ ९ ॥
तयां प्रसन्न करूनि । अस्त्रें घ्यावीं संपादूनि ॥ १० ॥
जिष्णु, नारायण-सखा । हेतु पुरवील तुझा ॥ ११ ॥
कथुनि, करीं स्थलांतर । वदुनि गुप्त मुनीश्वर ॥ १२ ॥
सकल जाती काम्यकवनीं । वासुदेव वंदी मनीं ॥ १३ ॥

अध्याय ३७ वा ६७

पुढती एक्या दिनीं धर्म अर्जुनासी । म्हणे वा तपासी जाईं आतां ॥
भीष्म, द्रोण, कृप, अश्वत्थामा, कर्ण । शस्त्रास्त्रसंपन्न प्रतिस्पर्धी ॥२॥
महाबळी राजा तेणें दुर्योधन । मंत्र हा जपून सिद्धि पावे ॥ ३ ॥
शस्त्रास्त्रसंपन्न इंद्रासी प्रार्थूनि । अस्त्रें संपादूनि धन्य होईं ॥ ४ ॥
आज्ञा मानूनियां निघाला अर्जुन । आशीर्वाद जन देती तया ॥ ५ ॥
कृष्णा म्हणे आम्हां जन्म क्षत्रियाचा । न लाभावा कदा हेचि इच्छा ॥

सकल तीं दुःखें हीन, या वियोगें। निर्विघ्न स्वमार्गे सुखें जाई ॥७॥
लक्ष्मी, सरस्वती, कीर्ति, द्युति, पुष्टि। होवोत तुजसी साह्य सदा॥
हिमाचलावरी धनुर्धारी वीर। पातला सत्वर क्रमूनि पंथ॥ ९॥
पिंगट वर्णाचा तपस्वी पाहिला। वासुदेव झाला तुष्ट मनीं॥ १०॥

६८

म्हणे तपस्वी पार्थासी। एथ धनु कासयासी॥ १॥
उच्च गति प्राप्त होतां। न धरीं धनुष्य हें हाता॥ २॥
म्हणे इंद्र मी, अर्जुना। सांगें मनींची कामना॥ ३॥
पार्थ म्हणे दे अस्त्रांसी। पुरवीं हेचि इच्छा माझी॥ ४॥
इंद्र म्हणे कासयासी। अस्त्रें, लाभतां सद्गति॥ ५॥
पार्थ म्हणे मरण वरें। जरी कर्तव्य न पुरें॥ ६॥
ऐकूनियां बोले इंद्र। करीं, प्रसन्न त्रिनेत्र॥ ७॥
तदा अस्त्रें मी अर्पीन। गुप्त झाला हें कथून॥ ८॥
वासुदेव म्हणे पार्थ। राही तेथें योगयुक्त॥ ९॥

---

## कैरातपर्व ४

अध्याय ३८ वा

६९

हिमगिरीवरी शोभला अर्जुन। पुष्प–फलें वन नटलें होतें॥ १॥
लंघूनि तें वन गिरीवरी गेला। सारस-कोकिळानाद ऐके॥ २॥
क्रौंच, मयूरादि पक्षी मनोहर। निर्मल निर्झर, सरिता बहु॥ ३॥
ऐशा रम्य वनीं संतुष्ट चित्तानें। तप आनंदानें करी पार्थ॥ ४॥
तृण अजिनासी धारण करूनि। राहिला भक्षूनि गलित पर्णं॥ ५॥
प्रथम मासीं फल, त्रितियादिनीं भक्षी। षष्ठ पंचदशीं पुढती सेवी॥६॥
पुढती मासामाजी भक्षी एकदिन। वायूचें भक्षण करी अंतीं॥ ७॥
ऊर्ध्वहस्त राही पादांगुष्ठावरी। शोभे जटाधारी तपस्वी तो॥ ८॥
पाहूनि तें तप महर्षिसंघात। निवेदी वृत्तांत नीलग्रीवा॥ ९॥

शिव म्हणे तयां जावें स्वस्थानासी । जाणितों पार्थाची इच्छा पूर्ण ॥
वासुदेव म्हणे मुनि स्वस्थानासी । गेले शंकरासी वंदूनियां ॥११॥

अध्याय ३९ वा

७०

घेई किराताचा वेष । शिव भोळा तो महेश ॥ १ ॥
चाप बाण हातीं घेई । किराती ते उमा होई ॥ २ ॥
नाना वेषें भूतगण । अगणित स्त्रिया जाण ॥ ३ ॥
वन निःशब्द जाहलें । पार्थासमीप पातले ॥ ४ ॥
वराह तो 'मूक' दैत्य । होऊनियां येई तेथ ॥ ५ ॥
पार्थ तयालागीं पाही । गांडीवासी करीं घेई ॥ ६ ॥
केला थोर टणत्कार । पाहूनियां ती शिकार ॥ ७ ॥
म्हणे किरात पार्थासी । असे शिकार ही माझी ॥ ८ ॥
पार्थ दुर्लक्ष करूनि । शर सोडी तया क्षणीं ॥ ९ ॥
एकाक्षणीं उभयांचे । बाण झोंबती तयातें ॥ १० ॥
वासुदेव म्हणे दैत्य । झाला गतप्राण तेथ ॥ ११ ॥

७१

किरातवेषानें असशी तूं कोण । घोर हें कानन पार्थ म्हणे ॥ १ ॥
सोडिलासी कां रे दैत्यावरी शर । दावितों सत्वर शौर्य तुज ॥ २ ॥
हांसोनि किरात पार्थासी बोलला । कानन आम्हांला सदन वाटे ॥
कां रे सुकुमारा पातलासी एथें । कां रे वराहातें वधिलें म्हणे ॥४॥
बोलतां बोलतां समर जुंपलें । गांडीव खेंचिलें धनुर्धरें ॥ ५ ॥
करितां वर्षाव प्रखर शरांचा । काय कोमलता भिल्ल म्हणे ॥ ६ ॥
ऐकोनि नाराच शर सोडी पार्थ । अचल किरात क्षतहीन ॥ ७ ॥
पार्थ म्हणे कोण साही माझे बाण । रुद्राविण अन्य मृत्यु पावे ॥८॥
वासुदेव म्हणे पार्थ सोडी शर । लीलेनें स्वीकार भिल्ल करी ॥९॥

७२

इतुक्यांत नवल झालें । भाते अक्षय्य संपले ॥ १ ॥
पार्थ भयाकुल झाला । स्मरे मानसीं अग्नीला ॥ २ ॥

ओढी प्रत्यंचा-पाशानें । ताडीतसे धनुष्यानें ॥ ३ ॥
गिळिलें किरातानें चाप । पार्थ करीं घेई खड्ग ॥ ४ ॥
अभंग तें खड्ग भंगे । पार्थ फेंकी शिला वेगें ॥ ५ ॥
अंतीं द्वंद्वयुद्ध झालें । चटचटा नाद आले ॥ ६ ॥
करिती प्रहार त्वेषानें । दंडमुष्टींचीं ताडनें ॥ ७ ॥
क्रोधें आंवळूनि अंतीं । पाडी किरात पार्थासी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । पडला तत्काळ मूर्छित ॥ ९ ॥

७३

सावधान होतां पार्थ प्रार्थी शंकरासी ।
लिंग मृत्तिकेचें करी बिल्व अर्पी त्यासी ॥ १ ॥
नवल पाहूनियां पार्थ चकित तें झाला ।
पार्थार्पित बिल्वदलें किरात शोभला ॥ २ ॥
भिल्ल मस्तकीं ती पूजा पाहूनि अर्जुन ।
पदांबुजीं नम्र होई म्हणे हेतु पूर्ण ॥ ३ ॥
सुप्रसन्न होई तया वेळीं भोलानाथ ।
म्हणे फाल्गुना अर्पितों माग इष्ट अस्त्र ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे तुष्ट होतां गिरिराणा ।
काय अप्राप्य या जनीं सांग, भक्तजनां ॥ ५ ॥

७४

पुढती पाहूनि शूलपाणी, पार्थ । जोडूनियां हस्त स्तवन करी ॥१॥
देवा महादेवा विभो नीलग्रीवा । असुर मानवां अजिंक्य तूं ॥ २ ॥
शिवा, विष्णु तूंचि, दक्षदर्पहारी । नमन त्रिपुरारी असो तुज ॥३॥
अज्ञानें तुजसी द्वंद्वयुद्ध केलें । अपराध झाले क्षमा करीं ॥ ४ ॥
शिव म्हणे पार्था क्षमिलें तुजसी । धरिलें हृदयासी प्रेमभरें ॥५॥
वासुदेव म्हणे हांसे भोलानाथ । बोलला सुस्पष्ट मधुर वाणी ॥६॥

अध्याय ४० वा

७५

शिव म्हणे धनुर्धरा । मागें इच्छिसी त्या वरा ॥ १ ॥
तपस्वी तूं श्रेष्ठ नर । कृष्ण ब्रह्म परात्पर ॥ २ ॥
चाप तूणीर दिधलें । अंग अक्षत जाहलें ॥ ३ ॥

पार्थ म्हणे महादेवा । ब्रह्मशिरोस्त्राचा ठेवा ॥ ४ ॥
भीष्म-द्रोणांस्तव देई । नम्र असे तुझ्या पायीं ॥ ५ ॥
अर्पितांचि सविधान । झालें अस्त्रसंनिधान ॥ ६ ॥
क्षुद्रकार्जी न योजावें । सकल जगातें रक्षावें ॥ ७ ॥
चिंतितांहि कार्य करी । सिद्ध शिवाची वैखरी ॥ ८ ॥
कंप पावली अवनी । शंख दुंदुभींचा ध्वनि ॥ ९ ॥
दर्शनेंचि धन्य पार्थ । शिव म्हणे जा स्वर्गांत ॥ १० ॥
गंगाधर गुप्त झाला । वासुदेव वंदी त्याला ॥ ११ ॥

अध्याय ४१ वा ७६

धन्य धन्य झालों जगीं म्हणे पार्थ । पाहिला प्रत्यक्ष उमाकांत ॥
प्रेमें मज तेणें हृदयीं धरिलें । सार्थक जाहलें जन्मूनियां ॥ २ ॥
इतुक्यांत देव वरुण पातला । धनेश्वर आला मागोमाग ॥ ३ ॥
यमराज येई विमानीं बैसोनि । इंद्रहि त्या स्थानीं विराजला ॥ ४ ॥
दिव्य दृष्टिदानें स्तविती तयासी । शिक्षा दानवांसी म्हणती करीं ॥
यम म्हणे घेई अस्त्र, दंड, मोदें । वरुण आनंदें पाश देई ॥ ६ ॥
'अंतर्धान' नामें अस्त्र कुबेराचें । लाभलें पार्थातें तया वेळीं ॥ ७ ॥
इंद्र म्हणे स्वर्गी येई पंडुसुता । महत्कार्य आतां करिसील तूं ॥८॥
घेऊनि स्यंदन येईल मातली । कार्यसिध्दि झाली जाणें तुझी ॥ ९ ॥
अर्पीन तुजसी अस्त्रें मी स्वर्गांत । आनंदलें चित्त अर्जुनाचें ॥ १० ॥
पूजूनियां केला पार्थानें सन्मान । गांठिलें स्वस्थान सकलांनीं ॥
वासुदेव म्हणे पूर्ण मनोरथ । जाहला कृतार्थ धनंजय ॥ १२ ॥

---

## इंद्रलोकाभिगमनपर्व ५

अध्याय ४२ वा ७७

मुनि म्हणे राया स्यंदनाची वाट । उत्कंठेनें पार्थ पाही तदा ॥ १ ॥
स्मरतां इंद्रासी मातली पातला । विदारीत आला मेघांलागीं ॥ २ ॥

तया वेळीं होती, दिशा निनादित । स्यंदनीं विविध अस्त्रें होतीं ।
गदा, शक्ति, प्रास, अशनी, वंदुका । चक्रयुक्त होत्या रथीं बहु ॥
वायुस्फोट तैशा पाषाणांच्या राशी । ध्वज नाम ज्यासी वैजयंत ॥
क्षणहि ठरेना दृष्टि, वेग ऐसा । मातली दैवसा भासे पार्था ॥ ६ ।
इतुक्यांत प्रार्थी मातली पार्थासी । आज्ञा देवेंद्राची कथन करी ।
वासुदेव म्हणे संतोषला पार्थ । दुर्लभ हा रथ पुण्यवन्ता ॥ ८ ॥

७८

मातलीसी सांगे पार्थ । घरीं आंवरूनि रथ ॥ १ ॥
गंगेमाजी करीं स्नान । संध्या जप तें तर्पण ॥ २ ॥
शैलराजासी स्तवूनि । हर्षें वैसला स्यंदनीं ॥ ३ ॥
गमन केलें वायुवेगें । विविध यानें दिसतीं मार्गें ॥ ४ ॥
स्वयंप्रकाश पुण्यात्मे । पाहूनियां मातलीतें ॥ ५ ॥
पुशितां, कळलें पार्थासी । तारे दिसती हे जनांसी ॥ ६ ॥
पुढती ऐरावत पाही । वेगें रथ पुढती जाई ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । आला इंद्रनगरीस ॥ ८ ॥

अध्याय ४३ वा ७९

अवलोकी पार्थ अमरावतीतें । सिद्ध-चारणांतें अवलोकी ॥ १ ॥
पुष्पफळें जयां सर्व ऋतूंमाजी । ऐसी वृक्षराजी डोलतसे ॥ २ ॥
नंदनवनासी पाहूनियां धाला । दर्शन प्राण्याला न घडे ऐसें ॥ ३ ॥
देव ऋषि तैसे गंधर्व तयासी । प्रेमें सत्कारिती स्वर्गामाजीं ॥ ४ ॥
'सुरवीथी' मार्ग वाद्य निनादित । क्रमूनि सभेंत प्राप्त होई ॥५ ॥
वंदितां, इंद्रानें आलिंगिलें त्यासी । सान्निध पार्थाली वैसविलें ॥
सर्वांगीं प्रेमानें फिरवी कृपाहस्त । शोभला तें पार्थ इंद्रासम ॥७॥
घृताची, मेनका उर्वशी गाताती । वासुदेव चित्तीं संतोषला ॥८॥

अध्याय ४४ वा ८०

सत्कार पावोनि अमरावतीमाजी । धनंजय राजी पितृगृहीं ॥ १ ॥
यथाविधि सौख्यें घेई अस्त्रज्ञान । वज्रास्त्र दारुण अशनी तैवी ॥

अकालीं त्या योगें उत्पत्ति मेघांची । वर्षं पांच ऐसीं कंठीतसे ॥३॥
इंद्राज्ञेनें नृत्य-गीत संपादिलें । कुंतीचीं पाऊलें स्मरुनी दुःखें ॥ ४ ॥
द्यूतोद्भव दुःखें उद्विग्न मनांत । इंद्रभुवनांत तळमळे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे नाहीं चित्त शांत । तया वैभवांत सुख कैसें ॥ ६ ॥

अध्याय ४५ वा

८१

इंद्र म्हणे चित्रसेना । जाई ऊर्वशीसदना ॥ १ ॥
धनंजयाच्या सेवेसी । करीं सादर तियेसी ॥ २ ॥
ऐकूनियां वासवआज्ञा । गेला गंधर्व त्या कामा ॥ ३ ॥
उर्वशीच्या सदनीं जाई । अर्जुनाचे गुण गाई ॥ ४ ॥
निर्मत्सर क्षमावान् । साङ्ग वेदांचें पठण ॥ ५ ॥
इंद्रासम बलवंत । तेज, शील, रूप, व्रत ॥ ६ ॥
झाली मोहित उर्वशी । सिध्द पार्थाच्या भेटीसी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे हरि । भक्तपरीक्षा ही करी ॥ ८ ॥

अध्याय ४६ वा

८२

चित्रसेनालागीं निरोप देऊनि । सुस्नात होवोनि शुचिस्मिता ॥ १ ॥
मदनशरांनीं पीडिलें अंतर । रम्य अलंकार ल्याली बहु ॥ २ ॥
सुगंध सुमनमाला लेवूनियां । तोषवी विजया मनामाजी ॥ ३ ॥
प्रदोषसमईं चंद्रोदय होतां । मार्गामाजी जातां शोभतसे ॥ ४ ॥
कुरळ्या कुंतलीं रुळती सुमनें । स्पर्धा अभिमानें निशिकांतासी ॥
कदलीसम वांके अवयव भारें । अंगही थरारे क्षणोक्षणीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे तापसीहि जन । कैसे न मोहून जाती सांगा ॥ ७ ॥

८३

रक्तवर्ण पादतल । जैसें उत्पल कोमल ॥ १ ॥
शुभ्रवस्त्र जघनदेश । ऊरु जंघा त्या सुरेख ॥ २ ॥
प्रमाणित मदिरापानें । शोभे आरक्त लोचनें ॥ ३ ॥
विरल, नील उत्तरीया । लेउनि आच्छादिली काया ॥ ४ ॥
मेघाच्छन्न चंद्रलेखा । तैसी भासे सकल लोकां ॥ ५ ॥

द्वारामाजी दिसतां, दूत । कथिती पार्थासी वृत्तांत ॥ ६ ॥
शंकित ये स्वागतासी । लाजे पाहूनि तियेसी ॥ ७ ॥
धैर्यें प्रणाम करूनि । सन्मानिलें कर जोडोनि ॥ ८ ॥
ऐका अप्सरा जें वदे । वासुदेव सार सांगे ॥ ९ ॥

८४

बोले उर्वशी पार्थासी । मज आज्ञा हे इंद्राची ॥ १ ॥
नृत्यसमई वारंवार । बघतां अवलोकी इंद्र ॥ २ ॥
तुझा हेतु ओळखूनि । आज्ञापिलें मजलागूनि ॥ ३ ॥
अवलोकूनि रूप, गुण । गेलें अंतरीं मोहून ॥ ४ ॥
म्हणूनि पातलें या ठाया । पुरवीं हेतु धनंजया ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । झांकीतसे कर्णपथ ॥ ६ ॥

८५

माथवो तूं म्हणे मज पूज्य जनीं । कुंती तें इंद्राणीसम श्रेष्ठ ॥ १ ॥
देवसभेमाजी ऐक कां पाहिलें । वंश तुझ्यामुळें पौरवांचा ॥ २ ॥
जननी वंशाची ऐशा पूज्यभावें । पाहिलें, न यावें पापमनीं ॥ ३ ॥
उर्वशी तयातें कथी देवनीति । विनवी तयासी परोपरी ॥ ४ ॥
नायके म्हणोनि बोले शापवाणी । पुरुषत्वाहानी येवो तुझ्या ॥ ५ ॥
चित्रसेनालागीं वृत्त कथी पार्थ । दुःखें तो इंद्रास कथन करी ॥ ६ ॥
पाचारूनि इंद्र बोले अर्जुनासी । वत्सा या शापासी समजें वर ॥ ७ ॥
अज्ञातवासीं तो येईल कामासी । पुढती पुरुषत्वासी पावसील ॥ ८ ॥
आनंदला पार्थ इंद्राच्या वचनें । या कथा श्रवणें चित्तशुद्धि ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे विजयाचें स्मरण । करील कल्याण भाविकांचें ॥ १० ॥

अध्याय ४७ वा

८६

एकदां विख्यात महर्षि लोमश । संचार करीत स्वर्गी येती ॥ १ ॥
स्वागत तयांचें करी शचिनाथ । सिंहासनीं पार्थ बघती मुनि ॥ २ ॥
सुकृत पार्थाचें काय ऐसें थोर । करिती विचार मनामाजी ॥ ३ ॥
आशय जाणूनि इंद्र करी स्मित । सामान्य हा पार्थ समजूं नका ॥

सम पुण्य-पापें जाहला मानव। ऐसा कोणी जीव नसे जगीं ॥ ५ ॥
कुंतीच्या उदरीं मदंशें जाहला। अस्त्रांस्तव आला स्वर्गामाजी ॥६॥
नर-नारायण, पार्थ-हृषीकेश। देवांच्या कार्यास प्राप्त झाले ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे बदरिकावन। पुरातन स्थान उभयांचें ॥ ८ ॥

८७

माझ्या प्रार्थनेसी मान। देउनि अवतरले जाण ॥ १ ॥
कृष्ण, कृष्णेच्या मिषानें। वधितील दुष्ट सैन्यें ॥ २ ॥
असुर निवातकवच। ब्रह्मवरें झाले मत्त ॥ ३ ॥
घात देवांचा कराया। असुर सजले मुनिराया ॥ ४ ॥
विष्णु कपिल तोचि हरि। लीलामात्रें सुजनां तारी ॥ ५ ॥
अल्प कार्यालागीं तया। कासयासी शीण द्यावा ॥ ६ ॥
पार्थ असुरां संहारिल। पुढती स्वस्थानीं जाईल ॥ ७ ॥
मुनिराया जा भूभागीं। कुशल सांगें धर्मालागीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ऐका। भावें पुढील वृत्तांता ॥ ९ ॥

८८

पार्थास्तव चिंता करूं नको धर्मा। कथावें स्वस्थाना त्वरित येई ॥
दिव्यबलाविण भीष्मद्रोणां रणीं। जिंकी ऐसा कोणी वीर नसे ॥
अस्त्रविद्या नृत्य-गीत तें वादित्र। संपादूनि वीर धन्य झाला ॥ ३ ॥
देवकार्य मोठें करोनि येईल। तोंवरी मंगल तीर्थें हिंडें ॥ ४ ॥
द्विजश्रेष्ठा करीं रक्षण धर्माचें। पार्थही मुनींतें विनवी तेंचि ॥ ५ ॥
तथेति बोलूनि काम्यकवनांत। लोमश धर्मास भेट देती ॥ ६ ॥

अध्याय ४८ वा

८९

व्यासमुखें सर्व वृत्तांत पार्थाचा। ऐकूनि धृतराष्ट्रा दुःख होई ॥ १ ॥
संजयासी म्हणे वीर पार्थासम। सैन्यामाजी कोण असे माझ्या ॥ २ ॥
पुत्र माझे दुष्ट जाती मृत्युपंथें। रणीं त्या पार्थातें कोण जिंकी ॥ ३ ॥
द्रोण, कर्ण, भीष्म वधितील सैन्य। तेणें हेतु पूर्ण कैसा होई ॥ ४ ॥
अस्त्रवेत्ते, शूर अजिंक्य पांडव। साह्यार्थ माधव सज्ज तयां ॥ ५ ॥

कैसातरी क्रोध तयांचा शमेल। कोण आंवरील पार्थ शरां ॥ ६ ॥
सहस्र करांनीं तापवितो रवि। तैसा धनुर्धारी पार्थवीर ॥ ७ ॥
राव म्हणे भासे अंतक सैन्याचा। वासुदेव त्याचा भाट झाला ॥८॥

अध्याय ४९ वा ९०

म्हणे संजय रायासी। दुर्योधनें छळिलें त्यांसी ॥ १ ॥
महासाध्वीचा त्या छळ। घडला, पुत्र तुझे खळ ॥ २ ॥
तदा क्रुद्ध झाले वीर। झाला प्रसन्न शंकर ॥ ३ ॥
वृत्त ऐकियेलें ऐसें। युध्द केलें भिल्ल वेषें ॥ ४ ॥
लोकपालही तोषले। ऐसें वृत्त ऐकियेलें ॥ ५ ॥
अंक विदारीन ऐसी। सत्य प्रतिज्ञा भीमाची ॥ ६ ॥
संजयासी म्हणे राव। अधिक घातकी सचिव ॥ ७ ॥
बाहुयुध्द शंकरासी। खांडववन तें अग्नीसी ॥ ८ ॥
नवलकारक या वार्ता। खचित नाश कौरवांचा ॥ ९ ॥
काय पुशी जनमेजय। कथितो ऐका वासुदेव ॥ १० ॥

अध्याय ५० वा ९१

जनमेजय म्हणे वैशंपायनासी। जीविका त्यां कैसी वनीं सांग ॥१॥
मुनि म्हणे वन्य-धान्य व मृगया। आधार हा तयां वनामाजीं ॥२॥
अग्निहोत्रि तैसे स्नातक संन्यासी। पोशिंदा तयांसी धर्मराज ॥३॥
मातेसम रक्षी पांचाळी तयांतें। स्मरती पार्थातें निरंतर ॥ ४ ॥
जप होम तैवी स्वाध्यायीं ते रत। ऐसीं वर्षें पांच काम्यकवनीं ॥
वासुदेव म्हणे निस्तेज दुर्बळी। कोणीहि त्या स्थळीं न दिसे दुःखी ॥

अध्याय ५१ वा ९२

दीर्घ उसासा सोडून। राव संजयालागून ॥ १ ॥
म्हणे सूता न मिळे शांति। शौर्य, धैर्य पांडवांसी ॥ २ ॥
परस्पर त्यांचें प्रेम। सिंहासम पराक्रम ॥ ३ ॥
वृष्णिवीर त्यां साह्यासी। राम-कृष्णांचीहि प्रीति ॥ ४ ॥

भीमाची ते महा गदा । लटके शिक्यावरी सदा ॥ ५ ॥
टणत्कार गांडीवाचा । सहन करिल कोण ऐसा ॥ ६ ॥
हितवचनें आप्तांचीं । वारंवार तीं स्मरती ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे नृप । आतां करी पश्चात्ताप ॥ ८ ॥

१३

धृतराष्ट्रालागीं संजय बोलला । प्रमाद जाहला तुझ्या हातें ॥ १ ॥
निवारण नाहीं घडलें योग्यवेळीं । क्रोधें वनमाळी लाल झाला ॥
धृष्टद्युम्नादिक धर्मासी भेटले । सारथी हो, बोले धर्म, कृष्णा ॥३॥
तथेति म्हणोनि कृद्ध होई कृष्ण । वैभवा स्मरून दुःखी झाला ॥
वीरांसह म्हणे जाऊनि युद्धासी । रणांत दुष्टांसी लोळवीन ॥ ५ ॥
पूर्व वैभवानें सुखें राज्य करीं । बोलला श्रीहरी धर्मालागीं ॥
धर्म म्हणे केली प्रतिज्ञा ते पूर्ण । होतांचि, दारुण युद्ध होवो ॥७॥
वासुदेव चिंती श्रीकृष्णमुरारी । भक्तांचा कैवारी नारायण ॥ ८ ॥

१४

वीर धृष्टद्युम्नादिक । करुनी केशवासी शांत ॥ १ ॥
खिन्न होऊं नको कृष्णे । म्हणती लढूं प्राणपणें ॥ २ ॥
भक्षितील गृध्र वृक । हसले त्यांचें मृत मांस ॥ ३ ॥
ओढितील, पशुपक्षी । सभेमाजी नेलें, त्यांसी ॥ ४ ॥
प्राशितील रुधिर त्यांचें । घटघटां पशु मोदें ॥ ५ ॥
पाप पाहिलें तें ज्यांनीं । रुधिर त्यांचें प्राशिल भूमी ॥ ६ ॥
राया ऐसी घोर वेळ । निश्चित हे समजें बोल ॥ ७ ॥
बोलले जे तया स्थानीं । सत्य करितील ते वाणी ॥ ८ ॥
कृष्णादिक ते अजिंक्य । वीरांसह झाले क्रुद्ध ॥ ९ ॥
राव म्हणे विदुरवाणी । सत्य होइल चिंता मनीं ॥ १० ॥
व्यर्थ समय जातां चिंता । वासुदेव सांगे चित्ता ॥ ११ ॥

---

# नलोपाख्यानपर्व ६

अध्याय ५२ वा

९५

जनमेजय म्हणे वैशंपायनासी । किरीटि स्वर्गासी जातां काय ॥१॥
पांडवांचें वृत्त कथावें मजसी । मुनि म्हणे होती शोकमग्न ॥ २ ॥
महाबाहु भीम म्हणे युधिष्ठिरा । आमुच्या अंतरा कष्ट बहु ॥ ३ ॥
बळिवंत आम्हीं क्रोधासी गिळूनि । कंठितों या वनीं काळ दुःखें ॥
द्यूतदोषें तुझ्या दुर्बलता आम्हां । धन दुर्योधना राव देती ॥ ५ ॥
क्षात्रधर्म, राज्य, मान्य हें बुधांसी । जिंकूनि दुष्टांसी येऊं वनीं ॥
मग हे प्रतिज्ञा सुखें पूर्ण करीं । अल्प दोष तरी यज्ञ करूं ॥ ७ ॥
दुष्टासवें दुष्ट हेचि राजनीति । वासुदेव कथी भीमवाक्य ॥ ८ ॥

९६

संवत्सर तुल्य एक अहोरात्र । धर्मशास्त्रीं घोर वेळ आतां ॥ १ ॥
संवत्सर शब्दें वेदामाजी दिन । तीस कृच्छ्रें जाण अब्द होय ॥ २ ॥
वेदशास्त्र जरी प्रमाण तुजसी । प्रतिज्ञेची पूर्ति तेरा दिनीं ॥ ३ ॥
वश न जोंवरी भूमि हे खलासी । नाश परिवारेंसी योग्य त्याचा ॥
शोधूनियां किंवा खेळूनियां द्यूत । आम्हासी वनांत धाडितील ॥५॥
जन्मभरी आम्हां करूं नको दीन । 'वंचका वंचन' धर्म हाचि ॥६॥
वासुदेव म्हणे आज्ञा मागे भीम । अग्नि तृणासम वैरी वधूं ॥ ७ ॥

९७

अवघ्राण मस्तकाचें । करूनि धर्म बांधवातें ॥ १ ॥
म्हणे विक्रमी तूं भीमा । नको कपटमार्ग आम्हां ॥ २ ॥
योग्य समयीं शौर्यानें । हेतु साधाल सुखानें ॥ ३ ॥
तया वेळीं अकस्मात । बृहदश्व ऋषि प्राप्त ॥ ४ ॥
यथाविधि करून पूजा । नम्रभावें बोले राजा ॥ ५ ॥
कपटद्यूतें दीन झालों । व्यथा दारुण पावलों ॥ ६ ॥
होती असह्य यातना । कधीं पाहीन अर्जुना ॥ ७ ॥
ऐसा दुःखी कोणीतरी । ऐकिला कीं अवनीवरी ॥ ८ ॥

वासुदेव म्हणे ऐका । मुनि सांगे नवलकथा ॥ ९ ॥

अध्याय ५३ वा

९८

वीरसेनाचा सुपुत्र । नळ नृपाळ पवित्र ॥ १ ॥
देवतुल्य वेदवेत्ता । महा भक्त ब्राह्मणांचा ॥ २ ॥
सत्यवादी द्यूतप्रिय । मनूसम इंद्रियजय ॥ ३ ॥
निषधाधिप परमधीर । प्रजारक्षणीं तत्पर ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐका । विदर्भेश श्वशुर त्याचा ॥ ५ ॥

९९

उदार विक्रमी भीमक नृमणि । संतानावांचोनि व्यथा पावे ॥ १ ॥
'दमनक' ऋषि मंदिरासि आले । पूजितां तोषले तयावरी ॥ २ ॥
पुत्रत्रय तैवीं कीर्तिमती कन्या । लावण्यसंपन्ना पावसील ॥ ३ ॥
ऐसें कथोनियां मुनिराज गेले । दम, दान्त झाले दमन, सुत ॥ ४ ॥
दमयंती कन्या लावण्याची खाणी । ख्यात त्रिभुवनीं जाहली ते ॥
भासे ती कमला कमलनयना । त्रैलोक्यीं अनन्या सुहासिनी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे शतसंख्य दासी । सख्याहि सेविती तिजलागीं ॥

१००

वीरसेनाचा नंदन । मूर्तिमंत तो मदन ॥ १ ॥
सख्या वर्णिती तयासी । नित्य दमयंतीपाशीं ॥ २ ॥
परिवारहि नळाचा । करी दमयंती प्रशंसा ॥ ३ ॥
झालीं आकर्षित दोघें । प्रेमसिंधु उसळे वेगें ॥ ४ ॥
अंतःपुराच्या सान्निध । उपवनीं तें निषध ॥ ५ ॥
पाही उड्डाण हंसांचें । पंख तयां सुवर्णाचे ॥ ६ ॥
झाला मोहित मानसीं । धरिलें कौशल्यें एकासी ॥ ७ ॥
पक्षी बोले मानुषवाणी । प्रिय करीन तुझें मी ॥ ८ ॥
मज मारूं नको राया । येई दमयंती या ठाया- ॥ ९ ॥
ऐसें करीन, मी नृपा । हंसावरी होई कृपा ॥ १० ॥
वासुदेव म्हणे पक्षी । उडुनी गेले अंतरिक्षीं ॥ ११ ॥

१०१

गगनीं भरान्या मारीत ते हंस। येती उपवनांत दमयंतीच्या ॥ १ ॥
पाहोनि तयांसी हर्षे दमयंती। सकल धांवती हंसांमागें ॥ २ ॥
चोरोनियां अंग हंस जाती दूरी। वृक्षशाखांवरी उडती क्षणीं ॥
एकेकामागोनि धांवती बालिका। दमयंती एकामागें जाई ॥ ४ ॥
हंस म्हणे बाले होई भाग्यवती। देवांहूनि कांती नैषधाची ॥ ५ ॥
देव, यक्ष, नाग, गंधर्व पाहिले। नाहींच देखिलें रूप तैसें ॥ ६ ॥
दमयंती तूंहि स्त्रियांमाजी श्रेष्ठ। समसमां इष्ट योग होणें ॥ ७ ॥
ऐसेंचि नळासी सांग म्हणे कन्या। हर्षूनि वदान्या वदली हंसा ॥
वासुदेव म्हणे रसाळ हे कथा। ऐकूनियां चित्ता मोद वाटे ॥ ९ ॥

अध्याय ५४ वा १०२

हंसवचन ऐकूनि। कन्या अस्वस्थ ते मनीं ॥ १ ॥
कृश दीन ती विव्हल। चिंता करी अहोरात्र ॥ २ ॥
सख्या कथिती नृपासी। तळमळ ती कन्येची ॥ ३ ॥
कन्या उपवर जाणोनी। हेतु ओळखिला मनीं ॥ ४ ॥
योजूनियां स्वयंवरा। निमंत्रिलें नृपवरां ॥ ५ ॥
सेनेसह राव सर्व। येती अंतरीं ज्यां गर्व ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऋषि। गेले तदा इंद्रलोकीं ॥ ७ ॥

१०३

स्वयंवरवृत्त नारदमुखानें। ऐकिलें इंद्रानें स्वर्गामाजी ॥ १ ॥
भीमककन्येचें वर्णन ऐकूनि। देवराज मनीं संतोषला ॥ २ ॥
लोकपालांसवें देवेंद्र निघाला। नैषध पाहिला गगनांतूनि ॥ ३ ॥
पाहूनि तयाचें तेज, खिन्न झाले। भूमीवरी आले लोकपाल ॥ ४ ॥
दूत होऊनियां साह्य त्या मागती। वंदी तयांप्रति वासुदेव ॥ ५ ॥

अध्याय ५५ वा १०४

होईन मी साह्य ऐसें बोलूनियां। कर जोडूनियां वृत्त पुशी ॥ १ ॥
इंद्र म्हणे आम्हीं लोकपाल चार। अग्नि, यम, इंद्र, वरुण ऐसे ॥२॥



हंसवचन ऐकूनि । कन्या अस्वस्थ ते मनीं ॥ १ ॥
कृश दीन ती विव्हल । चिंता करी अहोरात्र ॥ २ ॥

—वनपर्व अ. ५४, अभंग १०२

दमयंतीसी त्वां जाऊनि कथावें। चितूनि वरावें आम्हां एका ॥ ३ ॥
नळ म्हणे जातों मीहि स्वयंवरा। मज क्षमा करा ऐशा वेळीं ॥४॥
इंद्र म्हणे कां रे शब्द मागें घेसी। जा राजकन्येसी भेटें त्वरें ॥ ५ ॥
राव म्हणे कैसा जाऊं तया स्थानीं। सामर्थ्य अर्पोनि धाडी इंद्र ॥
अदृश्य होवोनि मंदिरासी गेला। पाही चंद्रकला नळराज ॥ ७ ॥
रेखीव शरीर सुकुमार बाला। पाहोनि नृपाला काम बाधे ॥ ८ ॥
प्रतिज्ञा स्मरूनि आंवरी हृदय। वासुदेव पाय वंदी त्याचे ॥ ९ ॥

१०५

सख्या पाहोनि रायासी। विस्मयानें नम्र होती ॥ १ ॥
तेज, लावण्य तें धैर्य। म्हणती कोण असे आर्य ॥ २ ॥
अधोमुखी पाही तया। स्मित करी नळराया ॥ ३ ॥
दमयंती म्हणे वीरा। व्यथा देसी मम अंतरा ॥ ४ ॥
कोण कैसा येसी एथें। पिता उग्र अपराध्यातें ॥ ५ ॥
राव म्हणे मी नैषध। झालों देवेंद्राचा दूत ॥ ६ ॥
देव आले स्वयंवरीं। तयांतूनि एका वरीं ॥ ७ ॥
ऐसा तयांचा निरोप। त्यांच्याबळें आलों एथ ॥ ८ ॥
करीं योग्य तेंचि आतां। वासुदेव सांगे कथा ॥ ९ ॥

अध्याय ५६ वा

१०६

दमयंती म्हणे वंदूनि देवांसी। सेवा नृपाळाची काय करूं ॥ १ ॥
तन, मन, धन अर्पिलें तुजसी। स्वीकारीं मजसी पुण्यश्लोका ॥२॥
हंसाचें वचन जाळितें हृदया। स्वयवर राया तुझ्यासाठीं ॥ ३ ॥
विष, अग्नि, जळ किंवा गळफांस। स्वीकारीन मज अव्हेरितां ॥४॥
ऐकोनियां राव म्हणे तुझ्यासाठीं। देव या जगतीं प्राप्त झाले ॥५॥
इंद्र, वरुण तो अग्नि, यमधर्म। वरूनि हो धन्य कोणा तया ॥ ६ ॥
वरूनि तयांसी मज दे रक्षण। सुहृद वचन ऐकें माझें ॥ ७ ॥
सद्गदकंठानें बोले दमयंती। प्रतिज्ञा हे माझी 'वरिन तुज' ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे नळ स्मृति देई। दूत मी या ठाईं पातलोंसें ॥ ९ ॥

१०७

कैसा स्वार्थ साधूं माझा । दूतकार्य स्वीकारितां ॥ १ ॥
कांहीं उपाय कथावा । जेणें धर्म न सुटावा ॥ २ ॥
देवी म्हणे नळराया । यावे सर्व तया ठाया ॥ ३ ॥
देवांसमक्ष मी तुज । वरितां नसे लवही दोष ॥ ४ ॥
ऐसें ऐकूनि नृपाळ । गांठी सुखानें स्वस्थळ ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे देव । पुशिती रायालागीं सर्व ॥ ६ ॥

१०८

सुरोत्तमालागीं राजा । म्हणे गेलों तुमचे काजा ॥ १ ॥
लंघूनियां दंडधरां । गेलों दमयंतीमंदिरा ॥ २ ॥
सख्यांसह दिसलों तिजा । तुमचा कथिला निरोप ॥ ३ ॥
देवांसमक्ष मी तुज । वरिन वदली ते मज ॥ ४ ॥
ऐसा सकळ वृत्तांत । कथी घडला तोचि, नृप ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे धन्य । पुण्यवंत ऐसे जन ॥ ६ ॥

अध्याय ५७ वा १०९

भीमक नृपाळ मुहूर्त पाहोनि । पाचारी नृमणि मंडपांत ॥ १ ॥
गिरिवरि सिंहासमान शोभले । झळकती कुंडलें रत्नमय ॥ २ ॥
सुवर्णस्तंभांनीं शोभला मंडप । वलाढ्य युवक व्याघ्रांसम ॥ ३ ॥
दिपवीत आली कन्या नृपाळांसी । मोहियेली दृष्टि सकळांची ॥ ४ ॥
समानरूपाचे पाही वीर पांच । कथितां तियेस राजनामें ॥ ५ ॥
व्याकुळ चित्तानें देवांसी प्रार्थना । करी राजकन्या कर जोडी ॥
काया, वाचा, मनें नळाविण कोणी । चिंतिला न स्वप्नीं सत्य सत्य
व्रतस्थ मी झालें नळरायास्तव । तया पुण्यें देव तोषतील ॥ ८ ॥
राजकन्येचा हा निर्धार जाणूनि । प्रगट तोषूनि होती देव ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे सती दमयंती । ओळखूनि पती मोद पावे ॥ १० ॥

११०

छाया-घर्महीन निमिषोन्मेषशून्य । देवांचें दर्शन होई तिज ॥ १ ॥
अंतराळीं स्थित माला प्रफुल्लित । भूपाळ सुस्थित भूमीवरी ॥ २ ॥

ओळखूनि तया कंठीं माळ घाली । भूप तयावेळीं दुःखी झाले ॥
आनंदले देव महर्षिसंघात । देती धन्यवाद नळालागीं ॥ ४ ॥
नळ म्हणे प्रिये भक्ति तुझी थोर । जाण निरंतर स्वाधीन मी ॥ ५ ॥
दमयंती वंदी प्रेमें लोकपाळां । संतोष वाटला देवांलागीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ज्यांचा क्रोध, मोद । सफल, ते वंद्य जगामाजी ॥

१११

इंद्र म्हणे यज्ञामाजी । करिन भेटूनियां राजी ॥ १ ॥
पावसील उत्तमगति । वर माझे हे तुजसी ॥ २ ॥
इच्छिसील ज्या ज्या स्थळीं । प्रगट होईन त्या काळीं ॥ ३ ॥
तैंवी अग्निलोकप्राप्ति । अनलाची ऐसी उक्ति ॥ ४ ॥
कदन्नहि मधुर होवो- । करस्पर्शें, सुगती लाहो ॥ ५ ॥
वर यमाचे, वरुण । बोले कृपेचें वचन ॥ ६ ॥
इच्छिसील तेथें जळ । लाभे रम्य पुष्पमाळ ॥ ७ ॥
दिव्य वर हे लाभले । स्वस्थळासी सर्व गेले ॥ ८ ॥
राव गेला स्वस्थानासी । आज्ञा घेवोनि नृपाची ॥ ९ ॥
पुढती यज्ञ बहुत केले । कन्या पुत्रहि लाभले ॥ १० ॥
इंद्रसेन, इंद्रसेना । राव तोष देई जनां ॥ ११ ॥
वासुदेव म्हणे नळ । वसुधा सुखवी सकळ ॥ १२ ॥

अध्याय ५८ वा

११२

देव जातां स्वस्थळासी । द्वापर, कलि दिसती त्यांसी ॥
पुशितां इंद्र म्हणती तया । जातों स्वयंवरा राया ॥ २ ॥
इंद्र हांसोनि बोलला । लाभ जाहला नळाला ॥ ३ ॥
ऐकूनियां कलि क्रुद्ध । इंद्र म्हणे नळ शुद्ध ॥ ४ ॥
धर्मात्मा तो दृढव्रत । कोण देईल त्या शाप ॥ ५ ॥
कलि म्हणे हे द्वापरा । क्रोध असह्य जाहला ॥ ६ ॥
प्रवेशूनि शरीरांत । भ्रष्ट करीन नळास ॥ ७ ॥
अक्षरूपें साह्य करीं । प्रवेशूनि त्या माझारीं ॥ ८ ॥

अध्याय ५९ वा

११३

करोनियां ऐसी सिद्धता निघाला । निषधदेशीं आला क्रोधें कलि ॥
द्वादशाब्द नाहीं चूक सांपडली । घोर वेळ आली पुढती एक ॥
पादप्रक्षाळणाविण करी संध्या । संधि हेचि निंद्या कलीलागीं ॥
प्रवेश करूनि व्यापी शरीरातें । अन्यरूपें भेटे पुष्करासी ॥ ४ ॥
नळभ्रात्या, खेळें नळासवें द्यूत । करितों साह्यास म्हणे तया ॥५॥
जिंकूनि नळासी होशील समृद्ध । देश हा निषध भोगिसील ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मानव हा लोभें । दुराशेच्या मार्गें धांव घेई ॥ ७ ॥

११४

प्रोत्साहनें ऐशा पुष्कर, नळासी । आव्हानी द्यूतासी वारंवार ॥
कलिप्रेरणेनें नळ सिद्ध झाला । विनाश जाहला वैभवाचा ॥ २ ॥
नागरीक जन भेटावया येती । कळवी दमयंती रायालागीं ॥ ३ ॥
मोहित नृपाळ न भेटे कोणासी । दुःख जनतेसी होई बहु ॥ ४ ॥
ऐसें कपटद्यूत चाले बहुमास । जिंकिलें नळास पुष्करानें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे होणारें न चुके । खेळचि कौतुकें खेळे हरि ॥ ६ ॥

अध्याय ६० वा

११५

दमयंती पाहे द्यूतासक्त नळा । संकटाची वेळा घोर म्हणे ॥ १ ॥
पाठवूनि धात्री अमात्यां पाचारी । नळासी सुंदरी विनवी बहु ॥
न पाहेचि नळ आपुल्या मंत्र्यांसी । फांसे फसविती क्षणोक्षणीं ॥
कुशल सारथी वार्ष्णेय नलाचा । पाचारूनि वाचा वदली राणी ॥
संकटसमयीं साह्य करीं सूता । द्यूतासक्त पिता बालकांचा ॥ ५ ॥
बुडत्याचा पाय खोलांतचि जाई । तैसी स्थिति होई नृपाळाची ॥
यास्तव होवोनि सदय हे सूता । ने माझ्या बालकां कुंडिनपुरीं ॥
रथ अश्वांसह तेथेंचि ठेवोनि । यथेच्छ निघोनि जाईं सुखें ॥ ८ ॥
मंत्र्यांसी पुसोनि वार्ष्णेय निघाला । ठेवी बालकांना कुंडिनपुरीं ॥
पुढती वार्ष्णेय अयोध्येसी गेला । वासुदेव झाला खिन्न मनीं ॥

अध्याय ६१ वा

११६

जिंकूनियां सर्वस्वातें । वदे पुष्कर नळातें ॥ १ ॥
आतां दमयंतीविना । लाविसील काय पणा ॥ २ ॥
लावूनियां तिचा पण । निज इच्छा करीं पूर्ण ॥ ३ ॥
ऐकूनियां निंद्य वाणी । वटारूनि नेत्र दोन्ही ॥ ४ ॥
वस्त्रें, भूषणें फेंकिलीं । एका वस्त्रें उभा द्वारीं ॥ ५ ॥
अलंकारशून्या राणी । जाई नृपाच्या मागोनी ॥ ६ ॥
राव राहिला त्रिरात्र । ऐसा नगराबाहेर ॥ ७ ॥
साह्य कोणीहि करीना । घोर पुष्कराची आज्ञा ॥ ८ ॥
करितां साह्य होइल वध । ऐसी आज्ञा अति निंद्य ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे नळ । भक्षी कंद, मूळ, फळ ॥ १० ॥

११७

ऐसा क्षुधाकुल राजा राणीसह । कंठितो दिवस बहुत वनीं ॥ १ ॥
सुवर्णवर्णाचे पक्षी एकेवेळीं । पाहोनि उदेली आशा नृपा ॥ २ ॥
परिधानीय वस्त्र पक्ष्यांवरी टाकी । गोष्ट दुर्दैवाची घडली तदा ॥३॥
उडोनियां पक्षी बोलले तयासी । वस्त्र कैसें नेसी हरितां राज्य ॥४॥
पक्षिरूपें फांसे पातलों या ठाया । राव म्हणे प्रिया परिसो बोला ॥
कोप या फांशांचा पीडी आपणांसी । मार्ग दक्षिणेसी जाती पाहें ॥
लंघूनि पयोष्णी विदर्भ कोसला । दक्षिणापथाला मार्ग जाती ॥७॥
वासुदेव म्हणे सूचक हे वाणी । ऐकूनियां राणी दुःख पावे ॥ ८ ॥

११८

शोकमग्न राणी म्हणे हे दयाळा । कृपावंत नळा वदसी काय ॥१॥
थरकांप माझ्या होई शरीराचा । ठाव हृदयाचा सुटला सर्व ॥ २ ॥
शत्रूनें हरिलें सर्वस्व आपुलें । वस्त्रहि राहिलें नाहीं देहा ॥ ३ ॥
ऐशावेळीं कैसी सोडूं पतीपायां । विपत्कालीं भार्या धीर देई ॥४॥

१ न च भार्यासमं किंचिद्विद्यते भिषजां मतम् ॥
औषधं सर्व दुःखेषु सत्यमेतत् ब्रवीमि ते ॥

नळ म्हणे तुज कैसा मी त्यागीन । प्रिया प्राणाहून प्रिय मज ॥ ५ ॥
राणी म्हणे देवा कलुषित भावें । त्यागूनि न जावें वनीं मज ॥ ६ ॥
इच्छिसील जरी जावें मी माहेरीं । उभयतां तरी जाऊं देवा ॥ ७ ॥
जाणें ऐशावेळीं श्वशुरगृहासी । न रुचे वीरासी जाणतें मी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे दुःखाकुल राणी । बोले आर्तवाणी नळालागीं ॥ ९ ॥

अध्याय ६२ वा

११९

राजा म्हणे प्रियकांते । कैसा भेटूं श्वशुरातें ॥ १ ॥
झालों बहु हीन दीन । तुझ्या दुःखाचें कारण ॥ २ ॥
एक वस्त्र उभयांसी । दुःखें काननीं हिंडती ॥ ३ ॥
पुढती एक पर्णशाला । वनीं दिसली तयांला ॥ ४ ॥
भूमीवरी बसती दोघें । मलिन होतीं त्यांचीं अंगें ॥ ५ ॥
नव्हतें तृणासन तेंही । काय विपत्ति महा ही ॥ ६ ॥
भूमीशयन करी राणी । श्रांत जाहली हिंडूनि ॥ ७ ॥
अंग भूमीसी टेंकतां । त्वरित येई गाढ निद्रा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे राजा । चिंतामग्न बघूनि भाजा ॥ ९ ॥

१२०

मार्ग न सुचे कठिण वेळ । चिंती अंतरीं भूपाळ ॥ १ ॥
ऐसें करितां, अपाय । अथवा होईल उपाय ॥ २ ॥
मरण श्रेयस्कर किंवा । त्याग भार्येचा करावा ॥ ३ ॥
माझ्यावरी अनुरक्ता । किती सोशील ही व्यथा ॥ ४ ॥
त्यागें, संभव सुंदरी । जाईल हे निज मोहरीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसे । येती विचार त्यागाचे ॥ ६ ॥

१२१

मज अनुसरली सती । तेणें होय दुःखप्राप्ति ॥ १ ॥
त्यागें सुखाचा संभव । ऐसें मनीं चिंती राव ॥ २ ॥
साध्वी महा पतिव्रता । कोण मार्गीं अडविता ॥ ३ ॥
दुष्ट कलीची प्रेरणा । खड्ग लाभे त्याचि क्षणा ॥ ४ ॥
वस्त्र कापूनि स्वहस्तें । त्यागी गाढ झोंपलीतें ॥ ५ ॥

होती यातना अंतरा । राव फिरला माघारा ॥ ६ ॥
करितो विलाप नृमणि । वासुदेव द्रवला मनीं ॥ ७ ॥

१२२

हाय प्रियेचें दर्शन । देवांसहि दुर्लभ जाण ॥ १ ॥
तेचि पर्णशालेमाजी । सम्राज्ञी हे पहुडली ॥ २ ॥
भूमीशय्या अर्धवस्त्र । पशु काननीं ज्या हिंस्र ॥ ३ ॥
होतां जागृत या वनीं । हांका मारील रडूनी ॥ ४ ॥
कैसी हिंडेल एकटी । प्रिया धर्माची हे मूर्ति ॥ ५ ॥
इंद्र, आदित्य, मरुद्गण, । रुद्र, अश्विनीनंदन ॥ ६ ॥
देव रक्षोत हिजसी । दीनपणें राव प्रार्थी ॥ ७ ॥
सतीत्याग करूनि गेला । समिप मागुती पातला ॥ ८ ॥
झाली ओढाताण त्याची । अंतीं त्यागी कांतेप्रति ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे वनीं । करी विलाप नरमणी ॥ १० ॥

अध्याय ६३ वा

१२३

निद्रा पूर्ण होतां सती । पाहे येवोनि जागृती ॥ १ ॥
जवळी न दिसेचि नृप । फाडियेलें अर्धवस्त्र ॥ २ ॥
भयभीत होउनि गेली । हांका मारी तयावेळीं ॥ ३ ॥
महाराज निषधपते । टाकूनियां गेलां कोठें ॥ ४ ॥
हाय हाय घात झाला । प्रतिज्ञेचा भंग केला ॥ ५ ॥
कैसे प्राण हे राहिले । इच्छितां न मृत्यु मिळे ॥ ६ ॥
थट्टा पुरे करा देवा । दासीलागीं धीर द्यावा ॥ ७ ॥
ऐसें आक्रंदन करी । जैसी व्याकुळ कुररी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे निष्ठा । संकटांत लागे कसा ॥ ९ ॥

१२४

देवा या काननीं भ्याली तव कांता । दर्शन द्या आतां दया करा ॥
पहावें त्या स्थळीं भास होई मज । असाल सहज झुडुपामागें ॥
सोडवेल कैसी काननीं एकटी । उपेक्षा हे खोटी निष्ठुरता ॥ ३ ॥

क्षुधा, तृषा, श्रमें एकाकी बैसतां । मजवीण नाथा सौख्य कैसें ॥
दुःखदग्ध ऐसी धांवे रानोमाळ । वाटे हळहळ वासुदेवा ॥ ५ ॥

१२५

क्षुधित एका अजगरें । धरिलें शरीर गोजिरें ॥ १ ॥
पतीसाठीं दुःख करी । आशा आपुली न धरी ॥ २ ॥
म्हणे मज आठवितां । कंटाळाल या जीविता ॥ ३ ॥
राया, होतां पापमुक्त । बहु होइल पश्चात्ताप ॥ ४ ॥
श्रम परिहार तुझा । कोण करील महाराजा ॥ ५ ॥
ऐसा आक्रोश मांडिला । मृगव्याधें तो ऐकिला ॥ ६ ॥
मुक्त कराया सुंदरी । शस्त्र घेउनि धांवे करीं ॥ ७ ॥
अंग चिरूनि सर्पाचें । केलें रक्षण राणीचें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे दैव । निवारील सकल भेव ॥ ९ ॥

१२६

मलिन शरीर धुवूनि व्याधानें । आहारार्थ प्रेमें दिधलीं फळें ॥ १ ॥
विश्रांति पावोनि सती होई शांत । पुशितां वृत्तांत व्याधा सांगे ॥२॥
अर्धवस्त्रें दिसे अस्पष्ट शरीर । कांती सुकुमार मधुर वाणी ॥ ३ ॥
पाहोनि तें रूप कामार्त होऊन । कामुकवचन बोले व्याध ॥ ४ ॥
ऐकतां प्रदीप्त दीपशिखेसम । आरक्त नयन होती तिचे ॥ ५ ॥
पतंगचि व्याध, स्पर्शावया धांवे । सती क्रोध पावे पाहोनियां ॥६॥
स्मरूनि नैषधा बोले शापवाणी । पडो हा मरूनि दुष्ट एथें ॥ ७ ॥
पडला तत्काळ जैसा दग्धवृक्ष । सद्धर्म सतीस रक्षीतसे ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे अन्य मानवाचें । स्मरण सतीतें न घडे स्वप्नीं ॥ ९ ॥

अध्याय ६४ वा

१२७

बृहदश्व सांगे पांडवांलागूनि । साध्वी एकाकिनी पुढती जाई ॥१॥
निर्जन काननीं किर्र कीटकांचा । व्याघ्र-महिषांचा ध्वनि येई ॥२॥
सिंह, गज तैसे विविध पशुपक्षी । म्लेच्छ तस्करांची वसती तेथें ॥
वृक्षलता बहु, नद्या, सरोवरें । पर्वतशिखरें तैसीं कूप ॥ ४ ॥
आस्वल, वराह, गवय बहुत । ऐशा अरण्यांत एकाकिनी ॥ ५ ॥

निर्भय नळासी शोधी पतिव्रता । व्याकुळता चित्ता वियोगानें ॥
निराश होऊनि शिलातलीं वैसे । प्रेमें वंदीतसे वासुदेव ॥ ७ ॥

१२८

वैसूनियां शिळेवरी । करी विलाप सुंदरी ॥ १ ॥
महाबाहो निषधराजा । अंत नको पाहूं माझा ॥ २ ॥
मज सोडूनियां वनीं । कोठें गेलासी त्यागूनि ॥ ३ ॥
मोठ मोठे करूनि यज्ञ । कां हें कठोर वर्तन ॥ ४ ॥
नाहीं का रे पूर्वस्मृति । स्मरें हंसाची त्या भेटी ॥ ५ ॥
सकलशास्त्रें वेद चारी । न ये सत्याची त्यां सरी ॥ ६ ॥
वचन एकतरी पाळीं । ' माझा अव्हेर न करीं ' ॥७॥
वनीं हांका मारीतसे । सिंह पुढती धांवलासे ॥ ८ ॥
क्षुधाकुल हा वनराज । रक्षीं रक्षीं नळा मज ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे ऐसा । धांवा मांडिला नळाचा ॥ १० ॥

१२९

' नावडेचि अन्या ' वदलासी जें नित्य । वचन तें सत्य करीं आतां ॥
होवोनि असहाय करिते विलाप । चुकतां कळप हरिणी जैसी ॥२॥
देईं धीर मज सर्वांगसुंदरा । संपन्न उदारा शीलवंता ॥ ३ ॥
न दिससी वनीं निद्रिस्थ वा स्थित । मार्ग आक्रमीत अथवा कोठें ॥
शोधिलें तुजसी बहुत या वनीं । शोक क्षणोक्षणीं वाढवीसी ॥ ५ ॥
जाऊं कोणापुढें पुसूं तरी कोणा । कोण नळराणा दावी मज ॥ ६ ॥
सुवार्तेची वाणी अमृतासमान । ऐकतील कर्ण काय माझे ॥ ७ ॥
ऐसें थोर भाग्य कोठें दमयंतीचें । पुढती वनीं दिसे सिंह स्पष्ट ॥
विशाल ते हनु, दाढाहि सुतीक्ष्ण । निर्भय होऊन पुढती गेली ॥
वासुदेव म्हणे निष्ठा मानवाची । निर्भयता शक्ति सकळ तेची ॥

१३०

राणी म्हणे मृगराजा । तूंचि स्वामी या वनाचा ॥ १ ॥
सर्व पशूंचा तूं राव । पती माझा नळदेव ॥ २ ॥
कन्या विदर्भरायाची । प्रार्थितें मी तुजप्रति ॥ ३ ॥
कोठें पाहिलासी काय । निषधपती नळराय ॥ ४ ॥

सांग सांग हे मृगराजा । अथवा भक्षीं देह माझा ॥ ५ ॥
करीं मजसी शोकमुक्त । नायकेचि मृगराज ॥ ६ ॥
अये, पावन सरिते । तुज कर मी जोडितें ॥ ७ ॥
जाणिसी तूं माझा भाव । स्त्रीपणाचा अनुभव ॥ ८ ॥
अथवा सजातीयाहून । होईल हा गिरी धन्य ॥ ९ ॥
आश्रय हा सकलांचा । वृक्ष-नद्या-पशुपक्ष्यांचा ॥ १० ॥
वासुदेव म्हणे सती । विनवी गिरिरायाप्रति ॥ ११ ॥

१३१

वृत्तांत सकळ निवेदी आपुला । विनवी गिरीला कन्या मानीं ॥
देई धीर म्हणे सदय होऊनि । वार्ता निवेदूनि नैषधाची ॥ २ ॥
हीन दीन जरी सांप्रत तो झाला । ओळख तुजला सहज त्याची ॥
आजानुबाहु तो गजेंद्रासमान । सांग वर्तमान कांहीं त्याचें ॥ ४ ॥
असती या वनीं तरी हे भूपाळा । धीर दे कांतेला दर्शनानें ॥ ५ ॥
'दमयंती' ऐसी हांक येवो कानीं । विलाप त्या रानीं ऐसा करी ॥
तीन अहोरात्र मार्ग उत्तरेचा । आश्रम लंघितां दिसला तिज ॥
आश्रम पाहूनि आधार वाटला । वासुदेव झाला तुष्ट बहु ॥ ८ ॥

१३२

त्याले वल्कलें अजिनें । धाले उदकप्राशनें ॥ १ ॥
शमदमादि पाळूनि । वायु भक्षिताती कोणी ॥ २ ॥
ऐसे पाहूनि तापसी । धीर वाटला मनासी ॥ ३ ॥
आश्रमांत जाऊनियां । वंदीतसे मुनिपायां ॥ ४ ॥
करूनि स्वागत तियेचें । सत्कारिलें स्त्रीरत्नातें ॥ ५ ॥
म्हणती वत्से वैस खालीं । कार्य काय कथन करीं ॥ ६ ॥
कुशल विचारी तयांसी । नाम पुशिती तापसी ॥ ७ ॥
झालों म्हणताती विस्मित । देवता तूं कोण एथ ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे देवी । कर जोडूनि बोलली ॥ ९ ॥

१३३

नाहीं देवता वनींची । अथवा सरिता-गिरींची ॥ १ ॥
व्यसनग्रस्ता मी मानुषी । कथितें वृत्तांत तुम्हांसी ॥ २ ॥

विदर्भाचा भीम राजा । कन्या त्याची हे समजा ॥ ३ ॥
निषधपति नळभूप । पती माझा पुण्यश्लोक ॥ ४ ॥
इंद्रासम कांतिमान । अलौकिक पराक्रम ॥ ५ ॥
सत्यप्रतिज्ञ उदार । निषधवंशाचा आधार ॥ ६ ॥
कुटिल द्यूतामाजी तया । जिंकियेलें मुनिराया ॥ ७ ॥
हिंडतसें महाराजा । वनीं शोधार्थ तयाच्या ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे साध्वी । क्लेश असह्यचि भोगी ॥ ९ ॥

१३४

तुमच्या तपोवनीं माझा । दिसला काय देव सांगा ॥ १ ॥
ऐशा घोर अरण्यांत । भीति पावे माझें चित्त ॥ २ ॥
कांहीं दिवस कंठीन । पुढती योग अवलंबीन ॥ ३ ॥
देह ठेऊनि होइन मुक्त । नये आत्महत्या दोष ॥ ४ ॥
तया वांचूनि जीवन । कंठितां हे व्याकुळ प्राण ॥ ५ ॥
पतिवियोगें जगांत । कैसी राहूं मी जिवंत ॥ ६ ॥
मुनि म्हणती भाग्योदय । होइल कथी वासुदेव ॥ ७ ॥

१३५

तपोवळें दिसे नैषधाची भेटी । कल्याणी, तूं कष्टी होऊं नको ॥ १ ॥
धर्मवळें राव होईल विमुक्त । स्वस्थान, वरिष्ठ पावेल तो ॥ २ ॥
भिऊं नको साध्वी ऐसें बोलूनियां । अदृश्य त्या ठाया होई सर्व ॥
पाहोनि विस्मित होई भीमकन्या । पाहातें या स्वप्ना काय म्हणे ॥ ४ ॥
कोठें ते तापसी आश्रम तो कोठें । सरिताहि आटे क्षणामाजी ॥ ५ ॥
पुष्प, फळयुक्त वृक्ष ते अदृश्य । दीन ते निस्तेज पुढती गेली ॥ ६ ॥
विशाल अशोक पाहूनि बावरी । शोकमुक्त करीं म्हणे मज ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे हिंडतां हिंडतां । दारुण प्रदेशा प्राप्त झाली ॥ ८ ॥

१३६

उल्लंघूनि नद्या, पर्वत चालली । घोर दऱ्या-खोरीं लंघियेलीं ॥ १ ॥
लंघूनियां गेली प्रदेश, वनांत । पाही बहु लोक सरितातटीं ॥ २ ॥
गज, अश्व होते तयांसवें रथ । क्रौंच, चक्रवाक सलिलामाजी ॥ ३ ॥

विशाल तें तीर निनाद पक्ष्यांचा । मकर मत्स्य कच्छां उदकीं वास
सुशोभित सदा द्वीपसमूहानें । वासुदेव प्रेमें वर्णीतसे ॥ ५ ॥

१३७

प्रचंड समूह जनांचा पाहूनि । जाई यशस्विनी समिप त्याच्या ॥
अर्धवस्त्र त्याली शोकार्त जहाली । उन्मत्त भासली जनांलागीं ॥
केश अस्ताव्यस्त तैसी बहु कृश । पिशाची जनांस वाटे कोणी ॥
पलायन कोणी करिती पाहूनि । चिंताकुल मनीं बहुत होती ॥ ४ ।
ओरडती कोणी कोणी हांसताती । वृत्तांत पुशिती सुजन निज ॥
मानुषी कीं सांगें देवता राक्षसी । शरण तियेसी जाती कोणी ॥
वृत्तांत निवेदी दुःखानें सकळां । दाखवा भूपाळा म्हणे मज ॥
वासुदेव म्हणे समूहाचा स्वामी । बोलतसे वाणी शुचि ऐका ॥

१३८

नेता समूहाचा सार्थवाह शुचि । म्हणे न आम्हांसी दिसला नळ
घोर काननीं या कोणी तुजविण । भेटलें न अन्य आम्हांलागीं ॥
माणिभद्र यक्ष असो तो प्रसन्न । शंकित होऊन वदला शुचि ॥ ३ ॥
दमयंती म्हणे जातां कोठें सांगा । म्हणती चेदिदेशा सुबाहूच्या ॥
वासुदेव म्हणे ऐकूनि ते वाणी । चिंतीतसे मनीं दमयंती ॥ ५ ॥

अध्याय ६५ वा १३९

सार्थवाहासह मार्ग आक्रमिला । प्रदेश लंघिला पुढती बहु ॥ १ ॥
'पद्मसौगंधिक' सरोवरतीरीं । पातले व्यापारी राणीसह ॥ २ ॥
समृद्ध तटाकीं विश्रांति पावले । निद्रिस्थ जाहले परमसुखें ॥ ३ ॥
मध्यरात्रीं येती वनगज तेथें । जलप्राशनातें सहजपणें ॥ ४ ॥
ग्राम गजांलागीं पाहूनि क्षोभले । अंगावरी गेले धांवूनियां ॥ ५ ॥
निद्रिस्थ व्यापारी मर्दिले तयांनीं । हाहाःकार वनीं उठूनि गेला ॥
आक्रोश त्या स्थानीं भयप्रद केला । निद्राभंग झाला दमयंतीचा ॥
पादतळीं जन मरती हें पाहून । केलें पलायन इतरांसवें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ऐके जनवाणी । नानापरी वनीं वदती जन ॥

१४०

नाहीं पूजिलें मणिभद्रा । यक्षाधिपा त्या कुबेरा ॥ १ ॥
गजानन विघ्नहर्ता । धरिला लोभ, न पूजितां ॥ २ ॥
ग्रहबाधा शकुन दुष्ट । देती आम्हां घोर कष्ट ॥ ३ ॥
कोणी युवक बोलती । पिशाच्चिनीची हे कृति ॥ ४ ॥
संगें आपुल्या जी वया । तया राक्षसींची माया ॥ ५ ॥
घेऊं प्राण त्या दुष्टेचा । सांपडे तें घालूं माथा ॥ ६ ॥
झ्याली लज्जायुक्त मनीं । राणी ऐकूनि ते वाणी ॥ ७ ॥
गेली पळूनि वनांत । दुःखें मांडिला विलाप ॥ ८ ॥
हाय ओढवलें दैव । कैसें म्हणे वासुदेव ॥ ९ ॥

१४१

हाय हाय दैवगति । कोठें लाभेचिना शांति ॥ १ ॥
एकामागें एक विघ्न । वाटे घोर पूर्वकर्म ॥ २ ॥
खचित काया, वाचा, मनें । इह जन्मींचीं न कर्में ॥ ३ ॥
राज्यहानि, स्वजन त्याग । हाय पतीचा वियोग ॥ ४ ॥
बालकांची ताटातूट । संकटें हीं वधती अंत ॥ ५ ॥
कैसी पार होऊं आतां । विपत्सागरीं बुडतां ॥ ६ ॥
वासुदेव चिंती चित्तीं । असहाय दमयंती ॥ ७ ॥

१४२

शोकविव्हल ते निघाले व्यापारी । जाऊं अन्य स्थळीं म्हणती आतां ॥
चिरडूनि मेले गतप्राण किती । दुःखें आठविती पुत्र मित्रां ॥ २ ॥
पाहूनि तयांचे क्लेश दमयंती । आपुलिया चित्तीं हळहळे ॥ ३ ॥
हाय हाय म्हणे काय पाप केलें । संगतीनें गेले प्राण यांचे ॥ ४ ॥
दुर्दैव अद्यापि संपलें न माझें । इच्छितां कोणातें न वरी मृत्यु ॥ ५ ॥
गजयूथ जरी चिरडिता मज । तरी हे सहज टळते क्लेश ॥ ६ ॥
दैवावीण सुख दुःखही न लाभे । दुर्दैव कां मागें ऐसें माझ्या ॥ ७ ॥

वालपर्णींहि न अकार्य घडलें । क्रुद्धचि कीं झाले लोकपाल ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे विप्रांसवें सती । विनवूनि यूथीं पुढती जाई ॥ ९ ॥

१४३

सायंकाळीं एके दिनीं । येई सुबाहूच्या स्थानीं ॥ १ ॥
अर्धवस्त्र मुक्तकेश । मलिन देह बहु क्लेश ॥ २ ॥
मानूनियां वेडी दीन । मागोमाग जाती जन ॥ ३ ॥
दुर्लक्षूनि त्यांच्या लीला । देवी क्रमी निजमार्गाला ॥ ४ ॥
येई प्रासादासमीप । राजमाता पाही तिज ॥ ५ ॥
अनाथेची येई दया । म्हणे आणावी या ठायां ॥ ६ ॥
कल्याणि हे रूपवती । न दिसे सामान्या मजसी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे दासी । नेति मंदिरीं तियेसी ॥ ८ ॥

१४४

राजमाता म्हणे विस्मित होऊनि । सांग तूं कल्याणि कोण मज ॥१॥
संकटीं हें तुझें अलौकिक तेज । अभ्रामाजीं वीज चमके जैसी ॥२॥
गंधर्वी कीं सांगें देवता तूं कोणी । असहाय असूनि निर्भया तूं ॥३॥
वासुदेव म्हणे सामर्थ्याची खाणी । बोलली जे वाणी ऐका तेचि ॥

१४५

भर्तृपरायण मानुषी मी दीन । समजें कुलीन दासी मज ॥ १ ॥
योग्य त्याचि स्थळीं घडे माझा वास । फलाहार मज सर्वकाळ ॥
एकाकिनी नित्य जाण मी हिंडतें । वास्तव्याचि जेथें सायंकाळ ॥
दैवयोगें माझा वीर प्रियपति । द्यूतानें संकटीं पडला बहु ॥ ४ ॥
एका वस्त्रें दोघें हिंडतां काननीं । निद्रेंत सोडूनि गेला मज ॥ ५ ॥
अव्हेरिलें मज त्या सत्यनिष्ठानें । शोधियेलीं वनें बहुत मातें ॥६॥
देवतुल्य तया नरश्रेष्ठास्तव । सोशिले अपाय बहुत मार्गी ॥ ७ ॥
अंतीं मातें तव लाभले हे पाय । पुढती वासुदेव वदतो ऐका ॥

१४६

गद्गदकंठानें कथितां वृत्तांत । पूर नयनांत दुःखाश्रूंचा ॥ १ ॥
पाहूनि तियेसी सदय माउली । विव्हल जाहली मनीं बहु ॥ २ ॥

म्हणे वत्से राहें सन्निधचि माझ्या। हेर, पति तुझा शोधितील ॥
हिंडतां हिंडतां येईल या स्थानीं। लवहि तूं मनीं नकरीं चिंता॥
दमयंती म्हणे परपुरुष सेवा। न घडो या देहा ऐसें व्रत ॥ ५॥
उच्छिष्टान्न कदा न भक्षीं कोणाचें। शोधार्थ विप्रांतें भेटेन मी॥
अनुज्ञा हे तरी राहीन या ठायां। तोष ऐकूनियां वासुदेवा ॥ ७॥

१४७

प्रतिव्रतेची ती वाणी। तोषे माउली ऐकूनि॥ १॥
व्रत ऐकूनियां मोदें। म्हणे पाळीन नियम तुझे॥ २॥
वास करीं वो सुखानें। कन्येलागीं वदली प्रेमें॥ ३॥
अये सुनंदे हे धन्या। दासी तुजसी असामान्या॥ ४॥
हिच्या सहवासें हर्ष। सर्वकाळ त्वन्मनास॥ ५॥
सुनंदेसी मोद वाटे। नेई निज मंदिरातें॥ ६॥
राही दमयंती त्या ठाया। वासुदेवासी विसावा॥ ७॥

अध्याय ६६ वा

१४८

बृहदश्व सांगे युधिष्ठिरा ऐक। येई पुण्यश्लोक एकावनीं॥ १॥
भडकला तेथें घोर दावानल। कानावरी बोल आर्त येती॥ २॥
'धांव धांव नळा अगा पुण्यश्लोका'। वारंवार हांका ऐशा येती॥
ऐकूनियां धांवे सदय नृपाळ। वदला तत्काळ भिऊं नको॥ ४॥
पाहातां पाहातां वणव्यांत शिरे। वेटोळें देखिलें नयनीं एक॥५॥
जोडूनियां कर नागराज वदे। 'कर्कोटक' मातें समजें नृपा॥ ६॥
नारदशापानें पडलों या ठाया। तुजविण राया मुक्ति नाहीं॥ ७॥
यास्तव सत्वरीं उचलूनि नेई। दावीन मीं कांहीं मार्ग तुज॥ ८॥
वासुदेव म्हणे नाग लघु झाला। उचली तयाला नळराज॥ ९॥

१४९

सुस्थळीं आणितां नाग म्हणे नळा। मोजूनि पाउलां पुढती चालें॥
ऐसीं कांहीं पदें चालतां कल्याण। नृपा सत्य जाण होइल तुझें॥
'एक' 'द्वि' 'त्रि' ऐसें मोजी नळराज। दशमीं सहज 'दश' म्हणे॥

आज्ञा ते मानूनि दंश करी नाग। विद्रुप सर्वांग नृपाळाचें ॥ ४ ॥
नाग, त्याचि क्षणीं प्रगट जाहला। विस्मय पावला राव मनीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सत्कर्म, संकट। आणूनियां हित करीतसे ॥ ६ ॥

१५०

कर्कोटक म्हणे नळा। पालटें या लाभ तुला ॥ १ ॥
आतां कोणी ओळखीना। विषें क्लेश त्या दुर्जना ॥ २ ॥
शिरला शरीरांत कलि। तेणें दशा हे आणिली ॥ ३ ॥
दुष्ट, मत्सरी तो पुरा। रक्षिलें मी तुजसी धीरा ॥ ४ ॥
आतां तुज भय नसे। फल माझ्या प्रसादाचें ॥ ५ ॥
विजयी होशील संग्रामीं। विपबाधा तुजसी नाहीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे भाग्य। संकटींहि काढी मार्ग ॥ ७ ॥

१५१

अक्षविद्यापटु ऋतुपर्ण राजा। होईं सूत त्याचा बाहुक नामें ॥ १ ॥
'अक्षहृदय' तो देईल तुजसी। 'अश्वहृदय' तीं विद्या देतां ॥ २ ॥
अक्षविद्यालाभें तुज राज्यप्राप्ति। लाभेल दमयंती पुत्रांसह ॥ ३ ॥
पूर्वरूपइच्छा होतां मत्स्मरण। करूनि वसन परिधानीं हें ॥ ४ ॥
ऐसें बोलूनियां दिव्य वस्त्रें अर्पी। सकलांची प्राप्ति होइल म्हणे ॥
बोलूनियां ऐसें नाग गुप्त झाला। वासुदेव गेला शरण तयां ॥ ६ ॥

अध्याय ६७ वा १५२

गुप्त होऊनियां कर्कोटक जातां। राव धरी पंथा अयोध्येचा ॥ १ ॥
दशम दिनीं येई अयोध्यापुरीसी। भेटला रायासी जाऊनियां ॥ २ ॥
म्हणे मी बाहुक, अश्वशास्त्रवेत्ता। मंत्रज्ञ, मी ज्ञाता पाकशास्त्रीं ॥
जाणितों मी शिल्प जें जें लोकीं ज्ञात। दुष्कर जें कृत्य करिन तेंहीं ॥
आश्रय दे मज म्हणतां ऋतुपर्ण। वदे वा कल्याण होवो तुझें ॥ ५ ॥
वास करीं येथें, होईं अश्वाध्यक्ष। शीघ्रगति अश्व करीं माझे ॥ ६ ॥
वार्ष्णेय, जीवल, तुजलागीं साह्य। निष्क दशसहस्र वेतन तुज ॥
वासुदेव म्हणे ऋतुपर्ण ऐसें। बोलतां नळाचें कार्य होई ॥ ८ ॥

१५३

ऐशारीति नळ राजा। आश्रय करी ऋतुपर्णाचा ॥ १ ॥
सन्मानानें वास करी। प्रिया आठवी अंतरीं ॥ २ ॥
प्रतिदिनीं सायंकाळीं। दुःखें श्लोक हा उच्चारी ॥ ३ ॥
'क्षुधा-तृषार्ता ती कोठें। श्रांता तपस्विनी झोंपे ॥ ४ ॥
हतभाग्या आठवूनि। असेल ती कवणस्थानीं'[1] ॥ ५ ॥
ऐसें न चुकतां नित्य। स्मरण करी तो बाहुक ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे शंका। येई ऐकूनि सेवका ॥ ७ ॥

१५४

सांग सांग रे बाहुका। करिसी कोणास्तव शोका ॥ १ ॥
ऐसी कोण ते भाग्याची। सांगें पत्नी ते कोणाची ॥ २ ॥
नळ म्हणे मंदबुद्धि-। पुरुषाची, ते कांता साध्वी ॥ ३ ॥
तेणें त्यागिलें तियेसी। असूनियां सत्यभाषी ॥ ४ ॥
मूढबुद्धि तो दुर्दैवी। वास करी एके ठाईं ॥ ५ ॥
आठवूनि तो कांतेसी। नित्य वदतो या श्लोकासी ॥ ६ ॥
कैसी वनीं ते हिंडेल। दुष्टें केला बहु छळ ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे चित्त। राखूं न शके कांही गुप्त ॥ ८ ॥

अध्याय ६८ वा

१५५

इकडे वैदर्भराजानें। कथिलें विप्रांसी सन्मानें ॥ १ ॥
शोधा माझ्या जामात्यासी। तैंवी कन्या दमयंतीसी ॥ २ ॥
धनें सहस्र अर्पीन। शोधील जो त्या लागून ॥ ३ ॥
मज भेटवील विप्र। तया देईन अग्रहार ॥ ४ ॥
ऐकूनियां विप्र जाती। दशदिशांतें शोधिती ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे शोध। घेतां कांहीं न दुर्बोध ॥ ६ ॥

---

१ क नु सा क्षुत्पिपासार्ता श्रांता शेते तपस्विनी ॥
स्मरन्ती तस्य मन्दस्य कं वासाद्योपतिष्ठति ॥

१५६

चेदिदेशामाजी सुबाहु ब्राह्मण । सहजपणें जाण प्राप्त झाला ॥ १ ॥
राजमंदिरांत पुण्याहवाचनीं । पाहियेली भैमी स्त्रियांमाजी ॥ २ ॥
धूम्राच्छन्न ज्वाला पाही मलिन कृश । आनंद विप्रास बहुत होई ॥
लोकोत्तर कांति ओळख पटवी । दैवयोगें जरी दीन झाली ॥ ४ ॥
उत्पाटित जैसी मृणालिनी शोभे । पंकलिप्त अंगें तैसी कन्या ॥ ५ ॥
राहुग्रस्त चंद्रें निस्तेज पौर्णिमा । त्यागूनी भूषणा तैसी दिसे ॥ ६ ॥
भूषणावांचूनि भूषण स्त्रियांसी । सत्य भर्ता हेंचि वदला विप्र ॥७॥
वासुदेव म्हणे पाहूनि कन्येसी । विप्राच्या मानसीं दुःख होई ॥ ८ ॥

१५७

वियोगी नळाचें दिव्यचि हें कर्म । जरी त्याचे प्राण असती देहीं ॥
राजकन्या कैसी दुःखमुक्त होई । ऐसी वेळ येई केव्हांतरी ॥ २ ॥
शील, वय, कुल, समान दोघांचें । सांत्वन सतीचें करितों आतां ॥
ठाउका नाहींचि द्विज दुःखलेश । संभाषणें सुख लाभो अल्प ॥ ४ ॥
करूनियां ऐसा विचार तो विप्र । उठूनियां क्षिप्र समीप जाई ॥५॥
वासुदेव म्हणे भाग्यकाल ऐसा । येई न कथितां मानवासी ॥ ६ ॥

१५८

विप्र म्हणे वो दमयंती । आलों तुझ्याचि शोधासी ॥ १
प्रिय सखा तव पित्याचा । कुशल तुझीं मातापिता ॥ २ ॥
भ्राते अपत्येंही सुखी । चिंतामग्न तुझ्यासाठीं ॥ ३ ॥
तुमच्यासाठीं शतावधि । विप्र हिंडती हे क्षिति ॥ ४ ॥
ओळखूनि सुदेवासी । आरंभिलें रूदनासी ॥ ५ ॥
सुनंदेनें हें पाहूनि । कथिलें मातेसी जाऊनि ॥ ६ ॥
पुढती येवोनि ते माता । वृत्त सांगें म्हणे विप्रा ॥ ७ ॥
वृत्त निवेदी सुदेव । कथितो तेंचि वासुदेव ॥ ८ ॥

अध्याय ६९ वा

१५९

विप्र म्हणे राजमाते । भीमराजा विदर्भातें ॥ १ ॥

कन्या विख्यात हे त्याची । सुलक्षणी दमयंती ॥ २ ॥
वीरसेन पुत्र नळ । राणी त्याची हे निर्मल ॥ ३ ॥
हरला राज्य द्यूतामाजी । विप्र शोधिती तयासी ॥ ४ ॥
दैवयोगें दमयंती । भेटलीसे या स्थळासी ॥ ५ ॥
भालदेशीं रक्तवर्ण । पाहें तीळ हिची खूण ॥ ६ ॥
मलिनपणें ही अस्पष्ट । कनक जैंवी असंस्कृत ॥ ७ ॥
भस्माच्छन्न अग्नि जैसा । सुचवी तयाची उष्णता ॥ ८ ॥
तैसी ओळखिली जाण । कन्या आकारावरून ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे झाली । माता विस्मित त्या वेळीं ॥ १० ॥

१६०

ऐकूनि हें सर्व वृत्त । स्वयें दमयंतीचें मुख ॥ १ ॥
सुनंदेनें प्रक्षाळिलें । चिन्ह स्पष्ट तें पाहिलें ॥ २ ॥
ओळखूनि कन्या-माता । आलिंगिती आर्द्रचित्ता ॥ ३ ॥
तिघी आश्रू ढाळिताती । माता म्हणे हे दमयंती ॥ ४ ॥
वत्से भगिनीकन्यके । मातृभगिनी समजें मातें ॥ ५ ॥
राजा दशार्णाधिपति । पिता ' सुदाम ' आम्हासी ॥ ६ ॥
अर्पिली ती भीमाप्रति । वीरबाहू माझा पति ॥ ७ ॥
पितृगृहीं बालपणीं । पाहियेली तुजलागोनि ॥ ८ ॥
सदनीं या राहें सुखें । वासुदेव मनीं हर्षे ॥ ९ ॥

१६१

पावूनियां समाधान । वंदी मातेचे चरण ॥ १ ॥
दमयंती म्हणे ज्ञात । नसतां पावलें मी सुख ॥ २ ॥
रक्षिलेंसी मजलागूनि । अन्नपानादि अर्पूनि ॥ ३ ॥
पुढती अधिक सौख्य होई । वास करितां या ठाईं ॥ ४ ॥
मातृभगिनी वो परी । स्वजन आठवती अंतरीं ॥ ५ ॥
पितृगृहीं माझीं बाळें । स्मरूनि व्याकुळ मी झालें ॥ ६ ॥
देई अनुज्ञा मजसी । पोंचवीं वो माहेरासी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐसें । विनवी मातृभगिनीतें ॥ ८ ॥

१६२

दीन वचनातें मान्यता देवोनी। पुत्रासी कथूनि राजमाता ॥ १ ॥
अन्नवस्त्रादिकें प्रेमें सन्मानूनि। केली पाठवणी दमयंतीची ॥ २ ॥
मेण्यांत वैसोनि सेनेसह जाई। आप्तजन पाही आनंदानें ॥ ३ ॥
मातापिता तैवीं अपत्यें पाहिलीं। आल्हाद पावली मनामाजी ॥ ४ ॥
देव ब्राह्मणांसी सादर पूजिलें। विप्रांसी अर्पिलें द्रव्य बहु ॥ ५ ॥
विदर्भरायानें सुदेव ब्राह्मणा। अर्पूनियां ग्रामा तोषविलें ॥ ६ ॥
सहस्रधेनूहि अर्पिल्या सुखानें। वासुदेव प्रेमें वर्णीतसे ॥ ७ ॥

१६३

एकरात्र घेई विश्रांती माहेरीं। पतीचा अंतरीं ध्यास सदा ॥ १ ॥
मातेसी विनवी जरी मी जगावें। त्वरित शोधावें पतिसी तरी ॥
दुःखाकुळ माता कथी नृपाळासी। असह्य कन्येसी शोक होई ॥
शोधास्तव व्हावी पराकाष्ठा आतां। पूर्ण करा नाथा कन्या हेतु ॥
अंकित विप्रासी आज्ञापि नृपाळ। शोधा हा भूगोल त्वरित आतां ॥
वासुदेव म्हणे भेटूनि कन्येसी। विप्र निवेदिती गमनआज्ञा ॥ ६ ॥

१६४

म्हणे विप्रांसी दमयंती। ऐकवा हे वाणी माझी ॥ १ ॥
'वस्त्र फाडूनियां प्रिया। मज त्यागूनि त्या ठायां ॥ २ ॥
कोठें निघूनि गेलासी। अर्धवस्त्रा मज दीनेसी ॥ ३ ॥
अद्यापि मी जैसी वनीं। शोकाकुला रात्रंदिनीं ॥ ४ ॥
यास्तव करीं अनुग्रह। देईं कांहीं प्रत्युत्तर ॥ ५ ॥
ऐसें सांगा विवरोनि। मज जाळी वियोगाग्नि ॥ ६ ॥
साध्वी भार्येचें रक्षण। व्हावें हाचि श्रेष्ठ धर्म ॥ ७ ॥
कैसें माझें मंदभाग्य। दावी तुज आडमार्ग ॥ ८ ॥
श्रेष्ठधर्म जगतीं दया। त्वांचि कथिलें पतिराया' ॥ ९ ॥
ऐसा कथिला निरोप। वासुदेव चित्तीं शांत ॥ १० ॥

१६५

दमयंती म्हणे ऐकोनियां कोणी। द्रवेल जाऊनि भेटा त्यासी ॥ १ ॥
समृद्ध, निर्धन असो कोणी दीन। तयाचें भाषण सांगा मज ॥ २ ॥

येईल तो एथें ऐसें करा यत्नें । बहु कौशल्यानें कार्य साधा ।। ३ ॥
करूं नका देऊं माझी आज्ञा ऐसें । ऐकोनि शोधातें विप्र जाती ।।
वचन तें जनसमूहीं बोलती । प्रत्युत्तर त्यांसी न मिळे कोठें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे हिंडतां अवनी । घडे योग्य स्थानीं इष्ट प्राप्ति ।। ६ ॥

अध्याय ७० वा १६६

दैवयोगें सांगे 'पर्णाद' येवोनि । हे राजनंदिनी ऐकें वृत्त ॥ १ ॥
शोधितां शोधितां गेलों अयोध्येसी । उच्चारिली उक्ति पुनः पुनः ॥२॥
ऋतुपर्ण किंवा कोणी सभासद । उच्चारीना शब्द, ऐकोनि तें ॥ ३ ॥
अनुज्ञा घेवोनि सभेंतूनि जातां । सूत एक हांका मारी मज ॥ ४ ॥
बाहुक तयाचें नाम, रूपहीन । ऱ्हस्व बाहु जाण मानव तो ॥ ५ ॥
अत्यंतचि शीघ्र वाहनें तयाचीं । करी पाकसिद्धि प्राविण्यानें ॥६॥
वासुदेव म्हणे वृत्तांत ऐकोनि । उत्सुकता मनीं दमयंतीच्या ॥ ७ ॥

१६७

विप्र म्हणे दमयंतीसी । सूत सोडी निश्वासासी ॥ १ ॥
पुनः पुनः रूदन करी । पुढती कुशल विचारी ॥ २ ॥
म्हणे यद्यपि अबला । साध्वी रक्षी निज शीला ॥ ३ ॥
स्वर्ग जिंकूनि उद्धार । करिती आपुला सत्वर ।। ४ ॥
त्यागितांहि पतीवरी । रुष्ट न होती अंतरीं ॥ ५ ॥
सदाचाराचें कवच । लेऊनि त्या संरक्षित ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसें । दुःखवचन बाहुकाचें ॥ ७ ॥

१६८

विपद्ग्रस्त-मूढ-पतीनें त्यागितां । करूं नये क्रोधा साध्वीनें त्या ॥
जीविकाहि तदा अशक्य तयाची । वस्त्रही तें पक्षी हरूनि गेले ॥
तया मनस्तापें हृदय जळतां । उचित न तदा करणें क्रोध ।। ३ ॥
तैशा स्थितीमाजी तया पतीवरी । सक्रोध अंतरीं होऊं नये ॥ ४
दुःखाकुलचित्तें वदतां तो ऐसें । पातलों मी येथें त्वरित कन्ये ॥

पुढील मार्गाची योजना करावी । वार्ता निवेदावी पित्यालागीं ।
ऐकूनि वचना कन्या सद्गदित । वासुदेव वृत्त कथितो ऐका ॥ ७ ॥

१६९

दुःखाकुल दमयंती । सांगे वृत्तांत मातेसी ॥ १ ॥
म्हणे समक्ष मी तुझ्या । योजीतसें पुढिल काजा ॥ २ ॥
नको कळवूं पित्यासी । पाठविलें सुदेवासी ॥ ३ ॥
ऐसें बोलूनि मातेतें । अर्पी धन पर्णादातें ॥ ४ ॥
म्हणे महत्कार्य केलें । पुढती वंदीन पाउलें ॥ ५ ॥
होतां प्रियपत्नीलाभ । विप्रा पूजीन मी तुज ॥ ६ ॥
देऊनियां आशीर्वाद । विप्र गेला स्वगृहास ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कन्या । युक्ति योजी असामान्या ॥ ८ ॥

१७०

बोले सुदेवासी मातेच्या समक्ष । जाई अयोध्येस वायुवेगें ॥ १ ॥
पुनः स्वयंवर होई दमयंतीचा । कथावें वृत्तांता ऋतुपर्णातें ॥ २ ॥
कुंडिनपुरासी राजे बहुत येती । एका दिनीं जासी तरी लाभ ॥
सूर्योदयवेळा निश्चित जाहली । शक्य तरी करीं त्वरा म्हणे ॥ ४ ॥
नलजीविताचा वाटतो संशय । कथितो वासुदेव संकेतासी ॥ ५ ॥

अध्याय ७१ वा

१७१

बाहुकासी ऋतुपर्ण । करी मधुर भाषण ॥ १ ॥
म्हणे बाहुका अश्वज्ञा । वाटे जावें कुंडिनग्रामा ॥ २ ॥
एकादिनीं शक्य जरी । भाग घेऊं स्वयंवरीं ॥ ३ ॥
वचन ऐकूनि नृपाचें । हृदय कांपलें नळाचें ॥ ४ ॥
कैसा भाव हा अंतरीं । आणील ती साध्वी तरी ॥ ५ ॥
अथवा भेटीस्तव माझ्या । योजी उपाय हा खासा ॥ ६ ॥
केली वंचना तियेची । सती जाई, न कुपंथीं ॥ ७ ॥
केला अक्षम्य अपराध । चिरवियोगही तिज ॥ ८ ॥
चांचल्य हें सहज जरी । साध्वी भ्रष्टेनाचि परी ॥ ९ ॥
ऐसे मनीं विविध भाव । कथितो वृत्त वासुदेव ॥ १० ॥

१७२

विरह दुःखानें होईल निराश । न शिवेचि मनास भाव ऐसा ॥१॥
पुत्र-कन्यावती, संभव न ऐसा । निर्णय हा, जातां कुंडिनपुरा ॥ २ ॥
चिंतूनियां ऐसें बोले ऋतुपर्णा । नेईन त्या स्थाना एका दिनीं ॥ ३ ॥
सुलक्षणी अश्व शोधूनि काढिले । वलिष्ठ शोभले जातिवंत ॥ ४ ॥
उत्तुंग नासिका, हनुवटी महा । विवर्त ते दहा शरीरीं त्यांच्या ॥५॥
राजा म्हणे कां रे फसविसी मज । रोडके हे काज करिती कैसें ॥६॥
वासुदेव म्हणे अज्ञ ज्या विपयीं । तेथ अभिप्रायीं पडूं नये ॥ ७ ॥

१७३

म्हणे बाहुक नृपाळा । एक ललाटीं शोभला ॥ १ ॥
मस्तकीं ते दोन दोन । प्रति कुक्षीवरी दोन ॥ २ ॥
उदरीं वक्षीं दोन दोन । पृष्ठ भागीं एक जाण ॥ ३ ॥
ऐसे द्वादश आवर्त । अश्व जाणें हे समर्थ ॥ ४ ॥
म्हणसी तरी दावीं अन्य । राव म्हणे तुजसी ज्ञान ॥ ५ ॥
करीं बाहुका जें योग्य । वदलों जाण तें सहज ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे गुण । तेंचि यशासी कारण ॥ ७ ॥

१७४

सुलक्षणी चार अश्व जोडियेले । उभयही झाले अधिर मनीं ॥ १ ॥
ऋतुपर्ण झाला रथारूढ जेव्हां । वैसले ते तेव्हां अश्व चारी ॥ २ ॥
गोंजारितां नळें जाहले हर्पित । उठवितां सिद्ध गमना होती ॥ ३ ॥
जवळी वार्ष्णेय रथामाजी राव । वायुवेगें धांव घेती अश्व ॥ ४ ॥
आकाशांत जणु स्यंदन चालला । विस्मय पावला ऋतुपर्ण ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कोशल्य पाहूनि । वार्ष्णेयाच्या मनीं शंका येई ॥६॥

१७५

देव सारथ्यासमान । काशल्यातें अवलोकून ॥ १ ॥
वाटे मातली असावा । शालिहोत्रचि हा किंवा ॥ २ ॥
आला मानव होऊनि । कीं हा कार्यास्तव मुनि ॥ ३ ॥
अथवा उदार तो नळ । गुण त्याचे हे सकळ ॥ ४ ॥

ज्ञान, वयहि समान । नैषध हा भाग्यहीन ॥ ५ ॥
वेष पालटूनि राहे । अथवा अन्य कोणी आहे ॥ ६ ॥
संयम, ऐकाग्र्य, उत्साह । पाहूनियां तोपे राव ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे नळ । वार्ष्णेयाचा ऐसा भाव ॥ ८ ॥

अध्याय ७२ वा

१७६

युधिष्ठिरालागीं बृहदश्व सांगे । अंतरिक्षमार्गें जाई नळ ॥ १ ॥
नद्या, सरोवरें, पर्वत लंघूनि । विदर्भा लक्षूनि जाई रथ ॥ २ ॥
जातां जातां म्हणे ऋतुपर्ण बाहुका । आंवरीं रे रथा क्षणभरी ॥ ३ ॥
उत्तरीय वस्त्र घेऊंदे पडलेलें । सूत म्हणे गेलें जावो आतां ॥ ४ ॥
चार कोश मागें राहिलें तें स्थळ । विस्मय नृपाळ मानी बहु ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे समय मंगल । येई भाग्यवेळ समिप तदा ॥ ६ ॥

१७७

फलयुक्त वृक्ष पाही बेहेड्याचा । बोलला बाहुका ऋतुपर्ण ॥ १ ॥
वस्तुगणनाचें कौशल्य तूं पाहें । सर्वत्र न राहे सर्वज्ञान ॥ २ ॥
ज्ञान पराकाष्ठा नसे एका ठाई । दिसे ठाई ठाई विखुरलें ॥ ३ ॥
गलित पर्णांहूनि शताधिक संख्या । जाण पर्णें वृक्षा तैसीं फळें ॥
शाखांसी या दोन सहस्र पंचाण्णव । बाहुका निश्चय समजे फळें ॥
ऐकोनि ते वाणी थांबवूनि रथ । मोजूनि बाहुक पाहूं म्हणे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे रायालागीं त्वरा । जाऊं कुंडिनपुरा म्हणे आधीं ॥

१७८

बाहुक म्हणे हे नृपाळा । विद्या पाहूंदे मजला ॥ १ ॥
धैर्य न धरवे जरी । वार्ष्णेय हा नेइल तरी ॥ २ ॥
राजा म्हणे हे बाहुका । तूंचि अश्वशास्त्र वेत्ता ॥ ३ ॥
तूंचि नेसील मजसी । इष्ट वेळीं त्या स्थळासी ॥ ४ ॥
शरण पातलों मी तुज । विघ्न न करावें मज ॥ ५ ॥
पुरवीन मनोरथ । नगरीं होवो वा सूर्यास्त ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे नळ । होऊं नको उतावीळ ॥ ७ ॥

१७९

ऋतुपर्ण देई एक लघु शाखा । गणावया देखा बाहुकासी ॥ १ ॥
अचूकचि संख्या पाहूनियां धाला । विद्या हे मजला द्यावी म्हणे ॥
राव म्हणे 'अक्षविद्या' मी जाणतों । विजय प्राप्त होतो द्यूतामाजी ॥
नळ म्हणे देऊं विद्या एकमेकां । ऋतुपर्ण तदा विद्या अर्पी ॥ ४ ॥
'अश्वविद्या' म्हणे ठेव असों द्यावी । पुढती अर्पावी मजलागीं ॥५॥
अक्षविद्याबळें कलि सोडी नळा । ओकतचि आला बाहेरी तो ॥
दमयंती शाप, कर्कोटक विष । पीडिती कलीस क्षणोक्षणीं ॥ ७ ॥
होऊनियां मुक्त प्रगटला कलि । नळ तैं त्यावरी क्रुद्ध झाला ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे शाप द्यावयासी । सिद्ध त्या क्षणासी नळराज ॥

१८०

कलि कांपत कांपत । जोडीतसे दोन्ही हात ॥ १ ॥
येई शरण नळासी । होवो म्हणे परम कीर्ति ॥ २ ॥
स्मरण करील जो तुझें । नाहीं त्यासी भय माझें ॥ ३ ॥
ऐकूनियां ती प्रार्थना । क्रोध आंवरीतो राणा ॥ ४ ॥
बेहेड्यामाजी शिरला कलि । शुद्ध नळराज अंतरीं ॥ ५ ॥
रथारूढ होऊनियां । वेगें पुढती हांकी अश्वां ॥ ६ ॥
बेहडा-बिभीतक वृक्ष । झाले जगामाजी निंद्य ॥ ७ ॥
केवळ नळालागीं कलि । दिसला होता तयावेळीं ॥ ८ ॥
कुंडिनपुरामाजी राव । येई म्हणे वासुदेव ॥ ९ ॥

अध्याय ७३ वा

१८१

सायंकाळीं वृत्त कळलें भीमासी । अयोध्यानिवासी राव आला ॥
राव म्हणे आणा सभेसी सन्मानें । विनविती प्रेमें दूत तदा ॥ २ ॥
अनुज्ञा लाभतां शिरले कुंडिनपुरीं । निनादित झाली नगरी सर्व ॥
अश्वशाळेमाजी अश्व नैषधाचे । रथाचिया घोषें हर्षिनले ॥ ४ ॥
मेघनादासम घोष, दमयंती । ऐकूनियां चित्तीं चकित झाली ॥५॥
मयुर, गज, अश्व, भ्रमले त्या नादें । विविध रम्य शब्दें करिती नाद ॥
वासुदेव म्हणे स्यंदनाचा नाद । पसरी आनंद कुंडिनपुरीं ॥ ७ ॥

१८२

चिंतीतसे दमयंती । नादें आल्हाद चित्तासी ॥ १ ॥
खचित आला नळराजा । केवळ प्राणचि जो माझा ॥ २ ॥
जरी तया न पाहीन । तरी देह हा ठेवीन ॥ ३ ॥
चंद्रवदन तयाचें । पांग फेडील दृष्टीचे ॥ ४ ॥
जरी ऐसें न घडेल । तरी नाशचि होईल ॥ ५ ॥
मेघगंभीर ती वाणी । आज येईल माझ्या कानीं ॥ ६ ॥
जरी मिथ्या हें ठरेल । देह अग्नींत पडेल ॥ ७ ॥
सिंहासम तो विक्रमी । येईल पित्याच्या सदनीं ॥ ८ ॥
ऐसें न घडतां प्राण । जातिल निश्चयें निघून ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे सती । चिंतीतसे ऐसें चित्तीं ॥ १० ॥

१८३

कदाही न बोले अनृत भाषण । दुःखद तें कर्म न घडे कदा ॥ १ ॥
थट्टेनेंहि केलीप्रतिज्ञा न लंघी । क्षमाशील जगीं पति माझा ॥ २ ॥
क्लीबासम नित्य जो परस्त्रियांसी । ऐसा माझा पति पुण्यवंत ॥ ३ ॥
अलौकिक ऐसे आठवती गुण । हृदय विदीर्ण होई माझें ॥ ४ ॥
ऐसें बोलूनियां बेभान जाहली । पहावया गेली सौधतळीं ॥ ५ ॥
राजांगणीं पाही अयोध्येचा रथ । वार्ष्णेय, बाहुक देखियेले ॥ ६ ॥
रथाखालीं दोघे उतरूनि अश्वां । नेती योग्यस्थाना ऐसें पाही ॥
राव ऋतुपर्ण खालीं उतरला । भेटीलागीं गेला भीमकाच्या ॥ ८ ॥
सन्मान तयाचा जाहला अपूर्व । म्हणे वासुदेव पुढती ऐका ॥ ९ ॥

१८४

राव म्हणे ऋतुपर्णा । अकस्मात कोण्या कामा ॥ १ ॥
प्राप्त जाहलासी सांगें । साह्य होऊं कोण्या मार्गें ॥ २ ॥
चकित अयोध्याधिपति । चिंती आपुलिया चित्तीं ॥ ३ ॥
न दिसे राजपुत्र कोणी । वार्ताही न कांहीं कानीं ॥ ४ ॥
समारंभाचें लक्षण । नसे कांहीं हें पाहून ॥ ५ ॥
नम्रपणें वदला राया । आलों दर्शना या ठाया ॥ ६ ॥
स्मित करोनि भीमक । चिंती कारण मनांत ॥ ७ ॥

घेई विश्रांति नृपाळा । प्रेमें बोले ऋतुपर्णाला ॥ ८ ॥
दाविताती स्थान दूत । वासुदेवासी आनंद ॥ ९ ॥

१८५

इकडे वाहुक अश्वांची । सेवा करूनि यथाविधि ॥ १ ॥
बैसे येऊनि रथांत । चिंती दमयंती मनांत ॥ २ ॥
न दिसे प्राणनाथ माझा । रथघोष मग कैसा ॥ ३ ॥
कीं हा नळाचा सारथी । जाणे विद्या नृपाळाची ॥ ४ ॥
अथवा राजा ऋतुपर्ण । अश्वशास्त्रांत निपुण ॥ ५ ॥
भेटावया वाहुकासी । अंतीं पाठविली दासी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे यत्न । करितां भेटे नारायण ॥ ७ ॥

अध्याय ७४ वा

१८६

केशिनी वो जाई भेटें वाहुकासी । कुशल तयासी विचारीं जा ॥
नम्रपणें त्याच्या सन्निध जाऊनि । वृत्तांत ऐकूनि घेई त्याचा ॥ २॥
मधुरशब्दानें पर्णादाचें वृत्त । कथोनि तयास, लक्ष ठेवीं ॥ ३ ॥
आगमनें यांच्या हर्षित मी झालें । वाटतें, पाउलें पतिदेवाचीं ॥
केशिनी, ते आज्ञा मानूनियां गेली । दमयंती राहिली गच्चीवरी ॥
वासुदेव म्हणे संवाद तयांचा । हर्षभरें ऐका भाविक हो ॥ ६ ॥

१८७

म्हणे केशिनी सज्जना । करितें स्वागत या स्थाना ॥ १ ॥
कुशल कथावें आम्हासी । विनवीतसे दमयंती ॥ २ ॥
कासयासी एथें आलां । सर्व वृत्त सांगें मला ॥ ३ ॥
म्हणे वाहुक तियेसी । वृत्त कळलें ऋतुपर्णासी ॥ ४ ॥
द्वितिय स्वयंवर वृत्त । ऐकतांचि धालें चित्त ॥ ५ ॥
एका दिनीं शतयोजनें । आला राव या वेगानें ॥ ६ ॥
असें सारथी मी त्याचा । वासुदेव कथितो वाचा ॥ ७ ॥

१८८

म्हणे केशिनी हे शूरा । कोण सांगातीं तिसरा ॥ १ ॥
येरु म्हणे वार्ष्णेयासी । जाणें नळाचा सारथी ॥ २ ॥

वनामाजी नळ जातां । गांठी वार्ष्णेय अयोध्या ॥ ३ ॥
जाणें अश्वशास्त्रवेत्ता । कुशल मज पाककर्ता ॥ ४ ॥
हींच कामें करितों नित्य । ऋतुपर्णाचा आश्रित ॥ ५ ॥
म्हणे केशिनी, वार्ष्णेय । नळवृत्त जाणे काय ॥ ६ ॥
म्हणे बाहुक, या स्थानीं । गेला अपत्यां ठेवोनि ॥ ७ ॥
नळवृत्त नळावीण । अथवा । दमयंतीवांचून ॥ ८ ॥
नाहीं अन्य कोणा ठावें । रूप त्याचें पालटलें ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे ऐशा । बोले सूचक तो भाषा ॥ १० ॥

१८९

म्हणे केशिनी सुवृत्ता । सांगें त्याचि पूर्व शब्दां ॥ १ ॥
बोललासी जें विप्रासी । ऐकूं इच्छिते दमयंती ॥ २ ॥
ऐकूनियां ऐसे शब्द । कंठ जाहला सद्गद ॥ ३ ॥
आंवरूनियां हृदया । बाहुक बोले त्या समया ॥ ४ ॥
विपत्कालीं पुण्यवती । स्वयें आपणा रक्षिती ॥ ५ ॥
इत्यादि तें कथितां नळ । झाला अंतरीं विव्हल ॥ ६ ॥
वृत्ति अनावर होई । नयनीं अश्रुपूर येई ॥ ७ ॥
ऐकूनियां तें केशिनी । सांगे दमयंतीलागूनि ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे काळ । कैसा आणी पहा वेळ ॥ ९ ॥

अध्याय ७५ वा

१९०

वृत्त ऐकूनि दमयंती । शोकविव्हल ते चित्तीं ॥ १ ॥
नळ मानूनि अंतरीं । म्हणे केशिनी सत्वरी ॥ २ ॥
पुनरपि अवलोकन । करीं त्या स्थानीं जाऊन ॥ ३ ॥
मागतांहि अग्नि, जळ । देऊं नको कांहीं वेळ ॥ ४ ॥
सांगें काय जें घडेल । मज येऊनि तत्काळ ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे दासी । येऊनि सांगे वृत्तांतासी ॥ ६ ॥

१९१

दमयंतीलागीं विस्मित केशिनी । सांगते येऊनि सकल वृत्त ॥ १ ॥
म्हणे बाहुकाची योग्यता ते मोठी । पाहिला न श्रेष्ठी ऐसा कोणी ॥

द्वार होई मोठें येतां तो सन्निध । वांकेना तो पूज्य नवल वाटे ॥
दृष्टिक्षेपें रिक्त कलश भरूनि गेले । नवल जाहलें ऐकें अन्य ॥४॥
तृण घेवोनियां दाविलें सूर्यासी । अग्नि तत्काळचि प्रज्वलित ॥ ५ ॥
स्पर्शितांहि अग्नि तयासी जाळीना । आश्चर्य याविना घडलें एक ।
चुरगाळितां तेणें न कोमेजे पुष्प । गंध द्विगुणित होई त्याचा ॥
ऐसीं चारी भूतें अनुकूल म्हणे । केशिनीवचनें वासुदेव ॥ ८ ॥

१९२

ऐकूनियां सकल वृत्त । द्रवलें दमयंतीचें चित्त ॥ १ ॥
स्पष्ट लक्षणें पतीचीं । शंका केवळ रूपाची ॥ २ ॥
केशिनीसी म्हणे राणी । सिद्ध मांस यत्नें आणीं ॥ ३ ॥
रुचि घेतां परिचित । शोक मांडिला बहुत ॥ ४ ॥
पुढती कन्या पुत्र दोन्हीं । पाठविलीं तथा स्थानीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे नाना । यत्नें परीक्षी ते धन्या ॥ ॥ ६ ॥

१९३

पाहूनि बाळांसी कुरवाळी कौतुकें । अंकावरी सुखें बैसवी त्यां ॥
दुःखाकुल चित्तें होई गोरामोरा । विचार अंतरामाजी आणी ॥ २ ॥
खालीं ठेवूनियां म्हणे केशिनीसी । हुबेहूब ऐसीं माझीं बाळें ॥ ३॥
स्मरण तयांचें पाहोनि यांप्रति । जा आतां पुनरपि येऊं नको ॥४॥
वारंवार येतां अपवाद येईल । परदेशी होतील दोषी व्यर्थ ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कथूनियां ऐसें । राव केशिनीतें म्हणे जाईं ॥ ६ ॥

अध्याय ७६ वा

१९४

केशिनी येवोनि सांगे सर्व वृत्त । दुःखाकुल चित्त दमयंतीचें ॥१॥
प्रत्यक्ष भेटीचा विचार करूनि । पाचारूनि आणि मातेलागीं ॥२॥
निवेदूनि सर्व वृत्तांत तियेसी । आज्ञा द्या भेटीची म्हणे मज ॥३॥
संशय अंतरीं केवळ रूपाचा । भेटीवीण कैसा दूर होई ॥ ४ ॥
माता जावोनियां विचारी रायासी । चिंतितां नृपासी पटली मात ॥

आज्ञा वडिलांची लाभतां तियेसी । आणवी नळासी मंदिरांत ॥
पाहूनि राणीसी शोकमग्न राव । म्हणे वासुदेव दुःखी राणी ॥ ७ ॥

१९५

ल्याली काषाय अंबर । जटिल जाहले कुंतल ॥ १ ॥
मलिन अंग दुःखाकुला । धैर्यें बोले बाहुकाला ॥ २ ॥
घोरवनीं निरपराधी । जेणें त्यागियेली साध्वी ॥ ३ ॥
ऐसा धर्मज्ञ तूं कोठें । पाहिला कीं सांग मातें ॥ ४ ॥
नळावीण ऐसी कृति । कोण करील या लोकीं ॥ ५ ॥
देवांसमक्ष मी ज्यासी । वरिलें कृति ही तयाची ॥ ६ ॥
त्याचा लाभ इच्छीतसें । विसरे वचन तो कैसें ॥ ७ ॥
देवां-ब्राह्मणां समक्ष । बोलला जें विवाहांत ॥ ८ ॥
ऐसें बोलतां बोलतां । अश्रुपूर येई नेत्रां ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे वेळ । कठिण परी तें सुदैव ॥ १० ॥

१९६

मृग नयनेचे नेत्र । पाहूनियां ते आरक्त ॥ १ ॥
मन द्रवलें रायाचें । पुण्यश्लोक वदे वाचे ॥ २ ॥
भीरु, द्यूत त्याग तुझा । सर्व खेळ तो कलीचा ॥ ३ ॥
तुझ्या शापें कलि दुःखी । हृदयीं माझ्या राहे कष्टी ॥ ४ ॥
अंतीं जिंकिलें तयाला । यातनांचा अंत झाला ॥ ५ ॥
सोडूनि तो गेला दुष्ट । तुझ्यास्तव या स्थानास ॥ ६ ॥
आलों ऋतुपर्णासवें । तेंचि कथिलें वासुदेवें ॥ ७ ॥

१९७

अनुरक्त कोण तुझ्याविण नारी । अन्य स्वयंवरीं हर्ष पावे ॥ १ ॥
भीमकन्या अन्य पतीसी वरील । स्वैर ती शोधील कोणी एक ॥ २ ॥
घेऊनियां ऐसी वार्ता पृथ्वीवर । हिंडताती चार नृपाळाचे ॥ ३ ॥
ऐकूनि तें वृत्त ऋतुपर्णराव । लक्षूनि तो भाव प्राप्त झाला ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे नळाची ही वाणी । ऐकूनियां राणी दुःख पावे ॥ ५ ॥

१९८

भयविव्हला ती कांपे थरथरां। जोडूनियां करां वदली नळा ॥ १ ॥
प्रभो या दोषानें दूषित मी नसें। देवांहूनि मातें तूंति देव ॥ २ ॥
कथिलें जें तेंचि उच्चारिती विप्र। देशोदेशीं क्षिप्र धांव घेती ॥ ३ ॥
पाहिलें पर्णादें तुज अयोध्येसी। युक्ति तुझ्यासाठीं आचरिली ॥४॥
अन्य कोणा नसे शक्य ऐसा वेग। यास्तव हा मार्ग निवडिला ॥५॥
शपथेवरी देवा कथीन मी तुझ्या। स्वप्नींही न माझ्या दुजा भाव ॥
वासुदेव म्हणे दमयंती ऐसें। दुःखें कथितसे नळालागीं ॥ ७ ॥

१९९

भूतसाक्षी वायु सर्वत्र संचार। करी निरंतर महाराजा ॥ १ ॥
अंतरिक्षांतूनि सूर्यनारायण। प्रकाशित जाण सकलां करी ॥ २ ॥
चंद्रमा विश्वाच्या मनींची देवता। साक्षी पुण्यश्लोका मजलागीं ॥
समर्थ हे देव, स्वप्नीं जरी माझ्या। विचार पापाचा उदित तरी ॥४॥
प्राणनाश माझा करोत तत्काळ। सत्य सत्य बोल त्रिवार हे ॥५॥
वासुदेव म्हणे ऐसें दमयंती। येऊनि काकुळती विनवी नळा ॥६॥

२००

सत्य प्रतिज्ञा हे ऐकूनि सतीची। अंतरिक्षामाजी वदला वायु ॥
पुण्य श्लोका नळा साध्वी दमयंती। समजें ही सती जगन्मान्या ॥
संवत्सर तीन साक्षी आम्ही तिचे। रक्षण शीलाचें नित्य करी ॥
तुझ्यासाठीं राया उपाय हा केला। स्वाकारीं सनीला निःसंदेह ॥
इतुक्यांत होई पुष्पवृष्टि तेथें। दुंदुभीच्या नादें भरलें नभ ॥ ५ ॥
ऐकूनियां ऐसी अशरीरिणी वाणी। निःसंदेह मनीं होई नळ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे आला पुण्यकाळ। दमयंती नळ सुखी होती ॥ ७ ॥

२०१

परस्पर भेटी होई प्रेमभावें। पूर्वरूप यावें होचि इच्छा ॥१ ॥
कर्कोटकदत्त वस्त्र पांघरितां। पावे पूर्वरूपा तत्काळचि ॥ २ ॥
स्पष्ट पूर्वरूपें पाहूनियां पति। चरणीं घट्ट मिठी घाली सती ॥ ३ ॥
मुक्तकंठें प्रेमें आर्तध्वनि आला। आलिंगी प्रियेला भाग्यवंत ॥ ४ ॥

अल्पत्यांसी घेई प्रेमें अंकावरी । स्तब्धता त्या वेळीं पसरे बहु ॥
वासुदेव म्हणे माता सर्व वृत्त । रायासी त्वरित कथन करी ॥ ६ ॥

२०२

आनंदित राव बोलला त्यावेळीं । यावें प्रातःकाळीं भेटावया ॥ १ ॥
दमयंतीसह जामात्यानें सुखें । निज आन्हिकातें उरकून ॥ २ ॥
उभयतां आतां पावोत विश्रांति । बोलला नृपति कांतेलागीं ॥ ३ ॥
वृत्तांत आपुला कथिती एकमेकां । ऐसी सुखें निशा घालविली ॥
कोमल तृणानें जैसी शोभे भूमि । शोभली तें भैमी तया वेळीं ॥
क्लेश मनस्ताप संपूनियां गेले । आनंदें भरलें हृदय तिचें ॥ ६ ॥
आल्हादक चंद्रें शर्वरीसमान । हर्षित ते जाण दमयंती ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे आनंदी आनंद । तोषल्या गोविंद सर्वकाळ ॥ ८ ॥

अध्याय ७७ वा २०३

प्रातःकाळीं स्नान संध्या आचरूनि । भूषणें लेऊनि नळराज ॥ १ ॥
दर्शन घेऊनि वंदी श्वशुरासी । वंदिते पित्यासी दमयंती ॥ २ ॥
पुत्रासम घेई सन्निध नळासी । सत्कारी तयासी भीमराजा ॥ ३ ॥
प्रजाजन सर्व हर्षित जाहले । आनंदें कोंदलें कुंडिनपुर ॥ ४ ॥
ध्वज पताकांनीं शोभली नगरी । पुष्पें उधळिलीं मार्गावरी ॥ ५ ॥
दारोदार गुढ्या तोरणें बांधिलीं । सुशोभित केलीं देवालयें ॥ ६ ॥
रंगवल्लिका त्या पुष्पांच्या रचना । वृत्त ऋतुपर्णा सकळ कळे ॥७॥
वासुदेव म्हणे क्षमा याचिताति । एकमेकांप्रति विनवूनि ॥ ८ ॥

२०४

एकमेक उभयांचा । करिती गौरव तो साचा ॥ १ ॥
मित्रपण तें पूर्वींचें । दृढ करिती या प्रसंगें ॥ २ ॥
नळ म्हणे तुझी ठेव । घेई राखीं दिव्य अश्व ॥ ३ ॥
दिधली अश्वविद्या तया । ऋतुपर्ण गेला ठाया– ॥ ४ ॥
अन्य सारथी घेवोनि, । नळ राहिला त्या स्थानीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे आतां । ऐका पुढील वृत्तांता ॥ ६ ॥

अध्याय ७८ वा

२०५

मास एक पुण्यश्लोक । राहे कुंडिनपुरास ॥ १ ॥
पुढती अनुज्ञा घेवोनि । जाऊं म्हणे निजस्थानीं ॥ २ ॥
अर्धशत अश्व घेई । गज षोडपचि पाहीं ॥ ३ ॥
पायदळ अवघें साठ । घेऊनि गांठी निषध देश ॥ ४ ॥
भेटूनियां पुष्करासी । म्हणे खेळूंया द्यूतासी ॥ ५ ॥
अथवा द्वैरथ्य युद्धातें । करूं म्हणे या समयातें ॥ ६ ॥
यत्नें राज्य वाडिलार्जित । संपादावें म्हणती वृध्द ॥ ७ ॥
सुयश अथवा तें मरण । एक आतां संपादीन ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे खळ । मानी दुर्वळचि नळ ॥ ९ ॥

२०६

पुष्कर म्हणे हे नैषधा । वहुत जोडिली संपदा ॥ १ ॥
पाहूनियां हर्ष वाटे । दैन्य दमयंतीचें संपे ॥ २ ॥
तिज लाविसी तूं पणा । करितों तुझ्या अभिनंदना ॥ ३ ॥
जैसा अप्सरेसन्निध । शोभतसे तो देवेंद्र ॥ ४ ॥
तैसा होईन मी सुखी । जिंकूनियां दमयंतीसी ॥ ५ ॥
ऐकूनि हे क्षुद्रवाणी । नळ कोपाकुल मनीं ॥ ६ ॥
शिरच्छेदार्थ सज्जला । परी कोप आंवरिला ॥ ७ ॥
म्हणे वालिश वडवड । पुरे द्यूता होई सिध्द ॥ ८ ॥
जिंकितांचि मी तुजला । पुढती कळेल हे खळा ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे द्यूत । आरंभितो पुण्यश्लोक ॥ १० ॥

२०७

एकाचि पणानें जिंकी पुष्करासी । मुकला सर्वस्वासी प्राणासवें ॥
निष्कंटक राज्य म्हणे आतां माझें । अधमा सतीचें न दिसे नख ॥
परिवारासह दास तूं तियेचा । परी दोष तुझा न म्हणे नळ ॥ ३ ॥
देईन मी तुज सुखें प्राणदान । पूर्वीचेंचि प्रेम ठेवीन मी ॥ ४ ॥
गृह धन त्याचें अर्पोनियां नळ । म्हणे वंधो, काळ कंठीं सुखें ॥५॥
सत्कारूनि त्यासी म्हणे जाई आतां । जोडूनियां हातां पुष्कर म्हणे ।

उदार तूं राजा लाभो नित्य कीर्ति । चिरकाल जगीं नांदशील ॥७॥
माम एक सुखें राहोनियां गेला । परिवारेंसी स्थळा पुष्कर तो ॥
पूर्ववैभवानें शोभला नैषध । आनंदी आनंद सकल जनां ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे देव, देवेंद्रासी । वंदिती नळासी तैसे सर्व ॥ १० ॥

अध्याय ७९ वा २०८

निषध देशीं जन करिती महोत्सव । पाहोनियां राव सुखी झाला ॥
सेना पाठवोनि राणीसी आणिलें । यज्ञ बहु केले पुढती नळें ॥ २ ॥
सत्यप्रतिज्ञ तो सत्कीर्ति पावला । आदर्श जाहला सकल नृपां ॥३॥
बृहदश्व सांगे तूंहि युधिष्ठिरा । त्वरित उदारा होसिल सुखी ॥ ४ ॥
धर्मशील नळ विजयी जाहला । तैसाचि तुजला विजय लाभे ॥५॥
एकाकी नळासी करोनि तुलना । दुःखभार धर्मा सहन करीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मुनि बृहदश्व । बोलती धर्मास सदय चित्तें ॥ ७ ॥

२०९

कर्कोटक दमयंती । नल ऋतुपर्ण राजर्षि ॥ १ ॥
यांच्या स्मरणें कलिदोष । कदा बाधेना कोणास ॥ २ ॥
एकितांचि विपद्ग्रस्त । राव होई शांत चित्त ॥ ३ ॥
यत्न करी वैभवाचा । राहे सम यशापयशा ॥ ४ ॥
नव्हे अपयशें खिन्न । तोचि धीर पुरुष जाण ॥ ५ ॥
चरित्र हें वारंवार । नष्ट ऐकतां दारिद्र्य ॥ ६ ॥
इष्ट कामना पुरती । पुत्र-पौत्र आरोग्यादि ॥ ७ ॥
सर्व सुखाचा अनुभव । तया म्हणे वासुदेव ॥ ८ ॥

२१०

येतां द्यूताचा समय । घालवितों तुमचें भय ॥ १ ॥
जाणतों मी अक्षविद्या । तुज अर्पितों हे राजा ॥ २ ॥
धर्म जोडूनियां पाणी । म्हणे धन्य होईन मी ॥ ३ ॥
विद्या अर्पोनियां मुनि । गेले स्नानार्थ निघूनि ॥ ४ ॥
धर्मालागीं म्हणती विप्र । पार्थ करी तप दुर्धर ॥ ५ ॥

ऐसा कोणी न पाहीला । साक्षात् धर्मचि भासला ॥ ६ ॥
सहन करी बहुत क्लेश । इंद्रकील पर्वतास ॥ ७ ॥
ऐकूनियां युधिष्ठिर । जाहलासे दुःखाकुल ॥ ८ ॥
विप्रालागीं प्रश्न करी । स्मरतो वासुदेव हरि ॥ ९ ॥

---

## तीर्थयात्रापर्व ७

अध्याय ८० वा २११

जनमेजय म्हणे वैशंपायनासी । पार्थावीण स्थिति कैसी होई ॥ १ ॥
मुनि म्हणे सूत्र तुटलिया मणी । छिन्नपक्ष वनीं पक्षी जैसे ॥ २ ॥
कुबेरावांचूनि चैत्ररथ वन । तैसें पार्थाविण भासे वनीं ॥ ३ ॥
धर्मालागीं म्हणे द्रौपदी दुःखानें । धनंजयाविणें शून्य दिशा ॥ ४ ॥
भीम म्हणे भद्रे सत्य तुझी वाणी । विजयाविण मनीं सौख्य नसे ॥
जिंकिलेंचि सर्व वाटे जया मुळें । शून्य हें जाहलें तेणें जग ॥ ६ ॥
नकुळ सहदेव गुण आठविती । पार्थासी स्मरती निरंतर ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे धनुर्धारी पार्थ । प्रिय सकलांस ऐशापरी ॥ ८ ॥

अध्याय ८१ वा २१२

कृष्णेसह ऐसे सकलहि भ्राते । स्मरूनि पार्थातें कष्टी होती ॥ १ ॥
पाहोनि तयांचें दुःख धर्मराज । उद्विग्न मनांत होई बहु ॥ २ ॥
इतुक्यांत तेथें ब्रह्मविद्यावळें । झळकत आले नारदमुनि ॥ ३ ॥
सत्कारितां म्हणे काय करूं प्रिय । नम्रपणें राव विनवी त्यांसी ॥
पृथ्वीप्रदक्षिणा करितां काय लाभ । सांगावें सहज मजलागीं ॥
मुनि म्हणे पूर्वी गंगेच्या तटाकीं । भीष्माची वसती पितृव्रता ॥
पुलस्त्यदर्शन तया एके वेळीं । भीष्म पूजा करी मनोभावें ॥ ७ ॥
संयम पाहोनि प्रसन्न ते मुनि । वासुदेव मनीं मोद पावे ॥ ८ ॥

अध्याय ८२ वा                २१३

पितृभक्ति तुझी पाहूनि तोषलों । यास्तव जाहलों प्रगट एथें ॥ १ ॥
निष्फळ न माझें दर्शन कदापि । पुलस्त्य बोलती ऐसें भीष्मा ॥
भीष्म म्हणे पृथ्वीप्रदक्षिणा होतां । काय लाभ लोकां सांगा मज ॥
मुनि म्हणे भीष्मा संयमी जो नर । दंभ अहंकार नसे जया ॥ ४ ॥
सकल मंत्रांचें फल तया लाभे । नित्य जो सन्मार्गें वागतसे ॥ ५ ॥
यज्ञ-याग जनीं धनवंतासाठीं । तीर्थयात्राविधि धनहीना ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पुलस्त्य सांगती । पुष्कर महती विस्तारानें ॥ ७ ॥

२१४

जंबुमार्ग वास; तीर्थ तें ‘ अगस्त्य ’ । कण्वाश्रम श्रेष्ठ पुढती असे ॥
‘ ययातिपतन ’ तीर्थासी पाहोनि । भेटावें जावोनि महाकाळा ॥
स्थाणुतीर्थ किंवा भद्रवट नामें । वंदूनियां जावें नर्मदेसी ॥ ३ ॥
दक्षिणसागरीं जाऊनि पुढती । स्नान चर्मण्वतीमाजी पुढें ॥ ४ ॥
अर्बुदगिरीस वसिष्ठआश्रम । छिद्र तेथ जाण पूर्वी होतें ॥ ५ ॥
‘ पिंग ’ तीर्थाहूनि प्रभासतीर्थासी । सिंधु-सरस्वतीमीलन पुढें ॥
‘ सलिलराज ’ पुढें वरदान तीर्थ । द्वारावती मार्ग तेथूनियां ॥७॥
मुद्रा कमलांकित पद्में सात्रिशूळ । पिंडारकस्थल ख्यात तेथें ॥ ८ ॥
सिंधु-सागराच्या संगमासि जावें । शंकुकर्णा व्हावें नम्र तेथें ॥९॥
‘ दमि ’ वसोर्धारा, पुढती करोनि । वसूंसी वंदूनि पुढती जावें ॥
‘ सिंधूत्तम ’ तैसें भद्रतुंग क्षेत्र । कुमारिका तीर्थलाभ घ्यावा ॥
पंचनदा जावें रेणुका वंदूनि । भीमेच्या उगमीं पुढती जावें ॥ १२ ॥
वासुदेव म्हणे श्रीकुंड प्रसिद्ध । वंदा पितामह तयास्थानीं ॥ १३ ॥

२१५

विमलतीर्थासी रौप्य सुवर्णाचे । मत्स्य, वितस्थेचें पुढती तीर ॥
वडवातीर्थातें सप्तचरु नाम । रुद्रपद जाण पुढती क्षेत्र ॥ २ ॥
मणिमान् देविका कामाख्यहि तीर्थ । जा दीर्घसत्रास पुढती भीष्मा ॥
विनशन, तेंवी शशयानतीर्थ । कुमारकोटीस पुढती जावें ॥ ४ ॥
कोटी रुद्ररूपें प्रगटला हर । त्या रुद्रकोटीस पुढती जावें ॥ ५ ॥

सरस्वतीचा तो संगम पहावा । वंदितां केशवा, पुण्य लाभे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पुण्यतीर्थें ऐसीं । जोडा पुण्यकोटी स्नानमात्रें ॥ ७ ॥

अध्याय ८३ वा

२१६

कुरुक्षेत्र सुविख्यात । महापापनिवर्तक ॥ १ ॥
ब्रह्मसदन तयासी । नाम सार्थ उपनिषदिं[1] ॥ २ ॥
पुढती 'सतत' नामें तीर्थ । महाविष्णूचा जें वास ॥ ३ ॥
पारिप्लव सुप्रसिद्ध । पृथ्वी तीर्थही विख्यात ॥ ४ ॥
जावें दशाश्वमेधासी । तेंवी उत्तमनाग तीर्थी ॥ ५ ॥
'द्वारपाल तरंतुक' । पंचनद, कोटितीर्थ ॥ ६ ॥
पुढती अश्विनीकुमार । वाराहही तीर्थ थोर ॥ ७ ॥
सोमतीर्थ ' एक हंस ' । यक्षिणीचा ' मुंजवट ' ॥ ८ ॥
भार्गवाचे ' रामन्हद । स्नानें सकल हेतु सिद्ध ॥ ९ ॥
' वंशमूलकासी ' जावें । ' कायशोधन ' पहावें ॥ १० ॥
' लोकोद्धार ' तें श्रीतीर्थ ' । ' कपिला ' तेंवी ' सूर्यतीर्थ ॥
पुढती 'गोभवन' 'शंखिनी' । 'अरंतुका' चिया स्थानीं ॥ १२ ॥
'ब्रह्मावर्त' 'सुतीर्थक' । 'अंबुमती'चें 'सुतीर्थ' ॥ १३ ॥
ख्यात तेथें 'मातृतीर्थ' । पुढती पहा 'वनसीत' ॥ १४ ॥
अहो 'दशाश्वमेधिक' । मृग झाले मानव जेथ ॥ १५ ॥
'मानुषतीर्था'सी त्या जावें । 'आपगे'चें स्नान व्हावें ॥ १६ ॥
वासुदेव म्हणे ऋषि । तीर्थें कथिती भीष्मासी ॥ १७ ॥

२१७

'ब्रह्मौदुंबरासी' 'केदारकुंडांत' । पुढती 'कपिष्ठलास'स्नान व्हावें ॥
'सरक''वृषभध्वज' 'इलास्पद'तीर्थ । 'किंदान''किंजप''कलशीं' जाणें
'अंबाजन्म' तेंवी तीर्थ 'पुंडरीक' । 'वैतरणी' देख 'त्रिविष्टपी' ॥ ३ ॥

१ जाबालोपनिषदांत

'फलकी' तें वन 'दृषद्वती'स्नान । 'पाणिखात' जाण महातीर्थ ॥
सर्वतीर्थलाभ 'मिश्रक' तीर्थासी । जा 'व्यासवना'सी अत्यादरें ॥
'मनोजव' तेंवी 'मधुवटी'तीर्थ । 'दृषद्वती' भेट 'कौशिकीसी' ॥
'व्यासस्थली' तेंवी 'गोस्थली' 'किंदत्त' । प्रख्यात तें कूप तीर्थ जाण
'सुदिन' 'अह' 'वेदी' तेंवो 'मृगधूम' । 'देवीतीर्थ' जाण 'वामनक' ॥
'कुलंपुन' तेंवी 'पवन' 'अमरन्हद' । पुढती 'श्री नैमिष' 'कुंजद्वय' ॥
'कन्या' 'ब्रह्म' 'सोम' 'सप्तसारस्वत' । तीर्थ तें विख्यात मंकणक ॥
'औशनस' तेंवी 'कपालमोचन' । 'विश्वामित्र' जाण पुढती तीर्थ ॥
तीर्थ सर्वश्रेष्ठ 'पृथूदक'तीर्थ । पुढती 'मधुस्रव' 'अर्धकील' ॥ १२ ॥
'शतसहस्रक' 'रेणुका'तीर्थासी । 'पंचवटी' पुढती 'वारुण'तीर्थ ॥
वासुदेव म्हणे 'कुरु' 'स्वर्गद्वार' । तीर्थ 'अनरक' सुगती देई ॥ १४ ॥

२१८

'पद्मनाभ' 'स्वस्तिपुर' । 'पावन' 'गंगान्हद,' 'कूप' ॥ १ ॥
'स्थाणुवट,' 'बदरिपाचन' ' रुद्रमार्गी' जातां पुण्य ॥ २ ॥
'एकरात्र' तें 'आदित्य' 'सोम' तेंवी 'दधीचि' तीर्थ ॥ ३ ॥
'कन्याश्रम' 'संनिहिती' । कुरुक्षेत्र त्या बोलती ॥ ४ ॥
तेंचि समंतपंचक । उत्तरवेदी नाम त्यास ॥ ५ ॥
वासुदेव कुरुक्षेत्र । म्हणे क्षेत्रांत तें क्षेत्र ॥ ६ ॥

अध्याय ८४ वा

२१९

'ज्ञानपावन' तें 'धर्मतीर्था पुढें । सौगंधिक' तैसें 'प्लक्षा'स्नान ॥ १ ॥
'ईशानाध्युषित,' 'शतकुंभा,' 'सुगंधा' । 'पंचयक्षा' देखा 'त्रिशूलखात'
'शाकंभरी'तीर्थ सुव्रतादेवीचें । 'सुवर्णाख्य' साचें पुढती तीर्थ ॥
'धूमावतीदेवी' 'रथवर्त'तीर्थ । पुढती 'धारातीर्थ' 'महागिरी' ॥४॥
'गंगाद्वार' तेंवी 'सप्तगंगा जाण । 'शक्रावर्त' जाण 'त्रिगंग' तें ॥५॥
'कनखल' तेंवी 'कपिलावट' ख्यात । 'नागराज' तीर्थ 'ललितक' ॥
'यमुना-गंगा' तेंवी 'सरस्वती' गंगा-। संगम,'सुगंधा'पुढती जावें ॥
'रुद्रावर्त' 'भद्रकर्णेश्वर' तेंवी । 'कुब्जाम्रक' पाहीं पुढती तीर्थ ॥
'अरुंधती-वट' 'सामुद्रिक' तीर्थ । पुढती 'ब्रह्मावर्त' यमुनोद्गम ॥

'दर्वी-संक्रमण' 'सिंधूचा उगम'। 'ऋषिकूल्या' जाण 'वासिष्ठ' तें ॥
'भृगुतुंग' तेंवी 'वीरप्रमोक्ष' तें। 'कृतिका' 'मघा' तें 'विद्यातीर्थ' ॥
वासुदेव म्हणे 'महालय' क्षेत्रीं। जाऊनि पुढती 'वैतसिका' ॥१२॥

२२०

'सुंदरिका' तेंवी 'नैमिष' मंगल। 'गंगाह्रद' स्थल,'सरस्वती' ॥ १ ॥
'बाहुदा,' 'विमलाशोक' तें पुढती। 'गोप्रतारतीर्थी' स्नान व्हावें ॥
'गोमती' माझारीं 'रामतीर्थी' जावें। 'शतसाहस्री' व्हावें पुण्यस्नान
'भर्तृस्थान' तीर्थी पुढती 'कोटितीर्थ'। 'वाराणसी' ख्यात जगामाजी
'कपिलान्हदीं' स्नान 'अविमुक्तस्थान'। गोमती-संगम गंगेसह ॥
'मार्कंडेयतीर्थ' दुर्लभ तें जनीं। 'गये'च्या गमनीं पुण्य बहु ॥ ६ ॥
अक्षय तो वट पुढती महानदी। 'ब्रह्मसरोवरीं' यज्ञस्तंभ ॥ ७ ॥
'धेनुकतीर्थासी' पाउलें कपिलेचीं। धूलिस्नानें मुक्ति तयास्थळीं ॥
'गृध्रवट' पुढें 'उदयपर्वत'। सावित्रीचें पद स्पष्ट तेथें ॥ ९ ॥
'योनिद्वार'ही तें पुढती 'फल्गुतीर्थ'।जावें 'धर्मप्रस्थ' लक्षूनियां ॥
'ब्रह्मस्थानां'हूनि राजगृहा जावें। 'मणिनाग' पहावें पुण्यतीर्थ ॥
तीर्थ तें प्राशितां सर्पबाधा टळे। 'अहल्यान्हद' जळें स्नान कीजे ॥
वासुदेव म्हणे 'पापविनाशन'। 'गंडकी' ते जाण 'विशल्याही ॥

२२१

'जनककूप' 'अधिवंग'। 'कंपना' तें सती चांग ॥ १ ॥
'माहेश्वरी' 'सोमपद'। 'नारायण' 'जातिस्मर' ॥ २ ॥
'माहेश्वरपुरा' जावें। 'वामनतीर्थ' ही पहावें ॥ ३ ॥
तीर्थ 'कौशिकी' पुढती। जावें 'चंपक' 'ज्येष्ठिला' सी ॥
अग्निधारा पावनतीर्थ। त्रिभुवनीं जें प्रसिद्ध ॥ ५ ॥
'कन्यासंवेद्य' 'निर्वीर'। देवकूट' 'कौशिकन्हद' ॥ ६ ॥
पितामह सरोवर। कुमारधारेचा' प्रवाह ॥ ७ ॥
गौरीशंकरीं 'स्तनकुंड' 'ताम्रारुण' तें प्रसिद्ध ॥ ८ ॥
तैसी 'नंदिनी' 'कालिका'। 'कौशिकी' ते 'अरुणा' देखा
'उर्वशी' तो सोमाश्रम। तेंवी 'कुंभकर्णाश्रम' ॥ १० ॥

'कोकामुखीं' पूर्वस्मृति। मुक्त करी 'पूर्वनदी' ॥ ११ ॥
'क्रौंचनिषूदन' देख। 'सरस्वती' 'औद्दालक' ॥ १२ ॥
'धर्मतीर्थ' 'चंपातीर्थ'। वंदा 'दंडार्त-दैवत' ॥ १३ ॥
'वासुदेव म्हणे भीष्मा। कथिती पुलस्त्य ते जाणा ॥ १४ ॥

अध्याय ८५ वा २२२

'संध्यातीर्थ' तैंवी 'लौहित्य' 'करतोया'। 'गंगासागरा' या जावोनि ते ॥
'गंगा पैलतट 'बिरज' वैतरणीसी। लंघितां 'कुलतीर्था'सी पुण्य जोडे
'वृषभ'तीर्थ तें 'काल'तीर्थ' जाण। 'पुष्पवती' स्नान 'वदरिका'
'चंपातीर्थ' तैंवी 'दंडाख्य' पवित्र। 'लपेटिका' शुद्ध 'महेंद्र'तो ॥
'मतंग' केदार तैसा 'श्रीपर्वत'। 'देवन्हद' तेथ पुण्यकारी ॥ ५ ॥
'वृषभपर्वत' पुढती 'कावेरी'। 'कन्या' सागरतीरीं तीर्थ असे ॥
विख्यात 'गोकर्ण' पुढती 'गायत्री'। विसरे गायत्री अब्राह्मण ॥७॥
'संवर्तवापी' ते पुढती 'वेणेसी'। पुढती 'गोदेसी' स्नान करा ॥
वेणेचा संगम वरदेचा तैंवी। 'उशप्लवन' व्हावी पुढती यात्रा ॥९॥
कृष्णा-वेणी तीरीं 'जातिस्मरन्हद' पुढें 'सर्वन्हद' पयोष्णीही॥ १० ॥
दंडकवनींचीं तीर्थें तीं पवित्र। शुकाचा शरभंग पुण्याश्रम ॥ ११ ॥
शूर्पारकामाजी रामतीर्थस्नान। गोदा 'तुंगारण्य' 'मेधाविक' ॥१२॥
'कालंजलगिरी' वरी देवन्हद। चित्रकूटा सन्निध मंदाकिनी॥ १३ ॥
'भर्तृस्थान' 'कोटीतीर्थ' 'ज्येष्ठस्थान'। 'कूप' तो पावन पुढती असे
वासुदेव म्हणे 'शृंगवेरपूर'। 'मुंजवट' थोर 'जान्हवी' ही ॥ १५ ॥

२२३

'प्रयागीं' नांदती सकलहि देव। अत्यंत महत्त्व तीर्थासी या ॥ १ ॥
'कंबल' अश्वतर 'भोगवतीतीर्थं'। प्रयागासन्निध तीर्थें बहु ॥
साठ कोटि तीर्थें एकाचि प्रयागीं। तीर्थी देहत्यागी तोचि धन्य ॥
सर्वतीर्थगंगा घडो स्नान कोठें। कनखल प्रयागीं तें पुण्य बहु ॥४॥
सर्व तीर्थें श्रेष्ठ कृतयुगामाजी। त्रेतायुगामाजी पुष्कर श्रेष्ठ ॥ ५ ॥
कुरुक्षेत्र जाणा द्वापारीं वरिष्ठ। कलीमाजी श्रेष्ठ गंगास्नान ॥ ६ ॥

पुष्करीं तें तप महालयीं दान । घडो अग्न्यारोहण मलयावरी ॥७॥
भृगुतुंगावरी उपवास करावे । स्नानमात्र व्हावें गंगेमाजी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे स्नानमात्रें गंगा । उद्धरिते जगा कलियुगीं ॥ ९ ॥

२२४

नाम घेतां गंगा करिते पावन । दर्शनें कल्याण सकळांचें ॥ १ ॥
स्नान-पानें करी कुळाचा उद्धार । गंगेसम थोर तीर्थ नसे ॥ २ ॥
देवांमाजी देव केशव जाणावा । विप्रचि मानवांमाजी श्रेष्ठ ॥ ३ ॥
गंगा तोचि देश गंगा तपोवन । सिद्धक्षेत्र जाण गंगातीर ॥ ४ ॥
विप्र, साधु, मित्र, पुत्र, शिष्यांप्रति । गंगेची महती कर्णी सांगा ॥
पुलस्त्याची वाणी कथितांचि पुण्य । होईल तो धन्य श्रोता-वक्ता ॥
अपुत्रांसी पुत्र निर्धनांसी धन ॥ वैश्य शूद्र जाण सुखी होती ॥ ७॥
वीर विजयानें ब्राह्मण ज्ञानानें- । सुतप्र, श्रवणें पूर्वस्मृति ॥ ८ ॥
गम्यागम्य ऐसीं कथियेलीं तीर्थें । दर्शनार्थ त्यांचें स्मरण करा ॥
अशुचि ते नर तीर्थासी न जाती । भीष्मा तुझी कीर्ति होईल जगीं ॥
नारदांची वाणी बोलूनि पुलस्त्य । जाहले अदृश्य तया वेळीं ॥११॥
पुढती भीष्मानें केलें तीर्थाटन । शत यज्ञ पुण्य लाभे तेणें ॥ १२ ॥
अष्टगुण धर्मा पुण्यलाभ तुज । अवघे मुनिराज तुझ्यासवें ॥ १३ ॥
प्रातःकाळीं यांचें करी जो चिंतन । पापमुक्ति जाण तया घडे ॥१४॥
वाल्मीकी, कश्यप, आत्रेय, गौतम । पुत्रांसवें जाण व्यासमुनि ॥
प्रतीक्षा ते तुझी करिती युधिष्ठिरा । लोमश उदारा त्वरित येती ॥
ययाती, पुरूरवा, भगीरथ, राम । तैसा शोभे धर्म राव जगीं ॥१७॥
वृत्रहत्यासम जिंकूनि शत्रूसी । होशील जगासी वंद्य राजा ॥ १८ ॥
वासुदेव म्हणे बोलूनियां ऐसें । मुनिश्रेष्ठ तेथें गुप्त झाले ॥ १९ ॥

अध्याय ८६ वा

२२५

धौम्यालागीं म्हणे धर्म । पार्थ करी पुण्यकर्म ॥ १ ॥
घोर तपासी धाडिलें । चित्त व्याकुळ जाहलें ॥ २ ॥
नर-नारायण मुनि । द्वापरांत आले दोन्हीं ॥ ३ ॥
हेंचि कथिती नारद । भ्राता माझा तो समर्थ ॥ ४ ॥

अस्त्र संपादनालागीं । पाठविलें पुण्यमार्गीं ॥ ५ ॥
अतीरथी भीष्म-द्रोण । कृप अश्वत्थामा जाण ॥ ६ ॥
कर्ण साक्षात् अग्नि भासे । अस्त्रें वायु, त्या अग्नीतें ॥ ७ ॥
शर तेंचि महाज्वाला । टणत्कार नाद त्याला ॥ ८ ॥
क्रोध तयाचा तो धूम । धार्तराष्ट्र उद्दीपन ॥ ९ ॥
सौख्य तृणासी जाळील । परी पार्थ वांचवील ॥ १० ॥
वासुदेव म्हणे धर्म । करितो पार्थाचें स्तवन ॥ ११ ॥

२२६

दिव्यास्त्रें ते विद्युल्लता । प्रेरक कृष्ण वायु ज्याचा ॥ १ ॥
श्वेत अश्व त्या वलाका । इंद्रधनु गांडिव देखा ॥ २ ॥
मेघ पार्थशरधारा । शमवितील त्या अग्नीला ॥ ३ ॥
अतिरथी ते सकळ । खचित पार्थ संहारिल ॥ ४ ॥
परी तप हें दारुण । करितां न जावो तत्प्राण ॥ ५ ॥
तेणें तळमळ होई । आम्हां अन्य स्थान दावीं ॥ ६ ॥
सांगा कांहीं रम्य स्थानें । पार्थावीण शून्य जिणें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे धर्म । दावा म्हणे अन्य स्थान ॥ ८ ॥

अध्याय ८७ वा

२२७

धौम्य म्हणे धर्मराया । ऐकतांचि सौख्य जीवा ॥ १ ॥
कथितों मी ऐसीं तीर्थें । शोकरहित होतिल भ्राते ॥ २ ॥
पृथक् तीर्थें जें देवांचीं । ऐशा जावें नैमिपासीं ॥ ३ ॥
इच्छा बहुत पुत्रांची । जाइल एखादा गयेसी ॥ ४ ॥
अथवा करिल अश्वमेध । नील वृषाचा उत्सर्ग ॥ ५ ॥
ब्रह्मदेवें केला याग । तेंचि विख्यात प्रयाग ॥ ६ ॥
रम्य हिरण्यबंधुगिरी । भार्गव राहिला महेंद्रीं ॥ ७ ॥
मणिकर्णिका सरोवरीं । भागीरथी प्रवेशाली ॥ ८ ॥
ब्रह्मशालीं वाराणसी । नामें ऐसीं त्या स्थानासी ॥ ९ ॥
तृषा हरली नैषधाची । रम्य ‘ कुंडोद ’ पर्वतीं ॥ १० ॥
नंदा, बाहुदा, त्या नद्या । शोभविती पूर्व दिशा ॥ ११ ॥
वासुदेव म्हणे आतां । ऐका दिशात्रय तीर्थां ॥ १२ ॥

अध्याय ८८ वा २२८

दक्षिणेचीं तीर्थें सांगतों तीं ऐक । गोदा ती प्रसिद्ध वेणा,भीमा ॥१॥
राजर्षि नृगाची पयोष्णी प्रसिद्ध । तीर्थांमाजी श्रेष्ठ तीर्थ जाणा ॥
रम्य ' माठरवन ' ' वरुणश्रोतसगिरी '। स्थानें हीं कथिलीं पुण्यप्रद॥
शूर्पारकामाजी जमदग्नी वेदी । चंद्रा पाषाणादि पुण्य नद्या ॥ ४ ॥
अशोक अगस्त्य वारुण तें तीर्थ । स्त्रिया भगवद्भक्त पांड्यदेशीं ॥५॥
ताम्रपर्णी नदी विख्यात गोकर्ण । चमसोद्भेदन सुराष्ट्रांत ॥ ६ ॥
तीर्थ तें प्रभास उज्जयंतगिरी । तपासी सत्वरी सिद्धिदाता ॥ ७ ॥
द्वारवतीमाजी वासुदेव वसे । धर्म तो समजें सनातन ॥ ८ ॥
पुण्याचें तें पुण्य पवित्रीं पवित्र । अचिंत्य गोविंद विश्ववासी ॥ ९ ॥
ईश अव्ययात्मा व्ययात्मा क्षेत्रज्ञ । मंगलांत जाण मंगल तो ॥ १० ॥
वासुदेव म्हणे चिंतितां गोविंद । आनंदीं आनंद सकलांसी ॥ ११ ॥

अध्याय ८९ वा २२९

पश्चिमेसी वाहे पवित्र नर्मदा । वैडूर्यपर्वता पुढती पाहें ॥ १ ॥
' फुल्लपद्म ' नामें रम्य सरोवर । होई चमत्कार वेदध्वनि ॥ २ ॥
विश्वामित्रातीरीं ययातीपतन । मैनाकहि जाण तयास्थानीं ॥ ३ ॥
असित पर्वत, च्यवन आश्रम । अल्प तपें जाण सिद्धि तेथें ॥ ४ ॥
जंबूमार्ग तैसी केतुमाला, मेध्या । पावन त्या नद्या गंगाद्वारा ॥५॥
सैंधवारण्यानें पुष्कर पवित्र । म्हणे वासुदेव तीर्थें ऐका ॥ ६ ॥

अध्याय ९० वा २३०

उत्तरेचीं पुण्यतीर्थें । ऐकें सावधान चित्तें ॥ १ ॥
सरस्वती तीरावरी । तीर्थमालिका ते सारी ॥ २ ॥
भेदियेला हिमाचल । तेंचि जाण ' गंगाद्वार ' ॥ ३ ॥
' कनखल ' तें सन्निध । ' पुरु ' नामक पर्वत ॥ ४ ॥
बदरी समीप विशाल । तेथें गंगा उष्ण जल ॥ ५ ॥
कनकवर्ण ते वालुका । वंद्य जाणा देवलोकां ॥ ६ ॥
परमात्मा वास करी । तेथें वसती तीर्थें सारीं ॥ ७ ॥

ऐसीं पवित्र हीं तीर्थें । करितां वससी शांत चित्तें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे तीर्थें । करितां चित्त शुद्ध होतें ॥ ९ ॥

अध्याय ९१ वा २३१

धौम्यमुनि ऐसा करितां उपदेश । मुनिवर्य लोमश प्राप्त झाले ॥१॥
परिवारासह उठोनि नृपाळें । प्रेमें सन्मानिलें तयांलागीं ॥ २ ॥
मुनि म्हणे धर्मा पाहिलें मी पार्था । बैसतां शचिनाथासवें स्वर्गी ॥
इंद्राज्ञेनें आलों धर्मा तुम्हांपाशीं । ऐका वृत्तांतासी सौख्यदायी ॥
शिवप्रसादानें ब्रह्मशिरोस्त्रातें । संपादिलें पार्थें तपोबळें ॥ ५ ॥
इंद्र, वरुण तो कुबेरहि यम । जाहले प्रसन्न अस्त्रदाते ॥ ६ ॥
नृत्य गायनही संपादी स्वर्गात । राहिला सुखांत इंद्रलोकीं ॥ ७ ॥
निवातकवचां वधूनि येईल । तपानें पुरेल हेतु तुझा ॥ ८ ॥
कर्णाहूनि श्रेष्ठ पार्थ निश्चयानें । कवच कुंडलें हरिल इंद्र ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे यात्रेचा मानस । पुरवी लोमश पुढती ऐका ॥ १० ॥

अध्याय ९२ वा २३२

पार्थाचा निरोप ऐकें पुण्यवंता । न्यावें पुण्यतीर्थां बांधवासी ॥१॥
रक्षक व्हावया प्रार्थिलें मजसी । पीडा राक्षसांची होऊं नये ॥२॥
प्रार्थी ऐसें पार्थ इंद्र देई आज्ञा । यास्तव हे प्राज्ञा तीर्था येतों ॥३॥
तृतीय समय असे हा मजसी । अल्प परिवारेंसी यात्रा करीं ॥४॥
धर्म म्हणे ऐसा कोण भाग्यवंत । सदेह स्वर्गात बंधु ज्याचा ॥ ५ ॥
कुशल इच्छितो देवेंद्र जयाचें । तयाच्या भाग्यातें काय तोटा ॥६॥
असमर्थ तैसी सुखासीन लोकां । वृत्तियुक्त भृत्यां फिरवी राव ॥७॥
धृतराष्ट्र किंवा पांचाल नृपति । देइल तुम्हांसी वेतन म्हणे ॥ ८ ॥
पौरजन येतां धृतराष्ट्र सांभाळी । प्रेम धर्मावरी बहुत त्याचें ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे लोमशांसमेत । वसती काम्यकांत तीन रात्री ॥१०॥

अध्याय ९३ वा २३३

विप्र विनविती धर्मासी । देई अनुज्ञा आम्हांसी ॥ १ ॥
तीर्थें असुरांनीं व्याप्त । तुझ्यासवें होवो लाभ ॥ २ ॥

ऐकूनि ते दीनवाणी । दिधली अनुज्ञा सर्वांनीं ॥ ३ ॥
इतुक्यामाजी नारद, व्यास । पर्वत, प्राप्त त्या स्थानास ॥४॥
सत्कारितां म्हणती धर्मा । शुद्ध चित्तें लागा कर्मा ॥ ५ ॥
देहशुद्धि तें मानुष । चित्तशुद्धि दैवव्रत ॥ ६ ॥
शुद्ध चित्तें उभय साधे । मग तीर्था जा आनंदें ॥ ७ ॥
तयां वीर सन्मानिती । तीर्थाटना सज्ज होती ॥ ८ ॥
भृत्य वल्कलें अजिनें । सायुध पूर्वाभिमुखानें ॥ ९ ॥
मार्गशीर्ष वद्य पक्ष । निघती पुष्य नक्षत्रास ॥ १० ॥
वासुदेव म्हणे मुनि । करिती स्वस्त्ययन वनीं ॥ ११ ॥

अध्याय १४ वा २३४

युधिष्ठिर म्हणे सन्मुने लोमशा । अधर्मे शत्रूचा विजय कैंवी ॥१॥
मुनि म्हणे तया खिन्नता न मानीं । समूळचि हानी अंतीं तया ॥२॥
अधर्माचरणीं दानव ते दैत्य । पावले विनाश बहुत जनीं ॥ ३ ॥
स्वधर्माचा त्याग करिती दानव । आदरीती देव धर्ममार्गा ॥ ४ ॥
तीर्थयात्रामार्गें पावन ते देव । मानिती दानव नित्य शुद्धि ॥ ५ ॥
व्यर्थ अभिमानें होऊनियां क्रुद्ध । अकार्याची लाज सांडियेली ॥६॥
लोकनिंदा भय सुटतां तयांचें । अंतीं विनाशाचें स्थान तयां ॥ ७ ॥
तप, तीर्थ पुण्यजनांचें दर्शन । यश पुण्य धनयुक्त देव ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे मुचकुंद मांधाता । तैसाचि धर्माचा पुण्यमार्ग ॥९॥

अध्याय १५ वा २३५

हिंडतां हिंडतां ब्रह्मसर तीर्थी । चातुर्मास्य यागा करिती वीर ॥१॥
गयाचा वृत्तांत शमठें कथिला । 'अमूर्तरयाला' पुत्र गय ॥ २ ॥
महायज्ञ तेणें केला या तीर्थासी । त्रैलोक्यांत कीर्ति तेणें तया ॥३॥
अन्नाचे पर्वत, घृताचे ओहोळ । नद्याचि केवळ दधि तेथें ॥ ४ ॥
गगनभेदी तो वेदध्वनि नित्य । तृप्त प्राणिमात्र तया स्थानीं ॥ ५ ॥
परितृप्त देव, हविर्द्रव्यें कैंवी । अन्यांनीं दिधलीं स्वीकारिती ॥ ६ ॥

वालुकण किंवा नक्षत्रें नभींचीं । गणाल त्या किती मेघधारा ॥७॥
दक्षिणा गयानें अगणित ऐसी । देऊनि विप्रांसी तोषविलें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे यज्ञ बहु ऐसे । त्या स्थानीं गयाचे शमठ कथीं ॥

अध्याय ९६ वा २३६

वातापि दैत्याचें मणिमतीपूर । तेथें युधिष्ठिर प्राप्त झाला ॥ १ ॥
वृत्त वातापीचें पुशितां लोमश । इल्वल नामक म्हणती दैत्य ॥ २॥
वातापि तयाचा कनिष्ठ तो भ्राता । मायावी छागाचा वेष घेई ॥३॥
विप्रालागीं एका मागतां इल्वल । पुत्र इंद्रतुल्य, न लाभे त्या ॥४॥
तया क्रोधें दैत्य विप्रघात करी । भक्षितां पाचारी छागालागीं ॥५॥
विप्रांचें उदर भेदूनि वातापि । येऊनियां शांति पावे तेणें ॥ ६ ॥
ऐसे वहुत विप्र मारिले त्या ठाया । दुःख वासुदेवा कथितां होई ॥

२३७

याचि वेळीं अधोमुख । पितर गर्तेमाजी देख ॥ १ ॥
पाहूनियां अगस्त्यानें । पुशिलें कारण दुःखानें ॥ २ ॥
पितर बोलले सद्गति । होतां सन्तान तुजसी ॥ ३ ॥
तयां देऊनि अनुमती । वधू शोधी आपणासी ॥ ४ ॥
अंतीं सकल सद्गुण । आणी एकत्र तो धन्य ॥ ५ ॥
कन्या ऐसी कल्पूनियां । जन्मो, म्हणे योग्य ठाया ॥ ६ ॥
विदर्भाचा राव तदा । करी पुत्रासाठीं तपा ॥ ७ ॥
त्यासी जाहली हे कन्या । लोपामुद्रा नाम जाणा ॥ ८ ॥
महालावण्याची खाणी । अंतरिक्षीं जै रोहिणी ॥ ९ ॥
होतां उपवर गुणवती । चिंता नृपाळाचे चित्तीं ॥ १० ॥
वासुदेव म्हणे रम्य । कथा ऐकूनि व्हा धन्य ॥ ११ ॥

अध्याय ९७ वा २३८

उपवर कन्या पाहूनि अगस्ती । मागणी करिती विवाहार्थ ॥ १ ॥
चिंतामग्न झाला राव तया वेळीं । राणीसी विचारी जाऊनियां ॥
समर्थ हा मुनि शापील मजसी । ऐकतां कन्येसी दुःख झालें ॥३॥
कन्या म्हणे मज द्यावें अगस्तीतें । चिंता मानसातें होऊं नये ॥४॥

मुनि अगस्तीचा हेतु पूर्ण झाला । लेववी वल्कलां कांतेलागीं ॥५॥
पतिआज्ञा होतां दिव्य वस्त्रें त्यागी । तेंवी भोगबुद्धि सांडियेली ॥६॥
मुनि गंगाद्वारीं आचरी तपासी । लोपामुद्रा त्याची सेवा करी ॥
ऐशा रीति काळ लोटला बहुत । पाही ऋतुस्नात लोपामुद्रा ॥८॥
वासुदेव म्हणे सेवा, शुद्धि, दम । पाहूनि प्रसन्न मुनिराज ॥ ९ ॥

२३९

मुनि पाचारी सन्निध । सती बोले लज्जायुक्त ॥ १ ॥
पति स्वीकारी भार्येसी । इच्छा धरोनि प्रजेची ॥ २ ॥
परी पुरवा माझा हेत । पति वसो वैभवांत ॥ ३ ॥
वल्कलें हीं तपस्व्याचीं । छाया नको त्या विषयांची ॥ ४ ॥
म्हणती मुनि, मी न राजा । कांता म्हणे हे महाराजा ॥ ५ ॥
क्षणार्धेंचि सकल धन । संपादिसी ऐसें पुण्य ॥ ६ ॥
मुनि म्हणे सत्कर्मांचा । क्षय न घडो ही इच्छा ॥ ७ ॥
राहें सन्मार्गें या स्थानीं । जातों द्रव्यार्थ निघोनि ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ऋषि । हिंडताती द्रव्यासाठीं ॥ ९ ॥

अध्याय ९८ वा २४०

पुण्यवंत श्रुतश्रवा । प्रेमें सन्मानी मुनीला ॥ १ ॥
हेतु विचारी नम्रत्वें । म्हणती मुनि द्रव्य द्यावें ॥ २ ॥
दावूनियां आय-व्यय । उपाय, न म्हणे राव ॥ ३ ॥
उदार तो मुनिश्रेष्ठ । भेटे 'ब्रध्नश्व' राजास ॥ ४ ॥
तोहि दावी आय-व्यय । न चले कांहींच उपाय ॥ ५ ॥
तिघे भेटती पौरुकुत्सा । तीच तयाची अवस्था ॥ ६ ॥
पुढती नृपाळ ते तिन्ही । परस्परांत चिंतूनि ॥ ७ ॥
म्हणती धनाढ्य इल्वल । पूर्ण हेतु तो करील ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे मुनि । देती मान्यता ऐकोनि ॥ ९ ॥

अध्याय ९९ वा २४१

सकल मिळोनि इल्वल देशासी । जातां स्वागतासी इल्वल येई ॥१॥
मायावी मेपाचें शिजविलें मांस । पाहूनि नृपांस न सुचे कांहीं ॥२॥

मुनि म्हणे तयां न करावी चिंता। मृत्युपंथ दुष्टा दावीन मी ॥ ३ ॥
बोलूनियां ऐसें वैसूवि भोजना। एकटाचि अन्ना भक्षी मुनि ॥ ४ ॥
पुढती बहु हांका मारितां इल्वल। येईना बाहेर बंधु त्याचा ॥ ५ ॥
मुनि म्हणे व्यर्थ शिणूं नका मूढा। पचविला आतां उदरामाजीं ॥
ऐकूनि दानव सन्मानी मुनींसी। जोडूनि करांसी पुशितो हेतु ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐकूनि धनइच्छा। म्हणे हेतु माझा कथितां लाभ ॥

२४२

काय द्यावें ऐसें सांगा मज वाटे। तरी मागाल तें देईन मी ॥ १ ॥
मुनि म्हणे यांसी सुवर्णसहस्र। एकेक सहस्र धेनु द्याव्या ॥ २ ॥
विंशति सहस्र धेनु तेंवि धन। द्यावें मजलागून चिंतिसी तूं ॥ ३ ॥
ऐकूनि दानव खिन्न मनीं झाला। मनोगत याला समजे म्हणे ॥ ४ ॥
हिरण्मय रथ ' विराव–सुराव '। अर्पीयेले अश्व विपुल धन ॥ ५ ॥
जोडूनियां धन स्वस्थानासी आला। दावोनि इल्वला नीतिपंथ ॥ ६ ॥
आज्ञा घेऊनियां नृपाळ ते गेले। पूर्ण हेतु झाले ऋषिपत्नीचे ॥ ७ ॥
मुनि म्हणे कांते सहस्र कीं शत। दशचि कीं एक व्हावा सुत ॥ ८ ॥
एकचि इच्छितां सहस्रांसमान। लाभेल सुजाण पुत्र प्रिये ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे मुनींचें वचन। सांगतां, ऐकून वदली तेंचि ॥ १० ॥

२४३

पुत्र एकचि असावा। कुलोद्धार जेणें व्हावा ॥ १ ॥
सज्जन जो विद्यावंत। मूर्ख सहस्रहि व्यर्थ ॥ २ ॥
अर्पी गर्भ संतोषूनि। गेला तपासी निघूनि ॥ ३ ॥
सप्त वर्षें उदरीं होता। पुढती जन्मला तो ज्ञाता ॥ ४ ॥
नाम ' दृढस्यु ' तयाचें। उदरीं जणुं शिकला शास्त्रें ॥ ५ ॥
' इध्मवाह, ' अन्य नाम। इध्मा आणी तो म्हणून ॥ ६ ॥
पितर उद्धरूनि गेले। स्थान ख्यात हें जाहलें ॥ ७ ॥
म्हणती लोमश धर्मासी। वंदा प्रेमें त्रिपथगेसी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे गंगा। स्नानें उद्धरिते जगा ॥ ९ ॥

२४४

दाविती धर्मासी भृगु-तीर्थ मुनि। भार्गव ज्या स्थानीं सुखी झाला ॥

हरिलें रामानें तेज भार्गवाचें । पुनरपि लाभे तीर्थस्नानें ॥ २ ॥
तीर्थस्नानें धर्म तेजःपुंज झाला । पुशितो मुनीला भार्गवकथा ॥ ३ ॥
मुनि म्हणे विष्णु रावणवधार्थ । दशरथपुत्र होऊनि आला ॥ ४ ॥
पाहियेलें आम्हीं रघुनंदनासी । ते धनुर्भंगादि विक्रम त्याचे ॥ ५ ॥
ऐकूनि भार्गव अयोध्येसी आला । स्वागतार्थ गेला राम त्याच्या ॥
पाहोनि तयासी वदला भार्गव । पराक्रम दाव रामा तुझा ॥ ७ ॥
दुर्धर राजांचा वध जेणें केला । ऐशा या चापाला चढवीं गुण ॥८॥
राम म्हणे मातें नको अवमानूं । पूर्वजांसी वानूं किती माझ्या ॥९॥
तयांच्या पुण्यानें सुलभ हें कार्य । वंदी वासुदेव उभयांलागीं ॥१०॥

२४५

भार्गव म्हणे वत्सा त्यागोनि वल्गना । चढवीं या गुणा चापासी तूं
क्रोधें रामचंद्र घेऊनि तें चाप । क्षणार्धें तयास गुण जोडी ॥ २ ॥
हांसोनियां केला टणत्कार वेगें । भयभीत नादें भूतें तदा ॥ ३ ॥
भार्गव अर्पूनि दिव्य बाण म्हणे । आकर्ण संधानें बल दावीं ॥ ४ ॥
सदर्प अससी ऐसें ऐकीयेलें । आजि तें पाहिलें राम म्हणे ॥ ५ ॥
परी क्षमा तुज करितों भार्गवा । सत्यरूपें पहा मज आतां ॥ ६ ॥
ऐसें बोलूनियां दिव्य-दृष्टि देई । नवलचि होई तया काळीं ॥ ७ ॥
वसु, रुद्र, साध्य, वेद, विश्व सारे । शरीरीं दाविलें भार्गवासी ॥
चकित भार्गव तया वेळीं झाला । बाण सोडियेला तदा रामें ॥ ९ ॥
सुटतां तो शर कडाडले मेघ । जाहला भूकंप क्षणामाजी ॥ १० ॥
हरूनियां तेज वेगें शर जाई । वंदीतसे पाई भार्गव तदा ॥ ११ ॥
वासुदेव म्हणे संवत्सर एक । राही भयभीत महेंद्रासी ॥ १२ ॥

२४६

दर्परहित, जित, निस्तेज । पितर बघूनि भार्गवास ॥ १ ॥
म्हणती वत्सा विष्णूसवें । अयोग्य हें कर्म झालें ॥ २ ॥
त्रिभुवनाचा पालक । समजें तयासी तूं पूज्य ॥ ३ ॥
आतां जाईं 'वधूसरा' । घेईं करोनि उद्धारा ॥ ४ ॥
पितामह भृगु पूर्वी । तया स्थानीं तप करी ॥ ५ ॥
पितृवच तें ऐकूनि । गेला भार्गव त्या स्थानीं ॥ ६ ॥

स्नान करितां सहज । लाभलें त्या पूर्वतेज ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐशा । कथितो लोमश वृत्तांता ॥ ८ ॥

अध्याय १०० वा

२४७

युधिष्ठिर म्हणे तपस्वी लोमशा । अगस्तीची कथा पुढती सांगा ॥
मुनि म्हणे राया कालकेय दैत्य । कृतयुगीं वृत्र नेता त्यांचा ॥ २ ॥
प्रार्थिती ब्रह्मयासी देव, पीडा होतां । उपाय नाशाचा ब्रह्मा सांगे ॥
दधीचि मुनींसी मागोनि घ्या वर । होतील त्या वज्र अस्थि त्याच्या
लोकहितास्तव देईल तो अस्थि । वृत्रवधयुक्ति हेची जाणा ॥५॥
वासुदेव म्हणे ऐकोनि ते वाणी । संतोषले मनीं सकल देव ॥ ६ ॥

२४८

सरस्वती-तीरीं दधीच आश्रमा । संगें नारायणा घेऊनि जाती ॥१॥
'जीवंजीवक' ते भ्रमर कोकिळ । करिती मंजूळ ध्वनि तेथें ॥ २ ॥
महिष, वराह, भ्रमर, चमर । करिती संचार पशु सुखें ॥३॥
स्वर्गतुल्य भासे आश्रम तो रम्य । ऋषि सूर्यासम तळपे तेथें ॥ ४ ॥
सकलहि देव वंदिती चरणा । करिती याचना अस्थींलागीं ॥ ५ ॥
मुनि म्हणे होवो देहपात माझा । मार्ग कल्याणाचा लाभो तुम्हां ॥
ऐसें बोलूनियां प्राण सोडियेले । वज्र निर्मियेलें त्वष्ट्याकरवीं ॥
शुचिर्भूतपणें स्वीकारी तें इंद्र । अस्त्र महा उग्र वज्र जनीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे विश्वकल्याणार्थ । वेंचिती प्राणांस तेचि साधु ॥

अध्याय १०१ वा

२४९

देवांसवें इंद्र वृत्रावरी गेला । रक्षिती तयाला असुर बहु ॥ १ ॥
घनघोर झालें युद्ध तयावेळीं । एकमेकांवरी धांव घेती ॥ २ ॥
कालकेया घातें भयाकुल देव । सोडूनियां धैर्य पळती वेगें ॥ ३ ॥
भयाकुल इंद्र प्रार्थी वासुदेवा । निज तेज तया अर्पी विष्णु ॥ ४ ॥
देव, ऋषि तेही तैसेंचि करिती । तेणें इंद्रशक्ति वृद्धि पावे ॥५॥
पाहोनि तें वृत्र सिंहनाद करी । कंपित जाहली अवनी सारी ॥ ६ ॥
महा वज्र तदा सोडिलें इंद्रानें । सिद्ध होई तेणें सकल कार्य ॥ ७ ॥

मालाधारी दैत्य मंदरासमान । कोसळे मरून भूमीवरी ॥ ८ ॥
वेभान देवेंद्र घावरूनि पळे । कार्य सिद्ध झालें नकळे त्यासी ॥ ९ ॥
देव महर्षींनीं स्तवन मांडिलें । हेतु पूर्ण झाले सकलांचे ॥ १० ॥
वासुदेव म्हणे घावरोनि दैत्य । पळती पाठलाग करिती देव ॥११॥

२५०

होतां दैत्य पराभव । करिती सिंधूचा आश्रय ॥ १ ॥
त्रैलोक्याचा नाश व्हावा । ऐशा चिंतिती उपाया ॥ २ ॥
होतां ब्राह्मणांचा नाश । सहज त्रैलोक्य विनाश ॥ ३ ॥
विद्या, तप, तयांपाशीं । धर्मज्ञ ते पुण्यराशी ॥ ४ ॥
ऐसा करोनि निश्चय । आरंभिती दुष्टकार्य ॥ ५ ॥
सागराचा आश्रय तयां । नवल वाटे वासुदेवा ॥ ६ ॥

अध्याय १०२ रा

२५१

काल-कश्यपाचे पुत्र ते कालेय । संहाराचें कार्य करिती वेगें ॥
निशा समयासी आश्रमीं शिरती । क्रूरत्वें भक्षिती मुनींलागीं ॥२॥
वसिष्ठ आश्रमीं एकदां अशीति । ब्राह्मणां भक्षिती दुष्ट दैत्य ॥ ३ ॥
अष्टोत्तर शत आश्रमासन्निध । नव ते अन्यत्र भक्षियेले ॥ ४ ॥
च्यवनाश्रमीं शत भक्षिले तापसी । ऐशा अनर्थासी मांडियेलें ॥५॥
भरद्वाजाश्रमीं विंशति ब्राह्मणां । भक्षूनियां दैना ऐशी केली ॥ ६ ॥
मृत्युग्रस्त दैत्य करिती क्रूर हिंसा । नकळे ही वार्ता कोणालागीं ॥
प्रभातसमयीं प्रेतराशी नित्य । आश्रम उध्वस्त दिसती लोकां ॥८॥
वासुदेव म्हणे ऐसी दीन दशा । उत्साह लोकांचा नष्ट होई ॥९॥

२५२

वषट्कार तेंवी स्वाध्याय न दिसे । त्राता कोणी नसे जनांलागीं ॥
पलायन केलें सुचेल त्या ठाईं । वन, गुहा पाहीं निर्झर ते ॥ २ ॥
मृत्युभयें कोणी सोडीयेले प्राण । दैत्यवध यत्न करिती कोणी ॥
सागरीं शोधितां श्रम बहु होती । नाश पावताती अंतीं वीर ॥४॥
चिंताग्रस्त देव पाहूनि हे दशा । कथिती देवेशा सकल वृत्त ॥५॥

जाऊनि वैकुंठीं देवांसवें इंद्र । घाली नमस्कार देवदेवा ॥ ६ ॥
कर्ता हर्ता म्हणे तूंचि ब्रह्मांडाचा । आधार पृथ्वीचा वराह तूं ॥
नारसिंह देवा वामनही तूंचि । तारीं या संकटीं आम्हांलागीं ॥८॥
वासुदेव म्हणे इंद्रमुखें देव । प्रार्थिती अव्यय केशवासी ॥ ९ ॥

अध्याय १०३ रा २५३

तिर्यक्, देव तैंवी स्थावर ते प्रजा । प्रभो अधोक्षजा सांभाळीसी ॥
हव्य-कव्यें देव होती वृद्धिंगत । पातलें संकट महा जनीं ॥ २ ॥
भयंकर वध होई ब्राह्मणांचा । तेणें भूगोलाचा नाश होई ॥ ३ ॥
पृथ्वीनाशें प्रभो नष्ट होती देव । दयाळा यास्तव कृपा करीं ॥ ४ ॥
देव म्हणे क्षुब्ध असुरवधानें । कालेय, ही तेणें घोर वेळ ॥ ५ ॥
सागरीं वास्तव्य करूनियां दैत्य । पीडिती विप्रांस निशाकाळीं ॥
यास्तव शोषण सागराचें व्हावें । अगस्तिप्रभावें कार्य साधा ॥
वासुदेव म्हणे ऐकूनि ते वाणी । अगस्ति आश्रमीं जाती देव ॥ ८ ॥

२५४

सत्यप्रतिज्ञ मुनीची । करिती सर्व देव स्तुति ॥ १ ॥
नहुषें पीडितां जनांसी । तूंचि शासन त्या देसी ॥ २ ॥
मुनिश्रेष्ठा भास्कराचा । विंध्यें मार्ग अडवितां ॥ ३ ॥
निवारूनि तें संकट । अवघे जन केले मुक्त ॥ ४ ॥
वरदा, हे मुनिराया । वंदीतसों तुझ्या पायां ॥ ५ ॥
वर देईं या संकटीं । वासुदेव चरण वंदी ॥ ६ ॥

अध्याय १०४ था २५५

युधिष्ठिर म्हणे मुनिराया सांगा । अडविलें मार्गा कैशा रीति ॥१॥
मुनि म्हणे, सूर्या घाली प्रदक्षिणा । ऐसा शैलराणा मेरुनामें ॥ २ ॥
विंध्य म्हणे सूर्या मेरूसम मज । प्रदक्षिणा नित्य घालीं नेमें ॥ ३ ॥
मेरु म्हणे विंध्या आज्ञा महेशाची । इच्छेसम माझी गति नसे ॥ ४॥
ऐकूनि ते वाणी होऊनियां क्रुद्ध । मार्ग व्हावा रुध्द म्हणूनि वाढे ॥
सकलहि देव प्रार्थिती तयासी । परी मूढ त्यांसी सन्मानीना ॥ ६॥

तया वेळीं देव करिती प्रार्थना । अगस्ति आश्रमा जाऊनियां ॥७॥
ऐकूनि तें दुःख लोपामुद्रेसह । येऊनि सन्निध म्हणती मुनि ॥८॥
विंध्या, गिरिश्रेष्ठा, दक्षिणेसी जातों । फिरूनि येईतों लीन राहें ॥
ऐसें बोलूनियां मुनि दक्षिणेसी । जाऊनि अद्यापि राहियेले ॥ १० ॥
वासुदेव म्हणे विंध्यकथा ऐसी । कथिती धर्मासी लोमश मुनि ॥

२५६

लोमश म्हणती धर्मराजा । ऐकें वृत्तांत मुनीचा ॥ १ ॥
होऊनियां सुप्रसन्न । वदे अगस्ति वचन ॥ २ ॥
काय वर द्यावा म्हणे । देव कथिती नम्रपणें ॥ ३ ॥
विश्वद्रोही ते कालेय । सिंधु देई त्यां आश्रय ॥ ४ ॥
प्राशीं यास्तव सिंधूसी । तरी संहारूं दुष्टांसी ॥ ५ ॥
म्हणे अगस्ति देवांना । पूर्ण करीन कामना ॥ ६ ॥
ऐसें बोलूनियां मुनि । जाई सागरीं त्या क्षणीं ॥ ७ ॥
पाहावया अद्‌भुत कर्म । जमले असंख्यात जन ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे यक्ष । उरग, गंधर्व समस्त ॥ ९ ॥

अध्याय १०५ वा

२५७

देवऋषींलागीं म्हणे मुनिराज । करितों लोककाज त्वरित आतां ॥१॥
शत्रुवधालागीं सज्ज व्हावें आतां । देखतां देखतां नवल झालें ॥ २ ॥
क्रुद्ध होऊनियां प्राशिला सागर । स्तवन अपार करिती देव ॥ ३ ॥
प्रसादेंचि तुझ्या विश्वाचा सांभाळ । धन्य तपोबळ मुनिश्रेष्ठा ॥४॥
वाजविती वाद्यें गंधर्व मंगल । करिती विद्याधर पुष्पवृष्टि ॥ ५ ॥
समस्तही जळ प्राशितां या रीति । देव संहारिती असुरांलागीं ॥६॥
वासुदेव म्हणे सज्ज होती दैत्य । धांवूनि युद्धार्थ पुढती येती ॥ ७ ॥

२५८

देव दानवांचें जुंपलें समर । कालेय ते घोर नष्ट होती ॥ १ ॥
विदारूनि भूमी पाताळीं पळाले । शत्रु नष्ट झाले सकळांचे ॥ २ ॥

मुनिलागीं हर्षें सकल स्तविती। मुक्त जन होती तुझ्यामुळें ॥ ३ ॥
महाबाहो, आतां जलपूर्ण करीं–। सागर, यावेळीं कृपासिंधो ॥ ४ ॥
मुनि म्हणे जळ उदरांत जीर्ण। करा कांहीं अन्य यत्न आतां ॥५॥
आज्ञा घेऊनियां देव ते विस्मित। गेले स्वस्थानास सौख्यभरें ॥६॥
वासुदेव म्हणे देवांसी हे चिंता। जलपूर्ण कैसा होई सिंधु ॥ ७ ॥

अध्याय १०६ वा २५९

पितामहालागीं विनविती अमर। कैसा हा सागर पूर्ण होई ॥ १ ॥
ब्रह्मा म्हणे सिंधु भगीरथ यत्नें। पूर्ण सलिलानें पुढती होई ॥ २ ॥
पूर्वज उद्धारास्तव तो झटेल। विनवी युधिष्ठिर वृत्त कथा ॥ ३ ॥
लोमश कथिती इक्ष्वाकु वंशांत। सगर विख्यात राव झाला ॥ ४ ॥
सत्ववंत गुणी परी पुत्रहीन। हैहयां वधून राज्य करी ॥ ५ ॥
शैब्या, ते वैदर्भी, रूपवंत भार्या। करी तपश्चर्या तयां सवें ॥ ६ ॥
कैलासीं जावोनि आराधी शंकरा। तेणें वर दिला संतोषूनि ॥ ७ ॥
साठ सहस्र ते पुत्र एकीलागीं। गर्विष्ठ ते जगीं नष्ट होती ॥ ८ ॥
वंशधर एक शूर जो दुजीतें। अंतर्हित ऐसें कथूनि शिव ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे राव स्वस्थानासी। येतां गर्भवती उभय भार्या ॥१०॥

२६०

अलाबु तो वैदर्भीसी। बाळ तेजस्वी शैब्येसी ॥ १ ॥
अलाबूची त्याग इच्छा। करितां गगनीं देव वाचा ॥ २ ॥
नकरीं साहस नृपाळा। नको त्यागूं अपुल्या बाळा ॥ ३ ॥
भिन्न भिन्न पात्रीं बीज। ठेवीं नृपाळा घृतयुक्त ॥ ४ ॥
वाढवितां पुत्रप्राप्ति। होईल वा निश्चयेंसी ॥ ५ ॥
आज्ञा शंकराची मानीं। अन्यथा ते न, धरीं ध्यानीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे तैसीं। पात्रें सांभाळीती दासी ॥ ७ ॥

अध्याय १०७ वा २६१

दीर्घकाल ऐसा लोटूनियां जातां। सगर बालकां अवलोकी ॥ १ ॥
साठ सहस्र ते पुत्र महा उग्र। पीडिती सर्वत्र गगनगामी ॥ २ ॥

ब्रह्मदेवालागीं प्रार्थितां सज्जन । म्हणे त्यांचें कर्म बाधेल त्यां ॥ ३ ॥
पुढती सगरानें आरंभिला यज्ञ । अश्वांचें रक्षण करिती पुत्र ॥ ४ ॥
शामकर्ण येतां सागरासन्निध । जाहला तो गुप्त निर्जन स्थानीं ॥५॥
येऊनि कथिती वृत्त सगरासी । क्रुद्धपणें त्यांसी वदला राव ॥ ६ ॥
दावूं नका तोंड अश्वशोधाविण । वचन ऐकून निघूनि गेले ॥ ७ ॥
विदीर्ण अवनी दिसे एके ठाईं । करूनियां घाई खणिती वेगें ॥ ८ ॥
दुःखाकुल प्राणी होती छिन्न भिन्न । केलें विदारण पाताळाचें ॥९॥
वासुदेव म्हणे पाहीयेला अश्व । तैसेचि कपिल तेजोराशी ॥ १० ॥

२६२

उन्मत्तपणानें अवमान मुनींचा । करूनि अश्वाचा माग घेती ॥ १ ॥
पाहोनि उन्माद कोपूनि महर्षि । क्रोधें फेंकिताती दृष्टिक्षेप ॥ २ ॥
तेणें दग्ध झाले सकल सगर । वृत्तांत नारद सगरा सांगे ॥ ३ ॥
ऐकूनि तें वृत्त विमनस्क राजा । असमंजससुता वदला वाणी ॥
वत्सा, माझ्यासाठीं नाश सकलांचा । त्यजिला तव पिता प्रजेस्तव
धर्म म्हणे कैसा अत्याज्याचा त्याग । घडला तें सांग मुनिराया ॥
वासुदेव म्हणे शैब्येचा तनय । असमंजस नांव तयालागीं ॥ ७ ॥

२६३

गळा दाबूनियां दुर्बळ बाळांसी । फेंकी नदीमाजी ओरडतां ॥ १ ॥
पाहोनि हें कृत्य नृपाळासी जन । म्हणती संरक्षण तूंचि आम्हां ॥
ऐकूनियां राव उद्विग्न मानसीं । तत्काळ सुतासी त्यागी वनीं ॥३॥
पौत्रालागीं राजा म्हणे अंशुमाना । तूंचि माझ्या मना धीर आतां ॥
यज्ञीय अश्वासी आणीं वा सत्वरी । ऐकतांचि धरी तनय मार्ग ॥
अश्वालागीं पाही कपिलांसन्निध । साष्टांग प्रणिपात करी तयां ॥
संतोषूनि मुनि म्हणती माग वर । अश्व द्या सत्वर येरु म्हणे ॥७॥
तैसेंचि पावन करा सगरांसी । मागतों तुम्हांसी नम्रपणें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे संतुष्ट तो मुनि । बोलला जे वाणी तेचि ऐका ॥ ९॥

२६४

कपिल म्हणे सत्यव्रता हे धार्मिका । येवो कृतार्थता सगरालागीं ॥
तुझ्या योगें जाण उद्धार कुळाचा । आराधील तुझा पौत्र शिवा ॥

आणील भूलोकीं त्रिपथगा गंगा। उध्द्‌रील जगा सगरांसह ॥ ३ ॥
ऐसें बोलूनियां अर्पितांचि अश्व। झालें यज्ञकार्य नृपाळाचें ॥ ४ ॥
बहुत दिनीं राज्य अर्पूनि पौत्रासी। सगर स्वर्गासी जाई सुखें ॥
समुद्रान्त राज्य करी अंशुमान। पुत्र पुण्यवान दिलीप त्याचा ॥
पितर निधनें दुःखें करी तप। गंगा दर्शनार्थ परी व्यर्थ ॥ ७ ॥
सुत भगीरथा अर्पूनियां राज्य। गेला तपःसिध्द स्वर्गलोकीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे भगीरथ धार्मिक। तेंवी सत्यव्रत दयाशील ॥ ९ ॥

अध्याय १०८ वा २६५

भगीरथ राव सकलांसी प्रिय। पितरांचें कार्य साधूं म्हणे ॥ १ ॥
राज्यभार टाकी सचिवांचे शिरीं। उग्र तप करी हिमाचलीं ॥ २ ॥
नद्या सरोवरें, शृंगें तया किती। विविध पशुपक्षी जया ठाईं ॥ ३ ॥
ऐशा प्रदेशांत दीर्घकाल तप। होतां, ते प्रगट गंगा झाली ॥ ४ ॥
हेतु विचारितां कथिलें सर्व तेणें। वदली प्रेमानें गंगा तदा ॥ ५ ॥
नीळकंठाविण वेग सहन करी। ऐसा अवनीवरी दुजा नसे ॥ ६ ॥
स्वर्गांतूनि येतां घेईल तो शिरीं। सफलता तरी तपासी या ॥ ७ ॥
ऐकूनि ते वाणी आराधी शंकरा। इष्ट त्याचि वरा मेळविलें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे तपोबळ श्रेष्ठ। रुचती न कष्ट परी कोणा ॥ ९ ॥

अध्याय १०९ वा २६६

पुण्यप्रद गंगा राया तुझ्यासाठीं। घेईन मस्तकीं शिव म्हणे ॥ १ ॥
ऐसें बोलूनियां सायुध शंकर। घेऊनि पार्षद सिद्ध होई ॥ २ ॥
हिमाचलावरी येऊनि रायासी। म्हणे वा गंगेसी प्रार्थी आतां ॥३॥
शुचिर्भूत नम्र भगीरथ चिंती। पाहोनि शिवासी गंगा आली ॥४॥
पहावया आले गंगावतरण। अंतरिक्षांतून देव, ऋषि ॥ ५ ॥
गगनमेखला येतांचि ते खालीं। मस्तकीं घेतली शंकरानें ॥ ६ ॥
मुक्तामालेसम प्रवाह ते तीन। हंसपंक्तीसम सलिल शुभ्र ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे आवर्त संयुता। मत्स्य, नक्रयुक्ता गंगा वंदूं ॥ ८ ॥

२६७

फेन पटलानें व्याप्त । कोठें वक्र कोठें नीट ॥ १ ॥
कोठें अडखळत जाई । मत्त युवतीसम पाही ॥ २ ॥
कर्णमधुर खळखळाट । मार्ग विचारी रायास ॥ ३ ॥
पितर पडले मरूनि । राव नेई तया स्थानीं ॥ ४ ॥
करूनि भगीरथ कार्य । स्वस्थानासी गेला शिव ॥ ५ ॥
इकडे भगीरथ नृप । आला सागरा सान्निध ॥ ६ ॥
गंगोदकें भरला सिंधु । पुरला नृपाळाचा हेतु ॥ ७ ॥
पितरांचें तर्पण केलें । तेणें पावन ते झाले ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ऐसें । वृत्त कथिलें लोमशें ॥ ९ ॥

अध्याय ११० वा

२६८

पुढती धर्मात्मा नंदा अपरानंदा । स्नानें हेमकूटाचलीं गेला ॥ १ ॥
शिला, मेघ, तेथें संचार करिती । वायूविण, चित्तीं नवल जनां ॥
घोष स्वाध्यायाचा ऐकू येई नित्य । दिसेनाचि विप्र परी कोणी ॥३॥
सायंप्रातर्नित्य अग्नीचें दर्शन । मक्षिकांचें विघ्न तपालागीं ॥ ४ ॥
नको हा संचार ऐसें वाटे मना । स्मरण गृहधना-कामिनीचें ॥ ५ ॥
स्थानाचें त्या वृत्त मुनींसी पुशितां । कथिती वृत्तांता ऐका त्याचि ॥
ऋषभकूट नाम असे या गिरीचें । ऋषभ नांवाचे वसती मुनि ॥७॥
आयुष्य तयांसी अनेक शतकें । एकदा गिरीतें मुनिआज्ञा ॥ ८ ॥
येवोनि या स्थानीं बोलेल जो त्यासी । ताडीं पाषाणेंसी गिरिश्रेष्ठा ॥
वायूसी निःशब्द करी मुनिराव । वंदी वासुदेव चरण त्याचे ॥१०॥

२६९

नंदातीरीं दाटी देवदर्शनासी । भेटूं न इच्छिती देव, जनां ॥ १ ॥
विघ्नास्तव तदा पर्वत निर्मिला । दुर्गम जनांला तपावीण ॥ २ ॥
संयम वाणीचा धर्मराया करीं । दुर्वा दर्भापरी दिसती पहा ॥ ३ ॥
वास्तव्य या स्थानीं अद्यापि देवांचें । पुण्यवंत तैसे वसती मुनि ॥
स्नानोत्तर गेले कौशिकीच्या तीरीं । आश्रम त्या स्थळीं कौशिकाचा ॥

ऋष्यशृंगमुनि वास करी जेथें । कश्यपाश्रमातें पाहीं धर्मा ॥ ६ ॥
शृंगर्षीचें वृत्त पुशितां सांगे मुनि । वासुदेव मनीं हृष्ट होई ॥ ७ ॥

२७०

महाऱ्हदामाजी देवतुल्य ऋषि । आचरी तपासी ' विभांडक ' ॥ १ ॥
स्नानसमयीं तो पाहीं उर्वशी तें । प्रमोहित चित्तें स्खलन पावे ॥
इतुक्यांत येई तृषित हरिणी । उदक प्राशूनि तेंचि जाई ॥ ३ ॥
देवकन्याशापें मृग देह पावे । तिज ब्रह्मदेवें उःशापिलें ॥ ४ ॥
जन्म देतां एका मुनीसी तूं मुक्त । तेंचि आतां सत्य होई दैवें ॥५॥
मृगीसी जाहला विभांडकसुत । मस्तकीं त्या शृंग एक होतें ॥ ६ ॥
तेणें ऋष्यशृंग नामें तो विख्यात । ब्रह्मचर्यरत सर्व काल ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पित्याविण कोणी । पाहिला न वनीं मनुज तेणें ॥८॥

२७१

त्याचवेळीं भ्रष्ट लोमपादराजा । मित्र दशरथाचा अंगाधिप ॥ १ ॥
देईन म्हणूनि विप्रासी नाकारी । ऐसा मिथ्याचारी बहिष्कृत ॥२॥
दोषयुक्तकर्म पुरोहित द्वारा । घडलें त्याचि काळा यदृच्छेनें ॥ ३ ॥
दीर्घकाल तदा होई अनावृष्टि । सर्वजन कष्टी राज्यामाजी ॥ ४ ॥
वृष्टीलागीं राव विनवी विप्रांसी । आण शृंगर्षीसी म्हणती विप्र ॥
स्त्रीनामें पदार्थ नसेचि त्या ठावा । सद्भाव वर्णावा काय त्याचा ॥
राज्यामाजी ऐसा येतांचि तो मुनि । इंद्र संतोषूनि कृपा करी ॥७॥
वासुदेव म्हणे विप्रांचें वचन । नृपाळ ऐकून यत्न करी ॥ ८ ॥

२७२

प्रायश्चित्त घेई विप्रशांतीस्तव । पुढती उपाय योजीतसे ॥ १ ॥
मंत्रज्ञ सचीवां पाचारूनि आणी । उपाय ते ध्यानीं घेई बहु ॥ २ ॥
मंदिरीं आणवी श्रेष्ठ वारांगना । तयांलागीं राणा सांगे कार्य ॥ ३ ॥
ऋष्यशृंगालागीं भुलवोनि आणा । आपुलियां स्थाना कौशल्यानें ॥
अशक्य तें कार्य वाटलें तयांसी । वृद्धा, साधनांसी मागे एक ॥५॥
भोग साधनें तैं लावण्य युवती । घेऊनि सांगाती वृद्धा जाई ॥६॥
वासुदेव म्हणे संतुष्ट रायानें । दिधलीं बहुरत्नें वृद्धेसी त्या ॥ ७ ॥

अध्याय १११ वा

२७३

सिद्ध केला एक रम्य नाव्याश्रम । पुष्पफलाकीर्ण वन तेथें ॥ १ ॥
विभांडक यदा आश्रमीं नसती । वृद्धा जागूनि ती वेळ घेई ॥ २ ॥
युवती वेश्येतें पाठवी आश्रमीं । धूर्ता उपदेशूनि कर्तव्यातें ॥ ३ ॥
सोडोनियां नाव आश्रमासन्निध । भेटे श्रृंगर्षीस कुशल पुशी ॥ ४ ॥
कंद-मूल-फल लाभे कीं विपुल । भेटीसी केवळ आलों तुझ्या ॥५॥
सौख्य पावसी कीं सांगें आश्रमांत । नित्य स्वाध्यायांत रमसी कीं ना ॥
पिता तपस्तेजसंपन्न असेना । ऐशा करी प्रश्नां वेश्या तया ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऋष्यशृंगमुनि । वेश्येसी पाहूनि वदला ऐका ॥ ८ ॥

२७४

मुनिश्रेष्ठा मजलागीं । वंद्य दिसती तूं जगीं ॥ १ ॥
ज्योतिप्रकाशासमान । तेजें प्रकाशलें वन ॥ २ ॥
बैसें कृष्णाजिनावरी । अर्घ्यपाद्य हें स्वीकारीं ॥ ३ ॥
कोण्या ठाईं आश्रम तुझा । आचरीसी कवण्याव्रता ॥ ४ ॥
वेश्या म्हणे शैलापार । माझा आश्रम सुंदर ॥ ५ ॥
पाद्य अभिवादन न घें । ऐसें जाण व्रत माझें ॥ ६ ॥
आलिंगितों तुज कुमारा । मुनि म्हणे फल स्वीकारा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे वेश्या । अर्पी विविध पदार्थां ॥ ८ ॥

२७५

तापसवेषानें युवती क्रीडा करी । हांसे खेळे धरी हृदयीं तया ॥
प्रफुल्लित वृक्ष वांकवोनि पुष्पें । मोहक विक्षेपें तोडीतसे ॥ २ ॥
लाजत लाजत मोहिलें तयासी । विकार चित्तासी उद्भवला ॥३॥
ऐसें पाहूनियां कटाक्ष फेंकिले । दृढ आलिंगिलें वरचेवरी ॥ ४ ॥
अग्निहोत्रमिष करोनियां गेली । व्याकुलता आली मुनीलागीं ॥५॥
मुनि विभांडक येऊनि पाहती । लोमव्याप्त यष्टि पिंगट नेत्र ॥ ६ ॥
म्हणती कां रे वत्सा दोहिलें न दुग्ध । न दिसती मज समिधा कोठें
स्रुक् स्रुवा मार्जन नाहीं कां रे केलें । चिंतामग्न झालें चित्त कैसें ॥८॥
वासुदेव म्हणे पुशिती बाळकासी । कोण या स्थानासी आलें होतें ॥

अध्याय ११२ वा

२७६

बाळ म्हणे जटाधारी। आला एक ब्रह्मचारी ॥ १ ॥
कमलपत्रासम नेत्र। आकर्षक काळे भोर ॥ २ ॥
जटा सुगंधी कुरळ्या। स्वर्णरज्जूनें बांधिल्या ॥ ३ ॥
अलंकार झळकती। वक्षीं कंदुक शोभती ॥ ४ ॥
कृशकटी ते मेखला। वस्त्रामाजी शोभे त्याला ॥ ५ ॥
चरणीं ज्यांचा मंजुळ ध्वनि। ऐसीं भूषणें तीं नामी ॥ ६ ॥
त्याचीं वल्कलेंही रम्य। शब्द कोकिळे समान ॥ ७ ॥
वसंताचें वन जैसी। तैसा तापस तो पाहीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे लुब्ध। मुनि तया अप्सरेस ॥ ९ ॥

२७७

द्विधा जटाभार बांधिला मस्तकीं। दोन्ही कर्ण झांकी कौशल्यानें ॥
विचित्र फळानें ताडितां भूमीसी। पुनरपि हातीं येई त्याच्या ॥२॥
आलिंगुनि मज वदनांसी वदन। लावितां अनन्य हर्ष झाला ॥ ३ ॥
अर्घ्य-पाद्य फळें घेईना हें व्रत। मोहियेलें चित्त ताता तेणें ॥ ४ ॥
सुमधुर फळें अर्पितां मजसी। रस त्वचा त्यांची अपूर्व ते ॥ ५ ॥
अपूर्वचि पेय अर्पिलें तयानें। अल्पावकाशानें भ्रमली भूमि ॥ ६ ॥
कौशेयगुंठिता सुगंधित माला। अर्पूनियां गेला मजलागीं ॥ ७ ॥
अस्वस्थ मी झालों तयाच्या दर्शनें। त्यागूं नये तेणें ऐसें वाटे ॥८॥
तयासंगें त्याचें व्रत आचरावें। ऐसें मनोभावें चिंतीतसें ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे निष्कपट मुनि। आलें जें जें मनीं तेंचि सांगे ॥१०॥

अध्याय ११३ वा

२७८

विभांडक म्हणे बाळा ऋष्यशृंगा। तपस्येच्या मार्गी विघ्नें बहु ॥ १ ॥
विविधरूपें दैत्य हिंडती आश्रमीं। पाहती न मुनि वदन त्यांचें ॥
पापासक्ति वाढे मोहक पेयांनीं। विलासाची मनीं न धरीं इच्छा ॥
ऐसें बोलूनियां शोधी त्या स्त्रियेसी। दिनत्रय ऋषि परी व्यर्थ ॥४॥
पुढती नित्यकर्मा गेला विभांडक। वेश्या अकस्मात् येई तेथें ॥ ५॥

पाहोनि तयासी हृष्ट झाला बाळ । बोलला सत्वर जाऊं आतां ॥
जोंवरीं न पिता पातला या स्थानीं । तोंवरीं आश्रमीं जाऊं तुझ्या ॥
संतोषूनि वेश्या नेई कौशल्यानें । वासुदेव प्रेमें गाई कथा ॥ ८ ॥

२७९

नृपाळाच्या अंतःपुरीं । जातां, पर्जन्याच्या सरी ॥ १ ॥
झालें सर्वत्र उदक । दूर झालें जनदुःख ॥ २ ॥
लोमपाद संतोषला । कन्या शांता अर्पी त्याला ॥ ३ ॥
विभांडक संतोषार्थ । नृप ठेवी मार्गीं घोष ॥ ४ ॥
कृषिकर्म आरंभिती । सन्मानार्थ सज्ज होती ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसी । झाली सिद्धता रायाची ॥ ६ ॥

२८०

आश्रमांत येतां मुनि । न दिसे बालक त्या स्थानीं ॥ १ ॥
क्रुद्ध होऊनि अंतरीं । जाई नृपाच्या नगरीं ॥ २ ॥
जागोजागीं क्षुधित, श्रांत । पाहे समृध्द घोषांस ॥ ३ ॥
भृत्य कोणाचे पुशितां । म्हणती सेवितों तव सुता ॥ ४ ॥
ऐकूनि ते मधुरवाणी । तोष पावला तो मुनि ॥ ५ ॥
नगरीं सत्कार जाहला । स्नुषा पुत्रही देखिला ॥ ६ ॥
म्हणे पुत्रालागीं मुनि । पुत्र होतां येई वनीं ॥ ७ ॥
हृष्ट होवोनि तापसी । गेला आनंदें वनासी ॥ ८ ॥
ऋष्यशृंगालागीं तोष । राही श्वशुरगृहास ॥ ९ ॥
जैसी रोहिणी चंद्रासी । अरुंधती वसिष्ठासी ॥ १० ॥
अगस्तीसी लोपामुद्रा । शचि शोभते जै इंद्रा ॥ ११ ॥
नळालागीं दमयंती । तैसी शांता शृंगर्षीसी ॥ १२ ॥
तया मुनीचें हें स्थान । धर्मा करीं एथें स्नान ॥ १३ ॥
मुनि लोमश कथिती । वासुदेव तयां वंदी ॥ १४ ॥

अध्याय ११४ वा

२८१

कौशिकेचें स्नान केलें । गंगासागरासी आले ॥ १ ॥

पुढती कलिंग देशासी । येती वैतरणी तीरासी ॥ २ ॥
प्रख्यात ते यज्ञभूमि । रुद्र स्तविला देवांनीं ॥ ३ ॥
स्नान तर्पणहि केलें । निर्विषय मन झालें ॥ ४ ॥
दिसती सकल लोक मज । कथन करी धर्मराज ॥ ५ ॥
वैखानस जपध्वनि । येई म्हणे माझ्या कानीं ॥ ६ ॥
लक्ष त्रय योजनींचा । कथिती मुनि ध्वनि साचा ॥ ७ ॥
आतां राहें राजा स्वस्थ । स्वयंभूचा हा प्रदेश ॥ ८ ॥
विश्वकर्मा करी यज्ञ । कश्यपासी भुमिदान ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे भूमि । पाहूनि तें खिन्न मनीं ॥ १० ॥

२८२

योग्य नव्हे माझें दान मानवासी । रसातळामाजी बुडूनि जाई ॥१॥
कश्यपें प्रार्थितां वेदीरूपें आली । वेदीवरी करीं आरोहण ॥ २ ॥
दुस्तर हा भव तेणें तरसील । मंत्र हा तारील सिंधूमाजी ॥ ३ ॥
स्पर्शितां वेदीसी सागरीं ते जाई । धर्मा तया ठाईं जाईं सुखें ॥ ४ ॥
रक्षणार्थ तुझ्या करितों स्वस्त्ययन । मुनीचें वचन धर्म पाळी ॥५॥
सागराचें स्नान घडलें धर्मासी । महेंद्र गिरीसी पुढती गेला ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे लोमश-आज्ञेनें । करी तीर्थस्नानें धर्मराज ॥ ७ ॥

अध्याय ११५ वा

२८३

अंगिरस तैंवी कश्यप वसिष्ठ । सत्कारी त्यां श्रेष्ठ धर्मराज ॥ १ ॥
अकृतव्रण तो रामाचा अनुचर । विनवी युधिष्ठिर तयालागीं ॥ २ ॥
परशुरामालागीं भेटावें हे इच्छा । भेटेल तापसां कदा सांगें ॥ ३ ॥
येरु म्हणे राया जाणिलें तयानें । भेटेल प्रेमानें तुजलागीं ॥ ४ ॥
अष्टमी ते तिथि अथवा चतुर्दशी । सहज इच्छापूर्ति तेणें तुझी ॥५॥
भार्गवाचें वृत्त कथीं म्हणे राव । क्षत्रियसंहार कैंवी झाला ॥ ६ ॥
येरु म्हणे राजा कार्तवीर्य जाण । अर्पी त्या विमान दत्तात्रय ॥ ७ ॥
अकुंठित गति तया विमानाची । पीडा सकलांसी देई राजा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे प्रार्थिती अमर । दुष्टांचा संहार करीं देवा ॥ ९ ॥

२८४

विष्णुसवें झाला संकेत इंद्राचा । दुष्ट विनाशाचा, ऐशा रीति ॥१॥
कान्यकुब्ज देशीं गाधीनामें नृप । स्वीकारी वनास तपालागीं ॥ २ ॥
कन्या रूपवती जाहली त्या स्थानीं । ऋचीक मागणी करिता झाला ॥
गाधी म्हणे तया अश्व दश शत । शामकर्ण देख शुल्क द्यावे ॥ ४ ॥
ऐसा कुलाचार कैसा पूर्ण होई । इच्छितों मी पाहीं कन्यादान ॥५॥
मुनि म्हणे हेतु पूर्ण होतां तुझे । पुरवीं तूं माझें वचन राया ॥ ६ ॥
ऐसें बोलूनियां वरुणासन्निध । जाऊनि ऋचीक वृत्त सांगे ॥ ७ ॥
ऐकूनि तत्काळ हेतु पूर्ण करी । वरुण त्या वेळीं ऋचीकाचे ॥ ८ ॥
गंगेतूनि अश्व कान्यकुब्ज देशीं । आले त्या स्थानासी 'अश्वतीर्थ' ॥
वरपक्षें येती देवही त्या स्थानीं । आदरें सन्मानी गाधी तयां ॥
कन्या सत्यवती अर्पिली मुनीतें । गाई त्या कथेतें वासुदेव ॥ ११ ॥

२८५

भृगु ऋचीकाचा पिता । ऐके विवाहाची वार्ता ॥ १ ॥
पाहूं स्नुषा आणि सुत । आला धरूनियां हेत ॥ २ ॥
करितां वंदन तयासी । हर्षे बोलला स्नुषेसी ॥ ३ ॥
मागसील हे सुभगे । तेंचि देइन वर मागें ॥ ४ ॥
मातेसह मजसी सुतां । देईं ऐसें मागे स्नुषा ॥ ५ ॥
भृगु म्हणे वो तथास्तु । पुरवीन तुझा हेतु ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मार्ग । दावी मुनि सत्पुत्रार्थ ॥ ७ ॥

२८६

होऊनियां ऋतुस्नात । माता आलिंगी अश्वत्थ ॥ १ ॥
आलिंगीं तूं औदुंबरा । चरु भक्षण हें करा ॥ २ ॥
विराट् पुरुषाच्या ध्यानें । अर्पितों हे चरु जाणें ॥ ३ ॥
दक्षपणें साधा कार्य । म्हणूनि गुप्त झाला आर्य ॥ ४ ॥
सत्यवतीनें ही मात । केली मातेसी विदित ॥ ५ ॥
वृक्ष, चरु विपर्यय । मोहें करीतसे माय ॥ ६ ॥
दीर्घकाल ऐसा जातां । कळलें भृगूचिया चित्ता ॥
वासुदेव म्हणे मुनि । आले पुनरपि त्या स्थानीं

२८७

वदती स्नुषेलागीं मुनि। ऐकें ऐकें वो कल्याणि ॥ १ ॥
ऐसी कैसी तुझी माता। जाहलीसी तूं वंचिता ॥ २ ॥
वृक्ष, चरु, विपरीत। उलटें घडलेंसे कृत्य ॥ ३ ॥
क्षत्रवृत्ति विप्रसुत। क्षत्रिय तो ब्राह्मणवृत्त ॥ ४ ॥
पुत्र होतील वो ऐसे। स्नुषा मुनीसी विनविते ॥ ५ ॥
नको नको ऐसा पुत्र। होवो ऐसा माझा पौत्र ॥ ६ ॥
तथास्तु तें म्हणती मुनि। पुत्र होई जमदग्नि ॥ ७ ॥
त्याची सूर्यासम कांति। सकल शास्त्रीं सहज गति ॥ ८ ॥
मागें टाकिलें सकळां। वेदविद्या ऐसी त्याला ॥ ९ ॥
सहज अस्त्रें चतुर्विध। जाणे पूर्ण धनुर्वेद ॥ १० ॥
वासुदेव म्हणे मुनि–। प्रसादाची हे करणी ॥ ११ ॥

अध्याय ११६ वा

२८८

तीव्र तप करी वेदाध्ययनरत। वेद घेई वश करूनियां ॥ १ ॥
जमदग्नि ऐसा प्रसेनजितासी। मागणी कन्येची करीतसे ॥ २ ॥
रेणुका तयाची कन्या गुणवती। अर्पिली मुनीसी नृपाळानें ॥ ३ ॥
अनुव्रता कांता घेवोनि आश्रमीं। राहिला येवोनि पुण्यवंत ॥ ४ ॥
पुनरपि तप आचरी त्या ठायां। रेणुका, तनयां प्रसवे तदा ॥ ५ ॥
रुमण्वान्, तैसा सुषेण, तो वसु। तेंवी विश्वावसु, परशुराम ॥ ६ ॥
वयानें कनिष्ठ परी गुणश्रेष्ठ। विक्रमें विख्यात जनीं झाला ॥ ७ ॥
जगदोद्धारक परशुराम देव। वंदी वासुदेव तया भावें ॥ ८ ॥

२८९

आणावया कंद-मुळें। मुनि वनामाजी गेले ॥ १ ॥
ऐशा समयीं एकदां। गेली स्नानासी रेणुका ॥ २ ॥
यदृच्छेनें चित्ररथ। दिसला तियेलागीं नृप ॥ ३ ॥
लेवूनियां कमलमाला। जलक्रीडेंत रंगला ॥ ४ ॥
पाहूनियां भाग्यवंता। मोह पावली रेणुका ॥ ५ ॥
निज आश्रमासी आली। मुनिरायानें पाहिली ॥ ६ ॥

ब्राह्मीकांतिहीन दिसे । कळलें सकल ज्ञात्यातें ॥ ७ ॥
क्रोधें धिक्कारी तियेसी । पाही इतुक्यांत तनयांसी ॥ ८ ॥
म्हणे वधा या दुष्टेला । स्नेह मातेचा सुतांला ॥ ९ ॥
मूक पाहोनि त्यां क्रुद्ध । जड केलें देउनि शाप ॥ १० ॥
वासुदेव म्हणे राम । सहज आला वनांतून ॥ ११ ॥

२९०

मुनि म्हणे रामा पापिणीचा वध । करीं, मनीं खेद धरूं नको ॥१॥
पितृआज्ञा होतां तत्काळ रामानें । आपुल्या परशूनें कार्य केलें ॥
साहस पाहोनि मुनि झाला शांत । जें जें त्वन्मनांत माग म्हणे ॥३॥
पुनरुज्जीवन, वधाची विस्मृति । होवो दोषमुक्ति मागे राम ॥४॥
पूर्वस्मृति लाभो सकल भ्रात्यांसी । प्रतियोद्धा मजसी नसो म्हणे ॥
दीर्घायुष्य तेंवी मागूनियां घेई । सकल तें देई पिता तया ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे लाभ, मृत्यु, हानि । दैवाची करणी अटळ जगीं ॥

२९१

मदोन्मत्त कार्तवीर्य आश्रमासी आला ॥
पुत्र एकही त्या स्थानीं नव्हता त्या काळा ॥ १ ॥
आदर सत्कार करी रेणुका तयाचा ॥
उन्मत्त नृपाळ करी अव्हेर सर्वांचा ॥ २ ॥
विध्वंस करूनि जाई वत्सासी घेवोनि ॥
हंबारत्या धेनूलागीं ताडन करूनि ॥ ३ ॥
छिन्न भिन्न वृक्षलता करोनियां दुष्ट ॥
क्रीडा ते मानोनि राही मंदिरांत स्वस्थ ॥ ४ ॥
अल्पकाळ ऐसा जातां, आश्रमासि राम ॥
येतांचि निवेदी पिता सर्व वर्तमान ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे धेनुहंबरडा कानीं ॥
येतांचि खवळे जैसा महा व्याळ रानीं ॥ ६ ॥

२९२

दिव्य धनुष्य घेवोनि । धांव घेई चवताळूनि ॥ १ ॥
मृत्युवश कार्तवीर्य । युद्ध करी घनघोर ॥ २ ॥

केलें हैराण रामानें । दिव्य प्रखर शरसंधानें ॥ ३ ॥
कर छेदिले सहस्र । परिघासम जे अजस्र ॥ ४ ॥
अंतीं दुष्ट मरूनि गेला । राम आश्रमासी आला ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सुत । कार्तवीर्याचे तें क्रुद्ध ॥ ६ ॥

२९३

राम नसतां ते आश्रमीं । येऊनि रमले घोरकर्मी ॥ १ ॥
जमदग्नीसी घेरिलें । शस्त्राघात तया केले ॥ २ ॥
शमयुक्त महामुनि । प्रतिकार नये स्वप्नीं ॥ ३ ॥
मग अनाथासमान । हांका मारी राम, राम ॥ ४ ॥
ऐसा आक्रोश मांडिला । क्रूर ताडिती तयाला ॥ ५ ॥
अंतीं करूनियां वध । धरिला क्रूरांनीं त्या मार्ग ॥ ६ ॥
आश्रमांत येतां राम । दुःख मांडिलें दारुण ॥ ७ ॥
पूज्य तपस्वी तो पिता । वासुदेव जोडी हातां ॥ ८ ॥

अध्याय ११७ वा

२९४

वनमृगासम कैसा । घात केला तपस्व्याचा ॥ १ ॥
व्रत जयासी अहिंसा । ताता घात तुझा कैसा ॥ २ ॥
काय तयांचा पुरुषार्थ । वधितां एकाकी धार्मिक ॥ ३ ॥
ऐसा परम दुःखी आर्य । अवघें करी प्रेतकार्य ॥ ४ ॥
केली अघटित प्रतिज्ञा । करिन पृथ्वी क्षत्रियहीना ॥ ५ ॥
ऐसें एकविंशति वार । करूनि भरिले ऱ्हद थोर ॥ ६ ॥
तया समंतपंचकीं । केली पितरांची तृप्ति ॥ ७ ॥
पुढती ऋचीक निवारी । राम एक यज्ञ करी ॥ ८ ॥
कश्यपासी भूमिदान । जेथ, तें हें खांडवायन ॥ ९ ॥
अंतीं महेंद्रीं राहिला । धर्म घेई दर्शनाला ॥ १० ॥
वासुदेव म्हणे धर्म । पुढती पाही दिक् दक्षिण ॥ ११ ॥

अध्याय ११८ वा

२९५

सागरतीरासी तीर्थाटन करी । प्रशस्तेच्या तीरीं स्नान केलें ॥ १ ॥
गोदेच्या तटाकीं करूनियां स्नान । सागरीं जाऊन मोद पावे ॥ २ ॥

नारीतीर्थें पांच पाहोनियां धाला। पार्थ विक्रमाला ऐकूनियां ॥ ३ ॥
शापमुक्त केल्या मकरी पार्थानें। वृत्त लोमशानें कथिलें तेंचि ॥४॥
शूर्पारक क्षेत्रीं परशुरामवेदी। पाहोनियां जाती सिंधूतीरीं ॥ ५ ॥
त्याचमार्गी जाई प्रभास तीर्थासी। आचरी तपासी द्वादश दिन ॥
केवळ उदक सेवी ऐसी वार्ता। कृष्ण बळिभद्रां कळतां दुःख ॥७॥
उभयतां आले धर्माच्या भेटीसी। यादव सांगाती सैन्यासवें ॥ ८ ॥
सभोंवतीं सर्व वैसोनि धर्मासी। वृत्तांत पुशिती प्रेमभरें ॥ ९ ॥
अर्जुनाचें वृत्त ऐकूनि तोपले। वनवासी पाहिले सकल कृश ॥१०॥
वासुदेव म्हणे दुर्बळ पांचाळी। पाहोनि वनमाळी खेद करी ॥ ११ ॥

अध्याय ११९ वा

२९६

गौरवर्ण जैवी दुग्धचि धेनूचें। कुंद पुष्प साचें अथवा चंद्र ॥ १ ॥
मृणालचि किंवा तैसा बळिराम। कमलनयन हरिसी म्हणे ॥ २ ॥
श्रद्धायुक्तधर्मे अभ्युदय होई। पराभव पाही अधर्मेसी ॥ ३ ॥
ऐसें कैसें म्हणूं पाहूनि धर्मासी। सत्कर्मे वनवासी युधिष्ठिर ॥ ४ ॥
दुरात्मा तो राज्य भोगितो पृथ्वीचें। शासन तयातें न घडे कांहीं ॥
ऐसें हें पाहोनि अल्पबुद्धि नर। अधर्मचि थोर मानितील ॥ ६ ॥
साशंकित जन अवघेचि झाले। पुण्यवंत गेले वनीं जेव्हां ॥ ७ ॥
शास्त्र म्हणे, धर्म श्रेष्ठचि जाणावा। येई अनुभवा विपरीतचि ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे बळिभद्रवीर। यापरी विचार सांगे बहु ॥ ९ ॥

२९७

धर्महीनाचा उत्कर्प। तरी धर्मालागीं क्लेश ॥ १ ॥
त्यागील तो राज्यसुख। परी नित्य धर्मरत ॥ २ ॥
भीष्मद्रोणांसवें अंध। कैसें भोगीतसे राज्य ॥ ३ ॥
काय कथील पितरां। करूनि निष्पापापहारा ॥ ४ ॥
आलें अंधत्व कृतकर्मे। काय मिळवी या अधर्मे ॥ ५ ॥
मृत्यु अकालीं या योगें। भीष्म-द्रोणां यांच्या संगें ॥ ६ ॥
स्मरूनि ऐशा या यातना। सकलां वधील भीमराणा ॥ ७ ॥
राजसूय यज्ञामाजी। एकेक जो दिशा जिंकी ॥ ८ ॥

त्यांच्या छळें ही अवनी । कैंवी जाईना भंगूनि ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे राम । दुःखें होतसे अद्विग्न ॥ १० ॥

अध्याय १२० वा २९८

म्हणे सात्यकी हलधरा । कार्यारंभ आतां करा ॥ १ ॥
कार्य थोरांचें सकळ । करिती त्यांचे शिष्य, पुत्र ॥ २ ॥
दक्ष ज्याचे साह्यकर्ते । भोगीना तो क्लेश ऐसे ॥ ३ ॥
कृष्ण बळिराम दोघे । विश्व जिंकिती अवघें ॥ ४ ॥
याचि क्षणीं दुर्योधना । जिंकूं राज्य अर्पूं धर्मा ॥ ५ ॥
ऐसें बोलूनि सात्यकी । एकेकाचीं कामें वांटी ॥ ६ ॥
संहारीन मी कौरवां । राजा अभिमन्यू व्हावा ॥ ७ ॥
होतां प्रतिज्ञा ते पूर्ण । स्वीकारील राज्य धर्म ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ऐसें । भाषण त्या सात्यकीचें ॥ ९ ॥

२९९

ऐकूनि ते वाणी बोलला मुकुंद । बाबा धर्मराज ऐसा नव्हे ॥ १ ॥
भीति, लोभ किंवा अन्यही कामना-। धरूनि स्वधर्मा न सोडी तो ॥
योग्यवेळीं शूर बांधव ते सर्व । हरितील गर्व कौरवांचा ॥ ३ ॥
तैसेंचि केकय, चेदिपति, आम्हीं । संहारूं संग्रामीं सकल शत्रु ॥४॥
धर्म म्हणे देवा योग्य तुझी वाणी । ओळखितों आम्हीं परस्परां ॥५॥
शिनिश्रेष्ठा, संधि येतां शौर्य दावीं । जा आतां स्वस्थळीं सुखें वसा ॥
स्वधर्मतत्पर असावें सर्वदा । न करावें प्रमादा धर्म म्हणे ॥ ७ ॥
भेटूं पुनरपि ऐसें बोलूनियां । पुढती निजकार्या वीर जाती ॥ ८ ॥
पयोष्णीच्या तीरीं धर्मासी स्तविती । विप्र, पुढती कथी वासुदेव ॥

अध्याय १२१ वा ३००

पूर्वी या स्थानासी बहुतीं यज्ञ केले । नृग, गय, झाले ख्यात जनीं ॥
याला वर्णनीं तें पूर्वी कथियेलें । नर्मदेसी आले धर्मादिक ॥ २ ॥
पुढती पाहिलें शर्यातीचें स्थान । केलें सोमपान कुमारांनीं ॥ ३ ॥
स्तंभित करोनि इंद्रासी च्यवनें । सुकन्या लाभानें हृष्ट झाला ॥४॥
धर्म म्हणे कैसें च्यवनाचें वृत्त । म्हणे द्यावें चित्त वासुदेव ॥ ५ ॥

अध्याय १२२ वा

३०१

सुपुत्र च्यवन भृगूलागीं होता । लोमश ते पार्था म्हणती ऐकें ॥१॥
पुण्यतीर्थावरी आचरिलें तप । स्थाणूसम देख बैसे मुनि ॥ २ ॥
लोटूनियां जातां ऐसा दीर्घकाल । वाढलें वारुळ तयावरी ॥ ३ ॥
लता, पिपीलिका व्यापिती तयासी । बैसला तपासी महाधीर ॥४॥
पुढती एके वेळीं नरेंद्र शर्याती । जल विहारार्थी वनीं आला ॥५॥
चार सहस्र त्या स्त्रिया नृपाळासी । सुकन्या तयासी कन्या एक ॥
सखीजनांसवें राजनंदिनी ते । काननीं झळके सौंदर्यानें ॥ ७ ॥
मदन-मदानें तप्त होऊनियां । हिंडे तया ठाया स्वैरपणें ॥ ८ ॥
वृक्ष-वल्लरींसी देखतां देखतां । एकाकिनी सुता हिंडूं लागे ॥ ९ ॥
एक वस्त्र भरा विद्युल्लता वनीं । पाहूनियां मुनि मोह पावे ॥ १० ॥
क्षीणस्वरें मारी हांक तो तियेसी । नाहीं कर्णपथीं गेलें तिच्या ॥
वासुदेव म्हणे रमणीय तें वृत्त । ऐकूनियां चित्त हर्ष पावे ॥ १२ ॥

३०२

काय वाई तरी ऐसें वारुळीं चकाके ॥
मोह पाहूनियां कन्या तया स्थळीं वांके ॥ १ ॥
शलाका घेवोनि हातीं टोंची तया स्थानीं ॥
नेत्र भार्गवाचे फोडी हाय हाय दोन्ही ॥ २ ॥
क्रुद्ध होऊनियां मुनि देई तदा शाप ॥
रुद्ध सर्व सैनिकांचा करी मलमार्ग ॥ ३ ॥
अवरोध होतां दुःखें व्याकुळ ती सेना ॥
क्लेश पाहूनि शर्याती बोले सर्वजनां ॥ ४ ॥
तपोनिष्ठ भार्गवाचा अवमान कोणीं ॥
केला काय सांगा त्वरें हिंडतां काननीं ॥ ५ ॥
मान्य करीनाचि कोणीं ऐसें पाहूनियां ॥
राव शोध घेई सौम्य योजूनि उपाया ॥ ६ ॥

वासुदेव म्हणे कन्या पाहूनि ते क्लेश ॥
वंदूनि विनम्र भावें बोलली पित्यास ॥ ७ ॥

३०३

सरोवराच्या तटाकीं । देखियेलें वल्मीकासी ॥ १ ॥
तेथें कांहीं चमकलें । कंटकानें त्या वेधिलें ॥ २ ॥
वचन ऐकूनि शर्याती । त्वरित तया स्थळाप्रति ॥ ३ ॥
जाऊनियां मुनीलागीं । नम्रपणें हात जोडी ॥ ४ ॥
म्हणे अपराध क्षमावा । जाणूनियां बालभावा ॥ ५ ॥
मुनि म्हणे तिरस्कारें । मजलागीं विद्ध केलें ॥ ६ ॥
रूपयौवनसंपन्ना । मजलागीं अर्पी कन्या ॥ ७ ॥
क्षमा होईल बा तरी । सत्य सत्य ही वैखरी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे मुनि । कठोर ती बोले वाणी ॥ ९ ॥

३०४

महर्षिवचन ऐकोनि शर्याती । न चिंतितां चित्तीं क्षणही कांहीं ॥ १ ॥
च्यवनासी अर्पी आपुली ते कन्या । जाहली सुकन्या ऋषिपत्नी ॥
प्रसन्न होऊनि उःशाप दिधला । हर्षें नगराला सैन्य जाई ॥ ३ ॥
निष्पाप सुकन्या संतुष्ट मनानें । परिचर्या प्रेमें पतिची करी ॥ ४ ॥
अग्नि अतिथींची सेवा करूनियां । साध्वी मुनिराया तोष देई ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे आश्रमांत सती । देव मानी पति सर्व काळ ॥ ६ ॥

अध्याय १२३ वा ३०५

आश्रमीं सुकन्या पाळी सदाचार । अश्विनीकुमार प्राप्त झाले ॥ १ ॥
तीर्थावरी कन्या स्नानकार्जी मग्न । असतां ते नग्न दिसली तयां ॥
येवोनि पुढती पुशिती वृत्तांत । कोणाची तूं एथ कोण सांगें ॥ ३ ॥
लज्जित सुकन्या वदली तयांसी । कन्या शर्यातीची, च्यवनभार्या ॥
ऐकूनि कुमार हांसूनि बोलले । वृध्दासी अर्पिलें कैसी तुज ॥ ५ ॥
सौदामिनीसम चमकसी वनीं । नाहीं त्रिभुवनीं रूप ऐसें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अश्विनीकुमार । वर्णिती सौंदर्य सुकन्येचें ॥ ७ ॥

३०६

अंगावरी नसे धड वस्त्र तेंही । भूषण एकही न दिसे रम्य ॥ १ ॥
अलंकारें भद्रे सौंदर्य खुलेल । तुजसी वल्कल अयोग्यचि ॥ २ ॥
जराजर्जर हा रूपहीन पति । कां यातें सेविसी शुचिस्मिते ॥ ३ ॥
रक्षण, पोषणा दुर्बल सर्वथा । त्यागाचि पतीचा ऐसा योग्य ॥ ४ ॥
आम्हां एकालागीं पतीत्वें स्वीकारीं । सार्थक या करीं यौवनाचें ॥
सर्वथा मी रत मुनीसी ते म्हणे । ऐसी शंका घेणें उचित नव्हे ॥
वासुदेव म्हणे निक्षूनि ते सती । सांगे देवांप्रति ऐशापरी ॥ ७ ॥

३०७

म्हणती अश्विनीकुमार । जाणें आम्हासी साचार ॥ १ ॥
देव असों आम्ही वैद्य । अर्पू लावण्य त्या सद्य ॥ २ ॥
करूं यौवनसंपन्न । निवडीं एका तिघांतून ॥ ३ ॥
कळवीं पतीसी हे वाणी । जाई एथें तया आणीं ॥ ४ ॥
ऐकूनियां ऐसे बोल । जाई आश्रमीं सत्वर ॥ ५ ॥
कथी वृत्तांत पतीसी । लाभे तयाची संमती ॥ ६ ॥
म्हणे वासुदेव सती । येई घेऊनियां पति ॥ ७ ॥

३०८

पति अनुमोदन निवेदी देवांसी । म्हणती ते उदकीं प्रवेशो तो ॥१॥
ऐकूनि च्यवन तीर्थांत प्रवेशे । कुमारही तैसे उदकीं गेले ॥ २ ॥
दोन घटी मग्न जळांत होऊनि । ठाकले येऊनि पुढती उभे ॥ ३ ॥
रूप, वेष, तेज, समान भूषणें । एकाचि धोरणें वदती सर्व ॥ ४ ॥
आम्हांमाजी कोणा एकासी तूं वरीं । कल्याणी सत्वरी त्यजूनि भय ॥
वासुदेव म्हणे सुकन्या दैवाची । विचारी मनासी क्षण एक ॥ ६ ॥

३०९

तुल्यरूपधारी पाहूनि तिघांसी । निश्चय मनासी ठरवी सती ॥१॥
निश्चित बुद्धीनें च्यवनासी वरी । तोषला अंतरीं तपोधन ॥ २ ॥
वदला अश्विनीनंदनांसी मुनि । यौवनाचा धनि केलें मज ॥ ३ ॥
कृपेनें तुमच्या लाभलें हें रत्न । तुम्हां सोमपान करवीन मी ॥ ४ ॥

वचनें मुनींच्या देव हृष्ट झाले । स्वस्थानासी गेले आनंदानें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सुकन्या च्यवन । वसती देवांसम परम हर्षे ॥ ६ ॥

अध्याय १२४ वा ३१०

शर्यातीसी वृत्त कळे । वृद्धा तारुण्य लाभलें ॥ १ ॥
देवतुल्य झाला मुनि । कन्या आनंदली मनीं ॥ २ ॥
ऐकूनियां राव धाला । च्यवन आश्रमासी आला ॥ ३ ॥
मोद न समावे गगनीं । सुखी उभयांसी पाहोनि ॥ ४ ॥
सन्मानूनि गोष्टी करी । नृपाळासी व्रतधारी ॥ ५ ॥
म्हणे सिद्ध होईं राया । यज्ञ तुझ्या हातें व्हावा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे नृप । मनीं मानी बहु सुख ॥ ७॥

३११

मान्य करूनियां जामातृवचन । मंडप विस्तीर्ण उभारिला ॥ १ ॥
मुहूर्त पाहोनि आरंभिला यज्ञ । महात्मा च्यवन प्रमुख तदा ॥ २ ॥
कुमारांच्या नांवें सोमपात्र घेतां । निवारी मघवा तयालागीं ॥ ३ ॥
देव वैद्यांलागीं अधिकार नसे । निश्चयें मुनीतें सांगे इंद्र ॥ ४ ॥
चर्चा होतां अंतीं कोपला देवेंद्र । ताडीन हें वज्र मुनिला म्हणे ॥५॥
हांसूनियां मुनि उचली सोमपात्र । उगारिलें वज्र इंद्रें तदा ॥ ६ ॥
देवेंद्राचा कर करोनि स्तंभित । निर्मीतसे एक कृत्या मुनि ॥ ७ ॥
मद नामें दैत्य प्रचंड तो होता । अमर्याद त्याचा देह जाणा ॥ ८ ॥
भूमीवरी हनु ओष्ठ अंतराळीं । बाहु जैसे गिरि पुष्ट तैवीं ॥ ९ ॥
कालाग्नीमसमान वदन तयाचें । पाहोनि इंद्रातें चाटी जिव्हा ॥१०॥
उग्र दृष्टि क्रूर इंद्रावरी धांवे । मुनिराय पावे वासुदेवा ॥ ११ ॥

अध्याय १२५ वा ३१२

स्तंभित बाहूतो देवेंद्र घावरा । पात्रता कुमारां येवो म्हणे ॥ १ ॥
भार्गवा प्रसन्न होईं मजवरी । सत्यचि वैखरी होवो तुझी ॥ २ ॥
वाढो तुझें यश धरोनि हे इच्छा । आणिलें प्रकाशा तपोबळ ॥ ३ ॥
कृपा करीं, होवो इच्छेसम तुझ्या । वचनें इंद्राच्या शमला क्रोध ॥४॥

मुक्त करोनियां शक्रासी क्षणांत । जनांमाजी मद विभागिला ॥ ५ ॥
दैत्य, स्त्रिया, द्यूत, मद्यपि, मृगया, । स्थानें वांटूनियां तया देई ॥६॥
ऐसीं हीं व्यसनें त्याज्य होती जनीं । इंद्र सोमपानीं रमला सुखें ॥७॥
हेतु पूर्ण ऐसा करूनि तपस्वी । गेला आश्रमासी कांतेसह ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ऐशा रम्यस्थळीं । धर्म स्नान करी सद्भावानें ॥ ९ ॥

३१३

सिकताक्ष तीर्थ सैंधव अरण्य । कुल्[१]यावलोकन करीं तेथें ॥ १ ॥
शंकरस्मरण पुष्करासी होतां । न करील बाधा कलिकाल ॥ २ ॥
आर्चीकपर्वत चंद्रमसतीर्थ । वाराणसी क्षेत्र प्रयाग तें ॥३ ॥
प्रस्रवण तेंवी पहा ही यमुना । मांधाता या स्थाना यज्ञ करी ॥ ४ ॥
यमुनेच्या स्नानें पापभय जाई । सोमकें या ठाईं यज्ञ केला ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे युवनाश्वसुत । मांधात्याचें वृत्त परिसा आतां ॥ ६ ॥

अध्याय १२६ वा

३१४

इक्ष्वाकुकुळांत युवनाश्व राजा । सहस्र अश्वमेधां आचरी तो १ ॥
संतानार्थ तप खडतर झालें । वास्तव्यचि केलें वनामाजी ॥ २ ॥
क्षुधा-तृषाव्याप्त एकदां नृपति । भृगु आश्रमासी प्राप्त झाला ॥ ३ ॥
त्याच दिनीं त्याच्या पुत्रप्राप्तीसाठीं । आश्रमीं त्या इष्टि घडली होती
भृगुनंदनानें जल मंत्रपूत । अर्पाया राणीस ठेवीयेलें ॥ ५ ॥
राणीनें प्राशितां पावन तें तीर्थ । इंद्रतुल्य सुत व्हावा तिज ॥ ६ ॥
ऐशा संकल्पानें ठेवियेलें तीर्थ । झाले निद्रावश श्रांत मुनि ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे दैव बलवंत । राव आश्रमांत प्राप्त झाला ॥ ८ ॥

३१५

शुष्ककंठ तो जलार्थ । करी याचना मुनींस ॥ १ ॥
परी नायकेची कोणी । कुंभ पाहिला दुरोनि ॥ २ ॥
गेला तृषार्त सन्निध । रिक्त केला सकल घट ॥ ३ ॥
तपस्येचें लाभे फळ । तृप्त जाहला नृपाळ ॥ ४ ॥
मुनि होऊनि जागृत । पाहती तों रिक्त घट ॥ ५ ॥

---

१ कालवे–पाट.

पुशितां कथी युवनाश्व । प्यालों उदक मी तृषार्त ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मुनि । झाले खिन्न तें ऐकोनि ॥ ७ ॥

३१६

मुनि म्हणे राया घडलें अयुक्त । वेंचियेलें तप तुझ्यासाठीं ॥ १ ॥
इंद्रासम बळी लाभावा सुपुत्र । ऐसे महामंत्र अभिमंत्रिले ॥ २ ॥
दैवलीला भासे विचित्र मजला । विफल या जला कोण करी ॥ ३ ॥
राहील नृपाळा तुजलाचि गर्भ । तैसाचि संकल्प करितों आतां ॥४॥
गर्भधारणेचे क्लेश न घडती । नृपा ऐसी इष्टि करूं सुखें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे राजा गरोदर । विश्वांत नवल थोर झालें ॥ ६ ॥

३१७

शत संवत्सर लोटतां पुढती । भग्न सव्य कुक्षि नृपाळाची ॥ १ ॥
जन्म पावे एक सूर्यासम बाळ । सुखरूप नृपाळ आश्चर्य हें ॥ २ ॥
बाळ पहावया सकल देव येती । दुग्ध या म्हणती कैसें लाभे ॥३॥
इंद्र म्हणे मातें प्राशील हा सुत । तर्जनी मुखांत स्वयें घाली ॥ ४ ॥
'मां धाता' बोलतां इंद्र, तेंचि नाम । विबुधांसी मान्य होई तदा ॥५॥
तर्जनी प्राशितां त्रयोदश विती । वाढतांचि कल्पी पुढती इंद्र ॥ ६ ॥
तत्काळचि तेणें धनुर्वेद ज्ञाता । दिव्य अस्त्रवेत्ता झाला बाळ ॥ ७ ॥
'अजागव' धनु अभेद्य कवच । लाभले तयास सहज बाण ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ऐसा तो मांधाता । झाला महायोद्धा दैवयोगें ॥ ९ ॥

३१८

स्वयें देवांचा अधिपति । करी राज्याभिषेकासी ॥ १ ॥
त्रिविक्रमासम राजा । स्वामी झाला त्रैलोक्याचा ॥ २ ॥
विविध महायज्ञ केले । अर्धे इंद्रासन मिळे ॥ ३ ॥
चतुःसमुद्रें वेष्टिली । भूमि दिवसांत जिंकिली ॥ ४ ॥
नव्हतें चैत्यहीन स्थान । असंख्यात धेनुदान ॥ ५ ॥
वृष्टि इंद्राच्या समक्ष । केली पडतांचि दुर्भिक्ष्य ॥ ६ ॥
कथितां मांधात्याचें वृत्त । धर्म विचारी मुनींस ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे आतां । ऐका सोमकाच्या वृत्ता ॥ ८ ॥

अध्याय १२७ वा

३१९

एक नृपाळ धार्मिक । नांव जयासी सोमक ॥ १ ॥
राण्या तयालागीं शत । सकल सद्गुणी सुरेख ॥ २ ॥
दिन लोटतां बहुत । तया झाला एक सुत ।। ३ ॥
वृद्धपणीं लाभ झाला । सौख्य वाटलें सकलां ॥ ४ ॥
नाम ' जंतु ' ऐसें तया । खेळविती सकल भार्या ॥ ५ ॥
सतत बैसूनि भोंवती । त्याचें कौतुक पाहाती ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे नर । मोहें पावे अनिवार ॥ ७ ॥

३२०

पिपीलिका दंश होई एकदां बाळास ॥
तया दुःखें बालकानें मांडिला आक्रोश ॥ १ ॥
माता सर्व, दुःखें तया करीती रूदन ॥
शब्द भरूनि तो गेला अवघें भवन ॥ २ ॥
राजसभेमाजी आर्त नाद ऐकूं जाई ॥
दूत पाठवोनि राजा वृत्त ध्यानीं घेई ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे वृत्त ऐकूनि उद्विग्न ॥
सोमक त्वरेनें दुःखें सोडी सभास्थान ॥ ४ ॥

३२१

त्यागूनियां सभा अंतःपुरीं गेला । समजाऊनि आला बालकासी १
सभेमाजी राव बोले धिक्कारूनि । एक पुत्र जनीं असूनि व्यर्थ ॥२॥
आयुष्य क्षणिक, मूर्तिमंत दुःख । वाटे पुत्र एक स्वानुभवें ॥ ३ ॥
पुत्रास्तव केल्या एकशत स्त्रिया । जंतूविण वायां सर्व यत्न ॥ ४ ॥
पुत्र एकुलता सकलांचा प्राण । शत पुत्र दान करा मज ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पुशितां उपाय । कथिती विप्र काय तेंचि ऐका ॥६॥

३२२

ऋत्विज म्हणे हे सोमका । कठिण उपाय करिसी कां ॥ १ ॥
राव म्हणे दुष्करहि । पुत्रांस्तव सांगा कांहीं ॥ २ ॥
पुत्रांस्तव या जंतूचा । होम नृपाळा करितां ॥ ३ ॥

वपाधूमावघ्राणानें । पूर्ण हेतु ऐसे जाणें ॥ ४ ॥
पुनरपि जंतु माता । प्रसवेल त्याचि सुता ॥ ५ ॥
त्याच्या सव्य कुशीवरी । स्वर्णचिन्ह ध्यानीं धरीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे विप्र । कथिती, तेजस्वी ते पुत्र ॥ ७ ॥

अध्याय १२८ वा ३२३

राजा म्हणे ब्रह्मन् इष्ट तें करोनि । इच्छा पुरवोनि सुखवा मज ॥१॥
ऐकोनि ते वाणी आरंभिला यज्ञ । जंतूसी मानून यज्ञद्रव्य ॥ २ ॥
वृत्तांत कळतां शोकाकुल माता । हाय हाय शब्दा करिती सर्व ॥३॥
आक्रोश करोनि ओढिती सकळ । धरोनियां कर बालकाचा ॥ ४ ॥
याजक पुत्राचा अन्य हात धरी । ओढाताण झाली बालकाची ॥५॥
कुररीसमान आक्रोश मांडिती । करुणार्द्र होती सकल माता ॥६॥
अंतीं ओढूनियां कर्म केलें घोर । फाडिती उदर वपेस्तव ॥ ७ ॥
विधियुक्त देती आहुती वपेची । पतन स्त्रियांसी तया धूम्रें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे नवलचि झालें । दिवस राहिले स्त्रियांलागीं ॥ ९ ॥

३२४

दशम मासीं त्या प्रसूत जाहल्या । पुत्रांसी पावल्या तेजस्विनी ॥ १ ॥
जंतूचि जाहला पूर्व जननीसी । ज्येष्ठ पुत्र तोचि नृपाळाचा ॥ २ ॥
निजपुत्रांहूनि तयावरी प्रीति । सकल मातांच मनोभावें ॥ २ ॥
सव्य कुक्षीवरी सुवर्णाचें चिन्ह । सर्वांहूनि गुण श्रेष्ठ त्याचे ॥ ४ ॥
ऐसा पुत्रवंत जाहला सोमक । आनंद चित्तांत तयालागीं ॥ ५ ॥
पुढती परलोकीं गेला तो ऋत्विज । नृप मागोमाग स्वर्गीं जाई ॥६॥
वासुदेव म्हणे पाही ऋत्विजासी । पडला नरकामाजी ऐसें नृप ॥७॥

३२५

राव विचारी विप्रासी । नरकलोकीं कां रे येसी ॥१ ॥
होरपळे तो अग्नींत । म्हणे कारण तुझा याग ॥ २ ॥
ऐकूनि ते विप्रवाणी । राव कळवळला मनीं ॥ ३ ॥
यमालागीं म्हणे मुक्त । करीं विप्रा, मज बांध ॥ ४ ॥
यम म्हणे कर्ता तोचि । स्वकर्माचे भोग भोगी ॥ ५ ॥

राजा म्हणे सुख-दुःख । सर्व भोगूं आम्हीं देख ॥ ६ ॥
यमलोकीं राहे राव । कृतज्ञांचा हा स्वभाव ॥ ७ ॥
योग्यवेळीं स्वर्गा जाती । सौख्य आनंदें भोगिती ॥ ८ ॥
तयाचाचि हा आश्रम । म्हणती मुनि व्हावें स्नान ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे धर्म । तेथ राहिला षड्दिन ॥ १० ॥

अध्याय १२९ वा

३२६

इष्टीकृत नामें सत्र । प्रजापति करी येथ ॥ १ ॥
यमुनातीरीं अंबरीष । पूर्वी पावला सिद्धीस ॥ २ ॥
नहुष ययाति या स्थानीं । रमले महा यज्ञकर्मी ॥ ३ ॥
रौप्यवर्ण संचाराचा । मार्ग ऋचीक पुत्राचा ॥ ४ ॥
पुढती एक अद्भुत वृत्त । कथिती धर्मासी लोमश ॥ ५ ॥
उखळ मुसळ आकृति । कर्णभूषणें जियेसी ॥ ६ ॥
ऐसी एक पिशाचिनी । वदली ब्राह्मणीलागूनि ॥ ७ ॥
ग्रामीं संकरजातींच्या । वास घडला गे तुझा ॥ ८ ॥
एक शफ उंटिणीचें । दधि सेविलेंसि साचें ॥ ९ ॥
प्रायश्चित्ताविणें शुद्धि । नाहीं नाहीं गे तुजसी ॥ १० ॥
न करीं निवास या स्थानीं । वदली तिजसी पिशाचिनी ॥ ११ ॥
वासुदेव म्हणे दोष । शास्त्र निवेदी ते साच ॥ १२ ॥

३२७

दुर्लक्षूनि तिची वाणी । रमली ब्राह्मणी ते कर्मी ॥ १ ॥
तदा घट स्थाल्यादिक । फोडूनि बोले वधीन सुत ॥ २ ॥
तथापि न त्यजितां स्थान । देह लाभेल मजसम ॥ ३ ॥
तयापुढती शिलाभाव । पावसील हा निश्चय ॥ ४ ॥
ऐसी पिशाचीची वाणी । युधिष्ठिरा घेई ध्यानीं ॥ ५ ॥
यास्तव राहूं एक दिन । पुढती स्थान पाहूं अन्य ॥ ६ ॥
गेले प्लक्षावतरणासी । स्वर्गद्वार त्या बोलती ॥ ७ ॥
स्नानें दिव्यदृष्टि लाभे । धर्म अवलोकी पार्थातें ॥ ८ ॥

सरस्वतीच्या तटाकीं । नित्य पुण्यात्मे वसती ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे क्षेत्र । जगीं कुरूचें विख्यात ॥ १० ॥

अध्याय १३० वा ३२८

तीर्थामाजी मृत्यु येतां स्वर्गप्राप्ति । ऐसा या तीर्थासी दक्षवर ॥ १ ॥
सरस्वतीतीरीं विनशनतीर्थ । निषाद देशांत गुप्त झाली ॥ २ ॥
चमसभेदासी प्रगट हे झाली । संगम पावली सरितांसवें ॥ ३ ॥
सिंधूच्या या तीर्थी लोपामुद्राभेटी । होवोनि आगस्ति सुखी झाले
वासिष्ठ ते मुक्त विपाश तीर्थासी । आत्महत्येप्रति सिद्ध होतां ॥ ५ ॥
पुण्यद काश्मीर मानसाचें द्वार । एथें रामचंद्र वास करी ॥ ६ ॥
प्रवेश न घडे वायुसीही जेथें । रामचंद्र तेथें प्रवेशला ॥ ७ ॥
प्रति पंचवर्षीं येती उमापति । भक्तांसी भेटती चैत्रमासीं ॥ ८ ॥
उज्ञानक तीर्थी वसिष्ठां संतोष । पद्म कुशेशय तीर्थ पुढें ॥ ९ ॥
रुक्मिणीनें क्रोध जिंकिला या ठाईं । भृगुतुंग पाहीं गिरिश्रेष्ठ ॥१०॥
जला, उपजला सरितांचें तीर । जेथें उशीनर यज्ञ करी ॥ ११ ॥
श्येन, कपोत ते इंद्र, अग्नि झाले । हरणार्थ आले नृपसत्व ॥ १२ ॥
वासुदेव म्हणे आतां तेंचि ऐका । देऊनियां चित्ता पुण्यवृत्त ॥१३॥

अध्याय १३१ वा ३२९

श्येन भयानें कपोत । नृपाळाच्या अंकाआड ॥ १ ॥
शरणार्थी तो लपून । वैसतांचि येई श्येन ॥ २ ॥
म्हणे राया माझें भक्ष्य । क्षुधा पीडिते बहुत ॥ ३ ॥
करूं नको हा अधर्म । राव म्हणे हाचि धर्म ॥ ४ ॥
कांपे थरथरां कपोत । कैसा करूं मी अव्हेर ॥ ५ ॥
विप्र, धेनु, शरणागत । वधितां समानाचि पाप ॥ ६ ॥
श्येन म्हणे राया अन्न । जाणें सकलांचा प्राण ॥ ७ ॥
अन्नाविण प्राण जातां । नाश माझ्या कुटुंबाचा ॥ ८ ॥
जाणे गौरव, लाघव । तोचि जगीं महानुभाव ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे श्येन । सांगे नृपाळासी धर्म ॥ १० ॥

३३०

राव म्हणे विहगोत्तमा । कथिसी हितकारी धर्मा ॥ १ ॥
नव्हसी कीं रे गरुत्मान् । जाणसी तूं अवघा धर्म ॥ २ ॥
ऐसें असोनि शरणार्थी-। त्याग, कैंवी हें बोलसी ॥ ३ ॥
आहारार्थ यत्न तुझा । अवलंबावें पुण्यमार्गा ॥ ४ ॥
वृषभ, वराह, महिष । मागसी तें देईन मांस ॥ ५ ॥
श्येन बोलला, कपोत । सनातन आमुचें भक्ष्य ॥ ६ ॥
राजा म्हणे पक्ष्यास्तव । मागें तुजला जें प्रिय ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ज्ञाता । अभय देई शरणागता ॥ ८ ॥

३३१

उशीनरराजा कपोताकारणें । निज मांसदानें तुष्ट करी ॥ १ ॥
भारंभार माझ्या निजमांस देई । हर्षित त्या होई वचनें नृप ॥ २ ॥
छेदूनियां मांस तोलूनि पाहतां । आश्चर्यचि लोकां वाटतसे ॥ ३ ॥
कपोत स्थानींचा हालेना सर्वथा । बहुत छेदितां नृपें मांस ॥ ४ ॥
अंतीं तो उदार बैसे पारड्यांत । देवांच्या चित्तांत करुणा येई ॥५॥
प्रगट होवोनि आशीर्वाद देती । परीक्षा सत्त्वाची म्हणती झाली ॥
यज्ञमंडपीं या आलों ज्या हेतूनें । सफल तें झालें आमुचें कार्य ॥
अक्षय्यकीर्तीनें राया सुखें नांदें । बोलूनि आनंदें देव जाती ॥ ८ ॥
पुण्यलोकीं जाई योग्य वेळीं राव । कथी वासुदेव तें हें तीर्थ ॥ ९ ॥

अध्याय १३२ वा

३३२

मंत्रपूतबुद्धि उद्दालकपुत्र । श्वेतकेतु विप्र आश्रम हा ॥ १ ॥
पुष्पफलाकीर्ण असे हा सर्वदा । सरस्वती अंबा मुनिंसी भेटे ॥ २ ॥
मागे तो तियेसी वाङ्मयाचें ज्ञान । भागिनेय जाण अष्टावक्र ॥ ३ ॥
यज्ञशाळेमाजी विदेह नृपाच्या । हरिला बंदीचा गर्व त्यांनीं ॥ ४ ॥
उद्दालकाश्रमीं धर्मा जाई आतां । धर्म म्हणे कथा सांगा त्याची ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे धर्माची ते वाणी । ऐकूनियां मुनि कथिती वृत्त ॥ ६ ॥

३३३

उद्दालकाचा कहोड । शिष्य संयमी प्रसिद्ध ॥१ ॥

सकल विद्या पूर्ण होतां । गुरु अर्पिती ' सुजाता - ' ॥ २ ॥
कन्या आपुली तयासी । ऐसी योग्यता शिष्याची ॥ ३ ॥
पुढती कहोडकांतेसी । गर्भ राही भाग्यराशी ॥ ४ ॥
एकदां तो गर्भांतूनि । पित्यालागीं बोले वाणी ॥ ५ ॥
अध्ययन न घडे योग्य । अवघी निशा जाई व्यर्थ ॥ ६ ॥
शिष्यांदेखत ही निंदा । ऐकूनियां वरी क्रोधा ॥ ७ ॥
वदला पिता शापवाणी । ' अष्टावक्र ' होई जनीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे सुत । त्याचि नामें जगीं ख्यात ॥ ९ ॥

३३४

अष्टावक्राची जननी । विनवी स्वपतीलागूनि ॥ १ ॥
उदरांत असतां बाळ । म्हणे आम्हां कठिण काळ ॥ २ ॥
प्राणनाथा द्रव्याविण । कैसे जातील हे दिन ॥ ३ ॥
प्रसूतीचा समय आला । नसे कपर्दी पदराला ॥ ४ ॥
ऐकूनियां कहोड मुनि । आला जनकाच्या सदनीं ॥ ५ ॥
त्यासि जिंकिला वंदीनें । सरितेमाजी बुडविलें ॥ ६ ॥
उद्दालक म्हणे कन्ये । वृत्त गुप्त ठेवीं धन्ये ॥ ७ ॥
पुढती जन्मे अष्टावक्र । त्यासी वंदी वासुदेव ॥ ८ ॥

३३५

उद्दाळक पिता, श्वेतकेतु भ्राता । अष्टावक्र चित्ता ऐसें वाटे ॥ १ ॥
संवत्सर ऐसे द्वादश लोटले । श्वेतुकेतु बोले अष्टावक्रा ॥ २ ॥
अंकावरी माझ्या-पित्याच्या न वैसें । उद्दालक नसे पिता तव ॥ ३ ॥
बोलूनियां ऐसें ओढिलें तयासी । खेद बालकासी होई बहु ॥ ४ ॥
जाऊनि सदनीं मातेलागीं पुशी । सांगें वो मजसी तात कोठें ॥ ५ ॥
दुःखार्ता ती सांगे शापभयें वृत्त । म्हणे अष्टावक्र मातुलासी ॥ ६ ॥
विस्मयकारक जाऊं त्या यज्ञासी । वाद विवादासी ऐकूं सुखें ॥ ७ ॥
पुढती यज्ञासी निघाले बालक । अडविती दूत तयांलागीं ॥ ८ ॥
रायालागीं तदा बोले अष्टावक्र । तेंचि वासुदेव कथन करी ॥ ९ ॥

अध्याय १३३ वा

३३६

भारवाहक आणि स्त्रिया । बधिर, अंधा, मार्ग द्यावा ॥ १ ॥

सकलांनीं नृपाळासी । द्यावें प्रथम मार्गासी ॥ २ ॥
विप्रालागीं नृपाळानें । मार्ग द्यावा आदरानें ॥ ३ ॥
राव म्हणे इच्छेसम । जाई मार्ग तो लंघून ॥ ४ ॥
विप्रां देवेंद्र वंदितो । अग्नि सदा तेजस्वी तो ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे बाळ । म्हणे पाहूं यज्ञस्थळ ॥ ६ ॥

३३७

द्वारपाल म्हणे आम्हीं आज्ञाधीन । बाल अथवा अज्ञ न सुटो कोणी
विप्रही तो जरी व्हावा वृद्ध ज्ञाता । अन्याच्या प्रवेशा प्रतिबंध ॥२॥
अष्टावक्र म्हणे आम्हां वृद्ध मानीं । नित्य पुण्यकर्मीं रमतों पाहें ॥
संयमी श्रवणेच्छु ज्ञाननिष्ठ सदा । जपतसों वेदां निरंतर ॥ ४ ॥
अल्पही अनल लोकां करी दग्ध । न लेखीं बालक आम्हांप्रति ॥
द्वारपाल म्हणे दुर्लभ तो ज्ञानी । बडबड त्यजोनि सेवी विद्या ॥
अष्टावक्र म्हणे निःसार अष्ठिला । शाल्मली तरूला पुष्ट जरी ॥ ७ ॥
देहवृद्धि नसे वार्धक्याचें चिन्ह । जयालागीं ज्ञान तोचि वृद्ध ॥ ८ ॥
द्वारपाल म्हणे ज्ञान वृध्दावीण । तेंही कालावीण न घडे लोकीं ॥
व्यर्थ वृध्दासम कासया बोलसी । मोद मानसासी वासुदेवा ॥१०॥

३३८

शुभ्रकेस होतां वार्धक्य न येई । ज्ञानी तोचि पाहीं वृद्ध खरा ॥
वय, धन, तेंवी शुभ्र वर्ण केश । हेतु वार्धक्यास न म्हणे ज्ञाता ॥२॥
साङ्ग वेदज्ञाता ज्ञानी तो गणावा । वदे द्वारपाला अष्टावक्र ॥ ३ ॥
प्रवेश लाभतां राजसभेमाजी । विवाद बंदीसी करितां पाहीं ॥ ४ ॥
जिंकितां बंदीतें होईल निर्णय । बाल-वृद्धभाव सहज कळे ॥ ५ ॥
विद्यावंत विप्र, मंत्र्यांसवें राजा । निर्णय वादाचा लावितील ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अन्य पंथें भेट । करी द्वारपाल नृपाळाची ॥ ७ ॥

३३९

बाळ म्हणे राजा ययातीसमान । समृद्ध तूं यज्ञ करिसी जनीं ॥ १ ॥
जिंकूनियां विप्रां उदकांत छोटी । ऐसें कर्म बंदी आचरी हा ॥ २ ॥
पुनः पराभव करूं नये कोणी । हेतु हा धरोनि क्रूर झाला ॥ ३ ॥

ऐकूनि हें वृत्त आलों या स्थानासी । अद्वैत-वादासी प्रवृत्त मी ॥
राव म्हणे बाळा, वादकुशल तो । तत्काळ जिंकितो महाज्ञाते ॥
मोठमोठे ज्ञाते दिपूनियां जाती । पाहोनि वंदीसी क्षणामाजी ॥६॥
वासुदेव म्हणे निवारी बाळासी । राव, परी त्याची वाणी ऐका ॥

३४०

अष्टावक्र म्हणे राजा । वाद त्यासी घडो माझा ॥ १ ॥
भेटला न कोणी ऐसा । म्हणूनि गर्व हा तयाचा ॥ २ ॥
करिसी कौतुक तयाचें । नकळे तुजसी तेज माझें ॥ ३ ॥
पावूनियां पराभवा । वरिल वंदी मूकभावा ॥ ४ ॥
शकट, भग्न ज्याचा कणा । तैसा होईल दैन्यवाणा ॥ ५ ॥
ऐसें ऐकूनियां राव । वदला, कथी वासुदेव ॥ ६ ॥

३४१

त्रिंशत् पदार्थांचा एक । ऐसे द्वादश ज्या अंश ॥ १ ॥
चतुर्विंशति ज्या पर्वें । त्रिशत् षष्टि आरा जाणें ॥ २ ॥
ऐशा चक्रासी जाणता । तोचि जनीं श्रेष्ठ ज्ञाता ॥ ३ ॥
अष्टावक्र म्हणे राजा । पौर्णिमा तैं अमावास्या ॥ ४ ॥
चतुर्विंशति हीं पर्वें । ऋतु तोचि नाभि जाणें ॥ ५ ॥
मास, राशी याचि धांवा । अहोरात्री याचि आरा ॥ ६ ॥
नित्य कालचक्र ऐसें । कदा न बाधो रायातें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे बाळ-। वचनें तोषला नृपाळ ॥ ८ ॥

३४२

श्येनवेगें दोघी संचार करिती । वडवांसम जगीं कोण देवी ॥ १ ॥
कोणाची संतती अपत्यें त्यां कोण । ऐसा करी प्रश्न बाळकासी ॥२॥
नांवही तयांचें अमंगल म्हणे । विद्युत् अशनी जाणें दुःख, मृत्यु ॥३॥
वडवा त्या दोन्हीं गगनरथासी । कोणाच्या गृहासी न येवोत ॥
अनिल जयाचा सारथी तो मेघ । उदय वृष्ट्यर्थ पावे नभीं ॥ ५ ॥
तयाच्या उदरीं विद्युत् अशनी जैंवी । मानस हें तैंवी सुपुत्रींचें ॥६॥
दुःख, मृत्यु त्यांच्या उदरीं नांदती । प्रथम प्रश्नासी उत्तर हें ॥ ७ ॥
वात, सारथी त्या विद्युदशनीलागीं । वडवा त्या दोघी प्रसवती ॥ ८ ॥

मनासी त्या देती दुःख, मृत्यु, जन्म। अग्नि, ज्योति धूम तोचि मेघ॥
मेघांमाजी अग्नी, अग्नीमाजी मेघ। तेंवी मृत्यु दुःख प्रसवे मन ॥१०॥
बीजांकुरन्यायें चक्र चाले ऐसें। निग्रहें तयांचें मूल छेदीं ॥ ११ ॥
वासुदेव म्हणे ऐसें अष्टावक्र। रायासी उत्तर सहज देई॥ १२ ॥

३४३

राजा म्हणे बाळा निद्रेमाजी कोण। न झांकी नयन सांगें मज॥१॥
जन्मोनीही नसे चांचल्य जयासी। हृदय न ज्यासी ऐसा कोण ॥२॥
वेगें वृद्धि पावे सांगें कोण ऐसें। उत्तर प्रश्नाचें देई माझ्या॥ ३ ॥
वंदीतें सर्वज्ञ जाणसी नृपाळा। निद्रिस्थ न डोळा झांकी मत्स्य ॥
चांचल्य अंड्यासी सर्वथा असेना। हृदय पाषाणा न वसे कदा ॥५॥
नित्य वाढतसे सरिता वेगानें। ऐसें स्थूलमानें उत्तर हें ॥ ६ ॥
इतुकेंचि वंदी देईल उत्तर। रहस्य साचार ऐकें आतां ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे अष्टवक्र ज्ञाता। संशय नृपाचा दूर करी ॥ ८ ॥

३४४

चित्घन पुरुष मत्स्य जागृत्स्वप्न दोन्हीं ॥
तटाकीं यथेष्ट हिंडे इहपर स्थानीं ॥ १ ॥
श्रांत होऊनि सुषुप्ति प्रळयासी जातां ॥
द्रष्टारूपें नित्य वसे प्राण लीन होतां ॥ २ ॥
कार्य-करण संघाताचा होई जरी नाश ॥
ज्ञान स्वरूपी हा आत्मा नित्य अविनाश ॥ ३ ॥
चलन वलन कांहीं नसे ब्रह्मांडासी ॥
सूत्रचालक चिदात्मा नित्य हा तयासी ॥ ४ ॥
शोकायतन हा देह, हृदय तयातें ॥
हृदयविहीन जाणें निरहंकारातें ॥ ५ ॥
ऐक चतुर्थ प्रश्नाचें उत्तर नृपाळा ॥
चित्त सरिता वाढवी वेगें प्रपंचाला ॥ ६ ॥
अव्ययद्रष्टा हें जड दृश्यजात सारें ॥
मुक्ति, अनासक्ति, विश्व, मनोमय वारे ॥ ७ ॥

ऐसीं उत्तरें ऐकूनि तोषला जनक ॥
म्हणे वृध्द तूंचि बाळा बुध्दि अलौकिक ॥ ८ ॥
वक्ता तुझ्यासम नाहीं पाहिला अद्यापि ॥
म्हणे वासुदेव, लाभे अनुज्ञा वादाची ॥ ९ ॥

अध्याय १३४ वा

३४५

बाळ म्हणे वंदी कस्पटासमान । वाटतसे जाण मज राया ॥ १ ॥
वंदीलागीं म्हणे पराभूतालागीं । मग्न जळामाजीं करिसी सुखें ॥२॥
ऐसा तुझा पण ऐकतों साचार । आटेल सागर अभिमानाचा ॥३॥
ताडूं नको मूढा निद्रिस्थ व्याघ्रासी । विषारी नागासी डिवचूं नको
दुर्बल नखाग्रें ताडी जो पर्वता । सहज आत्मघाता करीतसे ॥ ५ ॥
गिरींमाजीं जैसा मैनाक वरिष्ठ । सरितांमाजीं श्रेष्ठ गंगा जेंवी ॥
तेंवी नृपांमाजीं जनक-नृपाळ । म्हणतसे बाळ तया वेळीं ॥ ७ ॥

३४६

वंदीलागीं करी आव्हान वादार्थ । वासुदेव चित्त हर्ष पावे ॥ १ ॥
वंदी म्हणे सूर्य जैसा स्वप्रकाश । देव पितरांस यम जैसा ॥ २ ॥
तेंवी विश्वामाजीं बुध्दि हे स्वतंत्र । साम्राज्य सर्वत्र जगीं तिचें ॥
इंद्रियांचा स्वामी असे एक बुध्दि । अहमिदं वृत्ति तेचि जाणा ॥
कर्ता, भोक्ता, बुध्दि प्रेरक सर्वांसी । बुध्दिवीण जगीं कांहीं नसे ॥५॥
क्षणिक विज्ञान बौध्दांचें हें मत । वंदी विवादार्थ मांडीतसे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अष्टावक्रमुनि । खंडनार्थ वाणी बोले ऐका ॥ ७ ॥

३४७

इंद्र अग्नि दोघे मित्र । अथवा नारद-पर्वत ॥ १ ॥
रथालागीं चक्रें दोन । अथवा पति-पत्नी जाण ॥ २ ॥
करिती सहसंचार जेंवी । बुध्दि-चैतन्य हीं तेंवी ॥ ३ ॥
'द्वा सुपर्णा' त्या आधार । साक्षी चैतन्य केवळ ॥ ४ ॥
बुध्दि मधुर फल भोगी । चैतन्य तें स्थिर अंगीं ॥ ५ ॥
विषय तो बुध्दि जाणा । विषयी जाणावें चैतन्या ॥ ६ ॥
दृश्य घट होई कैसा । स्वयंप्रकाश तो द्रष्टा ॥ ७ ॥

बुध्दि जाणावी परतंत्र । एक द्रष्टा तो स्वतंत्र ॥ ८ ॥
त्यांच्या संयोगा वांचून । न घडे कार्य थोर, सान ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे बौद्ध-। पक्ष, खंडीत सहज ॥ १० ॥

३४८

वंदी म्हणे जीव कर्माधीन जाणें । पावे पाप-पुण्यें ते ते जन्म ॥ १ ॥
नारक-स्थावर, तिर्यग्रूप, पापें । देव-स्थावर ते मानुष, पुण्यें ॥ २ ॥
मातृपितृदेहीं अन्नद्वारा जाई । तिर्यग्पशू होई मानुष पुढें ॥ ३ ॥
कर्मपर वेद, त्रैवर्णिक जन । उपभोगस्थान त्रिविध जनीं ॥ ४ ॥
स्वर्ग, नरक, पृथ्वी, जागृदादि जाण । अवस्था त्या तीन असती जनीं
कर्म, कर्म-फल अन्य तत्त्व नसे । मत मीमांसेचें सांगे वंदी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐकोनि तो पक्ष । करी अष्टावक्र खंडनासी ॥ ७ ॥

३४९

कर्मजडां कैसें मोक्षाख्य चतुर्थ । स्थान, कथिती वेद स्पष्टपणें ॥१॥
ज्या क्षणीं विराग त्याचि क्षणीं त्याग । ऐसा दिव्यमार्ग वैदिकांचा ॥
शूद्र तो चतुर्थ अधिकारी ज्ञानाचा । चतुर्थ अवस्था तुर्या जाणें ॥३॥
विराट सूत्रात्मा अंतर्यामी तुर्य । विभिन्नचि सर्व अवस्था त्या ॥४॥
अ उ म आकार अर्धमात्रा तैसी । वाचक तयासी वर्ण जाणें ॥५॥
परा पश्यंत्यादि चतुर्विध वाणी । तेणें येई ध्यानीं तुर्यपद ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मोक्ष तो चतुर्थ । करीतसे सिद्ध अष्टावक्र ॥ ७ ॥

३५०

वंदी म्हणे गार्हपत्य । दक्षिण, आहवनीय, सभ्य ॥ १ ॥
आवसथ्य, अग्नि पंच, । पंचपाद पंक्ति-छंद ॥ २ ॥
अग्निहोत्र, दर्शपूर्ण । चातुर्मास्य, पशु, सोम ॥ ३ ॥
यज्ञ पंचक हें असे । पंचकाचि इंद्रियांचें ॥ ४ ॥
चिति, पंचभूतव्याप्त । प्रगटे या शरिरांत ॥ ५ ॥
मान, विपर्यय, स्मृति । निद्रा, विकल्प या वृत्ति ॥ ६ ॥
वृत्तिनिरोध स्वरूप । समाधि ते निद्रा देख ॥ ७ ॥

देहव्याप्त चितीलागीं । कर्तृत्वादि भोग जगीं ॥ ८ ॥
तुर्याचि तें नव्हे तत्त्व । वाद गातो वासुदेव ॥ ९ ॥

३५१

इंद्रियचि असे षष्ठम मानस । लीन सुषुप्तींत सकलांसह ॥ १ ॥
कर्तृत्वादि धर्म वंदिन् हें मनाचे । साक्षी आत्मा असे निराळाचि ॥
अग्न्याधानामाजी सहावी दक्षिणा । ऋतु तेंवी जाणा यज्ञ सहा॥३॥
वंदी म्हणे विप्रा अष्टधा तूं वक्र । वन्य पशु सप्त मान्य लोकीं ॥४॥
श्रोतव्यादि इह पारलौकिकहि । विषय ते पाहीं सप्त जनीं ॥ ५ ॥
आत्म्यासी झांकिती म्हणूनि ते छंद । बोद्धव्यादि सप्त विषय-सुखें ॥
इंद्रियेंचि द्वारें सुखार्थ आत्म्यासी । तंतुविण कैसी वीणा-वाणी ॥
आयुध रहित कलावंत जैसा । निष्क्रियचि तैसा आत्मा भासे ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे आत्म्याचें कर्तृत्व । अभावें तें गुप्त साधनांच्या ॥

३५२

वाळ म्हणे आत्मा शुद्ध । अहंकारासी कर्तृत्व ॥ १ ॥
पंच ज्ञानेंद्रियें, मन । बुध्दि, अहंकार जाण ॥ २ ॥
ऐसीं इंद्रियें हीं आठ । तितुकेचि विषय स्पष्ट ॥ ३ ॥
बृहदारण्यकाची वाणी । आत्मा भिन्न तयाहूनि ॥ ४ ॥
ऐसा परमात्मा शरभ । ज्ञानें द्वैत-सिंह छेद ॥ ५ ॥
सुषुप्तीचा तोचि द्रष्टा । सांगे अनुभव निद्रेचा ॥ ६ ॥
कैसा जड तो होईल । देह वासनेचें मूळ ॥ ७ ॥
यूप विषय-इंद्रियांचा । बंधनासी कारण साचा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ऐसे । पुरुष, पशु या यूपाचे ॥ ९ ॥

३५३

'उशंतस्त्वा' ऋचा उच्चारूनि त्रिधा । अर्पितां समिधा तीन वेळ ॥
'नव सामधेनी' होती तैशापरी । त्रिगुण संसारीं वाढती हे ॥ २ ॥
चार पाद, संख्या नव अक्षरांची । छंद तो बृहती विस्तारला ॥ ३ ॥
इच्छेसम संख्या नवाङ्कांची होई । नित्यचि ते राही संख्या नव ॥
तैसें हें प्रधान नित्य सर्वकाळ । द्वैतचि केवळ सत्य जनीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे प्रक्रिया सांख्यांची । निवेदितां वंदी, वाळ बोले ॥६॥

३५४

पूर्ण परब्रह्म स्वमाया सामर्थ्यें । घेऊनियां रूपें विविध भासे ॥ १ ॥
वागादि त्या दहा अग्न्यादिकां हेतु । प्रज्ञा ऐसा बोधु उपनिषदिं ॥
देह नगरांत दशेंद्रियवास । वेदामाजी स्पष्ट कथिलें ऐसें ॥ ३ ॥
गर्भ-मातेसम अनित्य संबंध । अहंकार, असंग-आत्म्यामाजी ॥ ४ ॥
ऐशा अद्वैताचा मूढांसी धिक्कार । तत्त्वज्ञ ते पात्र शुद्धचित्तें ॥ ५ ॥
बंदी म्हणे जीव इंद्रियांचा दास । विषय एकादश रुद्र तेंचि ॥ ६ ॥
बाळ म्हणे छंद जगती, तेंवी वर्ष । अवयव द्वादश तयां दोघां ॥ ७ ॥
जड चैतन्य हे तेंवी मूढ एक । त्यागूनि, विवेक, मानितातीं ॥ ८ ॥
श्रुति म्हणे मूळ भूतांचें, आनंद । सहजचि सिद्ध ब्रह्म तेणें ॥ ९ ॥
शुद्ध बुद्धीविण तर्काचें न काम । ध्यानेंचि हें ज्ञान सिद्ध होई ॥१०॥
धर्म, सत्य, दम, तप, ऱ्ही, तितिक्षा । धृति,यज्ञ,असूया,दान,यम ॥
अमात्सर्य, ऐसीं द्वादश हीं व्रतें । ज्ञान तेणें लाभे वासुदेवा ॥ १२ ॥

३५५

बंदी म्हणे ब्रह्मलोकीं । जाती त्यांसी ज्ञानप्राप्ति ॥ १
कृतयुगीं त्याचा लाभ । कलियुगीं तें दुर्लभ ॥ २ ॥
त्रयोदशी तिथि, तेरा-। द्वीपांनीं, हे युक्त धरा ॥ ३ ॥
देशकालही प्रशस्त । असतां होई चित्त शुद्ध ॥ ४ ॥
ऐसें बोलतसे बंदी । पुढती कुंठित होई बुद्धि ॥ ५ ॥
पाहूनि तें अष्टावक्र । पूर्ण करीतसे श्लोक ॥ ६ ॥
आत्मा जरी हा असंग । त्याचा मायीक संबंध ॥ ७ ॥
बुध्यादिकांहूनि भिन्न । ऐसें जया आत्मज्ञान ॥ ८ ॥
तयालागीं सद्योमुक्ति । स्वधर्मेंचि ऐशी स्थिति ॥ ९ ॥
ऐसें ऐकूनियां बंदी । स्तब्ध झाला मंदबुद्धि ॥ १० ॥
वासुदेव म्हणे हर्ष । पाहूनि तें सकलांस ॥ ११ ॥

३५६

जोडूनियां कर सकलहि विप्र । करिती सत्कार बालकाचा ॥ १ ॥
गर्जूनियां बाळ बोलला नृपाळा । उदकीं बंदीला बुडवीं आतां ॥२॥
बंदी म्हणे मज जाण वरुणसुत । द्वादश वार्षिक सत्र गृहीं ॥ ३ ॥

श्रेष्ठ द्विजांलागीं धाडिलें यज्ञासी । पूजा वाळा तुझी करितों प्रेमें ॥
आपुल्या सदनीं जाईन सुखानें । पित्याच्या कृपेनें सत्वरि मी ॥५॥
अष्टावक्र म्हणे वेदमयी वाणी । मुक्त विघ्नांतूनि कुतर्कांच्या ॥६॥
सत्य तेंचि सत्य, व्यर्थ तर्कबुद्धि । दिव्य अग्निशुद्धि सत्य दावी ॥७॥
तैसा मी वालक म्हणूनियां ज्ञाते । उपेक्षूनि मातें न जावोत ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ऐसें जाणूनियां । बुडवीं म्हणे या वंदीलागीं ॥ ९ ॥

३५७

ऐसा बुद्धिभ्रंश कां रे । काय भाक्षिलीं भोंकरें ॥ १ ॥
स्तुति परपिंडपुष्टांची । मत्त करी कीं तुजसी ॥ २ ॥
ऐकसी न माझे शद्ब । जैसा मदोन्मत्त गज ॥ ३ ॥
राव म्हणे हे वालका । करितों पूर्ण मनोरथां ॥ ४ ॥
वाळ म्हणे या वंदीसी । बुडवीं त्वरित सिंधूमाजी ॥ ५ ॥
वंदी म्हणे वालकास । भेटें आपुल्या पित्यास ॥ ६ ॥
तत्क्षणींचि प्रगट होती । बुडले जे जे जळामाजी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे मुनि । धाला पुत्रासी पाहूनि ॥ ८ ॥

३५८

म्हणे कहोड विप्रेंद्र । याचसाठीं व्हावा पुत्र ॥ १ ॥
साध्य जें न होई मज । केलें वाळानें सहज ॥ २ ॥
अवल, मूर्ख, अविद्वानां । सवल, ज्ञाते, पुत्र जाणा ॥ ३ ॥
असो कल्याण नृपाळा । वंदी सागरीं तो गेला ॥ ४ ॥
पुढती पित्यासी वंदूनि । वाळ गेला निज आश्रमीं ॥ ५ ॥
म्हणे कहोड वाळासी । स्नान करीं सरितेमाजी ॥ ६ ॥
आज्ञा मानितां तत्काळ । सकल गात्रें तीं सरळ ॥ ७ ॥
तदा प्रभृति समंगा । नामें ख्यात नदी जगा ॥ ८ ॥
धर्मा करीं एथ स्नान । पुढती पाहूं अन्य स्थान ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे मुनि । लोमश कथिती हे वाणी ॥ १० ॥

अध्याय १३५ वा

३५९

' मधुविला ' पूर्वीं नांव समंगेचें । 'कर्दमिल' एथें तीर्थ दुजें ॥ १ ॥

भरतानें पूर्वी केलें एथें स्नान ॥ वृत्रासी वधून शचिनाथें–॥ २ ॥
स्नान करोनियां पावन जाहाला । विनशन स्थळा जाऊं आतां ॥३॥
कनखल, भृगुतुंग, स्थूलशिरसाश्रम । त्यांगीं क्रोध, मान तयास्थळीं
रैभ्याश्रम असे समीप तयाच्या । 'यवक्रीत' नाशा पावे तेथें ॥५॥
यवक्रीत तेंवी रैभ्याची ते कथा । सांगावी लोमशा धर्म म्हणे ॥६॥
वासुदेव म्हणे रैभ्य, भरद्वाज । परस्पर मित्र महामुनि ॥ ७ ॥

३६०

रैभ्य मुनीलागीं पुत्र अर्वावसु । तेंवी परावसु नामें त्यांचीं ॥ १ ॥
भरद्वाजालागीं 'यवक्रीत' सुत, तपश्चर्यारत मुनिसी प्रिय ॥ २ ॥
रैभ्य ज्ञाता, तया शिष्य बहु होते । तैसींच अपत्यें तयालागीं ॥३॥
ज्ञात्या रैभ्यालागीं विप्र सन्मानिती । तपस्वी पित्यासी मान नसे ॥
ऐसें पाहूनियां यवक्रीत दुःखी । आचरी तपासी विद्येलागीं ॥ ५ ॥
पंचाग्निसाधनें इंद्र होई वश । पुशितां हेतूस विद्या मागे ॥ ६ ॥
इंद्र म्हणे विद्या गुरूवीण नसे । रैभ्यसुत बैसे पुनस्तपा ॥ ७ ॥
इंद्र येऊनियां सांगे पुनरपि । व्यर्थ या तपासी करूं नको ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे निर्धार मुनीचा । पाहूनि इंद्राचा नचले यत्न ॥ ९ ॥

३६१

न पुरविसी जरी देवेंद्रा कामना । होमीन दहनामाजी देह ॥ १ ॥
पाहोनि निर्धार उपाय योजिला । कृश एक झाला इंद्र, मुनि ॥ २ ॥
गंगेवरी बांधी सेतु सिकतेचा । हास्य यवक्रीता बघूनि येई ॥ ३ ॥
मुनीसी तो म्हणे व्यर्थचि हा यत्न । मुनि म्हणे शीण चुकती येणें
म्हणे विप्रा ऐसे निरर्थक यत्न । करितां तुझ्यासम मीहि जाणें ॥५॥
ऐकोनि ते वाणी ओळखी इंद्रासी । म्हणे शक्य तेंचि देई मज ॥६॥
अपेक्षिले ते ते वर अर्पियेले । पित्यासह स्फुरे वेद म्हणे ॥ ७ ॥
ऐकूनि संतोष पावे यवक्रीत । येई आश्रमांत आनंदानें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पित्यासी बोलला । स्फुरे आपणाला आतां वेद ॥९॥

३६२

दर्पोक्ति ऐकूनि बोले भरद्वाज । होईल सहज गर्व येणें ॥ १ ॥
भरद्वाज सांगे वालधीची कथा । पुत्रशोक व्यथा पीडीत तो ॥२॥

मागोनियां घेई अमर तो सुत । जोंवरी पर्वत वय त्याचें ॥ ३ ॥
' मेधावी ' तयासी होई क्रोधी पुत्र । कळला त्यासी वर अमरत्वाचा
उन्मत्तपणानें अवमानी मुनीसी । गांठ धनुपाक्षाची पडली तया ॥
भस्म होवो म्हणे पीडा तो पावतां । मेधावीसी व्यथा न घडे कांहीं
पाहोनि प्रेरणा करी महिपांसी । भेदिती गिरींसी तत्काळ ते ॥ ७ ॥
गिरीभंग होतां मृत्यु मेधावीसी । दुःख वालधीसी बहुत झालें ॥
वासुदेव म्हणे दैवलिखितासी । उल्लंघील जगीं कोण सांगा ॥ ९ ॥

३६३

भरद्वाज म्हणे यवक्रीतालागीं । गर्व नाडी जगीं सकलांसी ॥ १ ॥
पुत्रांसह रैभ्य महावीर्यवान । राहे सावधान जाणूनि हें ॥ २ ॥
क्रुद्ध होतां रैभ्य पावसील नाश । बोलला पित्यास यवक्रीत ॥ ३ ॥
आज्ञा मान्य मज करूं नये चिंता । रैभ्यहि सर्वथा वंद्य मज ॥ ४ ॥
यवक्रीत ऐसें बोलूनि मधुर । पीडी निरंतर मुनीलागीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सामर्थ्य लाभतां । विवेक मानसा क्वचित् जाण ॥६॥

अध्याय १३६ वा

३६४

निर्भय संचार करी यवक्रीत । आला आश्रमांत रैभ्यपींच्या ॥ १ ॥
मास तो वैशाख वृक्ष प्रफुल्लित । रैभ्य-स्नुषा तेथ दिसली तया ॥२॥
पाहूनि तिजसी कामवश झाला । हांका सुंदरीला मारीतसे ॥ ३ ॥
अंतीं बलात्कार करूनियां जाई । शोकमग्न होई रैभ्य-स्नुषा ॥ ४ ॥
तयावेळीं मुनि आश्रमीं नव्हता । परावसु कांता दुःखी पाही ॥५॥
ऐकूनि वृत्तांत कोपाकुल झाला । शांतवी स्नुषेला मृदु शब्दें ॥ ६ ॥
उत्पाटूनि जटा अग्नींत होमिली । कृत्या निर्मियेली रूपवती ॥ ७ ॥
द्वितीय जटेनें राक्षस निर्मिला । दुष्टवधीं त्याला योजी मुनि ॥८॥
वासुदेव म्हणे आज्ञा मानूनियां । उभयतां कार्या निघूनि जाती ॥

३६५

यवक्रीतासी मोहूनि । कमंडलु तो हिरोनि ॥ १ ॥
जाई कृत्या ते जेवितां । भुलवोनि यवक्रीता ॥ २ ॥
उठतां सांडूनियां पात्र । धांवे त्यावरी राक्षस ॥ ३ ॥

पाहूनियां यवक्रीत । धांवे सरोवरासन्निध ॥ ४ ॥
जलहीन तें पाहोनि । जाई अन्य सरिता स्थानीं ॥ ५ ॥
शुष्क सकल जलाशय । पाहोनियां चित्तीं भय ॥ ६ ॥
अंतीं अग्निशाळेमाजीं । धांव घेई रक्षणार्थी ॥ ७ ॥
अंध रक्षक शूद्रानें । परी तया अडवीलें ॥ ८ ॥
हृदयीं नोंचि शूलाघात । गतप्राण यवक्रीत ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे दैत्य । गेला रैभ्यआश्रमांत ॥ १० ॥

अध्याय १३७ वा ३६६

इकडे भरद्वाज आश्रमासी आले । आन्हीक आपुलें उरकोनि ॥
नित्य आगमनें प्रज्वलित अग्नि । परी कां अजूनि अद्य शांत ॥ २ ॥
द्वारपाळालागीं पुशितां वृत्तांत । कळतां मुनीस पुत्रनाश ॥ ३ ॥
पुत्रशोकें मुनि जाहला व्याकुळ । मांडिला अपार शोक तेणें ॥ ४ ॥
एकुलता माझा पुत्र वार्धक्यांत । दया त्या रैभ्यास कैसी नाहीं ॥
ऐसें बोलूनियां शाप देई मुनि । रैभ्या जा मरूनि पुत्रहस्तें ॥ ६ ॥
अपत्यरहित तेचि धन्य जनीं । वदलों शापवाणी मित्रातेंही ॥ ७ ॥
ऐसा दुःखें करी पुत्राचें दहन । स्वयेंही जळून शांत झाला ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कठिण व्यवहार । होती चमत्कार बहुत जनीं ॥

अध्याय १३८ वा ३६७

इकडे रैभ्याचा यजमान । राजा, नामें बृहद्युम्न ॥ १ ॥
तेणें रैभ्याचे सत्पुत्र । नेऊनि केलें थोर सत्र ॥ २ ॥
स्नुषेसह केवळ मुनि । होते आपुल्या आश्रमीं ॥ ३ ॥
परावसु तो एकदां । आश्रमासी येई यदा ॥ ४ ॥
निद्रा त्याच्या नेत्रांवरी । होती पहांट त्यावेळीं ॥ ५ ॥
ऐशा समईं अरण्यांत । दिसला तयालागीं मृग ॥ ६ ॥
धावरोनि रक्षणार्थ । केला मृगाचा त्या घात ॥ ७ ॥
हाय हाय कळलें त्याला । पितृघात स्वकरें झाला ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे रैभ्य । होता अजिनाच्छन्न सभ्य ॥ ९ ॥

३६८

परावसु परम दुःखें । प्रेतकर्म स्वपित्याचें ॥ १ ॥
करूनि सत्रामाजी आला । बोले आपुल्या भ्रात्याला ॥ २ ॥
ब्रह्महिंसा क्षालनार्थ । बंधो, आचरावें तप ॥ ३ ॥
सत्रकार्य तूं एकाकी । असमर्थ आचरिण्यासी ॥ ४ ॥
ऐकूनियां बंधुवाणी । गेला तपासी निघूनि ॥ ५ ॥
आचरूनि घोर तप । झाला मुनि पापमुक्त ॥ ६ ॥
आला पुनरपि सत्रासी । परावसु तें नृपासी-॥ ७ ॥
म्हणे, ब्रह्मघातकी हा । दृष्टिक्षेपें करिल दाहा ॥ ८ ॥
ऐकूनियां तें नृपाळ । म्हणे घालवा या दूर ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे स्वार्थ । कैसे करी हे अनर्थ ॥ १० ॥

३६९

घालवितां दूत अर्वावसु बोले । दुष्कर्म न झालें माझ्या हातें ॥ १ ॥
ब्रह्मघ्न तो खरा परावसु जाणा । सत्य त्या वचना कोण मानी ॥
अंतीं अर्वावसु जाई तपाप्रति । प्रसन्न त्या होती सूर्यादिक ॥ ३ ॥
परावसूलागीं परावृत्त केलें । कार्य व्यर्थ गेलें नृपाळाचें ॥ ४ ॥
अर्वावसु मागे वर देवांप्रति । उठवा पित्यासी त्वरित आतां ॥ ५ ॥
भ्रात्यासी न लागो दोष तें स्मरण । न राहोचि जाण पातकाचें ॥
पुत्रासह मुनि भरद्वाज उठो । मम हस्तें वाढो मंत्रही हा ॥ ७ ॥
वासुदेव सांगे तथास्तु म्हणोनि । हर्षित देवांनीं केलें विप्रा ॥

३७०

रैभ्य भरद्वाज तेंवी यवक्रीत । जाहले प्रगट तया स्थानीं ॥ १ ॥
यवक्रीत म्हणे सकल देवांसी, । वधिलें मजसी कैसें रैभ्यें ॥ २ ॥
देव यवक्रीता म्हणती न सत्य । बोलसी जें एथ तेंचि सर्व ॥ ३ ॥
गुरुवीण ज्ञान लाभलें तुजसी । क्लेश या रैभ्यासी वहुत झाले ॥
सेवा करूनियां संपादिली विद्या । सामर्थ्य या रैभ्या तुजहूनि ॥
बोलूनियां ऐसें जाती स्वस्थानासी । लोमश धर्मासी कथिती पुढें ॥
आश्रम रैभ्याचा एथ करीं स्नान । वासुदेव धन्य तयां मानी ॥

अध्याय १३९ वा ३७१

लोमश म्हणती युधिष्ठिरा ऐक । ‘ उशीरबीज ’ तो मैनाक ही ॥१॥
‘श्वेतगिरी’ कालशैलही लंघिले । प्रवाह शोभले सप्त पहा ॥ २ ॥
अग्नि नित्य असे या स्थानीं प्रदीप्त । वियोगी हें तीर्थ नारायण ॥
दुर्लभ हें जनां, एकाग्र चित्तानें । पावन दर्शनें व्हावें राया ॥ ४ ॥
देवपदचिन्हांकित क्रीडास्थान । दिसेल ते जाण आतां तुज ॥ ५ ॥
श्वेतगिरि तेंवी मंदरासी जाऊं । स्थान रम्य पाहूं मणिभद्राचें ॥६॥
यक्ष, गंधर्वांचें स्थान तें जाणावें । चित्त स्थिर व्हावें तुमचें आतां॥
षष्ठ योजनें हा शोभतो कैलास । देव या स्थानास येती सदा ॥८॥
‘बदरी’ ‘विशाला’ वृक्ष हा प्रसिध्द । कुबेर मंदीर पाहीं राया ॥९॥
वासुदेव म्हणे भीम, गंगा, यम । धीर तुजलागून म्हणती मुनि ॥१०॥

३७२

रक्षीं रक्षीं गंगामाते । लोमश म्हणती धर्मातें ॥ १ ॥
प्रवेशतो हा पर्वतीं । साह्य होई तूं त्याप्रति ॥ २ ॥
करीं कल्याण रायाचें । मुनि प्रार्थिती गंगेतें ॥ ३ ॥
धर्म म्हणे बांधवांसी । संरक्षावें पांचाळीसी ॥ ४ ॥
संयमूनि मन, वाणी । वागा कथिती जैसें मुनि ॥ ५ ॥
पुढती म्हणे भीमसेना । सांभाळावी वनीं कृष्णा ॥ ६ ॥
माद्रीसुतां जवळी घेई । धीर तयांलागीं देई ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐसा । मार्ग विकट तो होता ॥ ८ ॥

अध्याय १४० वा ३७३

धर्म म्हणे वृकोदरा । पुढती मार्ग विकट खरा ॥ १ ॥
जातों पुढती नकुलासवें । तुम्हीं माघारीं परतावें ॥ २ ॥
द्रौपदीचें रक्षण करीं । येऊं त्वरित माघारीं ॥ ३ ॥
पार्थभेटीची उत्कंठा । भीम म्हणे अमुच्या चित्ता ॥ ४ ॥
श्रांत पांचाली हे जरी । नाहीं फिरणार माघारीं ॥ ५ ॥

स्कंधावरी मी घेईन । श्रांत होतील त्यां जाण ॥ ६ ॥
ऐकूनियां त्या भाषणा । चालेन मी म्हणे कृष्णा ॥ ७ ॥
गंधमादन गिरीसी । जातीं सकल या रीति ॥ ८ ॥
तंगण, पुलिंद, किरात । वसती, सुबाहूचा देश ॥ ९ ॥
राजा प्रेमें स्वागत करी । सकळ राहिले त्या स्थळीं ॥ १० ॥
पाईं चालती पुढती । परिवारासी विश्रांति ॥ ११ ॥
वासुदेव म्हणे कृष्णा । जाई पार्थाच्या दर्शना ॥ १२ ॥

अध्याय १४१ वा ३७४

पांचाळीसमेत बांधवांनो ऐका । कोण या प्रारब्धा उल्लंघीऊ ॥ १ ॥
वण वण तेणें फिरविलें आम्हां । अंतरीं यातना बहुत होती ॥ २ ॥
पंच वर्षें पार्थ आपणा न दिसे । वस्त्रहरणदुःखें जळतें मन ॥ ३ ॥
प्रसन्न वदन चंद्रासम ज्याचें । वायूसम वेगें क्रोधें यम ॥ ४ ॥
रत्नमयी सभा त्रैलोक्यविख्यात । नित्य त्याच्या साक्ष विक्रमाची
तयास्तव पाहूं गंधमादनासी । सत्कर्म साह्यासी सर्वकाळ ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे दुर्गम तें स्थान । पुण्यवंतावीण गमन नसे ॥ ७ ॥

अध्याय १४२ वा ३७५

लोमश आज्ञेनें आकाशगंगेसी । वंदूनियां जाती पुढती सुखें ॥ १ ॥
आस्थिराशि एक पाहिला तयांनीं । कथिती सन्मुनि कथा त्याची॥
भौमासुरअस्थि पर्वतासमान । व्यापिती हें स्थान धर्मराजा ॥३॥
दितिसुत भौम महापराक्रमी । तपा आचरूनि बळी झाला ॥ ४ ॥
दशसहस्र वर्षें खडतर तप । तेणें दुराधर्ष होई, इंद्रा ॥ ५ ॥
सुरेंद्रानें केलें विष्णूचें चिंतन । प्रगट होऊन देव म्हणे ॥ ६ ॥
क्षणांत वधीन तया भौमासुरा । भिऊं नको इंद्रा ऐशा रीति ॥ ७ ॥
बोलूनियां ऐसें मारूनि चपराक । भौमासुर अंत करी विष्णु ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे तयाच्या त्या अस्थि । लोमश दाविती धर्मालागीं ॥

३७६

म्हणे लोमश धर्मासी । कृति अचिंत्य विष्णूची ॥ १ ॥

पुर्वी कृतयुगामाजी । प्राणि वाढले जगतीं ॥ २ ॥
जन्म-मरण संपलें । असंख्यात जीव झाले ॥ ३ ॥
वसुंधरा त्या भारानें । दबूनि जाई शत योजनें ॥ ४ ॥
धरा प्रार्थी गदाधरा । देवा भार हलका करा ॥ ५ ॥
ऐकूनियां ती प्रार्थना । दयासिंधूसी करुणा ॥ ६ ॥
म्हणे आर्त वसुधारिणी । नको चिंता करूं मनीं ॥ ७ ॥
ऐसें देऊनि अभय । देव जाहला अदृश्य ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे देह । वृद्धि पावतां नवल ॥ ९ ॥

३७७

खवळला सिंधु सुटला झंजावात । अवघें विश्व क्षुब्ध तयावेळीं ॥
शृंगावरी घेई वराह भूमीसी । होई त्या समयासी हाहाःकार ॥ २॥
देवऋषि तदा ब्रह्म्यासी प्रार्थिती । ब्रह्मा म्हणे क्षिति उद्धार हा ॥३॥
उद्धारकाळींचा क्षोभ हा जाणोनि । संशय सांडूनि सुखें असा ॥
देव म्हणती आम्हां घडावें दर्शन । कोठें नारायण दावीं देवा ॥
ब्रह्मदेव म्हणे नंदनवनांत । अत्यंत समीप भगवान ॥ ६ ॥
दर्शन तयाचें घेवोनि स्वस्थानीं । देवर्षी निघोनि जाती तदा ॥
वासुदेव म्हणे ऐकोनि हें वृत्त । पांडव मार्गस्थ शीघ्र होती ॥ ८ ॥

अध्याय १४३ वा

३७८

मार्गस्थ ते शूर क्रमिती मार्गातें । स्कंधावरी भाते तयांचिया ॥ १ ॥
नद्या सरोवरें लंघूनियां जाती । गंधमादनासी प्राप्त झाले ॥ २ ॥
काय दैवलीला, सुटे झंजावात । पर्जन्य संतत-धार पडे ॥ ३ ॥
दशदिशा होती धूलिकणें व्याप्त । अंतरिक्ष सर्व आच्छन्न तें ॥ ४ ॥
वायुभग्न-वृक्ष-नाद कडाडला । अस्वास्थ्य चित्ताला सकलांच्या ॥
कृष्णेसवें भीम एका वृक्षातळीं । सकल मंडळी सावधान ॥ ६ ॥
विजा कडाडूनि कोसळती गारा । जलमय धरा होई जणु ॥ ७ ॥
अल्पावधीमाजी ऐसा खेळ झाला । भानु प्रकाशला पुढती वनीं ॥
वासुदेव म्हणे एकत्र मिळोनि । निघाले लक्षूनि पुढती मार्ग ॥ ९ ॥

अध्याय १४४ वा

३७९

एक कोश मार्ग लंघूनियां जातां । येई असमर्थता पांचाळीसी ॥
पाहतां पाहतां कंपित जाहली । मूर्छेनेची आली वेळ तिज ॥
कोसळे कंपित कद्‌लीसमान । नकुल धांवून सांवरीत । ३ ॥
धीर देई राजा मंद भाषिणीसी । नकुल म्हणे कैसी वेळ आली ॥
धांवूनियां सर्व पातले त्या ठायीं । अंकावरी घेई धर्म तिज ॥ ५ ॥
शोक तया होई गतकाल चिंतूनि । पातले तैं मुनि सकल तेथें ॥
शांतिमंत्रघोष वायु शीत-मंद । सुटतां सावध होई कृष्णा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे अजिनशय्येवरी । विश्रांति सुंदरी घेई तदा ॥ ८ ॥

३८०

श्रांत द्रौपदीचे चेपिती चरण । म्हणे भीमा, धर्म, दुर्गमपंथ ॥ १ ॥
सुकुमार पांचाळी क्लांत बहु झाली । चिंता न करावी भीम म्हणे ॥
वाहीन मी स्कंधीं अथवा घटोत्कच । विक्रमी बालक असे माझा ॥
करिसील जरी आज्ञा, तो येऊनि । सकलां उचलोनि नेईल सुखें ॥
आज्ञा घेऊनियां स्मरिलें घटोत्कचा । पुत्र हिडिंबेचा प्राप्त झाला ॥
नम्रभावें करी वंदन सर्वांसी । आज्ञापीं मजसी ताता म्हणे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे बालकासी भीम । हृदयीं धरून कार्य सांगे ॥ ७ ॥

अध्याय १४५ वा

३८१

आज्ञा घेऊनि धर्माची । स्कंधीं घेई द्रौपदीसी ॥ १ ॥
तयावेळीं घटोत्कच । आज्ञा करी निज मित्रांस ॥ २ ॥
ऐसे राक्षस ते सर्व । स्कंधीं घेती परिवार ॥ ३ ॥
महा तपस्वी स्वतंत्र । गगनसंचारी लोमश ॥ ४ ॥
लंघूनियां म्लेच्छ देश । धातु रत्नांचे प्रदेश ॥ ५ ॥
यक्ष, किन्नर, विद्याधर । रुरु, वराह, चमर ॥ ६ ॥
उत्तर कुरूंसी लंघूनि । रम्य कैलास पाहूनि ॥ ७ ॥
बदरीवृक्षाच्या सान्निध । येऊनि वंदिती मुनींस ॥ ८ ॥
पुढती प्रसिद्ध मैनाक । बिंदुसरोवर देख ॥ ९ ॥
पिक असंख्य त्या स्थानीं । शोभा विचित्र कमळांनीं ॥ १० ॥

वंदूनियां भागीरथी । जप तर्पण करिती ॥ ११ ॥
रमले त्या स्थानीं पांडव । वंदी तयां वासुदेव ॥ १२ ॥

अध्याय १४६ वा ३८२

नर-नारायणाश्रमीं । वास करिती येवोनि ॥ १ ॥
व्हावी अर्जुनाची भेट । हाचि सकलांचा हेत ॥ २ ॥
ईशान्येचा सुटला वारा । नवल एकदां त्या स्थळा ॥ ३ ॥
दलें सहस्त्र जयासी । कमळ ऐसें त्या स्थानासी ॥ ४ ॥
पडलें येऊनियां एक । वायुगतीनें सहज ॥ ५ ॥
उचलोनि ते पांचाळी । भीमसेनासी बोलली ॥ ६ ॥
पहा पहा दिव्य पुष्प । रम्य आकार सुगंध ॥ ७ ॥
अर्पीन हें नृपाळासी । अन्य आणीं तूं मजसी ॥ ८ ॥
जरी मजवरी प्रेम । महावीरा, कमळें आण ॥ ९ ॥
न्यावीं काम्यकवनासी । पुरवीं हेचि इच्छा माझी ॥ १० ॥
वासुदेव म्हणे सती । अर्पी पुष्प तें धर्मासी ॥ ११ ॥

३८३

हेतु पूर्ण व्हावा प्रियेचा म्हणूनि । भीम धनुष्पाणी सिद्ध होई ॥१॥
ईशान्य दिशेसी चालला वेगानें । निर्भय चित्तानें एकाकी तो ॥२॥
प्रयत्नें दुर्गम स्थळींही जाईन । निर्धार हा जाण नित्य त्याचा ॥
भीति संभ्रमाचा स्पर्श तया नसे । पुढती एक दिसे गिरिश्रेष्ठ ॥
रम्य तो पर्वत वृक्षलताकीर्ण । शिला नीलवर्ण तयावरी ॥ ५ ॥
कोकिळा कूजन, भ्रमरांचें गीत । पाहोनि हर्षित मनामाजी ॥ ६ ॥
गंधमादन तो सुगंधित बहु । शीत, मंद वायु सुखावह ॥ ७ ॥
पीत, श्वेत, कृष्ण, त्रिपुंड्रची त्याला । तैसा धातु त्याला शोभवीती
पंख त्या मेघांचे, हार प्रवाहांचे । नृत्य गिरिराजाचें भासे भीमा॥९॥
वासुदेव म्हणे नूपुरांचा ध्वनि । मयूर ऐकूनि करिती नृत्य ॥ १० ॥

३८४

कोंवळ्या तृणांचे ग्रास जयांच्या वदनीं ॥
मृग निर्भय ते भीमा पाहती काननीं ॥ १ ॥

यक्ष, गंधर्व ललना अदृश्यस्वरूपें ॥
निर्भय सिंहासी तया पाहाती कौतुकें ॥ २ ॥
मार्ग आक्रमितां मनीं चिंती वृकोदर ॥
पाठवो न कोणा माझ्या शोधार्थ नृपाळ ॥ ३ ॥
हेतु द्रौपदीचा पूर्ण व्हावा हेंचि मनीं ॥
गरुडगतीनें जाई शोधित काननीं ॥ ४ ॥
पाथेय तयासी मार्गीं वाक्य द्रौपदीचें ॥
वेग पाहूनि तयाचा गजयूथ कांपे ॥ ५ ॥
भयाभीत पशूलागीं मल विसर्जन ॥
गजावरी गज फेंकी येतां ते धांऊन ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे लता वृक्ष उत्पाटित ॥
कमळें शोधाया हिंडे भीम काननांत ॥ ७ ॥

३८५

बलाढ्य पांडव दिशा निनादित-। चालला करीत, गिरीवरी ॥ १ ॥
विस्तीर्ण त्या स्थानीं कदलीवन होतें। उपटी मोठमोठे कदलीस्तंभ ॥
हिंडतां हिंडतां करी सिंहनाद। पशु भयाभीत होती तेव्हां ॥ ३ ॥
जलाशय स्थित, उडाले शकुंत। भीम त्या दिशेस जाई तदा ॥ ४ ॥
सरोवर एक पाहिलें विस्तीर्ण। करीतसे भीम जलक्रीडा ॥ ५ ॥
आनंदला, होई श्रम परिहार। पुढती वृकोदर शिखरीं चढे ॥ ६ ॥
निबिड त्या वनीं शंख फुंकीयेला। दंड ठोकियेला भीमसेनें ॥ ७ ॥
दुमदुमूनियां अवघें वन जाई। तया नादें धाई श्वापदांची ॥ ८ ॥
आगमन तदा कनिष्ठ भ्रात्याचें जाणूनि हनुमंतें चिंतीयेलें ॥ ९ ॥
हितास्तव स्वर्गमार्ग अडविला। निद्रावश झाला ऐसें दावी ॥ १० ॥
वासुदेव म्हणे आपटूनि पुच्छ। केला महानाद हनुमंतें ॥ ११ ॥

३८६

ऐकूनि तो घोर स्वन। रोमांचित झाला भीम ॥ १ ॥
कदलीवनीं शिलातलीं। भव्य आकृति देखिली ॥ २ ॥
नयन दिपताती पाहूनि। मेघासम त्याचा ध्वनि ॥ ३ ॥
वर्ण पिंगट तयाचा। ग्रीवा स्कंधावरी त्याच्या ॥ ४ ॥

स्कंध विशालचि होते । कृश कटि ते विराजे ॥ ५ ॥
दीर्घलोमव्याप्त शिर । भुवया आरक्त, चपल ॥ ६ ॥
ऱ्हस्व ओष्ठ, जिव्हा, मुख । रक्तवर्ण तें सुरेख ॥ ७ ॥
शुभ्र स्वच्छ दंत त्याचे । स्पष्ट दिसती भीमातें ॥ ८ ॥
ज्वालायुक्त जैसा अग्नि । पाही भीमासी निरखूनि ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे भीम । सन्निध ठाकला येऊन ॥ १० ॥

३८७

निद्रावश कपि पाहिला भीमानें । वन गर्जनेनें हादरिलें ॥ १ ॥
ऐकूनि तो नाद नेत्र किलकिले । करूनियां बोले कपिश्रेष्ठ ॥ २ ॥
निद्राभंग कां रे केलासी तूं माझा । अधर्म कां ऐसा करिसी सांग॥
दयावंत ज्ञाते, तूंचि कैसा क्रूर । सेविले न थोर ऐसें वाटे ॥ ४ ॥
पातलासी कां रे सांगें ऐशा स्थानीं । अगम्य तो वनीं मार्ग पुढें ॥५॥
पाहोनियां दया येई, तुजप्रति । स्वादुफळें भक्षीं अपूर्व हीं ॥ ६ ॥
देवांचा हा मार्ग, न जाई पुढती । प्राण हे संकटीं घालूं नको ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे विचारी वानर । कोण तूं कोठील भीमालागीं ॥ ८ ॥

अध्याय १४७ वा

३८८

प्रसिद्ध मी भीम, वायूचा तनय । कुंती माझी माय पंडुपत्नी ॥ १ ॥
कोण तूं, वानर कासया झालासी । क्षत्रिय तुजसी विचारी हा ॥२॥
स्मितवदनें तें बोले हनुमान । जाई परतून, वानर मी ॥ ३ ॥
भीम म्हणे नाहीं पुशिलें तुजसी । सोडीं वाट माझी भल्या बोलें ॥
कपि म्हणे जाई लंघूनियां मज । देह व्याधिग्रस्त वृद्ध माझा ॥५॥
भीम म्हणे ब्रह्म जाणूनियां ऐसा । अवमान तुझा कैवीं करूं ॥ ६ ॥
नाहींतरी कार्य सहजचि होतें । लंघिला हनुमंतें जेवीं सिंधु ॥७॥
वासुदेव म्हणे कपि करी प्रश्न । हनुमंत कोण सांग मज ॥ ८ ॥

३८९

भीम म्हणे हनुमंत । महाबळी गुणवंत ॥ १ ॥
शतयोजन विस्तीर्ण । गेला सागर लंघून ॥ २ ॥
रामपत्नीच्या शोधार्थ । भ्राता माझा तो विख्यात ॥ ३ ॥

जाणें तैसाचि मजसी । ऊठ सोडीं वाट माझी ॥ ४ ।
बल, पराक्रम, युद्ध । ऐशारीति मी समर्थ ॥ ५ ॥
सोडीं पंथ हा मर्कटा । अथवा दावीन यमलोका ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कपि । गर्व भीमाचा ओळखी ॥ ७ ॥

३९०

कपि म्हणे कृपा करीं । होई प्रसन्न मजवरी ॥ १
देह जर्जर जाणोनि । पुच्छा ठेवीं उचलोनि ॥ २ ॥
ऐकूनियां भीमसेन । तुच्छ तयासी लेखून ॥ ३ ॥
वाम करें उचलायासी । सिद्ध होतां न हले त्यासी ॥ ४ ॥
योजितांही दोन्ही कर । घामाघूम वृकोदर ॥ ५ ॥
अधोवदन लज्जेनें । करूनि कपींद्रासी म्हणे ॥ ६ ॥
कर जोडितों तुजसी । क्षमा करीं अपराधाची ॥ ७ ॥
सांग सांग अससी कोण । आलों तुजसी शरण ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कपि । तदा सांगे स्ववृत्तासी ॥ ९ ॥

३९१

पाहोनि जिज्ञासा कपींद्र बोलला । भीमा कमलनेत्रा ऐक आतां ॥
हनुमंत नामें वायूचा तनय । अंजनी ते माय कपिभार्या ॥ २ ॥
सुग्रीव सूर्याचा, वाली इंद्रपुत्र । पाहातांचि मज पुढती उभे ॥ ३ ॥
वायु आग्निसम सख्य सुग्रीवाचें । वास्तव्य आमुचें ऋष्यमुकीं ॥४॥
दाशरथीरूपें महाविष्णु तदा । होतां पितृआज्ञा वनीं हिंडे ॥ ५ ॥
मायावी राक्षस मृगरूपें तया । नेई अन्य ठाया कपटरूपें ॥ ६ ॥
हरिलें सीतेसी तदा रावणानें । हनुमंत प्रेमें वृत्त कथी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे बंधुभाव यदा । जागृत नराचा उत्कर्ष तैं ॥ ८ ॥

अध्याय १४८ वा

३९२

बंधूसव राम शोधार्थ निघाला । सुग्रीवा भेटला गिरिवरी ॥ १ ॥
वालीवध केला पुढती रामानें । सुग्रीवासी प्रेमें दिधलें राज्य ॥२॥
सीतेच्या शोधार्थ वानर धाडितां । शोध दक्षिणेचा आम्हांकडे ॥
संपातीनें वृत्त कथिलें आम्हांसी । लंघूनि सिंधूसी त्वरित गेलों ॥

शोधूनियां सीता जाळियेली लंका । कथिलें वृत्तांता श्रीरामासी ॥
बांधूनियां सेतु जाऊनि लंकेसी । वधिलें दुष्टासी श्रीरामानें ॥ ६॥
राज्य अर्पूनियां विभीषणाप्रति । येती अयोध्येसी सीतेसवें ॥ ७ ॥
जोंवरी रामाची कथा भूमीवरी । आयुष्य तोंवरी मजलागीं ॥ ८ ॥
सीतेच्या कृपेनें सर्वसौख्य येथें । गंधर्व रामाचें चरित गाती॥९॥
शाप, पराभव, होऊं नये तुज । भीमा म्हणूनि मार्ग रुद्ध केला ॥
वासुदेव म्हणे सरोवर दावी । कमळें ज्या ठाईं भीमा, कपि ॥११॥

अध्याय १४९ वा

३९३

ऐकूनियां रामकथा । भीम वंदी हनुमंता ॥ १ ॥
तुझ्या दर्शनें मी धन्य । प्रार्थितसें कार्य अन्य ॥ २ ॥
रूप, लंघितां सिंधूसी । बंधो दावीं तें मजसी ॥ ३ ॥
तेणें होईल आनंद । तेंवी सत्य तुझा शब्द ॥ ४ ॥
हनुमंत म्हणे भीमा । रूप न दिसे तें कोणा ॥ ५ ॥
कृत, त्रेत, द्वापर, कलि । भिन्न काल त्या त्या वेळीं ॥ ६ ॥
संधि, द्वापर-कलीचा । घातकी हा सद्धर्माचा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कपि सांगे युगधर्म पुढती ॥ ८ ॥

३९४

कृतयुगामाजी कृतकृत्य जन । रागद्वेषहीन धर्मरत ॥ १ ॥
ध्यान समाधीनें लाभे तयां मुक्ति । रमति आत्मयोगीं सकल वर्ण॥
त्रेतायुगीं यज्ञ, क्रिया ते प्रधान । रजाचें मिश्रण सत्वामाजी ॥ ३ ॥
तप, दान, धर्म, नित्य आचरीति । संकल्पें न सिद्धि केवळ त्यांसी ॥
द्वापरांत होई अधर्माची वृद्धि । तेणें आधि-व्याधि बहुत जनां ॥५॥
पीतवर्ण देव, धर्म तो द्विपाद । वेदामाजी भेद तया युगीं ॥ ६ ॥
एकपाद धर्म नांदे कलीमाजी । वृद्धि तैं तमाची होई बहु ॥ ७ ॥
युगधर्मे होई धर्महीं निष्फळ । भीमा नसे काळ अनुकूल ॥ ८ ॥
युगधर्म ऐसें जाणूनियां राहें । भीमा सुखें जावें फिरूनि आतां॥९॥
वासुदेव म्हणे महाभक्त तेही । अनुसरती पाहीं युगधर्म ॥ १० ॥

अध्याय १५० वा ३९५

भीम म्हणे कपिराजा । लावूं नको मज मार्गा ॥ १ ॥
हेतु पुरल्यावांचून । नाहीं जाणार मी जाण ॥ २ ॥
पाहोनियां त्या आग्रहा । कपि वाढवी निज देहा ॥ ३ ॥
होई द्वितीय गिरिराज । दिपला भीम पाहूनि तेज ॥ ४ ॥
हासूंनियां म्हणे कपि । पूर्ण रूप न हें अद्यापि ॥ ५ ॥
भीम म्हणे बंधुराया । आतां आंवरीं ही काया ॥ ६ ॥
उदित सूर्यासम कांति । नयन पाहूं न शकती ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे दिव्य-। रूपें, हर्षला पांडव ॥ ८ ॥

३९६

आचारेंचि होई धर्म । धर्में वेदार्थांचें ज्ञान ॥ १ ॥
तेणें होई यज्ञसिद्धि । जेणें देवतांची स्थिति ॥ २ ॥
यजन-अध्यापनें विप्र । वैश्यालागीं तो व्यापार ॥ ३ ॥
दंड साधन वीरांचें । सेवा धन तें शूद्रांचें ॥ ४ ॥
राजा मर्यादा जनांची । रक्षी, तया लाभे सिद्धि ॥ ५ ॥
साम, दान, भेद, दंड । उपेक्षा हे पंच मार्ग ॥ ६ ॥
स्त्रिया, मूढ, अथवा लोभी । अयोग्य हे संकेतासी ॥ ७ ॥
धार्मिक ते धर्मकार्जी । पंडित ते अर्थकार्जी ॥ ८ ॥
क्लीब, स्त्रियांमाजी राहो । क्रूर निष्ठुर कर्मी जावो ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे ऐसा । बोध हितकर कपीचा ॥ १० ॥

अध्याय १५१ वा ३९७

बोलूनियां ऐसें पूर्वरूप घेई । आलिंगन देई भीमालागीं ॥ १ ॥
तेणें सकल श्रम हरती भीमाचे । सद्गदित चित्तें वदला कपि ॥ २ ॥
वीरा आतां सुखें जाईं स्वस्थानासी । स्मरण संकटीं करीं माझें ॥
काय तुझें कार्य सांगें करूं आजी । वधूं कौरवांसी काय, बोलें ॥
भीम म्हणे राहीं प्रसन्न मजवरी । हेचि इच्छा करीं पूर्ण माझी ॥
कपि म्हणे नित्य साह्य मी तुम्हांसी । जिंकाल शत्रूसी सहज भीमा
बोलूनियां ऐसें दावोनियां मार्ग । जाहला अदृश्य कपिश्रेष्ठ ॥ ७ ॥

वासुदेव म्हणे ऐका आनंदानें । कथा ही प्रेमानें भारताची ॥ ८ ॥

अध्याय १५२ वा ३९८

गुप्त होऊनियां जातां हनुमान । पर्वत विस्तीर्ण पाही भीम ॥ १ ॥
विशाल स्वरूप वायुतनयाचें । चरित्र रामाचें चिंती मनीं ॥ २ ॥
कपिकाथित मार्गे जातसे वेगानें । सरोवरें, वनें, रम्य पाही ॥ ३ ॥
पंकलिप्त गज, चंचल हरिणि । विहार विपिनीं करिती सुखें ॥ ४ ॥
अंबुजेंचि-करसंपुट जोडिलें । मार्ग ते लंघिले ऐसे भीमें ॥ ५ ॥
सुवर्णकमलयुक्त नदी एक । हंस, चक्रवाक पाही तेथें ॥ ६ ॥
सरितेमाजी तया पाही रम्य वन । हेतु तदा पूर्ण पांडवाचे ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे आठवे पांचाळी । क्लेशयुक्त झाली ऐसी, भीमा ॥ ८ ॥

अध्याय १५३ वा ३९९

भीम तया उपवनीं । पाही एक पुष्करिणी ॥ १ ॥
तेथ कुबेरमंदीर । जवळी रम्य सरोवर ॥ २ ॥
गिरिशिखरीं ते निर्झर । सतत ओतितातो नीर ॥ ३ ॥
पीत कमल पराग । हरण करिती अंतरंग ॥ ४ ॥
प्राशी उदक तेथींचें । समाधान तें वीराचें ॥ ५ ॥
कमळें सौगंधिक तेथ । वैडूर्याचे जणुं देंठ ॥ ६ ॥
हंसपक्षफडत्कारें । कमल पराग उधळले ॥ ७ ॥
कुबेराचें क्रीडास्थान । यक्ष करिती संरक्षण ॥ ८ ॥
क्रोधाविष्ट तें राक्षस । बघूनि बोलले भीमास ॥ ९ ॥
मुनिवेषें शस्त्रधारी । काय हेतु तव अंतरीं ॥ १० ॥
वासुदेव म्हणे भीम । वृत्त करी निवेदन ॥ ११ ॥

अध्याय १५४ वा ४००

धर्मराजाचा बांधव । भीम नामें मी पांडव ॥ १ ॥
द्रौपदीच्या इच्छेसाठीं । आलों कमळें न्यावयासी ॥ २ ॥
दूत म्हणती धनद आज्ञा । घेऊनियां येई प्राज्ञा ॥ ३ ॥
भीम म्हणे मी क्षत्रिय । याचनेचा न परिचय ॥ ४ ॥

वीर ऐसें कथूनि त्यांसी । शिरला सरोवरामाजीं ॥ ५ ॥
नको नको म्हणती दूत । अंतीं होई घोर युद्ध ॥ ६ ॥
भीम सरसावोनि गदा । करीतसे चेंदामेंदा ॥ ७ ॥
गेले पळूनियां दूत । कथिलें कुवेरासी वत्त ॥ ८ ॥
धनद बोलला तयांसी । नका प्रतिरोधूं त्यासी ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे पाहीं । रमला एकाकी त्या ठाईं ॥ १० ॥

अध्याय १५५ वा ४०१

असंख्य कमळें तोडिलीं भीमानें । इतुक्यांत वेगानें सुटला वायु ॥
धूलिकणें व्याप्त जाहलें गगन । दुश्चिन्हें संग्रामसूचक तीं ॥ २ ॥
पाचारूनि धर्म बोले बांधवांसी । वेळ विक्रमाची येई वाटे ॥ ३ ॥
भीमसेन कोठें न दिसे मजसी । कृष्णा, कमळांची मात सांगे ॥४॥
घटोत्कचाप्रति बोले तदा धर्म । दाखवीं तें स्थान बंधु जेथें ॥ ५ ॥
परिवारासह नेई घटोत्कच । भीम ज्या स्थानास, सकलांलागीं ॥
मृत यक्ष तेथें पाहिले धर्मानें । उपदेश प्रेमें केला भीमा ॥ ७ ॥
नकरीं रे ऐसें साहस कदापि । विहार करिती पुढती सर्व ॥ ८ ॥
पाहूनि तें दूत पुनरपि धांवले । तयां शांत केलें युधिष्ठिरें ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे कुवेरासी वृत्त । कळलें समस्त तयावेळीं ॥ १० ॥

अध्याय १५६ वा ४०२

कांहीं काळ शैलशिखरीं तो धर्म । राहिला मानून सौख्य मनीं ॥
एकदां तो बोले सकलांलागूनि । गेलों विविधस्थानीं आनंदानें ॥
वास्तव्यहि केलें पुण्य आश्रमांसी । पुण्यद तीर्थांसी स्नान झालें ॥
भीमा, आतां पाहूं कुबेरमंदीर । मार्गाचा विचार करीं मनीं ॥ ४ ॥
इतुक्यांत होई वाणी गगनांत । प्रवेश न तेथ तुम्हांलागीं ॥ ५ ॥
धर्मा आल्या मार्गें स्वस्थानासी जाईं । योग्य वेळीं पाहीं धनदस्थान
वृषपर्व्याश्रमीं जा पुढें एथूनि । आर्ष्टिषेणाश्रमीं वास करीं ॥ ७ ॥
पुष्पवृष्टि तदा होई तया स्थानीं । सकलांच्या मनीं विस्मय वाटे ॥
वासुदेव म्हणे ऐकूनि ते वाणी । पातले स्वस्थानीं धर्मादिक ॥ ९ ॥

# जटासुरवधपर्व ८

अध्याय १५७ वा

४०३

नरनारायणाश्रमीं । सुखें राहिले येऊनि ॥ १ ॥
ऐसें गेले कांहीं दिन । आलें संकट दारुण ॥ २ ॥
घटोत्कचादिक सर्व । नसतां तेंवी वृकोदर ॥ ३ ॥
आला मायावी ब्राह्मण । हरिलें युधिष्ठिरमन ॥ ४ ॥
नकुळ, सहदेव, पांचाळी । चरणीं त्याच्या नम्र झाली ॥५॥
आश्रयासी तो राहिला । जटासुर नाम त्याला ॥ ६ ॥
पुढती पाहूनियां संधि । गेले मृगयेसी भीमादि ॥ ७ ॥
लोमश, मग्न समाधींत । इतर गुंतले स्नानांत ॥ ८ ॥
ऐसें पाहूनि राक्षस । उचली त्वरें द्रौपदीस ॥ ९ ॥
शस्त्रें घेऊनि वीरांचीं । धर्म, नकुळ, सहदेवासी ॥ १० ॥
वासुदेव म्हणे पाहीं । दैत्य काननांत जाई ॥ ११ ॥

४०४

चपल सहदेव दूर होई यत्नें । हांका दीर्घस्वनें मारी भीमा ॥ १ ॥
धर्म म्हणे मूढा राक्षसा कां ऐसा । जासी वाममार्गा त्यजूनि धर्म ॥
आधार मानव सकल जीवांसी । तूंहि आश्रयासी असर्सी माझ्या ॥
मित्र, अथवा जो कां विश्वासूनि राहे । अन्नदाता पाहें, आश्रय जो ॥
ऐसीयांसी द्रोह करूं नये कदा । अन्याय हा मंदा नकरीं ऐसा ॥५॥
कां रे तुज जीव जाहला नकोसा । अर्पूनि शस्त्रास्त्रां युद्ध करीं ॥६॥
मग सुखें नेईं हरूनि साध्वीतें । ऐशा वाम पंथें जाऊं नको ॥ ७ ॥
स्पर्शूनि साध्वीतें भक्षिलेंसी विष । धर्म, राक्षसास वदला ऐसें ॥८॥
वासुदेव म्हणे काळ विनाशाचा । येतांचि मर्यादा लंघी नर ॥ ९ ॥

४०५

ऐसें बोलूनियां धर्म । सहज करी एक कर्म ॥ १ ॥
अवलंबूनि गरिमेसी । दमवी स्वबळें दैत्यासी ॥ २ ॥
नवल झालें तया वेळीं । दैत्यगति मंद झाली ॥ ३ ॥

अभय देऊनियां धर्म । त्वरित येईल म्हणे भीम ॥ ४ ॥
चिंता न करावी मानसीं । गति रोधिली खळाची ॥ ५ ॥
सहदेव म्हणे धर्मा । आतां करूं क्षात्रियकर्मा ॥ ६ ॥
मारूं अथवा मरूनि जाऊं । ऐसें दुष्कृत्य न साहूं ॥ ७ ॥
दैत्य नांदतां जिवंत । जरी होईल सूर्यास्त ॥ ८ ॥
क्षात्रिय हे वीर, संज्ञा । पुढती त्यागीन मी प्राज्ञा ॥ ९ ॥
उभा राहें म्हणे दुष्टा । मजसवें करीं युद्धा ॥ १० ॥
म्हणे वासुदेव तदा । दिसली सकलांसी गदा ॥ ११ ॥

४०६

जटासुर कालवश । भ्रम तयाच्या चित्तास ॥ १ ॥
भ्रात्यांसवें द्रौपदीसी । नेतां पाही भीम त्यासी ॥ २ ॥
भीम म्हणे मी तुजला । ओळखिलें त्याचि काला ॥ ३ ॥
परी निरपराधनाश । कारण होईल पतनास ॥ ४ ॥
स्वस्थ राहिलों या ठायीं । आतां जाण गळ कंठीं ॥ ५ ॥
ऐसें ऐकूनियां दैत्य । युद्धालागीं होई सिद्ध ॥ ६ ॥
नाहीं म्हणे मी दिङ्मूढ । तुझी पाहातसें वाट ॥ ७ ॥
तुज क्षणांत वधून । मृत दैत्यांसी तर्पीन ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे भीम । क्रोधें धांवे तें गर्जून ॥ ९ ॥

४०७

माद्रीसुत दोघे धांवले साह्यासी । निवारूनि त्यांसी भीम म्हणे ॥
वत्सहो, प्रेक्षक व्हावें या युद्धाचे । वधीन दैत्यातें क्षणामाजी ॥२॥
ऐसें बोलूनियां युद्ध आरंभिलें । कंपित जाहलें अवघें वन ॥ ३ ॥
तल, मुष्ट्याघात, वृक्ष, परस्पर । ताडिती सत्वर एकमेकां ॥ ४ ॥
चटाचट नाद होई तया स्थानीं । वृक्षहीन भूमी जाहली ते ॥ ५ ॥
वाली सुग्रीव कीं मैनाक ते द्रोण । मत्त गजांसम लढती वनीं ॥
पंचफणायुक्त कर तें भीमाचा । आघातें ग्रीवेचा भंग करी ॥ ७ ॥
उचलूनि अंतीं आपटिला खालीं । हाडें चूर्ण झालीं तुटलें शिर ॥
वासुदेव म्हणे विजयी भीमाचें । स्तवनाचि साचें करिती मुनि ॥

———

# यक्षयुद्धपर्व ९

अध्याय १५८ वा

४०८

एकदां बांधवां युधिष्ठिर म्हणे । पार्थ, आगमनें नोपवील ॥ १ ॥
समीप तो आला पुण्यकाल आतां । संकेत कैलासा येऊं ऐसा॥२॥
सिंह, व्याघ्र, मृग, मयूर, कोकिळ । वृक्ष ते प्रफुल्ल पाहूं आतां ॥३॥
तपस्वी जनांची अनुज्ञा घेऊनि । वृषपर्व्याश्रमीं प्राप्त झाले ॥ ४ ॥
सत्कार तयांचा राजर्षीनें केला । सप्त दिन झाला वास तेथें ॥ ५ ॥
सकल परिवार ठेवूनि त्या स्थानीं । रायासी वंदूनि पुढती जाती ॥
वृषपर्वा तयां पोंचवूनि येई । भ्रांत्यांसवें जाई पुढती धर्म ॥ ७ ॥
चतुर्थ दिनीं ते गिरीवरी जाती । वासुदेव चित्तीं संतोषला ॥ ८ ॥

४०९

पुढती दिसे रम्य वन । चढती, गिरि माल्यवान ॥ १ ॥
तेथें बहुत जलाशय । पुण्यस्थानें निरामय ॥ २ ॥
विविध लता वृक्षराजी । भ्रमर मकरंद सेविती ॥ ३ ॥
शिखर गंधमादनाचें । पुष्प-फल-युक्त होतें ॥ ४ ॥
देव, गंधर्व क्रीडती । सिंह, व्याघ्रहि नांदती ॥ ५ ॥
किती हंस ते सारस । करिणींसवें मत्त गज ॥ ६ ॥
निर्झर ते स्वैरगति । सुखें मयूर नाचती ॥ ७ ॥
रजत, सुवर्ण, हरिताल । शिलाजितहि हिंगूल ॥ ८ ॥
किन्नर, गंधर्व त्या स्थानीं । सामगायनाचा ध्वनि ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे रम्य । विस्मयकारी ऐसें वन ॥ १० ॥

४१०

समृद्ध तो गिरि पाहूनियां वनीं । अतृप्तचि मनीं सर्वकाल ॥ १ ॥
ऐसी अपूर्व ते शोभा त्या स्थानाची । आर्ष्टिषेण ऋषि नांदे तेथें ॥
तेजस्वी तो कृश अस्थिचर्म-मात्र । धर्मपारंगत मुनिश्रेष्ठ ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे पातले त्या स्थानीं । देखिलें दुरोनि मुनीलागीं ॥४॥

अध्याय १५९ वा

४११

तपें दग्धपाप आर्ष्टिषेणाप्रति । पांडव वंदिती कथूनि नाम ॥ १ ॥
तपोबळें मुनि ओळखी पांडवां । सन्मानूनि तयां बैसा म्हणे ॥२॥
कुशल पुसोनि मुनि म्हणे धर्मा । असत्याचरणा न करिसी कीं ॥
मातापितरांचें करिसी कीं श्राद्ध । मानिसी कीं पूज्य गुरुजनां ॥४॥
सर्वज्ञ मी ऐसें नयेचि कीं मना । असंतुष्ट धौम्या करिसी ना कीं ॥
दान, धर्म, तप, शौच ते रुजुता । यामाजी पूर्वजां अनुसरसी कीं ॥
माता-पिता, अग्नि, गुरु, आत्मसेवा । करील, त्या ठेवा इहपर ॥७॥
वासुदेव म्हणे बोले युधिष्ठिर । आचरितों शास्त्र यथाशक्य ॥८॥

४१२

अमा-पूर्णा-संधि साधूनि तपस्वी । येती या स्थानासी मुनि म्हणे ॥
यक्ष, विद्याधर, गंधर्वही येती । पुढती न गति मानवांची ॥ २ ॥
पर्वकाळीं येई कुबेर या स्थानीं । तुंबरूचा ध्वनि ऐकूं येई ॥ ३ ॥
बहु चमत्कार पर्वकाळीं होती । यास्तव पुढती जाऊं नका ॥ ४ ॥
मुनिमान्य फळें रसाळ भक्षूनि । एथेंचि राहूनि सौख्य भोगा ॥५॥
सर्वदा पावाल तेणेंचि कल्याण । अवनीं जिंकून संरक्षाल ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे आर्ष्टिषेण मुनि । संतोषूनि मनीं वदती ऐसें ॥ ७ ॥

अध्याय १६० वा

४१३

मुनिवचनें पांडव । सुखें राहियेले सर्व ॥ १ ॥
सपरिवार घटोत्कच । गेला आपुल्या स्थानास ॥ २ ॥
अवलोकिती चमत्कार । रमले तया स्थानीं वीर ॥ ३ ॥
होती बहुत गांठीभेटी । करिती विविध कथा गोष्टी ॥ ४ ॥
महा ऱ्हदामाजी एका । गरुडें धरियेलें नागा ॥ ५ ॥
तदा पर्वत कंपित । नवल वाटे पांडवांस ॥ ६ ॥
पुष्पें अपूर्व उडालीं । सकलांनीं अवलोकिलीं ॥ ७ ॥
दिव्य सुगंधित पुष्पें । अवलोकूनि कृष्णा हर्षे ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कृष्णा । तदा बोले भीमसेना ॥ ९ ॥

४१४

नरश्रेष्ठा भीमा खांडव वनांत। विक्रमी तो पार्थ विजयी झाला ॥१॥
मायावी दैत्यांचा करोनि संहार। गांडीव सशर मेळविलें ॥ २ ॥
प्रेक्षणीय वन व्हावें दैत्यहीन। महाबळी भीम-यश वाढो ॥ ३ ॥
शैलशिखर हें पाहीन केधवां। ऐसें वाटे जीवा सर्वकाळ ॥ ४ ॥
ऐकोनि ते वाणी महावीर वेगें। जाई गिरिमार्गें सिंहापरी ॥ ५ ॥
तया गिरीवरी कुबेरमंदिर। पाहिलें अपूर्व रत्नमय ॥ ६ ॥
सुवर्णाचा तट रत्नजडित द्वारें। भोंवतीं मंदिरें स्फटिकाचीं ॥ ७ ॥
विलासिनी स्त्रिया करिती रम्य नृत्य। पताकांनीं तट शोभतसे ॥
वीर राही उभा धनुष्य टेंकूनि। वैभव स्मरूनि खिन्न होई ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे प्रत्यंचा ओढोनि। करी शंखध्वनि भीमसेन ॥ १० ॥

४१५

ऐकूनि तो महानाद। आले कुबेराचे दूत ॥ १ ॥
यक्ष, राक्षस धांवले। भीमासवें युद्ध झालें ॥ २ ॥
महावीर भीमसेन। करी सकलांसी ताडन ॥ ३ ॥
सोडूनियां प्रखर शर। केला दारुण संहार ॥ ४ ॥
पळती दूत तैं भयानें। मणिमान तयां म्हणे ॥ ५ ॥
भिऊनियां मानवासी। त्यजितां कासया रणासी ॥ ६ ॥
ऐसें बोलूनि तो वीर। गदा फेंकी भीमावर ॥ ७ ॥
गदा चुकवूनि भीम। शक्ति, शूलही छेदून ॥ ८ ॥
गदाघातें वधिला दैत्य। पळती तदा अवशिष्ट ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे भीम। करी गर्जना दारुण ॥ १० ॥

अध्याय १६१ वा

४१६

शैलशृंगावरी गर्जना ऐकूनि। धर्मराज मनीं चिंताग्रस्त ॥ १ ॥
पांचाळी स्वाधीन मुनींच्या करूनि। बांधव त्या स्थानीं प्राप्त झाले ॥
पाहोनि तें कृत्य धर्म खिन्न झाला। दुःखानें बोलला भीमालागीं ॥

इच्छिसी तूं प्रिय, भीमा जरी माझें। पुनरपि ऐसें नकरीं कृत्य ॥४॥
इतुक्यांत येई कुबेर त्या स्थानीं। वृत्तांत ऐकूनि दूतमुखें ॥ ५ ॥
यक्ष–राक्षसांचा घेऊनि परिवार। पाही युधिष्ठिर तयालागीं ॥ ६ ॥
वंदूनियां धर्मापुढती उभा राही। सुप्रसन्न होई धनद तेव्हां ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे निर्भय तो भीम। सज्ज चाप बाण उभा असे ॥ ८ ॥

४१७

नरवाहन तो कुबेर धर्मासी। म्हणे या स्थानासी राहीं सुखें ॥ १ ॥
सर्वभूतहितरत तूं सर्वदा। येऊं नको क्रोधा दूतकर्में ॥ २ ॥
निमित्तचि जाणे भीम हा तयांसी। पूर्वींची तो ग्रासी काल तयां ॥
वृकोदरावरी जाहलों प्रसन्न। मुक्त शापांतून केलें मज ॥ ४ ॥
धर्म म्हणे कां रे शाप तो कोणाचा। ऐकवीं वृतांता मजलागीं ॥५॥
वासुदेव म्हणे समस्त वृत्तांत। कुबेर धर्मास कथीतसे ॥ ६ ॥

४१८

पूर्वीं कुशावती देशीं। जातां देवांच्या कार्यासी ॥ १
मार्गीं मुनि यमुनातीरीं। उग्र तपश्चर्या करी ॥ २ ॥
उचलूनि एक कर। उभा भास्करासमोर ॥ ३ ॥
ऐसा अगास्ति देखिला मणिमाना मोह झाला ॥ ४ ॥
मूढ थुंकतां मस्तकीं। क्रोधें बोलला अगास्ति ॥ ५ ॥
अवमान हा कुबेरा। तुझ्या पुढती माझा झाला ॥ ६ ॥
सैन्यासवें त्या मूढासी। मनुज मारील एकाकी ॥ ७
त्यासी भेटतां तूं मुक्त। धर्मा ऐसें पूर्ववृत्त ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे भीम। होई ऐकूनि प्रसन्न ॥ ९ ॥

अध्याय १६२ वा

४१९

संकटीं जें धैर्य तेचि धृति जाण। सतत प्रयत्न दक्षता ते ॥ १ ॥
देश, काल तैंवी पराक्रम थोर। पंच हे प्रकार लोकतंत्रीं ॥ २ ॥
धनद म्हणे धर्मा देशकालाविण। व्यर्थ होती यत्न मानवाचे ॥ ३॥
दक्ष, पराक्रमी कृतयुगीं जन। ज्ञानाचि प्रधान तयाकाळीं ॥ ४ ॥
केवळ क्रोधानें, अनर्थाची प्राप्ति। वंचक, साहसी, पापयुक्त ॥ ५ ॥

युधिष्ठिरा भीम अधर्मज्ञ कोपी । मूढ, गर्व चित्तीं असहिष्णुता ॥६॥
राहोनि आश्रमीं बोध करीं तया । दूत तया ठाया सेवितील ॥ ७॥
वासुदेव म्हणे कुबेर पार्थाचें । कुशल स्वर्गीचें कथन करी ॥ ८॥

४२०

बंधु भीमाचा तो सान । तत्व-अर्थविधानज्ञ ॥ १ ॥
सर्वधर्मतत्त्ववेत्ता । कुशल असे स्वर्गी भ्राता ॥ २ ॥
सर्व लक्षणें प्रसिद्ध । तयामाजी जन्मसिद्ध ॥ ३ ॥
दम, दान, बल, बुद्धि । धैर्य, लज्जा, अकर्माची ॥ ४ ॥
कदाकाळीं निंद्यकर्म । न करी तेजस्वी अर्जुन ॥ ५ ॥
कुलभूषण तो स्वर्गी । अस्त्रविद्या शिकतो आजी ॥ ६ ॥
प्रपितामह शांतनूसी । हर्ष पाहूनि पार्थासी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे चित्त । पांडवांचें तें हर्षित ॥ ८ ॥

४२१

कुबेरमुखानें ऐके आत्मदोष । लाजविती पार्थगुण तया ॥ १ ॥
खिन्न वदनानें भीम गदा ठेवी । प्रत्यंचा उतरी धनुष्याची ॥ २ ॥
कुबेरासी करी आदरें वंदन । तुष्ट वैश्रवण बोले तया ॥ ३ ॥
वीरा मानहानि करीं दुर्जनांची । वृद्धि सुहृदांची नित्य करीं ॥ ४ ॥
वीरहो, तुम्हांसी सर्वकार्जी साह्य । करितील यक्ष वसा एथें ॥ ५ ॥
कृतार्थ किरीटी भेटेल येऊनि । बोलूनियां वाणी देव गेला ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कुबेरसदनीं । राहिले जाऊनि सुखें वीर ॥ ७ ॥

अध्याय १६३ वा

४२२

शैलशृंगावरी धौम्य, आर्ष्टिषेण । भेटती येऊन धर्मालागीं ॥ १ ॥
पाहूनि तयांसी पांडव वंदिती । मुनि तें पूर्वेसी नेई धर्मा ॥ २ ॥
इंद्र, कुबेर या दिशेतें रक्षिती । आदित्या वंदिती मुनि येथें ॥ ३ ॥
दक्षिणेसी यम, तयाचें भवन । नामें संयमन, ख्यात असे ॥ ४ ॥
पश्चिम दिशेतें रक्षितो वरुण । अस्ताचल रम्य पाहीं धर्मा ॥ ५ ॥
उत्तरेसी मेरु ब्रह्मसदन तें । पुढती विष्णूचें स्थान असे ॥ ६ ॥

प्रदक्षिणा घाली सूर्य मेरूप्रति। ऐसी या स्थानाची महती असे॥
वासुदेव म्हणे कथिती धौम्य मुनि। ऋतु, काल जनीं, सूर्य जाणा॥

अध्याय १६४ वा ४२३

रम्य गिरीवरी राहिले सुखानें। उदयास्तदर्शनें तोष वाटे॥ १॥
ठाईं ठाईं जल विपुल, विस्तीर्ण। प्रदेश, हिंडून न संपेचि॥ २॥
एक मास वीर राहिले त्या स्थानीं। पार्थासी स्मरूनि निरंतर॥३॥
पार्थ भेटीलागीं उत्कंठित चित्त। वेळ ती समीप येई आतां॥ ४॥
आग्नेय, वारुण, सौम्य, तें वायव्य। पाशुपत, ऐंद्र, वैष्णवहि॥५॥
ब्राह्म, पारमेष्ठ्य अस्त्रें संपादूनि। अर्जुन वंदूनि लोकपालां॥ ६॥
प्रदक्षिणा प्रेमें घालूनि इंद्रासी। गंधमादनासी येई सुखें॥ ७॥
वासुदेव म्हणे यक्षयुद्धपर्व। संपतां अपूर्व हर्ष वाटे॥ ८॥

---

## निवातकवचयुद्धपर्व १०

अध्याय १६५ वा ४२४

चिंतितां पार्थासी आला रथ एकाएकीं॥
चार अश्व, विजेसम झळकली कांति॥ १॥
अवलोकितां मातलि पांडव हर्षित॥
हर्ष गगनीं न मावे पाहूनि पार्थास॥ २॥
वंदिलें यथाधिकार सकळ भ्रात्यांसी॥
वंदूनि मुनि धौम्यातें प्रेमभरें आधीं॥ ३॥
समाधान द्रौपदीचें करूनि बैसला॥
एकमेक प्रशंसिती हर्षें तया काला॥ ४॥
सत्कार घेवोनि जाई मातलि स्वर्गासी॥
इंद्रदत्त वस्तु अर्पी, पार्थ द्रौपदीसी॥ ५॥
म्हणे, इंद्र, पशुपति, वायु, संतोषूनि॥
देऊनि दर्शन गेले अस्त्रें समर्पोनि॥ ६॥

निवेदूनियां संक्षेपें सकलहि वृत्त ॥
वासुदेव म्हणे झाले सर्व निद्रावश ॥ ७ ॥

अध्याय १६६ वा ४२५

प्रातः काळ होतां नम्रपणें पार्थ । वंदन धर्मास करीतसे ॥ १ ॥
अंतरिक्षामाजी इतुक्यांत निर्घोष । मधुर घंटानाद कर्णी येई ॥ २ ॥
पुरंदर मोदें पातला त्या स्थानीं । शास्त्रोक्त पूजनीं रमला धर्म ॥ ३ ॥
कर जोडूनियां भ्रात्यांसवें पार्थ । नयाच्या समीप उभा ठेला ॥ ४ ॥
नम्रभाव त्याचा पाहोनि धर्मानें । अवघ्राण केलें मस्तकाचें ॥ ५ ॥
इंद्र म्हणे धर्मा भोगिसील राज्य । काम्यकवनांत जाई आतां ॥ ६ ॥
कृतकृत्य पार्थ वधूनि शत्रूंसी । आनंद मानसीं दिधला मज ॥ ७ ॥
त्रैलोक्यीं अजिंक्य होईल अर्जुन । धर्मासी कथून इंद्र गेला ॥ ८ ॥
व्रतस्थ जो कोणी इंद्र समागम । संवत्सर पूर्ण पठण करी ॥ ९ ॥
निर्विघ्न होवोनि शतायु तो जाणा । वासुदेव जनां भावें कथी ॥ १० ॥

अध्याय १६७ वा ४२६

धर्म म्हणे धनंजया । कैसें आराधिलें देवां ॥ १ ॥
वत्सा, सकल वृत्त सांगें । उतावीळ चित्त माझें ॥ २ ॥
प्रेमभावें वदला पार्थ । गेलों वंदूनि वनांत ॥ ३ ॥
एकरात्र भृगृतुंगीं । वसतां विप्र भेटे मार्गी ॥ ४ ॥
प्रोत्साहन मिळतां त्याचें । गेलों पुढती हिमाद्रीतें ॥ ५ ॥
आरंभिलें घोर तप । वासुदेव गातो वृत्त ॥ ६

४२७

प्रथम मासीं फल-मूल । द्वितीयांत केवळ जल ॥ १ ॥
वायुभक्षण पुढती । उभा राहिलों चतुर्थी ॥ २ ॥
करूनियां ऊर्ध्व हस्त, । नवल झालें पांचव्यांत ॥ ३ ॥
आलें भूत वराहाचें । किरातही त्याच्या मागें ॥ ४ ॥
शरें वेधितां वराहा । किरातही सोडी शरा ॥ ५ ॥
पुढती होतां युद्ध घोर । झाले किरात सहस्र ॥ ६ ॥

क्षणीं पालटूनि रूपें । विफल करिती सकल अस्त्रें ॥ ७ ॥
अंतीं केलें द्वंद्वयुद्ध । पडलों होऊनि निश्चेष्ट ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । सांगे आनंदें स्ववृत्त ॥ ९ ॥

४२८

स्त्रियांसमावेत हांसूनियां भूत । अदृश्य समक्ष झालें माझ्या ॥१॥
उमेसह सांब देऊनि दर्शन । जाहला प्रसन्न मजवरी ॥ २
वृषभध्वज तो भूषणें सर्पांचीं । वंदिलें तयासी प्रेमभावें ॥ ३ ॥
पाशुपत तेणें अर्पियेलें मज । पावलों आनंद अंतर्यामीं ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे पावे अंतर्धान । कथूनि विधान भोलासांब ॥ ५ ॥

अध्याय १६८ वा ४२९

पुढती आला तोचि द्विज । निवेदिलें त्यासी वृत्त ॥ १ ॥
वदला तो, इंद्र आतां । तुज अर्पील शस्त्रास्त्रां ॥ २ ॥
झालें तैसेंचि नृपाळा । स्वर्गवास पुढती झाला ॥ ३ ॥
पंचदशाविध अस्त्रें । पंच प्रयोग जाणिले ॥ ४ ॥
वधीं ‘ निवातकवच ’। अर्पी याचि दक्षिणेस ॥ ५ ॥
ऐसें वदला देवेंद्र । अर्पी आपुलाचि रथ ॥ ६ ॥
संतोषूनियां विबुध । देती शंख देवदत्त ॥ ७ ॥
दुष्ट, सागरनिवासी । सज्ज जाहलों वधासी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । आला सागरतीरास ॥ ९ ॥

अध्याय १६९ वा ४३०

विस्तीर्ण सागर भयंकर नाद । लाटा फेनयुक्त गिरि जैसे ॥ १ ॥
सहस्रावधि त्या नौका रत्नयुक्त । फिरती जळांत इतस्ततः ॥ २ ॥
कूर्म, नक्रादिक फिरती महामत्स्य । विखुरले शंख असंख्यात ॥३॥
मातलि पातला दैत्य नगरासी । भासलें, तयासी इंद्रचि मी ॥ ४ ॥
पिनद्ध करोनि नगरद्वारें तदा । शस्त्रास्त्र संपदा करिती सिद्ध ॥५॥
देवदत्त नाद ऐकूनि असुर । वाद्यें भयंकर वाजविती ॥ ६ ॥

परस्परांमाजी समर जुंपलें । ऋषि मुनि आले तयास्थानीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे स्तविती पार्थास । मुनि, विजयार्थ मधुरशब्दें ॥ ८ ॥

अध्याय १७० वा ४३१

सकल निवातकवच । येती धांवोनि युद्धार्थ ॥ १ ॥
अडविला रथमार्ग । मजसी केलें शरविद्ध ॥ २ ॥
ऐसें पाहूनियां शर । सोडियेले मी प्रखर ॥ ३ ॥
रथ-अश्व-चूर्ण केलें । तेणें दैत्य क्रुद्ध झाले ॥ ४ ॥
केले प्रहार वहुत । झालों व्यथित मनांत ॥ ५ ॥
कुशल मातलि सारथी । साह्य तयाचें मजसी ॥ ६ ॥
वृद्धि पाहूनि असुरांची माधवास्त्र योजूनि चापीं ॥ ७ ॥
केला असुरांचा संहार । झाले दैत्य क्षीणवल ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे अंतीं । करिती मायावी युद्धासी ॥ ९ ॥

अध्याय १७१ वा ४३२

धर्मालागीं वोले पार्थ । अश्मवृष्टि तें रणांत ॥ १ ॥
पुढती जलवृष्टि थोर । सुटला वायु घनघोर ॥ २ ॥
क्षणभरी भ्रांत मन । जपिलें अस्त्र विशोषण ॥३॥
अग्निवृष्टि करिती दैत्य । पडला अंधकार त्यांत ॥ ४ ॥
भ्रांत जाहला मातलि । म्हणे घोर वेळ आली ॥ ५ ॥
वळी, शंवर तें वृत्र । युद्धें पाहिलीं समस्त ॥ ६ ॥
समय ऐसा नच आला । दिधलें अभय तयाला ॥ ७ ॥
मोहनास्त्र जपूनियां । नष्ट केली असुरमाया ॥ ८ ॥
पुनःप्रकाश अंधार । करिती दैत्य वारंवार ॥ ९ ॥
पडतां प्रकाश दुष्टांसी । पार्थ धाडी यमसदनासी ॥ १० ॥
वासुदेव म्हणे दैत्य । सकळ दिसती ना तयास ११ ॥

अध्याय १७२ वा ४३३

पुढती पळाले सकळ असुर । दुष्टांचा संहार वहुत झाला ॥ १ ॥
पाठलाग वेगें करितां तयांचा । केला शोध माझा भूमींतूनि ॥ २ ॥

निर्मिले पर्वत बहु भोंवतालीं । धैर्यानें मातलि वदला मज ॥ ३ ॥
वज्रास्त्र सोडोनि करीं यांचा घात । अंतीं तेंचि अस्त्र योजियेलें ॥४॥
तेणें परस्परां कवटाळूनि मेले । मज अभिनंदिलें मातलीनें ॥ ५ ॥
लवहीन क्षत जाहलें आम्हांसी । विस्मय मनासी मातलीच्या ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे देव, नगरांत । गेले वास्तव्यार्थ असुरांच्या ॥ ७ ॥

४३४

मातलि पार्थासी सांगे वृत्तांत तेथींचा ॥
वास तया स्थानीं पूर्वी देवांचाचि होता ॥ १ ॥
निवातकवच वळी होती ब्रह्मवरें ॥
प्रजापतीलागीं तदा प्रार्थिलें देवेंद्रें ॥ २ ॥
अन्य देह घेऊनि तूं वधिसील यांसी ॥
ब्रह्मा बोलला तें पार्था कार्य तूं साधिसी ॥ ३ ॥
अशक्य जें देवांप्रति तेंचि कार्य झालें ॥
वासुदेव म्हणे वीर स्वर्गामाजी गेले ॥ ४ ॥

अध्याय १७३ वा

४३५

दैत्य नगरांतूनि फिरतां माघारीं । अपूर्व नगरी पाहियेली ॥ १ ॥
इच्छागामी पुर संचरे नभांत । रत्नमय वृक्ष लता तेथें ॥ २ ॥
कालकंज नामें पौलोम हे दैत्य । नित्य हृष्टचित्त वसती तेथें ॥ ३ ॥
बुरुज, गोपुरें, आयुधें, विविध । पुशिलें मातलीस वृत्त त्यांचें ॥४॥
कथिलें तयानें असुरांनीं तप । करूनि ब्रह्म्यास तोषवीलें ॥ ५ ॥
पुलोमा, कालका मागती हा वर । पुत्रांसी नगरप्राप्ति ऐसी ॥ ६ ॥
हिरण्यपुर हें नाम नगरासी । वधीं या दैत्यांसी वज्राघातें ॥ ७ ॥
अजिंक्य तें स्थान ऐकूनि तोषलों । राजा सिद्ध झालों रणालागीं ॥
वासुदेव म्हणे पुढती अर्जुन । नगरलक्षून झेंप घेई ॥ ९ ॥

४३६

झालें युद्ध घनघोर । होतें विचित्र तें पुर ॥ १ ॥
भूमीवरी येई क्षणीं । क्षणीं उड्डाण गगनीं ॥ २ ॥
क्षणामाजी वक्रगति । क्षणीं निमग्न उदकीं ॥ ३ ॥

अस्त्रचमत्कारें पार्थे । करी नगर तें विद्ध ॥ ४ ॥
क्रुद्ध होऊनि असुर । रुद्ध केला धनुर्धर ॥ ५ ॥
कठिण काळीं तें रुद्रास्त्र । जपूनि सोडीतसे पार्थ ॥ ६ ॥
होई आश्चर्य त्या काळीं । अस्त्र विविधरूपें धरी ॥ ७ ॥
सिंह, व्याघ्र, महिषादिक । अवघे व्यापिती दैत्यांस ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । ऐसे वधी सकल दैत्य ॥ ९ ॥

४३७

पार्थ म्हणे धर्मा विक्रम हा माझा । पाहोनि इंद्राचा सूत हर्षे ॥ १ ॥
आक्रोश त्या स्थानीं करिती दैत्यस्त्रिया । त्यजोनि ऐश्वर्या पिटिती ऊर
ऐकोनि तें वृत्त इंद्र संतोषला । धन्य धन्य वाळा वदला मज ॥ ३ ॥
असाध्य हें कर्म देव-दानवांसी । बोलला मजसी राया, इंद्र ॥ ४ ॥
लाभली दक्षिणा जाहलों संतुष्ट । अजिंक्य सर्वांस होसील तूं ॥ ५ ॥
बाहुबळें तुझ्या पृथ्वीचें पालन । सुखें राव धर्म, करिल म्हणे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे इंद्राची हे वाणी । नृपाळ ऐकूनि संतोषला ॥ ७ ॥

अध्याय १७४ वा

४३८

म्हणे अर्जुन धर्मासी । पूर्ण जाहली विश्रांति ॥ १ ॥
देह जाहला अक्षत । पाचारिलें इंद्रें मज ॥ २ ॥
वदला भीष्म, द्रोण, कृप, । कर्ण, शकुनी, तुजसी तुच्छ ॥३॥
कवच अभेद्य, हे माला । प्रेमें अर्पिली मजला ॥ ४ ॥
म्हणे पुढती एके दिनीं । आतां जाईं रे स्वस्थानीं ॥ ५ ॥
होतां अनुज्ञा तयाची । राया भेटलों तुम्हांसी ॥ ६ ॥
धर्म म्हणे हे फाल्गुना । दिव्य अस्त्रें दावीं आम्हां ॥ ७ ॥
प्रातःकाळीं म्हणे पार्थ । दावीन मी उदईक ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ऐसे । वीर पावले निद्रेतें ॥ ९ ॥

अध्याय १७५ वा

४३९

द्वितीय दिनीं प्रातःकाळीं । वीर उत्सुक अंतरीं ॥ १ ॥

शुचिर्भूत होऊनि पार्थ । कल्पी पृथ्वीरूप रथ ॥ २ ॥
ध्यानबळें आरूढला । इंद्रदत्त कवच त्याला ॥ ३ ॥
आरंभिलें प्रयोगासी । कंप पावली धरित्री ॥ ४ ॥
वायु, सूर्य, रुद्र झाले । द्विज वेद विसरले ॥ ५ ॥
ऋषि, राक्षस आणि देव । गणांसह महादेव ॥ ६ ॥
स्तविती येऊनि पार्थासी । वायु करी पुष्पवृष्टि ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे तदा । वनीं हाहाःकार ऐसा ॥ ८ ॥

४४०

करिती देव ज्या प्रेरणा । येती नारद त्या स्थाना ॥ १ ॥
म्हणती थांब थांब पार्था । करूं नको या प्रयोगा ॥ २ ॥
पुढती नसतां लक्ष्य कांहीं । अथवा पीडा न लवही ॥ ३ ॥
प्रयोगें या बहु दोष । होई त्रैलोक्याचा नाश ॥ ४ ॥
ऐसें कदा न करणें । वाक्य ध्यानीं हें धरणें ॥ ५ ॥
धर्मा पाहसील रणीं । अस्त्रें जिंकितां अवनी ॥ ६ ॥
ऐसें बोलूनि नारद । गेले स्वस्थानीं त्वरित ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे देव । करिती भक्तां नित्य साह्य ॥ ८ ॥

---

## आजगरपर्व ११

अध्याय १७६ वा

४४१

चार संवत्सर कुबेरमंदिरीं । आनंदें कंठिलीं पांडवांनीं ॥ १ ॥
दश वर्षें ऐसीं गेलीं काननांत । बोलला धर्मास भीम तदा ॥ २ ॥
अज्ञातवासाचे दिन ऐशा स्थानीं । घालवूं येवोनि पुनरपि ॥ ३ ॥
प्रभो, दुष्टांसी त्या शासन करणें । कर्तव्यचि जाणें योग्य वेळीं ॥
नित्यचि या स्थानीं सुखें राहूं ऐसें । विसरूनि कार्यातें, नच वाटो
श्रीकृष्ण, सात्यकी साह्य तुजप्रति । भ्रात्यांसह मीहि तुज साह्य ॥६॥
वासुदेव म्हणे धर्मालागीं भीम । देई प्रोत्साहन राज्यास्तव ॥ ७ ॥

४४२

प्रदक्षिणा घाली धर्म, मंदिरासी । भीम वचनासी ऐकोनियां ॥ १ ॥
निरोप घेऊनि प्रार्थिलें गिरीसी । येऊं पुनरपि कार्य होतां ॥ २ ॥
आर्ष्टिषेणासम सन्मुनि लोमश । करूनि उपदेश निघूनि जाती ॥३॥
आल्यामार्गें वीर घटोत्कच नेई । सुस्थळासी ठेवी लीलामात्रें ॥ ४ ॥
तपोवनें, तीर्थें जाती अवलोकित । वासुदेव चित्त मोद पावे ॥ ५ ॥

अध्याय १७७ वा

४४३

गंधमादनासी सोडूनि दुःखानें । लंघूनियां वनें कामिला मार्ग ॥ १ ॥
लंघूनि कैलास वृषपर्व्याश्रमीं । विशाला आश्रमीं प्राप्त होती ॥ २ ॥
सुबाहूपुरासी घेवोनि परिवार । यमुनाउगमावर येती सुखें ॥ ३ ॥
निरोप मार्गांत घटोत्कचा देती । विशाखयूपासी पुढती वास ॥४॥
संवत्सर एक वसती त्या स्थानीं । भुजंगवदनीं गवसे भीम ॥५॥
धर्मराज करी मुक्तता तयाची । द्वैतवनामाजी येती सुखें ॥ ६ ॥
सरस्वतीतीरीं राहिले येवोनि । अश्मकुट्ट मुनि सामिप आले ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे भुजंगाचें वृत्त । देऊनियां चित्त परिसा आतां ॥८॥

अध्याय १७८ वा

४४४

वैशंपायनासी जनमेजय म्हणे । भीमासी सर्पानें धरिलें कैंवि ॥१॥
मुनि म्हणे ऐकें अद्भुत ती कथा । बोध दृढचित्ता करील ती ॥ २ ॥
विशाखयूपासी वास्तव्य करितां । वनांत हिंडतां भीमसेन ॥ ३ ॥
टाळ्या वाजवीत, भुज थोपटीत । गर्जना करीत हिंडे वनीं ॥ ४ ॥
भयाभीत होती वनचर प्राणी । भयानक वनीं दिसला सर्प ॥ ५ ॥
पर्वतासमान विशाल शरीर । केश त्या विचित्र अंगावरी ॥ ६ ॥
हरिद्रेसमान पीत त्याचा वर्ण । आरक्त नयन, तीक्ष्ण दाढा ॥ ७ ॥
चाटी जिव्हा, वेगें फूत्कार तो करी । कृतांत, अंतरीं सकलां वाटे
वासुदेव म्हणे गुहा अडवोनि । दुर्गम त्या स्थानीं बैसला तो ॥ ९ ॥

४४५

उडी मारी एकाएकीं । बलात्कारें बाहू ग्रासी ॥ १ ॥

स्पर्शितांचि सर्प, भीमा । देहभानही राहीना ॥ २ ॥
यत्न करितां मुक्ततेचा । विफल यत्न तो भीमाचा ॥ ३ ॥
दशसहस्र नागांचें । बल यद्यपि भीमातें ॥ ४ ॥
परी अगस्ति मुनींचा । वर सर्पालागीं साचा ॥ ५ ॥
मति कुंठित भीमाची । व्यर्थ होई सर्व शक्ति ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे जनीं । असती थोर, थोराहूनि ॥ ७ ॥

अध्याय १७९ वा

४४६

हतबल केलें भीमासी भुजंगें । वदला मधुरशब्दें भीम तया ॥ १ ॥
पन्नगा, तूं कोण करिसी हें काय । धर्माचा बांधव धरिला कैंवी ॥२॥
वर, विद्या, बल, अथवा हें तुझें? । यत्न मानवाचे गमती व्यर्थ ॥३॥
बाहू सोडूनियां वेढूनि शरीर । महा भयंकर वदला नाग ॥ ४ ॥
नहुष मी नाग, अगस्ति-शापानें । मुक्त्यर्थ प्रेमानें कथितों वृत्त ॥
अवध्य तूं मज, वंशज असूनि । भक्षणा सिद्ध मी दैवयोग ॥ ६ ॥
केवळ न सर्प जाणावें मजसी । वरलाभें शक्ति बहुत मज ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पावतां पतन । उःशाप मागून घेई राव ॥ ८ ॥

४४७

बलाढ्यहि प्राणी हतबल होई । स्पर्शितांचि पाहीं वरलाभें ॥ १ ॥
पूर्वस्मृति मज, सकल शास्त्रांची । आत्मविवेकाची आवड बहु ॥
प्रश्नाचें उत्तर देईल जो नर । मुक्त तो सत्वर करिल तुज ॥ ३ ॥
ऐसें बोलूनियां अगस्ति अदृश्य । होतां या स्थानास पडलों दुःखें॥
तदा प्रभृति या पडलों नरकामाजी । प्रतीक्षा कालाची करीतसें ॥
वासुदेव म्हणे दुष्कर्माचा खेद । होई अंतरांत तया सर्पा ॥ ६ ॥

४४८

ऐकूनियां भीमसेन । बोले गंभीर वचन ॥ १ ॥
क्रोध, शोक अथवा भय । नाहीं अंतरीं विस्मय ॥ २ ॥
सुख-दुःख, खेद, मनीं । पावेना तो धन्य जनीं ॥ ३ ॥
यत्नें दैवासी वंचील । ऐसा कोण रे सबळ ॥ ४ ॥
व्यर्थ व्यर्थ तो प्रयत्न । संकटीं मी निष्कारण ॥ ५ ॥

नाहीं चिंता मम नाशाची । स्मरतों माता-बांधवांसी ॥ ६ ॥
राज्यहीन बांधव माझे । मीचि प्रेरक तयांतें ॥ ७ ॥
कपटद्यूतपटु वैरी । संहारील धनुर्धारी ॥ ८ ॥
निराधार माद्रीसुत । विफल माझे मनोरथ ॥ ९ ॥
करी बहुत विलापातें । लवही तया बळ नसे ॥ १० ॥
वासुदेव म्हणे भीम । अंतीं होई परम दीन ॥ ११ ॥

४४९

इकडे अनिष्टसूचक । घडती अघोर उत्पात ॥ १ ॥
भालु करिती अशुभ शब्द । दिशा भासती प्रदीप्त ॥ २ ॥
नेत्र, चरण, पक्ष, एक । ऐसा भीषण 'वर्तिक'[1] ॥ ३ ॥
वमला रुधिर पूर्वेसी । स्फुरण वामलोचनासी ॥ ४ ॥
हृदयाचा दाह होई । धर्म म्हणे भीम नाहीं ॥ ५ ॥
वदली पांचाळी धर्मास । वेळ जाहला भीमास ॥ ६ ॥
ऐकूनियां ऐसी वाचा । धौम्यासवें धर्मराजा ॥ ७ ॥
पदचिन्हांसी शोधित । हिंडे काननीं भीमार्थ ॥ ८ ॥
मृतसिंह-व्याघ्र पाही । भग्न वृक्षांसन्निध जाई ॥ ९ ॥
पुढती कांटेरी झुडुपें । शुष्क वृक्ष जेथें उभे ॥ १० ॥
ऐशा दुर्गम प्रदेशीं । पाही निश्चेष्ट भीमासी ॥ ११ ॥
वासुदेव म्हणे धर्म । सर्पवेष्टित पाही भीम ॥ १२ ॥

अध्याय १८० वा

४५०

कुंतीपुत्रा, म्हणे धर्म तें भीमासी । ओढवोनि घेसी विघ्न कैसें ॥
अवलोकी भीम ज्येष्ठ भ्रात्याप्रति । वृत्तांत निवेदी घडला तैसा ॥
धर्म म्हणे नागा, सोडी बांधवासी । आहार मागसी तोचि देतों ॥३॥
सर्प म्हणे प्राज्ञा निघूनि तूं जाई । अथवा नाश होई समजें तव ॥
अन्य कांहीं नको, प्राप्त हा आहार । बोले युधिष्ठिर, कोण रे तूं ॥५॥

---

१ एक पक्षी

काय तुज अर्पू अथवा कथूं काय । पुशितो धर्मराय सत्य सांगें ॥
वासुदेव म्हणे भीमास्तव धर्म । प्रबल प्रयत्न करीतसे ॥ ७ ॥

४५१

सर्प म्हणे धर्मा तुझा मी पूर्वज । नृपाळ नहुष नाम माझें ॥ १ ॥
आयु जो सोमाचा पंचम वंशज । जाणें तोचि मज पूज्य पिता ॥२॥
यज्ञ, तप, दम स्वाध्याय विक्रमें । ऐश्वर्यलाभानें भरला मद ॥३॥
शिबिकावाहनीं योजूनि सहस्र । अवमानिले विप्र उन्मादानें ॥४॥
अगस्तीनें तदा शापिलें या परी । राखिलें अंतरीं सदयें ज्ञान ॥५॥
भक्षूनि भीमासी हरीन मी क्षुधा । मानितों पुरुषार्थी एका ज्ञाना ॥६॥
प्रश्नांचीं उत्तरें देसील तूं जरी । सोडीन मी तरी वृकोदरा ॥ ७ ॥
युधिष्ठिर म्हणे निर्विशेष ब्रह्म । 'पुरुषार्थ' मान्य मजही एक ॥८॥
तेंचि जरी तुझी इच्छा अजगरा । देईन उत्तरां यथाशक्य ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे सर्प धर्माप्रति । करी त्या प्रश्नांसी ऐका आतां ॥१०॥

४५२

ज्ञात्यांचीं जीं सहज चिन्हें । साधकाचीं तीं साधनें ॥ १ ॥
ऐसें जाणूनियां सर्प । प्रश्न कारितो धर्मास ॥ २ ॥
सत्य ब्राह्मण तो कोण । वेद्य, सांगें मजलागून ॥ ३ ॥
धर्म म्हणे हिंसाहीन । तैंवी यथार्थ भाषण ॥ ४ ॥
क्षमा, दान सत्पात्रींचें । शील, प्रेम, स्वधर्माचें ॥ ५ ॥
अनैष्ठुर्य, तप, कृपा । जया, तोचि विप्र, सर्पा ॥ ६ ॥
वेद्य परब्रह्म एक । सुख-दुःख नसे तेथ ॥ ७ ॥
निर्विशेष स्वयें होतां । संतप्त न होई ज्ञाता ॥ ८ ॥
हृदय, शोकाचें जें स्थान । नसे तयासी म्हणून ॥ ९ ॥
नसे पुनरावृत्ति त्यासी । ऐसी स्पष्ट माझी मति ॥ १० ॥
वासुदेव म्हणे धर्म । करी तत्त्व निवेदन ॥ ११ ॥

४५३

सर्प म्हणे राया लक्षणें विप्राचीं । तुवां कथिलीं तीं सकलां सम ॥
सुख-दुःखातीत वस्तु नसे वेद्य । स्थान तैसें प्राप्य नसे जनीं ॥ २ ॥

धर्म म्हणे सर्पा ब्रह्मज्ञविवक्षा । करूनि त्या पक्षा वर्णियेलें ॥ ३ ॥
केवळ ते ज्ञाति नसे माझ्या चित्तीं । क्षमादि, शूद्रासी नसती तेणें॥
ऐशा अर्थें शम जया, तो ब्राह्मण । शूद्र, जया काम तोचि जाणें ॥५॥
सत्य पाहों जातां ब्रह्म नसे वेद्य । वेद्य द्वंद्वातीत नसे कदा ॥ ६ ॥
कर्मप्राप्त वस्तु द्वंद्वयुक्त सदा । तत्त्व हें सर्वदा मजसी मान्य ॥ ७ ॥
अथवा ज्ञातव्य परी कर्मप्राप्त । नसे, तेंचि सिद्ध 'तत्त्व' शब्दें ॥८॥
कंठचामीकरन्याय तो जाणावा । तत्त्व वासुदेवा ठसलें बहु ॥ ९ ॥

४५४

सर्प म्हणे धर्मा, शमादि सद्गुण । सदाचारचिन्ह ब्राह्मणाचें ॥ १ ॥
ऐसें म्हणसी तरी जातीसी वैय्यर्थ्य । कर्मेंचि विप्रत्व म्हणणें लागे॥
धर्म म्हणे नालच्छेदन नसतां । संस्कार अपत्या 'जातकर्म' ॥ ३ ॥
माता-पिता तदा सावित्री-आचार्य । वेदाध्ययनें आर्य द्विज होई ॥४॥
संस्कार सिध्यर्थ बोललों मीं ऐसें । शूद्रत्व सकलांतें तयावीण ॥
कृतकृत्य शूद्र संस्कारावांचोनि । ऐसें शास्त्रवाणी बोलतसे ॥ ६ ॥
नागेंद्रा, सांप्रत संकरप्रतीति । यास्तव कर्मासी गणिलें मुख्य ॥७॥
सर्प म्हणे धर्मा पंडित तूं खरा । भक्षूं वृकोदरा कासयासी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे संवाद धर्माचा । संदेह जनांचा दूर करी ॥ ९ ॥

अध्याय १८१ वा

४५५

सत्य-प्रिय-वाणी, सत्पात्रींचें दान । अहिंसा संपन्न, स्वर्ग भोगी॥१॥
ऐसें सर्पवाक्य ऐकोनियां धर्म । म्हणे श्रेष्ठ कोण तयांमाजी ॥ २ ॥
सर्प म्हणे धर्मा, एकाहूनि एक । प्रसंगीं हीं श्रेष्ठ तारतम्यें ॥ ३ ॥
दुष्ट-हिंसेहूनि, सत्य, जाण श्रेष्ठ । असत्यें वरिष्ठ संरक्षावे ॥ ४ ॥
परतत्त्वाहूनि श्रेष्ठ वा अहिंसा । तत्त्व मदालसा आचरी तें ॥ ५ ॥
प्रसंगवैशिष्ट्यें लघु-गुरुभाव । म्हणे वासुदेव सर्प सांगे ॥ ६ ॥

४५६

धर्म म्हणे सर्पश्रेष्ठा । मृतालागीं स्वर्ग कैसा ॥ १ ॥
कर्मफल तरी कैसें । देहावीण लाभे सांगें ॥ २ ॥
सर्प म्हणे धर्मराजा । गति तीन या आत्म्याच्या ॥ ३ ॥

मानुष, देव, तिर्यग्योनि । उत्तमादिही त्या मार्नी ॥ ४ ॥
पाप-पुण्यें, पशु-देव । साम्यें होतसे मानव ॥ ५ ॥
अधिकांश तो भोगितां । सहज लाभते साम्यता ॥ ६ ॥
पशुयोनींतूनि देव । यज्ञसाठीं धेनु, अश्व ॥ ७ ॥
जैसा कार्यार्थी तो जन । करी नित्य पर्यटन ॥ ८ ॥
कृतकार्य स्वस्थ राही । तैसा मुक्त, बद्ध, पाहीं ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे संग । घडवी जन्म-मरण भोग ॥ १० ॥

४५७

धर्म म्हणे सर्पा, विषय ते ग्राह्य । ग्राहक तयांस कोण सांगें ॥ १ ॥
एकाचि समयीं सकल विषयांसी । कां नच सेविसी सर्पा वदे ॥
करणाधिष्ठित विषय तो आत्मा । सोपाधिक जाणा, सर्प म्हणे ॥
यथाविधि भोग भोगितो नृपाळा । उपाधीचा चाळा सकळ जाणें ॥
ज्ञान, बुद्धि, मन, साधनें भोगाचीं । गति मानसाची पंचेंद्रियां ॥ ५ ॥
विषय ते सेवी यथाक्रम मन । तैसेंचि ग्रहण करी जीव ॥ ६ ॥
युगपद्विषय त्या योगें ग्रहण । न घडेचि जाण युधिष्ठिरा ॥ ७ ॥
भ्रुवोर्मध्यभागीं आश्रित जो आत्मा । प्रेरक तो जाणा बुद्धीलागीं ॥
वासुदेव म्हणे सर्प ऐसें ज्ञान । वदे संतोषून धर्मालागीं ॥ ९ ॥

४५८

धर्म म्हणे सर्पा, लक्षण बुद्धीचें । तैसाचि मनाचें कथन करीं ॥ १ ॥
अध्यात्मज्ञानासी अवश्य हें ज्ञान । वदतसे धर्म सर्पालागीं ॥ २ ॥
अतीव तादात्म्य, बुद्धीचें आत्म्यासी । परस्पर होती एकरूप ॥ ३ ॥
वासनेच्या योगें संकल्प-विकल्प । बुद्धि वासनेस जन्म देई ॥ ४ ॥
परंपरा ऐसी अनादि अनंत । मन बुद्धि भेद तेणें होई ॥ ५ ॥
धर्म म्हणे ज्ञान परिपूर्ण तुज । मोह मानसास कैसा झाला ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे धर्माचा हा प्रश्न । बोलला ऐकून सर्प प्रेमें ॥ ७ ॥

४५९

ज्ञाताही वैभवें राया मोह पावे । नित्य हें धरावें वाक्य ध्यानीं ॥१॥
विपत्तीचें मूळ, मद-ऐश्वर्याचा । अभिमान साचा नडला मातें ॥२॥

सदय मुनींद्र विनवितां द्रवला । नेईल मुक्तीला म्हणे धर्म ॥ ३ ॥
विस्मय पावलों मुनीच्या तपानें । तोचि विस्मयानें प्रश्न केला ॥४॥
जाति कुल नव्हे पुरुषार्थ साधन । तप क्रिया धर्म श्रेयस्कर ॥ ५ ॥
ऐसें बोलूनियां राजा दिव्य देही । स्वर्गामाजी जाई वदूनि शुभ ॥
पडलें आलिंगन तदा बांधवांचें । येती आश्रमातें हर्षभरें ॥ ७ ॥
करूं नको ऐसें क्रू पुनरपि । सर्वहो चालती भीमालागीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे गेले द्वैतवनीं । आनंदित मनीं सकल वीर ॥ ९ ॥

---

## मार्कंडेयसमास्यापर्व १२

अध्याय १८२ वा ४६०

द्वैतवनामाजी निदाघ संपतां । प्रावृट्काळ येतां कृष्ण-मेघ-॥ १ ॥
रात्रंदिन वृष्टि करिती सर्वकाल । लोपला भास्कर तेजोराशी ॥२॥
सर्वत्र उगवे मृदु हरित तृण । वृद्धिंगत जाण मशक, सर्प ॥ ३ ॥
जलाकीर्ण भूमि निम्नोन्नत देश । झांकले, नद्यांस पूर येई ॥ ४ ॥
प्रदेश सर्वत्र शांत, रम्य दिसे । पक्षिगण नाचे इतस्ततः ॥ ५ ॥
मंडूकांचा शब्द नित्य येई कानीं । दिन ते निघोनि गेले सुखें ॥ ६ ॥
आल्हाददायक येई शरत्काल । प्रसन्न निर्मळ सरितोदक ॥ ७ ॥
निरभ्र आकाशीं शोभला चंद्रमा । कुमुदिनी नयनां उघाडिती ॥ ८ ॥
सरस्वतीतीरीं कार्तिकी पौर्णिमा । मोद पांडवांना देई बहु ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे धौम्यांसमवेत । काम्यकवनांत पुढती जाती ॥ १० ॥

अध्याय १८३ वा ४६१

काम्यकवनांत आनंद मुनींसी । पाहूनि धर्मासी बहुत होई ॥ १ ॥
पार्थसखा एक विप्र तैं बोलला । कळलें कृष्णाला आगमन ॥ २ ॥
येईल भेटीसी तैसा मार्कंडेय । येऊनि भेटेल त्वरित तुम्हां ॥ ३ ॥
शैब्य, सुग्रीव ज्या जोडिले रथासी । येई हृषिकेशी इतुक्यामाजी ॥
सत्यभामेसह पाहोनि हरीतें । आनंद वीरांतें होई बहु ॥ ५ ॥

धर्म-भीमालागीं आदरें वंदिलें। कृष्णें आलिंगिलें पार्थालागीं ॥ ६ ॥
धौम्याचें पूजन, कृष्णेचें सांत्वन। वंदिती चरण माद्रीसुत ॥ ७ ॥
सत्यभामा कृष्णा भेटती प्रेमानें। वंदी आदरानें वासुदेव ॥ ८ ॥

४६२

पार्थ म्हणे देवा, अभिमन्यु सुभद्रा। क्षेम कीं गोविंदा सांगे मज ॥१॥
सुखासनीं कृष्ण बैसोनियां म्हणे। धर्म श्रेष्ठ जाणें राज्यहानि ॥२॥
तपावीण नसे जगीं धर्मवृद्धि। कृतार्थ तूं लोकीं युधिष्ठिरा ॥ ३ ॥
द्रव्यलोभें धर्म न सांडिसी कदा। स्वधर्मी सर्वदा असतां रत ॥४॥
दुःशासनकृत्य त्वांचि साहिलेंसी। खचित तुजसी विजयलाभ ॥
प्रतिज्ञेचा काल संपतां पावना। आज्ञा करीं आम्हां निग्रहाची ॥६॥
धन्य धन्य पार्थ कृतास्त्र हा झाला। सुदैवेंचि आला सुखरूप ॥७॥
वासुदेव म्हणे बोलूनियां ऐसें। श्रीहरी कृष्णेतें वदला ऐका ॥ ८ ॥

४६३

कृष्ण म्हणे द्रौपदीतें। पुत्र सुखी द्वारकेतें ॥ १ ॥
महामानी, आजोळासी। राज्यलोभें न वसती ॥ २ ॥
द्वारकेंत आनंदानें। शिकवी सुभद्रा प्रेमानें ॥ ३ ॥
गुरु उत्तम सौभद्र। शिकवी शस्त्रास्त्रें त्यां शूर ॥ ४
राजवैभव भोगिती-। विहारार्थ यदा जाती ॥ ५ ॥
राजा होई शत्रुहीन। करीं प्रतिज्ञा ते पूर्ण ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण। देई उत्साह संपूर्ण ॥ ७ ॥

४६४

कर जोडूनियां बोले युधिष्ठिर। केशवा आधार तूंचि आम्हां ॥ १ ॥
सर्वकाल आम्हीं शरण तुजसी। योग्य समयासी साह्य करीं ॥ २ ॥
एक तप आम्हीं कंठिलें वनांत। संपवूं अज्ञातवास आतां ॥ ३ ॥
पुढती सर्वस्वी तुझ्याचि आधीन। बंधु, भार्या, जन यांच्यासवें ॥
पांडवांचा पक्ष सर्वदा सत्याचा। निर्धार हा तुझा स्थिर राहो ॥५॥
इतुक्यांत आले मार्कंडेय मुनि। विनम्र चरणीं सकल त्यांच्या ॥६॥
अजर-अमर स्वरूपसंपन्न। भासती यौवन-पूर्ण मुनी ॥ ७ ॥
नारदहि तदा पातले त्या स्थानीं। उभयां पूजूनि वंदियेलें ॥ ८ ॥

कृष्ण म्हणे सांगा सनातनधर्म । मुनि म्हणे ज्ञान कथिन बहु ॥ ९ ॥
नारदहि तया देई अनुमोदन । वासुदेव पूर्ण आनंदला ॥ १० ॥

४६५

युधिष्ठिर म्हणे महामुनीलागीं । दीर्घकाल जगीं नांदसी तूं ॥ १ ॥
प्रतीक्षा मी नित्य करितों बहु दिन । भेटीसी श्रीकृष्ण प्राप्त झाला ॥
वैभव भोगिती दुराचाररत । झालों पदभ्रष्ट ऐसे आम्हीं ॥ ३ ॥
व्युत्क्रम हा ऐसा पाहूनि मनांत । प्रश्न उपस्थित होती बहु ॥ ४ ॥
शुभाशुभ-कर्म-कर्ता तो पुरुष । भोगी स्वकर्मास कैशारीति ॥ ५ ॥
ईश्वर तो कर्ता कैसा सांगे मज । सहज सुख-दुःख, अथवा कर्मे ॥
कर्मफल जरी, तरी फलप्राप्ति । इह, परलोकीं अथवा कोठें ॥ ७ ॥
कोठें नांदताती कर्मे त्या मृताचीं । वासुदेव चित्तीं सावधान ॥ ८ ॥

४६६

मुनि म्हणे युधिष्ठिरा । साजे प्रश्न तुजसी खरा ॥ १ ॥
ज्ञान तुजलागीं पूर्ण । करिसी जनांस्तव प्रश्न ॥ २ ॥
ऐक सावधानचित्तें । पूर्वी सकलहि ज्ञाते ॥ ३ ॥
गगनीं स्वच्छंद संचार । दमनशील निर्मत्सर ॥ ४ ॥
दीर्घकालें पृथ्वीवरी । करिती संचार दरिद्रि ॥ ५ ॥
होती काम-क्रोधाकुल । ज्ञान-संकल्प निष्फल ॥ ६ ॥
व्याधिग्रस्त दुष्ट पापी । नास्तिकता तयां ग्रासी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे मुनि । कथिती तें घ्या ऐकोनि ॥ ८ ॥

४६७

सर्व वासनास्वरूप, । लिंगशरीर तें मुख्य ॥ १ ॥
ईश्वरानें निर्मियेलें । धर्माधर्म जाणूनि स्वयें ॥ २ ॥
क्षणभंगुर तें कर्म । करी संस्कार निर्माण ॥ ३ ॥
फल-कालावधि त्यांसी । वास सूक्ष्म शरिरासी ॥ ४ ॥
एक शरीर त्यागितां । करी संकल्प दुजाचा ॥ ५ ॥
देह स्थूल अथवा सूक्ष्म । भोग क्रियेमाजी सम ॥ ६ ॥
छायेसम अन्य देहीं । पूर्वकर्म तेंहि जाई ॥ ७ ॥

तेणें भोगी सुख-दुःख । ज्ञाता ओळखी तयास ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे आतां । गति ज्ञानियाची ऐका ॥ ९ ॥

४६८

तपस्वी, शास्त्रज्ञ, गुरुशुश्रूषक । क्षमाशील, दान्त, स्थिरव्रत ॥१॥
पवित्र कुळीं ते प्राणी जन्मा येती । प्रारब्ध जिंकिती योगबळें ॥२॥
लोकानुग्रहार्थ जन्म त्यां यथेच्छ । नसे कर्मतंत्र जन्म त्यांचा ॥३॥
दैवयोगें किंवा हठानें त्यां जन्म । सामान्यां कारण कर्म जन्मा ॥४॥
विविध प्रकारें लाभे कर्मफल । ज्ञात्यांचे प्रकार चतुर्विध ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसें बोलूनियां । निर्वेदिलो राया पुढती मुनि ॥ ६ ॥

४६९

श्रेयस्कर इहलोक हे मम मति । स्वर्गी श्रेष्ठ गति लाभे कोणा ॥१॥
उभयत्र सुखी कांहीं भाग्यवंत । आत्मजनां लाभ ऐसा थोर ॥ २ ॥
धनासक्ता अत्र सौख्य, न परत्र । तपस्व्यां न अत्र सौख्यलाभ ॥३॥
धर्मादिक जयां, सौख्य त्यां उभयत्र । इहपर नाश कर्महीनां ॥ ४ ॥
पांडव हो तुम्ही स्वर्गस्थ असोनि । पातलां या स्थानीं कर्मास्तव
युधिष्ठिरा क्लेश पावूनियां ऐसे । त्यजोनि शंकेतें धैर्य धरीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मार्कंडेय मुनि । सुखी व्हाल तुम्हीं सांगे धर्मा ॥ ७॥

अध्याय १८४ वा

४७०

पांडवांची इच्छा पाहूनियां मुनि । वृत्तांत कथनीं रमला बहु ॥ १॥
हैहयकुळींचा बलाढ्य 'कुमार' । मृगयेसी संचार करी वनीं ॥ २॥
मृगाजिनाछन्न मानूनियां मृग । पाहूनियां वध मुनिचा करी ॥ ३ ॥
कळतां हा प्रमाद येऊनि पित्यास । कथिला वृत्तांत घडला तैसा॥
चिंताक्रांत तदा हैहय सकल । धरूनि तळमळ शोध घेती ॥ ५ ॥
अरिष्टनेमि जो कश्यपाचा सुत । त्याच्या आश्रमास प्राप्त होती॥
मुनि म्हणे तयां वधिला जो तुम्हीं । हाचि काय ध्यानीं आणा नीट
विस्मित ते तया पाहूनि जिवंत । वासुदेव वृत्त सकल कथी ॥८॥

४७१

हैहयांसी अरिष्टनेमि । म्हणे मृत्युहीन आम्हीं ॥ १ ॥

वरिलें केवळ सत्यासी । तेजें जिंकिलें मृत्यूसी ॥ २ ॥
असत्संकल्पही नसे । नित्य पाळितों धर्मातें ॥ ३ ॥
कदाकाळीं विप्रनिंदा । न घडे, तीर्थी वास सदा ॥ ४ ॥
योगसिद्धांचें सान्निध्य । मृत्युभय न आम्हांस ॥ ५ ॥
संभाषणें तुम्ही मुक्त । जावें आपुल्या स्थानास ॥ ६ ॥
वंदूनियां हैहय जाती । हर्षे वासुदेव चित्तीं ॥ ७ ॥

अध्याय १८५ वा ४७२

विप्रांचें सद्भाग्य अन्य ऐकें आतां । 'वैन्य' नामें राजा पुण्यवंत ॥
यज्ञदीक्षा प्रेमें स्वीकारिली तेणें । याचीतसे धनें अत्रि, तया ॥ २ ॥
भार्यावचनें तो जाई यज्ञस्थानीं । शंका तया मनीं बहुत येई ॥ ३ ॥
पशु हिंसकाचें पाप नृपाळासी । प्रतिग्रह कैंवी घेऊं त्याचा ॥४॥
दुष्टभावें वैरी करितील प्रश्न । जिंकितांहि जाण पाप माथ ॥ ५ ॥
जो कोणी विवादीं जिंकितो विप्रास । होई तो राक्षस निर्जल वनीं
परी कांतावचें यज्ञस्थानीं आला । स्तवूनि नृपाला द्रव्य मागे
म्हणे विधाता हा नियंता पृथ्वीचा । ऐकतां ते वाचा वाद होई ॥
वासुदेव म्हणे सनत्कुमारांसी । निर्णय पुशिती द्विजश्रेष्ठ ॥ ९ ॥

४७३

सनत्कुमारांची वाणी घ्यावी ध्यानीं । ब्रह्म-क्षत्र जनीं अग्नीसम ॥१॥
परस्पर साह्य होतील ते जेव्हां । वायु, अग्नि तेव्हां समजा त्यांसी ॥
धर्मसंस्थापक राजा प्रजापति । शुक्र बृहस्पति शक्र तोचि ॥ ३ ॥
यास्तव अत्रीचें वचन सत्य जाणा । म्हणे मुनिराणा विप्रांलागीं ॥
निर्णय ऐकोनि राव संतोषला । दक्षिणा अत्रीला दिधली बहु ॥५॥
न्यायप्राप्तधन अर्पोनि पुत्रांसी । तपार्थ वनासी जाई मुनि ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे फल स्वधर्माचें । एकांतीं लाभतें अथवा वनीं ॥ ७ ॥

अध्याय १८६ वा ४७४

युधिष्ठिरा पूर्वी ताक्ष्यर्नामें मुनि । विचारी वंदूनि शारदेसी ॥ १ ॥
भद्रे, श्रेय काय धर्मच्युति कैंवी । टळेल तो दावीं मार्ग मज ॥ २ ॥
अग्नीमाजी कैंवी आहुति अर्पावी । पूजाहि करावी कैशा रीति ॥३॥

यथेष्ट संचार कैसा होई मम । करावें कथन मजलागीं ॥ ४ ॥
सरस्वती म्हणे प्रणवाचा जप । करितां ब्रह्मलोक प्राप्त होई ॥ ५ ॥
धेनुदानें स्वर्ग, वृषभें सूर्यलोक । वस्त्र देतां चंद्रलोक प्राप्ति ॥ ६ ॥
सुवर्णदानानें आमरत्वलाभ । तैंवी इंद्रलोक भूमिदानें ॥ ७ ॥
सालंकृत कन्यादानें तेंचि पुण्य । कुलोद्धार जाण अग्निहोत्रें ॥ ८ ॥
वेद-वेदार्थज्ञें अग्निहोत्र घ्यावें । कैवल्यासी जावें यथाक्रम ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे सरस्वतीप्रति । सामान्य नव्हसी म्हणे तार्क्ष्य ॥१०॥

४७५

देवी म्हणे विप्रा, सिद्धि स्वत्कर्माची । तेंचि माझी मूर्ति मनोहर ॥
प्रत्यगुरूप ऐसें कथितां देवीनें । मोक्ष तत्त्व म्हणे तार्क्ष्य सांगें ॥२॥
वेद-वेदार्थज्ञ जपादिक कर्म । आचरितां, ब्रह्मबोध तयां ॥ ३ ॥
सच्चित्सुखरूपें सर्वत्र प्रतीति । जाण श्रेष्ठ, लोकीं निरुपाधिक ॥४॥
बीजांकुरासवें ब्रह्मांड त्यामाजी । अविद्या मूळेंसी सरिता बहु ॥५॥
भोगजन्य सौख्य, हेंचि मधुर जल । वासना अंकुर फुटती तेथें ॥६॥
सच्छिद्र अपूपासम क्षुद्र सुख । तेणें ब्रह्मलोक न लाभेचि ॥ ७ ॥
चैतन्यभूमीसी अनादि अविद्या । संसृतीच्या वृक्षा वाढविते ॥८॥
समूळ उच्छेद करितां अविद्येचा । अद्वैतस्थानाचा लाभ घडे ॥९॥
वासुदेव म्हणे देवी सरस्वती । बोलली तार्क्ष्यासी सार ऐसें ॥१०॥

अध्याय १८७ वा ४७६

धर्मप्रश्नें मनु वैवस्वत वृत्त । कथि मुनिश्रेष्ठ मार्कंडेय ॥ १ ॥
विवस्वानपुत्र मनु तो विक्रमी । ओज, तेज जनीं ख्यात त्याचें ॥२॥
पिता त्याचा ईश, पितामह ब्रह्म । भरला अभिमान न मानी त्यां ॥
तपावीण मार्ग नसे हें जाणोनि । बदरिकाश्रमीं तप करी ॥ ४ ॥
ऊर्ध्व बाहु उभा एका चरणावरी । घोर तप करी ऐशारीति ॥ ५ ॥
चीरिणीच्या तीरीं येतां पात्रांतूनि । मत्स्य संबोधूनि वदला तया ॥
म्हणे हे सुव्रता, सामान्य मी मत्स्य । होऊं नये भक्ष्य बलवंताचें ॥
रक्ष रक्ष मातें होईन उतराई । उचलूनि घेई सदय मनु ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे मृत्तिकापात्रांत । ठेवी आश्रमांत नेऊनियां ॥ ९ ॥

४७७

पात्र सान होतां कूपांत सोडिला । गंगेमाजी नेला पुढती तया ॥
तेथूनिही म्हणे नेई सागरांत । संचार अशक्य गंगेमाजी ॥ २ ॥
सुखकर त्याचा घडे तदा स्पर्श । सोडी सागरांत मत्स्यालागीं ॥
हर्षभरें मत्स्य बोले तया वेळीं । प्रलय सत्वरी होइल आतां ॥ ४ ॥
रजत-भ्रम जातां शुक्ति जैं निर्मल । तैंवी चराचर नष्ट होई ॥ ५ ॥
दृढरज्जुयुक्त नौका करीं सिद्ध । बीजांचा संग्रह करूनि राहें ॥ ६ ॥
शृंगयुक्त तदा येईन जवळी । मीच तया वेळीं आश्रय तुज ॥ ७ ॥
मुनि म्हणे मत्स्या करितों तसेंचि । विस्मय मानसीं वासुदेवा ॥

४७८

पुढती सर्वत्र उदक । नौकेमाजी मनु देख ॥ १ ॥
सप्तऋर्षीसह बीजें । घेऊनि हाकारी नौकेतें ॥ २ ॥
चिंतितांचि मत्स्य आला । नौका बांधिली शृंगाला ॥ ३ ॥
वादळानें सिंधु क्षुब्ध । करी भयंकर नाद ॥ ४ ॥
उदकें बुडाली अवनी । एका स्थळीं मत्स्य आणी ॥ ५ ॥
तया वचनें बांधिती । नौका हिम शिखरासी ॥ ६ ॥
'नौकाबंधन' त्या नाम । शिखर हेंचि धर्मा जाण ॥ ७ ॥
मत्स्य म्हणे मीचि ब्रह्मा । मनु रचिल सृष्टि पुन्हा ॥ ८ ॥
होई अदृश्य तें मत्स्य । मनु बैसला तपास ॥ ९ ॥
तपोबळानें पुढती । यथापूर्व रचिली सृष्टि ॥ १० ॥
मत्स्याख्यान हें ऐकतां । सौख्य लाभे सकल लोकां ॥ ११ ॥
वासुदेव म्हणे ऐसा । नित्य खेळ श्रीहरीचा ॥ १२ ॥

अध्याय १८८ वा

४७९

धर्म म्हणे श्रेष्ठा मुनि तूं पुराण । केले अवलोकन प्रलय बहु ॥ १ ॥
हृदयाब्जामाजी शयन विष्णूचें । सान्निध्य तें तुझें तयालागीं ॥२॥
यास्तव सकल प्रलयाचें वृत्त । निवेदूनि मज हर्ष देई ॥ ३ ॥
मुनि म्हणे राया स्वयंभू तो नित्य । अनादि अनंत स्वयंसिद्ध ॥४॥
आश्चर्यचि विश्व इंद्रजाल मानीं । रज्जुसर्प जनीं तैसें विश्व ॥ ५ ॥

रागद्वेषें होई तोचि दोषयुक्त । होई चतुर्युग स्वयें जाणा ॥ ६ ॥
कृत, त्रेता, तैसें द्वापार, तो कालि । चार, तीन, धरीं हृदयीं दोन ॥
एक सहस्र ते देव संवत्सर । काल ऐसा थोर त्या त्या युगीं ॥८॥
तितुकींच शतकें संध्या प्रत्येकासी । या द्वादश सहस्रीं दैवयुग ॥
ऐसीं दैवयुगें सहस्र लोटतां । दिवस ब्रह्मयाचा, प्रलय पुढें ॥१०॥
वासुदेव म्हणे चतुर्थ चरणीं । जन मिथ्यावाणी कलियुगीं ॥ ११ ॥

४८०

कलिमाजी कल्पिताती । यज्ञास्तव प्रतिनिधि ॥ १ ॥
विप्राचार शूद्रासम । शूद्र संपादिती धन ॥ २ ॥
सर्वभक्षक ते विप्र । जपपरायण शूद्र ॥ ३ ॥
मिथ्या-शासक ते म्लेच्छ । शासक या धरित्रीस ॥ ४ ॥
वृथा ब्रह्मवादी जन । अनुभवें केवळ शून्य ॥ ५ ॥
र्‍हस्वदेही, विपुल प्रजा । सकलां पीडी बहु क्षुधा ॥ ६ ॥
भगकार्य करिती सुखें । द्वेष पतीचा स्त्रियांतें ॥ ७ ॥
होती बहुत निर्लज्ज । धेनु देती अल्प दुग्ध ॥ ८ ॥
पुष्पें, फळें परिमित । वृद्धि पावती वायस ॥ ९ ॥
कपटी, लोभी ते भिक्षुक । करभयें जन वंचक ॥ १० ॥
वैश्य, क्षत्रियहि भ्रष्ट । वासुदेव सांगे स्पष्ट ॥ ११ ॥

४८१

आश्रमस्थ ब्रह्मचारी । लोलुप ते दुराचारी ॥ १ ॥
होई परान्नप्रशंसा । तेंचि प्रिय सकल लोकां ॥ २ ॥
जन हिंसापरायण । वृष्टि अकालीं ते जाण ॥ ३ ॥
होती अल्पायु धार्मिक । मायावी ते वैश्य देख ॥ ४ ॥
सकल सौख्य धर्महीना । धार्मिक तो दैन्यवाणा ॥ ५ ॥
अल्प धनेंचि आढ्यता । ठेव नच येई हाता ॥ ६ ॥
प्रसवे अष्टवर्षा बाला । द्वादशांत पिता झाला ॥ ७ ॥
वार्धक्य तें षोडशांत । यौवनांत अतिवृद्ध ॥ ८ ॥
स्त्रिया वंचूनि पतीसी । रमती पशु-दासांपाशीं ॥ ९ ॥

चीरपत्नी व्यभिचारिणी । दुष्टक्रिया ऐसी जनीं ॥ १० ॥
वासुदेव म्हणे ऐसा । घोर प्रभाव कलीचा ॥ ११ ॥

४८२

अंतीं अनावृष्टि होई दीर्घकाल । आटती सागर सरिता तेंवी ॥१॥
वायूसवें अग्नि सर्व भस्मकरी । महाभयकारी वृष्टि पुढें ॥ २ ॥
जलमय होई सकल ब्रह्मांड । वायूहि प्रचंड पुढती सुटे ॥ ३ ॥
तोही लुप्त होतां एकाकी घावरा । महा जलार्णवामाजी मीच ॥४॥
तया स्थानीं महा वटवृक्षावरी । मंचकीं पहुडली बालमूर्ति ॥ ५ ॥
नयन तयाचे उत्फुल्ल कमल । वदन कोमल चंद्रासम ॥ ६ ॥
कर्ण तयाच्या, दैदीप्य, कंबुसी । शिरतां चित्तासी खेद वाटे ॥
असोनि बालक धीर मज देई । नकोसाचि होई जन्म तेथें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे वदनांत विश्व । न लागेचि अंत शतकांनींहि ॥ ९ ॥

४८३

पुढती तया शरण जतां । येतों बाहेरी तत्वतां ॥ १ ॥
पीतांबरधारी देव । दिसतो वट वृक्षावर ॥ २ ॥
म्हणे हांसूनि मजसी । पावलासी कीं विश्रांति ॥ ३ ॥
ऐकूनि ते मधुर वाणी । वंदितों मी चरण दोन्हीं ॥ ४ ॥
पुशितों तयाचें सामर्थ्य । कां रे झालासी बालक ॥ ५ ॥
किती काल वससी ऐसा । कोटि विश्वांच्या चालका ॥ ६ ॥
ऐकूनियां वदतो देव । ऐका म्हणे वासुदेव ॥ ७ ॥

अध्याय १८९ वा

४८४

देव म्हणे मार्कंडेया । प्रेमें कथितों माझी माया ॥ १ ॥
'नारा' नाम त्या उदकासी । तेथें वास्तव्य मजसी ॥ २ ॥
तेणें म्हणती नारायण । सकल विश्वांचें कारण ॥ ३ ॥
इंद्र, चंद्र सकल मीचि । शेष, मत्स्य, वराहादि ॥ ४ ॥
अधिन माझ्या सकल विश्व । स्वधर्मेंचि माझा लाभ ॥ ५ ॥
स्थिति, उत्पत्ति, संहार । माझा सर्वत्र संचार ॥ ६ ॥

जाण, उदरींचे क्लेश । सकल तुझ्या उद्धारार्थ ॥ ७ ॥
विश्व अदर्शनें दुःखी । पाहूनियां नेलें मुखीं ॥ ८ ॥
ब्रह्मा सांप्रत निद्रिस्थ । म्हणूनि जाहलों वालक ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे सृष्टि । होई निर्माण पुनरपि ॥ १० ॥

४८५

ऐसें बोलूनियां देव तो अदृश्य । होतां अवघें विश्व प्रगट होई ॥१॥
प्रलयकालीं तें आश्चर्य हें नित्य । वटपत्रस्थित तोचि कृष्ण-॥
जनार्दन तुझा आप्त हा जाहला । स्मरण मजला सकल असे ॥ ३ ॥
येणेंचि मजसी केलें दीर्घायुषि । पालक विश्वासी हाचि जाणा ॥
शरण जा तुम्हीं तया गोविंदासी । सकल वंदिती प्रेमभावें ॥ ५॥
आशीर्वाद देई यादवांचा राणा । करितो वंदना वासुदेव ॥ ६ ॥

अध्याय १९० वा

४८६

धर्म वोलला मुनींसी । कार्यें सांगा अंतिमांचीं ॥ १ ॥
मुनि सांगे स्वानुभव । पुढती धर्मा एक पाय ॥ २ ॥
धर्म-जालांसी पसरूनि । पांडित्यानें होईल हानी ॥ ३ ॥
अंत्यज करिती क्षात्रियकर्म । हीन होती श्रेष्ठ वर्ण ॥ ४ ॥
मित्र मानिती भार्येसी । मत्स्याहार सकलांसी ॥ ५ ॥
होई संहार धेनूंचा । प्रेमें पाळिताती अजा ॥ ६ ॥
तर्कवादें[१] मोहित जन । कर्में आचरिती हीन ॥ ७ ॥
अहं ब्रह्म या उच्चारें । घात करिती परस्परें ॥ ८ ॥
पुत्र वधील पित्यासी । पिता तोहि निजपुत्रासी ॥ ९ ॥
अवघे म्लेच्छप्राय जन । नाहीं कोणा समाधान ॥ १० ॥
धन हरिती विधवांचें । मूर्ख स्वयें होती ज्ञाते ॥ ११ ॥
वासुदेव म्हणे बळी । सज्जनांचे प्राण हरी ॥ १२ ॥

४८७

कन्येची याचना करीनाचि कोणी । अर्थासक्ति जनीं वृद्धि पावे ॥१॥
आत्मपसंतीनें वरिती कांतेसी । विश्वासघातकी अवघे जन ॥ २ ॥

१ अधर्मालाच धर्म भासविणारा युक्तिवाद.

भयार्त विप्रांसी त्राता न लाभेल। वास्तव्य घडेल दुर्गम स्थानीं ॥३॥
त्यागोनि देवता, अस्थींचें पूजन। करितील जन पुण्यस्थानीं ॥ ४ ॥
वैशिष्ट्य तें नष्ट होईल सकल। मनीं सर्वकाल व्याकुळता ॥ ५ ॥
माता, पिता, गुरु, भासतील वैरी। युगांताच्या वेळीं ऐसें घडे ॥
चंद्र-सूर्य, गुरु-पुष्य नक्षत्रासी। येतां कृतयुगासी आरंभ तो ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे धर्मांचा उत्कर्ष। तया समयास नित्य जाणा ॥ ८॥

४८८

विष्णुयश विप्रालागीं संभल ग्रामांत ॥
महापराक्रमी ज्ञाता होईल सुपुत्र ॥ १ ॥
कल्कि अवतार तोचि जाणें युधिष्ठिरा ॥
चिंतिनेंचि निर्मील तो सकल शस्त्रास्त्रां ॥ २ ॥
करील सर्वत्र राया धर्म संस्थापना ॥
म्लेच्छ नाशक तो धीर देईल विप्रांना ॥ ३ ॥
सार्वभौम चक्रवर्ति होऊनि तो राजा ॥
करील उद्धार जाणें सकल धर्मांचा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐसा कल्कि अवतार ॥
वंदुं तया नम्रभावें जोडोनियां कर ॥ ५ ॥

अध्याय १९१ वा

४८९

कल्कि अवतारीं विप्र। करूनियां अश्वमेध ॥ १ ॥
द्विजांलागीं पृथ्वीदान। करूनि संस्थापील धर्म ॥ २ ॥
पृथ्वी-संचार करील। म्लेच्छ अवघेही वधील ॥ ३ ॥
पुढती जातां तो वनासी। होतां अनुसरती त्यासी ॥ ४ ॥
ऐसा कृतयुगारंभ। अवघें नासेल पाखंड ॥ ५ ॥
लोक स्वधर्मीं रमती। सत्य-अहिंसेची प्रीति ॥ ६ ॥
ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र। स्वधर्मांचा घेती छंद ॥ ७ ॥
धर्मा, होईं धर्मरत। नको करूं ब्रह्मद्वेष ॥ ८ ॥
नको धरूं अभिमान। होईं धर्मपराधीन ॥ ९ ॥
प्रतिकूल काल येतां। होऊं नेदीं मोह चित्ता ॥ १० ॥

धर्म म्हणे द्विजश्रेष्ठा । मान्य सकळ तुझी वाचा ॥ ११ ॥
वासुदेव म्हणे मोद । पावे अंतरीं मुकुंद ॥ १२ ॥

अध्याय १९२ वा

४९०

धर्म म्हणे महाभाग्य । ब्राह्मणांचें, पुढती सांग ॥ १ ॥
मुनि म्हणे परिक्षित । अयोध्येसी राजा एक ॥ २ ॥
गेला एकदां मृगयेसी । वधूं धांवला मृगासी ॥ ३ ॥
अश्व दौडत आला वनीं । सरोवर तया स्थानीं ॥ ४ ॥
तत्र होऊनि सुस्नात । अश्वां चारी कमलदेंठ ॥ ५ ॥
घेई विश्रांति त्या स्थानीं । मधुर स्वर येई कानीं ॥ ६ ॥
ऐकूनियां गीतरव । करी अंतरीं विचार ॥ ७ ॥
इतुक्यांत तया स्थानीं । पाही सुंदर रमणी ॥ ८ ॥
घेई मधुर आलाप । हिंडे सुमनें वेंचित ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे पुशी । राव वृत्तांत तियेसी ॥ १० ॥

४९१

वदे सुंदरी मी कन्या । तदा रायासी कामना ॥ १ ॥
कन्या म्हणे मम नियमासी । पाळी तया प्राप्ति माझी ॥ २ ॥
पुशितां कथिला नियम । न घडो वापीचें दर्शन ॥ ३ ॥
देऊनियां मान्यतेसी । राजा स्वीकारी तियेसी ॥ ४ ॥
पुढती नगरासी पातला । प्रेमें एकांतीं राहिला ॥ ५ ॥
क्रीडासक्त नृपाळाचें । नघडे दर्शन कोणातें ॥ ६ ॥
पुशितां कथिती राजस्त्रिया । उदक न नेती त्या ठायां ॥ ७ ॥
मंत्री चिंतूनियां चित्तीं । रम्य उपवन निर्मिती ॥ ८ ॥
मुक्तामाला त्या स्थळासी । शोभा वासंतीगृहाची ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे वापी । गुप्त तेथ एक होती ॥ १० ॥

४९२

पुढती नृपालागीं बोलला अमात्य । या रम्य वनांत क्रीडा करीं॥१॥
ऐकोनि त्या स्थानीं भार्येसवें जाई । कांहीं दिवस राही आनंदानें ॥
क्षुधा-तृषायुक्त होतांचि नृपाळें । सहज अवलोकिलें रम्य गृह ॥३॥

वासंतीगृहासी प्रवेश करितां । पाही सुधाकृत रम्य वापी ॥ ४ ॥
वापीतें पाहोनि बोलला भार्येसी । येईं वापीमाजी क्रीडेस्तव ॥ ५ ॥
ऐकोनि ते वाणी जळांत बुडाली । पुनरपि आली नाहीं वरी ॥ ६ ॥
शोधार्थ तियेच्या वापी रिक्त करी । व्याकूळ अंतरीं होई राजा ॥ ७ ॥
वापीमाजी राजा पाही मंडूकासी । मंडूकवधासी प्रवर्तला ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे मृत मंडूकांची । भेट अर्पिताती नृपा जन ॥ ९ ॥

४९३

राज्यामाजी त्या सर्वत्र । होई मंडूकसंहार ॥ १ ॥
भयग्रस्त तें मंडूक । शरण आपुल्या नृपास ॥ २ ॥
नृप, होऊनि तापसी । आला परिक्षितापाशीं ॥ ३ ॥
विनवी, ऐसा मंडूकांचा । नको वध करूं साचा ॥ ४ ॥
राव म्हणे मम कांतेसी । भक्षिलें त्यां क्षमा कैसी ॥ ५ ॥
म्हणे मंडूक हे मान्या । सुशोभना माझी कन्या ॥ ६ ॥
दुष्ट स्वभाव तियेचा । तुज लाभ होईल तिचा ॥ ७ ॥
ऐसें बोलूनि मंडूक । कन्या अर्पी नृपाळास ॥ ८ ॥
पिता तिज शापी क्रोधें । सुत होतिल ब्रह्मद्वेष्टे ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे राजा । प्रेमें सन्मानी मंडूका ॥ १० ॥

४९४

निरोप घेऊनि मंडूक तो जातां । नृपाळाच्या चित्ता हर्ष बहु ॥ १ ॥
पुढती तयासी होई पुत्र-त्रय । शल, वल, दल, नामें त्यांसी ॥ २ ॥
शलासी अर्पूनि राज्य गेला नृप । तपार्थ वनांत आनंदानें ॥ ३ ॥
शल एकेदिनीं जातां मृगयेसी । गवसे न तयासी कृष्णमृग ॥ ४ ॥
सारथ्यासी म्हणे वेगें हांकी रथ । येरू म्हणे व्यर्थ श्रम जाणें ॥ ५ ॥
'वामी' आश्व तेही असमर्थ एथें । कैसें सामान्यांतें कार्य साधे ॥ ६ ॥
राव म्हणे कैसे सांगें वामी अश्व । चिंता सारथ्यास ऐकूनियां ॥ ७ ॥
सांगतां तयासी मुनिशापभय । न सांगतां राव वधील, मनीं ॥ ८ ॥
अंतीं म्हणे राया वामदेवअश्व । अलौकिक जव तयांलागीं ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे राव सारथ्यासी । म्हणे आश्रमासी नेईं रथ ॥ १० ॥

४९५

आश्रमासी येतां वामदेवाप्रति । अर्पी वा अश्वांसी राव म्हणे ॥ १ ॥
विद्ध मृग वनीं पलायन करी । संभावना करीं यास्तव अश्वें ॥ २ ॥
मुनि म्हणे राया होतां कार्यसिद्धि । त्वरित अश्वांसी पोंचवावें ॥ ३ ॥
मान्य वचन तें करूनि निघाला । योजूनि रथाला वामी अश्व ॥ ४ ॥
साधूनियां कार्य मंदिरासी जाई । अनावर होई लोभ तया ॥ ५ ॥
ऐसे कांही दिन लोटतां तो ऋषि । पाठवी शिष्यांसी आश्वांस्तव ॥
राव म्हणे विप्रां कासया हें रत्न । नृपाळांचें धन, सुखें जाई ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे वृत्त कथी शिष्य । ऐकूनि मुनीस क्रोध येई ॥ ८ ॥

४९६

क्रोधें वामदेव नृपाळासी भेटे । स्मरण वचनाचें देई तया ॥ १ ॥
राव म्हणे अश्व, गर्दभ, खेचर । तेणें तव कार्य सिद्ध होई ॥ २ ॥
ऐसे दिव्य अश्व नृपाळांचें धन । सत्वरी निघून आश्रमीं जा ॥ ३ ॥
वामदेव तदा क्रुद्ध तें ऐकोनि । राक्षस निर्मूनि वधिलें तया ॥ ४ ॥
पुढती राज्यारूढ दल होई परी । वामदेवावरी वेळ तीच ॥ ५ ॥
मागतां अश्वांसी दावी विषवाण । भक्षितील श्वान तुजसी म्हणे ॥
मुनि म्हणे वध होईल पुत्राचा । बोलतां सुताचा नाश होई ॥ ७ ॥
पाहोनि नृपाळ अंगावरी धांवे । तपोबळें पावे स्तंभत्व तो ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे अंतीं होई दीन । वदे तें ब्राह्मण ऐका काय ॥ ९ ॥

४९७

करीं बाणें राज्ञी विद्ध । नृपा होसील तें मुक्त ॥ १ ॥
तैसें करितां मुक्त झाला । राणी विनवी तें मुनीला ॥ २ ॥
करीं स्वधर्म पालन । बहुत कथिलें विनवून ॥ ३ ॥
मुनिश्रेष्ठा, पतिदेवासी । मजसवें लाभो गति ॥ ४ ॥
मुनि म्हणे मागें वर । पुण्यवती तूं साचार ॥ ५ ॥
राणी म्हणे पापमुक्ति । होवो त्वरित पतीची ॥ ६ ॥
पुत्र बांधवां समवेत । रमो नित्य स्वधर्मांत ॥ ७ ॥

होवो तयाचें कल्याण । वदला तथास्तु ब्राह्मण ॥ ८ ॥
गेला घेऊनि अश्वांसी । हर्षे वासुदेव चित्तीं ॥ ९ ॥

अध्याय १९३ वा ४९८

दीर्घायुष्याह्वानि विदेही जो मुक्त । तयालागीं श्रेष्ठ सुखलाभ ॥१॥
सिद्धांत अचल दृष्टांत देऊनि । कथिताती मुनि धर्माप्रति ॥ २ ॥
तपस्वी राजर्षि दीर्घायु तो वक । तैसाचि तो दाल्भ्य इंद्रसखे ॥३॥
विजयी देवेंद्र वकाच्या आश्रमीं । बैसे सुखासनीं मित्रभावें ॥ ४ ॥
म्हणे चिरंजीवा स्वानुभव कथीं । चिरंजीवालागीं दुःख काय ॥ ५ ॥
मुनि म्हणे इंद्रा इष्टांचा वियोग । अनिष्टाचा भोग होंचि दुःख ॥ ६ ॥
मूढ अकुलीन दुर्जनां वैभव । सज्जनांचा क्षय दुःखदाई ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे दीर्घायूचें सुख । ऐका कथी वक इंद्रालागीं ॥ ८ ॥

४९९

गृहीं उपोषण अथवा एकभुक्त । किंवा केवळ शाक भक्षी सुखें ॥
परी दुर्जनांचा आश्रय न करी । कोणींहि नधरी दूर तया ॥ २ ॥
खादाड जयासी कोणींहि म्हणेना । कोणी कंटाळेना वसतां गृहीं ॥
कष्टार्जित कण अमृतासमान । जयासी ते धन्य जगामाजी ॥ ४ ॥
ग्रासागणिक त्यासी सहस्र गोदान । यौवनींचें कर्म क्षीण त्याचें ॥
विप्रांलागीं दान अर्पूनि जो भक्षी । पापमुक्ति त्याची सहज घडे ॥
वासुदेव म्हणे ऐकूनि ते वाणी । मुनींसी वंदूनि इंद्र जाई ॥ ७ ॥

अध्याय १९४ वा ५००

धर्म म्हणे मार्कंडेया । क्षत्रियांची महती दावा ॥ १ ॥
ऐकूनियां मुनि तुष्ट । कथिती सुहोत्राचें वृत्त ॥ २ ॥
कुरुकुळींचा तो राजा । मार्गी भेटे औशीनरा ॥ ३ ॥
दोघेहि ते समगुणी । म्हणती मार्ग द्यावा कोणीं ॥ ४ ॥
मार्गी राहिले तटस्थ । येती इतुक्यांत नारद ॥ ५
म्हणती कां रे उभे ऐसे । वृत्त ऐकिलें तयांचें ॥ ६ ॥
ऐकूनियां वदती मुनि । श्रेष्ठ कनिष्ठालागूनि ॥ ७ ॥

ऐशावेळीं द्यावा मार्ग । तेणें श्रेष्ठत्वाचि सिद्ध ॥ ८ ॥
ऐकूनि हें औशीनरा । सुहोत्रानें मार्ग दिला ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे ऐसा । अधिकार त्या उभयांचा ॥ १० ॥

अध्याय १९५ वा ५०१

युधिष्ठिरालागीं मार्कंडेय म्हणे । ययाति या नामें नृप एक ॥ १ ॥
तयाच्या सभेसी येई एक विप्र । गुरुदक्षिणार्थ एकावेळीं ॥ २ ॥
विप्र म्हणे जरी याचकाचा द्वेष । असे तरी द्रव्य नको मज ॥ ३ ॥
राव म्हणे नसे अदेय मजसी । नित्य याचकासी वघूनि सौख्य ॥
ऐसें बोलूनियां सहस्र धेनूंसी । अर्पूनि विप्रासी सुखी केलें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे उदार क्षत्रिय । दानें कृतकार्य होती बहु ॥ ६ ॥

अध्याय १९६ वा ५०२

सेदुक, वृषदर्भ, नृपाळ हे दोन । वृषदर्भ पण गुप्त करी ॥ १ ॥
विप्रांलागीं दान रौप्य-सुवर्णाचें । न घडो अन्य, तें दान घडो ॥२॥
सेदुकें विप्रासी जाणूनि हें वृत । धाडिलें अश्वार्थ भवनीं त्याच्या ॥
अश्वयाचना ती ऐकोनि ताडिलें । पुढती द्रव्य दिलें अगणित ॥४॥
वासुदेव म्हणे उदार क्षत्रिय । सुप्रसन्न विप्र करिती दानें ॥ ५ ॥

अध्याय १९७–१९८ वा ५०३

शिनिश्येनाचा वृत्तांत । कथिती अल्पवृत्त भेद ॥ १ ॥
ऊरु मांसाचें त्या जाण । पक्षी करी राजाचिन्ह ॥ २ ॥
पुत्र दिधला तयासी । नाम ‘ कपोतरोम ’ ज्यासी ॥ ३ ॥
वैश्वामित्र अष्टकाचा । अश्वमेध तो एकदां ॥ ४ ॥
प्रतर्दन वसुमना । औशीनर शिबि जाणा ॥ ५ ॥
ऐसे बांधव नृपाचे । तयांसवें राव बैसे ॥ ६ ॥
इतुक्यामाजी नारद मुनि । प्राप्त होती तया स्थानीं ॥ ७ ॥
सन्मानूनि तयांप्रति । प्रश्न नृपाळ करिती ॥ ८ ॥
प्रथम पतन कोणाचें । म्हणती कथावें आम्हांतें ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे मुनि । नारदांची ऐका वाणी ॥ १० ॥

५०४

भूलोकीं अष्टक येईल प्रथम । दानाचा अभिमान धरिला तेणें ॥१॥
पुढती प्रतर्दन पावेल पतन । याचितां उद्विग्न जाहला तो ॥ २ ॥
निजकार्य होतां देईन मी अश्व । बोलला विप्रांस कार्यासक्त ॥ ३ ॥
अंतीं रथ, अश्व दिधले चौघांसी । परी दुःख त्यासी अंतरांत ॥ ४ ॥
'वसुमना' चें त्या पुढती पतन । वाउगें वचन मधुर बोले ॥ ५ ॥
निर्मिला तयानें रम्य पुष्परथ । 'आपुलाचि' मज व्यर्थ वदे ॥ ६ ॥
तीन वेळ गेलों स्वस्तिवाचनासी । वदला तैसेंचि परि न देई ॥७॥
मजहूनि श्रेष्ठ शिवीचें सत्कर्म । विप्रास, शिजवून पुत्र अर्पी ॥ ८
विप्र म्हणे राया भक्षीं तूंचि यासी । शांत त्या कर्मासी प्रवर्तला ॥
पाहूनि ते शांति विप्र संतोषला । अर्पोनि पुत्राला गुप्त होई ॥१०॥
शिविराजा शांत उदार निष्काम । होऊनि ब्राह्मण, ब्रह्मा येई ॥११॥
वासुदेव म्हणे मार्कंडेय वाणी । ऐकूनियां मनीं हर्ष वाटे ॥ १२ ॥

अध्याय १९९ वा

५०५

धर्म म्हणे अन्य पुरातन कोणी । असे कीं अवनीमाजी मुने ॥ १ ॥
मुनि म्हणे धर्मा, इंद्रद्युम्न नृप । क्षीणपुण्यें स्वर्ग त्यजूनि आला ॥
यावत्काल कीर्ति स्वर्ग तावत्काल । जाणोनि नृपाळ वदला मज ॥
ओळख मुनींद्रा नसे कीं रे माझी । रत तपामाजी वदलों तया ॥४॥
'प्रावारकर्ण' तो उलूक पूर्वीचा । ओळखील साचा तुजलागीं ॥५॥
ऐकूनियां ऐसें होऊनियां अश्व । वाहूनियां मज नेई तेथें ॥ ६ ॥
येरु म्हणे 'बक' ओळखील तुज । 'अकूपार' कच्छ वदला तोही
भेटतां कच्छासी होई तो सद्गद । वदला विख्यात यज्ञकर्ता ॥ ८ ॥
संचारें धेनूंच्या होई सरोवर । जाहलें अपार धेनुदान ॥ ९ ॥
त्याचि सरोवर-तीरीं माझा वास । म्हणे वासुदेव नवल तोंचि ॥

५०६

दिव्य रथ प्रगटला । शब्द कानावरी आला ॥ १ ॥
इंद्रद्युम्ना तुझी कीर्ति । जाणें अखंड या लोकीं ॥ २ ॥

वैसूनियां रथावरी । स्वर्गी येई वा सत्वरीं ॥ ३ ॥
पुण्यें स्वर्गलोकप्राप्ति । पापें होई अधोगति ॥ ४ ॥
धर्मा पोंचवूनि आम्हां । राव गेला स्वर्गस्थाना ॥ ५ ॥
धर्म म्हणे मुनिश्रेष्ठा । पावन केलेंसी पतिता ॥ ६ ॥
मुनि म्हणे गोविंदानें । नृगा पापमुक्त केलें ॥ ७ ॥
वंदूं तया मुकुंदासी । मागूं सद्‌बुद्धि तयासी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे धन्य । भारताचें ज्यां श्रवण ॥ ९ ॥

अध्याय २०० वा

५०७

दानफल कदा लाभे, तेंवी कैसें । मुनि या प्रश्नाचें उत्तर देई ॥ १ ॥
पुत्रहीन किंवा धर्महीन नर । व्यर्थ खरोखर जन्म त्याचा ॥ २ ॥
परान्नजीवी जे स्वगृहीं अधाशी । न पाळितां प्रौढी गोरक्षक ॥ ३ ॥
वृथा जन्म त्यांचा जाणावा सर्वथा । बोलला हे वाचा मार्कंडेय ॥
आरूढपतित अन्याय्य, संचयी । अथवा गुरुद्रोही, पतित, स्तेन ॥
पापी, कृतघ्न जो वेदाचा विक्रयी । जातिमात्र पाहीं ब्राह्मण जो ॥
शूद्रयाजी तेंवी ग्रामजोशी जाण । शूद्रस्त्रीग्रहण, गारुडी जो ॥७॥
वासुदेव म्हणे स्त्रिया, परिचारक । ऐसीयांसी व्यर्थ देतां दान ॥८॥

५०८

मंत्र-जप-होम-स्वाध्यायस्वरूपी-। नौका, ब्राह्मणासी पार करी ॥१॥
ऐशा याचकासी देईल जो दान । जाई उद्धरून निश्चयें तो ॥ २ ॥
विविध प्रकारें महात्म्य दानाचें । मार्कंडेय साचें कथिती धर्मा ॥३॥
शहायशीं सहस्र योजनें अंतर । यमलोक दूर कथिती मुनि ॥ ४ ॥
दात्यासी ते प्राप्ति यमलोकीं जातां । मार्गामाजी सौख्या पावे बहु ॥
वाणी, कर्म, देह, त्रिविध तें शौच । सर्वदा विप्रास उद्धारक ॥ ६ ॥
प्रतिग्रह दोष नलागे विप्रांसी । नित्य जे गायत्री जपती नेमें ॥ ७ ॥
विप्र तो सत्पात्र नसे जया स्थानीं । अपवित्र भूमि जाणा तेचि ॥८॥
वासुदेव म्हणे निर्मल अंतर । जयाचें तो नर पुण्यवंत ॥ ९ ॥

५०९

काया-वाचा-मनें सर्वदा जे शुद्ध । सर्वपापमुक्त जाणा त्यांसी ॥१॥

शरीर-शोषण तप नव्हे जाणा । ज्ञानयुक्त कर्मा महाफल ॥ २ ॥
अग्निदग्धबीजासम ज्ञानदग्ध । अविद्यादि क्लेश निवारक ॥ ३ ॥
अर्धश्लोकें जरी ज्ञान होई जीवा । प्रयोजन तया नसे कांहीं ॥ ४ ॥
प्रचीति न ज्यासी नित्य तो साशंक । स्वानुभव श्रेष्ठ मोक्षचिन्ह ॥
सुसंस्कृतबुद्धि आचार्यवचनें । तैसीच शास्त्रानें, उपाय तो ॥ ६ ॥
स्वधर्मानें स्वर्ग, दानें उपभोग, । तीर्थस्नानें नाश दुष्कृताचा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे मुक्ति ते ज्ञानानें । कथिती प्रेमानें मार्कंडेय ॥ ८ ॥

५१०

पर्वकालीं दान होई शतगुण । गजछाया जाण महापर्व ॥ १ ॥
'प्रतिस्रोतें' तीर्थीं सत्पात्र विप्रासी । दान देई त्यासी महाफल ॥
यात्रें तेसें द्यावें, ऐसा न्याय जनीं । आणोनि हें ध्यानीं दान करा ॥
सुवर्ण अग्नीचें, भूमि ते विष्णूची । धेनु ते सूर्याची कन्या जाणा ॥
दानत्रयें घडे लोकत्रय दान । त्रिकालीं पावन दान एक ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे दानाची श्रेष्ठता । सर्वकाल ज्ञाता मान्य करी ॥ ६ ॥

अध्याय २०१ वा ५११

युधिष्ठिर म्हणे सर्वज्ञ मुनींसी । कथा 'कुवलाश्वाची' सांगा मज ॥
धुंधुमार नाम कैसें तया प्राप्त । महामुनि ऐक म्हणती तया ॥ २ ॥
उत्तंकानें पूर्वी आचरिलें तप । प्रसन्न तयास महाविष्णु ॥ ३ ॥
पाहोनि विष्णूसी स्तविलें विप्रानें । वर माग म्हणे देव तया ॥ ४ ॥
विप्र म्हणे देवा, दर्शनें मी धालों । पूर्णकाम झालों महाविष्णो ॥५॥
देव म्हणे विप्रा, मागें तूं अवश्य । निष्काम सेवेस वश झालों ॥६॥
विप्र म्हणे देवा कमलनयना । धर्म-सत्य-दमां, देई मज ॥ ७ ॥
निरंतर राहो तुझेंचि स्मरण । चरणीं शुद्ध प्रेम राहो सदा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे प्रार्थना विप्राची । ऐकूनि प्रभूसी हर्ष झाला ॥ ९ ॥

५१२

नारायण बोले हर्षें । पुरतील हेतु तुझे ॥ १ ॥

---

१ पूर्वेकडे वाहणारा नदीचा प्रवाह ज्या ठिकाणीं पश्चिमवाही होतो तें तीर्थ.

देव संतुष्ट सर्वदा । पावसील ऐशा योगा ॥ २ ॥
करिसील महत्कार्य । सन्मानिती तुज आर्य ॥ ३ ॥
कुवलाश्व ‘ धुंधुमार ’। तुझ्या प्रसादें होईल ॥ ४ ॥
देव ऐसें बोलोनियां । गुप्त होई तया ठाया ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे रम्य । वृत्त, पुढें द्यावें ध्यान ॥ ६ ॥

अध्याय २०२ रा

५१३

बृहदश्व नामें इक्ष्वाकु कुळांत । राजा पुण्यवंत महा योद्धा ॥ १ ॥
कुवलाश्व नामें तयालागीं सुत । पित्याहूनि श्रेष्ठ गुण त्याचे ॥ २ ॥
पुत्रासी अर्पोनि राज्य बृहदश्व । चालला वनास तपालागीं ॥ ३ ॥
उत्तंक मुनीसी कळतां वृत्तांत । निवारी तयास येऊनियां ॥ ४ ॥
मुनि म्हणे राया, प्रजाकार्य साधीं । जावोनि वनासी काय लाभ ॥
निर्भयता जरी लाभेल आम्हांसी । तरीच तपासी स्फूर्ति येई ॥ ६ ॥
‘मरुधन्वा’ नामें आश्रमा सान्निध । प्रदेश विख्यात असे एक ॥ ७ ॥
‘उज्ञालक’ तेथ वालुमय सिंधु । तेथ वसे धुंधु दुष्ट दैत्य ॥ ८ ॥
भूमीमाजी वास करी, त्याचा वध- । करूनि, वनास सुखें जाई ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे धुंधूचीं दुष्कर्मै । कथिलीं उत्तंकानें रायालागीं ॥ १० ॥

५१४

महादुष्ट धुंधु दैत्य । तेणें केलें घोर तप ॥ १ ॥
देव, मानवांचा नाश । हाचि नित्य तया ध्यास ॥ २ ॥
अवध्य तो इतरांसी । वर ब्रह्म्याचा तयासी ॥ ३ ॥
करी सांप्रत शयन । वालुकेच्या विवरीं जाण ॥ ४ ॥
संवत्सरें सुटतां श्वास । सप्तदिन भूमीकंप ॥ ५ ॥
तदा उठती धूम्रज्वाला । नित्य पीडा आश्रमाला ॥ ६ ॥
वध करूनि तयाचा । मिळवीं अलौकिक यश ॥ ७ ॥
साह्य, माझें तपस्तेज । निश्चयेंसी होईल तुज ॥ ८ ॥
वरचि हा भगवंताचा । ऐकें नृपा माझी वाचा ॥ ९ ॥
उत्तंकाचा मनोदय । कथन करी वासुदेव ॥ १० ॥

अध्याय २०३ रा ५१५

जोडूनियां कर बृहदश्व म्हणे । कार्य हें सन्मुने करिल सुत ॥ १ ॥
कुवलाश्व माझा पुत्र वीर्यवंत । सुपुत्र त्रिःसप्तसहस्र त्या ॥ २ ॥
कथूनियां ऐसें अनुज्ञा घेवोनि । बृहदश्व वनीं जाई सुखें ॥ ३ ॥
युधिष्ठिर म्हणे धुंधु-दैत्यवृत्त । कथावें समस्त मजलागीं ॥ ४ ॥
मुनि म्हणे पूर्वी मधु-कैटभांनीं । पाहिलें शयनीं भगवंतासी ॥ ५ ॥
नाभीकमळीं तो होता ब्रह्मदेव । दैत्यासी विस्मय पाहूनियां ॥ ६ ॥
पीडा तयालागीं देती ते दुर्जन । कमल हालवून उठवी देवा ॥ ७ ॥
विष्णु म्हणे तदा पाहूनि दैत्यांसी । मागा जें चित्तासी तुमच्या येई
गर्विष्ठ ते दैत्य बोलले विष्णूसी । तूंचि आम्हाप्रति मागें कांहीं ॥
देव म्हणे मज वध्य तुम्हीं व्हावें । हेतु पुरवावे मनिंचे माझ्या ॥
वासुदेव म्हणे ऐकूनि ते वाणी । चिंतूनियां मनीं वदले दैत्य ॥ ११ ॥

५१६

दैत्य बोलले विष्णूसी । सत्यावरी आम्हां प्रीति ॥ १ ॥
असत्य तें थट्टेमाजी । वदलों नाहींच कदापि ॥ २ ॥
शौर्य, शम, धैर्य, तप । दान, शील तेंवी सत्त्व ॥ ३ ॥
बल, रूप तें संयम । असामान्य ऐसे गुण ॥ ४ ॥
असो, अनावृत नभीं । संहारीं तूं आम्हांलागीं ॥ ५ ॥
लाभो तुझेंचि पुत्रत्व । पुरवीं मनींची ही आस ॥ ६ ॥
निज ऊरु अनावृत । पाहूनि सोडीयेलें चक्र ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐसा । वध केला त्या दैत्यांचा ॥ ८ ॥

अध्याय २०४ था ५१७

मधु-कैटभांसी धुंधुनामें सुत । तेणें उग्र तप आचरीलें ॥ १ ॥
देव-दानवांसी अवध्य जाहला । मागूनि ब्रह्म्याला तैसा वर ॥ २ ॥
पुढती जिंकूनि देवांसी तो दैत्य । विष्णूसी संत्रस्त करी बहु ॥ ३ ॥
उत्तंकआश्रमासन्निध राहिला । वारंवार ज्वाला निघती तेथें ॥ ४ ॥
कुवलाश्व तदा सेनेसह आला । सुचिन्हें त्याकाला बहुत होतीं ॥

सप्तदिन सिंधु खणिला पुत्रांनीं । जागृत होऊनि उठला धुंधु ॥ ६ ॥
दीप्तज्वालायोगें कुवलाश्वसुतां । दग्ध करी तदा धुंधु दैत्य ॥ ७ ॥
क्रोधें तें नृपाळ पुढती धांवला । विपुल तप्तजला सोडी धुंधु ॥
पाहोनि ब्रह्मास्त्र सोडी कुवलाश्व । दैत्य भस्मसात होई तेणें ॥९॥
वासुदेव म्हणे कुवलाश्वाप्रति । 'धुंधुमार' ऐसी पुढती संज्ञा ॥१०॥

५१८

सुप्रसन्न देवां मागे धुंधुमार । सखा तो उपेंद्र होवो मज ॥ १ ॥
लाभो अजिक्यता, अद्रोह भूतांसी । नित्य धर्मरति, स्वर्गवास ॥
आनंदें देवांनीं दिधली मान्यता । उत्तंकाच्या चित्ता समाधान ॥३॥
दृढाश्व, कपिलाश्व, चंद्राश्व हे तीन । उरले सुजाण राजपुत्र ॥४॥
धुंधुमार कथा विष्णूचें कीर्तन । गाईल तो धन्य जगामाजी ॥ ५ ॥
इहपर त्यासी निश्चयें लाभती । वासुदेव चित्तीं आनंदला ॥ ६ ॥

अध्याय २०५ वा ५१९

विनवी युधिष्ठिर मार्कंडेयाप्रति । साध्वीची महती सांगा मज ॥१॥
इंद्रियें दमूनि, मन संयमूनि । दैवताचि जनीं पति जयां ॥ २ ॥
दुष्कर तें कर्म ऐसें वाटे मज । सांगा मुनिराज स्वानुभवें ॥ ३
काया-वाचा-मनें सेविती पतीसी । उदरीं तयासी वागवीती ॥ ४ ॥
प्रसूती-वेदना प्राणांतीक होती । प्रेमें सांभाळिती अपत्यांसी ॥ ५ ॥
तैसेंचि स्वकर्म क्रूरही असोनि । आचरिती जनीं तेही धन्य ॥ ६ ॥
क्रूरकर्मं कैसी लाभेल सद्गति । शंका माझ्या चित्तीं सर्वकाल ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे मुनि धर्माप्रति । उत्तरें प्रश्नाचीं देती ऐका ॥ ८ ॥

५२०

मुनि म्हणे कोणी मातेसी वंदिती । पित्यासी मानिती श्रेष्ठ कोणी ॥
अपत्यलालन दुष्कर तें कर्म । युधिष्ठिरा जाण माता करी ॥ २ ॥
पुत्राचें कल्याण उभय इच्छिती । जनीं यश कीर्ति म्हणती वाढो ॥
माता-पित्यांची जे पुरविती कामना । सुपुत्र ते जाणा जगामाजीं ॥
माता-पिता नित्य जयासी प्रसन्न । सर्वलाभ जाण तयालागीं ॥ ५ ॥
केवळ पतीची करितां शुश्रूषा । उद्धार साध्वीचा खचित होई ॥

व्रतें, उपोषणें, श्राद्ध, यज्ञकर्मे। न लागती जाणें स्त्रियांलागीं ॥७॥
वासुदेव म्हणे मुनि हा सिद्धांत। देऊनि दृष्टांत कथिती ऐका ॥८॥

अध्याय २०६ वा

५२१

मुनि म्हणे भरतश्रेष्ठा। ऐकें रम्य एक कथा ॥ १ ॥
तपोनिष्ठ कौशिकमुनि। वेदवेत्ता वसे वनीं ॥ २ ॥
एक वलाका एकदां। त्याच्या शिरीं त्यागी विष्ठा ॥ ३ ॥
क्रोधें इच्छितां विनाश। पडली पावूनि पंचत्व ॥ ४ ॥
पाहूनियां खिन्न झाला। मुनि भिक्षेसी निघाला ॥ ५ ॥
येऊनियां एका गृहीं। म्हणे 'भवति भिक्षांदेहि'। ६ ॥
म्हणे सुगृहिणी थांव। पति पातला इतुक्यांत ॥ ७ ॥
क्षुधाकुल पाहूनि पति। अर्पी भोजन प्रेमेंसी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे सती। देव मानीतसे पति ॥ ९ ॥

५२२

पतीसेवेमाजी विस्मरण झालें। पुढती पाहिलें विप्रालागीं ॥ १ ॥
लज्जित होऊनि तत्काळ भिक्षेसी। आणितां विप्रासी क्रोध येई ॥
क्रोधें म्हणे कां गे विलंब हा केला। अपराध झाला सती म्हणे ॥३॥
पाहूनियां श्रांत परम दैवत। रमलें सेवेंत क्षमा करा ॥ ४ ॥
मुनि म्हणे विप्र इंद्रासही श्रेष्ठ। ब्राह्मण वरिष्ठ पतीहूनि ॥ ५ ॥
मर्त्य मानवांची कथिसी काय कथा। जाळितील विश्वा क्रुद्ध विप्र ॥
मूढे, वृद्धसेवा घडली न तुजसी। वासुदेव कथी विप्रवाणी ॥ ७ ॥

५२३

वंद्य तपोधना करू नको क्रोध। वलाका न मज समजें म्हणे ॥१॥
क्रुद्ध होऊनियां करिसील काय। ज्ञानी-विप्रपाय वंद्य मज ॥ २ ॥
सामर्थ्य विप्रांचें मजलागीं ज्ञात। विप्रा होई शांत क्षमा करीं ॥ ३ ॥
दैवत मजसी पतीविण नाहीं। महाफल पाहीं सेवेचें त्या ॥ ४ ॥
कळलें या ठाया काननींचें वृत्त। निवेदितें एक ज्ञानचिन्हें ॥ ५ ॥
कासया, न म्हणें, ज्ञात्याचीं लक्षणें। विद्येचीं साधनें तींच विप्रा ॥
क्षमा, गुरुभक्ति, आर्जव, संयम। येणेंचि ब्राह्मण्य सिद्ध होई ॥ ७ ॥

सूक्ष्म धर्म नसे तुजलागीं ठावा। मिथिलेसी पुसावा व्याधाप्रति ॥
पुनरपि क्षमा मागतां विप्रासी। प्रसन्न तिजसी विप्र होई ॥ ९ ॥
निंदिलेंसि परी कथिलेंसि प्रिय। तेणें निजकार्य साध्य म्हणे ॥१०॥
वासुदेव म्हणे निंदीत आपणा। पातला आश्रमा द्विजश्रेष्ठ ॥ ११ ॥

अध्याय २०७ वा

५२४

चकित होवोनि अंतरीं। जाई मिथिला नगरीं ॥ १ ॥
नगर, वैभवसंपन्न। पुशित जाई व्याधस्थान ॥ २ ॥
हरिण, महिषादींचें मांस। क्रेते बहु त्या स्थानास ॥ ३ ॥
तेथें उभा विप्र दूर। व्याध उठला सत्वर ॥ ४ ॥
वंदी जाऊनि विप्रासी। वदे कळलें रे मजसी ॥ ५ ॥
पतिव्रतेनें धाडिलें। विप्रा आश्चर्य वाटलें ॥ ६ ॥
व्याध नेऊनि गृहासी। देई आसन तयासी ॥ ७ ॥
अनुचित तुज हें कर्म। वदला तयासी ब्राह्मण ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे व्याध। ऐका बोलला जें वाक्य ॥ ९ ॥

५२५

व्याध म्हणे विप्रा परंपराप्राप्त। कर्म कुलोचित समजें मम ॥ १ ॥
स्थित मीं स्वधर्मीं मानूं नको खेदा। नेमी जें विधाता तेंचि इष्ट ॥२॥
वृद्ध माय-बापां सेवितों आदरें। नित्य सदाचारें क्रमितों वय ॥३॥
देवता, अतिथि, भृत्यांसी अर्पूनि। रमतों सेवूनि अन्न सदा ॥ ४ ॥
केवळ विक्रय करितों मांसाचा। न करीं मी कदा हिंसेप्रति ॥५॥
त्याज्य मजलागीं मांसाशन विप्रा। एकभुक्त सदा वसतों सुखें ॥६॥
दुःशीलही येणें शीलवंत होई। ऋतुकाळीं पाहीं गमन मज ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे हिंसाकर्मीरत। होईल धार्मिक तोही येणें ॥ ८ ॥

५२६

स्वैराचारी राव, संकरकारक। तेणें बहु दुःख होई जनां ॥ १ ॥
धर्म-वर्ण ऐसे संकर ते दोन। तेणें अंगहीन क्लीब प्रजा ॥ २ ॥
पिताचि तो नृप स्वधर्मपालक। पालनीं अदक्ष तस्कर तो ॥ ३ ॥
निंदा-स्तुति मम करिती तयांस। करितों संतुष्ट शुभकर्मे ॥ ४ ॥

धार्मिक, संयमी, उद्योगीं तत्पर। स्वावलंबी नर असती जनीं ॥५॥
यथाशक्तिदान तितिक्षा सत्कार। त्यागेंचि हे थोर गुण प्राप्त ॥६॥
करूं नये कदाकाळीं वृथावाद। प्रिय अयाचित सकलां द्यावें ॥ ७ ॥
काम-लोभ-भयें धर्म न सांडावा। नित्य सुजनभावा स्वीकारावें ॥
वासुदेव म्हणे ऐका व्याधवाणि। नास्तिकाची हानि सर्वकाळ ॥

५२७

मूढ गर्विष्ठाचा निष्फळ संकल्प। स्वयेंचि मूर्खत्व प्रगट करी ॥१॥
आत्मप्रशंसेनें ठरेना सद्गुणी। न बोलतां जनीं ज्ञाता श्रेष्ठ ॥ २ ॥
परनिंदा आत्मकीर्तिही कथीना। सज्जन तो जनां अज्ञातचि ॥ ३ ॥
कृतकर्मदोष पश्चातापें जाई। पुढती पाप नाहीं सत्कर्मानें ॥ ४ ॥
जप-तप-तीर्थें पापाची निवृत्ति। ऐसें प्रतिपादी श्रुतिमाता ॥ ५ ॥
पूर्व जन्मार्जित, अनवधानकृत। पापाचा विनाश स्वधर्मानें ॥ ६ ॥
स्वधर्मरतासी साह्य व्हावें सदा। करावी न्यूनता दूर त्याची ॥७॥
सज्जन छिद्रासी व्हावें आच्छादन। सर्वदा कल्याण आचरावें ॥८॥
वासुदेव म्हणे मोक्ष संपादन। ध्येय, हें जाणून कर्म घडो ॥ ९ ॥

५२८

दांभीकपणानें स्वधर्माचीं चिन्हें। धर्मशून्यमनें वरिती दुष्ट ॥ १ ॥
बाह्यचिन्हें सर्व दिसती साधूंचीं। अंतरीं स्वार्थाची घोर वापी ॥
शिष्टाचार नसे लवाहि तयांसी। सोंग सद्भावासी करितां नये ॥
विप्र म्हणे व्याधा, धर्मज्ञ तूं थोर। सांगें शिष्टाचारज्ञान मज ॥४॥
यज्ञ, दान, तप, वेद, सत्य, ऐसीं। कर्में हीं शिष्टांचीं व्याध म्हणे ॥
स्वाधीन विकार, ऋजुत्व जयांसी। म्हणावें तयांसी शिष्ट ऐसें ॥६॥
वासुदेव म्हणे द्वितीय लक्षण। सदाचार जाण सज्जनांचें ॥ ७ ॥

५२९

वेदरहस्य तें सत्य। दम सत्याचें रहस्य ॥ १ ॥
सार दमाचें तो त्याग। शिष्टांचें हें मुख्य अंग ॥ २ ॥
मोहें धर्माची असूया। करिती क्लेश बहु तयां ॥ ३ ॥

अनुयायीही तयाचे । भोगिताती क्लेश तैसे ॥ ४ ॥
घोर संसार-सरिता । उदक पंचेंद्रियें देखा ॥ ५ ॥
काम-लोभ-मकर, क्रूर । अचल नौका जाणें धैर्य ॥ ६ ॥
करूनि आश्रय तियेचा । पैलपार होई साचा ॥ ७ ॥
सदाचारासवें संत । एकरूप जाणें नित्य ॥ ८ ॥
न्याय्य प्रवृत्ति तो धर्म । अनाचार तो अधर्म ॥ ९ ॥
कर्म स्वभावानुरूप । जन आचरिती देख ॥ १० ॥
वासुदेव म्हणे शांति । राखी शिष्ट सदा चित्तीं ॥ ११ ॥

५३०

दुष्कर आचार अंतरीं उदार । तेचि शिष्ट थोर जगामाजी ॥ १ ॥
आचरिती धर्म नित्य आदरानें । धर्मज्ञान धर्मे होई तयां ॥ २ ॥
जगामाजी नित्य थोर सदाचार । जाण तें आश्चर्य सनातन ॥ ३ ॥
श्रौतस्मार्त धर्म शिष्टांचा आचार । तोचि सदाचार बोलिजेतो ॥
स्वजनां आधार दया दीनांवरी । प्रेम विद्येवरी धनासम ॥ ५ ॥
शांति क्षमा चित्तीं संतोष सर्वदा । मुक्त तो तत्त्वतां सर्वकाळ ॥६॥
वासुदेव म्हणे शिष्टांचा हा धर्म । व्याध संतोषून विप्रा सांगे ॥ ७॥

अध्याय २०८ वा ५३१

यद्यपि हें कर्म आचरितों घोर । दैव बलवत्तर असे माझें ॥ १ ॥
पूर्वकर्मे घडे लाभ-हानि सर्व । निमित्त मानव होई जरी ॥ २ ॥
साविधि तें मांस त्याज्य न मानावें । कलींत जाणावें वर्ज्य तेंही ॥
अपरिहार्य ते हिंसा नित्य जाणा । जीवचि जीवांना जीवन तें ॥४॥
मित्रहि मित्राचा, बंधु बांधवाचा । द्वेष करी साचा जगामाजी ॥५॥
उत्कर्ष कोणाचा पाहवे न कोणा । दोषचि सज्जना देती व्यर्थ ॥६॥
ऐसा विपरीत प्रकार या लोकीं । पाहोनियां चित्तीं खेद वाटे ॥७॥
वासुदेव म्हणे स्वधर्म निरत । तयासी सुयश प्राप्त होई ॥ ८ ॥

अध्याय २०९ वा ५३२

श्रुतिसंमत हा धर्म । ऐसें वृद्धांचें शासन ॥ १ ॥

असत्यहि होई सत्य। समर्थीं सत्यही असत्य ॥ २॥
ऐसी सूक्ष्म त्याची गति। कर्मासम फलप्राप्ति॥ ३॥
मूढालागीं सुख-दुःख। भासतसे विपरीत॥ ४॥
अधार्मिका सुखप्राप्ति। धार्मिक तो दुःख भोगी॥ ५॥
फल न लाभे यत्नांचें। दैव कारण तयाचें॥ ६॥
गर्भश्रीमंतचि कोणी। कोणी कुलांगार जनीं॥ ७॥
वासुदेव म्हणे ऐसे। सूक्ष्म धागे या कर्माचे॥ ८॥

५३३

कर्में होई रोगप्राप्ति। व्हावी उपायें निवृत्ति॥ १॥
विपुल अन्नें बद्ध-कोष्ठ। इतरां अन्नालागीं कष्ट॥ २॥
जीव कर्मफलाधीन। लाभे तेणेंचि मरण॥ ३॥
अप्रिय न कोणी इच्छी। यत्न करी यथाशक्ति॥ ४॥
परी फल इच्छेसम। घडेनाचि हा नियम॥ ५॥
सुमुहूर्त हें निमित्त। फलें भिन्न भिन्न प्राप्त॥ ६॥
सद्यः फल या कर्मातें। चार्वाकाचें मत ऐसें॥ ७॥
कृतहानि अकृतलाभ। तयामतीं ऐसे दोष॥ ८॥
वासुदेव म्हणे बद्ध-। जीव, जाई परजन्मास॥ ९॥

५३४

विप्र म्हणे कैसा शाश्वत हा जीव। प्रमाण वैभव व्याध म्हणे॥१॥
सुख-दुःख भेदें पूर्वजन्मासिद्धि। कर्मासम वृद्धि लाभतसे॥ २॥
विप्र म्हणे जीव जन्म घेई कैसा। व्याध म्हणे विप्रा अवघें कर्म॥३॥
आब्रह्मस्तंब हें कर्मचि जाणावें। कर्मासम व्हावें, देव, पशु॥ ४॥
दुःखाभाव तेंचि सौख्य मानी जीव। उतरतां भारवाहक, जें॥५॥
पापें पापवृद्धि पुण्यवृद्धि पुण्यें। यास्तव प्रयत्नें पुण्य करा॥ ६॥
सवैराग्य पुण्य जया तोचि धन्य। भोगेच्छा ते क्षीण होई त्याची॥
ज्ञानदृष्टि येतां, राग-द्वेषहानि। निरिच्छ स्वधर्मीं रमतसे॥ ८॥
मोक्ष्याचें साधन एकमेव ज्ञान। मूळ शम, दम ज्ञानालागीं॥ ९॥
विप्राच्या प्रश्नासी उत्तर व्याधाचें। वासुदेव मोदें सांगे ऐका॥१०॥

अध्याय २१० वा

५३५

अंधःकारामाजी घटाच्छन्न दीप। छिद्रेंसी प्रकाश सकलां देई ॥ १ ॥
छिद्रें ते जाणावीं इंद्रियें शरीरीं। प्रकाश बाहेरी तेंचि मन ॥ २ ॥
विषयांचा बोध मन देई जीवा। राग-द्वेषभावां पुढती जन्म ॥ ३ ॥
इष्टास्तव यत्न तयापुढें होई। द्वेष, लोभ, पाहीं पुढती मोह ॥ ४ ॥
मोहें अविवेक, अधर्म घडवी। अधःपात होई दुराचारें ॥ ५ ॥
द्रव्यलोभ होतां कुमार्ग तयासी। ज्ञात्या सुहृदांसी अवमानी तो ॥
साधनरहित, श्रुति वचनांसी। अस्थानीं तो योजी ज्ञानगर्वें ॥ ७ ॥
शमादि सद्‌गुण नष्ट होती त्याचे। समानशीलातें सख्य घडे ॥८॥
वासुदेव म्हणे इहपरनाश। पापप्रवृत्तास ऐशा रीति ॥ ९ ॥

५३६

अधःपात ऐसा होई हें जाणोनि। रमती सत्कर्मीं तेचि भले ॥ १ ॥
सुखदुःखभाव कौशल्यें निवारी। साधुसंग धरी शुभकर्मा ॥ २ ॥
परिच्छेदशून्य ब्रह्म-परा, गति। अविद्यावंतासी यज्ञादिक ॥ ३ ॥
एकत्व ज्ञान, ते विद्या समजावी। मायाचि जाणावी द्वैतमूळ ॥ ४ ॥
रज्जु-सर्पन्यायें ब्रह्म अधिष्ठान। कर्म, भक्ति, ज्ञान ऐलतटीं ॥ ५ ॥
वेदविधि नसे बंधन ज्ञात्यासी। स्वभाव तयासी तोचि जरी ॥ ६ ॥
भूतभौतिकांसी ग्राह्यत्व या जनीं। ऐक्यभाव अग्नि-लोहासम ॥ ७ ॥
आत्मा, चित्त, दोन्हीं ऐक्यता पावती। सच्चिदानंदासी दुःख तेणें ॥
वासुदेव म्हणे भोग्य व्यक्ताव्यक्त। आत्मा तो अलिप्त सर्वांहूनि ॥९॥

अध्याय २११ वा

५३७

वर्णिलीं पुढती पंचमहाभूतें। विप्राच्या प्रश्नातें विवेचिलें ॥ १ ॥
पंचदश गुणें वास शरीरांत। अन्य देह ध्यास पुढती तया ॥ २ ॥
दृढाभिमानें त्या अत्यंत विस्मृति। पूर्वशरीराची जीवालागीं ॥ ३ ॥
इंद्रियांसी ग्राह्य व्यक्त तें जाणावें। अव्यक्त गणावें अग्राह्य तें ॥४॥
विषयातिक्रमें इंद्रियां जिंकोनि। तपोबळें ज्ञानी होई जीव ॥ ५ ॥
प्रारब्ध तोंवरी राही जीवन्मुक्त। पापपुण्यासक्त नसे तदा ॥ ६ ॥
विद्यावृत्ति नाशी अविद्यावृत्तीतें। ऐसा मोक्ष लाभे वासुदेवा ॥७॥

५३८

ऐकें साधन मुक्तीचें । संयमन इंद्रियांचें ॥ १ ॥
चित्तैकाग्र्यरूपी तप । अन्यथा तें न घडे देख ॥ २ ॥
ज्ञानेंद्रियांसवें मन । आत्मकल्पित तें जाण ॥ ३ ॥
यांसी जिंकील तयातें । नसे भय संसाराचें ॥ ४ ॥
पुरुषासी देह, रथ । बुद्धि सारथी तयास ॥ ५ ॥
इंद्रियें ते अश्व त्यासी । जरी कुशल सारथी ॥ ६ ॥
आंवरील मनोरश्मि । नेई पुरुषासी स्वस्थानीं ॥ ७ ॥
अश्व धांवतां यथेच्छ । व्यर्थ जाई शास्त्राभ्यास ॥ ८ ॥
जलसंचारी जें नौका । वायु नेतसे कुमार्गा ॥ ९ ॥
तैसीं इंद्रियें बुद्धीसी । दुष्टमार्गाप्रति नेती ॥ १० ॥
कामी होई विषयासक्त । विरक्तासी तेणें दुःख ॥ ११ ॥
सर्वकाल ध्यानमग्न । फल तया ज्ञानजन्य ॥ १२ ॥
वासुदेव म्हणे दोष । कळती विषयांचे तयांस ॥ १३ ॥

अध्याय २१२–२१३ वा ५३९

निरूपिले व्याधें सत्व, रज, तम । विप्र करी प्रश्न विज्ञानाचा ॥ १ ॥
शरीराभिमानी कैसा तो संभवे । वायु कैंवि पावे चेष्टारूप ॥ २ ॥
चित्प्रतिबिंब तो जाणें विज्ञानात्मा । देहासी चेतना तयायोगें ॥ ३ ॥
विज्ञान चिदात्माआश्रयें तो प्राण । चलन वलन करवीतसे ॥ ४ ॥
सूत्रात्मा म्हणती प्राणासी सुजाण । शक्ति, क्रिया, ज्ञान तयामाजी ॥
समष्टि जीव हा आधार भूतांसी । अहंकार, शब्दादि, तोचि सर्व ॥
उपाधि प्रवेशें जीवत्व तयासी । भिन्न भिन्न गति तैशापरि ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे उपाधीचे गुण । ते जीव-चैतन्य आपुले मानी ॥ ८ ॥

५४०

वायुसंघर्ष तो जठराग्नि देहीं । रोधितां तो होई इंद्रियजय ॥ १ ॥
नाभिप्रदेशासी इंद्रियें सकळ । आम-पक्वाशय, ऊर्ध्व, अध ॥ २ ॥
हृदयापासूनि सकल अन्नरस । वायु दशविध, शरीरीं नेती ॥ ३ ॥
नाग, कृकल, कूर्म, तैंवी देवदत्त । धनंजय, पंच उपप्राण ॥ ४ ॥

मूर्धीस्थानीं प्राण स्थापिताती योगी जाती परमपदीं प्राणजयें॥५॥
वासुदेव म्हणे आत्मा निराकार। अध्यासें साकार भासतसे ॥ ६॥

५४१

चित्तप्रसादानें घडे आत्मलाभ। चित्त तें नीवात दीपासम ॥ १ ॥
सुस्नाताचें वस्त्र असूनि न भासे। एकाग्र तें तैसें चित्त जाणा ॥२॥
पूर्वोत्तर रात्रीं करी जो अभ्यास। हृदयीं ब्रह्मास अवलोकी तो ॥३॥
परम बल क्षमा, दया श्रेष्ठ धर्म। श्रेष्ठ आत्मज्ञान, ज्ञानामाजी ॥४॥
सत्य श्रेष्ठ व्रत, हित तेंचि सत्य। अहितकारी सत्य, अनृतचि ॥५॥
फलेच्छारहित सत्कर्म जयाचीं। सत्य तो संन्यासी समजें मनीं ॥६॥
वासुदेव म्हणे चित्ताचा वियोग। लक्षणेनें योग म्हणती तया ॥ ७॥

अध्याय २१४ वा

५४२

विप्र जाहला संतुष्ट। पाहूनियां बोले व्याध ॥ १ ॥
मूर्तिमंत माझा धर्म। आतां करीं अवलोकन ॥ २ ॥
ऐसें बोलूनि विप्रासी। नेलें अंतगृहामाजी ॥ ३ ॥
देवगृहासम शुद्ध। भरला स्थानीं त्या सुगंध ॥ ४ ॥
वृद्ध दैवतें व्याधाचीं। माता-पितरें तयाचीं ॥ ५ ॥
तृप्त बैसलीं आसनीं। व्याध वंदी त्यां चरणीं ॥ ६ ॥
म्हणती होईल कल्याण। सेवातत्पर तूं जाण ॥ ७ ॥
परशुरामासम सेवा। करिसी आमुची तूं बाळा ॥ ८ ॥
पुढती विप्रासी वंदिलें। कुशल तयासी पुशिलें ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे व्याध। कथितो वडिलांचें महत्त्व ॥ १० ॥

५४३

माता-पिता माझें परमदैवत। सर्वभावें भक्त तयांचा मी ॥ १ ॥
गंध, पुष्पें जैसें पूजन देवांचें। स्वमाता-पित्यातें पूजितों मी ॥ २ ॥
पुष्पें, फलें, रत्नें, अर्पूनि सादर। प्रसन्न अंतर करितों त्यांचें ॥ ३ ॥
अग्नि, यज्ञ वेद माता-पिता मज। यांच्यास्तव सुत आप्त भार्या ॥ ४ ॥
पादप्रक्षालन, स्नान, पान, अन्न। सेवा बाळांसम करितों प्रेमें ॥५॥
अप्रिय तयांचें न घडे सर्वथा। करितों शुश्रूषा अधर्मेंहि ॥ ६ ॥

माता, पिता, अग्नि, आत्मा, आचार्यहि । गृहस्थासी पाहीं गुरु पांच
वासुदेव म्हणे सेवितां तयांसी । होई धर्मप्राप्ति सर्वकाल ॥ ८ ॥

अध्याय २१५ वा ५४४

व्याध म्हणे विप्रा, संतवचनाचा । प्रत्ययचि साचा प्राप्त तुज ॥ १ ॥
माता पितरांसी त्यागूनि आलासी । अंधत्व तयांसी तया दुःखें ॥
जावोनि तयांची सेवा करीं बापा । व्यर्थ ऐशा तपा करूं नको ॥३॥
आजचि जावोनि सुख तयां देईं । श्रेयःप्राप्ति होई तेणें तुज ॥ ४ ॥
विप्र म्हणे व्याधा, तारिलेंसि मज । विज्ञाता दुर्लभ तुझ्यासम ॥५॥
शूद्रयोनीमाजी जन्मलासी कैसा । सांग सांग व्याधा मजलागीं ॥६॥
माता पितरांची करीन मी सेवा । हर्ष वासुदेवा ऐकूनियां ॥ ७ ॥

५४५

व्याध म्हणे विप्रसुत पूर्वजन्मीं । दक्ष अध्ययनीं होतों सदा ॥ १ ॥
पारंगत झालों धनुर्विद्येमाजी । नृपाळ संगती फळली मज ॥ २ ॥
नृपासवें वनीं मृगयेसी जातां । घोर शरें एक्या, वधिला मुनि ॥३॥
मानूनियां मृग जातां मी सन्निध । मुनि म्हणे, शूद्र व्याध होईं ॥४॥
वासुदेव म्हणे कथा हे व्याधाची । ऐकावी पुढती शांतचित्तें ॥५॥

अध्याय २१६ वा ५४६

क्षमस्व जाहला न कळतां अपराध । वदतां मुनिराज द्रवला मनीं ॥
पूर्वजन्म स्मृति सेवा वडिलांची । घडेल तुजसी विप्र म्हणे ॥ २ ॥
तया पुण्यें स्वर्ग पावसील ऐसें । बोलतां शरातें काढियेलें ॥ ३ ॥
आश्रमांत येतां सोडियेले प्राण । जाहलों उद्विग्न तयावेळीं ॥ ४ ॥
कथूनियां ऐसें वृत्त, वदे व्याध । जातों मी स्वर्गात सौख्यें आतां ॥
विप्र म्हणे व्याधा, विप्रकुळीं जन्म । पावसील जाण खचित श्रेष्ठा ॥
अद्यही सद्गुणें विप्रचि तूं व्याधा । दुष्कर्मे विप्रत्वा बाध येई ॥
वासुदेव म्हणे शूद्रतुल्य विप्र । विप्रतुल्य शूद्र कर्मे होती ॥ ८ ॥

५४७

व्याध म्हणे मानवासी । येई अनिष्टें विरक्ति ॥ १ ॥
करूनियां व्यर्थ शोक । न ये कांहींचि हातास ॥ २ ॥

असंतोष सदा मूढा । तोष सुजनांसी सर्वदा ॥ ३ ॥
असंतोषा नाहीं अंत । संतोष तें परम सुख ॥ ४ ॥
विषादचि विष जनीं । खिन्नता न यावी मनीं ॥ ५ ॥
न करी विषादि पुरुषार्थ । न शिवे मजलागीं शोक ॥ ६ ॥
पुढती घेऊनि अनुज्ञा । घाली विप्र प्रदक्षिणा ॥ ७ ॥
व्याधें वंदिलें विप्रासी । विप्र गेला स्वगृहासी ॥ ८ ॥
माता-पित्यासी सेविलें । ऐसें कथानक भलें-॥ ९ ॥
मार्कंडेय कथी धर्मा । वासुदेव वंदी मान्यां ॥ १० ॥

अध्याय २१७–२१८ वा ५४८

अंगिरा, तपानें अग्नीसम होई । उद्वेग तें येई अग्नीलागीं ॥ १ ॥
अंगिरा तयासी बोले नम्रभावें । पूर्वस्थानीं जावें कार्यास्तव ॥ २ ॥
अग्नि म्हणे मुने, तूंचि हुताशन । अग्नित्व सोडून जातों आतां ॥३॥
विराटात्मा सुखें होईन मी आतां । येरु म्हणे ताता-पिता होई ॥४॥
पुढती अंगिरा अग्निपुत्र झाला । अग्नीहि जाहला पुत्र त्याचा ॥ ५ ॥
तोचि बृहस्पति, देवांचा आचार्य । जाणीतसे थोर कारण ब्रह्म ॥
वासुदेव म्हणे विविध ते अग्नि । घ्या आतां ऐकोनि संतोषानें ॥७॥

अध्याय २१९–२२१ वा ५४९

बृहस्पतिलागीं 'तारा' नामें कांता । 'शंयु' आदि सुतां प्रसवे षष्ठ ॥
'स्वाहा' नामें कन्या सातवी तियेसी । त्रिगुणें सुतांसी प्रसवे तिघां ॥
राजस तो काम, क्रोध तो तामस । सात्विक तो 'उक्थ' मोक्ष दाता
'तप' नामें पुत्र जाहला उक्थासी । पांचजन्य त्यासी द्वितिय नाम ॥
तयानें निर्मिले पंच वंश लोकीं । हर्षें काल कंठी पुत्रांसवें ॥ ५ ॥
पुरंदर, उषा, शंभु मनु तेंवी । सूर्यही तेजस्वी सुत तयां ॥ ६ ॥
तयांचा विस्तार बहुताचि असे । प्रकार इष्टींचे कथिले बहु ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे अग्नीचा विस्तार । केला असे थोर भारतांत ॥ ८ ॥

अध्याय २२२ वा ५५०

सहनामें अग्नि सप्तलोकस्वामी । ' मुदिता ' कामिनी ' अद्भुत ' सुत

पिंडीं, ब्रह्मांडीं तो अन्न तैंवी हवि । तृप्तीस्तव सेवी देवतांच्या ॥२॥
अद्भुताचा सुत 'भरत' संज्ञक । दग्ध करी मृतशरीरांसी ॥ ३ ॥
अग्निष्टोमकारी ' नियत ' संज्ञक । भरताचा सुत दिव्य अग्नि ॥ ४ ॥
भोगार्थी ते देव शोधिती सहासी । नियतभयेंसी उदकीं जाई ॥५॥
आंगिरसासह विनवी, नेई हव्य । बोलूनि अन्यत्र जाई स्वयें ॥ ६ ॥
देवांसी तें स्थान दाविलें मत्स्यांनीं । शाप देई अग्नि भक्ष्य व्हा रे ॥
धातु निर्मी अग्नि रिघूनि भूमींत । पू[1] त्याचा गंधक, स्फटिक कफ
अस्थि देवदारु, पित्त मारकत । लोह, शिळा, काष्ठ, यकृत तें ॥९॥
नखांपासूनियां अभ्रक जाहलें । शिराचि पोवळें निर्मिताती ॥१०॥
वासुदेव म्हणे सुवर्णादि अन्य । धातुही उत्पन्न विविध होती॥ ११॥

५५१

ऐशारीति 'सह' तपांत रमला । सोडूनि आपुला पूर्व देह ॥ १ ॥
मुनि तयालागीं शोधिती तपानें । पुनरपि भयानें उदकीं जाई ॥ २ ॥
अंतीं स्वयें सिंधु शोधी तयाप्रति । लागला कार्यासी अग्निदेव ॥३॥
सिंधु, गंगा आदि सकल पुण्य नद्या । माताचि अग्नीच्या ध्यानीं घ्यावें
'विभूरसी' पुत्र जाणा अद्भुताचा । अंगिरा सर्वांचा मूळ अग्नि ॥५॥
वासुदेव म्हणे सकल हुतद्रव्यां । पोंचवीतो देवा अग्नि स्वयें ॥ ६ ॥

अध्याय २२३ वा ५५२

मार्कंडेय म्हणे तेजस्वी कुमार । अग्नीलागीं थोर झाला एक ॥ १ ॥
तयावेळीं होई देवांचा संहार । मानसशैलीं इंद्र जाई तदा ॥ २ ॥
तयास्थानीं शब्द ऐकिला इंद्रानें । मजसी शौर्यानें रक्षो कोणी ॥३॥
होवो माझा पति अथवा देवो तरी । अभय उच्चारी इंद्र तदा ॥ ४ ॥
इतुक्यांत उभा पुढती केशी दैत्य । धरीतसे हस्त सुंदरीचा ॥ ५ ॥
पुढती वज्रानें ताडितां शचींद्र । सोडूनियां स्थळ पळूनि गेला ॥६॥
इंद्र म्हणे तदा तया सुंदरीसी । कोण तूं कोणाची सांगे मज ॥ ७ ॥

१ पाचु

वासुदेव म्हणे ऐशा नवलकथा । ऐकूनियां चित्ता मोद वाटे ॥ ८ ॥

अध्याय २२४ वा ५५३

कन्या म्हणे 'देवसेना' । प्रजापतीची मी कन्या ॥ १ ॥
'दैत्यसेना' भगिनी माझी । हरिलें दैत्यानें तिजसी ॥ २ ॥
इंद्रा देईं मजसी पति । दुर्जय जो जगामाजी ॥ ३ ॥
कन्या म्हणे महाबळी । अजिंक्य जो या भूतळीं ॥ ४ ॥
उरग, राक्षस, किन्नरां । जिंकील जो स्वयें इंद्रा ॥ ५ ॥
विप्रभक्त ऐसा पति । लाभो हेचि इच्छा माझी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे तदा । चिंता जाहली देवेंद्रा ॥ ७ ॥

५५४

देवसेनावृत्त ऐकूनियां इंद्र । अंतरीं विचार करी बहु ॥ १ ॥
दुश्चिन्हें तयासी दिसती बहुत । भेटला ब्रह्म्यास जावोनियां ॥ २ ॥
म्हणे देवसेना होवो पतियुक्त । अनुकूल शूर पती लाभे ॥ ३ ॥
ब्रह्मा म्हणे इंद्रा, स्वस्थ हो मानसीं । देवसेनापति नियोजित ॥४॥
ऐकोनि ते वाणी वसिष्ठ आश्रमीं । देवीसी घेवोनि जाई इंद्र ॥ ५ ॥
सोमपानालागीं पातले तें देव । सेवी हविर्द्रव्य अग्नि स्वयें ॥ ६ ॥
उज्वल तारका विप्रस्त्रिया तया । दिसतां त्या ठाया काम बाधे ॥
वासुदेव म्हणे आंवरूनि मन । अदृश्य होऊन पाही तयां ॥ ८ ॥

५५५

होऊनियां गार्हपत्य । अवलोकी त्यांचें रूप ॥१ ॥
कांति कांचनासमान । ज्वालारूपें हुताशन ॥ २ ॥
पाहोनियां असंतुष्ट । जाई वैतागें उदकांत ॥ ३ ॥
स्वाहा, दक्षकन्या त्यासी । बहुत दिन मनीं इच्छी ॥ ४ ॥
म्हणे विप्रकन्यारूपें । मोहित करीन अग्नीतें ॥ ५ ॥
तेणें संतोपेल अग्नि । सौख्य पावेन मी मनीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे स्वाहा । युक्ति योजी निजकार्या ॥ ७ ॥

अध्याय २२५ वा ५५६

अंगिराची भार्या 'शिवा' शीलवती । तियेच्या रूपासी स्वाहा घेई

अग्निलागीं म्हणे देवा मी विव्हल । प्राण हा जाईल अस्वीकारें ॥२॥
अंगिरा मुनींची पत्नी मी सन्मान्या । सकल ऋषिपत्न्या साह्य मज
अग्नि म्हणे कैसा हेतु ओळखिला । बोलली तयाला चतुर स्वाहा ॥
पावका, आम्हां तूं सर्वकाल प्रिय । परी मनीं भय वाटे बहु ॥ ५ ॥
जाणोनियां भाव धाडिलें स्त्रियांनीं । इच्छा पुरवोनि सोडीं मज॥६॥
पुरवी कामना ऐकोनियां अग्नि । स्वाहा निज मनीं चिंतीतसे ॥७॥
ऐसी जरी कोणी मजसी पाहील । साध्वीसी देईल दोष व्यर्थ ॥ ८ ॥
यास्तव होवोनि गरुडी, तें वन । सोडी, शराच्छन्न पाही गिरि ॥
सप्त फणाधारी भुजंग अद्भुत । होते रक्षणार्थ तया स्थानीं ॥ १० ॥
दुर्गम त्या स्थळीं सुवर्णकुंडांत । वेगें त्या वीर्यास त्यजूनि जाई ॥
वासुदेव म्हणे सहा वेळा ऐसी । स्वाहा करी कृति तया स्थानीं ॥

५५७

भिन्न भिन्न रूपें घेऊनियां जाई । तोषवोनि येई अग्नीलागीं ॥ १ ॥
पुलस्त्य, पुलह, अंगिरस, क्रतु-। भार्यारूपें हेतु पूर्ण करी ॥ २ ॥
असामान्य सेवा-तपें, अरुंधती । स्वाहेसी प्रतिकृति करितां नये॥३॥
कुंडामाजी वीर्य टाकी सहा वेळां । बालक जाहला तयास्थानीं ॥४॥
'स्कंद' ऐसें नांव तयाचें प्रसिद्ध । सुबाहु द्वादश, वदनें सहा ॥५॥
महा पराक्रमी शोभला बालक । ओढी प्रत्यंचेस शिवधनूच्या ॥६॥
चराचर झालें नादें त्या मोहित । चित्र, ऐरावत, क्रुद्ध होती ॥ ७ ॥
पाहोनि गजांसी धरिलें दोन्ही करें । शक्ति, कुक्कुट, बळें धरूनि हातीं
वासुदेव म्हणे वाजवोनि शंख । घुमवी आकाश बालक तो ॥ ९ ॥

५५८

उदयाचळासी आदित्य । तैसा शोभला बालक ॥ १ ॥
लोक होवोनि उद्विग्न । गेले तयासी शरण ॥ २ ॥
श्वेत, क्रौंच गिरिराज । शरें भेदिले सहज ॥ ३ ॥
हंस, गृध्र तयामार्गें । मेरूवरी जाती मोदें ॥ ४ ॥
कोसळतां गिरिराज । इतर गिरी करिती नाद ॥ ५ ॥
घाबरोनि श्वेतगिरि । उडूनि जाई अंतराळीं ॥ ६ ॥
शरण जाई आर्तभूमि । तदा सौख्य तिजलागोनि ॥ ७ ॥

करूनि स्कंदा नमस्कार। सकल गिरी होती स्थिर ॥ ८ ॥
शुक्ल पंचमीचा दिन। स्कंदा वंदिती सुजन ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे ऐसा। जन्म जाहला स्कंदाचा ॥ १० ॥

अध्याय २२६ वा

५५९

होती उत्पात तैं थोर। नारी-नरांमाजी वैर ॥ १ ॥
मुनि उद्विग्न जाहले। शांतिकर्मांत रंगले ॥ २ ॥
कोणी म्हणती विप्रस्त्रिया। अनर्थासी कारण या ॥ ३ ॥
म्हणती कोणी हे गरुडी। ऐसी जनालागीं नाडी ॥ ४ ॥
लोकप्रवाद ऐकूनि। त्यागिताती स्त्रिया मुनि ॥ ५ ॥
स्वाहा विनवी तयांसी। नका दोष लावूं यांसी ॥ ६ ॥
जाणावा हा माझा पुत्र। सांगे ऐसें वारंवार ॥ ७ ॥
विश्वामित्र करूनि इष्टि। योजीतसे ज्ञानदृष्टि ॥ ८ ॥
तया कळलें सकल वृत्त। वासुदेव जोडी हात ॥ ९ ॥

५६०

विश्वामित्र करी बाळाचें स्तवन। संस्कार संपूर्ण करी त्याचे ॥ १ ॥
शक्ति,पारिषद, कुक्कुट, अर्पोनि। प्रिय होई मुनि स्कंदालागीं ॥२॥
मुनिलागीं म्हणे कर्म हें स्वाहेचें। दोष न स्त्रियांतें लवभरी ॥ ३ ॥
परी रामासम अपवादाची भीति। धरूनियां चित्तीं त्यजिल्या भार्या
इकडे देवांसी वाटे बहु चिंता। विनविती इंद्रा, स्कंदा वधीं ॥ ५ ॥
इंद्र म्हणे नसे शक्य हें मजसी। वाटे विधात्यासी अवध्य हा ॥ ६ ॥
देवांसी रुचेना इंद्राचें वचन। निरुत्साहें दीन म्हणती कैसा ॥ ७ ॥
दुर्बल तूं इंद्रा वधितील तया-। लोकमाता आर्या, म्हणती देव ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे देवांच्या वचनें। माता उत्साहानें सिद्ध होती ॥ ९ ॥

५६१

पाहोनियां कुमारासी। माता उद्विग्न मानसीं ॥ १ ॥
शरण तयासी जावोनि। म्हणती आम्हां माता मानीं ॥ २ ॥
आलों प्रेमें तुजपाशीं। अभिनंदीं तूं आम्हांसी ॥ ३ ॥
हेतु मातांचा जाणून। केलें त्यांचें दुग्धपान ॥ ४ ॥

इतुक्यांत अग्नि येई । स्कंध वंदी तया पायीं ॥ ५ ॥
करी रक्षण बाळाचें । अग्नि आपुल्या सामर्थ्यें ॥ ६ ॥
लोकमाताक्रोधजन्या-। कृत्या, धात्री तया मान्या ॥ ७ ॥
कन्या रक्तसमुद्राची । 'क्रूरा' मानी पुत्र त्यासी ॥ ८ ॥
अजमुखधारी अग्नि । रमवी तयासी काननीं ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे ऐसा । प्रभाव त्या बालकाचा ॥ १० ॥

अध्याय २२७ वा ५६२

ग्रह, उपग्रह सर्व । संरक्षिती स्कंददेव ॥ १ ॥
ऐरावतारूढ इंद्र । चाल करी स्कंदावर ॥ २ ॥
देव शस्त्रास्त्रें घेवोनि । आले त्या स्थळीं धांवोनि ॥ ३ ॥
पाही पावकाचा सुत । करी तदा सिंहनाद ॥ ४ ॥
ऐकोनि तो दिव्य ध्वनि । देव घाबरले मनीं ॥ ५ ॥
मुखांतूनि काढी ज्वाळा । स्कंद जाळीत सुटला ॥ ६ ॥
उरले ते पलायन । करिती इंद्रासी सोडून ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे इंद्र । अंतीं फेंकीतसे वज्र ॥ ८ ॥

५६३

भग्न झाली दक्षिण कुक्षि । नवल होई त्या स्थानासी ॥ १ ॥
पुरुष एक प्रगटला । कनक कवच जो त्याला ॥ २ ॥
दिव्य कुंडलें तयासी । तैसी करीं महाशक्ति ॥ ३ ॥
वज्र, गुप्तचि जाहलें । इंद्र अंतरीं घाबरे ॥ ४ ॥
वाहूजन्य तो विशाख । बघूनि धाक देवेंद्रास ॥ ५ ॥
शरण जाई कुमारासी । अभय देई बाळ त्यासी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे देव । वाजविती तें पणव ॥ ७ ॥

अध्याय २२८ वा ५६४

देवेंद्रानें जेव्हां फेंकीयेलें वज्र । निर्मी प्राणी क्रूर स्कंद तदा ॥ १ ॥
गर्भहरण वा बालकांचा नाश । करिती, विशाखास म्हणती पिता ॥
तैशाचि निर्मिल्या कन्या बहु क्रूर । विशाखासि छाग मुख शोभे ॥
भद्रशाख नामें कोसल देशांत । जाहला विख्यात स्कंदसुत ॥४॥

तैसेंचि तयासी मानिताती लोक । स्कंदपिता देख म्हणती रुद्रा ॥
पार्वती तयाची माता मानिताती । तथा आराधिती, पुत्रांस्तव ॥ ६ ॥
विनविती कुमारा अग्नीच्या कन्यका । सर्वलोकमाता व्हावें आम्हीं
शुभा, अशुभा, त्या पृथग्विधा होती । 'शिशु'नामें त्यांसी शूर पुत्र
पुत्रासह सप्त-माता 'वीराष्टक' । नवम छागमुख नवक ऐसें ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे शुक्र पंचमीसी । घडली कथा ऐसी पुढती युद्ध ॥

अध्याय २२९ वा ५६५

कवच कुंडलें किरीट शोभला । रक्तवस्त्र त्याला स्कंद वीर ॥ १ ॥
पद्मरूपा साक्षात् श्रीहि देहधारी । तयातें स्वीकारी येऊनियां ॥२॥
पूर्णचंद्रासम शोभला तें वीर । पूजिताती विप्र तया लागीं ॥ ३ ॥
करिती स्तवन षष्ठ दिनामाजी । अभय जगासी दिधलें तुवां ॥ ४ ॥
हिरण्यगर्भा तूं इंद्र होईं आतां । स्कंद म्हणे इंद्रा कार्य काय ॥ ५ ॥
सौख्य, तेज, बल, अर्पी इंद्र भूतां । कथिती ऋषि स्कंदा कार्य त्याचें
धार्मिक सुजनां देई इष्ट फल । दुर्जन संहार करी इंद्र ॥ ७ ॥
कार्यनियुक्त तो करी सकल भूतां । संतोष त्या होतां कार्यसिद्धि ॥
चंद्र,सूर्य, अग्नि, पृथ्वि, वायु, आप । होई स्वयें शक्र समय येतां
वासुदेव म्हणे इंद्रहि स्कंदासी । अभिषेक तुजसी करितों म्हणे ॥

५६६

स्कंद म्हणे देवेंद्रासी । तूंचि पालक देवांसी ॥ १ ॥
इंद्रपदाची न इच्छा । किंकर मी देवेंद्राचा ॥ २ ॥
इंद्र म्हणे महावीरा । आणीं विचार अंतरा ॥ ३ ॥
तुझ्या विक्रमें सकल लोक । अवमानीतील मज ॥ ४ ॥
तेणें होई भेदबुद्धि । कलह माजेल पुढती ॥ ५ ॥
ऐसी येऊं नये वेळ । म्हणूनि पद हें सांभाळ ॥ ६ ॥
स्कंद म्हणे हे देवेंद्रा । इंद्र तूंचि आम्हां भद्रा ॥ ७ ॥
इंद्र म्हणे तव आज्ञेनें । इंद्र होईन मी प्रेमें ॥ ८ ॥
परी होई सेनापति । होवो अभिषेक तुजप्रति ॥ ९ ॥
स्कंद म्हणे दुष्टनाश । होवो, देवांसी सुयश ॥ १० ॥

गो-ब्राह्मण पालना । स्वीकारीन देवसेना ।। ११ ।।
आतां करीं अभिषेक । तूंचि देवेंद्रा हो सिद्ध ।। १२ ।।
वासुदेव म्हणे ऐसा । सुखसंवाद तयांचा ।। १३ ।।

५६७

देवांसह वासवानें । केला अभिषेक प्रेमानें ।। १ ।।
महर्षींनीं पूजा केली । शोभा स्कंदाची वाढली ।। २ ।।
कनक छत्र तें मस्तकीं । अग्नीसम त्यांची कांति ।। ३ ।।
उमेसह त्रिपुरहर । येऊनि घाली दिव्य माळ ।। ४ ।।
रुद्र अग्नीतें म्हणती । रुद्रतनयत्व स्कंदासी ।। ५ ।।
अग्निदत्त दिव्य ध्वज । होता कुक्कुट चिन्हांकित ।। ६ ।।
शक्ति, धर्म, तेज, बल । सत्य, उन्नति, सौंदर्य ।। ७ ।।
असंमोह, ब्राह्मणत्व । भक्तत्राण, शत्रुवध ।। ८ ।।
प्रजापालन हे गुण । स्कंदालागीं सहज जाण ।। ९ ।।
वासुदेव म्हणे ऐसा । स्कंद शोभे चंद्र जैसा ।। १० ।।

५६८

स्वाध्यायाचा घोष रम्य वाद्यनाद । अप्सरा गंधर्व करिती गान ।।
देवपिशाचहि स्कंदाच्या भोंवतीं । विनम्र दिसती वंदनार्थ ।। २ ।।
सकल देवता पूजिती स्कंदातें । अभय सर्वांतें स्कंद देई ।। ३ ।।
इंद्र स्कंदालागीं अर्पी 'देवसेना'। यथाविधि कन्याग्रहण करी ।।
अपराजिता, कुहू, सिनीवाली, षष्ठी । लक्ष्मी, तैं सद्वृत्ति, नामें ख्यात
श्रीनामें विख्यात पंचमी ते तिथि । षष्ठी महातिथि कृतार्थत्वें ।।६।।
वासुदेव म्हणे सती देवसेना । स्कंदाची अंगना भाग्यवती ।। ७ ।।

५६९

अध्याय २३० वा

सतऋषिभार्या येती कुमारा सन्निध ।।
म्हणती पतींनीं केला निष्कारण त्याग ।। १ ।।
संरक्षीं आम्हांसी बाळा सदय होवोनि ।।
पुत्र आमुचा तूं होई कामना हे मनीं ।। २ ।।

देई अक्षय्य स्वर्गासी, बोले स्कंद तयां ॥
अनिंद्य मातांनो तुम्हीं सुमाताचि माझ्या ॥ ३ ॥
इतुक्यांत इंद्र देव येई तया स्थानीं ॥
रोहिणीसी स्पर्धा करी कनिष्ठ भगिनी ॥ ४ ॥
अभिजित तपालागीं काननासि जाई ॥
कैसी संख्या पूर्ण करूं चिंता मज पाहीं ॥ ५ ॥
करितील कार्य तुझें कृत्तिका शचींद्रा ॥
बोलूनि अभय देई स्कंद तैं देवेंद्रा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे स्कंदग्रह, जनांप्रति ॥
विविध प्रकारें क्रूर पीडा बहु देती ॥ ७ ॥

५७०

पूतना ते दिति, शकुनि, सरमा। देती त्या यातना गर्भिणीसी ॥ १ ॥
देव, पितृग्रह, गांधर्वहि तैसे। ग्रह ते स्कंदाचे पैशाचहि ॥ २ ॥
क्रीडा, भोग, किंवा अपहार इच्छा। करूनि जीवाचा करिती छळ ॥
बाल, युवक, वृद्धां छळिती स्कंदमाता। माहेश्वरी भक्तां रक्षीतसे ॥
शुचिर्भूतांलागीं ग्रह न बाधती। वासुदेव चित्तीं श्रद्धा राहो ॥ ५ ॥

अध्याय १३१ वा

५७१

स्वाहा म्हणे माझ्या बाळा। हेतु पुरवीं या काला ॥ १ ॥
दक्षकन्या मी व्याकुळ। अग्नीस्तव सर्वकाळ ॥ २ ॥
घडो शाश्वत सहवास। पुरवीं बाळा या हेतूस ॥ ३ ॥
स्कंद म्हणे वो जननी। तुझ्याविण पुढती कोणी ॥ ४ ॥
न अर्पील हव्य-कव्य। अग्नि राहो तुझ्यासह ॥ ५ ॥
ऐकूनि तें पावकासी। स्वाहा भेटली प्रेमेंसी ॥ ६ ॥
अग्निदेवें स्वीकारिलें। हेतु तियेचे पुरले ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे स्कंद। पुढती वंदी शंकरास ॥ ८ ॥

५७२

वैजयंती नामें ऐरावत, घंटा। आणूनियां स्कंदा अर्पीतसे ॥ १ ॥
मेरूच्या शिखरीं कुमार शोभला। मेरूहि तोषला स्कंदामुळें ॥ २ ॥

गौरवूनि स्कंदा, शिव, उमेसह । स्यंदनीं ज्या सिंह, आरूढला ॥३॥
गुह्यकांसमेत कुबेर पुढती । देव ते इंद्रादि मागोमाग ॥ ४ ॥
पार्वतीच्या मागें सकल देवता । स्कंदही मागुता सेनेसह ॥ ५ ॥
शिव म्हणे बाळा, मजलागीं भेटे । कार्य जें देवांचें प्राप्त होई ॥ ६ ॥
ऐसें बोलूनियां हृदयीं धरिलें । स्वस्थळीं धाडिलें आनंदानें ॥७॥
वासुदेव म्हणे दारुण उत्पात । होती इतुक्यांत तया स्थानीं ॥ ८ ॥

५७३

भयाकुल तदा होती सकल देव । करिती दानव घोर ध्वनि ॥ १ ॥
केली दाणादाण बाण-वर्षावानें । अभय इंद्रानें दिधलें देवां ॥ २ ॥
असुर संहार करी शचीनाथ । प्रगटला दैत्य महिषासुर ॥ ३ ॥
क्रूर बलाढ्य तो नावरे इंद्रासी । शिवाच्या धुरेसी धैर्यें धरी ॥ ४ ॥
स्कंदाचें स्मरण केलें शंकरानें । गर्जना खलानें थोर केली ॥ ५ ॥
त्रस्त होती देव, राक्षस संतुष्ट । इतुक्यामाजी स्कंद प्रगटला ॥६॥
स्कंदावरी दैत्य धांवोनियां गेले । विद्ध तया केलें शस्त्राघातें ॥७॥
प्रचंड शक्तीनें महिषासुरासी । छेदूनि शिरासी पाडियेलें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे महिषासुरवध । केला अकस्मात कुमारानें ॥ ९ ॥

५७४

तीच शक्ति वारंवार । स्कंद सोडी दैत्यावर ॥ १ ॥
ऐसें केलें निर्दलन । इंद्र देई आलिंगन ॥ २ ॥
विक्रम हा थोर आजि । म्हणे बाळा प्रथमचि ॥ ३ ॥
कीर्ति त्रैलोक्यीं होईल । यश सर्वदा लाभेल ॥ ४ ॥
शिव म्हणे मजसम । करा स्कंदाचा सन्मान ॥ ५ ॥
घेऊनियां शिवाज्ञा । देव जाताती स्वस्थाना ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसी । पुण्य कथा ही स्कंदाची ॥ ७ ॥

अध्याय २३२ वा

५७५

आग्नेय तो स्कंद दीप्तकीर्तिवंत । शुभानन, रौद्र, दीप्तवर्ण ॥ १ ॥

मातृवत्सल, तो धर्मात्मा, सुव्रत । नामें हीं विख्यात स्कंदालागीं ॥
मार्कंडेय म्हणे स्तविलें मी तया । आधार या विश्वा तोचि ऐसें ॥
नेत्र, बाहु जया द्वादश तो देव । जनांसी अभय देवो सदा ॥ ४ ॥
गाईल जो विप्र, स्कंदाचें हें वृत्त । ऐकेल सुचित्त, तया लाभ ॥५॥
आयुर्धन, यश, तेज, शत्रुनाश । पुष्टि-तुष्टि प्राप्त तया होई ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मार्कंडेय बोध । जाहला समाप्त स्कंदा वंदूं ॥ ७ ॥

---

## द्रौपदी-सत्यभामासंवादपर्व १३

अध्याय २३३ वा ५७६

वैशंपायन जनमेजया । म्हणे काम्यकवनीं राया ॥ १ ॥
सत्यभामेसवें कृष्ण । राहियेला कांहीं दिन ॥ २ ॥
कृष्णेलागीं सत्यभामा । प्रश्न करी तया स्थाना ॥ ३ ॥
महाबलाढ्य पांडवां । कैसें वश केलें तुवां ॥ ४ ॥
आसक्त ते तुझ्यावरी । नसती वचनाबाहेरी ॥ ५ ॥
काय उपाय तुजपाशीं । कृष्णे सांग तो मजसी ॥ ६ ॥
करिसी सोमवार व्रत । तीर्थस्नान कीं उपवास ॥ ७ ॥
भोगकौशल्यादि कांहीं । कामशास्त्र कथित बाई ॥ ८ ॥
वनस्पति, मंत्र, जप । अंजन कीं सांगें मज ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण । इच्छी भामा स्वस्वाधीन ॥ १० ॥

५७७

म्हणे द्रौपदी भामेतें बोलसी हें काई ॥
असाध्वी स्त्रियांचे मार्ग ठाउके न बाई ॥ १ ॥
प्रिय कृष्णाची महिषी बोले तरी काय ॥
चिंती मनामाजी कैसे, ऐसे हे उपाय ॥ २ ॥
मंत्र-तंत्र-युक्ता-नारी, येतां ऐसें ध्यानीं ॥
पति मानितील बाई तियेसी नागिणी ॥ ३ ॥

उद्विग्न तया पुरुषासी शांतिलाभ कैसा ॥
शांतीवीण सौख्य कोणा, दुष्ट मार्ग ऐसा ॥ ४ ॥
मंत्र-तंत्र, जडी-बुट्टी, अंगारे-धुपारे ॥
प्रिय ज्या स्त्रियांसी त्यांचा लाभ घेती सारे ॥ ५ ॥
महारोग, अथवा तयां दुष्ट हालाहल-॥
देती, वैधव्यें तयांचे अंतीं हाल हाल ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मूढ स्त्रिया ऐशा जनीं ॥
निजपतिनाश घेती स्वयेंचि करोनि ॥ ७ ॥

५७८

कैसी माझी वागणूक । ऐकें पतीच्या सन्निध ॥ १ ॥
सोडूनियां अहंकार । सेवा करितें सर्वकाळ ॥ २ ॥
सपत्नीसीं प्रेमभावें । नित्य सतीनें वागावें ॥ ३ ॥
ईर्षा सोडूनि मी शांत । निज कर्तव्यांत दक्ष ॥ ४ ॥
असभ्यता, दुर्भाषण । कदाकाळीं न करीं जाण ॥ ५ ॥
कटाक्ष कीं सांकेतिक । उठणें बैसणें सदोष ॥ ६ ॥
क्रिया शंकास्पद ऐसी । कदाकाळीं न घडे माझी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कृष्णा । नित्य गौरवी पतींना ॥ ८ ॥

५७९

देव गंधर्व कीं मानव संपन्न । प्रिय पतीहून न दिसे कोणी ॥ १ ॥
स्नान भोजनादि पतीच्या मागूनि । शय्येसी त्यजूनि उठतें आधीं ॥
रणा-वनांतूनि सदनीं येतां पति । देतें आसनादि उठूनि तयां ॥ ३ ॥
भांडीं-कुंडीं सदा निर्मळ राखितें । मिष्टान्न अर्पितें योग्य वेळीं ॥४॥
झाड-सारवण सडा-संमार्जन । करोनि, सदन स्वच्छ माझें ॥ ५ ॥
तिरस्कार-वाणी दुष्ट-स्त्रीसंगति । सर्वदा मजसी त्याज्य, भामे ॥६॥
अकारण हास्य करिती ज्या स्त्रिया । द्वारामाजी उभ्या वारंवार ॥
उद्यानीं हिंडती नित्य एकाकिनी । स्त्रिया वार्जितें मी ऐशा सदा ॥
वासुदेव म्हणे अति हास्य-क्रोध । क्रोधाचें निमित्त त्यागी सती ॥

५८०

अनिष्ट मजसी पतीचा विरह । वाटे सर्वकाळ सत्यभामे ॥ १ ॥

कार्यालागीं दूर जातां पतिदेव। विलास ते सर्व त्याज्य मातें ॥३॥
वर्ज्य जें पतीसी त्याज्य तें मजला। सौभाग्यालंकारां सेवीं सदा ॥
कुलधर्म तैसे परंपराप्राप्त। पाळितें आचार अत्यादरें ॥ ४ ॥
एकमेव जनीं आधार पतीचा। धर्म हा सतीचा सनातन ॥ ५ ॥
पति तोचि देव, पति तोचि गति। विरुद्ध पतीसी होऊं नये ॥ ६ ॥
उल्लंघन त्याच्या शब्दाचें कदापि। करूं नये चित्तीं वसो नित्य ॥७॥
उपहास, निंदा न घडे कुंतीची। दक्षता मी ऐसी घेतें सदा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे गुरूंची शुश्रूषा। मार्ग हा सतीचा, तारक होई ॥ ९ ॥

५८१

सत्यनिष्ठ वीरमाता। आर्या, कुंतीची मी स्नुषा ॥ १ ॥
सकलकार्यें मी तियेचीं। करितें संतुष्ट चित्तेंसी ॥ २ ॥
कदा न करी अवज्ञा। वंद्य पतीसी ती धन्या ॥ ३ ॥
धर्मराजा सर्वकाळ। मुनि अठ्यायशीं सहस्र ॥ ४ ॥
सेवी देऊनि त्यां दासी। आवड त्या विप्रर्षींची ॥ ५ ॥
तया ब्राह्मणांचीं पात्रें। नित्य मीचि वाढित होतें ॥ ६ ॥
दशसहस्र मम दासींचें। सर्व ज्ञान मजसी होतें ॥ ७ ॥
राज्यकारभारीं लक्ष। सर्वकाल होतें दक्ष ॥ ८ ॥
सकल आय-व्यय मज। पांडवांचे होते ज्ञात ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे वीर। विसंवती कृष्णेवर ॥ १० ॥

५८२

सकल कार्यांचा भारिभार टाकिती। अस्त्रें अभ्यासिती महावीर ॥
रात्रंदिन ऐसें झटूनियां कार्य। केलें मनीं धैर्य धरूनियां ॥ २ ॥
क्षुधा-तृषा त्यांची निवारितें सदा। रात्रंदिन त्यांचा ध्यास मज ॥३॥
सत्यभाम, ऐसी दिनचर्या माझी। अंकित पतींसी करूनि घेई ॥४॥
वशीकरणाचा उपाय हा माझा। निंद्य साधनांचा तिरस्कार ॥ ५ ॥
सत्यभामा म्हणे क्षमा करीं मज। विनोदें सहज पुशिलें ऐसें ॥६॥
मैत्रिणीच्या भावें पुशिलें थट्टेनें। प्रश्न सत्यत्वानें मानूं नको ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे साध्वीचा व्यवहार। जनांचा उद्धार करीतसे ॥८॥

अध्याय २३४ वा ५८३

म्हणे द्रौपदी हे सत्ये। ऐकें निश्चित मार्गातें ॥ १ ॥
पति दैवत सतीसी। त्याच्या सुखें कांता सुखी ॥ ॥
क्रोधें तयाच्या, विनाश। प्रेमें प्राप्त सकल भोग ॥ ३ ॥
सौख्य लाभे न सुखानें। कष्ट सोशीं आनंदानें ॥ ४ ॥
सत्य प्रेम तयावरी। कळतां तोषेल श्रीहरी ॥ ५
ऐकतांचि पतीशब्द। उठूनि यावें वो द्वारांत ॥ ६
दासी नसतां सकळ कार्य। करूनि तोषवावा आर्य ॥ ७ ॥
कथितां कांहीं तेणें वार्ता। गुप्त राखावी सर्वथा ॥ ८ ॥
हितकर्ते जे तयाचे। प्रेमें सन्मानीं तूं त्यांतें ॥ ९ ॥
तयाचा जो अहितकर्ता। वारा घेऊं नको त्याचा ॥ १० ॥
सख्य करावें साध्वींसी। वर्ज एकांत सुतांसी ॥ ११ ॥
वासुदेव म्हणे ऐसा। बोध भामेसी कृष्णेचा ॥ १२ ॥

अध्याय २३५ वा ५८४

कांहींकाळ कृष्ण राहिला त्या स्थानीं। पुढती स्यंदनीं बैसे जाण्या ॥
तयावेळीं भामा बोले द्रौपदीसी। त्यागूनि चिंतेसी सुखी राहें ॥२॥
खिन्नचित्तें होऊं नेदीं वो जागर। इच्छित सत्वर पावसील ॥ ३ ॥
पाहसील सुखें छत्रधारी धर्म। तारील सद्धर्म तुम्हांलागीं ॥ ४ ॥
हांसल्या तुजसी वनामाजी जातां। भग्नमनोरथा दिसतील त्या ॥५॥
प्रतिविंध्य, सोमसुत, श्रुतवर्मा। शतानीक जाणा श्रुतसेन ॥ ६ ॥
कुमार जाहले प्रवीण ते पंच। प्रिय सकलांस सुस्वभावें ॥ ७ ॥
सुभद्रा तयांसी साभांळी प्रेमानें। नांदती सन्मानें सदनांत ॥ ८ ॥
बोलूनियां ऐसें घाली प्रदक्षिणा। शोभवी स्यंदना कृष्णासवें ॥ ९ ॥
स्मित करूनियां द्रौपदीसी कृष्ण। बोलला वचन सुखें राहीं ॥१०॥
वासुदेव म्हणे शीघ्रगामी अश्व। द्वारकेचा मार्ग आक्रमिती ॥ ११ ॥

## घोषयात्रापर्व १४

अध्याय २३६ वा ५८५

सरोवरतीरीं काम्यकवनांत। वीर हर्षयुक्त क्रमिती काळ ॥ १ ॥
इकडे कोणी एक कथाभिज्ञ विप्र। येतां धृतराष्ट्र पुशी तया ॥
पांडवांचें वृत्त कथावें मजसी। कृश ते कंठिती काळ म्हणे ॥ ३ ॥
ऐकोनि तें वृत्त राव हळहळे। गुण आठविले सकलांचे ॥ ४ ॥
कलिपुरुष हे मंदमति सुत। दिसे त्यां मकरंद, न दिसे दरी ॥ ५ ॥
अत्यंत अशुभ कौरवांचें कर्म। दैवपराधीन जीव वाटे ॥ ६ ॥
प्रेरणेवांचूनि वायूचा संचार। दिनामागें रात्र सहज येई ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे तैसें पापकर्म। अपरिहार्य जाण भोग त्याचा ॥ ८ ॥

५८६

अर्ध-धन द्यावें तरी दुःख होई। न अर्पितां होई सुतनाश ॥ १ ॥
परी दैवगति नियतचि तैसी। तरी कोण कैसी निवारील ॥ २ ॥
संकट अद्यापि बहुतचि दूर। उत्कर्षचि थोर होई त्यांचा ॥ ३ ॥
सदेह स्वर्गासी जाऊनियां पार्थ। शस्त्रास्त्रमंडित होऊनि आला ॥४॥
ऐसें त्याचें तेज सहन करी कोण। ऐकिलें भाषण सौबलानें ॥ ५ ॥
सकल तें वृत्त कथिलें कर्णासी। हर्ष-शोक त्यासी वाटे तदा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे निर्धार रायाचा। कौरवांच्या नाशा कारण तो ॥७॥

अध्याय २३७ वा ५८७

कर्ण म्हणे दुर्योधना। पृथ्वीमाजी तूंचि राणा ॥ १ ॥
सकल संपत्तीचा धनि। सेनेसह जाऊं वनीं ॥ २ ॥
पाहूं वनवासी पांडव। दावूं त्यांसी निजवैभव ॥ ३ ॥
सकल संपत्ति तयांची। लोळे तुझ्या पायांपाशीं ॥ ४ ॥
अजिनधारी महावीर। पाहूनियां लाजतील ॥ ५ ॥
राजस्त्रिया कृष्णेप्रति। बघतां उद्वेग तियेसी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कर्ण। वदला ऐसें दुर्भाषण ॥ ७ ॥

अध्याय २३८ वा ५८८

ऐकोनियां ऐसें कर्णाचें वचन। हर्षे दुर्योधनअंतरासीं ॥ १ ॥
नृपाळअनुज्ञा लाभेल ती कैसी। चिंता मानसासी हीच म्हणे ॥२॥
दीन पांडवांसी पाहूनियां सुख। होईल चित्तास राज्याहूनि ॥ ३ ॥
आनुज्ञालाभार्थ उपाय योजावा। मज निवेदावा उद्यींक ॥ ४ ॥
भीष्मासवें राव देईल अनुज्ञा। ऐसें करीं प्राज्ञा चातुर्यानें ॥ ५ ॥
ऐकूनि ते वाणी गेले स्वस्थळासी। प्रातःसमयासी कर्ण येई॥ ६ ॥
हांसूनियां म्हणे राया, द्वैतवनीं। घोषांसी पाहूनि येऊं स्वयें ॥७॥
अवलोकूनि येऊं आपुलें गोधन। उपाय ऐकून हर्षे वाटे ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे हातावरी हात। मारूनि मार्गास लागती ते ॥ ९ ॥

अध्याय २३९ वा ५८९

दुर्योधनादि प्रमुख। भेटताती नृपाळास ॥ १ ॥
पूर्वसंकेतें 'समंग'। येई बल्लवहि तेथ ॥ २ ॥
कथी वृत्त तो घोषांचें। शकुनि म्हणे नृपाळातें ॥ ३ ॥
स्वयें येईल पाहून। राजा, घोष दुर्योधन ॥ ४ ॥
देई अनुज्ञा तयासी। वेळ वत्सांच्या चिन्हांची ॥ ५ ॥
वय, जाती, वर्ण संख्या। करूं तैसीच मृगया ॥ ६ ॥
राव म्हणे हे अनुमति। देववे न तुम्हांप्रति॥ ७ ॥
वसती पांडव त्या स्थानीं। भीम महा पराक्रमी ॥ ८ ॥
द्रौपदी, तो केवळ अग्नि। पार्थ आला स्वर्गांतूनि ॥ ९ ॥
कांहीं घडेल निमित्त। उद्भवेल तेणें युद्ध ॥ १० ॥
वासुदेव म्हणे राजा। कथी दूत साधो काजा ॥ ११ ॥

५९०

शकुनि म्हणे नृपाळासी। सत्य प्रतिज्ञा धर्माची ॥ १ ॥
आज्ञाधारक ते भ्राते। नसे कारण युद्धाचें ॥ २ ॥
जाऊं केवळ मृगयेसी। येऊं पाहूनि घोषांसी ॥ ३ ॥

---

१ वांसराचे केंस कात्रून वगैरे खुणा करून त्यांचें गणन करितात ती वेळ

पांडवांच्या वसतिस्थानीं । जाणारहि नाहीं आम्हीं ॥ ४ ॥
बोलूनियां या वचना । कष्टें घेती ते अनुज्ञा ॥ ५ ॥
चतुरंग सेनाभार । आठ सहस्र ते रथ ॥ ६ ॥
तीस सहस्र गजांसी । नवसहस्र अश्वांसी ॥ ७ ॥
असंख्य तें पायदळ । ऐसा निघाला नृपाळ ॥ ८ ॥
सपरिवार दुर्योधन । लक्षूनियां जाई वन ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे कर्ण । शकुनि आदि संगें जाण ॥ १० ॥

अध्याय २४० वा ५९१

सेनेसवें दुर्योधन । वनीं राहिला येऊन ॥ १ ॥
कर्ण, शकुनि समीप । करिती भिन्न स्थळीं वास ॥ २ ॥
केली धेनूंची गणना । चिन्हें केलीं नव वत्सांना ॥ ३ ॥
वर्षत्रय पूर्ण ज्यांसी । वृषभ सकळ ते नेती ॥ ४ ॥
गोप पावले संतोष । प्राप्त होतां अन्न-वस्त्र ॥ ५ ॥
वीर दुर्योधनादिक । रमले वनीं मृगयेंत ॥ ६ ॥
तयावेळीं राजा धर्म । होता यज्ञामाजी मग्न ॥ ७ ॥
सरोवराच्या समीप । केला होता तेणें वास ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे तेथ । दूत येती विहारार्थ ॥ ९ ॥

५९२

प्रतिबंध तयां केला गंधर्वांनीं । पातला त्या स्थानीं चित्ररथ ॥ १ ॥
जयंतादि बहु देवांचे कुमार । अप्सरासंभार तयांसवें ॥ २ ॥
व्यापिलें तयांनीं अवघें सरोवर । म्हणे कौरवेंद्र दूत त्यासी ॥ ३ ॥
गंधर्वांनो सोडा स्थान हें त्वरित । धृतराष्ट्रसुत येई एथें ॥ ४ ॥
सेनापतिहि तें बोले गंधर्वांसी । आज्ञा कौरवांची सोडा स्थान ॥५॥
ऐकूनि गंधर्व हांसूनि बोलले । भान हरपलें रायाचें त्या ॥ ६ ॥
मूढहो देवांसी उन्मत्तपणानें । कथितां अविवेकानें आज्ञा त्याची ॥
सोडूनि तें स्थान जावोत सत्वरी । जगावें हे जरी इच्छा मनीं ॥८॥
वासुदेव म्हणे सकल सैनिक । पळूनि वृत्तांत कथिती नृपा ॥ ९ ॥

अध्याय २४१ वा ५१३

दुर्योधन तदा होऊनियां क्रुद्ध । करा प्रतिबंध म्हणे तयां ॥ १ ॥
साक्षात् शतक्रतु क्रीडेंत रंगतां । तया अधार्मिका जिंकूं आम्हीं॥२॥
ऐकोनि ते वाणी सैन्य कौरवांचें । बळात्कारें घुसे वनामाजी ॥३॥
सामोपचारानें कथिती गंधर्व । नायकती वीर उन्मादानें ॥ ४ ॥
अंतीं तया स्थानीं समर जुंपलें । शौर्य दावियेलें राधेयानें ॥ ५ ॥
गंधर्वांचा नाश जाहला पाहूनि । धांवला गर्जूनि चित्रसेन ॥ ६ ॥
मायामय युद्धें घेरिलें कर्णासी । पलायन अंतीं केलें तेणें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे भग्न होतां रथ । विकर्णरथांत बैसे कर्ण ॥ ८ ॥

अध्याय २४२ वा ५१४

होतां पराजित कर्ण । पळूनि जाई सकल सैन्य ॥ १ ॥
दुर्योधन युद्ध करी । हटेनाचि तिळभरी ॥ २ ॥
करिती गंधर्व ताडन । स्यंदनाचें होई चूर्ण ॥ ३ ॥
भूमीवरी पडला राव । धरिला तयासी सजीव ॥ ४ ॥
गंधर्वांची शूर सेना । बद्ध करी दुःशासना ॥ ५ ॥
राजस्त्रिया हरिल्या कोणी । कौरवांची दैना वनीं ॥ ६ ॥
दीन, अनाथ, धांवले । धर्मराजासी भेटले ॥ ७ ॥
राजस्त्रियांसवें राव । म्हणती नेती हे गंधर्व ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे भीम । बोले तयांसी वचन ॥ ९ ॥

५१५

प्रयासें साधावें इच्छितों जें मनीं । तेंचि गंधर्वांनीं सहज केलें ॥ १ ॥
दुष्कर्माचें फल ऐसेंचि लाभतें । इच्छी जें परातें तेंचि प्राप्त ॥ २ ॥
दुःखावरी डाग आले द्यावयासी । ज्याचें तयासी फळलें कर्म ॥३॥
करिती जे दुष्ट विपन्नांचा द्वेष । तयांचा विनाश सिद्धांत हा ॥ ४ ॥
सद्भाग्यें आमुच्या ऐसा वीर जनीं । भार उतरूनि सुखवी आम्हां ॥
ऐशा रीति आम्हां जो कोणी दुखवील । शासन भोगील याचि रीति

क्रोधें भीमसेन यापरी बोलतां। द्रवला धर्मात्मा युधिष्ठिर ॥ ७ ॥
म्हणे वत्सा, ऐसा निर्दय न होई। काळ-वेळ कांहीं घेई ध्यानीं ॥
वासुदेव म्हणे धर्माचें औदार्य। बोलताती आर्य असामान्य ॥ ९ ॥

अध्याय २४३ वा ५९६

वत्सा भीमा, ऐसे आर्त हे शरण। तयांसी टोंचून बोलूं नको ॥१॥
ऐसाचि या लोकीं ज्ञातींचा कलह। वैर समुद्भव होई तेणें ॥ २ ॥
परी अभिमान त्यजूनि कुळाचा। पक्ष परकीयांचा घेऊं नये ॥ ३ ॥
कुरुकुलोत्पन्न स्त्रियांसी स्पर्शिलें। वलात्कारें नेलें दुर्योधना ॥ ४ ॥
ऐशा या कर्मानें स्वकुळाचा नाश। कुलरक्षणार्थ सज्ज होई ॥ ५ ॥
पार्थासवें भीमा, सोडवा रायासी। चाल शस्त्रास्त्रेंसी त्वरित करा
वासुदेव म्हणे धर्मज्ञ क्षत्रिय। देतसे अभय शरणागता ॥ ७ ॥

५९७

धांवा धांवा ऐसें म्हणेल जो त्यासी। महायत्नें रक्षी तोचि वीर ॥
वर, राज्य, किंवा पुत्रलाभाहूनि। शरणार्थीरक्षणीं मोद वीरा ॥
विपत्काळीं साह्य मागे दुर्योधन। जगांत याहून लाभ काय ॥ ३ ॥
दीक्षित मी जरी नसतों या समई। युद्धास्तव पाहीं सुखें जातों ॥
सामोपचार वा युद्ध करा सौम्य। निग्रह दारुण पुढती करा ॥५॥
धर्माचें वचन ऐकूनियां पार्थ। वदे राया मुक्त दुर्योधन ॥ ६ ॥
सामोपचारानें कार्य नच होतां। नाश गंधर्वांचा करीन मी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पार्थ प्रतिज्ञेनें। कौरवांचीं मनें हृष्ट होती ॥ ८ ॥

अध्याय २४४ वा ५९८

प्रज्वलित अग्नि भासले पांडव। पाहोनि गंधर्व सज्ज होती ॥ १ ॥
दिव्य कवचधारी वीर ते गर्जले। उपाय योजिले सामादिक ॥ २ ॥
पार्थ म्हणे माझा भ्राता सुयोधन। त्वरित सोडून द्यावें यासी ॥३॥
गंधर्व बोलती चित्रसेनाविण। शास्ता नसे अन्य आम्हांलागीं ॥४॥
पार्थ म्हणे तया परदाराहरण। मानवसंग्राम योग्य नसे ॥ ५ ॥
स्त्रियांसवें राजा यास्तव सोडावा। अथवा पहावा पराक्रम ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे युद्ध करी पार्थ। दारुण शरांस सोडीतसे ॥ ७ ॥

अध्याय २४५ वा ५९९

प्रदीप्त शरांनीं ताडिती गंधर्व । प्रतिकार पांडव करिती तयां ॥१॥
इंद्रजाल, सौर- आग्नेय अस्त्रांनीं । गंधर्वांसी रणीं कोंडी पार्थ ॥ २ ॥
चित्रसेन घावें पाहोनि तें कर्म । गदा त्याची छिन्न केली पार्थें ॥३॥
अस्त्रांसी उत्तर लाभतां अस्त्रांचें । गंधर्व मायेतें अवलंबी तें ॥ ४ ॥
पार्थ तया वेळीं शब्दवेध करी । चित्रसेनावरी सोडी शर ॥ ५ ॥
घायाळ गंधर्व बोलला पार्थासी । मित्रा तुज स्मृति नाहीं काय ॥
पाहोनि गंधर्व व्याकुळ अर्जुन । घेई आंवरून प्रखर शस्त्रें ॥ ७ ॥
भीमादिक तेवी चित्रसेन वीर । आंवरिती शर, कुशल शब्दें ॥८॥
वासुदेव म्हणे वळाविण जनीं । विचारीना कोणी कोणालागीं ॥९॥

अध्याय २४६ वा ६००

पार्थ प्रश्नेंसी गंधर्व । म्हणे धाडी आम्हां इंद्र ॥ १ ॥
सखा शिष्य तो अर्जुन । घेई तया सांभाळून ॥ २ ॥
धनंजया, दुर्योधन । कपटी, आचरी अधर्म ॥ ३ ॥
कपट हेतूसी धरोनि । पातले हे द्वैतवनीं ॥ ४ ॥
नेतां बांधूनि स्वर्गासी । पार्थ भेटवी धर्मासी ॥ ५ ॥
धर्म ऐकूनियां वृत्त । करी सकलांतें मुक्त ॥ ६ ॥
वधिलें नाहीं दुर्योधना । महद्भाग्य वाटे धर्मा ॥ ७ ॥
दुरात्मा हा बंधमुक्त । तेणें कुळाचा लौकिक ॥ ८ ॥
गौरवोनि गंधर्वांस । केलें धर्मानें मार्गस्थ ॥ ९ ॥
मृतगंधर्व इंद्रानें । साजिव केले अमृतानें ॥ १० ॥
धर्म म्हणे सुयोधना । न करीं साहस हें पुन्हां ॥ ११ ॥
करूं नये वृथा वैर । प्रेमें प्रेमवृद्धि थोर ॥ १२ ॥
लज्जायुक्त दुर्योधन । करी धर्मासी वंदन ॥ १३ ॥
वासुदेव म्हणे दुष्ट । गेला आपुल्या स्थानास ॥ १४ ॥

अध्याय २४७ वा ६०१

दुर्योधन पापी नगरासी जातां । मार्गीं वास त्यांचा वनामाजी ॥

निशा समयीं तो उद्विग्न अंतरीं । बेसे मंचावरी क्षीण तेज ॥ २ ॥
पुढती येऊनि कर्ण म्हणे त्यासी । भाग्यानें आम्हासी लाभ तुझा ॥
शत्रूसी जिंकूनि जाहलासी मुक्त । विक्रम जगांत थोर केला ॥४॥
जर्जर मी राया केलें पलायन । शौर्य असामान्य खचित तुझें ॥५॥
वासुदेव म्हणे ऐकोनि ते शब्द । जाहला सद्गद दुर्योधन ॥ ६ ॥

अध्याय २४८ वा ६०२

राधेया, तुजसी वृत्तांत न ठावा । काय दोष द्यावा तुजप्रति ॥ १ ॥
जिंकिलें गंधर्वा ऐसें तूं मानिसी । परी गोष्ट तैशी घडली नसे ॥२॥
परिवारासवें आम्हांसी बांधितां । धर्मराज त्राता झाला आम्हां ॥
अतिमानुष ते अर्जुनाचे शर । असह्य तो मार गंधर्वासी ॥ ४ ॥
प्रगटला अंतीं चित्रसेन रणीं । मित्रासी पाहूनि भेट देई ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे दुःखें दुर्योधन । वृत्तांत कथन करीतसे ॥ ६ ॥

अध्याय २४९ वा ६०३

कर्णा, दुःख काय सांगूं । चित्रसेनें दुष्ट हेतु- ॥ १ ॥
जाणोनियां, कथिला पार्था । ऐकूनियां खेद चित्ता ॥ २ ॥
नेलें धर्माच्या समीप । दिसलों द्रौपदीतें बद्ध ॥ ३ ॥
नको नको तें स्मरण । प्रिय वाटतें मरण ॥ ४ ॥
उपवासें प्राणांतिक । करिन आतां देहत्याग ॥ ५ ॥
दुःशासनासवें तुम्हीं । जावें आपुल्या सदनीं ॥ ६ ॥
हर्ष देऊनि शत्रूसी । कैसा येऊं नगरासी ॥ ७ ॥
काय सांगूं आप्तजनां । गर्व झाला माझ्या मना ॥ ८ ॥
अविनीताचा विनाश । दृष्टांत मी झालों त्यास ॥ ९ ॥
केलें अनुचित कर्म । असह्य हा अवमान ॥ १० ॥
वासुदेव म्हणे राजा । दुःखाकुल होई ऐसा ॥ ११ ॥

६०४

दुःशासनाप्रति बोले दुर्योधन । करावें रक्षण स्वराज्याचें ॥ १ ॥
मित्र बांधवांसी रक्षीं दक्षतेनें । विप्र आनंदानें संरक्षावे ॥ २ ॥

सज्जनां आधार होई दुःशासना । बोलतां लोचना अश्रु येती ॥३॥
कंठीं घालूनियां मिठी म्हणे जाई । सकलां खेद होई तया वेळीं ॥
दुःशासन म्हणे गिरीहि ढळेल । सागर आटेल भंगेल भू ॥ ५ ॥
पंच महाभूतें सोडितील भाव । परी आम्हां राव तूंचि बंधो ॥ ६ ॥
ऐसें बोलूनियां रूदन मांडिलें । शोकानें भरलें स्थान तदा ॥ ७ ॥
कर्ण त्या समयीं करी निवारण । उचित भाषण करूनियां ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे दुःख लव होतां । दुर्जन जीविता कंटाळती ॥ ९॥

अध्याय २५० वा ६०५

कर्ण म्हणे दुर्योधना । व्यर्थ सोडूं नको प्राणां ॥ १ ॥
कर्तव्यचि हें प्रजेचें । संरक्षावें नृपाळातें ॥ २ ॥
आरंभितां समरासी । नाहीं पातले साह्यासी ॥ ३ ॥
तुवां जयांसी जिंकिलें । तेहीं प्राणा न विटले ॥ ४ ॥
तुझी करीन शुश्रूषा । जरी त्यजिसी न उपवासा ॥ ५ ॥
अवघे हांसतील जरी । न येसी तूं निजमंदिरीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कर्ण-। वचनें न उठे दुर्योधन ॥ ७ ॥

अध्याय २५१ वा ६०६

शकुनि म्हणे राया, काय हा अविवेक । वैभव कां व्यर्थ घालविसी
पांडवांचें राज्य अर्पूनि तयांसी । कृतज्ञता तुझी सिद्ध करीं ॥ २ ॥
ऐकूनि निराश होई दुर्योधन । प्रायोपवेशन आरंभी तें ॥ ३ ॥
दर्भासनीं बैसे मृत्यूच्या दारांत । दैत्य-दानवांस खेद बहु ॥ ४ ॥
अथर्वण यज्ञें निर्मिती ते कृत्या । मागतसे आज्ञा दैत्यांसी ती ॥ ५ ॥
दानव आज्ञेनें दुर्योधनाप्रति । नेई पाताळासी उचलोनि ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे दानव ते हर्षें । बोलले रायातें श्रवण करा ॥ ७ ॥

अध्याय २५२ वा ६०७

दानव म्हणती नृपाळा । सौख्य देसी कां शत्रूला ॥ १ ॥
शंकरासी आराधिलें । तुज मागूनि घेतलें ॥ २ ॥
नाभीपासूनि जो ऊर्ध्व । वज्रमय तुझा देह ॥ ३ ॥

अभेद्य तो शस्त्रास्त्रांसी । अधोभागीं उमा रक्षी ॥ ४ ॥
पुष्पमय तो कोमल । चित्त स्त्रियांचें हरील ॥ ५ ॥
नससी मानव तूं राया । समजें तुझी दिव्य काया ॥ ६ ॥
भगदत्तादिक वीर । शत्रु संहार करितील ॥ ७ ॥
भीष्म-द्रोणांच्या देहांत । दैत्य होतील प्रविष्ट ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे दैत्य । कथिती आपुला वृत्तांत ॥ ९ ॥

६०८

क्षत्रियकुळांत दैवबळयुक्त । जन्मले ते दैत्य साह्य तुज ॥ १ ॥
नरकासुराचा जीवात्मा तो कर्ण । तयासी अर्जुन तुच्छ असे ॥ २ ॥
वर्म हें जाणोनि कवच-कुंडलांचा । अपहार साचा करील इंद्र ॥३॥
परी संशप्तक अंश ते आमुचे । वधितील पार्थातें निश्चयेंसी ॥ ४ ॥
भीऊं नको राया त्यागीं सकल शोक । राज्य निष्कंटक करीं सुखें ॥
आमुच्या पक्षासी तुझाचि आधार । अर्जुनादि वीर देव मानीं ॥ ६॥
वासुदेव म्हणे दुर्योधनाप्रति । आशीर्वाद देती प्रेमभरें ॥ ७ ॥

६०९

दर्भासनीं कृत्या आणोनियां ठेवी । अदृश्य ते होई क्षणामाजी ॥ १ ॥
स्वप्नासम कृत्य वाटे दुर्योधना । धीर त्याच्या मना येई बहु ॥ २ ॥
सत्य मानूनियां दैत्यांचें वचन । पावे समाधान अंतरांत ॥ ३ ॥
प्रातःकाळीं कर्ण जोडूनियां कर । हांसोनि उद्गार काढीतसे ॥ ४ ॥
विजय कल्याण कैसें मृतालागीं । विषाद हा त्यागीं दुर्योधना ॥५॥
आलिंगन नृपा देऊनियां बोले । हेतु पूर्ण झाले समजें राया ॥ ६ ॥
स्पर्शूनि आयुधें करितों प्रतिज्ञा । हरीन मी प्राणां अर्जुनाच्या ॥ ७ ॥
जिंकूनि पांडवां स्वाधीन करीन । सत्य सत्य जाण वाचा माझी ॥
ऐकूनि ते वाणी तोषला नृपाळ । मानूनि सफल उठला जन्म ॥९॥
वासुदेव म्हणे निज सेनेसह । धरूनि उत्साह नगरा येती ॥ १० ॥

अध्याय २५३ वा ६१०

भीष्म-द्रोणादिकां कळला वृत्तांत । भीष्म करी बोध दुर्योधना ॥१॥
राया कासयासी त्या स्थळीं गेलासी । लज्जा मानसासी वाटो तुझ्या

कर्णाचा विक्रम कळो आतां तरी। कल्याणार्थ करीं संधि राया ।।
दुर्योधन तदा हांसोनि उठला। त्यागूनियां गेला सभास्थान ॥ ४ ॥
कर्ण, दुःशासन, शकुनीहि गेले। लज्जित जाहले भीष्म मनीं ॥ ५ ॥
त्यागोनियां जातां भीष्महीं स्थानासी। येती सभेमाजी सकल पुन्हां
कर्ण म्हणे निंदी भीष्म सदा मज। जातों विजयार्थ राया आतां ॥
एकटाचि येतों जिंकूनियां दिशा। विक्रम कर्णाचा पाहो भीष्म ॥
हर्षित नृपानें गौरवोनि कर्णा। देवोनियां सेना पाठविलें ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे महारथघोष। त्रैलोक्य नादित कर्ण करी ॥ १० ॥

अध्याय २५४ वा ६११

विराट रायासी युद्धांत जिंकोनि। घेवोनि खंडणी पुढती गेला ॥१॥
भगदत्तादिक उत्तरेचे नृप। जिंकोनियां वित्त मेळविलें ॥ २ ॥
नेपाळ जिंकोनि पूर्वेसी पातला। मागध, मिथिला, जिंकी देश ॥३॥
मोहनपत्तन, त्रिपुरी, कोसल। घेवोनियां कर पुढती गेला ॥ ४ ॥
दक्षिणेसी कर्ण रुक्मीतें जिंकोनि। विजयी पश्चिमीं होत असे ॥५॥
अरण्यवासी ते भूपही जिंकिले। म्लेच्छही मर्दिले विक्रमानें ॥ ६ ॥
अल्पावधीमाजी दिग्विजय करी। दुर्योधन धरी हृदयीं तया ॥ ७ ॥
भीष्म द्रोणाहूनि प्रिय झाला कर्ण। वृद्धांचे चरण वंदीतसे ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे जिंकिलें पार्थासी। कौरव मानिती राधेयानें ॥ ९ ॥

अध्याय २५५ वा ६१२

कर्णालागीं दुर्योधन। म्हणे राजसूर्य यज्ञ-॥ १ ॥
करूं, ऐसी इच्छा माझी। कर्ण देई अनुज्ञेसी ॥ २ ॥
पुरोहित म्हणे राजा। दर्प हरीं पांडवांचा ॥ ३ ॥
तयां जिंकिल्यावांचूनि। नसे पात्रता या कर्मीं ॥ ४ ॥
एका कुलीं एक यज्ञ। राजसूय म्हणती प्राज्ञ ॥ ५ ॥
अजिंक्य जो जगामाजी। तोचि पात्र या यज्ञासी ॥ ६ ॥
राया वैष्णवयज्ञातें। करीं समर्यी या मोदें ॥७॥
हल, कनकाचा करूनि। यज्ञभूमी नांगरूनि ॥ ८ ॥

पावें विष्णुयज्ञें पुण्य । धर्मासम होई धन्य ॥ ९ ॥
केला यज्ञ हा विष्णूनें । यश जोडी याचि यज्ञें ॥ १० ॥
वासुदेव म्हणे राजा । करी यज्ञाची सिद्धता ॥ ११ ॥

अध्याय २५६ वा ६१३

वैभवसंपन्न सामग्री यज्ञाची । पाहोनि जनांसी हर्ष वाटे ॥ १ ॥
सर्व नृपाळांसी गेलें निमंत्रण । बोले दुःशासन दूतालागीं ॥ २ ॥
द्वैतवनीं वृत्त कथोनि धर्मासी । निमंत्रण त्यांसी त्वरित देई ॥ ३ ॥
दूत येवोनियां धर्मासी भेटला । आनंद जाहला तयालागीं ॥ ४ ॥
पूर्वजांची कीर्ति वाढेल तो म्हणे । प्रतिज्ञावचनें बद्ध आम्हीं ॥ ५ ॥
भीम म्हणे दूता आपुल्या नृपासी । सांगे रणयज्ञासी येऊं सुखें ॥
शस्त्रास्त्रप्रदीप्त आग्नींत आहुती । पडेल खलाची सांगें तया ॥ ७ ॥
वृत्तांत दूतानें कथिला जावूनि । रमले यज्ञकर्मीं कौरवेंद्र ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे दक्षिणा समृद्ध । अर्पोनियां यज्ञ पूर्ण केला ॥ ९ ॥

अध्याय २५७ वा ६१४

यज्ञपूर्ण होतां राजा नगरांत । प्रवेशतां सौख्य सकळ जनां ॥ १ ॥
कोणी म्हणे प्रौढी व्यर्थ या यज्ञाची । धर्माच्या यज्ञाची महती थोर
नहुष, मांधात्यासम तुझा यज्ञ । कर्ण, दुःशासन म्हणती राया ॥३॥
आसनीं बैसतां कर्ण त्या सन्मानी । राजसूय मनीं होता त्याच्या ॥
म्हणे राजसूय वैऱ्यासी जिंकूनि । करिसील मनीं मोद तदा ॥ ५ ॥
प्रेमें आलिंगूनि बोले दुर्योधन । कर्णा, महायज्ञ केव्हां घडे ॥ ६ ॥
कर्ण म्हणे राया, ऐक ही प्रतिज्ञा । न वधीं अर्जुना जोंवरी मी ॥७॥
तोंवरी न घेई पादप्रक्षाळूनि । मद्य-मांस जनीं वर्ज्य मज ॥ ८ ॥
मागेल तें दान देईन याचका । खडतर व्रता स्वीकारिलें ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे कर्णाची प्रतिज्ञा । हर्ष दुर्योधना ऐकतांचि ॥ १० ॥

६१५

इकडे पांडव सचिंत मानसीं । दूतवचनासी ऐकोनियां ॥ १ ॥
गुप्त हेर तदा येवोनि सांगती । प्रतिज्ञा कर्णाची धर्मालागीं ॥ २ ॥

ऐकोनि तें धर्म जाहला उद्विग्न। कवचाचें स्मरण तयालागीं ॥ ३ ॥
अस्वस्थ चित्तानें आठवी सकळ। सोडूनि हें स्थळ जाऊं म्हणे ॥
भीष्म द्रोणांसवें राजा दुर्योधन। पृथ्वीचें पालन करीतसे ॥ ५ ॥
दान, उपभोग, फल हें द्रव्याचें। जाणूनि भ्रात्यांचें हित करी ॥६॥
वासुदेव म्हणे घोषयात्रापर्व। जाहलें समाप्त वंदुं धर्मा ॥ ७ ॥

---

## मृगस्वप्नोद्भवपर्व १५

अध्याय २५८ वा ६१६

तया रात्रीं धर्मराज। स्वप्नामांजी पाही मृग ॥ १ ॥
बोले सद्गदित कंठें। राया संरक्षीं आम्हांतें ॥ २ ॥
केलें आम्हां नामशेष। रक्षीं आमुच्या कुळास ॥ ३ ॥
सदय धर्म म्हणे तया। जातों आम्हीं अन्य ठाया ॥ ४ ॥
ऐसें बोलतां तयासी। येई जागृति प्रभातीं ॥ ५ ॥
वृत्त कथूनि बांधवांतें। स्मरे उपकार मृगांचे ॥ ६ ॥
झाले आधार तयांनां। त्यजूनि जाती द्वैतवना ॥ ७ ॥
तृणबिंदूच्या समीप। गेले काम्यकवनांत ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पार्थ। जाती विप्रांसमवेत ॥ ९ ॥

---

## व्रीहिद्रौणिकपर्व १६

अध्याय २५९ वा ६१७

एकादशवर्षें काननांत जाती। सहन करिती दुःख धैर्यें ॥ १ ॥
स्वापराधें दुःख भ्रात्यांसी, हें मनीं। शल्य, रात्रंदिनीं निद्रा नये।
कपट शकुनीचें, पारुष्य कर्णाचें। आठवूनि क्रोधें त्रस्त धर्म ॥३॥
धर्मास्तव सौख्यें भोगिताती क्लेश। उत्साह मनांत धरिती मोठा।

अल्पावधि आतां राहियेला ऐसें । चिंतूनि मनातें धीर देती ॥ ५ ॥
महायोगी व्यास येती ऐशा वेळीं । पाहतां दुरूनि उठला राव ॥६॥
सामोरा जावोनि सन्मानी तयांस । बैसला समीप शुश्रूषेतें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कृश पांडवांसी । सानुकंप चित्तीं म्हणती व्यास ॥

६१८

व्यास म्हणती राजश्रेष्ठा । वचन ऐकें हे वरिष्ठा ॥ १ ॥
उग्र तपावीण सुख । नसे कोणालागीं प्राप्त ॥ २ ॥
क्रमें सुख-दुःख प्राप्ति । चिर सौख्य न कोणासी ॥ ३ ॥
ज्ञाता न करी कदा शोक । सर्वकाळ त्या संतोष ॥ ४ ॥
सुख-दुःख अपरिहार्य । धरी निश्चय हा आर्य ॥ ५ ॥
सत्य, आर्जव, अक्रोध । शौच सत्पात्रीं विनियोग ॥ ६ ॥
शम, दम, अनसूया । अहिंसा तो जय इंद्रियां ॥ ७ ॥
पावन हे क्रिया मानीं । दुष्टां लाभे तिर्यग्योनि ॥ ८ ॥
आदरानें द्यावें दान । अंतीं शुभ मति जाण ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे धर्म । करी व्यासांप्रति प्रश्न ॥ १० ॥

६१९

दान कृच्छ्रामाजी सांगा काय श्रेष्ठ । इहपर सौख्य कैसें लाभे ॥१॥
दानाहूनि श्रेष्ठ नसे अन्य कांहीं । व्यासांची हे ग्वाही धर्मालागीं ॥
धनास्तव जन अर्पिताती प्राण । सागर अरण्य लंघिताती ॥ ३ ॥
कृषि, गोरक्ष्य, तें दास्याहि वरिती । धनार्थ सोशिती कष्ट बहु ॥४॥
द्रव्याचा त्या त्याग कठिण हें कर्म । दानाचें हें वर्म जाण धर्मा ५॥
अन्यायोपार्जित द्रव्यदानें पुण्य । न घडे वचन ध्यानीं धरीं ॥ ६ ॥
सद्भावें, सत्पात्रीं, योग्य वेळीं, देतां । अल्पहि महत्वा पात्रे दान ॥
वासुदेव म्हणे कथिती एक कथा । व्यासमुनि पार्था ऐका प्रेमें ॥८॥

अध्याय २६० वा

६२०

व्यास कथिती हे धर्मा । विप्र एक मुद्गल नामा ॥ १ ॥
सत्यनिष्ठ जितेंद्रिय । अद्वेष्टा तो अतिथिप्रिय ॥ २ ॥
वृत्ति तयाचि कापोती । करी इष्टिकृत सत्रासी ॥ ३ ॥

पंचदशदिनीं जाण । सपरिवार त्या भोजन ॥ ४ ॥
द्रोणभरी व्रीहि आणी । तितुक्या दिनीं तो वेंचूनि ॥ ५ ॥
करूनि दर्श-पौर्णिमास । सेवी, अतिथी देवांस ॥ ६ ॥
अवशिष्ट ग्रहण करी । तोषे इंद्र, त्याच्या घरीं- ॥ ७ ॥
अल्प अन्नेंचि संतुष्ट । शतावधि होती विप्र ॥ ८ ॥
शुद्धचित्तें करितां दान । होई अन्नाचें वर्धन ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे कीर्ति । होई विप्रांची दिगंतीं ॥ १० ॥

६२१

दिगंबर दुर्वासाची प्राप्त होई स्वारी ॥
अनियतवेषें शब्द कठोर उच्चारी ॥ १ ॥
भोजनार्थ आलों ऐसें म्हणे मुद्गलासी ॥
करोनि स्वागत मुनि अर्पि भोजनासी ॥ २ ॥
यथेच्छ भक्षूनि अन्न फांशी सर्वांगातें ॥
षष्ठ वेळ ऐशा रीति येई भोजनातें ॥ ३ ॥
तीन मास उपोषण होई सकलांसी ॥
शांति लवहि न ढळे परी मुद्गलाची ॥ ४ ॥
क्रोध, मात्सर्य, अवमान, भ्रांति न तयातें ॥
प्रसन्न दुर्वास बोले तदा मुद्गलातें ॥ ५ ॥
तुझ्यासम या भूलोकीं दाता नसे कोणी ॥
क्षुधाभाव हरूनि नेई जनांसी अधर्मी ॥ ६ ॥
प्राणधर्म-क्षुधा तैंवी जिंकिलें इंद्रियां ॥
धन्य धन्य त्याग तुझा वंद्य तूं देवांना ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे मुनि बोले मुद्गलासी ॥
जासी सुव्रता या पुण्यें सदेह स्वर्गासी ॥ ८ ॥

६२२

दुर्वास मुनीचें अपूर्णचि वाक्य । विमानाचा नाद तोंचि येई ॥ १ ॥
सारस हंस ते जोडिले तयातें । घुंगुर माळांचे रम्य ध्वनि ॥ २ ॥
मुद्गल मुनीसी विनविती दूत । सदेह स्वर्गास नेऊं तुज ॥ ३ ॥

मुनि म्हणे दूता स्वर्गाचें वर्णन । गुण अवगुण कथीं मज ॥ ४ ॥
प्रश्नाचें उत्तर देईं मित्रभावें । यावें कीं न यावें ठरवूं पुढें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सत्कार्माचें सौख्य । स्वर्गाहूनि तुच्छ धार्मिकासी ॥

अध्याय २६१ वा ६२३

देवदूत म्हणे विप्रा बुद्धिमंता । प्राप्त सुखाचा कां करिसी त्याग ॥१॥
भूलोकावरी तो स्वर्लोक जाणावा । सुख विशेष हा अर्थ त्याचा ॥
दुःखरहित तें सौख्य तया स्थानीं । सुखाच्या मागूनि दुःख नसे ॥
देवयानचर-सत्पथहि जाण । क्रममुक्तिस्थान पुण्यें लाभे ॥ ४ ॥
तेहेतीस योजनें उंच ज्या शिखर । मेरु गिरिवर असे तेथें ॥ ५ ॥
नंदनवनादि उद्यानें त्या स्थानीं । क्षुधा, तृषा, ग्लानि नसे तेथें ॥६॥
शब्द, स्पर्श, तेथें अल्हादकारक । नसे जरा, शोक, दुःख, कांहीं ॥
तैजस शरीरें तेथें कर्मजन्य । स्वेद-मलहीन देह सदा ॥ ८ ॥
वस्त्रांसी मालिन्य, म्लानता पुष्पांसी । नसे, विमानांची प्राप्ति तेथें
वासुदेव म्हणे एकाहूनि एक । श्रेष्ठ पुण्यलोक पुढती बहु ॥ १० ॥

६२४

अग्रभागीं ब्रह्म लोक । पुण्यऋषि वसती तेथ ॥ १ ॥
ऋभु देवता त्या ठाईं । मत्सराची बाधा नाहीं ॥ २ ॥
देह असती निराकार । सर्व सुखाचें माहेर ॥ ३ ॥
तेथ नसे द्वंद्वभाव । स्थान इच्छिती तें देव ॥ ४ ॥
अनासक्तकर्मप्राप्ति । विप्रा सद्गुण हे स्वर्गी ॥ ५ ॥
ऐकें दोषही स्वर्गीचे । क्षीणपुण्यें पतन साचें ॥ ६
वृद्धि न घडे कर्मांची । स्पर्धा पाहूनि इतरांची ॥ ७ ॥
निकृष्टांसी उत्कृष्टांचा । द्वेष, असमाधान चित्ता ॥ ८ ॥
म्लान होतां पुष्पमाला । भय पतनाचें त्याला ॥ ९ ॥
पुढती मानवदेह प्राप्त । कर्मासम गति त्यास ॥ १० ॥
वासुदेव म्हणे मुनि । दोषहीन स्थान वर्णी ॥ ११ ॥

६२५

मुद्गलासी देवदूत । कथीतसे परमपद ॥ १ ॥

सर्वोच्च तें विष्णुस्थान । परमशुद्ध सनातन ॥ २ ॥
ब्रह्म तेंचि परमज्योति । लाभे सुटतां आसक्ति ॥ ३ ॥
निरहंकार जो निर्द्वंद्व । जाई त्यास्थळीं मानव ॥ ४ ॥
मुनि म्हणे देवदूता । निघूनि जाई सुखें स्वर्गा ॥ ५ ॥
नको नको स्वर्गसुख । होईन मी द्वंद्वातीत ॥ ६ ॥
ऐसें बोलूनियां मुनि । समलोष्टाश्मकांचनीं-॥ ७ ॥
होऊनियां, मुक्त झाला । धर्मा, त्यजावें शोकाला ॥ ८ ॥
योग्यकाळीं राज्यप्राप्ति । होईल वा खेद त्यजीं ॥ ९ ॥
ऐसें बोलूनि धर्मास । व्यास गेले स्वस्थानास ॥ १० ॥
वासुदेव म्हणे बोध । लाभे संकटीं सुजनास ॥ ११ ॥

---

## द्रौपदीहरणपर्व १७

अध्याय २६२ वा ६२६

सूर्यदत्त स्थाली तेंवी वन्यमृग । जीविकेचा मार्ग पांडवांसी ॥ १ ॥
आनंदें वनांत काळ कंठिताती । हेंचि कौरवांसी महादुःख ॥ २ ॥
ऐशावेळीं मुनि दुर्वास पातले । प्रेमें सत्कारिलें दुर्योधनें ॥ ३ ॥
महाक्रोधी मुनि राहिला त्या स्थानीं । अपरात्रीं भोजनीं मोद मानी
कदाकाळीं अन्न दवडूनि वायां । कदा निंदूनियां भक्षी क्रोधें ॥ ५ ॥
विचित्र स्वभावें ऐसा वागे परी । दुर्योधन करी सेवा त्याची ॥६॥
संतोषूनि मुनि म्हणे मागें वर । पूर्वींच निर्धार कौरवांचा ॥ ७ ॥
म्हणे जें पांडव विश्रांति पावती । भेटें तें तयांसी हेचि इच्छा ॥८॥
तथास्तु म्हणोनि जातां मुनिश्रेष्ठ । आनंद चित्तास कौरवांच्या॥९॥
वासुदेव म्हणे पांडव संकटीं । पडतां कौरवांसी अत्यानंद ॥ १० ॥

अध्याय २६३ वा ६२७

पुढती कांहीं दिन लोटतां दुर्वास । निशा समयास येई वनीं ॥१॥
द्रौपदी समवेत उरकोनि भोजन । शोभविती स्थान वीर सुखें ॥

शिष्यांसह धर्मे पाहूनि मुनींसी । धाडिलें स्नानासी भोजनार्थ ॥३॥
पाहूनि तयांसी चिंती महासती । काय या समयासी वाढूं यांतें ॥
वासुदेव म्हणे हर्ष-शोककाळी । भक्तां वनमाळी आठवतो ॥ ५ ॥

६२८

देवकीनंदना, कंस निषूदना । विघ्न-विनाशना धांव, वेगें ॥ १ ॥
कृष्णा, वासुदेवा, जगन्नाथा, ब्रीद । शरणागत-भक्त-रक्षणाचें ॥२॥
आर्तरक्षका, हे गोपाला, वृत्तींसी । प्रेरणा तूं देसी नमन तुज ॥३॥
निराश्रितां आम्हां गति तूं वरदा । रक्षण गोविंदा, करीं माझें ॥४॥
नीलकमलदलासम शामवर्णा । आरक्तलोचना कृपा करीं ॥ ५ ॥
पीतांबरधरा, कौस्तुभभूषणा । ऐश्वर्य निधाना, तारीं मज ॥ ६ ॥
विपत्कालीं आम्हां एक तूं आधार । विघ्न आजि थोर प्राप्त झालें॥
सभेमाजी लाज माझी राखिलीस । तैंवी या समयास धांव घेईं ॥
वासुदेव म्हणे त्यजोनि रुक्मिणी । आला चक्रपाणी धांवूनियां ॥

६२९

वंदूनि कृष्णासी निवेदिलें वृत्त । क्षुधा पीडी मज देव म्हणे ॥ १ ॥
भोजन करोनि करीन मी कार्य । लज्जित ते कर जोडी तया ॥ २ ॥
कणभरी अन्न नसे स्थालीमाजी । लाज राखीं माझी बोले कृष्णा ॥
कृष्ण म्हणे झालों व्याकुळ क्षुधेनें । न बोलें थट्टेनें ऐशा वेळीं ॥४॥
मजलागीं दावीं आणूनि तें स्थाली । बोलें वनमाळी द्रौपदीसी ॥५॥
आणितां ते स्थाली शाकपत्र एक । पाहूनि अनंत तोष पावे ॥ ६ ॥
भक्षूनि तें म्हणे तृप्त परमात्मा । येवोत भोजना मुनिराज ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे देवनदी तीर्थी । सहदेव मुनींसी शोधी प्रेमें ॥ ८ ॥

६३०

अघमर्षण करिती मुनि । शांत होई जठराग्नि ॥ १ ॥
येती तृप्तीच्या ढेंकरा । शिष्य म्हणती हे गुरुवरा ॥ २ ॥
तृप्त जाहलों आकंठ । सकळ पाकसिद्धि व्यर्थ ॥ ३ ॥
मुनि म्हणे मी अपराध । केला राजर्षीचा आज ॥ ४ ॥
अनुभव अंबऋषीचा । धाक वाटे सज्जनांचा ॥ ५ ॥

सदाचारी हे पांडव । साह्य तया वासुदेव ॥ ६ ॥
अग्निलागीं जैं कार्पास । शापितील तैं आम्हांस ॥ ७ ॥
करा पलायन आतां । पांडवांसी न भेटतां ॥ ८ ॥
गुरुवचन ऐकोनि । पलायन करिती मुनि ॥ ९ ॥
सहदेवा कळतां वृत्त । कथी येऊनि धर्मास ॥ १० ॥
वासुदेव म्हणे धर्म । तदा होई चिंतामग्न ॥ ११ ॥

६३१

प्रगटूनि कृष्ण बोलला धर्मासी । आलों रक्षणासी तुमच्या येथें ॥
परमक्रोधी मुनि दुर्वासांचें आतां । भय न तत्वतां तुम्हांलागीं ॥२॥
भिऊनि तुम्हांसी केलें पलायन । होईल कल्याण तुमचें सदा ॥३॥
द्रौपदीची हांक धावलों ऐकोनि । अनुज्ञा घेऊनि जातों सुखें ॥४॥
धर्म म्हणे देवा, सागरीं तूं नौका । आधार आमुचा सर्वकाल ॥५॥
मुकुंद जातसे अनुज्ञा घेवोनि । वीर वनोवनीं हिंडताती ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सुजनांचा छळ । करील तो खळ नाश पावे ॥ ७ ॥

अध्याय २६४ वा ६३२

काम्यकवनासी राहिले सुखानें । जाती आनंदानें मृगयेलागीं ॥१॥
तृणबिंदु, धौम्य, आश्रमांत दोघे । ठेविती कृष्णेतें एकाकिनी ॥ २ ॥
अनुज्ञा मुनींची घेऊनियां जाती । बांधव धर्मादि मृगयेतें ॥ ३ ॥
वृद्धक्षत्रपुत्र जयद्रथ तेव्हां । विवाहेच्छु शाल्वदेशीं जाई ॥ ४ ॥
यदृच्छेनें मार्गी काम्यकवनांत । येतां द्रौपदीस पाही द्वारीं ॥ ५ ॥
नील अभ्रामाजी जेंवी विद्युल्लता । तेंवी अनिंदिता दिसली तया ॥
वंदिती सकळ मानूनि देवता । जयद्रथ चित्ता काम बाधे ॥ ७ ॥
कोटिकास्यालागीं म्हणे हे सुंदरी । लाभतां, मंदिरीं नेईन मी ॥८॥
सुमुखीचा घेई शोध तूं जाऊनि । जंबुक सिंहिनीजवळी जाई ॥
वासुदेव म्हणे कुटिल कोटिक । भेटे द्रौपदीस जाऊनियां ॥ १० ॥

अध्याय २६५ वा ६३३

कोटिक म्हणे वो भद्रे सुलोचने । कोणाची सन्मान्ये कोण सांगे ॥

वांकवूनि शाखा धरिली कदंबाची । शोभा अश्रमाची तेणें बहु ॥
चंचल प्रदीप्त जैसी अग्निशिखा । तैसें तेज देखा वाटे मज ॥ ३ ॥
कैसी एकाकिनी वससी वनांत । भय न चित्तास लवही तुझ्या ॥
नागकन्या वनीं करिसी कीं संचार । सरस्वती थोर अथवा उमा ॥
कोणाची तूं कन्या कोण तुझा पति । कां एथें वससी सांग आम्हां
सुरथाचा पुत्र कोटिकास्य नाम । मजलागीं जाण शुभाननें ॥ ७ ॥
त्रिगर्तराज हा पुढती ' क्षेमकर ' । कुलिंदाचा पुत्र रथामाजी ॥८॥
रक्त अश्व जया जोडिले रथासी । जयद्रथ त्यासी समजें भद्रे ॥९॥
यापरी निवेदी नांवें सकळांचीं । भार्या तूं कोणाची कोण म्हणे ॥
कृष्णा म्हणे त्याचा जाणूनि आशय । कथितो वासुदेव वचन तेंचि ॥

अध्याय २६६ वा ६३४.

सोडोनियां शाखा कृष्णा वदे त्यासी । शैब्या तुजप्रति जाणतें मी ॥
अंचल सांवरी कौशेय वस्त्राचा । मर्यादित वाचा बोलतसे ॥ २ ॥
कुलीन मी कैसी बोलूं तुजप्रति । तथापि एकटी कथितें वृत्त ॥३॥
द्रुपदाची कन्या कृष्णा मम नाम । पांडव ते धन्य पती माझे ॥ ४ ॥
मृगयेसी गेले काननांत पति । भेटूनि तयांसी पुढती जावें ॥ ५ ॥
त्वरीत ते आतां माघारे येतील । पूजा अर्पितील तुम्हालागीं ॥६॥
वासुदेव म्हणे कृष्णा सत्कारार्थ । गेली आश्रमांत चंद्रमुखी ॥ ७ ॥

अध्याय २६७ वा ६३५

जावोनियां कोटिकास्य । जयद्रथासी वृत्तांत ॥ १ ॥
निवेदितां वदला राजा । हरिला भाव तिनें माझा ॥ २ ॥
ऐसा सान्निध जावोनि । कैसा आलासी परतोनि ॥ ३ ॥
प्रिय मज ती सुंदरी । इतर सकळ वानरी ॥ ४ ॥
कोण सांगें ती कोणाची । येरू म्हणे ते द्रौपदी ॥ ५ ॥
पांडवांची पट्टराणी । नेई तिजसी हरूनि ॥ ६ ॥
ऐकूनियां जयद्रथ । स्वयें गेला आश्रमांत ॥ ७ ॥
कुशल विचारी तियेसी । अर्पी द्रौपदी पाद्यासी ॥ ८ ॥

मृग अर्पी अर्धशत । नृपालागीं उपहारार्थ ॥ ९ ॥
वदली, येऊनियां धर्म । अर्पील तो पशु वन्य ॥ १० ॥
वासुदेव म्हणे कृष्णा । करी तयांच्या सन्माना ॥ ११ ॥

६३६

हांसूनियां जयद्रथ । म्हणे बैसें, सिद्ध रथ ॥ १ ॥
घेई अनुभव सौख्याचा । त्याग करीं या दीनांचा ॥ २ ॥
सुज्ञ स्त्रिया त्या कदापि । सेविती न दरिद्र्यासी ॥ ३ ॥
पुरुष जोंवरी संपन्न । तोंवरीच तो सन्मान्य ॥ ४ ॥
नाश होतां संपत्तीचा । करूं नये आश्रय त्याचा ॥ ५ ॥
नष्टवैभव पांडवां । त्यजूनि करीं माझी सेवा ॥ ६ ॥
सिंधु, सौवीर, देशांचा । उपभोग घेई साचा ॥ ७ ॥
ऐकूनि तें देवी क्रुद्ध । त्वरित जाई आश्रमांत ॥ ८ ॥
म्हणे निर्लज्जा, हे वाणी । काय बोलसी या स्थानीं ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे कृष्णा । क्रोधें धिक्कारी दुर्जना ॥ १० ॥

अध्याय २६८ वा

६३७

कृष्णा म्हणे मूढा, आजिंक्य पांडव । निर्लज्जा, उद्धार निघती कैसे ॥
दुरात्म्यासी स्तुत्य दिसेनाचि कांहीं । श्वानासम पाहीं भुंकसी तूं ॥
महागर्तेतूनि तुज वांचवील । न दिसे नृपाळ ऐसा कोणी ॥ ३ ॥
निद्रिस्थ सिंहाच्या उपटोनि मिशा । पावसी विनाशा मूर्खत्वानें ॥
कृष्णसर्पालागीं दुखविसी व्यर्थ । फळ कर्दळीस नष्ट करी ॥ ५ ॥
जयद्रथ म्हणे पुरे या वल्गना । जाणितों मी त्यांना बैस रथीं ॥ ६ ॥
जिंकितां तयांसी होसील तूं दीन । आधींच प्रसन्न करीं मज ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐकूनि ते शब्द । होई बहु खेद द्रौपदीसी ॥ ८ ॥

६३८

पांचाळी बोलली सौवीर नृपाळ । आपणा प्रबळ मानीतसे ॥ १ ॥
परी तया माझा निग्रह अशक्य । पीडितां सभेंत काय झालें ॥ २ ॥

बलात्कारें जरी जाहलें हरण । तरी कृष्णार्जुन शोधितील ॥ ३ ॥
मजसाठीं पार्थ चाप घेतां करीं । कांपेल धरित्री मूढमते ॥ ४ ॥
भीमसेन गदा घेवोनि धांवतां । धैर्य न पर्वता धरवेल ॥ ५ ॥
माद्रीतनयांचे शररूपी विष । येतां होसी दग्ध पश्चात्तापें ॥ ६ ॥
ऐकूनि दुरात्मा येई अंगावरी । सुंदरी धिक्कारी तयालागीं ॥ ७॥
घाबरोनि मारी धौम्यालागीं हांका । वस्त्रासी धरितां हिसडा देई ॥
सिंधुपति तदा पडला भूमिवरी । येती अंगावरी सकळ दुष्ट ॥ ९ ।
संत्रस्त पांचाळी चढली रथावरी । धौम्यासी अंतरीं खेद वाटे ॥
वासुदेव म्हणे भोगाल कर्मासी । मागोमाग जाती वदूनि मुनि ॥

अध्याय २६९ वा

६३९

इकडे धर्मराज बांधवांसी म्हणे । पहा हीं दुचिन्हें घोर कैसीं ॥१॥
पीडा घोर कांहीं वाटे द्रौपदीसी । उद्वेग चित्तासी माझ्या बहु ॥
पुरे हे इतुके मृग आम्हांप्रति । जावूं आश्रमासी त्वरित आतां ॥३॥
अराजक राष्ट्रासमान कांतार । मजसी हें घोर दिसे आजी ॥ ४ ॥
ऐकोनियां वीर धरिताती वाट । जंबुकाचा शब्द सुचवी भय ॥५॥
आश्रमासन्निध पांचाळीची दासी । करितां आक्रोशासी दूत धांवे॥
म्हणे विघ्न काय सांगें वो आश्रमीं। पांचाळीसी कोणीं छळिलें काय
प्राणाहूनि प्रिय द्रौपदी वीरांसी । अवनी तिजसाठीं धुंडितील ॥
वासुदेव म्हणे अभय दासीते । लाभतां वृत्तातें कथन करी ॥ ९ ॥

६४०

दासी म्हणे 'इंद्रसेना' । सूता, ऐकें या वचना ॥ १ ॥
बलात्कारें जयद्रथ । गेला घेवोनि साध्वीस ॥ २ ॥
जवळी असेल अद्यापि । धरा सत्वरी तयासी ॥ ३ ॥
चाटिला न सोमरस । श्वानें, तोंचि व्हा सावध ॥ ४ ॥
साध्वी जाहली न भ्रष्ट । तोंचि सोडवा तियेस ॥ ५ ॥
धर्म म्हणे अये, शब्द । काय बोलसी अभद्र ॥ ६ ॥
राजपुत्र क्रुद्ध होतां । जाण वधिती अवध्या ॥ ७ ॥
ऐसें बोलूनि धांवले । जयद्रथासी गांठिलें ॥ ८ ॥

धांव धांव भीमा, ऐसा । शब्द ऐकिला धौम्याचा ॥ ९ ॥
अभय देऊनि मुनीसी । थांब थांब रे गर्जती ॥ १० ॥
वासुदेव म्हणे भ्रांत । खल ऐकूनि तो शब्द ॥ ११ ॥

अध्याय २७० वा ६४१

जयद्रथ म्हणे कृष्णे, या वीरांचा । परिचय साचा देई मज ॥ १ ॥
कृष्णा म्हणे मूढा, जाणूनियां मज । विचारिसी लाज नसे मनीं ॥२॥
मुरूपों, सांगतें मानूनियां धर्म । ध्वजाग्रीं ज्या स्वन मृदंगाचा ॥३॥
सुवर्ण वर्ण जो स्थूल-नासिकेचा । ताचि पति माझा युधिष्ठिर ॥
प्राणदान देई शरणागतासी । शरण तयासी त्वरित जाई ॥ ५ ॥
तालवृक्षासम उंच वृकोदर । बलाढ्य तो वीर परमक्रोधी ॥ ६ ॥
संयमी, अजिंक्य वीर तो अर्जुन । माद्रीसुत दोन महाशूर ॥ ७ ॥
अधमा ,पावसी विनाश तूं आतां । जाहल्या मुक्तता पुनर्जन्म ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे सोडूनि पदाति । करिती वीर वृष्टि दुष्टांवरी ॥ ९ ॥

अध्याय २७१ वा ६४२

सिंधुपति पाही पांडव समीप । प्रेरणा योध्यांस करी तदा ॥ १ ॥
पाहतां पाहतां जुंपलें समर । पार्थ, वृकोदर पुढती झाले ॥ २ ॥
सेनाप्रमुखांसी केलें गतप्राण । नकुल दारुण युद्ध करी ॥ ३ ॥
मयूरांसमान विद्ध करी सैन्य । सहदेव बाण सोडूनियां ॥ ४ ॥
धर्माच्या अश्वांसी संहारी त्रिगर्त । हृदयीं, अर्ध-चंद्र ताडी धर्म ॥
नकुलाचा रथ फेंकिला सुरथें । मारी उड्डाणातें नकुल तदा ॥ ६ ॥
सुरथें सोडिला गज तयावरी । क्षणांत संहारी नकुळ तया ॥ ७ ॥
कोटिकास्य वध करी वृकोदर । द्वादश सौवीर वधिले पार्थें ॥ ८ ॥
पांचाळीसी अंतीं सोडी जयद्रथ । गेला काननांत पळूनियां ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे दक्ष माद्रीसुत । घेती द्रौपदीस रथावरी ॥ १० ॥

६४३

भीम संहारी तें सैन्य । पार्थ करी निवारण ॥ १ ॥
न दिसे म्हणे सिंधुपति । भीमा, प्रथम तया शोधीं ॥ २॥

भीम म्हणे न सुटे खळ । जरी गांठील पाताळ ॥ ३ ॥
धर्म जाहला कैवारी । स्मरूनि दुःशीला गांधारी ॥ ४ ॥
कृष्णा म्हणे राज्यहर्ता । हरील जो खळ, कांता ॥ ५ ॥
शरण येतांहि तयासी । सोडूं नये ऐसी नीति ॥ ६ ॥
ऐकूनियां भीमार्जुन । गेले काननीं धांवून ॥ ७ ॥
धर्म द्रौपदीसमवेत । भेटे येवूनि विप्रांस ॥ ८ ॥
दुष्ट गेला एक कोश । पार्थ वधी त्याचे अश्व ॥ ९ ॥
त्यजूनि स्यंदन पळाला । पार्थ म्हणे ने साध्वीला ॥ १० ॥
पलायनें काय लाभ । भीम गर्जे थांव थांव ॥ ११ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । वदला मारूं नको यास ॥ १२ ॥

---

## जयद्रथविमोक्षणपर्व १८

अध्याय २७२ वा

६४४

भीमार्जुन माझा करितील वध । जाणूनियां खेद नृपाळासी ॥ १ ॥
पलायन करी बहुत वेगानें । धरिला भीमानें सहज क्रोधें ॥ २ ॥
ओढूनियां केश आपटिलें त्यासी । ताडीलें मस्तकीं तलाघातें ॥३॥
सांवरूनि मुर्छा राव करी यत्न । मुष्ट्याघातें भीम ताडीतसे ॥ ४ ॥
मारूनियां लत्ता पाडिलें मूर्छित । सोडीं म्हणे पार्थ धर्मवाक्यें ॥
भीम म्हणे क्रोधें नीच हा दुरात्मा । दयाळु महात्मा धर्मराज ॥६॥
बालिश बुद्धीनें वदसी तूंहि तेंचि । दुष्टघाता येसी आड कैसा ॥
बोलूनियां ऐसें मूकपणें पांच । काढियेले पाट प्रखर शरें ॥८॥
निंदूनियां म्हणे मूढा 'दास' ऐसें । बोलसी सभेतें सुटसी तरी ॥
अनुमती देतां बांधिलें रथासी । मूर्छना खलासी येई तदा ॥१०॥
वासुदेव म्हणे पर्णशालेमाजी । आणूनि धर्मासी दावियेला ॥ ११ ॥

६४५

हांसूनियां म्हणे धर्म । भीमा देई रे सोडून ॥ १ ॥
म्हणे पांचाळी हा दास । काढीयेले पांच पाट ॥ २ ॥

आतां जावो हा अधम । पतिदेवा, द्या सोडून ॥ ३ ॥
मुक्त होतां जयद्रथ । वंदीतसे सकलांस ॥ ४ ॥
धर्म म्हणे दास्यमुक्त । केलें आतां हो धार्मिक ॥ ५ ॥
पुनरपि परस्त्रीचा । अभिलाष न करीं ऐसा ॥ ६ ॥
तुज साह्यकर्त्यांसवें । अधमा किती धिक्कारावें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । वदला आतां हो मार्गस्थ ॥ ८ ॥

६४६

लज्जायुक्त जयद्रथ । गेला मूक अधोमुख ॥ १ ॥
गंगाद्वारीं जावूनियां । केली उग्र तपश्चर्या ॥ २ ॥
तोषविलें शंकरासी । म्हणे देवा हे मजसी ॥ ३ ॥
पांडवांसी मी जिंकावें । हेतु पूर्ण हे करावे ॥ ४ ॥
शिव म्हणे हें अशक्य । पांडुपुत्र ते अजिंक्य ॥ ५ ॥
पार्थाविण तूं चौघांसी । एकदांचि निवारिसी ॥ ६ ॥
निवारणाहि पार्थाचें । तुजलागीं शक्य नसे ॥ ७ ॥
दुराराध्य तो देवांसी । नारायण साह्य त्यासी ॥ ८ ॥
दिधलें प्रेमें पाशुपत । संपादिलीं वज्रादिक ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । तपस्वी तो परम भक्त ॥ १० ॥

६४७

शिव म्हणे नारायण । चंद्रसूर्यां अधिष्ठान ॥ १ ॥
मनोबुद्धींचा जो पति । ज्योतींची जी दिव्य ज्योति ॥ २ ॥
त्रिविध परिच्छेदशून्य । तोचि जगाचें कारण ॥ ३ ॥
जड चेतन सर्वात्मा । संहारक तोचि जाणा ॥ ४ ॥
वराह तो नारसिंह । वामनरूपी तोचि देव ॥ ५ ॥
सांप्रत तो यदुराणा । प्रेमें संरक्षी अर्जुना ॥ ६ ॥
कोण जिंकील तयासी । जिंकिसील तूं धर्मासी ॥ ७ ॥
ऐसें बोलूनि शंकर । गुप्त झाला सपरिवार ॥ ८ ॥
सदनीं जाई सिंधुपति । पांडव ते वनामाजी ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे सौख्य । वनीं वाटे पांडवांस ॥ १० ॥

## रामोपाख्यानपर्व १९

अध्याय २७३ वा ६४८

मार्कंडेयालागीं नृपाळ बोलला। निवारण करा संशयाचें ॥ १ ॥
अयोनिजा, मुने पांचाळी हे सती। महाक्लेश साध्वी भोगी कैंवी ॥
धर्मा, धर्मरूप दैव बलवत्तर। वाटे निरंतर पाहोनि हें ॥ ३ ॥
चोरीचा आरोप येई सुजनावरी। तैसें साध्वीवरी संकट हें ॥ ४ ॥
बलात्कारें दुष्टे हरितां तियेसी। प्राप्तचि आम्हांसी होई युद्ध ॥५॥
क्लेश हे वनींचे, मृगया जीविका। मुनिवेषें हिंसा करणें लागे ॥ ६ ॥
राज्याचा अपहार केला बांधवांनीं। नसेलचि कोणी दुःखी ऐसा ॥
वासुदेव म्हणे प्रश्न हा धर्माचा। पूर्वी कोण ऐसा जाहला कीं ॥८॥

अध्याय २७४ वा ६४९

मुनि म्हणे धर्मा ऐशा आपत्तींत। नृपाळ अनेक पडले पूर्वी ॥ १ ॥
रामचंद्रालागीं हेंचि दुःख झालें। कांतेसी हरिलें रावणानें ॥ २ ॥
वधूनि जटायू हरितां सीतेसी। सख्य सुग्रीवासी श्रीरामाचें ॥ ३ ॥
बांधूनियां सेतु जाळूनियां लंका। सोडविली सीता श्रीरामानें ॥४॥
धर्म म्हणे सांगा सकळ तें वृत्त। वीरांचें चरित्र पुण्यदाई ॥ ५ ॥
इक्ष्वाकु कुळांत अजाचा दशरथ। राम त्याचा सुत मुनि म्हणे ॥६॥
लक्ष्मण, भरत, शत्रुघ्नही तिघे। बांधव रामाचे विनयशाली ॥ ७ ॥
कौसल्या, सुमित्रा, कैकेयी, या माता। राम, कौसल्येचा भाग्यवंत ॥
भरत, कैकेयीसी सुमित्रेसी दोघे। निर्मिलें सीतेतें ब्रह्मदेवें ॥ ९ ॥
विदेह नृपाची कन्या ते प्रसिद्ध। वासुदेव पद वंदीतसे ॥ १० ॥

६५०

पितामह रावणाचा। साक्षात् स्वयंभूचि साचा ॥ १ ॥
पुत्र पुलस्त्य ब्रह्मयासी। गो संज्ञक कांता त्याची ॥ २ ॥
वैश्रवण तिचा सुत। गेला सोडूनि पित्यास ॥ ३ ॥
पुलस्त्यासी क्रोध आला। तेजें निर्मी विश्रव्याला ॥ ४ ॥
ब्रह्मा सेवेनें संतुष्ट। वर वैश्रवणा देत ॥ ५ ॥

अमरधनेश त्या केलें । सख्य रुद्रासी जोडिलें ॥ ६ ॥
लोकपाल केलें त्यासी । नलकूबर सुत प्राप्ति ॥ ७ ॥
राजधानी तया लंका । प्रेमें अर्पिलें पुष्पका ॥ ८ ॥
आधिपत्य त्या यक्षांचें । राजराज्यत्वहि साचें ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे ऐसा । कुबेर तो सद्भाग्याचा ॥ १० ॥

अध्याय २७५ वा

६५१

विश्रवा क्रोधानें पाही कुबेरासी । तोषवी पित्यासी वैश्रवण ॥ १ ॥
पुष्पोत्कटा, राका, मालिनी राक्षसी । अर्पिल्या पित्यासी सेवेस्तव
पुष्पोत्कटेलागीं रावण, कुंभकर्ण । होई विभीषण मालिनीसी ॥ ३ ॥
खर-शूर्पणखा जूळ तें राकेसी । रूप, गुण, अति विभीषणा ॥ ४ ॥
रावण तो श्रेष्ठ उत्साही, विक्रमी । कुंभकर्ण रणीं माया दावी ॥५॥
ब्रम्हद्वेष्टा खर, भगिनी भयंकर । विघ्न निरंतर सिद्धां करी ॥ ६ ॥
वेदवेत्ते शूर गंधमादनासी । पाहूनि धनदासी दुःखी झाले ॥ ७ ॥
पाहूनि वैभव तपासी बैसले । सुप्रसन्न केलें ब्रह्मदेवा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे खडतर तप । वरुपें सहस्र केलें बहु ॥ ९ ॥

६५२

चरणावरी एकया उभा राहोनियां । वायु भक्षूनियां 'दशकंठ' ॥१॥
पंचाग्नि साधन करी महायत्नें । करी उपोषणें 'कुंभकर्ण' ॥ २ ॥
जप, उपवास विभीषणें केला । खरासवें सेवा भगिनी करी ॥ ३ ॥
अंतीं दशकंठें मस्तक छेदिलें । प्रगटूनि बोले ब्रह्मदेव ॥ ४ ॥
अमरत्वाविण मागाल तें इष्ट । देईन संतुष्ट होऊनियां ॥ ५ ॥
मानवावांचोनि न घडो पराभव । ऐसा देई देव वर तयां ॥ ६ ॥
कामरूपी होसी ऐसेंहि बोलला । लाभली दुजाला निद्रा बहु ॥
संकटींहि नसो अधर्माची इच्छा । स्फुरण ब्रह्मास्त्रा बिभीषणा ॥
पितृप्रधान तूं ब्रह्मा म्हणे त्यासी । देई अमरत्वासी धार्मिका त्या ॥
वासुदेव म्हणे वर देई ऐसे । ब्रह्मा स्वस्थानातें सुखें जाई ॥ १० ॥

६५३

वर लाभ होतां जिंकी कुबेरासी । हरूनि लंकेसी घालवी त्या ॥१॥

गंधमादनातें राहिला जावोनि । बोलला कोपोनि रावणातें ॥ २ ॥
मजसवें पिता अवमानिलासी । पुष्पक शत्रूसी लाभो तुझ्या ॥ ३ ॥
रावणा, सत्वरी मृत्यु तुज येवो । सेनापति होवो बिभीषण ॥ ४ ॥
पिशाच्च, राक्षस करिती अभिषेक । प्रेमें रावणास लंकेमाजी ॥५॥
देव-दैत्यांलागीं बैसवोनि धाक । संहारी सात्विक-जनांलागीं ॥६॥
वासुदेव म्हणे जनांचा आक्रोश । तेणेंचि तयास रावण नाम ॥७॥

अध्याय २७६ वा ६५४

संत्रस्त ब्रह्मर्षि, ब्रह्म्यालागीं देव । धरूनि नम्रत्व शरण जाती ॥१॥
ब्रह्मा म्हणे, विष्णु गेला भूमीवरी । साह्य व्हा सत्वरी तयालागीं
'दुंदुभी' गंधर्वी होवो ते मंथरा । वानर व्हा इंद्रा स्त्रियांसवें ॥३॥
ऐसी सकलहि सिद्धता जाहली । वानर ते बळी वज्रदेही ॥ ४ ॥
भेदासी प्रारंभ केला मंथरेनें । मोही चातुर्यानें कैकेयेसी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे स्वकीयांचें वैर । करील संहार उभयांचा ॥ ६ ॥

अध्याय २७७ वा ६५५

धर्मपरायण बांधव सकळ । व्रतें विद्या, बळ संपादिती ॥ १ ॥
प्रजानुरंजन करीतसे राम । तेणें तुष्ट मन दशरथाचें ॥ २ ॥
यौवराज्य हेतु राजाच्या मनांत । आवडे जनांस भाव त्याचा ॥ ३ ॥
रूपवंत राम आरक्तनयन । मत्त गजासम गमन त्याचें ॥ ४ ॥
आजानुबाहूचें विशाल तें वक्ष । रम्य कुरळे केश नीलवर्ण ॥ ५ ॥
बृहस्पतीसम बुद्धिमंत राम । सकळांचें प्रेम तयावरी ॥ ६ ॥
सर्व-धर्म-विद्या पारंगत शूर । दिसे मनोहर शत्रूतेंही ॥ ७ ॥
अजिंक्य इंद्रासी सुजनां आधार । दुर्जनसंहार करीतसे ॥ ८ ॥
संयमी सद्गुणी सदाचाररत । मोद मूर्तिमंत कौसल्येचा ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे पुण्य समयासी । वेळ अभिषेकाची योजी नृप ॥१०॥

६५६

वृत्तांत ऐकूनि कुटिल मंथरा । जाई अंतःपुरा कैकेयीच्या ॥ १ ॥
म्हणे अभागिनी होतां सर्पदंश । आनंद चित्तास कैंवी मूढे ॥ २॥

भाग्योदय आजी होई कौसल्येचा । नाश भरताचा समजें आजी ॥
ऐकूनि कैकेयी भेटे नृपाळासी । मागे त्या वरांसी पूर्वदत्तां ॥ ४ ॥
राव म्हणे प्रिये, काय देऊं तुज । मागे ती, भरतास राज्य द्यावें ॥
तेंवी वनामाजी जावो रामचंद्र । ऐकूनि दुःखार्द्र मूक राव ॥ ६ ॥
पित्याचें वचन पूर्ण करी राम । जानकी, लक्ष्मण संगें वनीं ॥ ७ ॥
वनामाजी जातां राम, पुत्रशोकें । गेला मृत्युपंथें दशरथ ॥ ८ ॥
मातुल गृहेंसी आणूनि भरता । घेई म्हणे राज्या कैकेयी त्या ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे मातेचें वचन । ऐकूनियां खिन्न भरत बहु ॥ १० ॥

६५७

निंदूनि मातेसी निघाला भरत । रामासी नगरांत आणावया ॥ १ ॥
मातेचें दुष्कृत्य अमान्य मजसी । स्पष्ट हें जनतेसी भरत दावी ॥
कौसल्यादि माता वसिष्ठादि मुनि । भरताच्या मागूनि अवघे जाती
पातले ते सर्व चित्रकूटावरी । तयां वल्कलधारी दिसला राम ॥४॥
पितृनिधनाचें कथूनि त्या वृत्त । पाचारी नगरास भरत प्रेमें ॥५॥
पितृआज्ञेस्तव भरताची वाणी । अमान्य करोनि धाडी तया ॥ ६ ॥
भरत, पादुका स्थापी सिंहासनीं । वसे नंदिग्रामीं मुनिवेषें ॥ ७ ॥
तेथूनीच करी राज्यकारभार । इकडे रामचंद्र त्यजिती गिरि ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे वंदूनि शरभंगा । गोदेच्या तटाका जाई राम ॥ ९ ॥

६५८

जनस्थानीं शूर्पणखा । भेटे पालटूनि रूपा ॥ १ ॥
वैर मांडिलें तियेनें । धर्मवत्सल रामानें- ॥ २ ॥
चौदा सहस्र दैत्यांसी । वधिलें खर-दूषणेंसी ॥ ३ ॥
केलें निर्भय धर्मारण्य । शूर्पणखेचा अवमान ॥ ४ ॥
लंकेमाजी ते जाऊनि । भेटे रावणालागूनि ॥ ५ ॥
पाहोनि ते छिन्नगात्र । दुष्टें वटारिले नेत्र ॥ ६ ॥
कांहीं चिंतूनि योजना । गेला नभपथें गोकर्णा ॥ ७ ॥
रामभीतीनें मारीच । करी तया स्थळीं तप ॥ ८ ॥

वासुदेव म्हणे यज्ञ । कौशिकाचा त्या कारण ॥ ९ ॥

अध्याय २७८ वा ६५९

सन्मानूनि दैत्य विचारी कुशल । रामाचें त्या वैर कळलें तदा ॥१॥
म्हणे रावणा ही त्यजावी दुर्बुद्धि । कां रे पाचारिसी मृत्युलागीं ॥२॥
भीतीनें तयाच्या बैसलों मी एथ । करिसी कां मरणार्थ सिद्ध मज
ऐकूनि ते शब्द रावण कोपला । वधीन तुजला म्हणे क्रोधें ॥ ४ ॥
मरणाचि तरी मारील तो श्रेष्ठ । चिंतूनि मारीच सिद्ध होई ॥ ५ ॥
स्वयेंचि करोनि और्ध्वदेहिकासी । निघाला साह्यासी रावणाच्या ॥
घेवूनियां वेष सुवर्णमृगाचा । मोहियेली सीता वनामाजी ॥ ७ ॥
विधिप्रेरणेनें मृगामागें राम । जाई संरक्षणं लक्ष्मण करी ॥ ८ ॥
दूर नेऊनियां हांका मारी मृग । सीता-लक्ष्मणांस आर्तस्वरें ॥ ९ ॥
करुणार्द्र वाणी मानूनि रामाची । सीता, लक्ष्मणासी जाई म्हणे ॥
वासुदेव म्हणे न जातां सौमित्र । भाषण कठोर करी सीता ॥११॥

६६०

मूढा, इच्छिसी मजला । सिंहिनीतें जैंवी कोल्हा ॥ १ ॥
करीन मी आत्महत्या । हेतु विफल हा तुझा ॥ २ ॥
ऐकूनि ते वाणी घोर । दुःखें निघाला सौमित्र ॥ ३ ॥
इतुक्यांत मुनिवेषें । रावण येई त्या स्थळातें ॥ ४ ॥
प्रगट होऊनि तियेसी । भार्या होई म्हणे माझी ॥ ५ ॥
तिरस्कारें वदली सीता । पतन होईल आकाशा ॥ ६ ॥
शकलें होतील पृथ्वीचीं । येई शैत्यही अग्नीसी ॥ ७ ॥
परी त्याग राघवाचा । मूढा, न करील सीता ॥ ८ ॥
क्रोधें शिरतां आश्रमांत । उचली रावण तियेस ॥९॥
गगनपंथें जातां दुष्ट । पाही जटायू तो गृध्र ॥१०॥
वासुदेव म्हणे सीता । मारी रामालागीं हांका ॥११॥

अध्याय २७९ वा ६६१

अरुणाचा पुत्र, संपातीचा भ्राता । सखा दशरथाचा जटायू तो ॥

म्हणे कां रे ऐसी हरिसी माझी स्नुषा । जर्जर दैत्येशा केलें तेणें ॥
छेदूनि तयाचे पंख तो दुर्जन । आकाशीं उड्डाण करूनि गेला ॥३॥
जागोजाग फेंकी अलंकार साध्वी । वानरांसी पाही शिखरीं एका॥
वस्त्रालंकार तें फेंकिले तियेनें । नेलें रावणानें लंकेमाजी ॥५॥
इकडे सौमित्रासी पाहूनियां राम । संक्रुद्ध होऊन मनीं म्हणे ॥६॥
राक्षसव्याप्त या काननीं एकाकी । सोडूनि सीतेसी कैसा आला ॥
तोंचि सौमित्रानें कथिला वृत्तांत । खेद श्रीरामास तदा होई ॥८॥
चिंताकुल चित्तें जातां आश्रमासी । मार्गीं जटायूसी पाहियेलें ॥
सीतेस्तव वध रावणाच्या हस्तें । बोलूनि प्राणातें सोडी पक्षी ॥
वासुदेव म्हणे करूनि अंत्यकर्मा । पातले आश्रमा राजपुत्र ॥११॥

६६२

आश्रमांत येती शंकाकुल चित्तें । ओस तयांसी तें दिसलें स्थान ॥
अंतकाळीं दावी जटायु खुणेनें । दक्षिणपथानें तैसे जाती ॥२॥
मार्गामाजी तयां दिसला एक प्राणी। हृदयावरी दोन्हीं नेत्र त्याच्या
मस्तकहीन त्या उदरासी मुख । बोलती 'कबंध' तयालागीं ॥ ४ ॥
सौमित्रासी तेणें धारिलें क्षणांत।राम सव्यहस्त छेदी तेव्हां ॥ ५ ॥
सौमित्रें छेदिलें दक्षिण-करासी । भेदितांचि कुक्षि गेला प्राण ॥६॥
दिव्य देहधारी निघाला पुरुष। राम म्हणे त्यास कोण रे तूं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे आश्चर्य जाहलें । पुरुष तो बोले रामालागीं ॥ ८ ॥

६६३

विश्वावसु मी गंधर्व । विप्रशापें शासन घोर ॥ १ ॥
हरिलें रावणें सीतेसी । सख्य करीं सुग्रीवासी ॥ २ ॥
ऋष्यमुकाच्या समीप । पंपासरोवर देख ॥ ३ ॥
वास त्या स्थळीं कपीचा। सान भ्राता तो वालीचा ॥ ४ ॥
समदुःखी तुम्हीं दोघे । एकमेकां साह्यकर्ते ॥ ५ ॥
लाभ होईल सीतेचा । इतुकेंचि कथितों आतां ॥ ६ ॥
सकल ज्ञान रावणाचें । असे सख्या सुग्रीवातें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे गुप्त । होतां बांधव विस्मित ॥ ८ ॥

अध्याय २८० वा

६६४

सीताहरणदुःखें भ्राते । येती पंपासरोवरातें ॥ १ ॥
पाहूनि तें रम्य स्थान । राम जाहला उद्विग्न ॥ २ ॥
करी सांत्वन सौमित्र । पुढती दिसे गिरिवर ॥ ३ ॥
तया स्थानीं दिसले कपि । पाही सुग्रीव दोघांसी ॥ ४ ॥
येई हनुमंत भेटीतें । सख्य जाहलें तयांचें ॥ ५ ॥
खूण वस्त्राची दाविली । शंका रामाची फिटली ॥ ६ ॥
केला सुग्रीवा अभिषेक । मैत्री उभयां कार्यार्थ ॥ ७ ॥
पुढती गेले किष्किंधेसी । सिंहगर्जना करिती ॥ ८ ॥
निवारीते तया तारा । परी सज्जला संगरी ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे वाली । कारण कांते ही विचारी ॥ १० ॥

६६५

क्षणभरी स्वस्थ राहूनियां तारा । म्हणे त्वत्भ्रात्याला राम साह्य॥१॥
तुल्य शत्रु-मित्र ऐसें सख्य तयां । पातले या ठाया कार्यास्तव ॥२॥
रामाच्या साह्यानें समर्थ वानर । ऐकूनि कपिवर रुष्ट झाला ॥३॥
दोष तारेलागीं देऊनि निघाला । पंचत्व पावला रणामाजी ॥ ४ ॥
तारा, किष्किंधेची प्राप्ति सुग्रीवास । राम चातुर्मास्य राही तेथें ॥
वासुदेव म्हणे अशोकवनासी । फल-मूल भक्षी दुःखें सीता ॥ ६ ॥

६६६

विकराला राक्षसींसी । दैत्य ठेवी रक्षणासी ॥ १ ॥
रूप तयांचें विचित्र । दीर्घ जिव्हा अधिक नेत्र ॥ २ ॥
सीता बोलली एकदां । वध करा तुम्हीं माझा ॥ ३ ॥
नको नको हें जीवन । मज रामचंद्राविण ॥ ४ ॥
करूनियां अन्नत्याग । प्राण त्यागीन सहज ॥ ५ ॥
परी परपुरुषासी । सेवीन मी न कदापि ॥ ६ ॥
कथिती जावोनि रावणा । जानकीच्या या भाषणा ॥ ७ ॥
त्रिजटा वदे ऐशावेळीं । ऐकें 'अविंध्याची' बोली ॥ ८ ॥
राम असे सुखरूप । केलें वानरांसी सख्य ॥ ९ ॥

सोडवील तो तुजसी । शंका न धरीं मानसीं ॥ १० ॥
नलकूवराचा शाप । संरक्षण तेणें तुज ॥ ११ ॥
वासुदेव म्हणे वाणी । सीता हर्षली ऐकूनि ॥ १२ ॥

६६७

त्रिजटा म्हणे सीते स्वप्नांत मी नित्य । पाहातें विनाश रावणाचा ॥
तैलाभिषिक्त तो पंकमग्न दिसे । दक्षिण दिशेतें जाई स्वयें ॥ २ ॥
स्वाभाविक दोषें निंद्य सकळांसी । वैर त्या देवांसी दुर्बुद्धीचें ॥३॥
शुभ्र-छत्रधारी दिसे बिभीषण । सचिवांसह जाण पुण्यवंत ॥ ४ ॥
अस्थिराशीवरी पायस भक्षण । करितो लक्ष्मण स्वप्नीं माझ्या ॥ ५ ॥
व्याघ्ररक्षिता तूं जासी उत्तरेसी । ऐसें स्वप्नामाजी पाहतें मी ॥६॥
आशायुक्तवाणी ऐकूनि संतोष । येती इतुक्यांत राक्षसी त्या ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे त्रिजटे समवेत । पाहती सीतेस पूर्वी जैसी ॥ ८ ॥

अध्याय २८१ वा

६६८

पतीवियोगें सुमुखी । मलिनवस्त्रा बहु दुःखी ॥ १ ॥
कंठीं मणि-मंगळसूत्र । हेचि त्याली अलंकार ॥ २ ॥
शिलातलासी बैसून । करी सर्वदा रूदन ॥ ३ ॥
अकस्मात एका वेळीं । आला रावण त्या स्थळीं ॥ ४ ॥
त्याला बहु अलंकार । परी भासला भेसूर ॥ ५ ॥
समीप रोहिणीच्या शनि । तैसा दिसला त्या स्थानीं ॥ ६ ॥
म्हणे सीते वो सुंदरी । मुख्य होईं अंतःपुरी ॥ ७ ॥
चौदा कोटी त्या पिशाची । सदा माझिया सेवेसी ॥ ८ ॥
द्विगुण, दूत नरभक्षक । त्रिगुण, वचनीं माझ्या यक्ष ॥ ९ ॥
विश्रव्याचा मी सुपुत्र । समजें पंचम लोकपाल ॥ १० ॥
वासुदेव म्हणे दुष्ट । विनवी यापरी सीतेस ॥ ११ ॥

६६९

क्रुद्ध वैदेही त्या काळीं । मध्यभागीं तृण धरी ॥ १ ॥
नेत्रांतून वाहे जळ । भिजूनि गेलें वक्षस्थल ॥ २ ॥
सोडीं म्हणे राक्षसेंद्रा । ऐशा अभद्र विचारा ॥ ३ ॥

परदाराअभिलाप। सुखावह न कोणास ॥ ४ ॥
पतिव्रता मी मानुषी। हरूनि लाभ न अवलेसी ॥ ५ ॥
लोकपाळासम श्रेष्ठ। मुनिपुत्रा कां रे भ्रष्ट ॥ ६ ॥
म्हणसी कुवेराचा भ्राता। लाज कैसी नसे चित्ता ॥ ७ ॥
ऐसें बोलूनि सुकुमारी। अधोमुखी रूदन करी ॥८॥
वदला रावण तियेसी। मदन पीडितो मजसी ॥९॥
अनुमतीवीण कैसा। करूं स्वीकार मी तुझा ॥१०॥
झाला बोलूनियां गुप्त। वासुदेव खिन्न चित्त ॥११॥

अध्याय २८२ वा

६७०

माल्यवान गिरीवरी। वसे किष्किंधेजवळी ॥१॥
रामचंद्र एका रात्रीं। उठला येऊनि जागृति ॥२॥
गगनीं पाहिला चंद्रमा। सीतास्मरणें दुःख मना ॥३॥
म्हणे लक्ष्मणासी राम। वाटे सुग्रीव कृतघ्न ॥४॥
ग्राम्यधर्मांत आसक्त। विसरला कर्तव्यास ॥५॥
शोध घेऊनि तयासी। त्वरित आणीं या स्थळासी ॥६॥
आज्ञा मानूनि सौमित्र। नगरीं जाई वीर क्रुद्ध ॥७॥
तारेसवें सुग्रीवानें। सन्मानिलें त्यासी प्रेमें ॥८॥
म्हणे सुग्रीव तयासी। गेले वानर कार्यासी ॥९॥
नाहीं नाहीं मी कृतघ्न। त्वरित सुवार्ता कथीन ॥१०॥
वासुदेव म्हणे शांत। होई लक्ष्मण चित्तांत ॥११॥

६७१

दिशात्रय कपि पातले शोधोनि। अपयशें मनीं खिन्न होती ॥१॥
दक्षिणेचें वृत्त न कळे अद्यापि। आशा तीच होती रामचंद्रा ॥२॥
दोन मास होतां येती कपिदूत। मधुवन उध्वस्त कथिती राया
ऐकूनि सुग्रीव म्हणे कृतकृत्य। निश्चयेंसी दूत झाले माझे ॥४॥
इतुक्यांत येई वीर हनुमंत। प्रसन्न तयास पाही राम ॥५॥
हर्षभरें तदा बोले वानरांसी। पातलां यशासी घेवोनि कीं ॥६॥

हनुमंत म्हणे पाहूनि सीतेसी । पातलों भेटीसी आनंदानें ॥७॥
वासुदेव म्हणे सकळ वृत्तांत । सांगे हनुमंत रामालागीं ॥८॥

६७२

शोधियेली दक्षिण दिशा । केला प्रवेश गुहेचा ॥ १ ॥
रम्यभूमि ते मयाची । तपा बैसे प्रभावती ॥ २ ॥
पुढती गेलों सागरतीरीं । नैराश्यता आम्हां वरी ॥ ३ ॥
केलें प्रायोपवेशन । झालें जटायुस्मरण ॥ ४ ॥
नाम उच्चारितां त्याचें । घडलें दर्शन संपातीचें ॥ ५ ॥
सकल वृत्तांत ऐकोनि । बोले स्फूर्तिदायी वाणी ॥ ६ ॥
दिसे मजलागीं लंका । सांपडेल तेथें सीता ॥ ७ ॥
ऐकूनियां त्याची वाणी । गेलों उड्डाण करोनि ॥ ८ ॥
तपस्विनी उपवासी । नृपनंदिनी ते होती ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे केश । दिसले जटिल हनुमंतास ॥ १० ॥

६७३

गांठूनि एकांतीं वंदिलें तियेसी । कुशल वृत्तासी कथीलें तुझ्या ॥
सुग्रीवसख्याचा कथिला वृत्तांत । बोलला अविंध्य सकल म्हणे ॥
खुणेस्तव देई दिव्य चूडामणि । आधार त्या स्थानीं हाचि तिज ॥
वियोग दुःखानें व्याकुळ ती मनीं । मुक्तेलागूनि त्वरा करी ॥४॥
वायसकथेचें देऊनि स्मरण । व्याकुळ हे प्राण वदली झाले ॥ ५ ॥
पुढती जाळूनि लंकेसी निघालों । भेटीस्तव आलों रामा, तुझ्या ॥
वासुदेव म्हणे ऐकूनि तें राम । कपीचा सन्मान करी बहु ॥ ७ ॥

अध्याय २८३ वा

६७४

सुग्रीवआज्ञेनें सैन्य सिद्ध होई । वालीश्वशुर येई सुषेण तो ॥ १ ॥
गज, गवय, तो गवाक्ष पातला । पनस, तो आला दधिमुख ॥ २ ॥
कोट्यवधि सेना जाहली एकत्र । जांबवान ऋक्षसेना आणी ॥३॥
सुमुहूर्ती सेना निघे श्रीरामाची । सागरतीरासी प्राप्त होई ॥ ४ ॥
पसरली सेना सागरासमान । सुग्रीवासी राम वदला तेव्हां ॥५॥
दुस्तर सागर कैसा हा लंघावा । म्हणती कोणी नावा सिद्ध करा ॥

राम म्हणे नौका असती वणिकांच्या । उपसर्ग कैसा द्यावा त्यांसीं
सागराचि मार्ग देईल आम्हांसी । बोलूनि उपवासी बैसे राम ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे सिंधु स्वप्नामाजी । भेटला रामासी नम्रभावें ॥ ९ ॥

६७५

राम म्हणे सिंधूलागीं । मार्ग देईं मज आधीं ॥ १ ॥
अथवा शोषूनि टाकीन । विनवी सागर वंदून ॥ २ ॥
तुजलागीं मार्ग देतां । रामा होईल ते प्रथा ॥ ३ ॥
नल वानराकरवीं । सेतुबंधन तूं करीं ॥ ४ ॥
विश्वकर्म्याचा तो सुत । साह्य होईन मी त्यास ॥ ५ ॥
बोलूनियां आपांपती । गुप्त होई त्या स्थळासी ॥ ६ ॥
पुढती सेतूचें बंधन । 'नलसेतु' तया नाम ॥ ७ ॥
बिभीषणही पातला । त्यासी अभिषेक केला ॥ ८ ॥
सिंधु लंघूनियां गेले । वृत्त राक्षसांसी कळे ॥ ९ ॥
शुक-सारण हेरांसी । राम दावी निज सैन्यासी ॥ १० ॥
पुढती अंगद शिष्टाई । वासुदेव वंदी पाईं ॥ ११ ॥

अध्याय २८४ वा

६७६

मार्कंडेय म्हणे युधिष्ठिरा राया । दुर्गमचि लंका नगर होतें ॥ १ ॥
महाद्वार तट होते सभोंवार । खंदक दुस्तर सप्त होते ॥ २ ॥
शतघ्नि प्रभृति यंत्रें तटावरी । तोफा महाद्वारीं असती सिद्ध ॥ ३ ॥
रामआज्ञेनें तो जाई वालीसुत । रावणासमीप सभेमाजी ॥ ४ ॥
म्हणे हे नृपाळा, कोसलनरेश । सांगतो तें ऐक हितप्रद ॥ ५ ॥
अजितेंद्रिय जो अन्यायप्रवृत्त । राव त्या देशांत पापवृद्धि ॥ ६ ॥
राजासवें नाश होई त्या देशाचा । निरपराध प्रजा नष्ट होई ॥७॥
उन्मत्त अवमान ऋषि-देवतांचा । छळहि स्त्रियांचा करिती बहु ॥
आतां वेळ आली तुझ्या विनाशाची । सोडूनि जानकी सुखी होईं
अथवा राक्षसकुळाचा संहार । होईल रघुवीर वदला ऐसें ॥१०॥
वासुदेव म्हणे ऐकूनियां क्रुद्ध । होई राक्षसेंद्र तया वेळीं ॥ ११ ॥

६७७

हस्त-पाद क्रूर धरिती दैत्य चार। सामर्थ्य अपार अंगदाचें ॥ १ ॥
तत्काळ तो जाण करोनि उड्डाण। नृपाळभुवनशिखर गांठी ॥
दैत्यां आदळूनि पाडी भूमीवरी। लंघूनि नगरीं गेला वीर ॥ ३ ॥
भेटूनि राघवा कथिला वृत्तांत। वानर लंकेंत प्रवेशती ॥ ४ ॥
लंका रक्षणार्थ शस्त्रें जीं ठेविलीं। तींच कामीं आलीं वानरांच्या ॥
स्वाभाविक युद्ध होई परस्पर। विजय वानर संपादिती ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे रामाचें दर्शन। घेऊनि वंदन करिताती ॥ ७ ॥

अध्याय २८५ वा ६७८

पर्वण, पतन, जंभ, हरि, खर। पिशाच ते क्षुद्र राक्षसगण ॥ १ ॥
अदृश्य स्वरूपें वानरां पीडिती। बिभीषण शक्ति त्यांची हरी ॥ २ ॥
सामर्थ्य तयांचें ऐसें नष्ट होतां। वानर विघाता करिती सुखें ॥३॥
होऊनियां क्रुद्ध धांवला रावण। व्यूह तो रचून 'औशनस'॥ ४ ॥
'बृहस्पति-व्यूह' रचिला रामानें। समर क्रोधानें करिती दोघे॥ ५॥
इंद्रजितावरी धांवला सौमित्र। भिडला विरूपाक्ष सुग्रीवासी ॥६॥
परस्पर वीर सोडिती शस्त्रास्त्रें। विश्व त्या आघातें भयाकुल ॥७॥
वासुदेव म्हणे समासम वीर। भेटूनि समर करिती घोर॥ ८॥

अध्याय २८६ वा ६७९

प्रहस्तें मारितां गदा बिभीषणा। करूनि ताडना शक्त्याघातें ॥ १ ॥
फोडोनि मस्तक पाडिला प्रहस्त। धांवला धूम्राक्ष पाहोनियां ॥२
कपिसमुदाय पळूनियां जातां। क्रोध हनुमंता येई बहु ॥ ३ ॥
दारुण संगर होऊनियां अंतीं। धूम्राक्षासी वधी हनुमंत ॥ ४ ॥
ऐकूनि तें वृत्त दुःखित रावण। प्रयत्नें उठवून कुंभकर्णा ॥ ५ ॥
निवेदूनि वृत्त सकळ तयासी। पाठवी रणासी सेनेसह ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे दूषणाचे भ्राते। साह्यास्तव दोघे वीर त्याच्या ॥७॥

अध्याय २८७ वा ६८०

कुंभकर्ण धांवे गर्जना करूनि । वानर पाहूनि पळती तया ॥ १ ॥
साह्यास्तव त्याच्या सुग्रीव धांवला । धरूनि तयाला जाई दैत्य ॥
पाहूनि सौमित्र सोडी दिव्यशर । तोडूनि तो शर शौर्य दावी ॥ ३ ॥
मायाबळें दैत्य होई चतुर्भुज । मस्तकें तयास होती बहु ॥ ४ ॥
समय जाणोनि ब्रह्मास्त्र सौमित्रें । सोडूनि दुष्टातें ठार केलें ॥ ५ ॥
वज्रवेग तेंवी प्रमाथी ते दोन । सेनेसवें रण करिती बहु ॥ ६ ॥
पर्वतप्रहारें मारी हनुमंत । एकासी, दुजास नील वधी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे संगर दारुण । राक्षस मरून पडती बहु ॥ ८ ॥

अध्याय २८८ वा ६८१

इंद्रजित युद्ध करी । जाऊनियां नभांतरीं ॥ १ ॥
करूनि मायावी समर । बहुत मारिले वानर ॥ २ ॥
शिळा घेऊनियां कपि । अंतरिक्षामाजी जाती ॥ ३ ॥
परी नचले त्यांचें बळ । विद्ध करी त्यांसी खळ ॥ ४ ॥
वीर, राम-लक्ष्मणांसी । करी मूर्छित रणासी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे चंद्र-। सूर्यचि ते भूमीवर ॥ ६ ॥

अध्याय २८९ वा ६८२

समरांत दोघे पडतां महावीर । दुःखी कपिवीर भोंवतालीं ॥ १ ॥
द्विविद, अंगद, मैंद, हनूमान् । तार तो सुषेण नील, नल ॥ २ ॥
बिभीषणें तदा प्रज्ञास्त्र जपिलें । वीरांसी उठाविलें स्वसामर्थ्यें ॥ ३ ॥
विशल्य औषधि समंत्र योजूनि । घालविली ग्लानि सुग्रीवानें ॥४॥
पवित्र उदक पाठवी कुबेर । स्पर्शितांचि नेत्र दिव्य जेणें ॥ ५ ॥
दिसती त्या योगें अदृश्य राक्षस । सकल वीरांस देई राम ॥ ६ ॥
पुनरपि येई इंद्रजित रणीं । लक्ष्मण शरांनीं वेधी तया ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे वीर बिभीषण । सौमित्रासी पूर्ण साह्य करी ॥ ८ ॥

६८३

मर्मभेदी तीन शर । सोडी लक्ष्मण वीर ॥ १ ॥

अतर्क्यचि कार्य केलें । कर मस्तक छेदिले ॥ २ ॥
सारथ्याचा केला नाश । रथ दूर नेती अश्व ॥ ३ ॥
पातले ते नगरासी । पाही रावण तयांसी ॥ ४ ॥
रिक्त स्यंदन पाहिला । वध पुत्राचा जाणिला ॥ ५ ॥
आर्तस्वरें करी शोक । धांवे सीतेच्या वधार्थ ॥ ६ ॥
अडवी तयासी अविंध्य । म्हणे वधीं श्रीरामास ॥ ७ ॥
इंद्रासवें तूं देवांसी । त्रस्त केलें युद्धामाजी ॥ ८ ॥
ऐकूनियां दशकंठ । म्हणे सज्ज करा रथ ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे अंतीं । जाई रावण युद्धासी ॥ १० ॥

अध्याय २९०–२९१ वा ६८४

पुत्रवधें क्रुद्ध होई बहु दैत्य । आपुल्या रथांत बैसतसे ॥ १ ॥
रत्नखचित तो स्यंदन शोभला । रणांगणीं आला दशकंठ ॥ २ ॥
नल, नील, मैंद, अंगद, हनूमान । करिती निवारण राक्षसांचे ॥३॥
क्रुद्ध राक्षसांची अवितर्क्य माया । अंगापासूनियां निर्मी दैत्य ॥ ४ ॥
असंख्य निर्मिले राम लक्ष्मण । करिताती रण परस्पर ॥ ५ ॥
विस्मय त्या वेळीं वाटे सकळांस । लक्ष्मण रामास हांका मारी ॥
म्हणे या सर्वांसी वधीं रामचंद्रा । राक्षस संहारा करीं वेगें ॥७॥
ऐकूनि ते वाणी खवळला राम । राक्षसांचे प्राण हरण करी ॥ ८ ॥
इतुक्यांत येई इंद्राचा स्यंदन । मातली वंदून विनवी रामा ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे रथारूढ राम । संग्राम दारुण करीतसे ॥ १० ॥

६८५

रथारूढ रामचंद्र । करीतसे सिंहनाद ॥ १ ॥
युद्ध राम-रावणाचें । जगीं तुलना त्या नसे ॥ २ ।
शूल फेंकितां रावण । राम करी छिन्न भिन्न ॥ ३ ॥
वानरांची झाली दैना । क्रोध येई रघुनंदना ॥ ४ ॥
काढूनियां दिव्य शर । अभिमंत्रिलें ब्रह्मास्त्र ॥ ५ ॥
योजितां तो चापावरी । देव तोपले अंतरीं ॥ ६ ॥
झाला हाहाःकार थोर । सुटतां तो दिव्य शर ॥ ७ ॥

रथासहित रावण । दग्ध जाहला दुर्जन ॥ ८ ॥
भस्महीं न उरलें त्याचें । नाद नभीं दुंदुभींचे ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे राम । करी धर्माचें रक्षण ॥ १० ॥

६८६

होई रणीं जयजयकार । करिती रामाचा सत्कार ॥ १ ॥
दिव्य सुमनांची वृष्टि । अमर आनंदें करिती ॥ २ ॥
राम पावूनियां तोप । राज्य अर्पी विभीषणास ॥ ३ ॥
आणी अविंध्य सीतेसी । म्हणे स्वीकारीं साध्वीसी ॥ ४ ॥
पाहूनियां दीन सती । वदला राम तिजप्रति ॥ ५ ॥
सीते, झालीस तूं मुक्त । केलें आम्हीं कर्तव्यास ॥ ६ ॥
कैसा करूं मी स्वीकार । भ्रष्ट होतां हविर्द्रव्य ॥ ७ ॥
ऐकतांचि पडली खालीं । झंजावातें जैं कदली ॥ ८ ॥
निश्वासेंसी जैं दर्पण । तैसें वदन होई म्लान ॥ ९ ॥
सौमित्रेयासवें कपि । स्तब्ध निश्चेष्ट बैसती ॥ १० ॥
वासुदेव म्हणे खेद । होई चिंता सकलांस ॥ ११ ॥

६८७

तया स्थानीं येई चतुर्मुख ब्रह्मा । शक्र, अग्नि, रामा भेटताती ॥ १ ॥
धनद, वरुण, वायु, तेंवी यम । पिता, संतोषून येई तदा ॥ २ ॥
सप्त ऋषि, देव, गंधर्व, पातले । नम्रभावें बोले जनकसुता ॥ ३ ॥
लवही न दोष रामा, तुजप्रति । जाणसी तूं गति सकलांची ॥ ४ ॥
यत्किंचित जरी मजलागीं दोष । होवो माझा नाश तत्काळचि ॥५॥
स्वप्नींहि कदापि चिंतिलें न अन्या । करीं मज धन्या स्वीकारूनि ॥
इतुक्यांत होई स्पष्ट नभोवाणी । जनकनंदिनी शुद्ध असे ॥ ७ ॥
वायु, अग्नि, यम, वरुण तें ब्रह्मा । वदती श्रीरामा, शंका सोडीं ॥
दशरथ म्हणे वर्षे चतुर्दश । होतीं, नगरास जाई आतां ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे सकलहि देव । म्हणती 'मागें वर' रामचंद्रा ॥१०॥

६८८

राम म्हणे माझी मति स्वधर्मांत । नित्य राहो स्थित हेचि इच्छा ॥
पराभव कदा होऊं नये माझा । मृत वानरांचा प्राण येवो ॥ २ ॥

तथास्तु म्हणोनि देव गुप्त होती । वर हनुमंतासी देई सीता ॥३॥
जोंवरी या जगीं कीर्ति श्रीरामाची । तोंवरी तुजसी आयुर्लाभ ॥४॥
पुढती पुष्पकीं बैसूनियां राम । सागर लंघून जाई सुखें ॥ ५ ॥
यौवराज्य, कपि-अंगदा अर्पोनि । येती नंदिग्रामीं सकळ वीर ॥६॥
भरताची भेट घेऊनि सत्वरी । बैसे राज्यावरी रामचंद्र ॥ ७ ॥
सन्मानूनि वीरां धाडिलें स्वस्थानीं । धनदा अर्पोनि पुष्पक तें ॥८॥
गोमतीच्या तीरीं केले दश यज्ञ । याचकांसी दान दिधलें बहु ॥९॥
वासुदेव म्हणे रामकथा ऐसी । कथिली धर्मासी मुनिश्रेष्ठें ॥१०॥

अध्याय २९२ वा ६८९

मार्कंडेय म्हणे युधिष्ठिराप्रति । पूर्वीं श्रीरामासी दुःख ऐसें ॥ १ ॥
परंतपा, शोक करूं नको ऐसा । नसे पातकाचा लेश तुज ॥ २ ॥
भीमार्जुनांसम वीर तुझे भ्राते । सर्वदा साह्यातें असती सज्ज ॥३॥
सहज जिंकोनि शत्रूंसी रणांत । पूर्ववैभवास संपादिसी ॥ ४ ॥
प्रत्ययहि तुज आला या प्रसंगीं । सिंधुपतीलागीं दास केलें ॥ ५ ।
वानरांच्या साह्यें विजयी तो राम । काय तुज न्यून, शोक सोडीं ॥
वासुदेव म्हणे मुनीलागीं धर्म । हर्षित होऊन प्रश्न करी ॥ ७ ॥

---

## पतिव्रतामाहात्म्यपर्व २०

अध्याय २९३ वा ६९०

युधिष्ठिर म्हणे मुने । शोक द्रौपदी कारणें ॥ १ ॥
ऐसी पतिव्रता जनीं । जाहली कीं अन्य कोणी ॥ २ ॥
मुनि म्हणे राया धर्मा । सती सावित्री सन्मान्या ॥ २ ॥
मद्रदेशीं अश्वपति । नामें धार्मिक नृपति ॥ ४ ॥
सत्यप्रतिज्ञ महात्मा । विप्रभक्त उदारात्मा ॥ ५ ॥
प्रजारंजनीं तत्पर । भूतहित-क्षमाशील ॥ ६ ॥
नव्हतें अपत्य तयासी । करी खडतर तपासी ॥ ७ ॥
आराधन सावित्रीचें । केलें अष्टादश वर्षें ॥ ८ ॥

होई प्रसन्न सावित्री। अर्पि कन्या तयाप्रति ॥ ९ ॥
पुत्रास्तव अन्य कांहीं। बोलूं नको, आतां जाईं ॥ १० ॥
ऐसें बोलूनियां देवी। गुप्त तथा स्थानीं होई ॥ ११ ॥
वासुदेव म्हणे नृप। नगरीं जाई मानूनि सुख ॥ १२ ॥

६९१

ऐसा कांहीं काळ लोटतां राणीस। राहिले दिवस पुण्यकाळीं ॥ १ ॥
राजीवनयना लाभलीसे कन्या। प्रसन्नवदना नृपाळासी ॥ २ ॥
केलें जातकर्म 'सावित्रीचि' नाम। समई यौवन प्राप्त तिज ॥ ३ ॥
सर्वांगसुंदर कन्या ते सुकुमार। सकल राजपुत्र दिपती तेजें ॥ ४ ॥
अभ्यंग करूनि एकदां ते कन्या। मंदिरीं हवना करीतसे ॥ ५ ॥
विप्रद्वारा करी स्वस्तिवाचनासी। तीर्थ-प्रसादाची माला ल्याली ॥
पाहूनियां राव होई दुःखाकुल। कन्या विवाहार्थ, खेद त्यासी ॥७॥
म्हणे कन्ये कोणीं तुजसी याचीना। शोधीं गुणवाना तूंचि आतां ॥
आढळतां कोणी सांगें मजप्रति। करीन तयासी कन्यादान ॥ ९ ॥
समई कन्येचें न करी तो दान। पिता जो स्वधर्म आचरीना ॥ १० ॥
समई मातेचें न करीं रक्षण। निंद्य तो दुर्जन शास्त्र म्हणे ॥ ११ ॥
वत्से, मजलागीं येऊं नये दोष। यास्तव वचनास पाळीं माझ्या ॥
वासुदेव म्हणे रथारूढ कन्या। वृद्ध मंत्रीजनांसवें जाई ॥ १३ ॥

अध्याय २९४ वा ६९२

दिन ऐसे गेले कांहीं। स्वारी नारदाची येई ॥ १ ॥
प्रेमें पूजा स्वीकारूनि। बैसताती उच्चस्थानीं ॥ २ ॥
इतुक्यांत येई कन्या। वंदी पूज्यांच्या चरणां ॥ ३ ॥
मुनि म्हणती हे नृपाळा। उपवर दिसे बाळा ॥ ४ ॥
कां न करिसी उपाय। नम्रपणें बोले राव ॥ ५ ॥
गेली होती त्याचि कार्या। ऐकूं वृत्त आतां आर्या ॥ ६ ॥
कन्या म्हणे सत्यवान। शाल्वपतीचा नंदन ॥ ७ ॥
पिता द्युमत्सेन अंध। हरिती शत्रु त्याचें राज्य ॥ ८ ॥
कांतेसवें तो काननीं। वसे नृपाळ सद्गुणी ॥ ९ ॥

अनुरूप त्याचा सुत । वरिलें तयासी मनांत ॥ १० ॥
वासुदेव म्हणे खेद । चित्तीं पावला नारद ॥ ११ ॥

६९३

अकार्य अज्ञानें जाहलें नृपाळा । कन्येनें या केला अविवेक ॥ १ ॥
सत्यवादी त्याच्या माता-पितरांसी । सत्यवान हेचि संज्ञा रुचे ॥२॥
प्रिय अश्व, तया अश्वाचेंचि चित्र । काढी, 'अश्वचित्र' म्हणती तेणें
सूर्यासम तेज, विक्रमी महेंद्र । नित्य क्षमाशील धरणीसम ॥ ४ ॥
बुद्धिवंत जैसा दुजा बृहस्पति । उदार ययातीसम असे ॥ ५ ॥
रूप, गुण, लज्जा-आकार्याची जया । तयाच्या गौरवा करिती ज्ञाते
राव म्हणे वर्णी दोषही तयाच । मुनि म्हणे ऐकें महादोष ॥ ७ ॥
आजपासूनियां एक वर्षामाजी । देहावसानासी पावेल तो ॥ ८ ॥
ऐकूनि नृपाळ म्हणे कन्येप्रति । शोधीं तूं अन्यासी योग्य वेळीं ॥
वासुदेव म्हणे ऐकोनि बालिका । बोलली तें ऐका पित्यालागीं ॥

६९४

एकदांचि ताता होई काष्ठछेद । 'देतों' ऐसा शब्द एकदांची ॥ १ ॥
कन्यादान तेवीं घडे एकदांची । वरिलें जयासी मनामाजी ॥ २ ॥
असो तो अल्पायु अथवा दुर्गुणी । बोलली जे वाणी तेंचि सत्य ॥
करूनि निश्चय बोलतसे वाणी । तेंचि आचरणीं येत असे ॥ ४ ॥
मुनि म्हणे राया, स्थिर तुझी कन्या । होवो सत्यवाना योग तिचा॥
राव म्हणे आज्ञा प्रमाण मजसी । देवोनियां आशी गेले मुनि ॥ ६॥
वासुदेव म्हणे राजा अश्वपति । लागे सिद्धतेसी विवाहाच्या ॥

अध्याय २९५ वा

६९५

अश्वपति सुमुहूर्तासी । विवाहार्थ परिवारेंसी ॥ १ ॥
गेला सत्वरि वनांत । शिरला सुखें आश्रमांत ॥ २ ॥
शालवृक्षाचिया तळीं । राव तृणासनावरी ॥ ३ ॥
पाही द्युमत्सेनाप्रति । वंदी तया अश्वपति ॥ ४ ॥
करी आतिथ्य नृपाळ । पुशी तयासी कुशल ॥ ५ ॥
अश्वपति म्हणे राजा । कन्या होवो तुजसी स्नुषा ॥ ६ ॥

हेचि कामना अंतरीं । पुत्रास्तव हे स्वीकारीं ॥ ७ ॥
राजा म्हणे तुझी कन्या । अयोग्याचि ऐशा श्रमां ॥ ८ ॥
आम्हीं असों नियमनिष्ठ । वनवासी आश्रमांत ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे ऐसी । स्पष्ट सांगे परिस्थिति ॥ १० ॥

६९६

अश्वपति म्हणे सुख आणि दुःख । उत्पत्ति विनाश-शील जगीं ॥१॥
कन्येसवें ऐसें जाणितों मी राया । करूनि निश्चया प्राप्त झालों ॥२॥
निराश मजसी करूं नको राया । विनम्र मी पायां वंदीतसें ॥३॥
कुल, शील दोन्ही समान हे नृपा । अनुरूप सुता होईल हे ॥४॥
द्युमत्सेन म्हणे मद्राधिपा ऐसी । मनीषा पुर्वींचि होती मनीं ॥५॥
परी राज्यभ्रष्ट जाहलों मी आतां । यास्तव हे शंका येई मनीं ॥
जाणोनि हें जरी अर्पिसील कन्या । तरी हे सन्मान्या आम्हांलागीं
इष्ट, आतिथी तो अश्वपति झाला । संतोष जाहला वासुदेवा ॥८॥

६९७

पाचारूनि आणी आश्रमस्थ जनां । अर्पियेली कन्या सन्मानानें ॥१॥
कन्यादान केलें प्रेमें सालंकृत । तैंवी गृहोचित अर्पी वस्तु ॥२॥
पुढती आनंदें जाई स्वगृहासी । सासु श्वशुरांसी वंदी कन्या ॥३॥
सकल भूषणें काढोनियां ठेवी । वल्कलें भूषवी निजकाया ॥४॥
सद्‌गुणें आपुल्या संपादिली प्रीति । आनंदें सावित्री वसे तेथें ॥५॥
चरण संवाहन करूनि सासूचें । साहित्य पूजेचें श्वशुरा अर्पी ॥६॥
मधुर भाषण सत्कार्य-नैपुण्य । चित्त समाधान परिचर्या ॥७॥
ऐशा सद्‌गुणानें रंजवी पतीसी । चित्तीं नारदाची वाणी सदा ॥८॥
वासुदेव म्हणे एकाचि चिंतन । सावित्रीचें मन खिन्न होई ॥९॥

अध्याय २९६ वा

६९८

निघूनियां ऐसा गेला दीर्घ काळ । समीप ती वेळ प्राप्त झाली ॥१॥
गणूनियां दिन निश्चित योजिला । चतुर्थ दिनाला निधन जाणें ॥
आरंभूनि व्रत उभी रात्रंदिन । पाहूनि नियम दुःखी राजा ॥३॥
जवळी जाऊनि बोले द्युमत्सेन । कन्ये, उपोषण दुष्कर हें ॥४॥

स्नुषा म्हणे ताता करूं नये दुःख । सकारण व्रत आरंभिलें ॥५॥
राव म्हणे केंवी करूं व्रतभंग । त्वरितचि साङ्ग पूर्ण होवो ॥६॥
वासुदेव म्हणे बोलूनियां ऐसें । राव स्वस्थचित्तें स्थिर राहे ॥७॥

६९९

उद्देक मृत्यु जाणोनि पतीचा । धरूनियां निष्ठा पाळी व्रत ॥१॥
उगवला दुष्ट घोर तो दिवस । आहुती अग्नीस अर्पीयेली ॥२॥
दैनंदिन विधि उरकोनि सारे । सकलांसी केलें अभिवादन ॥३॥
जोडूनियां कर उभी राहियेली । तथास्तु बोलली आशीर्वचा ॥४॥
सासु-श्वशुर तें बोलले तियेसी । व्रताची समाप्ति होवो मुली ॥५॥
वत्से, करीं आतां सत्वरीं भोजन । पुढती करीं अन्य कार्य सुखें॥६॥
कृतकार्य होतां करीन भोजन । विनम्र होऊन वदली कन्या ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे तोंचि सत्यवान । परशु घेऊन सिद्ध होई ॥ ८ ॥

७००

नम्रभावें तदा बोलली सावित्री । नाथा, मजप्रति वनीं न्यावें ॥ १ ॥
एकाकी न जावें वनीं पतिदेवा । वियोग न व्हावा आजि मज ॥ २ ॥
सत्यवान म्हणे प्रिये, तूं उपवासी । दुर्गम वनासी येऊं नको ॥ ३ ॥
साध्वी म्हणे नाथा, उत्साह मनासी । प्रतिबंध मजसी करूं नये ।
सत्यवान म्हणे वडिलांची आज्ञा । घेऊनियां वना सुखें येई ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐकोनि ते वाणी । वंदिते जावोनि वडिलांसी ॥ ६ ॥

७०१

विनम्रभावानें बोले वडिलांसी । आज्ञा मजलागीं लाभो म्हणे ॥१॥
विरह न आजी साहवे पतीचा । नये निवारितां पुण्यकर्म ॥ २ ॥
अन्यकार्ये जरी असतें पतीसी । निवारण आजी घडतें ताता ॥ ३ ॥
इतुक्या दिनांत आश्रमाबाहेर । टाकिलें पाऊल काय सांगा ॥ ४ ॥
द्युमत्सेन म्हणे आजवरी ऐसा । हट्ट सावित्रीचा स्मरेचिना ॥ ५ ॥
यास्तव वधूची इच्छा होवो पूर्ण । मार्गी सत्यवान संरक्षावा ॥६॥
घेऊनि अनुज्ञा यापरी निघाली । वेदना अंतरीं बहुत तिज ॥ ७ ॥

परी सुवासिनी चालली हांसत । पतीसी मनांत तोष देई ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे विधीची घटना । न कळेचि कोणा क्षणही पूर्वी ॥९॥

७०२

म्हणे मोदें सत्यवंत । पाहीं मयूरांचें नृत्य ॥ १ ॥
विचित्र हीं उपवनें । ऐकें कोकिळांचें गाणें ॥ २ ॥
प्रफुल्लित वृक्षलता । वेगें वाहती सरिता ॥ ३ ॥
सूक्ष्म दृष्टीनें सावित्री । अवलोकी सर्व कृति ॥ ४ ॥
मृत्युस्मरणें बावरी । सुविचारें धैर्य धरी ॥ ५ ॥
हृदय होतसे विदीर्ण । परी होती सावधान ॥ ६ ॥
मंदगतीनें ती जाई । मागोमाग सदा राही ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐसा । समय कठिण तो साचा ॥ ८ ॥

अध्याय २९७ वा

७०३

तोडी बहु फळें वीर सत्यवान । साध्वी तीं वेंचून परडी भरी ॥१॥
तोडितां तोडितां काष्ठें, येई घाम । मस्तकीं दारुण दुःख होई ॥२॥
श्रमपीडित तो बोले सावित्रीसी । यातना मजसी होती बहु ॥ ३ ॥
हृदयीं वेदना होती बहु माझ्या । अस्वस्थता चित्ता असह्यचि ॥४॥
आडवेंचि आतां व्हावें ऐसें वाटे । दुःख सर्वांगातें होई कांते ॥५॥
ऐकूनियां शिर घेई अंकावरी । नारद वैखरी आठवली ॥ ६ ॥
इतुक्यांत एक दिव्य कांतियुक्त । दिसला पुरुष तियेलागीं ॥७॥
वर्ण त्याचा शाम, जटांचें बंधन । आरक्त नयन, रक्त वस्त्र ॥ ८ ॥
करामाजी त्याच्या भयंकर पाश । राजतनयास निरीक्षी तो ॥ ९ ॥
भीषण आकृति पाहूनि कंपित । सावित्रीचें चित्त होत असे ॥१०॥
भूमीवरी शिर ठेऊनि दुःखार्ता । जोडूनियां हस्ता बोले तया ॥११॥
वासुदेव म्हणे प्रसंग जाणून । धैर्यानें भाषण करी साध्वी ॥ १२ ॥

७०४

देवता तूं कोणी निश्चय हा माझा । पाहूनियां रूपा अलौकिक ॥
कोण तूं कासया सांगें पातलासी । बोलली सावित्री यमालागीं ॥
येरु म्हणे साध्वी अये तपस्विनी । पातलों या स्थानीं समजें यम ॥

जाणूनियां पुण्य, बोलतों तुजसी । न्यायवया पतीसी प्राप्त झालों ॥
सती म्हणे देवा स्वयें पातलासी । कां न दूताप्रति धाडियेलें ॥ ५॥
यम म्हणे तुझा पति धर्मनिष्ठ । दूत, ऐसे श्रेष्ठ, कैसे नेती ॥ ६ ॥
ऐसें बोलूनियां सूक्ष्म शरीरासी । पाशानें आकर्षी यमराज ॥७॥
घेऊनियां प्राण नभपथें जातां । सावित्री दुःखार्ता मागें जाई ॥८॥
वासुदेव म्हणे व्रतस्थ साध्वीसी । पाहूनि आकाशीं वदला यम ॥

७०५

जाई वो कल्याणि, माघारीं तूं आतां । आचरीं भर्त्याचा अंत्यविधि
शक्य तेथवरी झालें अनुगमन । जाहलीस पूर्ण ऋणमुक्त ॥ २ ॥
सती म्हणे माझा सनातन धर्म । जेथें प्रियप्राण जावें तेथें ॥ ३ ॥
तप, गुरुभक्ति, यमाचा प्रसाद । तेणें अकुंठित गति माझी ॥ ४ ॥
सप्तपदीं मैत्री होई सज्जनाची । ऐकें वचनासी देवा, आतां ॥ ५॥
वनांतही धर्म त्यागिती दुर्जन । ग्रामींही सज्जन यत्नरत ॥ ६ ॥
जितेंद्रिय ग्रामीं वनींहि संन्यासी । धर्म जगामाजी विज्ञानार्थ ॥७॥
यास्तव प्रधान साधन, हा धर्म । श्रेष्ठ हा आश्रम गृहस्थांचा ॥८॥
करूं नको नाश देवा आश्रमाचा । वासुदेव ऐसा भाव सांगे ॥ ९ ॥

७०६

सावित्रीसी म्हणे यम । तुझें निर्दोष भाषण ॥ १ ॥
स्वर-व्यंजनसंयुक्त । मधुर तें युक्तियुक्त ॥ २ ॥
ऐकूनियां तोष मनीं । इच्छिसी तें घे मागोनि ॥ ३ ॥
पतिजीवित न मागें । तोषूनियां जाई मागें ॥ ४ ॥
सती ऐकूनियां मनीं । कांहीं निश्चय ठरवोनि ॥ ५ ॥
मागे श्वशुरासी तेज । अंधत्वाचा तेंवी नाश ॥ ६ ॥
यम तथास्तु बोलला । जाई म्हणे सदनाला ॥ ७ ॥
क्लेश होतील अपार । कांति तुझी सुकुमार ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे सती । ऐका वदे यमाप्रति ॥ ९ ॥

७०७

सती म्हणे भर्ता समीप असतां । श्रम न सर्वथा मजलागीं ॥ १ ॥

सज्जनांची मैत्री महा फलदाई । सर्वदा घडावी संगती ते ॥ २ ॥
यम म्हणे साध्वी, तुझ्या संगतींत । ज्ञात्यासी संतोष, वर मागें॥३॥
राज्य लाभो म्हणे देवा, श्वशुरातें । तथास्तु संतोषें वदला यम ॥४॥
जाईं म्हणे आतां गृहीं अनिंदिते । शास्ता तूं जनांतें कन्या म्हणे ॥
देवा, तूंचि देसी फल सत्कर्मांचें । आसक्तचि साचे पाशबद्ध ॥ ६ ॥
काया-वाचा-मनें सर्वभूतीं दया । अद्रोह, दान, हा श्रेष्ठ धर्म ७ ॥
अल्पायु, अशक्त, कुशलताहीन । मृत्युलोकीं कोण नसे सांगा ॥८॥
ऐसेंही असूनि दया करी नर । कां न अवलेचर करिसी दया ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे संतुष्ट यमानें । शत बंधुदानें तोषविलें ॥ १० ॥

७०८

जाईं आतां म्हणे यम । मार्ग पुढती कठीण ॥ १ ॥
पतिसन्निध असतां । साध्वी म्हणे नाहीं चिंता ॥ २ ॥
दुर्घट न वाटे कांहीं । मन पुढती धांव घेई ॥ ३ ॥
सूर्यपुत्र तूं प्रतापी । विवस्वान नामें ख्याती ॥ ४ ॥
पक्षपात नाहीं मनीं । दक्ष सदा नियमनीं ॥ ५ ॥
समदृष्टि धर्मराजा । तुझ्या चरणीं भाव माझा ॥ ६ ॥
सज्जनासी विश्वासतां । इष्टसिद्धि लाभे लोकां ॥ ७ ॥
माझा तुझ्यावरी भाव । प्रत्यक्ष तूं यमदेव ॥ ८ ॥
देवश्रेष्ठा स्वतःहूनि । सुजन विश्वासार्ह जनीं ॥ ९ ॥
भूतसौहृदें विश्वास । सज्जनांचा सकळांस ॥ १० ॥
वासुदेव म्हणे ऐसी । साध्वी करी सुजनस्तुति ॥ ११ ॥

७०९

संतोषूनि यम म्हणे हें वचन । सावित्रीवांचून नायाकिलें ॥ १ ॥
पतीवीण घेई मागूनि जें इष्ट । औरस दे पुत्र शत म्हणे ॥ २ ॥
बलवीर्ययुक्त कुलोद्धारक ते । सत्य संकल्पा, हें मागतसें ॥ ३ ॥
तथास्तु हे वाणी सहज निघाली । जाईं आतां मुली म्हणे यम ॥४॥
सती म्हणे कैसी जाऊं पतीविण । होईल वचन सत्य कैसें ॥ ५ ॥
यम म्हणे कैसा पति तुज देऊं । जाणें क्षीणआयु तयालागीं ॥ ६ ॥

सती म्हणे काय अशक्य देवासी । निष्फळ न तुझी वाणी कदा ॥
सत्यप्रिय संत जगामाजी नित्य । तेणेंचि हें विश्व चालतसे ॥ ८ ॥
सज्जनप्रसादें लाभे मान, धन । प्रसाद दुर्जन काय करी ॥ ९ ॥
ऐशा गुणें संत, श्रेष्ठ सर्वांहूनि । संत तूं, या जनीं यमधर्मा ॥ १० ॥
रक्षीं रक्षीं आम्हां यालागीं हे देवा । तोष वासुदेवा ऐकूनियां ॥११॥

७१०

यम म्हणे सावित्रीसी । अर्थपूर्ण वाणी तुझी ॥ १ ॥
झालों संतुष्ट मी तुज । इष्ट तोचि वर माग ॥ २ ॥
सती म्हणे हे वरदा । सत्य होवो वर तुझा ॥ ३ ॥
भर्त्यांविण पुत्रलाभ । कैसा होईल तें सांग ॥ ४ ॥
सर्व सुख माझें भर्ता । तुच्छ लेखितें मी स्वर्गा ॥ ५ ॥
वैभवही तयाविण-। तुच्छ, तैसेचि हे प्राण ॥ ६ ॥
अर्पी पति दयाघना । पाळीं आपुल्या वचना ॥ ७ ॥
ऐसी ऐकूनियां वाणी । यमधर्म तुष्ट मनीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे यम । वदला इच्छा होवो पूर्ण ॥ ९ ॥

७११

प्रसन्न होऊनि देव सोडी सत्यवाना ॥
म्हणे सावित्रीसी पूर्ण होतील कामना ॥ १ ॥
चार शत संवत्सर आयुष्य लाभेल ॥
लौकिक तयाचा जनीं अखंड होईल ॥ २ ॥
तयापासूनि तुजसी शत पुत्रलाभ ॥
पुत्र पौत्रांसवें तयां लाभो महद्भाग्य ॥ ३ ॥
'मालवी' मातेसी तुझ्या शत पुत्रलाभ ॥
होईल, बोलूनि झाला यमराज गुप्त ॥ ४ ॥
विद्रूप पतीचा देह घेवोनियां अंकीं ॥
जाऊनि समीप बैसे आनंदें सावित्री ॥ ५ ॥
इतुक्यांत सत्यवान जागृत जाहला ॥
शामवर्ण कोण म्हणे ओढिता मजला ॥६॥

सावित्री म्हणे तो यम गेला स्वस्थळासी ॥
शक्यतरी जाऊं आतां निशा वनव्यापी ॥७॥
वासुदेव म्हणे पूर्वस्मृति सत्यवाना ॥
स्वप्न, सत्य कीं, तयाच्या शंका येई मना ॥८॥

७१२

पाहिला मी प्रिये, कोण तो पुरुष? । सांगें जरी तुज ज्ञात असे ॥१॥
सती म्हणे सर्व उद्यीक कथीन । सोडूनि हें स्थान जाऊं आतां ॥
क्रूर, हिंस्र पशू हिंडताती वनीं । घोर ही रजनी पसरली ॥३॥
माय-बापें गृहीं करितील चिंता । येरु म्हणे कैसा मार्ग दिसे ॥४॥
सती म्हणे वन दावाग्नीनें दग्ध । आम्हांस्तव सिद्ध असे अग्नि ॥
अद्यापि आपणा होती जरी क्लेश । जाऊं उद्यीक प्रात काळीं ॥
सत्यवान म्हणे जाऊं आश्रमांत । येतील शोधार्थ मुनिवर ॥७॥
ऐसाचि अवधि पूर्वी मज होतां । वृद्ध माता-पिता करिती दुःख ॥
मजवांचूनि त्यां प्राणही न प्रिय । हर हर काय करितील तीं ॥९॥
वासुदेव म्हणे बोलूनियां ऐसें । धिक्कारी निद्रेतें वारंवार ॥१०॥

७१३

असहाय माय-बापां । आठवूनि करी शोका ॥१॥
म्हणे आम्हीं परस्पर । एकमेकांसी आधार ॥२॥
माझें मज नाहीं दुःख । पिता त्यागील प्राणास ॥३॥
वृद्ध पिता आणि माता । मारितील मज हांका ॥४॥
ऐशापरी होई दीन । अंतीं मांडिलें रूदन ॥५॥
ऐशी मातृ-पितृभक्ति । पाहूनियां वदली सती ॥६॥
पदरीं माझ्या पुण्य जरी । सासु-श्वशुरां सौख्य तरी ॥७॥
वासुदेव म्हणे ऐसें । पुण्य लाविलें पणातें ॥८॥

७१४

आर्तस्वरें तदा बोले सत्यवान । विपरीत परिणाम जरी कांहीं ॥
तरी प्रिये, प्राण नाहीं ठेवणार । सत्य हा निर्धार जाण माझा ॥२॥
इच्छिसी मजसी जरी प्रियकांते । जाऊं आश्रमातें त्वरित तरी ॥

ऐकूनियां साध्वी उठली तत्काळ । आंवरी संभार स्वकेशांचा ॥
धरोनियां करीं उठवी पतीसी । परडी फळांची अवलोकी तो ॥ ५॥
जाणूनियां भाव बोले तया साध्वी । उद्यीक न्यावी परडी सुखें ॥
टांगोनि ते ठेवी वृक्ष शाखेवरी । घेवोनियां करीं परशु निघे ॥७॥
स्कंधावरी हस्त घेवूनियां एक । सांवरी तयांस अन्य हस्तें ॥ ८॥
परिचित मार्ग दावीत निघाला । चंद्रहि तयाला साह्य करी ॥९॥
पलाश तरूंचा समूह तो येतां । सोडीं म्हणे पथा दक्षिणेच्या ॥
उत्कंठित मनीं तात भेटीस्तव । हृष्ट वासुदेव चित्तामाजी ॥११॥

अध्याय २९८ वा ७१५

इकडे द्युमत्सेनाप्रति । अकस्मात येई दृष्टि ॥१॥
परी न दिसे सत्यवान । कांतेसवें शोधी वन ॥२॥
कर्णी पडतां शब्द कांहीं । म्हणती सत्यवान येई ॥३॥
चरण विदीर्ण तयाचे । बोंचूनियां कुश कांटे ॥४॥
धांवाधांव बहु केली । जमली तापस मंडळी ॥५॥
उभयांचा तो विलाप । ऐकूनियां सकळां दुःख ॥६॥
भारद्वाज, गौतम, धौम्य । मार्कंडेयादि ब्राह्मण ॥७॥
धीर तयालागीं देती । तोंचि पातली सावित्री ॥८॥
अग्नि भोंवतालीं सर्व । बैसताती तदा विप्र ॥९॥
उभी पाहूनि सावित्री । प्रेमें तिज वैसविती ॥१०॥
वासुदेव म्हणे प्रश्न-। करितां, बोले सत्यवान ॥११॥

७१६

सत्यवान कथी वृत्तांत सकळ ।मस्तकासी कळ येई म्हणे ॥१॥
पुढती जाहलों दीर्घ निद्रावश । कारण अवधीस हेंचि जाणा ॥२॥
दृष्टिलाभहेतु कथील सावित्री । सन्मुनि बोलती, देवता हे ॥३॥
ऐकूनि हे वाणी सकळ वृत्तांत । कथितां विस्मित होती मुनि ॥४॥
म्हणाति हे कन्ये, कुळाचा उद्धार । स्वपुण्यें साचार केलासी त्वां ॥
सत्कारूनि मुनि गेले स्वस्थळासी । आनंद मानसीं वासुदेवा ॥६॥

अध्याय २९९ वा ७१७

शाल्वदेशवासी जन आश्रमांत येती ॥
शत्रुनाशवृत्त मोदें नृपा निवेदिती ॥ १ ॥
दृष्टिलाभ पाहोनियां मोद सकलांतें ॥
रथ, पालख्या आणोनि नेती नगरातें ॥ २ ॥
अभिषेक रायालागीं पुत्रा यौवराज्य ॥
अर्पितां जनांसी वाटे अपूर्व आनंद ॥ ३ ॥
पुत्रलाभ सावित्रीसी, माता मालवीतें ॥
पुत्र होतां हर्ष, फल ऐसें सत्कर्माचें ॥ ४ ॥
उभय कुळांचा सती करिते उद्धार ॥
मार्कंडेय म्हणे धर्मा, पांचाळी हे थोर ॥ ५ ॥
ऐकतां सतीची कथा विशुद्ध मनानें ॥
पूर्ण मनोरथ होती जाणा निश्चयानें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मुनि काम्यकवनांत ॥
धर्मासवें पांडवांसी करिती हा बोध ॥ ७ ॥

---

## कुंडलाहरणपर्व २१

अध्याय ३०० वा ७१८

जनमेजयालागीं वैशंपायनानें । वृत्त आनंदानें कथिलें ऐका ॥ १ ॥
स्वप्नामाजी विप्र येऊनियां कर्णा । देवेंद्र याचना करिल म्हणे ॥ २ ॥
कवच-कुंडलें अर्पूं नको तया । इच्छिसी विजया समरीं जरी ॥ ३ ॥
कर्ण म्हणे वाटे नव्हसी तूं विप्र । येरु म्हणे 'सूर्य' पातलों मी ॥ ४ ॥
हितास्तव तुझ्या कथितों हे वाणी । कर्ण म्हणे जनीं कीर्ति श्रेष्ठ ॥
व्रतभंग माझा न होवो कदापि । विन्मुख विप्रासी नच करीं ॥ ६ ॥
प्राणाहूनि मज कीर्ति प्रिय देवा । विक्रमें मानवा जिंकीन मी ॥ ७ ॥
वेषधारी इंद्रा, कुंडलें, कवच । अर्पूनि गतीस पावेन मी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे आपुल्या व्रतासी । वीर न कदापि सोडी कदा ॥ ९ ॥

अध्याय ३०१ वा ७१९

सूर्य म्हणे कर्णा, अनहित ऐसें। न करीं सर्वांचें अविवेकानें ॥ १ ॥
रक्षूनियां देह संपादावें यश। तरीच सार्थक होई जनीं ॥ २ ॥
सजीवाची कीर्ति होई सुखप्रद। सुपुष्पें प्रेतास सौख्य नसे ॥ ३ ॥
भक्तरक्षणार्थ कथितों मी ऐसें। रहस्य देवांचें गूढ असे ॥ ४ ॥
योग्यवेळीं तुज कळेल तें कर्णा। यास्तव वचना ऐकें माझ्या ॥ ५ ॥
नकार युक्तीनें देईं देवेंद्रासी। साधन धर्मासी मुख्य देह ॥ ६ ॥
करिसी पार्थाची स्पर्धा निरंतर। कुंडलें आधार संकटीं हीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे भानु परोपरी। कर्णासी निवारी, परी व्यर्थ ॥ ८ ॥

अध्याय ३०२ रा ७२०

कर्ण म्हणे भास्करासी। कृपा करीं तूं मजसी ॥ १ ॥
प्रेमें मातें करिसी बोध। विन्मुख न करवे द्विज ॥ २ ॥
प्रिय प्राणाहूनि सत्य। भय पार्थाचें न मज ॥ ३ ॥
द्रोणाचार्य, जामदग्न्य। गुरु माझे ध्यानीं आण ॥ ४ ॥
देईं अनुज्ञा मजसी। सूर्य वदे तें कर्णासी ॥ ५ ॥
शक्ति घेऊनि इंद्राची। कवच कुंडलें त्या अर्पी ॥ ६ ॥
मधुर शब्दांसी योजून। करीं तयातें प्रसन्न ॥ ७ ॥
तेणें पावसी विजय। कथूनि गेला ऐसें देव ॥ ८ ॥
प्रातःकाळीं करितां जप। कथिलें स्वप्न तें सूर्यास ॥ ९ ॥
घेतां अनुमती तयाची। वाट पाहे वासवाची ॥ १० ॥
वासुदेव म्हणे नित्य। कर्ण आराधी सूर्यास ॥ ११ ॥

अध्याय ३०३ रा ७२१

गूढ जें देवांचें कथिलें न कर्णा। तेंचि आतां जनां निवेदितों ॥ १ ॥
वैशंपायन तें कथी जनमेजया। ऐकूनियां तया तोष वाटे ॥ २ ॥
एकदां दुर्वास कुंतीभोजाप्रति। वदे शीघ्रकोपी महासिद्ध ॥ ३ ॥
भिक्षान्न सदनीं घ्यावें ऐसी इच्छा। परी क्रोध माझा साही कोण ॥

प्रतिबंध होतां यथेच्छ वर्तना । क्रोध माझ्या मना येई बहु ॥ ५ ॥
राव म्हणे मुने, कन्या यशस्विनी । तोषवील मनीं तुजलागीं ॥६॥
वासुदेव म्हणे भवितव्यासम । होतसे वर्तन मानवाचें ॥ ७ ॥

७२२

बोलूनि दुर्वासा कथिलें पृथेसी । वत्से, या मुनींची सेवा करीं ॥१॥
प्रथम अपत्य मज शूरसेनें । अर्पिलें प्रेमानें पालनार्थ ॥ २ ॥
तेचि तूं कल्याणि, वसुदेव भगिनी । सत्कुळीं जन्मूनि धन्य होई ॥
अल्पहि प्रतिबंध होतां दुष्टपणा । लक्षण कुलहीना सहज ऐसें ॥४॥
बालभावें स्त्रिया विकार पावती । प्रायः ऐसी रीति अपवाद तूं ॥५॥
निश्चयें सेवितां होईल कल्याण । कुलनाश जाण क्रुद्ध होतां ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कन्येसी नृपाळ । मुनींचें या बळ श्रेष्ठ म्हणे ॥ ७ ॥

अध्याय ३०४ था ७२३

राजेंद्रा, मुनींची परिचर्या प्रेमें । करीन संयमें वदली कन्या ॥ १ ॥
यथेच्छ वर्तनें वागतां तयासी । क्रोधालागीं संधि न देईन ॥ २ ॥
योग हा मजसी लाभला भाग्यानें । निःशंक मनानें राहीं सुखी ॥
सुकन्येचें वृत्त जाणतें मी ताता । करूं नको चिंता लवहीं मनीं ॥
ऐकूनि वचन मोद रायाप्रति । विनवी मुनींसी वंदूनियां ॥ ५ ॥
मुनिराया, कन्या वाढली सुखांत । क्षमा अपराधांस करीं तिच्या ॥
बाल, तपस्वी वा वृद्धांचे अपराध । ज्ञाते न मनांत घेती कदा ॥७॥
क्षमाशील सदा विप्र हे मुनींद्रा । जाणूनि स्वीकारा सत्कारासी ॥
अनुमति ऐसी घेऊनि मुनींची । मंदिर तयासी दिधलें एक ॥ ९ ॥
दक्षपणें करी राजकन्या सेवा । हर्ष वासुदेवा होई बहु ॥ १० ॥

अध्याय ३०५ वा ७२४

सेवा करीतसे कुंती । महाक्रोधी तपस्व्याची ॥ १ ॥
वेळीं अवेळीं तो येई । विविध अन्न मागूनि घेई ॥ २ ॥
सदा निर्भर्त्सी कन्येतें । साहूनि तें शांत चित्तें ॥ ३ ॥
भगिनी, पुत्र अथवा शिष्य । तैसी रमली सेवेंत ॥ ४
अंतीं तोषला सन्मुनि । वर म्हणे घे मागोनि ॥ ५ ॥

कुंती म्हणे कृतकृत्य । झालें, होतां तूं संतुष्ट ॥ ६ ॥
निरिच्छेसी देई मंत्र । जेणें देव होती भृत्य ॥ ७ ॥
पाचारिसील ज्या कोणा । देव देईल दर्शना ॥ ८ ॥
बोलूनियां ऐसी वाणी । मुनि अदृश्य त्या स्थानीं ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे नृप । चकित ऐकूनि तें वृत्त ॥ १० ॥

अध्याय ३०६ वा ७२५

पुढती एकदां निज मनीं कुंती । प्रचीति मंत्राची पाहूं म्हणे ॥ १॥
यदृच्छेनें तदा होई ऋतुमती । जातां सौधदेशीं सूर्या पाही ॥ २ ॥
दिव्यदृष्टिलाभें जाहलें दर्शन । करूनि आचमन जपिला मंत्र ॥ ३ ॥
येऊनि तें सूर्य म्हणे मी आधीन । हेतु निवेदन करीं मज ॥ ४ ॥
कुंती म्हणे देवा जाईं स्वस्थळासी । सहज तुजसी पाचारिलें ॥५॥
सूर्य म्हणे भद्रे, पुत्र वीर्यवान । अर्पूनि जाईन सौख्यें तुज ॥ ६ ॥
निरर्थक देवां पाचारित क्लेश । देईन मी शाप सकळांसी ७ ॥
सकलहि देव हांसतील पाहीं । कन्या म्हणे व्हावी, क्षमा मज ॥८॥
देहरक्षण हें शील ललनांचें । भास्करा, धर्मातें त्यागूं कैंवी ॥ ९ ॥
सूर्य म्हणे लाभ दुर्मिळ हा ऐसा । स्वीकार तूं माझा सुखें करीं ॥
जगामाजी भद्रे, होईल सुकीर्ति । वासुदेव कथी वृत्त प्रेमें ॥ ११ ॥

अध्याय ३०७ वा ७२६

शापील पित्यासी दुर्वासासमवेत । काय त्यांचा दोष मनीं म्हणे ॥
थोरांसवें केली सलगी अज्ञानें । धरिला देवानें कर दृढ ॥ २ ॥
काय करूं आतां अधर्म होईल । म्हणे मी स्वतंत्र नाहीं देवा ॥ ३ ॥
सूर्य म्हणे नाहीं तुजप्रति दोष । कौमार्यहि नष्ट नच होवो ॥ ४ ॥
अमृतमय ज्या कवच कुंडलें । पुत्र मजमुळें पावसील ॥ ५ ॥
घेऊनि, यापरी कन्येची अनुमती । योगबळें चित्तीं प्रवेशला ॥ ६ ॥
कौमार्यरक्षण करूनियां गेला । विस्मय वाटला वासुदेवा ॥ ७ ॥

अध्याय ३०८ वा ७२७

माघमासीं शुक्ल प्रतिपदा तिथि । प्रसवली कुंती बालकासी ॥ १ ॥

आप्त स्वकीयांसी आज्ञात तें वृत्त । धात्री कन्यकेस विदित एका ॥
सहज कुंडलें कवच बाळासी । का‌ष्ठ पेटिकेसी ठेवी कुंती ॥ ३ ॥
संरक्षणालागीं लिप्त केलें मेण । लाऊनि झांकण सोडी जळीं ॥ ४ ॥
पुत्रस्नेहें कन्या जाहली व्याकुळ । देव रक्षितील म्हणे यासी ॥ ५ ॥
धन्य म्हणे याचें करी जी पालन । मधुर भाषण ऐकेल जी ॥ ६ ॥
स्वप्नांतही तिज पुत्रलाभ ऐसा । होईल ही आशा असेल कीं ॥ ७ ॥
'अश्व' नदींतूनि यमुनेंत जाई । पुढती प्रवाहीं गंगेचिया ॥ ८ ॥
चंपा नगरीच्या समीप पेटिका । प्रदेशीं सूतांच्या प्राप्त होई ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे दैवाचें कवच । संरक्षी जीवास सर्वकाळ ॥ १० ॥

अध्याय ३०९ वा ७२८

धृतराष्ट्र सखा सूत 'अधिरथ' । गंगेच्या तीरास प्राप्त झाला ॥ १ ॥
रूपवती भार्या 'राधा' नामें त्याची । पाही पेटिकेसी जळामाजी ॥
कुंकुमाचे हस्त दूर्वांचें कंकण । ऐसें संरक्षण दिसलें तिज ॥ ३ ॥
यदृच्छेनें येई पेटिका तीरासी । काढूनि पतीसी दावी राधा ॥ ४ ॥
उघाडितां दिसे बालक तयांसी । स्वरूप जगासी दिपवी त्याचें ॥५॥
सूत म्हणे आम्हां पुत्रहीनाप्रति । देवपुत्रप्राप्ति दैवें झाली ॥ ६ ॥
सहज कवच-कुंडलांनीं युक्त । बालक राधेस मोद देई ॥ ७ ॥
'वसुषेण' नाम ठेवलें तयासी । वृषही तयासी म्हणती कोणी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे हेरद्वारा वृत्त । कळलें कुंतीस बालकाचें ॥ ९ ॥

७२९

योग्य वेळीं तया हस्तिनापुरासी । अधिरथ योजी विद्येस्तव ॥ १ ॥
द्रोण, कृप, तैंवी जामदग्न्य राम । शस्त्रास्त्रीं निपुण करिती तया ॥
दुर्योधनासवें सख्यत्व पावला । धनुर्धर झाला ख्यात जनीं ॥ ३ ॥
धार्तराष्ट्रासवें पांडवांचें वैर । स्पर्धा परस्पर पार्थ-कर्णा ॥ ४ ॥
गुह्य हें देवांचें, अभेद्य कवचें । अवध्यता यातें, दुःख धर्मा ॥ ५ ॥
जलस्थित कर्ण, आराधी, सूर्यासी । तोषवी विप्रांसी तया वेळीं ॥
इंद्रही एकदां विप्रवेषें येई । म्हणे भिक्षांदेही कर्णालागीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे स्वागत विप्राचें । करूनि तयातें बोले कर्ण ॥ ८ ॥

अध्याय ३१० वा ७३०

स्वागत करूनि म्हणे माग कांहीं । येरु म्हणे देई कुंडलांसी ॥१॥
कर्ण म्हणे मागें गृह, धन, राज्य । करूं नको मज वध्य ऐसा ॥ २ ॥
ऐकूनिही विप्र सोडीना आग्रह । कर्ण म्हणे होवो लाभ मज ॥ ३ ॥
इंद्र म्हणे वज्राविणें मागें कांहीं । कर्ण म्हणे देई शक्ति मज ॥ ४ ॥
चिंतूनियां इंद्र बोलला कर्णासी । तव हस्तें शक्ति वाधिल एका ॥
कर्ण म्हणे छेद करितां कवचाचा । देवा, विद्रूपता येऊं नये ॥ ६ ॥
प्रसंगावांचूनि सोडितां हे शक्ति । विनाश पावसी इंद्र म्हणे ॥ ७ ॥.
शक्तिलाभें कर्ण, छेदी स्वकवच । कापितां सर्वांग, पुष्पवृष्टि ॥ ८ ॥
रुधिरार्द्र तेणें अर्पिलें इंद्रासी । कुंडलें कर्णींचीं अर्पियेलीं ॥ ९ ॥
कर्णविच्छेदनें, कर्ण नामें ख्यात । आनंद देवांस कवचनाशें ॥ १० ॥
धार्तराष्ट्र तदा दर्पहीन झाले । पांडव तोषले मनामाजी ॥ ११ ॥
वासुदेव म्हणे काम्यक वनांत । पांडवांनीं वृत्त श्रवण केलें ॥ १२ ॥

---

## आरणेयपर्व २२

अध्याय ३११ वा ७३१

हरण पांचाळीचें होतां । क्लेश पांडवांच्या चित्ता ॥ १ ॥
वन काम्यक सोडूनि । वास करिती द्वैतवनीं ॥ २ ॥
एक तपस्वी एकदां । वृक्षावरी अरणी-मंथा ॥ ३ ॥
ठेऊनियां, जातां कार्या । मृग पातला त्या ठाया ॥ ४ ॥
अंग घांशितां वृक्षासी । अरणी अडके शृंगामाजी ॥ ५ ॥
धावरूनि धांवे मृग । विप्र होई चिंताव्यग्र ॥ ६ ॥
कथी पांडवां जाऊन । म्हणे अग्निहोत्र छिन्न ॥ ७ ॥
न घडे मंथन अग्नीचें । करा रक्षण धर्माचें ॥ ८ ॥
ऐकतांचि पांडव वीर । जाती सज्जचापशर ॥ ९ ॥
कष्टें शोधितां मृगासी । होई गुप्त क्षणामाजी ॥ १० ॥
वटवृक्षातळीं खिन्न । बैसतां ते वीर दीन ॥ ११ ॥

नकुळ म्हणे धर्मलोप । नाहीं घडला कुळांत ॥ १२ ॥
वासुदेव म्हणे कैसें । म्हणती पावलों दोषातें ॥ १३ ॥

अध्याय ३१२ वा ७३२

धर्म म्हणे वत्सा, अमर्याद जनीं । आपत्ती या मानीं निर्निमित्त ॥१॥
प्रारब्धकर्माचें पाप-पुण्य फल । भीमासी सकळ द्यूत स्मरे ॥ २ ॥
पार्थ म्हणे कर्णवचन साहिलें । तेणेंचि हे आले क्लेश माथां ॥ ३ ॥
सहदेव म्हणे शकुनीचा घात । करितां अनर्थ टळता सुखें ॥ ४ ॥
तृषार्त तें धर्म बोले नकुळासी । शोधीं उदकासी त्वरित यत्नें ॥५॥
वृक्षारूढ भ्राता म्हणे धर्माप्रति । जल सन्निधाचि निःसंशय ॥ ६ ॥
धर्म म्हणे वत्सा, सत्वरी जावोनि । तूणीर भरूनि उदक आणीं ॥७॥
ऐकूनि नकुळ जळाच्या सान्निध । गेला तोंचि शब्द कानीं येई ॥८॥
'उत्तर न देतां प्राशूं नको जळ । साहसें होईल घात तुझा' ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे तृषार्त तो, जल । प्राशितां तत्काळ पडला खालीं ॥

७३३

ऐसा कांहीं वेळ लोटतां तयासी । धर्म सहदेवासी धाडीतसे ॥१॥
पाहूनि नकुळा, धांवला जळांत । पुनरपि शब्द तेचि जळीं ॥ २ ॥
परी तृषार्त तो स्पर्शितां जळास । पडला मूर्छित होऊनियां ॥ ३॥
पुढती येऊनि पार्थ सोडी शर । परी भूमीवर पडला अंतीं ॥ ४ ॥
तैसेंचि पतन भीमाचें त्या स्थानीं । मार्ग प्रतीक्षूनि येई धर्म ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अपूर्व तें वन । वृक्षलताकीर्ण शोभे बहु ॥ ६ ॥

अध्याय ३१३ वा ७३४

सरोवराच्या तीरासी । धर्म पाही मृत वीरांसी ॥ १ ॥
थक्क होई विस्मयानें । गुण आठवी दुःखानें ॥ २ ॥
अंतीं होई घामाघूम । करी स्वमनीं चिंतन ॥ ३ ॥
शस्त्रप्रहार न दिसे । पदचिन्हहि न तेथें ॥ ४ ॥
विषमग्न नसे जल । म्हणे पाहूनि निर्मल ॥ ५ ॥
कोणी महाभूत येथें । असावेंसें तया वाटे ॥ ६ ॥

चिंतूनियां मनीं ऐसें। गेला जलप्राशनातें ॥ ७ ॥
तोंचि कर्णीं येई शब्द। मत्स्यभक्षक मी बक ॥ ८ ॥
उत्तर न देतां जल। तूंही सेवितां मरसील ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे धर्म। बदला कोण तूं बलवान ॥ १० ॥

७३५

पक्षी म्हणे असो कल्याण, मी यक्ष। त्यागूनि भीतीस दूर जाई ॥१॥
निवारिलें बहु, परी नायकितां। दाविला हा पंथा बांधवांसी ॥ २ ॥
ऐकूनि हे वाणी मागें होई राजा। विशाल देहाचा पाही यक्ष ॥३॥
बदला धर्मासी, उत्तरें प्रश्नाचीं। देऊनियां प्राशीं उदक सुखें ॥४॥
धर्म म्हणे यक्षा, उत्तरें, होऊन-। अहंभावशून्य, देईन मी ॥ ५ ॥
यक्ष म्हणे कोण आदित्या प्रेरक-। दूत? कैंवी अस्त, प्रतिष्ठा तैं? ॥
ब्रह्म प्रेरक त्या, दूत देव, अस्ता-। धर्म नेई, तया सत्याधार ॥ ७ ॥
श्रोत्रियत्व कैसें, महत्वही कैंवी। द्वितीयत्व[1] तैंवी बुद्धिमत्ता? ॥
श्रुत, तप, धृति[2], वृद्धसेवा जाण। यक्षा म्हणे धर्म साधनें हीं ॥९॥
वासुदेव म्हणे प्रश्न हे यक्षाचे। संदेह चित्ताचे करिती दूर ॥ १० ॥

७३६

देवत्व विप्रांचें, सद्धर्म तो कैंवी। असत्क्रिया तैंवी मानुषभाव? ॥१॥
स्वाध्याय देवत्व, तप तो सद्धर्म। निंदा असत्कर्म, मरण अंत्य ॥२॥
देवत्व क्षत्रियां धनुर्वेदज्ञान। यज्ञ, यथाक्रम[3] त्याग, भय ॥ ३ ॥
साम, यजु कोण सांगावे यज्ञींचे। स्वीकारी यज्ञातें नुल्लंघी[4] तैं? ॥
प्राणं[5] तोचि साम यजु तेंचि मन[6]। ऋचा स्वीकारून नुल्लंघवी ॥५॥
आवप[7], निवप[8], प्रतिष्ठा[9], संतति। श्रेष्ठ फळें त्यांचीं सांगें धर्मा ॥ ६ ॥

१ अविद्याकृत जीवाहून वेगळें असें जें शुद्ध आत्मस्वरूप तें द्वितीयत्व. त्याचा लाभ कशानें होतो असा प्रश्न. २ योगयुक्त चित्तानें केलेलें निदिध्यासन. यानें द्वितीयत्व प्राप्त होतें. ३ विप्रांप्रमाणेंच क्षत्रियांचेंही देवत्व आदि कोणतें, अशा प्रश्नांना हीं यथाक्रम उत्तरें जाणावीं. ४ यज्ञाचा स्वीकार कोण करतें आणि यज्ञ कोणाचें उल्लंघन करीत नाहीं असे प्रश्न आहेत. त्याला ऋचा यज्ञाचा स्वीकार करितें व ऋचेचें म्हणजे वेद वाक्याचें यज्ञ उल्लंघन करीत नाहीं; अशीं उत्तरें दिलीं आहेत. ५ निरुद्ध प्राण. ६ एकाग्र मन. ७ देवतर्पण. ८ पितृतर्पण. ९ श्रेष्ठत्व.

वृष्टि, उद्यानादि धेनु तें सुपुत्र । धर्म म्हणे श्रेष्ठ फळें त्यांचीं ॥७॥
बुद्धिवंत, पूज्य, उपभोक्ता मान्य । जिवंतही कोण मृतासम ? ॥८॥
देवता-अतिथी-भृत्य तें आपणा । तर्पी न पितरां तोचि मृत ॥९॥
वासुदेव म्हणे यक्षाचे हे प्रश्न । ऐकूनि सज्जन तृप्ति पावे ॥ १० ॥

७३७

भूमीहूनि गुरु, नभाहूनि उंच । वायूहूनि शीघ्र, तृणात् बहु ॥ १ ॥
काय कथीं धर्मा, ? धर्म म्हणे माता । पिता, मन, चिंता उत्तरें हीं ॥
उघड्या नेत्रें निद्रा, चळेना जन्मूनि । हृदयशून्य जनीं, वेगें वाढे ॥
ऐसे कोण सांगें मजलागीं धर्मा ? । मत्स्य, अंड, अश्मा, नदी, म्हणे
पांथस्था, गृहस्था, रुग्णा, मृतालागीं । मित्र कोण जगीं सांगें धर्मा ॥
सार्थ, भार्या, भिषग् , दान हीं उत्तरें । दिधलीं युधिष्ठिरें यक्षालागीं
कोण सर्वातिथि, सनातन धर्म । अमृत, व्यापून जगा कोण ? ॥७॥
अग्नि तें गोदुग्ध हवन, दुग्धचि- । अमृत, विश्वासी व्यापी वायु ॥
वासुदेव म्हणे यक्ष प्रश्न ऐसे । बोध मानवातें करिती बहु ॥ ९ ॥

७३८

एकाकी विचरे कोण ऐसा जगीं । जन्मे जो जन्मूनि कोण सांगें ॥
हिमाचें भषज, महद्दावपन । काय तें कथन करीं धर्मा ॥ २ ॥
एकाकी तो सूर्य, जन्मे पुनश्चंद्र । हिमासी औषध अग्नि जाणा ॥
भूमिरावपन ऐसें कथी धर्म । एकचि जें धर्म्य काय म्हणे ॥ ४ ॥
यश, स्वर्ग, सुख, सांगें सर्वश्रेष्ठ ? । दाक्ष, दान, सत्य, शील जाणें ॥
सांगें आत्मा कोण, दैवकृत सखा । काय उपजीविका, परायण ? ॥
पुत्र तोचि आत्मा, भार्या सखा जाण, । पर्जन्यचि, दान अंत्योत्तरें ॥
धन्य, धन, लाभ, सुख, तें उत्तम । सांगें धर्मा कोण मजलागीं ? ॥
दाक्ष, श्रुत, तेंवी आरोग्य, तें तुष्टि । धर्म यक्षाप्रति सांगतसे ॥९॥
श्रेष्ठ सदाफल-धर्म, सांगें मज । संयमितां काय शोक टळे ? ॥ १० ॥
स्थिर सख्य कोठें ? आनृशंस्य, त्रयी । मन, सुजन होई स्थिर मित्र
वासुदेव म्हणे यक्षप्रश्नें ज्ञान । सुलभ हें जाण जनां होई ॥ १२ ॥

१ व्यापारी समूह. २ श्रेष्ठ उत्पत्तिस्थान. ३ आश्रय. ४ दया. ५ ॐकार.

७३९

प्रिय, शोकहीन, संपन्न ते सुखी। त्यागूनि कशासी होती जन? ॥१॥
मान, क्रोध, काम, लोभ, त्याग, हेंचि । उत्तर प्रश्नासी देई धर्म ॥
विप्र, नट, भृत्य नृपाळासी दान। किमर्थ कथन करीं मज? ॥ ३ ॥
धर्म, यश, तेंवी भरण, भयार्थ । श्रेष्ठ तें विप्रास दान देतां ॥४॥
आवरण काय, प्रकाशे न कैंवी। मित्रत्याग कैंवी स्वर्गहानि? ॥५॥
अज्ञान, अंधारें, लोभें, संगें, ऐसीं । उत्तरें हीं साचीं यक्षप्रश्ना ॥६॥
पुरुष, राष्ट्र, श्राद्ध, यज्ञ कैंवी मृत ?। दरिद्रि, अराजक, अश्रोत्रिय॥
दक्षिणाविहीन यज्ञ, मृत जाणा । यक्ष करी प्रश्ना पुढती ऐका ॥ ८॥
उपदेष्टा, जल, अन्न, विष काय। कथीं श्राद्धकाळ, उदक प्राशीं ॥
संत, नभ, शब्द, काम, विप्र, मानीं । चिंती धर्मवाणी वासुदेव ॥

७४०

तप, दम, क्षमा, कथावी ते लज्जा । धर्माचार यक्षा तप मानीं ॥ १ ॥
मनाचें दमन, द्वंद्वसहिष्णुता। नाचरी दुष्कृत्या लज्जा तेंचि ॥ २ ॥
ज्ञान, शम, दया, आर्जव तें कैसें? । तत्वार्थ बोध तें ज्ञान जगीं ॥३॥
चित्त प्रशांतता, भूतहित-इच्छा। आर्जव समचित्तता जाणं यक्षा
दुर्जय तो शत्रु, व्याधि अनंतक। साधु असाधूंस कथीं धर्मा ॥५॥
क्रोध, लोभ तेंवी भूताहितरत। असाधु निर्दय तोचि यक्षा ॥ ६ ॥
मोह, मान, तेंवी आलस्य तें शोक । करावा विदित यक्ष म्हणे ॥
धर्ममूढता, तें आत्माभिमानिता । धर्मनिष्क्रियता अज्ञानचि ॥८॥
स्थैर्य, धैर्य, स्नान, दान, तें कथावें । धर्मनिष्ठ व्हावें तेंचि स्थैर्य ॥
इंद्रियनिग्रह, मनोमलत्याग । दान तेंच चांग भूतरक्षा ॥ १० ॥
पंडित, नास्तिक, मूर्ख, काम, हेवा। मजसी कथावा युधिष्ठिरा ॥
धर्मज्ञ, नास्तिक तोचि मूर्ख जाणा । काम ते वासना, हृत्तापहि ॥
वासुदेव म्हणे ऐका यक्षप्रश्न। चिंतूनियां धन्य व्हाल जगीं ॥१३॥

७४१

अहंकार, दंभ, दैव, तें पैशुन्य। करावें कथन यक्ष म्हणे ॥ १॥

महद्ज्ञान तें लौकिकार्थ धर्म । दानफल जाण, परनिंदा ॥ २ ॥
धर्म-अर्थ-काम-विरोध आपैसा । होईल नाहींसा कैंवी राजा ॥ ३ ॥
धर्मशील भार्या लाभतां हें कार्य । होतसे सुकर धर्म म्हणे ॥ ४ ॥
यक्ष म्हणे कैंवी अक्षय नरक । कथावें त्वरित धर्मराजा ॥ ५ ॥
धर्म म्हणे यक्षा, पाचारूनि द्विजा । अवमान करितां नरकप्राप्ति ॥
वेद, धर्म, द्विज, देव, पितरांसी । मिथ्या मानी त्यासी नरकप्राप्ति
संपन्न न भोगी, याचकां न अर्पी । अक्षय ऐशांसी नरकप्राप्ति ॥
धर्मा, कुल, वृत्त, स्वाध्याय वा श्रुत । यामाजी विप्रत्व कोणे गुणें
धर्म म्हणे वृत्त विप्रत्वाकारण । करावें रक्षण नित्य त्याचें ॥ १० ॥
वासुदेव म्हणे भांडवल विप्रा । वृत्ताचि सर्वदा ध्यानीं असो ॥ ११ ॥

७४२

सदाचार जया विप्रा । तोचि चिरंजीव खरा ॥ १ ॥
वृत्तवंत तो न क्षीण । नाश पावे वृत्तहीन ॥ २ ॥
पठक, पाटक, चिंतक । केवळ ते व्यसनी मूर्ख ॥ ३ ॥
क्रियावंत तो पंडित । वाणी धर्माची हे स्पष्ट ॥ ४ ॥
क्रिया भ्रष्ट जो वेदज्ञ । शूद्राहूनि जाणा हीन ॥ ५ ॥
अल्पज्ञहि क्रियावंत । दान्त, विप्र तोचि सत्य ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे यत्नें । संपादावीं बोधरत्नें ॥ ७ ॥

७४३

प्रियभाषी, तेंवी विवेकी, बहुमित्र, । धार्मिक, लाभास जोडी कोण्या?
प्रियत्व, उत्कर्ष, सुख, तें सद्गति, । लाभे तयाप्रति धर्म म्हणे ॥ २ ॥
प्रमोद, आश्चर्य, मार्ग, वार्ता कथीं । सजीव तें होतीं बंधू धर्मा ॥ ३ ॥
पंच-षष्ठ दिनीं लाभो वा भोजन- । अप्रवासी, ऋण नसतां मोद ॥ ४ ॥
प्रतिदिनीं मृत्यु पाहोनि जनांचा । मानी अमरता आश्चर्य हें ॥ ५ ॥
तर्क तो अस्थिर श्रुतीही विभिन्न । ऋषींही प्रमाण एक नसे ॥ ६ ॥
धर्मतत्वगूढ जाणूनियां ज्ञाता- । चाले, तो सुपंथा जगामाजी ॥ ७ ॥
संसारकटाहीं रात्रि-दिवेंधन । सूर्य तोचि जाण अग्नि, यक्षा ॥ ८ ॥
काळ, मास, ऋतु, घेऊनियां दर्वी । ढवळूनि शिजवी भूतांलागीं ॥

वार्ता हे विवेकें नित्य येवो कानीं। वासुदेव मनीं चिंतीतसे ॥१०॥

७४४

यक्ष म्हणे धर्मा, उत्तरें प्रश्नाचीं। ऐकूनि चित्तासी मोद वाटे ॥१॥
सजीव पुरुष, तेंवी पूर्ण काम। धर्मा, सांगें कोण मजसी आतां ॥२॥
पुण्यकर्मे ज्याच्या दुमदुमे जग। तोंवरी जीवित पुरुषाप्रति ॥३॥
प्रिया-प्रिय तैसें सुख-दुःख तेंवी। भूत-भविष्याहि तुल्य जया ॥ ४ ॥
यक्षश्रेष्ठा, जाणें पूर्णकाम त्यासी,। उठवीं एकासी म्हणे यक्ष ॥५॥
ऐकूनि ते वाणी यक्षाप्रति धर्म। म्हणे बंधु मम नकुळ उठो ॥६॥
वासुदेव म्हणे यक्ष विस्मयानें। साशंकित मनें प्रश्न करी ॥ ७ ॥

७४५

यक्ष म्हणे धर्मा, काय हें बोलसी। भीम अर्जुनासी सोडूनियां ॥१॥
प्रिय तुज भीम, आधार अर्जुन। नकुळ सापत्न्य बंधु तुझा ॥२॥
ऐसें असूनियां त्यागूनि भीमासी। इच्छिसी नकुलासी कासया तूं ॥
धर्म म्हणे यक्षा, त्यागूनि धर्मासी। सौख्य न कोणासी प्राप्त होई ॥
धर्माच्या विनाशें आपुलाही नाश। रक्षी आपणांस रक्षीतां त्या ॥
आनृशंस्य जनीं श्रेष्ठ धर्म मज। यक्षा नकुळास उठवीं आतां ॥६॥
कुंती माद्री दोघी नृपाळाच्या कांता। असोत सपुत्रा हेचि इच्छा ॥
कुंतीसम माता मानितों माद्रीसी। उठवीं नकुळासी धर्म म्हणे ॥८॥
यक्ष म्हणे धर्म-अर्थकामाहूनि। समत्वाचि जनीं श्रेष्ठ तुज ॥ ९ ॥
यास्तव सकळ भ्रात्यां येवो प्राण। आनंदित मन होई माझें ॥१०
वासुदेव म्हणे महाज्ञाता धर्म। करी परिपूर्ण यक्षइच्छा ॥ ११ ॥

अध्याय ३१४ वा

७४६

इतुक्यांत पांडव वीर। उठूनि बैसले समोर ॥ १ ॥
धर्म म्हणे सुहृद्‌भाव। धरिसी कोण रे तूं देव ॥ २ ॥
पिता वाटसी या स्थानीं। यक्ष म्हणे यमधर्म मी ॥३॥
यश, सत्य, शौच, दम,। आर्जव, ऱ्ही, तप, दान ॥ ४ ॥
ब्रह्मचर्य, धार्मिकता। देह समजें धर्मा माझा ॥ ५ ॥
शांति, अहिंसा, समता। अमात्सर्य, तेंवी तपा ॥ ६ ॥

धर्मद्वारें ऐसें मानीं । पुण्यवंत तूं या जनीं ॥ ७ ॥
शम, दम, उपरति । चित्तैकाग्र्य तितिक्षेसी ॥ ८ ॥
पंच साधन संयुक्त । पट्पदीही[1] तुज प्राप्त ॥ ९ ॥
क्षुधा-तृषा, शोक-मोह, । जरा-मृत्यु, हे पड्भाव ॥ १० ॥
वासुदेव म्हणे यक्ष । वदे धर्मा लाभो मोक्ष ॥ ११ ॥

७४७

यक्ष म्हणे धर्मा, समत्व पाहोनि । तुष्ट झालों मनीं वर मागें ॥ १ ॥
धर्म म्हणे दोष न लागो विप्रासी । यक्ष म्हणे मीचि मृग झालों ॥
अन्य वर घेईं मागूनियां आतां । धर्म म्हणे ताता देईं एक ॥ ३ ॥
अज्ञातवासाचा काल होई प्राप्त । न लागोचि शोध कोणालागीं ॥
यमधर्म म्हणे विराटपुरासी । इच्छित वेषेंसी सुखें वसा ॥ ५ ॥
अरणी या देईं विप्रालागीं आतां । विदुरहि माझा अंश बाळा ॥ ६ ॥
अन्य कांहीं वर मागें मजप्रति । सदाचि अतृप्ति वर देतां ॥ ७ ॥
धर्म म्हणे लोभ-मोह-क्रोध-जेता । होईन मी ऐसा वर देईं ॥ ८ ॥
सत्य, तप, दाननिरत असावें । देवा, हेंचि द्यावें मजलागीं ॥ ९ ॥
तथास्तु म्हणोनि गुप्त धर्मराज । अरणी विप्रास वीर देती ॥ १० ॥
वासुदेव म्हणे ऐसे यक्षप्रश्न । करावें चिंतन नित्य त्यांचें ॥ ११ ॥

७४८

जनमेजयाप्रति बोलले मुनींद्र । आख्यान हें भद्र सर्वकाल ॥ १ ॥
भीमादि भ्रात्यांचें सुखद उत्थान । बांधवमीलन हर्षदायी ॥ २ ॥
धर्म, धर्मराज पिता-पुत्रभेट । प्रश्नोत्तर रूप बोधामृत ॥ ३ ॥
कीर्तिवर्धक हें पावन आख्यान । करितां पठण पुण्य लाभे ॥ ४ ॥
मनोनिग्रही जो जितेंद्रिय कोणी । पठण-श्रवणीं निष्ठा धरी ॥ ५ ॥
शतायु तो होई पुत्र-पौत्रयुक्त । सत्कर्म निरत सर्वकाल ॥ ६ ॥
सुहृद्द्रोह, परद्रव्य, परदारा । ऐशा निंद्याचारा न करील तो ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे आरण्येयपर्व । गातां हें अपूर्व यशलाभ ॥ ८ ॥

---

१ शमदमादि हीं पंचसाधनें, क्षुधा-तृषा आदि षड्भावांवर विजय मिळवून देतात. हे षड्भाव म्हणजेच षट्पदी.

अध्याय ३१५ वा

७४९

विद्वज्जन परिवेष्टित । वीर चिंतूनि मनांत ॥१॥
वृत्त अज्ञातवासाचें । कथिती सकळ विप्रांतें ॥ २ ॥
दुर्योधन, शकुनि, कर्ण । वैर करिताती दारुण ॥ ३ ॥
शोधास्तव आमुच्या जनां । छळूनि देतील यातना ॥ ४ ॥
जातों यास्तव निघोनि । प्रेमें अनुज्ञा घेवोनि ॥ ५ ॥
पुनः विप्रांलागीं आम्हीं । भेटूं काय ? सांगा स्वामी ॥६॥
ऐसें उद्गारूनि धर्म । करी शोक तें दारुण ॥ ७ ॥
विप्र सांवरिती तया । म्हणती भिऊं नको राया ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे धौम्य । करी इतिहास कथन ॥ ९ ॥

७५०

मुनि म्हणे राया, सत्यनिष्ठा, दान्ता । विपत्कालीं ज्ञाता मोह पावे ॥
देवहि यापरी येतां संकटांत । शत्रुनिग्रहार्थ धरिती वेष ॥ २ ॥
पर्वतशिखरीं राहिला देवेंद्र । वामन, उपेंद्र वळीस्तव ॥ ३ ॥
जळांत निवास केला अनलानें । वज्रांत हरीनें वास केला ॥ ४ ॥
अंकामाजी वास और्व महर्षीचा । जाणें आदित्याचा गुप्तभाव ॥५॥
मानववेषानें वधिलें रावणा । तेंवी तूंहि धर्मा, कार्य साधीं ॥ ६ ॥
कपटाचा मार्ग न रुचे धर्मासी । भीम बोले त्यासी नम्रभावें ॥७॥
धर्मा आजवरी राहिलों आज्ञेंत । तैसेचि सेवक पुढती आम्हीं ॥८॥
आशीर्वाद देती मनोभावें विप्र । कोशभरी शूर, दूर जाती ॥ ९ ॥
चिंतूनि अज्ञातवास आरंभिला । जाणती नीतीला सकळ भ्राते ॥
विचारार्थ सर्व एकत्र बैसती । वासुदेव पदीं वंदी तयां ॥११॥

७५१

मुनिलागीं म्हणे सौति । श्रोता पावे पापमुक्ति ॥ १ ॥
अधना धनलाभ घडे । अपुत्रासी पुत्र जोडे ॥ २ ॥
कोणी नर अथवा नारी । शुचिर्भूत जे अंतरीं ॥ ३ ॥
त्यांच्या कामना सकळ । श्रवणें याच्या पुरतील ॥ ४ ॥
विप्रां द्यावें पायसान्न । वस्त्र, अलंकार, धन ॥ ५ ॥

तेणें परमात्मा तोषेल । दानें दाता उद्धरेल ॥ ६ ॥
वक्त्यालागीं कांस्यपात्र । कपिला द्यावी सालंकार ॥ ७ ॥
तेणें पांडव तोषती । मनोरथ पूर्ण होती ॥ ८ ॥
ग्रंथाभ्यासी जो भाविक । पावे सर्वदा उत्कर्ष ॥ ९ ॥
कृष्णार्पण वनपर्व । भावें करी वासुदेव ॥ १० ॥

## वनपर्व समाप्त

या वनपर्वाची एकंदर अभंग संख्या ७५१

पुढील विराटपर्वाचा आद्य श्लोक—

जनमेजय उवाच—

कथं विराटनगरे मम पूर्वपितामहाः ॥
अज्ञातवासमुषिता दुर्योधनभयार्दिताः ॥ १ ॥

-ॐ नमो भगवते वासुदेवाय-

# अभंग-भारत

( महाभारताचा अभंगमय सुबोध भावार्थ )

## ४ विराटपर्व

### प्रवेशपर्व १

नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ॥
देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत् ॥ १ ॥

अध्याय १ ला                    १

जनमेजय म्हणे विराटपुरीतें । पूर्वज ते माझे वसले कैसे ॥ १ ॥
दुर्योधनभयें व्याकुळ होवोनि । वेष पालटूनि वर्ष एक ॥ २ ॥
महासाध्वी सती कृष्णभक्तिरत । होऊनि अज्ञात वसली कैसी ॥
मुनि म्हणे धर्म, वदला एकांतीं । द्वादशाब्दपूर्ति झाली कष्टें ॥४॥
कष्टतर आतां पातलासे काळ । पार्था, कवण स्थळ सुखद सांगें ॥
पार्थ वदे चेदि, पांचाळ तो मत्स्य । शूरसेन, मल्ल, सुराष्ट्रादि ॥६॥
कथिसी त्या स्थळीं राहूं आनंदानें । घालवूं सुखानें संवत्सर ॥७॥
धर्म म्हणे देवें कथिलें जें स्थान । विराट बलवान राव तेथें ॥ ८ ॥
आम्हांवरी प्रेम तयाचें बहुत । निर्भय सदनांत राहूं त्याच्या ॥ ९ ॥
इच्छेसम कर्म आपुलें योजूनि । कथा मजलागूनि बांधव हो ॥१०॥
वासुदेव म्हणे धर्मवचनातें । ऐकूनि तयातें वदला पार्थ ॥ ११ ॥

२

दयाळु, धार्मिका, उदारा तूं कैसा। वागसील चिंता मज वाटे ॥१॥
नृपा, तुज कैसे साहतील क्लेश। कैसा आपत्तीस निवारिसी ॥ २ ॥
सभासद पार्था, होईन नृपाचा। घेऊनि विप्राचा वेष सुखें ॥ ३ ॥
कथी धर्मराज, कंक माझें नाम। छद्मद्विज यम ऐसा अर्थ ॥ ४ ॥
अनृताचा दोष टळेल या रीति। 'आत्मावै' ही श्रुति विख्यातचि ॥५॥
रत्नखचित ते घेऊनियां अक्ष। खेळेन मी द्यूत कौशल्यानें ॥ ६ ॥
अमात्यां समवेत तोषवीन नृपा। अज्ञात मी लोकां ऐशा मार्गे ॥७॥
प्राणप्रिय सखा धर्माचा मी ऐसें। कथीन नृपातें पुशितां मज ॥८॥
वृकोदरा सांगें, कार्य तुझें आतां। वासुदेव कथा कथितो रम्य ॥९॥

अध्याय २ रा

३

भीम म्हणे राया, नामें 'पौरोगव'। होईन वल्लव सूपकार ॥ १ ॥
पाकक्रियाज्ञानदानें इतरांसी। संतुष्ट मानसीं करीन मी ॥ २ ॥
संपादीन प्रेम विराट रायाचें। जिंकीन मल्लांतें युद्धामाजी ॥३॥
गज, वृषभांचें करीन दमन। वदेल हें काम धर्माग्रहीं ॥ ४ ॥
गुप्तपणें ऐसा राहीन सुखानें। निश्चिंत मनानें राहें धर्मा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वृकोदरवाणी। हर्षित ऐकूनि धर्मराज ॥ ६ ॥

४

कैसा हा राहील पार्थ धनुर्धारी। प्रेमानें विचारी धर्मराज ॥१॥
तपनांत सूर्य, द्विजांमाजी विप्र। शस्त्रांमाजी वज्र श्रेष्ठ जेंवी ॥ २ ॥
आप्तांमाजी पुत्र, सुहृदांत भार्या। वीरांमाजी आर्या स्थान तैसें ॥
रुद्र कीं बारावा आदित्य तेरावा। देवांत जाणावा इंद्रचि हा ॥४॥
सिंह, गरुड कीं हिमालय श्रेष्ठ। तैसा वीर पार्थ श्रेष्ठ असे ॥ ५ ॥
विराटसदनीं राहील हा केंवी। पार्थ म्हणे व्हावी क्लीबता ते ॥६॥
कंकणें लेऊनि बाहू आच्छादीन। 'बृहन्नला' नाम सार्थ माझें ॥७॥
नृत्य-गीत, वाद्य शिकवीन स्त्रियांसी। म्हणवीन कृष्णेची परिचारिका
पार्थ म्हणे राजा, राहीन मी ऐसा। वासुदेव चित्ता मोद वाटे ॥९॥

अध्याय ३ रा ५

नकुळालागीं म्हणे आर्य । काय करिसील तू कार्य ॥ १ ॥
तुम्हांवरी मजमुळें । संकट हें ओढवलें ॥ २ ॥
नकुळ म्हणे पूज्य भ्रात्या । असें अश्वशास्त्रवेत्ता ॥ ३ ॥
जाणितों मी आयुर्वेद । नाम सांगेन 'ग्रंथिक' ॥ ४ ॥
अश्वाध्यक्ष मी धर्माचा । कथिन मजसी पुशितां ॥ ५ ॥
म्हणे सहदेव धर्मातें । 'तंतिपाळ' नाम मातें ॥ ६ ॥
होईन मी गोसेवक । जाणें तयांचें सर्वस्व ॥ ७ ॥
मज आवडे तें कार्य । लवहि चिंता न करो आर्य ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे धर्म । ऐका वदे होऊनि खिन्न ॥ ९ ॥

६

धर्म म्हणे कांता कुलशीलवती । कैसा या संकटीं मार्ग काढी ॥१॥
जन्मापासूनि जी सुखांत वाढली । करील या वेळीं काय कृष्णा ॥
पारतंत्र्यामाजी राहील ते कैसी । चिंता हे मजसी वाटे बहु ॥ ३ ॥
सती म्हणे देवा, 'सैरंध्री' भुजिष्या । सदनीं राणीच्या राहीन मीं
वेणी-फणी नित्य करीन तियेची । हर्ष सुदेष्णेसी देईन मी ॥ ५ ॥
धर्म म्हणे राहें प्रिये, सावधान । करिसी भाषण मधुर नित्य ॥६॥
सिद्ध ऐशारीति जाहले पांडव । हर्ष वासुदेव पावे मनीं ॥ ७ ॥

अध्याय ४ था ७

धर्म म्हणे पुरोहित । जावो द्रुपदपुरीस ॥ १ ॥
अग्निहोत्र, दासदासी । नेवो पांचाळदेशासी ॥ २ ॥
इंद्रसेनादि सारथी । जावोत ते द्वारकेसी ॥ ३ ॥
द्वैतवनांत सोडून । गेले पांडव निघून ॥ ४ ॥
ऐसें सर्व कथितील । दोष तयां न घडेल ॥ ५ ॥
बोलूनियां धर्म ऐसें । मागे निरोप मुनींतें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे धौम्य । नृपा बोधी, द्या ऐकून ॥ ७ ॥

८

ऐका ऐका तुम्हीं सकलहि ज्ञाते । व्यवहार धर्मातें जाणतसां ॥१॥
कांहीं राजनीति कथितों ती ऐका । सुहृद्भावें ज्ञाता बोध्य ठरे ॥२॥
कृष्णेचें रक्षण करा दक्षतेनें । दोष स्वातंत्र्यानें स्त्रियांलागीं ॥ ३ ॥
साध्वीतेंहि जन निंद्य कल्पितील । स्वतंत्र वसेल साध्वी जरी ॥
राजगृहीं कैसें वर्तावें तें ऐका । सज्जनांहि धोका मानी तेथें ॥५॥
अनुज्ञेवांचूनि घेऊं नये भेटी । भरंवसा पोटीं धरूं नये ॥ ६ ॥
एकांतीं नृपाच्या जाऊं नये कदा । सोडूनि मर्यादा वागूं नये ॥७॥
हेरांसी संशय येईल तें कृत्य । वर्जूनियां भृत्य सौख्य पावे ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे बोध न पुशितां । राजालागीं कदा करूं नये ॥ ९ ॥

९

योग्यकाळीं योग्य स्तवन करावें । सख्य न घडावें अंतःपुरीं ॥ १ ॥
द्वेष्य-द्वेषकांसी न घडावी मैत्री । विदित तयासी सर्व होई ॥२॥
स्वस्थानींहि आज्ञा होतांचि वैसावें । तत्पूर्वी न व्हावें अवलोकन ॥
सलगी करितां जाळी अग्नीसम । अवज्ञेनें पूर्ण नाश त्याचा ॥ ४ ॥
कथील तें कार्य आदरें करावें । पुशितां कथावें सकल नृपा ॥ ५ ॥
गर्व, कोप तेंवी प्रमाद त्यजावा । हिताचा कथावा पुशितां मार्ग ॥
अनहितकारी प्रियहि त्यजावें । सर्वदा असावें अनुकूल ॥ ७ ॥
मानूनि त्या प्रिय, प्रमत्त न व्हावें । भाषण त्यजावें अनिष्ठांसी ॥८॥
राजदत्तस्थान त्यागूं नये कदा । सन्मुखहि कदा बैसूं नये ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे वांटितां वेतन । पाचारणाविण जाऊं नये ॥१०॥

१०

कदाकाळीं राव होतां मिथ्याभाषी । कथन लोकांसी करूं नये ॥१॥
अकीर्तिकारक बोलूं नये भाषा । गर्व बल-बुद्धीचा धरूं नये ॥ २ ॥
घडतांहि लाभ दक्षचि असावें । प्रिय-हित घ्यावें ध्यानीं त्याचें ॥३॥
कोप-प्रसादहि सफल जयाचे । अहित तयाचें चिंती कोण? ॥४॥
ओष्ठ, बाहुक्रिया, चापल्यसूचक । नृपाच्या सन्मुख होऊं नये ॥५॥
मर्येचि भाषण, शिंक वा जांभई । कदाकाळीं पाहीं देऊं नये ॥६॥

हास्यास्पद कृत्य होतां कवणाचें । कदा मर्यादेतें सोडूं नये ॥७॥
वासुदेव म्हणे हास्य, ताटस्थ्याहि । योग्य जें समयीं तेंचि व्हावें ॥

११

लाभ होतां हर्ष, अवमानितां व्यथा । होई ज्याच्या चित्ता अयोग्य तो ॥
पावतांहि हानि निंदूं नये कदा । जनपीडामार्गा दावूं नये ॥ २ ॥
अप्रिय जनांसी होई जो अमात्य । दीर्घकाल वास न घडे त्याचा ॥
महत्व नृपाचें नित्य वाढवावें । चातुर्य करावें प्रगट सदा ॥ ४ ॥
बुद्धि, बल, शौर्य, उत्साह जयासी । निष्ठा संयमेंचि राजप्रिय ॥५॥
पाचारितां अन्या सिद्ध जो सेवेसी । प्रिय तो रायासी सर्वकाळ ॥
पडेल तें कार्य करावें सौख्यानें । गृह-दारा-धनें विसरोनि ॥ ७ ॥
राजासम वेष कदा करूं नये । कार्यीं स्पर्धूं नये द्रव्यालागीं ॥ ८ ॥
यान, वस्त्रादिक अर्पितां रायानें । धारण प्रेमानें व्हावें त्याचें ॥९॥
विनम्र जो सदा नृपाच्या पुढती । इच्छा पूर्ण त्याची सर्वकाळ ॥
वागूनियां ऐसें धर्मा, व्हा यशस्वी । ऐसा तो तपस्वी बोध करी ॥
वासुदेव म्हणे प्रार्थी धर्मराज । स्वस्त्ययनकाज करा आतां ॥१२॥

१२

धर्म म्हणे धौम्या, कुंती-विदुरावीण । बोध ऐसा कोण करी आम्हां ॥
विजयार्थ आतां करा स्वस्त्ययन । मुनि तें ऐकून जपिती पाठ ॥२॥
मंत्रयुक्त केलें हवन मुनीनें । प्रदक्षिणा प्रेमें करिती वीर ॥ ३ ॥
वंदूनि द्विजांसी केलें वेषांतर । गुप्तरूपें दूर गेले वेगें ॥ ४ ॥
पांचाळपुरीसी गेले धौम्यमुनि । द्वारका गांठूनि सूत धाले ॥५॥
वासुदेव म्हणे पांडवांचें वृत्त । ऐका स्वस्थचित्त होऊनियां ॥६॥

अध्याय ५ वा

१३

खड्ग तूणीरांसी बांधोनि निघाले । तलत्राण केलें बद्ध करीं ॥१॥
कालिंदी लंघूनि आले दक्षिणेसी । श्रांत द्रौपदीसी पाही धर्म ॥२॥
पार्थालागीं बोले घेई स्कंधावरी । आले सीमेवरी विराटाच्या ॥३॥
नगरासन्निध येवोनि ठाकले । स्मशान देखिलें सन्निधचि ॥ ४ ॥
तया स्थानीं भव्य शमीवृक्ष होता । म्हणती निज शस्त्रां ठेवूं येथें ॥

चढला नकुळ तया तरूवरी । बांधूनि ठेविलीं शस्त्रें नीट ॥ ६ ॥
पर्जन्य न बाधे ऐशा ढोलीमाजी । ठेऊनियां राजी होती वीर ॥ ७ ॥
टांगूनियां शव म्हणती मृत माता । कुलाचार ऐसा कथिती गोपां ॥
संरक्षूनि ऐसीं ठेवियेलीं शस्त्रें । सांकेतिक नामें स्वयें घेती ॥ ९ ॥
जय, जयंत, तो विजय, जयत्सेन । जयद्बल, जाण नामें त्यांचीं ।
वासुदेव म्हणे ऐसे महावीर । विराटनगर प्रवेशती ॥ ११ ॥

अध्याय ६ वा १४

धर्मराज जातां विराटनगरीं । प्रार्थितो अंतरीं दुर्गेलागीं ॥ १ ॥
यशोदेच्या गर्भी संभव जियेचा । वरद जियेचा नारायण ॥२॥
कृष्णभगिनी ते संकट हारिणी । कल्याणदायिनी स्मरणें तारी ॥३॥
दर्शनार्थ केलें स्तवन धर्मानें । भात्यांसवें प्रेमें विविध स्तोत्रें ॥४॥
ब्रह्मचारिणी, हे कुमारी नमोस्तु । वरदे, नमोस्तु चतुर्भुजे ॥५॥
महिषमर्दिनी, नमोस्तु भवानी । दुर्गे हे मृडानी महाकाली ॥ ६ ॥
विंध्यवासिनी, हो प्रसन्न मजसी । संकटीं संरक्षीं आम्हांलागीं ॥
विजये, विजय, वरदे, दे वर । प्रणतजनोद्धार करीं वेगें ॥ ८ ॥
त्राहि आम्हां ऐसें विनवितां धर्म । जाहली प्रसन्न प्रगट बोले ॥९॥
सकलहि हेतु पुरतील तुमचे । प्रार्थितांचि ऐसें कार्यसिद्धि ॥ १० ॥
देऊनियां वर पावे अंतर्धान । वासुदेव धन्य चिंतनें त्या ॥ ११ ॥

अध्याय ७ वा १५

विराटमंदिरीं पातला नृपाळ । कक्षेमाजी खेळ सोंगट्यांचा ॥ १ ॥
रत्नजडित ते फांसे सुवर्णाचे । होते सकलांतें अलौकिक ॥ २ ॥
राव म्हणे भासे भाग्यवंत राजा । आजानुबाहू हा सुलक्षणी ॥ ३ ॥
विप्रवेषें जरी येई सभास्थानीं । परी सत्य कोणी राव भासे ॥ ४ ॥
इतुक्यांत धर्म येवोनि बोलला । राजा दे मजला आश्रय तूं ॥ ५ ॥
इच्छेसम तुझ्या वागेन मी ऐसें । ऐकूनि नृपातें मोद वाटे ॥ ६ ॥
सन्मानूनि राव कोण तूं कोणाचा । प्रश्न करी, विद्या काय तुज ॥
धर्म म्हणे राया, सखा मी धर्माचा । व्याघ्रपाद-गोत्रा जन्मलों मी ॥

द्यूतकुशल मी नांव माझें 'कंक' । राव म्हणे राज्य तूंचि करीं ॥९॥
वासुदेव म्हणे धर्माचें उत्तर । सत्यचि, साचार अवलोकितां ॥१०॥

१६

धर्म म्हणे राया, कलह या द्यूतीं । जाणूनि हें चित्तीं विनती एक ॥
द्यूतामाजी नित्य सत्याचा अपलाप । होई हा सिद्धांत, तणें भय ॥
जिंकिल्या धनासी तत्काळ पावावें । हेंचि मज द्यावें वर दान॥ ३॥
राव म्हणे योग्य शासन करीन । इच्छा पुरवीन कंका तुझी ॥ ४ ॥
ऐका हो सकळ कंक माझा मित्र । सांभाळील राष्ट्र मजसम ॥ ५ ॥
अहोरात्र द्वार खुलें तुज कंका । सन्मान्य तूं सखा मजलागीं ॥६॥
ऐसा धर्मराज राहिला त्या स्थानीं । ओळखीना कोणी तयालागीं
वासुदेव म्हणे फल सत्कर्माचें । न दिसे कोणातें, समई कळे ॥८॥

अध्याय ८ वा

१७

महाविक्रमी बळिवंत । सिंहगति पुण्यवंत ॥ १ ॥
ऐसा धिप्पाड पुरुष । खेंजा, दर्वी[1] ज्या करांत ॥ २ ॥
कोशरहित तीक्ष्ण सुरा । शोभे स्कंधावरी झारा ॥ ३ ॥
ऐसा वीर रायाप्रति । म्हणे वल्लव मी लोकीं ॥ ४ ॥
राव म्हणे सत्य सांगें । यक्ष गंधर्व कीं स्वांगें ॥ ५ ॥
भीम म्हणे हे नरेंद्रा । सेविलें मी युधिष्ठिरा ॥ ६ ॥
मल्लयुद्धाची आवड । धरिले सिंह, गज-द्वाड ॥ ७ ॥
प्रिय करीन मी तुझें । आश्रयार्थ आलों एथें ॥ ८ ॥
म्हणे विराट तयासी । पाकगृहीं जा सुखेंसी ॥ ९ ॥
सकल सूदांचा अधिकारी । भीम राहिला मंदिरीं ॥ १० ॥
वासुदेव म्हणे कोणी । ओळखीना त्यालागोनी ॥ ११ ॥

अध्याय ९ वा

१८

आर्तपणें कृष्णा सैरंध्री वेषानें । नगरीं धैर्यानें प्रवेशली ॥ १ ॥
दीर्घ, काळेभोर, कुरळे, मृदु केश । अपसव्य अंग झांकिती ते ॥२॥

१ सुरी किंवा कांस्याचा चमचा.

वस्त्र तें मलीन वेड्याचीच कृति। स्त्रिया गोळा होती भोंवताली
पाहूनि तयांसी सैरावरा धांवे। मार्गी ऐसी पाहे, महाराणी ॥ ४ ॥
पाठवूनि दासी पाचारी तियेसी। म्हणे तूं कोणाची कोण सांगें ॥
सैरंध्री तें म्हणे भुजिष्या मी दीन। राणी तें वचन मिथ्या मानी ॥
वासुदेव म्हणे न झांके झाकितां। गंध कस्तुरीचा तैसी स्थिति ॥

१९

सुंदरी वो, म्हणे सुदेष्णा तियेसी। सैरंध्री तुजसी कैसी म्हणूं ॥१॥
सर्वश्रेष्ठ तुझीं लक्षणें, अधिकार। सुचविती थोर सम्राज्ञीचा ॥२॥
गूढ तुझे गुल्फ ऊरूहि संहत। षडभागें[1] उन्नत त्रिगंभीरो[2] ॥ ३ ॥
पंचभागीं[3] रक्त, वाणी हंसासम। पयोधर पीन, श्रोणि तेंवी ॥ ४ ॥
काश्मिरी तुरंगीसम तुझी गति। शामवर्ण कांति सुकेशी तूं ॥ ५ ॥
कमललोचने, हे तनुमध्यमे। पूर्णचंद्रानने कंबुग्रीवे ॥ ६ ॥
अंगसुगंधहि कमलासमान। भद्रे, सांगें कोण देवता तूं ॥ ७ ॥
विद्याधरी किंवा किन्नरी, रोहिणी। अथवा इंद्राणी सांगें कोण ॥
कृष्णा म्हणे देवी, सैरंध्री भुजिष्या। भामा-द्रौपदीच्या लोभ बहु ॥
विचित्र पुष्पांच्या गुंफितां मी माळा। 'मालिनी' मजला दिधलें नाम
सुदेष्णेसी म्हणे दे मज आश्रय। ऐका वासुदेव कथितो वृत्त ॥११॥

२०

म्हणे सुदेष्णा लावण्य। अये तुझें अप्रतिम ॥ १ ॥
पाहूनियां नृपाळासी। मोह पडेल मानसीं ॥ २ ॥
कैसा करूं आत्मघात। तुज घेऊनि गृहांत ॥ ३ ॥
हांसूनियां म्हणे कृष्णा। चिंता न करी हे सुदेष्णा ॥ ४ ॥
सैरंध्री हे नोहे तैसी। पति गंधर्व तियेसी ॥ ५ ॥
महाबलाढ्य ते पांच। संरक्षण त्यांचें मज ॥ ६ ॥
कोणी करितां अवमान। त्याच रात्रीं घेतिल प्राण ॥ ७ ॥
न करीं परपुरुषसेवा। निर्धार हा ध्यानीं घ्यावा ॥ ८ ॥

---

१ नासिका, नेत्र, कान, नखें, वक्ष व कंठ. २ शब्द, बुद्धि व नाभि.
३ तळवे, नेत्र, ओष्ठ, जिव्हा व नखें.

देई आश्रय वर्षे एक । तेणें पावसील भाग्य ॥ ९ ॥
न घडो उच्छिष्ट सेवन । अथवा पादप्रक्षालन ॥ १० ॥
मान्य करोनि ते वाणी । आश्रय तिजसी देई राणी ॥ ११ ॥
वासुदेव म्हणे ऐसी । राहे कृष्णा त्या स्थानासी ॥ १२ ॥

अध्याय १० वा २१

गोपवेष-भाषा सहदेव स्वीकारी । पातला दरबारीं विराटाच्या ॥
गोपासमीप तो उभा राहियेला । दुरूनि पाहिला नृपाळानें ॥ २ ॥
पाठवूनि दूत आणिला समीप । जाऊनि सन्निध राव म्हणे ॥ ३ ॥
कोण तूं कोणाचा सत्य जो वृत्तांत । कथावा समस्त मजलागीं ॥४॥
मेघनादें तदा बोले सहदेव । वैश्य मी गोसंख्य पांडवांचा ॥ ५ ॥
'अरिष्टनेमि' मी तुजवीण नृपा । अन्य कोठें आतां जाऊं सांग ॥
राव म्हणे विद्या जाणसी तूं काय । रूप हें अपूर्व भासे तुझें ॥ ७ ॥
सहदेव म्हणे एका खिल्लारांत । वसे धेनुशत पांडवांच्या ॥ ८ ॥
ऐसीं आठ कोटि खिल्लारें तयांचीं । व्यवस्था मी त्यांची केली राया ॥
शास्त्र मी धेनूंचें जाणतों सकळ । ऐकूनियां राव तुष्ट झाला ॥१०॥
वासुदेव म्हणे आश्रय दिधला । सहदेव राहिला सदनीं सुखें ॥

अध्याय ११ वा २२

तदा सन्निध नृपातें । वेषधारी योद्धा दिसे ॥ १ ॥
दिव्य कुंडलें कर्णांत । करीं कंकणें शोभत ॥ २ ॥
पृष्ठभागीं रुळती केश । राव बोलला सभ्यांस ॥ ३ ॥
वाटे मजसी हा योद्धा । येई पसरूनि हातां ॥ ४ ॥
येई जरी ऐशा वेषें । मज सेनापति भासे ॥ ५ ॥
म्हणे कोण तूं पुण्यात्मा । दिससी मज माझा आत्मा ॥ ६ ॥
वार्धक्यानें झालों श्रांत । करीं तूंचि माझें राज्य ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । नम्र बोलला रायास ॥ ८ ॥

२३

गायन-वादन नृपाळा । जाणतसें पूर्ण कला ॥ १ ॥
करीं कन्येसी स्वाधीन । नृत्य, गीतही शिकवीन ॥ २ ॥

कैसें रूप हें मजसी । ऐकूनियां खिन्न होसी ॥ ३ ॥
पोरकी मी बृहन्नला । कन्या-पुत्र हे नरवरा ॥ ४ ॥
मत घेवोनि मंत्र्यांचें । परीक्षिती स्त्रिया त्यातें ॥ ५ ॥
पाठविती अंतःपुरीं । होतां निर्धास्त अंतरीं ॥ ६ ॥
बृहन्नला अल्पकाळीं । प्रेम संपादी त्या स्थळीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐसा । राहे सखा श्रीहरीचा ॥ ८ ॥

अध्याय १२ वा २४

अश्वशाळेमाजी एकदां नृपाळ । हिंडतां नकुळ दिसला तयां ॥ १ ॥
अश्वनिरीक्षण करितो हा कोण । भाषा ते ऐकून वंदी नृपा ॥ २ ॥
राव म्हणे कोण जाणसी तूं काय । केलेंसी वास्तव्य पुरा कोठें ॥
नकुळ म्हणे राया, अश्वशास्त्रवेत्ता । सेवक धर्माचा होतों पूर्वी ॥
जाति, लक्षण कीं रोगनिवारण । जाणतों संपूर्ण अश्वशास्त्र ॥ ५ ॥
पांडव यालागीं 'ग्रंथिक' या नामें । ओळखिती प्रेमें मजलागीं ॥ ६ ॥
राजा म्हणे होईं नियंता अश्वांचा । काळ कोठें कैसा कंठिती ते ॥
दर्शनें या मज धर्माचें स्मरण । ग्रंथिका हें स्थान शोभवीं तूं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ऐसे ते सकळ । कंठिताती काळ राजगृहीं ॥ ९ ॥

## समयपालनपर्व २

अध्याय १३ वा २५

देव-सन्मुनींच्या प्रसादें पांडव । राहिले निर्भय तया स्थानीं ॥ १ ॥
आपुल्या सद्गुणें संपादूनि धन । अर्पिताती जाण परस्परां ॥ २ ॥
गुप्तपणें कृष्णा अवलोकी पतींसी । ओळख तयांची दावीना ते ॥३॥
संरक्षिती तिज सकलहि भ्राते । दक्ष त्या स्थानातें करिती वास ॥
ऐसे, तीन मास लोटले तयांसी । महोत्सवीं होती दंग लोक ॥ ५ ॥
ब्रह्मयाच्या उत्सवा मल्ल बहु येती । जीमूतमल्लासी तोड नसे ॥६॥

१ शरदतूंत नवधान्य होतांच हा उत्सव होई. नव्यांची पौर्णिमा ती हीच.

पाहोनि विराट बोले वल्लवासी । युद्ध जीमूतासी करीं शौर्यें ॥ ७ ॥
नृपाळवचन मानूनि कष्टानें । कशिली हर्षानें कटी भीमें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे युद्ध अलौकिक । पाहूनियां लोक धन्य झाले ॥ ९ ॥

२६

मल्लयुद्ध तदा होई भयंकर । ताडिताती वीर परस्पर ॥ १ ॥
ओढिती, झोडिती, पीडिती, चिरडीती । प्रहार करिती, मर्मस्थानीं
धक्का, बुक्की, तेंवी शलाकाताडन । वळें उत्पाटन करिती वेगें ॥३॥
अंतीं आंवळूनि धरिती एकमेकां । वल्लव जीमूता चकवी तदा ॥४॥
उचलूनि वेगें आपटी तयासी । लोळवूनि तेंवी मुष्टयाघातें ॥ ५ ॥
अंतीं गतप्राण जाहला जीमूत । अवघे हर्षित होती तदा ॥ ६ ॥
वल्लवासी धन अर्पिलें अपार । पुढती सिंह, व्याघ्र, खेळवीले ॥ ७ ॥
तंतिपाळ तेंवी ग्रंथिक स्वगुणें । तोषविती प्रेमें सकळांसी ॥ ८ ॥
कौशल्य वीरांचें अंतःपुराप्रति । दाविता सैरंध्री दुःख पावे ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे अज्ञात तो काळ । कंठिती सकळ वीर ऐसा ॥ १० ॥

---

## कीचकवधपर्व ३

अध्याय १४ वा

२७

मत्स्यराजगृहीं पालटूनि वेष । वीर दश मास कंठिताती ॥ १ ॥
जनवंद्य साध्वी सेवा सुदेष्णेची । करी, कालगति जाणूनियां ॥ २ ॥
वर्तनें आपुल्या तोषवी राणीसी । सकल स्त्रियांसी प्रिय झाली ॥३॥
अल्पकाळ आतां अज्ञातवासाचा । राहतां एकदां नवल घडे ॥ ४ ॥
सहजपणें साध्वी दिसली कीचका । होई कामबाधा तयालागीं ॥५॥
कामवीर बोले येऊनि राणीसी । उन्माद ही दासी आणी मज ॥
कोण ही अंगना कोठूनियां आली । दासी कैंवी झाली भाग्यवती ॥
वश होतां मम ऐश्वर्य सकळ । सुंदरी भोगील आनंदानें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे सुदेष्णेचें मत । घेऊनियां दुष्ट पुढती होई ॥ ९ ॥

२८

सैरंध्रीसी म्हणे सुंदरी, तूं कोण। कोकिलेसमान वाणी तुझी ॥ १ ॥
सौंदर्य अपूर्व कोण तूं देवता। दर्शनेंचि चित्ता काम पीडी ॥ २ ॥
आत्मप्रदानें तूं शांतवीं मजसी। समागमें प्रीति वृद्धि पावे ॥ ३ ॥
यथेच्छ विहार करीं मजसवें। प्राशूनियां पेयें अमोलिक ॥ ४ ॥
सकलहि स्त्रिया दास्य करितील। कीचक होईल दास तुझा ॥५॥
वासुदेव म्हणे शब्द ते ऐकूनि। बोले सौम्यवाणी द्रुपदकन्या ॥६॥

२९

सूतपुत्रा व्यर्थ कामना करिसी। मानोनियां दासी क्षुद्र मज ॥ १ ॥
जाणें मजलागीं परस्त्री हे सूता। सकळांसी कांता प्राणप्रिय ॥२॥
ज्ञाते न करिती परस्त्रीचिंतन। अकार्याचें प्रेम त्यजिती ज्ञाते ॥३॥
दुष्प्राप्य वस्तूचा धरितां अभिलाष। दुष्कीर्ति, विनाश, निश्चयेंसी
ऐकूनि ते वाणी कामांध कीचक। म्हणे मी अनुरक्त तुझ्यावरी ॥५॥
वरानने, नको अव्हेरूं मजसी। मजसम जगीं कोण असे ॥ ६ ॥
शुभानने, होईं भाग्याची स्वामिनी। त्यजितां खेद मनीं पावसील ॥
वासुदेव म्हणे ऐकूनि भाषण। दुष्टासी निंदून वदली कृष्णा ॥ ८ ॥

३०

सूतपुत्रा, त्यजीं मोह हा दारुण। गमविसी प्राण कासया हे ॥ १ ॥
अशक्य तुजसी प्राप्ति सैरंध्रीची। गंधर्व रक्षिती पती मज ॥ २ ॥
मूढ बालक जें सरितोल्लंघन। इच्छी तैसें कर्म व्यर्थ तुझें ॥ ३ ॥
शिशु जेंवि इच्छी दिव्य चंद्रबिंब। तैसेंचि विरुद्ध कर्म तुझें ॥४॥
त्रैलोक्यांत त्राता नसे तुजप्रति। इच्छितां मजसी मनीं, भ्रष्टा ॥
गगनसंचारी वीर माझे पती। कोण तयांप्रति अवमानील ॥ ६ ॥
दैवहीना, माझा धरिसी अभिलाप। पातला विनाश जवळी वाटे ॥
वासुदेव म्हणे निर्भय द्रौपदी। बोले कीचकासी स्पष्टपणें ॥ ८ ॥

अध्याय १५ वा

३१

ऐकूनियां तो निषेध। भानहीन तो कामांध ॥ १ ॥
वदला दुष्ट, सुदेष्णेसी। लाभो सैरंध्री मजसी ॥ २ ॥



एक मुहूर्त मार्गांत । साध्वी प्ार्थी मार्तंडास ॥ १ ॥
गुप्तपणें भगवंत । दैत्य धाडी रक्षणार्थ ॥ २ ॥

—विराटपर्व अ. १५, अभंग ३३

ऐसें न घडेल जरी । प्राण जातील सत्वरी ॥ ३ ॥
मजसाठीं हे सुदेष्णे । योजीं उपाय दयेनें ॥ ४ ॥
चिंतूनियां म्हणे राणी । चतुर्दशी धरीं ध्यानीं ॥५॥
पाठवीन पेयांस्तव । करीं एकांतीं उपाय ॥ ६ ॥
पाहें जरी होई वश । वासुदेव पावे क्लेश ॥ ७ ॥

३२

ऐकूनियां झाला संतुष्ट अंतरीं । हर्षानें मंदिरीं प्राप्त झाला ॥ १ ॥
उत्कृष्ट मदिरा आणवूनि सिद्ध-। करी भक्ष्य-भोज्य विविध वस्तु ॥
दूत पाठवूनि सुचवी राणीसी । राणी सैरंध्रीसी कथीतसे ॥ ३ ॥
जाई वो, त्वरित कीचकसदनीं । पात्रें हीं घेवोनि पानकांचीं ॥४॥
खिन्नचित्तें कृष्णा म्हणे पदार्पण । कदा न करीन सदनीं त्याच्या ॥
निर्लज्ज तो दुष्ट अवमानील मज । कथिलें वृत्त तुज पूर्वींच मी ॥
नम्र तुझ्या दासी असती बहुत । पाठवीं तयांस रक्षीं मज ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पूर्ण कसोटीची । वेळ तैं साध्वीची प्राप्त झाली ॥ ८ ॥

३३

क्रोधें बोलली सुदेष्णा । भक्षील कीं घेईल प्राणां ॥ १ ॥
पाठवितें मी तुजसी । पात्र देई करांमाजी ॥ २ ॥
भयाभीत तैं सुंदरी । पराधीन रूदन करी ॥ ३ ॥
होऊनियां दैवाधीन । दुःखें आज्ञा करी मान्य ॥ ४ ॥
एक मुहूर्त मार्गांत । साध्वी प्रार्थी मार्तंडास ॥ ५ ॥
गुप्तपणें भगवंत । दैत्य धाडी रक्षणार्थ ॥ ६ ॥
नित्य सन्निध तो राही । कृष्णेप्रति कीचक पाही ॥ ७ ॥
भयाभीत हरिणीसम । सती मनीं चिंतामग्न ॥ ८ ॥
बुडत्यालागीं नाव जैसी । मोद तेंवी कीचकासी ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे दुष्ट । उठला पाहूनि तियेस ॥ १० ॥

अध्याय १६ वा

३४

समीप येऊनि बोले कामोन्मत्त । उगवेल रात्र भाग्याची हे ॥ १ ॥
स्वामिनीचें असो सप्रेम स्वागत । होऊनियां वश कृपा करीं ॥ २ ॥

विचित्रभूषणें स्वीकारीं मौलिक । मोहपुष्पमद्य प्राशीं सुखें ॥ ३ ॥
दिव्य शय्या केली सिद्ध तुझ्यास्तव । ऐकूनियां क्रुद्ध याज्ञसेनी ॥
कृष्णा म्हणे मज धाडिलें राणीनें । सुमधुर पानें न्यावयासी ॥५॥
करील तें अन्या, म्हणोनि दुष्टानें । धरिला करानें दक्षिणकर ॥ ६ ॥
तदा ते संक्रुद्धा म्हणे सत्यव्रते । पाहीन पापाचें फल तुझ्या ॥ ७ ॥
ऐसें बोलूनियां जातां ती माघारा । धरोनि पदरा ओढी नीच ॥८॥
क्रोधें तदा सोडी दीर्घ निश्वासांसी हिसडा तयासी देई कृष्णा ॥
वृक्षासम नीच पडे उन्मळूनि । सती सभास्थानीं धांव घेई ॥ १० ॥
इतुक्यांत येई धांवोनि कीचक । ओढूनियां केश लता हाणी ॥११॥
भूमीवरी कृष्णा पडतां दैत्यानें । निश्चेष्ट पाडिलें कीचकासी ॥१२॥
वासुदेव म्हणे ऐसा हा अनर्थ । अवलोकिती पार्थ सभेमाजी ॥१३॥

३५

असहिष्णु भीम युधिष्ठिरासह । अवलोकी सर्व दुष्कृत्य तें ॥ १ ॥
संतप्त तें वीर क्रोधें दांत खाई । विसरूनि जाई देहभान ॥ २ ॥
उठूं पाहे क्रोधें स्वस्थानावरूनि । अंगुष्ठ दाबूनि धरी धर्म ॥ ३ ॥
मत्त गजासम निवारूनि तया । म्हणे हे वल्लवा वधसी काय ॥ ४ ॥
काष्ठें हवीं तरी जाईं त्वां बाहेरी । इतुक्यांत सुंदरी द्वारीं येई ॥५॥
वासुदेव म्हणे करी जणु दग्ध । बोले स्पष्ट शब्द विराटासी ॥ ६ ॥

३६

पंचदेश वैरी लंघूनियां ज्यांचा । भयाकुल निद्रा नसे तया ॥ १ ॥
तैशा त्या वीरांची भार्या मी मानिनी । लत्ता मज हाणि सूतपुत्र ॥
सर्वदा जे दाते, याचिती न कदा । त्यांची हे संपदा भ्रष्ट होई ॥३॥
प्रत्यंचा दुंदुभि सर्वदा निनादे । कांता त्यांची खेदें हांका मारी ॥
धर्मपाशबद्ध तेजस्वी जे दान्त । हाय त्यांचा अंत वधसी राया ॥
प्रपन्नार्तिहर शूर माझे पती । कोठें हिंडताती गुप्तवेषें ॥ ६ ॥
क्लीबासम कैसा अवमान साहती । वधार्थ न येती कैसे पुढें ॥ ७ ॥
कोठें गेला त्यांचा क्रोध, हा विराट । वधीना दुष्टास काय करूं ॥
वासुदेव म्हणे अनार्यासमान । राजा तुझा धर्म म्हणे सती ॥ ९ ॥

३७

दुष्कृत्याचें अवलोकन । करिती सभासद सुज्ञ ॥ १ ॥
धर्मभ्रष्ट हा कीचक । धर्म पाळीना हा नृप ॥ २ ॥
सेविती जे ऐशा नृपा । दोष येई त्यांचे माथां ॥ ३ ॥
अश्रुलोचना ते सती । ऐशी निंदी विराटासी ॥ ४ ॥
राव म्हणे ज्ञात नसे । काय घडलें तें आम्हांतें ॥ ५ ॥
तदा दुःखें सकल वृत्त । कृष्णा निवेदी सभ्यांस ॥ ६ ॥
ऐकूनियां सभासद । म्हणती कीचक हा दुष्ट ॥ ७ ॥
धन्य धन्य ऐसी आर्या । जया भाग्यवंत भार्या ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कोण । देवता ही म्हणती जन ॥ ९ ॥

३८

क्रोधें धर्माच्या ललाटीं । स्वेदबिंदू तैं चमकती ॥ १ ॥
म्हणे सैरंध्री वो आतां । जाई सन्निध राज्ञीच्या ॥ २ ॥
अनुसरतां वो, भर्त्यांसी । क्लेश ऐसेचि साध्वीसी ॥ ३ ॥
ऐसे भोगिती ज्या, क्लेश । जिंकिती त्या, पतिलोकास ॥ ४ ॥
वाटे मम अंतरासी । काल प्रतिकूल तयांसी ॥ ५ ॥
अकालज्ञ तूं शैलूषी । व्यर्थ रूदन करिसी ॥ ६ ॥
दुःख हरितील गंधर्व । डाव रंगला, जा, दूर ॥ ७ ॥
कृष्णा म्हणे माझे पति । शूर दयावंत चित्तीं ॥ ८ ॥
परी ज्येष्ठ, द्यूतरत । तेणें होतील ते वध्य ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे कृष्णा । ऐसें वदूनि सोडी स्थाना ॥ १० ॥

३९

मेघलेखायुक्त चंद्रासम मुख । केशभार मुक्त पृष्ठीं रुळे ॥ १ ॥
आरक्तनयना करीत रूदना । सुदेष्णासदना प्राप्त झाली ॥ २ ॥
राणी म्हणे भद्रे, ताडिलें कीं कोणी । रडसी कां सुश्रोणी सांगे मज ।
कृष्णा म्हणे जेंवी विजनवनांत । ओढिलें, सभेत तेंवी दुष्टें ॥ ४ ॥
राणी म्हणे जरी इच्छिसी दुष्टाचा । वध मी तयाचा करवीन ॥५॥

---

१ नटी.

कृष्णा म्हणे ज्यांचा अपराध ते वीर । नीचासी यमपूर दावितील
वासुदेव म्हणे स्वजन विश्वास । ज्यां ते वरिष्ठ कुळवंत ॥ ७ ॥

अध्याय १७ वा

४०

स्वस्थानीं जावोनि होवोनि सुस्नात । कीचकाचा वध चिंती मनीं
रडतां रडतां चिंती निर्णयासी । शासन दुष्टासी कैंवी होई ॥ २ ॥
काय करूं, कोठें जाऊं, या संकटीं । कैंवी कार्यसिद्धि होई मम ॥
ऐसें बोलूनियां चिंती वृकोदरा । तयाच्या मंदिरा जाई रात्रौ ॥४॥
स्वस्थ शांत परी पाकशाळेमाजी । अवलोकी सिंहासी निद्रामग्न ॥
म्हणे महादुष्ट असतां जिवंत । कैसी निद्रा अद्य येई देवा ॥ ६ ॥
वृषभासान्निध धेनूसम उभी । राहूनियां साध्वी खेद करी ॥ ७ ॥
महावृक्षाश्रिता जैंवी वनलता । तैंवी ते भीमाचा देह झांकी ॥ ८ ॥
मृगराजवध सुप्त सिंहाप्रति । आणी तैं जागृति भीमालागीं ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे वीणा मधुनादें । बोले मृदुशब्दें वृकोदरा ॥ १० ॥

४१

उठा, उठा, भीमसेना । त्यागा मृताच्या शयना ॥ १ ॥
वीर पत्नीचा अवमान । करितां जगे जनीं कोण ॥ २ ॥
मृदुशय्या त्यजूनि भीम । उठला मेघनीलवर्ण ॥ ३ ॥
म्हणे प्रिये कां वो ऐसी । त्वरायुक्त येथें येसी ॥ ४ ॥
अस्वस्थ तूं दिससी कृश । मज निवेदीं जें दुःख ॥ ५ ॥
नित्य साह्य मी तुजसी । करीन विमुक्त संकटीं ॥ ६ ॥
इच्छिसी तें कार्य सांगें । त्वरित जाई निजमार्गें ॥ ७ ॥
कोणी न होवो जागृत । हाचि भाव मन्मनांत ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे भीम । वदे द्रौपदीलागून ॥ ९ ॥

अध्याय १८ वा

४२

कृष्णा म्हणे धर्म जियेलागीं पति । तियेच्या दुःखासी काय तोटा
जाणोनि कारण पुशितां कां मजसी । 'कौरवांची दासी' सलतो शब्द
दुःशासनकर्मदुःख वर्णवेना । मजवीण प्राणा कोण रक्षी ॥ ३ ॥
वनामाजी स्पर्श केला जयद्रथें । सहन कोणातें दुःख होई ॥ ४ ॥

अद्य द्यूतकारापुढती सूतानें । ताडिलें लत्तेनें मजलागीं ॥ ५ ॥
ऐसें असूनियां लक्ष न कोणाचें । काय जीविताचें मोल माझ्या ॥
कीचक दुरात्मा नृपाचा शालक । नित्य वदे मज भार्या होईं ॥ ७ ॥
शय्येवरी मज पाचारितां दुष्ट । विदारक कष्ट हृदया होती ॥ ८ ॥
वधार्ह तो दुष्ट सर्वथा जाणावा । भ्राता तो निंदावा द्यूतकार ॥९॥
जयाच्या दुष्कर्मे हानी सर्वस्वाची । यातना आम्हांसी असह्यचि ।
वासुदेव म्हणे उद्वेगें द्रौपदी । धर्माप्रति निंदी दुःखावेगें ॥ ११ ॥

४३

नित्य द्विसहस्र हरतांहि रुक्म । न येतेंचि दैन्य बहुत वर्षे ॥ १ ॥
अश्व, अश्वेत्तर लाविता पणासी । तरी न दैन्यासी प्राप्त होता ॥२॥
द्वारामाजी ज्याच्या नृपाळसमूह । तिष्ठे, तोचि हाय दीन झाला
अन्न, धन, दान केलें अपरिमित । तोचि भाग्यवंत दीन झाला ॥४॥
लक्षावधि मुनि तुष्ट केले जेणें । तोचि दुष्कर्मानें दीन झाला ॥५॥
दीनांचा आधार दयेचा सागर । तोचि नरव्याघ्र दीन झाला ॥ ६ ॥
करभार देती नृपाळ जयासी । वेतन तो इच्छी दीनवाणा ॥ ७ ॥
उपासक ज्याचे नृपाळ समस्त । तोचि उपासक दैवें झाला ॥ ८ ॥
मयसभेमाजी भूषवी जो लोकां । तयाची जीविका कैसी आजी ! ॥
शोकसागरीं मी मग्न झालें देवा । कवणाचा धांवा करूं सांगा ॥
वासुदेव म्हणे साध्वी भीमाप्रति । बोले ऐशारीति दीनवाणी ॥११॥

अध्याय १९ वा

४४

अप्रिय मी आतां देवा जें कथीन । होऊनियां खिन्न तेंचि ऐका ॥१॥
विपर्यास त्याचा न घडो सर्वथा । हेतु न पूज्यांचा अवमान ॥ २ ॥
सूपकार ऐसी ख्याति वल्लवाची । 'झाली पाकसिद्धि' वदतां दुःख ॥
युद्ध पशूंसवें करितां मी खिन्न । ललनांचें मन संशयित ॥ ४ ॥
म्हणती हीं दोघें आलीं एकया वेळीं । अनुरूप जाहलीं परस्परां ॥५॥
बोलती दुर्ज्ञेय स्त्रियांचें हृदय । ऐकूनियां हाय दुःख वाटे ॥ ६ ॥
विराट कन्यांचा नर्तक तो वीर । जयासम शूर नाहीं कोणी ॥ ७ ॥
कन्या परिवेष्टित पाहूनि तयासी । हाय हृदयासी पडती घरें ॥ ८ ॥

अश्व वृषभांचा करिती सांभाळ। दुर्जनांचे काळ माद्रीपुत्र ॥ ९ ॥
तोद्भवदुःखें हृदयकृंतन। पावतां, विराम कैंवी चित्ता ॥ १० ॥
वैयक्तिक तैंवी दुःखें कथूं काय। वाटे हाय हाय स्मरण होतां ॥
वासुदेव म्हणे व्याकुळ चित्तानें। विनवी विनयानें कृष्णा, भीमा ॥

अध्याय २० वा ४५

राजमंदिरीं मी सैरंध्रीवेषानें। सेवा दक्षपणें करितें भीमा ॥ १ ॥
राजपत्नी, राजकन्या, राजस्नुषा। करिते प्रतीक्षा सद्भाग्याची ॥
सर्वदाचि सर्व धरूनियां आशा। अंत स्वदुःखाचा इच्छितें मी ॥३॥
अनित्य सर्वदा जया-जय लोकीं। जाणोनियां पोटीं धरिली आशा ॥
अनुकूल काल पाहीन पतींचा। हेचि एक इच्छा मनामाजी ॥ ५ ॥
चक्रनेमिक्रमें दारिद्र्य, संपदा। यश, दैन्य, सदा फिरवी काल ॥६॥
दैवगति, शास्त्र, मजलागीं मान्य। तेणें शोकहीन वसें सदा ॥ ७ ॥
शुष्क सरोवर वर्षाकालीं पूर्ण। तैसीच होईन कृतार्थ मी ॥ ८ ॥
दैवास्तव दैवी उपाय योजावा। कथन हेतु घ्यावा ध्यानामाजी ॥
वासुदेव म्हणे दैवाधीन कृष्णा। बोलतसे भीमा नम्रभावें ॥ १० ॥

४६

वनीं पावलें आनंद। भक्षूनिही मूलकंद ॥ १ ॥
राजभवनीं मी कृश। निमित्त त्या केवळ दास्य ॥ २ ॥
न कळे कालगति कोणा। नव्हती दुःखाची कल्पना ॥ ३ ॥
दैवगति आपणासी। हाय नाडिते सर्वांसी ॥ ४ ॥
कुंतीवीण उटी अन्या। उगाळिली[1] हें स्मरेना ॥ ५ ॥
पहा आतां कोमलकर। पडले घट्टे तयांवर ॥ ६ ॥
ऐसें बोलूनियां दावी। कर भीमालागीं साध्वी ॥ ७ ॥
पुरा निर्भय मी सदा। सुदेष्णेचा धाक आतां ॥ ८ ॥
वर्ण, उटीचा नृपासी। रुचो हेचि चिंता पोटीं ॥ ९ ॥
न रुचे अन्यविपिष्टितें। चंदन तें नृपाळास ॥ १० ॥
न कळे काय बालपणीं। घडला अपराध हातूनि ॥ ११ ॥

१ दुसऱ्यानें उगाळलेलें.

ऐसें बोलूनियां रडे । हृदय भीमाचें धडधडे ॥ १२ ॥
कर घेऊनियां करीं । भीमसेन अश्रु ढाळी ॥ १३ ॥
वासुदेव म्हणे वीर । वदला दुःखानें तो शूर ॥ १४ ॥

अध्याय २१ वा ४७

क्लेश तुझे भद्रे, पाहोनियां गदा । तैंवी त्या गांडीवा धिक्कारीन ॥१॥
सभेमाजी मन जाहलें बेभान । परी आंवरून धरिलें धर्मे ॥ २ ॥
काल प्रतीक्षेचें नसतें बंधन । पदाघातें चूर्ण करितों तरी ॥ ३ ॥
संहार दुष्टांचा द्यूतांत न केला । अपराध घडला घोर मम ॥ ४ ॥
त्यागूनियां क्रोध आचरीं सद्धर्म । निंदेनें या प्राण त्यजिल राजा ॥
सुकन्या, जानकी, तैंवी इंद्रसेना । लोपामुद्रा धन्या सावित्री ते ॥
तूंहि तयांसम सद्गुणांची खाणी । अल्पकाळ मनीं धैर्य धरीं ॥७॥
अर्ध मास आतां राहिला दुःखाचा । पुढती वैभवाचा काल तुज ॥
वासुदेव म्हणे कृष्णा भीमाप्रति । म्हणे दुःखें ऐसी घडली निंदा ॥

४८

गतगोष्टीलागीं शोक । करणें कासयासी व्यर्थ ॥ १ ॥
उपस्थिताचा प्रतिकार । करणें योग्य हा व्यवहार ॥ २ ॥
रूपें माझ्या पराभव । मानी सुदेष्णा हें दैव ॥ ३ ॥
ध्यानीं आणूनि कीचक । विनवी मजलागीं नित्य ॥ ४ ॥
वश होतां मी तयासी । चिंता हरेल राणीची ॥ ५ ॥
कथिले माझे शूरपति । परी नसे तया क्षती ॥ ६ ॥
ऐसा योजूनि उपाय । अवमानिली दीन गाय ॥ ७ ॥
दुष्ट नृपाळाचा आप्त । अवमानील जरी नित्य ॥ ८ ॥
तरी त्यागीन मी प्राण । मग कैंचा क्षात्रधर्म ॥ ९ ॥
भार्या रक्षणेंचि प्रजा । तेणें सांभाळ आत्म्याचा ॥ १० ॥
वासुदेव म्हणे कृष्णा । विनवी ऐशापरी भीमा ॥ ११ ॥

४९

उदरीं जियेच्या जाई तो फिरोनि । जाया तेचि जनीं म्हणती तेणें

केंवी ममोदरीं जन्मेल हे चिंता । वाहे पतिव्रता सर्वकाळ ।। २ ।।
ऐसा ऐकियेला सनातन धर्म । क्षत्रिया भूषण दुष्टवध ।। ३ ।।
जटासुरवध, जयद्रथा शिक्षा । केली तेंचि आतां व्हावें भीमा ।।
राजवाल्लभ्यें तो पीडी नित्य मज । शिळेवरी कुंभ आदळावा ।।५।।
जगतां तो जरी उदयीक आदित्य । उगवतां विष प्राशीन मी ।।६।।
श्रेयस्कर वाटे मृत्यु चरणांपुढें । बोलूनियां रडे याज्ञसेनी ।। ७ ।।
वक्षःस्थळीं शिर ठेवोनियां कृष्णा । करूनि रूदना विनवी बहु ।।
सांत्वन करोनि पुसोनियां नेत्र । होवूनियां क्रुद्ध भीम बोले ।। ९ ।।
वासुदेव म्हणे दांत ओंठ खाई । पुढती जणुं पाही कीचकासी ।।

अध्याय २२ वा

५०

भीमसेन म्हणे भद्रे । पुरवीन हेतु तुझे ।। १ ।।
वधीन मी कीचकासी । उदयीक बांधवेंसी ।। २ ।।
त्यजूनियां दुःख शोक । करीं तयासी संकेत ।। ३ ।।
रात्रीं नृत्यशाळेमाजी । सुखें पाचारीं तयासी ।। ४ ।।
तया स्थानींच्या मंचकीं । पितर दावीन दुष्टासी ।। ५ ।।
गुप्त संकेत करूनि । दुष्टालागीं तेथ आणीं ।। ६ ।।
ऐसा संवाद तयांचा । साश्रु लोचनेंचि होतां ।। ७ ।।
घोर रजनी संपली । येई सैरंध्री स्वस्थळीं ।। ८ ।।
वासुदेव म्हणे दुष्ट । भेटे येवोनि सतीस ।। ९ ।।

५१

म्हणे वो सुंदरी, ताडितां सभेंत । कोण प्रतिकारार्थ सिद्ध झाला ।।
नाममात्र राव समजें विराट । राजा हा कीचक मत्स्यदेशीं ।। २ ।।
संतुष्टचित्तानें वश होई मज । अर्पीन मी तुज विविध वस्तु ।। ३ ।।
शत निष्क-दास तितुक्याचि दासी । अर्पीन रथासी खेचरी ज्या ।।
कृष्णा म्हणे वृत्त बांधव कीं सखा । न जाणे सर्वथा तरी मान्य ।।
अनुमत होतां बोले तयाप्रति । ये नृत्य शाळेसी अंधारांत ।। ६ ।।
पुरतील सर्व कामना त्या स्थानीं । अनर्थाची हानी सकल होई ।।
ऐकोनि कीचक हर्षित जाहला । उत्कंठा चित्ताला द्रौपदीच्या ।।८।।

वासुदेव म्हणे उभयांसी हर्ष । कामना मनांत परी भिन्न ॥ ९॥

५२

काममोहित कीचक । हार त्याला सुगंधित ॥ १ ॥
दिव्य वस्त्रें अलंकार । करी विविध शृंगार ॥ २ ॥
मालवता जेंवी दीप । शोभा वाढवी अधिक ॥ ३ ॥
घटका भासे प्रहरासम । करी सैरंध्रीचिंतन ॥ ४ ॥
इकडे द्रौपदी भीमास । कथी जाऊन संकेत ॥ ५ ॥
ऐकूनियां पावे हर्ष । म्हणे वधीन दुष्टास ॥ ६ ॥
आड येतील तयांसी । पाठवीन यमलोकीं ॥ ७ ॥
संहारूनि कौरवांतें । अतां जिंकीन पृथ्वीतें ॥ ८ ॥
कृष्णा म्हणे पतिदेवा । गुप्तरूपें साधीं कार्या ॥ ९ ॥
भीम म्हणे इच्छेसम । वधीन मी तो दुर्जन ॥ १० ॥
गज बिल्वफळाप्रति । तैसा चुरडीन तयासी ॥ ११ ॥
वासुदेव म्हणे ऐसें । अभय देई पांचाळीतें ॥ १२ ॥

५३

नृत्यशाळेमाजी निशासमयासी । टपला मृगासी सिंह जैसा ॥ १ ॥
योग्य समई तो पातला कामांध । शोधी सैरंध्रीस अंधारांत ॥ २ ॥
मंचकीं येऊनि भीम पहुडला । कीचक तोषला स्पर्शूनियां ॥ ३ ॥
म्हणे हे सुंदरी, सर्वस्व अर्पूनि । पातलों या स्थानीं प्रेमभरें ॥ ४ ॥
पाहूनि हा वेष म्हणताती स्त्रिया । 'तुजसम आर्या नाहीं कोणी' ॥
ऐकूनियां भीम तत्काळ उठोनि । म्हणे तूंचि जनीं रूपवंत ॥ ६ ॥
अपूर्व हा स्पर्श परी तुजलागीं । मर्मज्ञ तूं जगीं कामलुब्ध ॥ ७ ॥
परी मत्त गज मर्दील हा सिंह । पाहो मृतदेह सुदेष्णा ती ॥ ८ ॥
निष्कंटक मार्ग तेणें सैरंध्रीचा । निरंतर सौख्या भोगील ती ॥ ९ ॥
ऐसें बोलूनियां ओढीयेले केश । दारुण युद्धास प्रारंभ तें ॥ १० ॥
वासुदेव म्हणे विस्मित कीचक । प्रवर्ते युद्धास क्रोधावेशें ॥ ११ ॥

५४

वाली, सुग्रीव कीं मेरु, हिमाचल । अथवा शार्दूल गज जेंवी ॥ १ ॥

तैसें घोर द्वंद्व आरंभिलें त्यांनीं । ताडन करूनि एकमेकां ॥ २ ॥
वेळूभेदें जैसा येई घोर नाद । तैसा फटाफट नाद येई ॥ ३ ॥
झंझावातासम भीम गदगदां । हालवी कीचका परी व्यर्थ ॥ ४ ॥
जानूवरी पाडी कीचक भीमासी । तदा त्या वीरासी क्रोध येई ॥५॥
वक्षःस्थलीं केलें वलिष्ठ ताडन । कीचकाचे प्राण कासावीस ॥६॥
फिरूनि ताडितां वैसला तो खालीं । चाल अंगावरी करी भीम ॥
आंवळूनि करी विव्हल तयासी । कंठ दावितांचि फिरले नेत्र ॥८॥
वुवुळ बाहेरी येतां टेंची देह । किंचाळे विक्राळ कीचक तें ॥ ९ ॥
वांकवोनि ग्रीवा ओढी फरफर । शवावरी वीर उभा राहे ॥ १० ॥
वासुदेव म्हणे क्रुद्ध भीमसेन । दंतोष्ठ चावून हात चोळी ॥ ११ ॥

५५

तोडी हस्त-पाद, मस्तक वेगानें । खुपशी क्रोधानें शरीरांत ॥ १ ॥
शरीरावयव रचूनियां ऐसे । पाचारी कृष्णेतें आनंदानें ॥ २ ॥
अवस्था पशूची कृष्णे पहा कैसी । बोलला साध्वीसी महावीर ॥
प्रज्वलित अग्नि करूनियां दावी । शवावरी ठेवी पाय त्याच्या ॥४॥
म्हणे जे दुरात्मे गती तयां ऐसी । पाहीं कीचकासी शांत चित्तें ॥
पुढती निरोप घेऊनियां गला । गांठी पाकशाला आनंदानें ॥ ६ ॥
कृतार्थ सैरंध्री जावूनि बाहेरी । निवेदी सत्वरी संरक्षकां ॥ ७ ॥
म्हणे गंधर्वांनीं मारिलें दुष्टासी । धांवोनियां येती दूत सर्व ॥ ८ ॥
विस्मित ते हस्त-पाद निरखून । करिती निरीक्षण शरीराचें ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे दीपावरी कीट । घालितां झडप नाश पावे ॥ १० ॥

अध्याय २३ वा

५६

अवलोकिताती बांधव येवोनि । रूदन मांडोनि रोमांचित ॥ १ ॥
इतुक्यांत उभी कृष्णा तयां दिसे । वधा या दुष्टेतें म्हणती कोणी ॥
अंतीं राजआज्ञा घेवोनि तियेसी । बांधूनियां नेती प्रेतासवें ॥ ३ ॥
जियेमुळें नाश कीचकाचा आजी । म्हणती ते स्वर्गीं भेटो तया ॥
घोर प्रसंगीं त्या जय, जयंतांसी । बाहोनियां सती शोक करी ॥५॥
ऐकोनि ते शब्द वल्लव गर्जेला । शब्द कानीं आला भिऊं नको ॥६॥

पुढती प्रयत्नें गंधर्व वेगानें । जावोनि क्रोधानें उपटी वृक्ष ॥ ७ ॥
पाहोनि तयासी दुष्ट घावरले । परी झोडपिलें सकळांगीं ॥ ८ ॥
एकशत पांच कीचकांचा नाश । करोनि कृष्णेस सोडविलें ॥ ९ ॥
सैरंध्रीस म्हणे निर्भय तूं जांई । आश्चर्य त्या ठांई सकळां वाटे ॥
वासुदेव म्हणे दुष्कर्माचें फळ । लाभतें तत्काळ दुर्जनासी ॥ ११ ॥

अध्याय २४ वा ५७

विस्मित अवघे, वृत्त विराटासी । कथूनि उपायासी म्हणती योजीं
सैरंध्रीचें रूप मानव स्वभाव । शूर ते गंधर्व, नाश टाळीं ॥ २ ॥
राव म्हणे अग्निसंस्कार एकत्र । सकलां त्वरित सन्मानें द्या ॥ ३ ॥
सुदेष्णेसी म्हणे सैरंध्रीलागूनि । यथेच्छ स्वस्थानीं जाऊं द्यावें ॥
इतुक्यांत कृष्णा, नगरीं प्रवेशे । पाहूनि तियेतें पळती लोक ॥ ५ ॥
झांकिताती नेत्र, पळताती कोणी । बैसती लपूनि कोणी भयें ॥ ६ ॥
पाकशालाद्वारीं पाही गजेंद्रासी । हांसोनि 'त्रात्यासी नमन' म्हणे
भीम म्हणे जयां वास्तव्य या स्थानीं । ऋण मुक्त जनीं विचरोत ते ॥
नृत्य शालाद्वारीं म्हणती कन्यका । अये हर्ष चित्ता पाहोनियां ॥
वासुदेव म्हणे बृहन्नला वृत्त । सुटकेचें समस्त पुशीतसे ॥ १० ॥

५८

कृष्णा म्हणे तुज बृहन्नले सौख्य । सैरंध्रीचें दुःख तुजसी काय ॥
यास्तव हांसोनि प्रश्न हा करिसी । बृहन्नला दुःखी होई बहु ॥ २ ॥
म्हणे क्लैब्य मज गांजी सर्वकाळ । काय माझे हाल जाणसी तूं ॥
अन्याचें हृदय कळेना अन्यासी । मंदिरीं सैरंध्री पुढती जाई ॥ ४ ॥
पाहोनि तियेसी राणी म्हणे अये । यथेच्छ त्वां जावें भय आम्हां
रूपवती तुझे महाक्रोधी पती । रायालागीं भीति वाटतसे ॥ ६ ॥
ऐकूनि सैरंध्री म्हणे तेरा दिन । सांभाळावी दीन गाय सुखें ॥ ७ ॥
पुढती कृतार्थ होतील गंधर्व । करितील प्रिय नृपाळाचें ॥ ८ ॥
कल्याण नृपाचें निश्चयें होईल । नृपाळ सांभाळ करो माझा ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे बोले दीनवाणी । समाप्त या स्थानीं कीचकवध ॥

# गोहरणपर्व ४

अध्याय २५ वा ५९

परिवारासवें वध कीचकाचा । विषय जनांचा अन्य नसे ॥ १ ॥
युक्तायुक्त चर्चा करिती सकळ । कौरवांचे हेर सकळ देशीं ॥ २ ॥
पांडवांचा शोध न लागे तयांसी । हस्तिनापुरासी कथिती वृत्त ॥
पदचिन्हांकित अवनी हिंडलों । द्वारकेसी गेलों सूतांमागें ॥ ४ ॥
परी व्यर्थ यत्न, विनाश तयांचा । वाटे आम्हां, पंथा दावीं पुढें ॥
बांधवांसमेत त्रिगर्तांचा हंता । गेला यमलोका सुवार्ता हे ॥ ६ ॥
गुप्तरूपें नाश गंधर्वांच्या हस्तें । आनंद चित्तातें तुमच्या होवो ॥
वासुदेव म्हणे हेरांची हे वाणी । कौरव ऐकूनि चिंताकुल ॥ ८ ॥

अध्याय २६ वा ६०

तटस्थ नृपाळ बोले सकलांसी । नकळे मजसी पुढती काय ॥ १ ॥
चिंतन एकचि असेल सकळां । शोध आपणाला लागो त्यांचा ॥
अल्पकाल आतां अवशिष्ट राहिला । दुःख आपणाला पुढती बहु ॥
कालज्ञ प्रतिज्ञा करितील पूर्ण । सत्यपरायण बळिवंत ॥ ४ ॥
कर्ण म्हणे राया, नूतन हेरांसी । योजूनि तयांसी शोधूं आतां ५ ॥
दुःशासन म्हणे प्रामाणिक हेरां । संतोषवीं आर्या, प्रदानेंसी ॥ ६ ॥
शोधितांहि शोध न लागेल जरी । गेले पैलतीरीं सागराच्या ॥ ७ ॥
अथवा वनांत जाहले ते नष्ट । योजीं उपायांस शोधास्तव ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कौरव यापरी । चिंतिती अंतरीं कार्यास्तव ॥ ९ ॥

अध्याय २७ वा ६१

जितेंद्रिय ते धर्मज्ञ । सुखें वसती म्हणे द्रोण ॥ १ ॥
परस्पर ऐक्यभावें । वसतां दैन्य कां बाधावें ॥ २ ॥
काल प्रतीक्षा करिती । गुप्त रूपें वीर ऐसी ॥ ३ ॥
करा उपाय सत्वरी । दुर्ज्ञेय ते असती जरी ॥ ४ ॥
युधिष्ठिर पुण्यवंत । कैसा ओळखे कोणास ॥ ५ ॥

सिद्ध ज्ञात्यांसी योजूनि । त्वरित हित घ्या साधूनि ॥ ६ ॥
द्रोण म्हणे सामान्यांचें । कार्य नव्होचि हें साचें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे इष्ट । कठिण कार्जीं कुशल दूत ॥ ८ ॥

अध्याय २८ वा ६२

भीष्म म्हणे दुर्योधना । शोर्यी वीरांसी सुस्थाना ॥ १ ॥
महायोद्धे हरिभक्त । शक्य नसे त्यांचा अंत ॥ २ ॥
तुम्हांलागीं नीतिबोध । करूं नयेचि हें सिद्ध ॥ ३ ॥
परी कथितों हिताचें । घेऊं नयेचि निंद्यार्थें ॥ ४ ॥
पुण्यवंतांचा निवास । न घडे सामान्य देशास ॥ ५ ॥
कर्णा, सात्विक, समृद्ध-। प्रदेशांत, त्यांचा वास ॥ ६ ॥
वेद-घोष, धर्म जेथें । युधिष्ठिर वसे तेथें ॥ ७ ॥
धन-धान्याची अभिवृद्धि । दह्या-दुधाची समृद्धि ॥ ८ ॥
निर्भयता दान जेथें । वसतील पांडव तेथें ॥ ९ ॥
वृद्ध सांगतो हा ऐका । द्वेष त्यांचा करूं नका ॥ १० ॥
ऐकूनि हा माझा बोध । करा आपुलें स्वहित ॥ ११ ॥
वासुदेव म्हणे भीष्म । करिती निर्मळ भाषण ॥ १२ ॥

अध्याय २९ वा ६३

कृपाचार्य म्हणे दुर्योधनाप्रति । उपेक्षा शत्रूंची करूं नये ॥ १ ॥
अज्ञात पांडव तोंचि, मिळवी दळ । जाणें आपपर चातुर्यानें ॥ २ ॥
सैन्य, बळ, कोश, नीति, चिंतूनियां । पंथ आक्रमावा स्वहिताचा ।
शत्रु, मित्र तेंवी उदासीन कोण । जाणूनि वर्तन करीं राया ॥ ४ ॥
संधि-विग्रहादि जाणूनि नियम । तेंवी साम, दान उपायहि ॥ ५ ॥
सैन्य-कोशवृद्धि करितां विजय । कथी वासुदेव कृपवाक्य ॥ ६ ॥

अध्याय ३० वा ६४

बोले त्रिगर्ताधिपति । नाम सुशर्मा जयासी ॥ १ ॥
मत्स्य, शाल्व कीचकांची । बहुत पीडा आम्हांप्रति ॥ २ ॥
झाला विराट पोरका । जातां कीचक यमलोका ॥ ३ ॥

संधि असे विजयाची । जिंकूं त्वरित विराटासी ॥ ४ ॥
त्रिगर्तांसी तेणें तोष । वाढे कौरव सामर्थ्य ॥ ५ ॥
ऐकूनि हें तुष्ट कर्ण । देई तया अनुमोदन ॥ ६ ॥
दुर्बलांची काय चिंता । विजय संपादूं हा आतां ॥ ७ ॥
दुर्योधनही तत्काळ । म्हणे सिद्ध करा दळ ॥ ८ ॥
जावें सुशर्मा पुढती । जाऊं आपण मागुती ॥ ९ ॥
त्वरित जाऊनियां आणूं । हरूनियां लक्ष धेनु ॥ १० ॥
कृष्ण अष्टमी आषाढ । विराटासी देती कष्ट ॥ ११ ॥
वासुदेव म्हणे काल । करी क्रिया परस्पर ॥ १२ ॥

अध्याय ३१ वा ६५

येऊनियां गोप वंदी नृपाळासी । विराटपुरीसी दुःखाकुल ॥ १ ॥
जिंकिलें आम्हांसी रणीं त्रिगर्तांनें । हरिलीं गोधनें रक्षीं नृपा ॥ २ ॥
ऐकूनि तत्काळ सैन्य केलें सज्ज । भ्राता 'शतानीक' सिद्ध होई ॥
अनुज तयाचा मदिराक्ष तोही । सिद्ध तदा होई युद्धास्तव ॥ ४ ॥
विराट त्या वेळीं बोले बांधवासी । कंक बल्लवही महाबळी ॥ ५ ॥
तया चौघांप्रति युद्धार्थ पाचारीं । येतील सत्वरी ऐसें वाटे ॥ ६ ॥
आज्ञा मानूनियां मागोमाग जाती । गज, अश्व, रथी, बहुत सेना ॥
वासुदेव म्हणे धेनु रक्षणार्थ । ससैन्य विराट धांव घेई ॥ ८ ॥

अध्याय ३२ वा ६६

गर्जना करोनि मार्गं क्रमी सैन्य । गांठिले दुर्जन सायंकाळीं ॥ १ ॥
त्रिगर्त मत्स्यांचें जुंपे घोर युद्ध । धूळ गगनांत उधळे बहु ॥ २ ॥
शक्ति तोमरांचे आघात करिती । प्रेतें रणामाजी पडती बहु ॥ ३ ॥
विखुरले केश छिन्न हस्त-पाद । रणांगण व्याप्त रुधिर मांसें ॥ ४ ॥
विराट सुशर्मा एकमेकांवरी । धांवले सत्वरी परम क्रोधें ॥ ५ ॥
शस्त्रास्त्रें ताडन करिती एकमेकां । स्वपर सैनिकां नकळे कांहीं ॥
वासुदेव म्हणे घनघोर युद्ध । सुशर्मा विराट करिती क्रोधें ॥ ७ ॥

अध्याय ३३ वा

६७

दशदिशा धूलिव्याप्त । होई निशाकाल प्राप्त ॥ १ ॥
वीर ठेविती शस्त्रांसी । सहज लाभे त्यां विश्रांति ॥ २ ॥
कृष्ण सप्तमीचा चंद्र । उगवतांचि ते शूर ॥ ३ ॥
चांदण्यांत करिती युद्ध । शौर्यें धांवला त्रिगर्त ॥ ४ ॥
तदा विराटासमवेत । होई त्याचें द्वंद्व-युद्ध ॥ ५ ॥
विराटासी जर्जर केलें । त्याच्या रक्षकां वधिलें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे दैन्य । दैवें भोगिती सज्जन ॥ ७ ॥

६८

कामुक सुस्त्रीसी हरी बलात्कारें । कर्म तेंवी केलें सुशर्म्यानें ॥१॥
विराटासी वेगें घाली रथावरी । हरूनि सत्वरि नेई तदा ॥ २ ॥
बावरूनि सैन्य पळतांचि कंक । बोले बल्लवास धांव घेई ॥ ३ ॥
संकटीं येऊनि रक्षावें नृपासी । राहिलों गृहासी सौख्यें त्य च्या ॥
साह्य तयालागीं होतां संकटांत । होऊं ऋणमुक्त भीमा सुखें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कृतज्ञ जे शूर । तैसेचि उदार धन्य जगीं ॥ ६ ॥

६९

भीम म्हणे धर्मा, अतर्क्य विक्रम । पहा मी दावीन स्वस्थ रहा ॥१॥
उत्पाटूनि वृक्ष झोडपीन यांसी । धर्म म्हणे ऐसी नको क्रि या॥२॥
असामान्य नको होऊं ऐशा रीति । भीम धरी हातीं चाप तदा ॥३॥
पाहोनि विराटा, म्हणे साधो आलों । त्रिगर्ता सज्जलों पळूं नको ॥
सचिंत सुशर्मा पाहोनि तयासी । सक्रोध युद्धासी प्रवर्तला ॥ ५ ॥
बल्लवानें रथ, गज, पायदळ । संहार अपार चालविला ॥ ६ ॥
पाहोनि सुशर्मा खवळूनि धांवे । परी अंतीं पावे बहुत हानी ॥७॥
वासुदेव म्हणे धर्मादि सकळ । वीर ते प्रबळ करिती युद्ध ॥ ८

७०

एक सहस्र धर्मानें । सात सहस्र भीमानें ॥ १ ॥

नकुळानें सप्त शत । सहदेवें तीन शत ॥ २ ॥
वीर वधिले संग्रामीं । धर्म त्रिगर्तासी रणीं-॥ ३ ॥
करी ताडन शरानें । कंका विद्ध केलें तेणें ॥ ४ ॥
इतुक्यांत वृकोदरें । रणीं दुष्टासी पाडिलें ॥ ५ ॥
मदिराक्ष पुढती झाला । ताडियेलें सुशर्म्याला ॥ ६ ॥
अंतीं सोडूनियां रण । भयें करी पलायन ॥ ७ ॥
वृकोदर म्हणे त्यासी । नेई शौर्यें या धेनूंसी ॥ ८ ॥
अनुचरांसी सोडून । काय करिसी पलायन ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे भीमा । थांब बोलला सुशर्मा ॥ १० ॥

७१

विराट त्या वेळीं संधि साधूनियां । गदा घेऊनियां घुसला रणीं ॥
विक्रमी भीमानें त्रिगर्ता ओढिलें । बहुत चारिले मुष्टिलड्डू ॥ २ ॥
मूर्छित तो होतां सैन्य सैरावैरा । पळे सुशर्म्याला भीम धरी ॥ ३ ॥
सोडवूनि धेनु लुटियेलें धन । वंदिलें जाऊन विराटासी ॥ ४ ॥
ओढूनियां मान सुशर्म्यासी भीम । बांधितांचि शून्यसंज्ञ होई ॥
सोडीं सोडीं म्हणे तयालागीं धर्म । दास तरी मान्य भी म्हणे ॥
धर्म म्हणे सोडीं, दास्य विराटाचें । मान्य सुशर्म्यातें, वधुं नको ॥
मुक्त करी धर्म, दास्यपाशांतूनि । पुन्हां या दुष्कर्मीं न रमें म्हणे ॥
वासुदेव म्हणे दयाळु तो धर्म । औदार्याचें कर्म नित्य करी ॥ ९ ॥

अध्याय ३४ वा

७२

विराटासी सुशर्म्यानें । केलें वंदन लज्जेनें ॥ १ ॥
पुढती गेला नगरासी । राव गौरवी वीरांसी ॥ २ ॥
सालंकृत कन्या, धन । कंका, राज्य हें अर्पीन ॥ ३ ॥
ऐसें बोलला तयांसी । तुम्हांमुळें सुटका माझी ॥ ४ ॥
धर्म म्हणे विराटासी । भाषणें या हर्ष चित्तीं ॥ ५ ॥
करीं आतां विजयोत्सव । नगरीं प्रवेशला राव ॥ ६ ॥
झालें स्वागत थाटानें । जयजयकार ये मुखानें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे धन्य । जगीं संत ते सज्जन ॥ ८ ॥

अध्याय ३५ वा ७३

इकडे दुर्योधन अमात्यांसमेत। धेनुहरणार्थ प्राप्त झाला ॥ १ ॥
भीष्म, द्रोण, कर्ण, कृप, अश्वत्थामा। पातला त्या स्थाना दुःशासन
विविंशति, तेंवी विकर्ण, दुर्मुख। शकुनि, दुःशल, चित्रसेन ॥ ३ ॥
सकलांनीं धेनु वेढिल्या बहुत। ताडूनि रक्षक गोपालांसी ॥ ४ ॥
गोपाध्यक्ष येई आक्रोश करीत। कथीतसे वृत्त समस्तांहि ॥ ५ ॥
'भूमिंजय' नाम 'उत्तर' ज्या दुजें। ऐके गोपमुखें वृत्तांत तो ॥
बालिशपणानें तदा अंतःपुरीं। आत्मश्लाघा करी अहंभावें ॥ ७ ॥
साठ सहस्र त्या धेनु सोडवाव्या। हर्ष वासुदेवा गोपशब्दें ॥ ८ ॥

अध्याय ३६ वा ७४

भूमिंजय म्हणे सारथीच नाहीं। करूं तरी काई शौर्य व्यर्थ ॥ १ ॥
महायुद्धामाजी सारथी निमाला। अन्य न उरला मजलागीं ॥ २ ॥
लाभतां सारथी गर्जना करीन। युद्धांत हरीन कौरवांसी ॥ ३ ॥
दुजा धनंजय भासेन तयांसी। बोले कन्यकांसी कृष्णा तदा ॥ ४ ॥
बृहन्नला कार्य करील, ते पूर्वी। होती पांडवांसी साह्य सांगे ॥ ५ ॥
येऊनि सैरंध्री कथी उत्तरासी। शिष्या हे पार्थाची बृहन्नला ॥ ६ ॥
अग्निलागीं वन अर्पितां, सारथ्य। करूनियां पार्थ संरक्षीला ॥ ७ ॥
भगिनीसी सांगे कार्य तें उत्तर। जाई ते सत्वर नृत्यस्थानीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कालगति थोर। घटना अपूर्व घडवी जनीं ॥ ९ ॥

अध्याय ३७ वा ७५

दिव्यमालाधारी उत्तरा पार्थासी। वृत्तांत निवेदी उत्तराचा ॥ १ ॥
म्हणे कौरवांनीं धेनु हरियेल्या। साह्य बांधवाला होई आतां ॥२॥
खांडववनांत पार्थाचें सारथ्य। केलेंसी हें ज्ञात सैरंध्रीसी ॥ ३ ॥
ऐकूनियां पार्थ उत्तरासन्निध। येतां होई मोद द्रौपदीतें ॥ ४ ॥
जाणूनि अर्जुन अज्ञान पांघरी। विनोद मंदिरीं केला बहु ॥ ५ ॥
चढवूनि कवच उलटेंचि आधीं। जानुरक्षा बांधी मस्तकासी ॥

भुजारक्षण तें कंठांत, मस्तकीं-। पृष्ठरक्षणासी, योजीतसे ॥ ७ ॥
जाणूनि अज्ञान उत्तर स्वहस्तें । बांधी कवचातें हांसोनियां ॥ ८ ॥
बैसतां रथांत बोलती त्या कन्या । मृदु वस्त्रें आम्हां हरूनि आणी ॥
पार्थ म्हणे जरी जिंकील अरींसी । तरी बाहुल्यांची स्मृति मज ॥
वासुदेव म्हणे खांडववनीं जें । मंगल होवो तें म्हणती कन्या ॥

अध्याय ३८ वा

७६

राजपुत्र म्हणे बृहन्नलेप्रति । जिंकीन रणासी कौरवांतें ॥ १ ॥
इतुक्यांत येई सेना कौरवांची । स्मशानीं शमीसी पाही पार्थ ॥२॥
पाहोनियां सेना उत्तर घाबरे । म्हणे बृहन्नले काय करूं ॥ ३ ॥
अजिंक्य हे वीर कंपित करिती । मूर्छना मजसी येई पाहें ॥ ४ ॥
शून्य नगरीं या एकाकी मी वीर । सैन्य तें सकळ पित्यासवें ॥५॥
बृहन्नले रथ फिरवीं माघारा । बाळ मी एकला कैसा लढूं ॥ ६ ॥
पार्थ म्हणे वीरा, हर्ष कां वैऱ्यांचा । घाबरूनि ऐसा वाढवीसी ॥
स्तवूनि आपणा धाडिलें रणासी । लढेन वैऱ्यांसी मीचि आतां ॥
राजपुत्र म्हणे कोपेल नृपाळ । संरक्षूं नगर जाऊनियां ॥ ९ ॥
ऐसें बोलूनियां धनुष्य त्यागून । केलें पलायन उत्तरानें ॥ १० ॥
पाहूनियां पार्थ धांवला मागूनि । वासुदेव मनीं चिंती हरि ॥ ११ ॥

७७

पाहूनियां तया सैनिक हांसती । वेणी याच्या पृष्ठीं म्हणती रुळे ॥
अल्पावकाशेंचि म्हणती हा पार्थ । एकाकी युद्धार्थ प्राप्त झाला ॥
पाहूनियां सेना पळतां, कुमारासी । आंवरी पार्थचि म्हणती वाटे ॥
कौरव सेनेचे तर्क हे चालतां । उत्तरासी उभा करी पार्थ ॥ ४ ॥
उत्तर विनवी पार्थासी बहुत । परी धरी पार्थ तयालागीं ॥ ५ ॥
म्हणे तूं क्षत्रिय हो माझा सारथी । भिऊं नको चित्तीं रक्षीन मीं ॥
जिंकूनि कौरवां धेनु सोडवीन । करीन संग्राम पाहें आतां ॥ ७ ॥
ऐसें बोलूनियां रथावरी स्थापी । लगामहि हातीं देई त्याच्या ॥८॥
वासुदेव म्हणे दुश्चिन्हें असंख्य । होती कौरवांस तया वेळीं ॥ ९ ॥

अध्याय ३९ वा ७८

रथारूढ पार्थ प्रहर्षित झाला । सवेग गांठिला शमीतरु ॥ १ ॥
उत्पात त्या वेळीं होती कौरवांसी । भीष्म, द्रोण चित्तीं खिन्न झाले
द्रोण म्हणे वायु सुटला भयानक । गगन हें व्याप्त अंधःकारें ॥ ३ ॥
मेघ हे समस्त दिसताती उग्र । शस्त्रास्त्रें बाहेर येतीं स्वयें ॥ ४ ॥
पश्चिम दिशेसी भालू ओरडती । अश्रु हे ढाळिती अश्व पहा ॥ ५ ॥
क्लीबवेषें पार्थ आला निश्चयेंसी । लढला किरातासी हिमाचलीं ॥६॥
प्रतियोद्धा मज न दिसे या कोणी । क्रुद्ध कर्ण मनीं स्तवितां पार्था ॥
म्हणे कां निंदितां स्तवूनि पार्थासी । नसे तो आम्हांसी शतांशहि
राजा म्हणे पार्थ असतां कार्य झालें । नसतां हरिले प्राण जाणा ॥
वासुदेव म्हणे ऐकूनि ते शब्द । स्तविती भीष्मादिक दुर्योधना ॥

अध्याय ४० वा ७९

युद्धशास्त्रामाजी जाणूनि अपात्र । उत्तरासी पार्थ वदतसे ॥ १ ॥
शमीवरूनि हीं धनुष्यें काढावीं । त्वरित या जाई वृक्षावरी ॥ २ ॥
पांडवांचे ध्वज, शर, चाप पथें । पाहीं तीं कवचें वृक्षावरी ॥ ३ ॥
लक्ष धनुष्यांची योग्यता जयासी । पार्थ धनुष्यासी अवलोकावें ॥
तोलेना इतरां परी तृणासम । मजलागीं जाण लघूचि तें ॥ ५ ॥
शस्त्रामाजी श्रेष्ठ सुवर्णभूषित । शस्त्रें, पांडवांस जाणें ऐसीं ॥ ६ ॥
तापदायक तीं शत्रुसेनेप्रति । वासुदेव चित्तीं शस्त्रां वंदी ॥ ७ ॥

अध्याय ४१ वा ८०

उत्तर तें बोले बृहन्नले कैसें । स्पर्शावें शवातें राजपुत्रें ॥ १ ॥
निंद्य अव्यवहार्य कथिसी हें कर्म । पार्थ म्हणे धर्म कथिला तुज ॥
वृक्षावरी चढे ऐकूनि 'उत्तर'। चाप दे, सत्वर पार्थ म्हणे ॥ ३ ॥
सोडितां वेष्टन दिसती दिव्य शस्त्रें । सर्वत्र पसरे तेज त्यांचें ॥ ४ ॥
पाहूनि कंपित होई राजपुत्र । वंदूनि शस्त्रांस बोलतसे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अपूर्व वस्तूचा । श्रेष्ठ संरक्षिता स्वाभाविक ॥ ६ ॥

अध्याय ४२-४३ वा ८१

विस्मित उत्तर, म्हणे बृहन्नले । कोणाचीं हीं शस्त्रें सांगें मज ॥१॥
बृहन्नला म्हणे शत चक्रांकित । पार्थाचें धनुष्य जाण बाळा ॥ २ ॥
देव-दानवांनीं पूजिलें हें चाप । ब्रह्मयाच्या करांत लक्ष वर्षें ॥ ३ ॥
पांच शतें तीन वर्षें प्रजापति । इंद्र पंच्यायशीं संवत्सर ॥ ४ ॥
पंचशतवर्षें सोमाच्या करांत । वरुण वर्षें शत धारण करी ॥ ५ ॥
पंचषष्टि वर्षें भूषवील पार्था । प्रसाद वरुणाचा पार्थालागीं ॥ ६ ॥
सुवर्ण गजांनीं चिन्हित हें चाप । भीमाच्या करांत शोभतसे ॥ ७ ॥
तपनीय इंद्रगोप जयावरी । युधिष्ठिराकरीं शोभे धनु ॥ ८ ॥
सुवर्ण सूर्यांनीं चित्रित नकुला । तपनीय भ्रमरां शोभवी जें ॥ ९ ॥
धारण करी तें चाप सहदेव । म्हणे वासुदेव श्रवण करा ॥ १० ॥

८२

सर्पासम बाण जाणें अर्जुनाचे । अर्धचंद्र साचे भीमशर ॥ १ ॥
हरिद्रवर्ण हा नकुळाचा कलाप । सहदेव सायक सूर्याकृति ॥ २ ॥
त्रिपर्व हेमाचे शर हे धर्माचे । खड्ग हें पार्थाचें शिलीमुख ॥ ३ ॥
वैय्याघ्रकोशीं हें वृकोदर खड्ग । खड्ग हें प्रचंड नृपाळाचें ॥ ४ ॥
अज चर्माच्छन्न खड्ग नकुळाचें । सहदेव हातींचें गोत्रमांत ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वृत्त विश्वासार्थ । कथी उत्तरास सकल ऐसें ॥ ६ ॥

अध्याय ४४ वा ८३

म्हणे उत्तर विस्मित । वीर कोठें ते सांप्रत ॥ १ ॥
धर्मराज, भीमा-र्जुन । पांचाळीचें कवणस्थान ॥ २ ॥
हर्षे बोले बृहन्नला । जाणें पार्थ तूं मजला ॥ ३ ॥
कंक तोचि जाणें धर्म । वल्लव तो भीमसेन ॥ ४ ॥
ग्रंथिक तो सहदेव । नकुल तोचि तंतिपाल ॥ ५ ॥
सैरंध्री ते याज्ञसेनी । वसते सुदेष्णासदनीं ॥ ६ ॥
म्हणे उत्तर, पार्थाचीं । नांवें सांगें तूं मजसी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे नामें । ऐक पार्थाचीं सुखानें ॥ ८ ॥

१ मीन्याचे. २ बाण. ३ बेडकीसारखें तोंड असलेलें.

८४

अर्जुन, फाल्गुन, जिष्णु तैं किरीटी। श्वेतवाहन तैं बिभत्सु तो ॥१॥
विजय ही कृष्ण, सव्यसाची तैंवी। धनंजय ऐसीं नामें दश ॥ २ ॥
पार्थ म्हणे ऐकें कारणें उत्तरा। ऐकूनि निर्धारा करीं मनीं ॥ ३ ॥
रुजुकर्मे मज अर्जुन हें नाम। प्रथम दिनीं जन्म फाल्गुनांत ॥ ४ ॥
जयशीला जिष्णु नाम हें उत्तरा। किरीट अर्पिला इंद्रें मज ॥ ५ ॥
श्वेतवाहन मीं अश्व माझे शुभ्र। निंदितों निंद्यांस बीभत्सु मी ॥६॥
नित्य विजयी मी म्हणूनि विजय। सांगे धनंजय नाम सार्थ ॥ ७ ॥
ओढितों धनुष्य उभय करेंसी। तेणें सव्यसाची म्हणती मज ॥८॥
कृष्ण मज नाम ठेविलें पित्यानें। चित्ताकर्षणानें बालपणीं ॥ ९॥
ऐकूनि उत्तर वंदी तयाप्रति। नामद्वय कथी आपुलें त्या ॥१०॥
म्हणे जे अज्ञानें अपराध घडले। पार्था क्षमा केले पाहिजे त्वां ॥
वासुदेव म्हणे निर्भय उत्तर। जाहला तत्काळ तया वेळीं ॥१२॥

अध्याय ४५ वा

८५

उत्तर उत्साहें म्हणे कथिसील। तेथेंचि जाईल रथ आतां ॥१॥
पार्थ म्हणे आणीं शस्त्रें सर्व खालीं। ठेवीं रथावरी बांधूनियां ॥२॥
आज्ञा मान्य करी उत्तर त्वरित। अभय त्या पार्थ देई तदा ॥ ३ ॥
म्हणे माझे बाहु रक्षितील तुज। जैंवी सदनांत असती सुखें ॥ ४॥
राजपुत्र म्हणे इंद्र कीं केशव। मानूनि निर्भय जाहलों मी ॥५॥
परी एक शंका बाधा करी मज। वीराप्रति क्लैब्य कैसें येई ॥ ६ ॥
पार्थ म्हणे एक वर्ष माझें व्रत। जाहलें सांप्रत पूर्ण आतां ॥७॥
राजपुत्र म्हणे दारुकासमान। करीन मी कर्म सारथ्याचें ॥८॥
केशवासमान अश्व या रथाचे। पार्था तूंचि यांतें योग्य वीर ॥९॥
वासुदेव म्हणे उत्तर अश्वांची। शैब्य सुग्रीवांसी तुलना करी ॥

८६

सोडी कंकणें अर्जुन। बांधी करीं तलत्राण ॥१॥
शुभ्र वस्त्रें कुरळे केश। बांधी हाइ शुचिर्भूत ॥२॥

१ भूमिंजय व उत्तर.

चिंतितांचि सकल अस्त्रें । सज्ज जाहलीं सेवेतें ॥३॥
प्रार्थूनियां तयांप्रति । वेगें ओढी प्रत्यंचेसी ॥४॥
ध्वनि प्रचंड जाहला । झंजावात तैं सुटला ॥५॥
विद्युल्लता चमकती । वीर पार्था ओळखिती ॥६॥
म्हणे उत्तर पार्थासी । कैसा लढसील एकाकी ॥७॥
वासुदेव म्हणे पार्थ । भिऊं नको कथितो ऐक ॥८॥

८७

चित्ररथासी जिंकितां । कोण माझा साह्यकर्ता ॥१॥
अग्नीलागीं खांडववन । देतां साह्यकर्ता कोण ॥२॥
युद्ध करितां पौलोमांसी । नव्हतें कोणीही साह्यासी ॥३॥
स्वयंवरीं साह्यकर्ता । कोण मजलागीं होता ॥४॥
गुरु द्रोण, तैं कुबेर । यम, वरुण, अग्नि, इंद्र ॥५॥
वासुदेव, कृपाचार्य, । शूलपाणी तो शंकर ॥६॥
अनुग्रहें या सर्वांच्या । काळचि मी कौरवांचा ॥७॥
सोडीं व्यग्रता चित्ताची । हांकीं सत्वरीं रथासी ॥८॥
वासुदेव म्हणे पार्थ । धन्य धन्य पुण्यवंत ॥९॥

अध्याय ४६ वा

८८

प्रदक्षिणा घाली शमीवृक्षाप्रति । उत्तर सारथी धनंजय ॥१॥
सिंहाकारध्वज टाकिला काढूनि । प्रार्थितां गगनीं फडके ध्वज ॥
पीतवर्ण सिंहपुच्छ कपीरूप । प्रगटे अद्भुत ध्वज रथीं ॥ ३ ॥
प्रार्थितां अग्नीसी दिव्य बाणवृष्टि । प्रदक्षिणा त्यासी घाली पार्थ ॥४॥
गोधांगुलित्राण, गांडीवधारण । करूनि अर्जुन उत्तरेसी- ॥ ५ ॥
हांकूनियां रथ फुंकी देवदत्त । होतां दिव्य नाद आश्चर्यचि ॥ ६ ॥
गुढघे टेंकिती अश्व, वीरां भीति । बैसला खालतीं राजपुत्र ॥ ७ ॥
थोपटूनि पाठ उठवी अश्वांसी । पार्थ उत्तरासी धीर देई ॥ ८ ॥
राजपुत्र म्हणे ऐसा भयप्रद । ऐकिला न नाद पूर्वी कदा ॥ ९ ॥
पुनरपि पार्थ म्हणे हा सावध । केला शंखनाद गगनभेदी ॥ १० ॥
वासुदेव म्हणे गुहा निनादल्या । लपूनि बैसला राजपुत्र ॥ ११ ॥

८९

रथ चक्र तैंवी प्रत्यंचेचा घोष । ऐकूनि राजास म्हणती द्रोण ॥ १ ॥
पार्थावीण वीर नसे हा नृपाळा । अग्नि मंद झाला पाहें माझा ॥२॥
घोर शब्दें पशु धांवती पूर्वेसी । ध्वजाग्रीं बैसती काक पाहें ॥ ३ ॥
गृध्र समोंवतीं फिरती सैन्याच्या । उत्साह वीरांचा नष्ट झाला ॥
सकळ या धेनु पाठवीं स्वदेशीं । सज्ज हो युद्धासी रचूनि व्यूहा ॥
वासुदेव म्हणे स्पष्टपणें द्रोण । करिती कथन दुर्योधना ॥६ ॥

अध्याय ४७ वा

९०

म्हणे दुर्योधन अकालीं अर्जुन । प्रगट होऊन कैसा येई ॥ १ ॥
कालगणनेचा निर्णय या भीष्म । पितामह जाण करो स्वयें ॥ २ ॥
यद्यपि संपूर्ण होतो त्यांचे दिन । अकालीं चालून यावें काय ॥ ३ ॥
कौरव-मत्स्यांच्या संगरीं कां यावें । त्रिगर्तासी केलें साह्य आम्हीं॥
विराटचि जरी असेल हा तरी । सज्ज व्हा संगरीं त्यजूनि भय ॥५॥
कर्ण म्हणे राया, पक्षपाती द्रोण । आधिपत्य काढून घेई त्याचें ॥ ६॥
पशु, पक्षी, नित्य संचार करिती । वायू वाहताती नित्य ऐसे ॥७॥
शकुन मानूनि प्रशंसा पार्थाची । करूनि आम्हांसी भय दावी ॥८॥
दयाळु हे सर्व आचार्य जाणावे । मंदिरीं बैसावें स्वस्थ यांनीं ॥९॥
पांडित्य करावें बैसूनि दारांत । अन्न-यज्ञदोष वर्णावे कीं ॥ १० ॥
यास्तव नृपाळा सारूनियां मागें । जाऊं युद्धमार्गे शौर्यें आम्हीं ॥
वासुदेव म्हणे द्रोणांचा अवमान । करूनियां कर्ण वदला ऐका ॥

अध्याय ४८ वा

९१

सैनिक हो ऐसे घाबरे कां तुम्हीं । पार्थासी या रणीं वधीन मी ॥१॥
अजिक्यचि द्रोण भीष्मादि अमर । घाबरे अंतर कैंवी त्यांचें ॥ २ ॥
त्रिभुवनकीर्ति पार्थ महावीर । तैसाचि मी शूर जगामाजी ॥३॥
गरुड सर्पासी तैसाचि मी पार्था । होईन संहर्ता रणामाजी ॥४॥
वारुळांत नाग तैंवी माझे शर । भेदूनि शरीर अरिचें जाती ॥५॥

जामदग्न्यास्त्रानें बलाढ्य मी लोकीं । ध्वजाग्रींचा कपि संहारीन ॥
दुर्योधनालागीं क्षणांत सुखवीन । पार्थासी ताडून रणांगणीं ॥७॥
पुढती जावोत धेनु कीं राहोत । विक्रम पाहोत सकल माझा ॥८॥
वासुदेव म्हणे कर्णाचे प्रलाप । ऐकूनियां कृप वदती ऐका॥ ९॥

अध्याय ४९ वा ९२

कर्णा नव्हे युद्ध कपटद्यूतासम । समय जाणून करितां यश ॥ १ ॥
अजिंक्य रथांत बैसतां अवेळीं । विजय न घाली माळ कोणा ॥२॥
उत्तर-कुरूंसी लढला एकाकी । पार्थ तो अग्नीसी प्रिय झाला ॥३॥
एकाकी व्रतस्थ, सुभद्राहरण । एकाकी अर्जुन करिता झाला ॥ ४ ॥
एकाकी मांडिलें किरातासी युद्ध । केला जयद्रथ दास तेणें ॥ ५ ॥
राहिला एकाकी स्वर्गामाजी पार्थ । केला पराभूत चित्रसेन ॥ ६ ॥
कालखंज तैंवी निवातकवच । वधी तदा पार्थ एकाकी तो ॥ ७ ॥
एकाकी कर्णाचा काय पराक्रम । ऐकूंदे वचन राधेयाचें ॥ ८ ॥
एकाकी पार्थासी समर हे वाचा । खेळ नव्हे बापा वैकर्तना ॥ ९ ॥
पाशमुक्त सिंह खवळला आजी । सज्ज व्हा रणासी सकळ आतां ॥
वासुदेव कथी कृपाचें वचन । ऐक्येंचि रक्षण शक्य आम्हां ॥११॥

अध्याय ५० वा ९३

मूकपणें अग्नि जाळी सकळांसी । प्रकाश विश्वासी देई सूर्य ॥ १ ॥
मूकपणें पृथ्वी तोली चराचर । प्रलापाचि फार करी कर्ण ॥ २ ॥
हरिल्या न धेनू नोल्लंघिली सीमा । अथवा स्वस्थाना नच गेला ॥३॥
बोलूनियां ऐसें क्रुद्ध अश्वत्थामा । पित्याच्या अपमाना न साहीचि ॥
शम-शौर्य-धन-सेवा-युक्त वर्ण[१] । गुरूंसी वंदन करिती नित्य ॥ ५ ॥
दुष्कृत्यें करूनि सद्गुरूची निंदा । कोण राधासुतावीण करी ॥ ६ ॥
कपटद्यूतानें जिंकूनियां राज्य । कोण जनीं वंद्य जाहलासे ॥ ७ ॥
राव दुर्योधन क्रूर हा निर्लज्ज । कासयासी व्यर्थ आढ्यता हे ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे क्रुद्ध अश्वत्थामा । ताडीतसे कर्णा कटु शब्दें ॥ ९ ॥

१ ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र

१४

कर्णा मजलागीं कथीं । जिंकिलेंसी कोणाप्रति ॥ १ ॥
धनंजय माद्रीसुत । जिंकिलेसी कीं रणांत ॥ २ ॥
इंद्रप्रस्थ नगरासी । सांग कदा जिंकिलेंसी ॥ ३ ॥
एकवस्त्रा रजस्वला । कोठें जिंकिली अबला ॥ ४ ॥
विदुराची सत्यवाणी । तरु मुळांत छेदूनि ॥ ५ ॥
धन, सुगंध इच्छिला । छळ पांडवांचा झाला ॥ ६ ॥
वीर कैसे अकस्मात । म्हणती येतील युद्धार्थ ॥ ७ ॥
अरे, कृमि कीटकही । अंतीं चवताळती पाहीं ॥ ८ ॥
पूर्वस्मरणेंचि विजय । म्हणे क्षुब्ध वासुदेव ॥ ९ ॥

१५

कर्णा, स्वस्थपणें करीं तूं पांडित्य । सकलांचा अंत करी पार्थ ॥ १ ॥
कोण त्या वीराची प्रशंसा करीना । देव-दानवांनां अजिंक्य तो ॥
पुत्रासम शिष्य, प्रिय सकलांसी । व्यर्थ कां पित्यासी निंदियेलें ॥
दुर्योधना खेळ खेळलासी सुखें । ओढिलें सभेतें पांचाळीसी ॥४॥
युद्ध करीं आतां तैसेंचि सुखानें । मातुलासी प्रेमें मार्ग पुसीं ॥५॥
गांडीव हें कदा नच फेंकी फांसे । कृत-द्वापरांचें नाम जयां ॥ ६ ॥
पर्वतभेदी ते विजयाचे शर । मार्गीं अणुमात्र न थांबती ॥ ७ ॥
वडवाग्नि, वायु, यमही तो क्षमा । करी, परी तुम्हां वधिल पार्थ ॥
धनंजयासवें इच्छीना मी युद्ध । यथेच्छ लढोत अन्य वीर ॥ ९ ॥
धनूंस्तव जरी येई मत्स्यपति । प्राप्तचि मजसी तरी रण ॥ १० ॥
वासुदेव म्हणे सौबल रक्षील । अश्वत्थामा बोले, बोले ऐसे ॥११॥

अध्याय ५१ वा

१६

भीष्म म्हणे कृप, अश्वत्थामा वीर । बोलले साचार कर्ण मूढ ॥१॥
धर्मज्ञहि स्वार्थें मोह पावतसे । रुचे तरी ऐकें राया माझें ॥ २ ॥
परशुरामाधीण द्रोणासम अन्य । वीर असे कोण अवनीवरी ॥३॥

---

१ छेदनतरु

ईर्षेस्तव कर्णें निंदिलें तयासी । नसोचि मानसीं द्वेष त्याच्या ॥ ४ ॥
गुरुपुत्रें त्यासी क्षमावें यास्तव । विरोधाची वेळ नसे जाणा ॥५॥
शाप-शर दोन्हीं सिद्ध ज्या द्रोणाचे । क्षमाचि त्या साजे श्रेष्ठ धर्म॥
पिता-पुत्र क्षमा करोत या वेळीं । भेद भयकारी जनीं सदा ॥ ७ ॥
अश्वत्थामा म्हणे वैन्याचेहि गुण । गुरूचे दुर्गुण कथिती आर्य ॥८॥
त्याचि न्यायें झालें वर्तन पित्याचें । निंदा कासयातें व्हावी ऐसी॥
वासुदेव म्हणे क्षमा दुर्योधन-। मागे. म्हणे कर्ण वदला रोषें ॥१०॥

९७

कर्ण, दुर्योधन, भीष्म । करिती द्रोणांसी वंदन ॥ १ ॥
द्रोण म्हणतो भीष्मवाणी । पटली माझ्या अंतःकरणीं ॥ २ ॥
करा सुविचार साचा । नाश टाळावा रायाचा ॥ ३ ॥
कांहीं योजूनियां युक्ति । युद्ध टाळावें पार्थासी ॥ ४ ॥
काळ निर्णय भीष्मानें । द्यावा राव वचनानें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे भीष्म । देती निर्णय चिंतून ॥ ६ ॥

अध्याय ५२ वा

९८

धार्तराष्ट्रा, काल अवयवहीन । करावें गणन गौण मार्गें ॥ १ ॥
सावनगणना करितां नव दिन । गेले उल्लंघून दुर्योधना ॥ २ ॥
विजयादशमी पराभव दिन । केलें गोग्रहण ग्रीष्मतूंत ॥ ३ ॥
यास्तव जाहला भ्रम तुजलागीं । कृतकृत्य जगीं पांडव हे ॥ ४ ॥
प्रतिज्ञा पालन केलें पूर्णपणें । कापट्य न जाणे धर्मराजा ॥ ५ ॥
अधर्म तयाचा नसे लवभरी । सिद्धता सत्वरी करा आतां ॥ ६ ॥
ऐक्य किंवा युद्ध हेचि आतां मार्ग । राजा म्हणे युद्ध करूं आम्हीं ॥
भीष्म म्हणे सैन्य जावो चतुर्थांश । रक्षो चतुर्थांश धेनूंप्रति ॥ ८ ॥
अर्ध सैन्यें आम्हीं करूं युद्ध सुखें। जाईं नगरातें दुर्योधना ॥ ९ ॥
मध्यभागीं द्रोण, सव्य, दाक्षिणेसी । गुरुपुत्र रक्षी तैवी कृप ॥ १० ॥
वासुदेव म्हणे आघाडीसी कर्ण । मागें संरक्षण करिती भीष्म॥११॥

अध्याय ५३ वा

९९

भीष्मआज्ञेसम होतांचि योजना । ऐकिली गर्जना रथघोषाची ॥१॥

गुरु म्हणे ऐका होई भुभु:कार। चरणावरी शर पडले माझ्या ॥२॥
कर्णासी लक्षूनि शर दोन गेले। वंदन जाहलें, अनुज्ञा हे ॥ ३ ॥
अग्नीसम वीर शोभे बहुत दिनीं। पाहियेला आम्हीं रणामाजी॥४॥
विराटपुत्रासी बोलला अर्जुन। राव दुर्योधन गांठू आधीं ॥ ५ ॥
कृपाचार्य हेतु जाणूनि क्षणांत। राव रक्षणार्थ जाऊं म्हणे ॥ ६ ॥
इकडे पार्थानें धेनूंसी गांठूनि। केला घोरध्वनि गगनभेदी ॥ ७ ॥
ऐकूनियां धेनु पळाल्या समस्त। विराटनगरींत प्राप्त झाल्या ॥८॥
वासुदेव म्हणे सैन्य तें विस्मित। पाहे तें कौशल्य मुग्धपणें ॥ ९ ॥

अध्याय ५४ वा

१००

जिंकूनियां धेनु पार्थ गर्जतसे। पाहोनियां योद्धे धांव घेती ॥ १ ॥
पार्थ म्हणे नेई कर्णावरी रथ। उत्सुक युद्धार्थ माझ्यासवें ॥ २ ॥
ऐकूनि ' उत्तर ' भेदूनियां व्यूह। कर्णाच्या समीप रथ येई ॥ ३ ॥
रक्षणार्थ तदा वीर बहु येती। दैना विकर्णाची करितां पळे ॥ ४ ॥
राव शत्रुंतप[1] होई गतप्राण। कर्णबंधु जाण स्वर्ग गांठी ॥ ५ ॥
कर्ण तदा क्रोधें पातला पुढती। ताडी उभयांसी क्रोधावेशें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे खवळूनि पार्थ। करी घोर युद्ध तयावेळीं ॥ ७ ॥

१०१

केला वर्षाव शरांचा। आच्छादिलें सर्वलोकां ॥ १ ॥
गेला झांकूनि तें कर्ण। भीष्म, कृप, तेंवी द्रोण ॥ २ ॥
करिती आक्रोश सैनिक। कर्ण न ढळे रति एक ॥ ३ ॥
देती सैनिक त्या स्फूर्ति। मोदें टाळ्या पिटिताती ॥ ४ ॥
कर्ण करी सिंहनाद। पाही गुरुजनां पार्थ ॥ ५ ॥
दोघे चंद्रसूर्यासम। शोभविती रणांगण ॥ ६ ॥
इतुक्यांत कर्ण, विद्ध। करी पार्थाच्या अश्वांस ॥ ७ ॥
पाहोनियां उसळला। कर्ण सर्वांगीं वेधिला ॥ ८ ॥
कासावीस झाले प्राण। केलें अंतीं पलायन ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे कर्ण। शराघातें बहु दीन ॥ १० ॥

१ संग्रामजित

अध्याय ५५ वा १०२

कर्णपलायन पाहूनियां वीर । पार्थावरी शर वर्षिताती ॥ १ ॥
परी पार्थवीर तयां करी विद्ध । व्रणहीनअंग नसे कोणी ॥२॥
सैनिकांचे हार गेले गगनांत । पतनासी पंथ नसे शरें ॥ ३ ॥
पार्थ सान्निध्याची संधी क्षणभरी । लाभे तो सत्वरी स्वर्गी जाई ॥
पार्थरूपें काळ पातला सैन्यांत । ऐसेंचि मनांत सकलांच्या ॥५॥
द्रोणादिक वीरां ताडिलें पार्थानें । उत्तरासी म्हणे कृपां गांठीं ॥६॥
रक्ताश्वसंयुत नीलकेतुयुक्त । तयांच्या सन्मुख रथ नेई ॥ ७ ॥
शीघ्रास्त्रेंही मम दावीन तयांसी । पुढती गुरूंसी वंदूं सुखें ॥८॥
कमंडलु चिन्ह ध्वजावरी ज्याच्या । तोचि गुरु माझा विप्रश्रेष्ठ ॥
प्रदक्षिणा तया घालूनि जाईन । उतरूनि वंदीन रणीं तया ॥१०॥
करील तो जरी प्रथम प्रहार । तरीच हे शर वाधती त्या ॥११॥
वासुदेव म्हणे पार्थाचा आदर । कोठें कर्ण क्षुद्र निंदी द्रोणा ॥१२॥

१०३

ध्वजावरी चापचिन्ह । तोचि अश्वत्थामा जाण ॥ १॥
गुरुपुत्र जाणें त्यासी । पुनः पुनः ये मागुती ॥ २ ॥
नेई समीप स्यंदन । वीर असे तो सन्मान्य ॥३॥
गज चिन्हांकित ध्वज । जाणें तोचि कौरवराज ॥४॥
जाऊनियां अभिमुख । शौर्य दावीन मी त्यास ॥५॥
'हस्तिशृंखला' चिन्हाचा । ध्वज जाणें तो कर्णाचा ॥६॥
तयासमीप सावध । राहें द्वेष्टा तो प्रसिद्ध ॥७॥
सूर्य तारका संयुक्त । ध्वजयुक्त ज्याचा रथ ॥८॥
शुभ्रछत्र ज्या मस्तकीं । तोचि भीष्म वंद्य लोकीं ॥९॥
त्यासी लढेन मी जेव्हां । राहें सावध तूं तेव्हां ॥१०॥
आज्ञा मानूनियां रथ । नेई कृपाच्या सन्निध ॥११॥
वासुदेव म्हणे युद्ध । पुढती होईल प्रसिद्ध ॥१२॥

अध्याय ५६ वा १०४

ग्रीष्म मेघांसम मंदवेगें सैन्य । चतुरंग चालून पुढती येई ॥ १ ॥

अश्व-गजारूढ पातले सन्निध । विस्मय नभांत होई तदा ॥२॥
देव गंधर्वादि विमानीं शोभती । शोभा त्या युद्धाची पहावया ॥३॥
एक कोटि स्तंभ देवेंद्र विमानीं । वसु आदित्यांनीं विराजले ॥४॥
उग्रसेनादिक गंधर्वहि येती । राक्षस महर्षि सनकादिक ॥५॥
अग्नि, ईश, सोम, वरुण, यम, धाता । कुबेर, विधाता, तुंबरूहि ॥
मंद-सुगंधित वायु तें सुटला । दिव्य पुष्पमाला दिसती नभीं ॥७॥
रत्नमय दीप्ति पसरे नभांत । पाहोनि अतृप्त इंद्र होई ॥८॥
वासुदेव म्हणे अहो थोर भाग्य । अवलोकिती युद्ध सकल देव ॥

अध्याय ५७ वा

१०५

प्रदक्षिणा घाली कृपाचार्यांप्रति । ध्वजावरी वेदी झळके ज्याच्या ॥
अश्वविशारद कौशल्यें उत्तर । विस्मित अंतर करीतसे ॥२॥
स्पष्ट निज नाम सांगूनियां पार्थ । फुंकी देवदत्त उच्च स्वरें ॥३॥
प्रतिध्वनि नभीं उमटे तयाचा । तोंचि आचार्यांचा शंखनाद ॥४॥
शरत्कालीं मेघ गर्जती ज्यापरी । तैसें धनुर्धारी करिती कर्म ॥५॥
दशबाणीं विद्ध करिती शारद्वत । पार्थ तदा चाप सिद्ध करी ॥६॥
नाराच सोडितां छेदिले कृपानें । झांकी शत बाणें पार्थ तयां ॥ ७ ॥
दश सहस्र तें सोडूनियां शर । करिती आचार्य सिंहनाद ॥ ८ ॥
अकस्मात पार्थें अश्व उधळिले । आचार्य पडले भूमीवरी ॥९॥
वासुदेव म्हणे सन्मानार्थ पार्थ । क्षणभरी स्वस्थ राहियेला ॥१०॥

१०६

स्वस्थानीं बैसूनि कंकपत्रशर । सोडी पार्थावर कृपाचार्य ॥१॥
तोडूनि तयांसी भल्लबाणें चाप । छेदूनि कवच भेदीयेलें ॥२॥
चापामागें चाप तोडितां पार्थानें । आचार्य क्रोधानें शक्ति फेंकी ॥३॥
दशधा छेदूनि पाडिली ते खालीं । तदा विद्ध करी कृप पार्था ॥४॥
छिन्नभिन्न पार्थें स्यंदन तें केला । सारथी मारिला तुटलें चाप ॥५॥
प्रचंड तें गदा फेंकिली कृपानें । लाघवें पार्थानें उलटविली ॥ ६ ॥
रक्षणार्थ तदा कौरववीरांनीं । एकत्र मिळोनि युद्ध केलें ॥७॥
परी महावीरें निवारिलें त्यांसी । नेलें आचार्यांसी दूर तदा ॥ ८ ॥

वासुदेव म्हणे ऐसे कृपाचार्य । जाहले दुर्बल पार्थापुढें ॥९॥

अध्याय ५८ वा

१०७

पाहोनियां शौर्य द्रोण धांव घेती । ने म्हणे पुढती पार्थ, रथा ॥१॥
भिऊं नको वीरा उत्तरा, हो सज्ज । प्रवालसन्निभ अश्व पाहें ॥२॥
शुक्रासमबुद्धि, नीति गुरूसम, । धनुर्वेदप्राण आचार्य हा ॥३॥
दया, क्षमा, सत्य, रुजुत्व, हे गुण । तयासी लढेन उत्तरा मीं ॥४॥
बोले ऐसें पार्थ तोंचि येती द्रोण । सवेग धांवून तयावरी ॥५॥
एकमेकां अश्व भेटती तयांचे । रक्त, शुभ्र, ऐसे वर्ण रम्य ॥६॥
मीलन हें त्यांचें पाहोनि विस्मित । जाहले सैनिक मनामाजी ॥७॥
भयाकुल होती, म्हणती ऐक्यानें । लढती कोण जाणे पुढती काय
वासुदेव म्हणे शंकित ती सेना । दोष देई द्रोणां तया वेळीं ॥९॥

१०८

हृष्टचित्त वीर पार्थ । येई द्रोणांच्या समीप ॥ १ ॥
उतरोनि रथाखालीं । वंदी श्रीगुरु माउली ॥२॥
म्हणे धरितां सूडबुद्धि । काळ गेला वनामाजी ॥३॥
समरदुर्जया, तूं रुष्ट । नको होऊं या समयास ॥४॥
आधीं करितां तूं प्रहार । पूज्या, सोडीन मी शर ॥ ५ ॥
ऐकूनियां वीस बाण । सोडी पार्थावरी द्रोण ॥ ६ ॥
तितुके तोडी धनुर्धर । द्रोण सोडितो सहस्र ॥७॥
तेही छेदिले पार्थानें । गुरु-शिष्य लढती धर्में ॥८॥
अवघे जन धन्योद्गार । काढिताती पाहूनि शौर्य ॥९॥
वासुदेव म्हणे द्रोण । करिती विक्रम दारुण ॥१०॥

१०९

चित्र विचित्र तें सोडूनियां शर । आच्छादी अंबर क्षणीं पार्थ ॥ १ ॥
विद्युद्वेगें शर सुटती द्रोणांचे । एकचि तें भासे दीर्घशर ॥२॥
इंद्र-वृत्रांसम लढती महावीर । अस्त्रज्ञ ते थोर महाबळी ॥३॥
पुष्पितपळाश भासती ते रणीं । अस्त्रें निवारूनि होती धन्य ॥४॥
कौरवसेनेचा होई बहुनाश । द्रोण अर्जुनास प्रशंसिती ॥५॥

त्रैलोक्यविख्यात वीरासवें द्रोण । राहिले टिकून इतुका काळ ॥६॥
शीघ्र, शीघ्रता शर अर्जुनाचे । व्यापिती द्रोणातें शलभासम ॥७॥
अश्वत्थामा येई पुढती धांवून । करी निवारण शरांचें त्या ॥८॥
अश्वत्थाम्यावरी धांवतां अर्जुन । सारथी घेऊन जाई द्रोणां ॥९॥
वासुदेव म्हणे जाणूनि अवकाश । दिधला द्रोणांस धनंजयें ॥१०॥

अध्याय ५९ वा १९०

शौर्य पाहूनि हर्षित । तातपराभवें क्रुद्ध ॥ १ ॥
समर मांडिलें दारुण । गुरुपुत्र असामान्य ॥ २ ॥
पार्थ दिङ्मूढ तयासी । करी वेधूनि अश्वांसी ॥३॥
क्रोधें दिव्यशर सोडी । अर्जुनाची मौर्वी तोडी ॥४॥
सकळ देती धन्यवाद । पार्थ हांसोनि गद्गद ॥५॥
जोडी अन्य प्रत्यंचेसी । करी कंपित भूमीसी ॥६॥
रिक्त तूणीर ते होतां । गुरुपुत्रालागीं चिंता ॥७॥
टणत्कार करी कर्ण । पार्थ कोपे अवलोकून ॥८॥
पाहूनि त्या निर्लज्जासी । कोप चढे फाल्गुनासी ॥९॥
इतुक्यामाजी द्रोणपुत्रा । वीर अर्पिताती शरां ॥१०॥
परी पार्थ कर्णावरी । गेला धांवूनि सत्वरी ॥११॥
इच्छी युद्ध तें द्वैरथ । वासुदेव कथी वृत्त ॥१२॥

अध्याय ६० वा १९१

पार्थ म्हणे कर्णा, सत्य त्या वल्गना । करोनियां रणा दावीं मज ॥
प्रायश्चित्त आतां भोगीं कुकर्माचें । धर्ममर्यादा ते पूर्ण झाली ॥२॥
कर्णा आतां करीं द्वैरथ युद्धासी । वल्गनाचि मोठी कर्ण म्हणे ॥३॥
दौर्बल्यानें क्लेश जाहले तुम्हांसी । सन्मानूं, शौर्यासी पाहूनियां ॥
पांडुपुत्रा युद्ध करावें मजसी । हेचि इच्छा तुझी दिसते मज ॥५॥
पार्थ म्हणे कर्णा, तुझ्यासम तूंच । दिससी निर्लज्ज मजलागीं ॥६॥
पुढती अपूर्व संगर जाहलें । तलत्राण केलें भग्न कर्णें ॥ ७ ॥

क्रुद्ध धनुर्धरें तूणीर तोडिला। छेदिलें चापाला तत्काळाचि ॥८॥
फेंकितां कर्णानें शक्ति ते तोडिली। सेना निवारिली पुढती येतां ॥
मारूनियां अश्व फोडिलें कवच। पाडिलें मूर्छित कर्णाप्रति ॥१०॥
उत्तरेसी कर्णं केलें पलायन। उत्तर अर्जुन गर्जले तें ॥ ११ ॥
वासुदेव म्हणे व्यर्थ वाचाळता। लौकिक वीराचा मलिन करी ॥

अध्याय ६१ वा

११२

पार्थ म्हणे वीर शांतनव जेथें। उत्तरा हा तेथें रथ नेई ॥ १ ॥
तयालागीं प्रेमें लढेन मी आतां। देवांसम योद्धा तात माझा॥ २ ॥
राजपुत्र म्हणे झालों मी संत्रस्त। दशदिशा व्याप्त शस्त्रास्त्रांनीं ॥३॥
अपूर्व हा मज शूर समागम। जाहलें विदीर्ण मन माझें ॥ ४ ॥
वीरांचे ते शब्द घोर शंखनाद। गदाघात घोष प्रत्यंचेचा ॥ ५ ॥
ऐकूनि चीत्कार कर्ण हे बधीर। दृष्टि गरगर फिरली माझी ॥ ६ ॥
मंडलाकृति हें पाहूनियां चाप। करांचा विक्षेप भयदाई ॥ ७ ॥
जोडिसी सोडिसी शर तरी कदा। भ्रमतें हें सदा मन माझें ॥ ८ ॥
रश्मि प्रतोदाचें धारणसामर्थ्य। नसेचि अंगांत आतां माझ्या ॥९॥
वासुदेव म्हणे स्तवूनियां पार्थ। धीर उत्तरास देई बहु ॥ १० ॥

११३

सामर्थ्य विक्रम कथूनि समस्त। तयासी उद्युक्त पार्थ करी ॥ १ ॥
भीष्माच्या सान्निध नेऊनियां रथ। तोडियेला ध्वज त्वरित शौर्यें ॥
पाहूनि धांवले दुःसह, विकर्ण। तेंवीं दुःशासन, विविंशति ॥ ३ ॥
चौघांहि वीरांचें केलें निवारण। शौर्य दुःशासन दावीतसे ॥ ४ ॥
उभयांसि केलें तेणें शरविद्ध। मूर्छित तें पार्थ करी तया ॥ ५ ॥
तीच गति होई विकर्णादिकांची। पलायन अंतीं करिती चौघे ॥६॥
वासुदेव म्हणे कौरवांची सेना। संहारूनि दैना करीतसे ॥ ७ ॥

अध्याय ६२ वा

११४

एक होऊनियां सकल सैनिक। पार्थासवें युद्ध करिती क्रोधें ॥ १ ॥
नीहार आच्छादी जेंवी पर्वतासी। तेंवी पार्थ झांकी सकळ वीरां ॥

खिंकाळती अश्व गजांचा चीत्कार । भेरी, शंख, घोर नाद येई ॥३॥
घावेरे सैनिक पळती सैरावैरा । तांडव त्या काला करी पार्थ ॥ ४ ॥
छिन्न अवयवें भूमि ते आच्छन्न । वाहते भरून रुधिरनदी ॥ ५ ॥
अश्व, गज, रथ, वाहूनियां जाती । ऐसी घोरकृति पार्थ करी ॥६॥
वासुदेव म्हणे फुंकितांचि शंख । निनादलें नभ तया वेळीं ॥ ७ ॥

अध्याय ६३ वा ११५

पराभूत त्या वीरांसी । करितां क्रोध सकळांसी ॥ १ ॥
दुर्योधन कर्णादिक । द्रोण, अश्वत्थामा, कृप ॥ २ ॥
करिती वर्षाव शरांचा । वेध करिती पार्थाचा ॥ ३ ॥
उरलें नाहीं अंगुलद्वय । पार्थ देहीं निरामय ॥ ४ ॥
हांसूनियां तदा पार्थ । सोडी जपूनि ऐंद्रास्त्र ॥ ५ ॥
पर्जन्य जैं मुसळधार । तैसे सोडीतसे शर ॥ ६ ॥
मूढ होई सकल सैन्य । जाई सर्वत्र पळून ॥ ७ ॥
होती कित्येक मूर्छित । गज, अश्व, वीर श्रेष्ठ ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे शौर्य । धन्य पार्थाचें अपूर्व ॥ ९ ॥

अध्याय ६४ वा ११६

पाहूनि अनर्थ धांव घेई भीष्म । सोडी शर तीक्ष्ण पार्थावरी ॥ १ ॥
उदयाद्रीसम शोभला महात्मा । धृतराष्ट्रपुत्रां मोद देई ॥ २ ॥
क्रुद्ध नागासम सोडी अष्ट शर । वेधिला वानर गणांसवें ॥ ३ ॥
छत्र, ध्वज, अश्व, छेदितां पार्थानें । दिव्य अस्त्र भीष्में सोडियेलें ॥
अस्त्रासवें अस्त्र भिडतां त्या वेळीं । पर्वणी लाभली प्रेक्षकांसी ॥५॥
शलभपंक्तिसम पार्थ सोडी बाण । छेदितांचि धन्य म्हणती भीष्म ॥
देवकीनंदन, भारद्वाज, भीष्म । यांवीण हें कर्म कोण करी ॥ ७ ॥
धन्य पितामह, धन्य धनंजय । सहज उद्गार सर्वत्र हे ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे अस्त्रयुद्ध ऐसें । न दिसे कोणातें जगामाजी ॥ ९ ॥

११७

शस्त्रयुद्ध भीष्मार्जुन । आतां करिताती दारुण ॥ १ ॥

चाप तोडी धनंजय । अन्य घेई गंगापुत्र ॥ २ ॥
शूर वर्षाव करिती । समासमचि भासती ॥३ ॥
श्रेष्ठ कोण हा संदेह । वीर अर्जुन गांगेय ॥ ४ ॥
म्हणे गंधर्व इंद्रासी । अजिंक्य हा पार्थ लोकीं ॥ ५ ॥
विद्ध करिती सव्यभागां । क्रोधें भीष्म, पार्थालागीं ॥ ६ ॥
तदा तोडूनियां चाप । वक्षःस्थळीं केलें विद्ध ॥ ७ ॥
घेती आधार तें भीष्म । परी होती संज्ञाशून्य ॥ ८ ॥
करी सारथी विचार । अंतीं नेई तयां दूर ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे योद्धा । भीष्म अजिंक्य या जगा ॥ १० ॥

अध्याय ६५ वा

११८

दुर्योधन येई धांवूनि पुढती । पार्थाच्या ललाटीं वेध करी ॥ १ ॥
अनावर क्रुद्ध होई पृथासुत । वर्षाव करित विषाग्नीचा ॥ २ ॥
पाहोनि विकर्ण धांवे गजारूढ । गंडस्थळीं विद्ध पार्थ करी ॥ ३ ॥
पर्वतशिखरासम तो कोसळे । विकर्ण न पळे रणांतूनि ॥ ४ ॥
अग्रशत पदें पळूनि त्वरित । विविंशतिरथ गांठी वेगें ॥ ५ ॥
तत्काळ भेदिलें नृपवक्षःस्थळ । वमतां रुधिर पळती सर्व ॥ ६ ॥
योद्धे पलायन करिती हें पाहून । स्वयें रणस्थान सोडी नृप ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे गर्जूनियां पार्थ । बोलला नृपास क्रोधावेशें ॥ ८ ॥

११९

ममतोसी रक्त चुकवूनि मज । कोठें जासी सांग नरश्रेष्ठा ॥ १ ॥
सुयोधना, यश कीर्ति कां त्यागीसी । सोडोनि रणासी जासी कोठें ॥
अद्यापि विजय जाहला न तुझा । नाद न वाद्यांचा ऐकूं येई ॥ ३ ॥
ठोकूनियां दंड पुढती उभा पार्थ । आव्हान युद्धार्थ देई तुज ॥ ४ ॥
नरेंद्रें करावें रणीं प्राणार्पण । पलायन धर्म नव्हे त्यासी ॥ ५ ॥
सन्मुख हो माझ्या स्मरूनियां द्यूत । नाम करीं सार्थ दुर्योधना ॥६॥
रक्षील तुजसी आतां सांगें कोण । त्यजूनि वा रण रक्षीं प्राणा ॥७॥
वासुदेव म्हणे बोलतां हें पार्थ । घडलें जें वृत्त पुढती ऐका ॥८॥

अध्याय ६६ वा

१२०

अंकुशानें जैसा गज। तैसा फिरे कुरुराज ॥ १ ॥
नाग जैसा अपमानित। तैसा धांवला रणांत ॥ २ ॥
पाहूनियां स्तब्ध कर्ण। येई कराया रक्षण ॥ ३ ॥
येई गांगेयहि पुढें। राहे नृपाळाच्या मागें ॥ ४ ॥
द्रोण, कृप, विविंशती। दुःशासनादिक येती ॥ ५ ॥
पाहोनियां अवघे वीर। खवळला पार्थव्याघ्र ॥ ६ ॥
अवघे एकाकी वीरातें। ताडिताती दिव्य अस्त्रें ॥ ७ ॥
निवारूनियां अस्त्रांसी। संमोहनअस्त्र योजी ॥ ८ ॥
टणत्कार प्रत्यंचेचा। नाद घुमाविला शंखाचा ॥ ९ ॥
झाले सकल मोहित। पडले होऊनि मूर्छित ॥ १० ॥
पार्थ म्हणे राजपुत्रा। आतां घेई यांच्या वस्त्रां ॥ ११ ॥
भीष्म करील वारण। ऐसें वाटे मजलागून ॥ १२ ॥
वासुदेव म्हणे पार्थ। जाई लंघूनि वीरांस ॥ १३ ॥

१२१

संतप्त गांगेय सोडी बहु शर। छेदी ते सत्वर धनंजय ॥ १ ॥
वधूनि आश्वांसी वेधी पितामहा। जाई लंघूनियां कौरवांसी ॥ २ ॥
सावधान वीर जाहले सकळ। बोलला नृपाळ तयांलागीं ॥ ३ ॥
पार्थालागीं ऐसा कैसा जाऊं देतां। वधाचि आमुचा करितां काय ॥
भीष्म म्हणे राया, काय हें बोलसी। गेली होती मती कोठें सांगें ॥
पापभीरु पार्थ नकरी दुष्कर्म। तेणें तुमचे प्राण वांचले हे ॥ ६ ॥
दुर्योधना, आतां जाई नगरासी। पार्थ स्वस्थळासी सुखें जावो ॥
वासुदेव म्हणे हितप्रद वाणी। सेना ते ऐकोनी फिरली मागें ॥ ८ ॥

१२२

असहिष्णु दुर्योधन। भग्नमनोरथ पूर्ण ॥ १ ॥
गेला निश्वास टाकित। वंदी गुरुजनां पार्थ ॥ २ ॥
शरें मान्यांसी वंदिलें। नवल जातां जातां केलें ॥ ३ ॥
दुर्योधनाचा किरीट। केला क्षणामाजी विद्ध ॥ ४ ॥

टणत्कार प्रत्यंचेचा । शंख फुंकी विजयाचा ॥ ५ ॥
ऐसा पूर्ण पराभव । करूनि निघाला विजय ॥ ६ ॥
म्हणे उत्तरा, धेनूंसी । रणामाजी ठाकिलेंसी ॥ ७ ॥
रथ नेईं आतां घरा । देव गेले अमरपुरा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कर- । जोडूं धन्य पार्थ वीर ॥ ९ ॥

अध्याय ६७ वा

१२३

युद्धांत सैनिक गेले जे पळूनि । नमिती ते येऊनि पार्थालागीं ॥
अभय देऊनि सोडी तयां पार्थ । देती धन्यवाद तयासी ते ॥ २ ॥
दृष्टीहि कौरव न टाकिती मागें । आपुल्याचि मार्गें निघूनि जाती ॥
हृदयीं धरूनि पार्थ उत्तरासी । म्हणे वार्ता माझी न कथीं कोणा ॥
पांडव सदनीं वसती हें ऐकूनि । विराट, सदनीं त्यजिल प्राण ॥५॥
त्वांचि कौरवांसी जिंकूनि उत्तरा । धेनू सोडविल्या ऐसें सांगें ॥
राजपुत्र म्हणे पार्था, तुझ्या कर्मा । नसेचि उपमा जगामाजी ॥७॥
परी आज्ञेविण न कथीन कोणा । शब्दही अर्जुना विक्रमाचा ॥ ८ ॥
ऐसा तो विजयी विजय विठ्ठल । स्मशानीं सत्वर प्राप्त झाला ॥
उत्तराचा रथ होई पूर्ववत । गेला हनुमंत स्वस्थळासी ॥ १० ॥
वासुदेव म्हणे बृहन्नलावेषें । पार्थ सारथ्यातें करीतसे ॥ ११ ॥

१२४

खिल्लारें धेनूंचीं पाहें हीं समस्त । उत्तरासी पार्थ वदतसे ॥ १ ॥
उदकप्राशन करूंदे अश्वांसी । विसावा तयांसी देऊं अल्प ॥ २ ॥
अपराण्हकाळीं जाऊं नगरातें । पुढती गोपांतें जाऊं द्यावें ॥ ३ ॥
विजयघोषणा नृपाळ करील । सन्मान होईल नगरीं तुझा ॥ ४ ॥
बोलूनियां ऐसें स्मशानीं पातला । अलंकार त्याला सकळ सौख्यें ॥
वासुदेव म्हणे पार्थ, बृहन्नला । होऊनि निघाला नगराप्रति ॥ ६ ॥

अध्याय ६८ वा

१२५

जिंकूनि त्रिगर्ता धेनु सोडवोनि । विराट स्वस्थानीं प्राप्त झाला ॥
नागरिकजन सत्कारिती त्यासी । उत्तर तयासी न दिसे कोठें ॥२॥

अंतःपुरीं स्त्रिया कथिती वृत्तांत । आले भीष्मादिक म्हणती राया ॥
ऐकूनि अंतरीं घाबरे विराट । पुत्राचें जीवित संकटांत ॥ ४ ॥
चतुरंगसेना साह्यास्तव जावो । संरक्षण होवो बालकाचें ॥ ५ ॥
बृहन्नला जया संगरीं सारथी । हाय त्या बाळाची काय दशा ॥६॥
कंक म्हणे राया, अभय तयासी । बृहन्नला ज्यासी साह्य असे ॥७॥
इतुक्यांत येई विजयाची वार्ता । ऐकूनि विराटा हर्ष बहु ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे बोलला तैं कंक । विजय स्वाभाविक भूमिंजया ॥

१२६

हर्षित नृपाळ होई रोमांचित । अर्पी वस्त्रादिक दूतांप्रति ॥ १ ॥
म्हणे ध्वजादिकीं शोभो राजपथ । देव देवतांस अर्पा पूजा ॥ २ ॥
मंगलवाद्येंसी स्वागतार्थ जावें । घंटानादें गावें नगरीं वृत्त ॥ ३ ॥
दधि, दूर्वा तेंवी मंगलआरती । नेवोत पुढती कुमारिका ॥ ४ ॥
राजकन्या जावो पुढती स्वागता । गावोत ते गीतां मागधादि ॥ ५ ॥
पाहोनि उत्सुक सकळ स्वागता । राव म्हणे कंका द्यूत खेळूं ॥ ६॥
कंक म्हणे हर्षें खेळूं नये द्यूत । सर्वदांचि वर्ज्य द्यूत वाटे ॥ ७ ॥
हरला सर्वस्व युधिष्ठिर द्यूतें । आग्रहार्थ फांसे घेई करीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे आनंदें विराट । उत्तरशौर्यास वर्णीतसे ॥ ९ ॥

१२७

भीष्मासम वीर रणांत जिंकिले । कार्य थोर केलें कंका, सुतें ॥ १ ॥
कंक म्हणे नाहीं नवल या माजी । बृहन्नला ज्यासी साह्य होई ॥२॥
संक्रुद्ध विराट बोलला कंकासी । काय त्या क्लीबासी स्तविसी विप्रा
मित्रत्वें अपराध साहिले हे जाण । राहीं सावधान इतउत्तर ॥४॥
सत्यप्रतिज्ञ तैं कंक म्हणे राजा । विक्रम क्लीबाचा नेणसी तूं ॥ ५ ॥
भीष्म-द्रोणादिकां समरीं जिंकील । ऐसा एकमात्र तोचि जगीं ॥
ऐकूनियां रुष्ट बोलला विराट । शास्त्याविण व्यर्थ धर्म लोकीं ॥७॥
बोलूनियां ऐसें ताडीयेला अक्ष । नासिकेचा भेद होई तदा ॥ ८ ॥
रुधिर अंजलीमाजी धरी कंक । पाही सैरंध्रीस सहेतुक ॥ ९ ॥
जाणोनि तें कृष्णा, पात्र जलपूर्ण । तत्काळ आणून रुधिर धरी ॥
वासुदेव म्हणे अज्ञान नृपाचें । शासन कंकातें दैवयोगें ॥ ११ ॥

१२८

इतुक्यांत राजदूत । हर्षे पातला समीप ॥ १ ॥
म्हणे साह्य बृहन्नला । ऐसा उत्तर पातला ॥ २ ॥
राजा म्हणे जा सत्वरी । आणीं उभयांसी मंदिरीं ॥ ३ ॥
हळुच बोले कंक दूता । आणीं कुमार एकटा ॥ ४ ॥
युद्धावीण माझें रक्त । करील वीराप्रति क्रुद्ध ॥ ५ ॥
क्रोधावेशें, विराटाचा । नाश करील तो साचा ॥ ६ ॥
दूत जातांचि उत्तर । प्रवेशला नृपमंदिर ॥ ७ ॥
वंदूनियां नृपाळासी । पाही अवस्था कंकाची ॥ ८ ॥
घाबरोनि पुशितां वृत्त । राव बोलला तयास ॥ ९ ॥
षंढाची हा करी स्तुति । अल्प शासन हें त्यासी ॥ १० ॥
भूमिंजय म्हणे ताता । करीं संतुष्ट या विप्रा ॥ ११ ॥
ब्रह्मविष हें समूळ । नाश आपुला करील ॥ १२ ॥
वासुदेव म्हणे सदा । क्षमा याचीतसे राजा ॥ १३ ॥

१२९

धर्म म्हणे राजा, क्रोध न कदापि । येई मजप्रति क्षमिलें तुज ॥ १ ॥
भूमीवरी रक्त पडतें तरी राष्ट्र । पावतें विनाश निःसंशय ॥ २ ॥
हर्षे हृष्टचित्त, उल्लंघी धर्मासी । नियम मजसी पूर्ण ज्ञात ॥ ३ ॥
वास्तव तुजसी दोष नसे कांहीं । व्यर्थ जरी होई शिक्षा मज ॥ ४ ॥
बृहन्नला येई इतुक्यांत तेथें । कंक स्वस्थानातें शोभवितां ॥ ५ ॥
रायासवें कंक वंदिला तियेनें । राव कौतुकानें पुत्रा स्तवी ॥ ६ ॥
म्हणे बाळा केलें अलौकिक कर्म । संतोषलें मन कैकेयीचें[1] ॥ ७ ॥
तुझ्यासम पुत्र दुर्लभ या जनीं । भीष्मादिकां रणीं जिंकिलेंसी ॥
सिंह जेंवी भक्ष्य सोडवी आपुलें । तैसें तुवां केलें नवल जनीं ॥
महत्कार्य कैंवी सिद्ध झालें बाळा । वृत्त तें मजला कथन करीं ॥
वासुदेव म्हणे सत्य यथाक्रम । स्वतेजेंचि जाण प्रगट होई ॥ ११ ॥

---

१ विराटाची स्त्री सुदेष्णा.

अध्याय ६९ वा  १३०

भूमिंजय म्हणे ताता । नव्हे विक्रम हा माझा ॥ १ ॥
नाहीं जिंकिलें धेनूंसी । राखिलें न कीं तयांसी ॥ २ ॥
देवपुत्र एक कोणी । साह्य झाला मजलागोनि ॥ ३ ॥
रण त्यागूनि पळतां । तोचि माझा साह्यकर्ता ॥ ४ ॥
वज्रदेही त्या वीराचा । महा विक्रम हा साचा ॥ ५ ॥
कृप, द्रोण, अश्वत्थामा । कर्ण, भीष्म, दुर्योधना ॥ ६ ॥
जिंकूनियां समरांगणीं । दुर्योधनासी वाधूनि ॥ ७ ॥
पळतां सिद्ध केलें रणा । अंतीं जिंकिलें सकलांना ॥ ८ ॥
वस्त्रें आणिलीं हरूनि । अचल राहिला त्या स्थानीं ॥ ९ ॥
राजा म्हणे देवपुत्र । मज दावीं तो सत्वर ॥ १० ॥
राजपुत्र म्हणे ताता । दिन द्वयें लाभ त्याचा ॥ ११ ॥
पुढती विराटआज्ञेनें । कन्यकांसी दिधलीं वस्त्रें ॥ १२ ॥
वीर करिताती संकेत । वासुदेव स्वस्थचित्त ॥ १३ ॥

---

## वैवाहिकपर्व ५

अध्याय ७० वा  १३१

तृतीय दिनीं ते सुस्नात होवोनि । व्रत संपवोनि प्रगट होती ॥ १ ॥
नृपाच्या आसनीं बैसले येवोनि । भासले पंचाग्नीसम वीर ॥ २ ॥
सभास्थानीं येतां क्रुद्ध झाला राव । म्हणे कंका, नय त्यजिला कैंवीं
राजसिंहासनीं बैससी येऊनि । भूषणें लेऊनि नृपाळाचीं ॥ ४ ॥
हांसोनियां पार्थ बोले हे नृपाळा । सन्मानी याजला देवेंद्रहि ॥ ५ ॥
धर्माचा अवतार महाबुद्धिमंत । महा तपोनिष्ठ धर्मराज ॥ ६ ॥
सूर्यासम कीर्ति वर्धिष्णु जयाची । इंद्र कुबेरांसी सन्मान्य जो ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे धर्माचें वर्णन । करूनि अर्जुन कथीतसे ॥ ८ ॥

१३२

दहा सहस्र सवेग । मागें सालंकृत गज ॥ १ ॥
सूत अष्टशत स्तुति । मार्गीं करिती जयाची ॥ २ ॥
देव, जैसे धनदासी । तैसे नृप ज्या वंदिती ॥ ३ ॥
करभार देणें भाग । ऐसा जगतीं ज्याचा धाक ॥ ४ ॥
वृद्ध-अनाथांचा पिता । प्रिय ज्यासी सकल प्रजा ॥ ५ ॥
ऐशीं सहस्र स्नातक । नित्य ज्याच्या आश्रयास ॥ ६ ।
दम, धर्म, ज्या अक्रोध । ज्याचा कौरवांसी ताप ॥ ७ ॥
गुण असंख्य जयाचे । नित्य वंदिती ज्या भ्राते ॥ ८ ॥
आसनीं या काय तेणें । बसूं नये आनंदानें ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । वर्णी यापरी धर्मास ॥ १० ॥

अध्याय ७१ वा १३३

विस्मित विराट म्हणे हाचि धर्म । तरी तो अर्जुन कोठें असे ॥ १ ॥
महाबळी भीमा, सहदेव-नकुळां । पांचाळी विमला दावीं मज ॥
पार्थ म्हणे वीर बल्लव तो भीम । कीचकहनन केलें येणें ॥ ३ ॥
हाचि तो गंधर्व अंतःपुरीं व्याघ्र-। वधिले, तो शूर हाचि जाणें ॥
अश्वाध्यक्ष तैंवी गोरक्षक तुझे । तनय माद्रीचे जाणें तयां ॥ ५ ॥
सैरंध्री ते राया, द्रौपदी जाणावी । पार्थ हे म्हणवी बृहन्नला ॥ ६ ॥
गर्भस्थ बालकासम तुझ्या गृहीं । कंठिला हा पाहीं कठिण काळ ॥
वासुदेव म्हणे ऐकोनि ते वाणी । उत्तर त्यां वर्णी सकलांसी ॥ ८ ॥

१३४

राजपुत्र म्हणे सिंहासम पुष्ट । युधिष्ठिर श्रेष्ठ नृपाळ हा ॥ १ ॥
गजगति, स्कंध विशाल जयाचे । अवलोकीं भीमातें वीरश्रेष्ठा ॥
दिव्य चापधारी गजेंद्रासमान । शोभतो अर्जुन पाहीं ताता ॥ ३ ॥
शील, बलयुक्त माद्रीचे हे सुत । लक्ष्मीचि श्रेष्ठ द्रौपदी हे ॥ ४ ॥
ताता, मृगांमाजी सिंहासम पार्थ । भासला रणांत मजलागीं ॥५॥
गजेंद्रासी एका शरें विद्ध केलें । भूमीमाजी गेले दंत तदा ॥ ६ ॥

कौरवासी येणें जिंकिलें रणांत । दिव्य शंखनाद बधिर करी ॥
वासुदेव म्हणे वर्णी पांडवांसी । राजपुत्र चित्तीं हर्ष पावे ॥ ८ ॥

१३५

राव म्हणे वत्सा, घडला अन्याय । प्रसन्न पांडव करूं आतां ॥ १ ॥
उचित त्या कार्या हाचि काळ बाळा । उत्तरा पार्थाला अर्पूं सुखें ॥
राजपुत्र म्हणे काल हाचि योग्य । सन्मान मान्यांस द्यावयाचा ॥
राव म्हण भीमें प्राण वांचविले । पाहिजे क्षमिलें पांडवांनीं ॥ ४ ॥
करूनि संकेत निश्चय तैं केला । पार्थासी उत्तरा द्यावी ऐसा ॥ ५ ॥
राजदंड कोश नगरांसहित । अर्पियेलें राज्य धर्मालागीं ॥ ६ ॥
अर्जुनासी म्हणे जाहलों कृतार्थ । आलिंगी वीरास पुनः पुनः ॥
म्हणे धर्मा, पूर्ण जाहली प्रतिज्ञा । अर्पितों हे कन्या पार्थालागीं ॥
ऐकूनियां धर्म पाही पार्थमुख । जाणूनियां पार्थ बोले तदा ॥ ९ ॥
स्नुषाभावें कन्या स्वीकारीन राया । सुयोग हा यावा उभयकुळां
वासुदेव म्हणे ऐकूनि विराट । होई हृष्टचित्त तया वेळीं ॥ ११ ॥

अध्याय ७२ वा

१३६

राव म्हणे पार्था, ऐसें कां करिसी । कां न स्वीकारिसी भार्यात्वानें ॥
पार्थ म्हणे राया, मज पित्यासम । लेखूनियां प्रेम कन्या करी ॥२॥
पूज्य ते मजसी गुरूसम मानी । अयोग्यचि जनीं भार्याभाव ॥ ३ ॥
मज उत्तरेचा झाला सहवास । राया वर्ष एक सदनीं तुझ्या ॥ ४ ॥
स्वीकारितां तिज निंदितील जन । पूर्वींच हें प्रेम जुळलें ऐसें ॥ ५॥
यास्तव दुहिता तिजसी मानूनि । करितों मागणी पुत्रास्तव ॥ ६ ॥
ऐशा मार्गें दोष न येतांचि कोणा । होईल आपणां सौख्यलाभ ॥७॥
देवकीनंदन मातुल जयाचा । अभिमन्यु माझा अस्त्रवेत्ता ॥ ८ ॥
उत्तरेसी वर जाणें तो अनुरूप । योग्य तो जामात तुजलागीं ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे विराट अनुज्ञा । देई, म्हणे प्राज्ञा धन्य झालों ॥ १० ॥

१३७

म्हणे विराट अर्जुना । योग्य तेंचि वदसी प्राज्ञा ॥ १ ॥
करीं वाटे जें उचित । तुझ्या संबंधें आनंद ॥ २ ॥

होतां धर्माची अनुमति । निमंत्रणें पाठविती ॥ ३ ॥
उभयांचे सुहृद आप्त । निमंत्रिती यदुनाथास ॥ ४ ॥
वसती उपप्लव्य पुरीं । समीप विराटनगरी ॥ ५ ॥
संगें घेवोनि यादव । हर्षे पातला माधव ॥ ६ ॥
शैब्य येई काशिराज । दोन अक्षौहिणी फौज ॥ ७ ॥
अक्षौहिणी सेनेसवें । द्रुपद येई हर्षभरें ॥ ८ ॥
धृष्टद्युम्न तैं शिखंडी । सुतां अवलोकी द्रौपदी ॥ ९ ॥
तयां सन्मानी विराट । वासुदेवचित्तीं मोद ॥ १० ॥

१३८

पातले जे त्या स्थानासी । अव रे अक्षौहिणीपति ॥ १ ॥
विपुल दक्षिणासंयुक्त । यज्ञकर्ते ते बहुत ॥ २ ॥
अवभृथ घडलें तयां । वेदमंत्रें जनमेजया, ॥ ३ ॥
प्राणावरी जे उदार-। समरीं, ऐसे महाशूर ॥ ४ ॥
वेद-शास्त्रवेत्ते नृप । पुण्यशाली भाग्यवंत ॥ ५ ॥
अवलोकितां ऐशा नृपां । मोद विराटाच्या चित्ता ॥ ६ ॥
यथा अधिकार नृप । प्रेमें सन्मानी तयांस ॥ ७ ॥
भृत्य, सेना, वाहनेंही । तोष पावलीं त्या ठायीं ॥ ८ ॥
पुढती झाला वाङ्‌निश्चय । तोष पावे वासुदेव ॥ ९ ॥

१३९

प्रमुख नृपाळांचीं नामें । कथितों ऐकावीं तीं प्रेमें ॥ १ ॥
वासुदेव वनमाळी । येई बलराम त्या स्थळीं ॥ २ ॥
हार्दिक्यही कृतवर्मा । सात्यकी तैं अक्रूर जाणा ॥ ३ ॥
अनाधृष्टि तैंवी सांब । निशठ बलरामात्मज ॥ ४ ॥
आले सुभद्रेसमवेत । इंद्रसेन पांडव सूत[1] ॥ ५ ॥
बहुत गज, लक्ष अश्व । आला घेऊनि कोटि रथ ॥ ६ ॥
पायदळही निखर्व । तैसे बहु यादववीर ॥ ७ ॥
सकलां अहेर कृष्णाचा । महावस्त्रेंसी रत्नांचा ॥ ८ ॥

१ पांडवांचा सारथि

सत्कुळें तीं सुविख्यात । भाग्यें जाहलीं एकत्र ॥ ९ ॥
झाला विवाह थाटानें । भरलें नभ मंगलस्वनें ॥ १० ॥
होई अपूर्व भोजन । मैरेयादि पेयपान ॥ ११ ॥
वासुदेव म्हणे हर्षे । सहजपणें सकळांस ॥ १२ ॥

१४०

विवाहमंडपीं गायन-वादन । नृत्य, नटकर्म, भाट गातीं ॥ १ ॥
कथाकीर्तनासी रंग बहु माजे । थाट माट साजे मंदिरांत ॥ २ ॥
नटूनि थटूनि सुस्वरूप स्त्रिया । राणीसवें आल्या मंडपांत ॥ ३ ॥
रूपगुणांमाजी पांचाळी अपूर्व । सकळांचा गर्व हरण करी ॥ ४ ॥
इंद्रकन्येसम उत्तरा शोभली । स्त्रिया भोंवतालीं सकल उभ्या ॥५॥
कृष्णाच्या सन्मुख कन्यादान झालें । पुत्रास्तव केलें ग्रहण पार्थे ॥
स्नुषाभावें केला स्वीकार धर्मानें । वासुदेव प्रेमें डोलतसे ॥ ७ ॥

१४१

वायूसम ज्यांचा जव । ऐसे अर्पी अश्व राव ॥ १ ॥
संख्या सप्त सहस्रांची । दोन सहस्र गजराजी ॥ २ ॥
धन अर्पोनि विपुल । दिधल्या आहुती सशास्त्र ॥ ३ ॥
केलें विप्रांचें पूजन । विपुल दक्षिणा अर्पून ॥ ४ ॥
पंडुपुत्रांसी विराट । प्रेमें अर्पी सकल राज्य ॥ ५ ॥
म्हणे जीवित अर्पिलें । कंठ सद्गदित झाले ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे तेथ । भरला अपूर्व प्रमोद ॥ ७ ॥

१४२

भागिनेयाचा विवाह । हर्ष पावला माधव ॥ १ ॥
वांटी द्रव्य सकलांसी । वस्त्रें भूषणें विप्रांसी ॥ २ ॥
शय्या, बहुविध रत्नें । अश्व, गजादि वाहनें ॥ ३ ॥
अन्नें षड्रस अर्पिलीं । विविध पेयें समर्पिलीं ॥ ४ ॥
हृष्ट-पुष्टजनाकीर्ण । नगर उत्सवांत मग्न ॥ ५ ॥
समाप्त हें पुण्यपर्व । वंदी पार्थां वासुदेव ॥ ६ ॥

१४३

फलश्रुति आतां ऐका या पर्वाची । सकल आधि व्याधी बाधतीना ॥

दुर्गतीतरण सुभिक्ष तैं क्षेम । आरोग्येंसी पुण्य वृद्धि पावे ॥ २ ॥
सर्व पापनाश, धन-धान्य वृद्धि । श्रवणें एकाकी विजय पावे ॥
संकटांची बाधा वियोग प्रियांचा । न घडेचि साचा श्रवण होतां ॥
वैराटकपर्व ऐकूनि विविध । वस्त्रें, अलंकार, धान्य, धेनु ॥ ५ ॥
देवतांप्रीत्यर्थ, यथाशक्ति दान । सद्विप्रां वंदून द्यावें प्रेमें ॥ ६ ॥
वक्ता संतोषतां सर्व देव तुष्ट । षड्रसें संतुष्ट विप्र व्हावे ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे वैराटकपर्व-। श्रवणें, इच्छा सर्व पूर्ण होती ॥ ८ ॥

## विराटपर्व समाप्त

या विराटपर्वाची एकंदर अभंग संख्या १४३

---

### पुढील उद्योगपर्वाचा आद्य श्लोक—

वैशंपायन उवाच—

कृत्वा विवाहं तु कुरुप्रवीरास्तदाभिमन्योर्मुदिताः स्वपक्षाः ॥
विश्रम्य रात्रावुषसि प्रतीताः सभां विराटस्य ततोऽभिजग्मुः ॥ १ ॥

-ॐ नमो भगवते वासुदेवाय-

# अभंग-भारत

( महाभारताचा अभंगमय सुबोध भावार्थ )

## ५ उद्योगपर्व

### सेनोद्योगपर्व १

नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ॥
देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत् ॥ १ ॥

अध्याय १ ला

१

भारतांत सार पर्व हें उद्योग । कथीन तें साङ्ग भावबळें ॥ १ ॥
श्रोते हो समस्त व्हावें सावधान । द्यावें अवधान एकचित्तें ॥ २ ॥
वंदूं कृष्णार्जुन तेंवी द्वैपायन । कार्य हें निर्विघ्न स्मरणें त्यांच्या ॥
यादव माधव पांडव हर्षित । विवाहोत्सवांत श्रांत झाले ॥ ४ ॥
विश्रांति घेवोनि उठले प्रभातीं । सभेमाजी येती स्नानोत्तर ॥ ५ ॥
रत्नजडित ते भव्य राजसभा । सिंहासनें शोभा देती बहु ॥ ६ ॥
पुष्पमाला, धूप, अगरु-चंदनें । प्रहर्षित मनें सकळांचीं ॥ ७ ॥
नरश्रेष्ठ येती, समृद्ध त्या स्थानीं । वासुदेव पाणी जोडी तयां ॥ ८ ॥

२

मध्यभागीं वृद्ध विराट, द्रुपद । बलराम, गोविंद पित्यासवें ॥ १ ॥
नृपाळासमीप बैसती येवोनि । धर्म, सन्निधानीं विराटाच्या ॥ २ ॥

भीमार्जुन, माद्रीतनय, सात्यकी । सांब, प्रद्युम्नादि विराजले ॥ ३ ॥
द्रुपदतनय तैसे ते वैराटि । तैंवी युवकश्रेष्ठि अभिमन्यु ॥ ४ ॥
द्रौपदीचे सुत रूप बलशाली । सभा ते शोभली नभासम ॥ ५ ॥
परस्पर गोष्ठी आनंदें करिती । अंतीं अवलोकिती कृष्णमुख ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे यादवेंद्र तदा । सारभूत वाचा वदला ऐका ॥ ७ ॥

३

कृष्ण म्हणे सर्वां विदितचि असे । वृत्त पांडवांचें द्यूतोद्भूत ॥ १ ॥
प्रतिज्ञापालन केलें पांडवांनीं । सहन करोनि विविध क्लेश ॥ २ ॥
अवनी जिंकिती ऐसें यांचें बल । काय श्रेयस्कर उभय पक्षां ॥३॥
अधार्मिक पंथें देवांचेंहि राज्य । लाभतां धर्मास तुच्छ वाटे ॥ ४ ॥
सद्धर्मे एकादा ग्रामही लाभतां । युधिष्ठिरचित्ता तोष बहु ॥ ५ ॥
वडिलार्जित राज्य हरियेलें कैसें । विदित तें असे सकल तुम्हां ॥
जिंकिलें न रणीं परी धार्तराष्ट्रां । कुशल सर्वदा इच्छी धर्म ॥ ७ ॥
मागती तयांसी कष्टार्जित धन । वधार्थ दारुण यत्न झाले ॥ ८ ॥
दुष्टपणें केले बहुत अन्याय । कथी वासुदेव कृष्णवाणी ॥ ९ ॥

४

अभिवृद्धिगत लोभ कौरवांचा । सन्मार्ग वीरांचा ध्यानीं घ्यावा ॥
परस्पर त्यांचा संबंध जाणोनि । पृथक, सह, ध्यानीं मार्ग आणा ॥
सत्यप्रतिज्ञांसी विपरीत वर्तनें । होईल विक्रमें पूर्ण हेतु ॥ ३ ॥
जाणोनियां न्याय वीर कौरवांसी । वधितील दुष्कृति पाहूनियां ॥
अल्पसंख्य परी मित्रांसवें एक । होवूनियां युद्ध मांडितील ॥ ५ ॥
यथार्थ पराचें मत न जाणितां । योजाल संकेता काय तुम्हीं ॥६॥
यास्तव धार्मिक शुचि कुलवंत । अप्रमत्त दूत प्रथम योजा ॥ ७ ॥
पाठवोनि अर्धराज्य त्यां मागावें । कां नच रुचावें सकलां मत ॥८॥
वासुदेव म्हणे प्रशंसूनि कृष्णा । वदला बंधुराणा बळिराम ॥ ९ ॥

अध्याय २ रा

५

बळिभद्र म्हणे धर्म-अर्थयुक्त । बोलला मुकुंद तेंचि सत्य ॥ १ ॥
वीर धर्मराज मागे अर्ध राज्य । तेंचि योग्य मज वाटतसे ॥ २ ॥

सौख्यलाभ तेणें होई उभयांसी । शांतता प्रजेसी प्राप्त होई ॥ ३ ॥
सभेमाजी वीर सकळ आणोनि । बोलो नम्रवाणी दूत तेथें ॥ ४ ॥
द्यूतासक्त धर्म हरला वैभव । आणूं नये क्रोध कौरवांसी ॥ ५ ॥
त्यागूनि अन्यांसी, शकुनीसी द्यूत । सकल निवारितां रमला धर्म
प्रतिकूल डाव पडतांहि खेळे । हरला त्यामुळें सकल राज्य ॥ ७ ॥
लवही न दोष गांधारपतीचा । प्रणामें सामाचा मार्ग धरा ॥ ८ ॥
याचि मार्गें शक्य पांडवांचें हित । सामप्राप्त अर्थ हितावह ॥ ९ ॥
अन्याय युद्धानें होई हें ऐकूनि । सात्यकी उठूनि बोले क्रोधें ॥ १० ॥
वासुदेव म्हणे सत्याचाहि मार्ग । कठिणचि सिद्ध करणें लोकीं ॥

अध्याय ३ रा

६

मनीं तेंचि येई वदनीं नराच्या । बलरामवाचा तैसीच हे ॥ १ ॥
शूर, कापुरुष, जनीं दोन्हीं पक्ष । एकाचि कुळांत क्लीव-शूर ॥ २ ॥
एकाचि वृक्षासी फलाफलवती । शाखा विराजती तैसेंचि हें ॥३॥
लवही न दोष बलरामाप्रति । दोषी जे ऐकती अन्याय हा ॥ ४ ॥
धार्मिकांसी दोष देतां सभेमाजी । क्रोध न कोणासी आश्चर्य हें ॥
ऐसा वक्ता कैंवी निर्भय विचरे । अल्पही जो बोले धर्मदोष ॥ ६ ॥
अनभिज्ञाप्रति अक्ष-कोविदांनीं । स्वयें पाचारूनि जिंकियेलें ॥ ७ ॥
अनासक्ता द्यूतीं अन्यायें जिंकितां । धर्ममूलकता कासयाची ॥ ८ ॥
भ्रात्यांसवें द्यूतीं हरता गृहांत । तरीच तो योग्य पराभव ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे कापट्य करूनि । शुभ काय जनीं कौरवांचें ॥ १० ॥

७

सत्यप्रतिज्ञ हे वनवासमुक्त, । धर्मादिक पात्र राज्यैश्वर्या ॥ १ ॥
याचना कां त्यांनीं करावी प्रणिपातें । इच्छी न पराचें धन पार्थ ॥
उपस्थित प्रश्न कालनिर्णयाचा । भीष्म, द्रोण, क्षत्ता, दूर करी ॥३॥
धार्तराष्ट्र जरी अर्पिती न राज्य । नमवीन खळांस प्रखर शरें ॥४॥
पदीं नम्र जरी होती न धर्माच्या । मार्ग यमलोकाचा दावीन त्यां ॥
कृष्ण, पार्थ, भीम, प्रत्यक्ष ते यम । संपादूं लढून धर्मराज्य ॥ ६ ॥

आतताई वध करणें हा धर्म । याचितां अधर्म होई तयां ॥ ७ ॥
कौरवांचा हतु जाणूनियां द्यावा । मार्ग आक्रमावा पुढती शौर्यें ॥
आतां युधिष्ठिर राज्य उपभोगील । अथवा घेईल दुर्योधना ॥९॥
वासुदेव म्हण सात्यकीवचन । करी सभास्थान हर्षोत्फुल्ल ॥१०॥

अध्याय ४ था

८

सात्यकीसी द्रुपदराजा । म्हणे योग्य मार्ग तुझा ॥१॥
मधुर शब्दें दुर्योधन । ऐकणार नाहीं जाण ॥ २ ॥
पुत्रवत्सल धृतराष्ट्र । अन्नें दीन द्रोणादिक ॥ ३ ॥
मूर्ख शकुनि आणि कर्ण । कौरवेंद्राच्या आधीन ॥४॥
न रुचे बलरामाचें मत । ज्ञाते म्हणती, तें अयुक्त ॥ ५ ॥
दुष्टालागीं मृदुभाषी । भासे दुर्बल या लोकीं ॥ ६ ॥
धेनूसवें कठोरता । अथवा मार्दव गर्दभा ॥ ७ ॥
तैसी क्रिया ही होईल । दुष्टां विजय भासेल ॥ ८ ॥
कळवूं आपुल्या मित्रांसी । सज्ज होऊं समरासी ॥ ९ ॥
प्रथम ज्याचें पाचारण । साह्य तयासी सज्जन ॥ १० ॥
त्वरा करोनियां दूत । आधीं जावोत सर्वत्र ॥ ११ ॥
वासुदेव म्हणे ऐसा । भाव जाणा द्रुपदाचा ॥ १२ ॥

९

शल्य, भगदत्त, हार्दिक्य, अंधक । शूर तो वृहन्त, दीर्घप्रज्ञ ॥ १ ॥
प्रतिविंध्य, बाल्हिक, सेनाबिंदु, शक । तेंवी मुंजकेश, चित्रवर्मा ॥
चैद्याधिप, नील, सुबाहु, सुपार्श्व । पुंड्र, दंतवक्र, एकलव्य ॥ ३ ॥
निषाद, क्षेमक, तेंवी वृहत्सेन । तैसा वटधान, वृहद्बल ॥ ४ ॥
ऐसे जे बहुत विक्रमी नृपाळ । वृत्त त्यां तत्काळ निवेदावें ॥ ५ ॥
पुरोहित माझा विप्र महाज्ञाता । जावो कौरवांच्या सभेमाजीं ॥६॥
भीष्म-द्रोणादिकां कथावें जें तेणें । निवेदूनि प्रेमें पाठवूं त्या ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे द्रुपदवचन । ऐकूनियां कृष्ण संतोषला ॥ ८ ॥

अध्याय ५ वा

१०

कृष्ण म्हणे योग्य वाणी सोमकाची । विरुद्ध जो त्यासी मूर्ख जाणा

कुंती-सुभद्रेच्या निमित्तें पांडव। तैसेचि कौरव आप्त आम्हां ॥२॥
दुर्योधनकन्या हरिली सांबानें। आप्तभाव तेणें कौरवांसी ॥ ३ ॥
सकलहि आतां जाऊं स्वस्थानासी। द्रुपद आम्हांसी गुरूसम ४॥
द्रोण, कृप, मित्र पांचाळ राजाचे। करील योग्य तें दूतमुखें ॥ ५ ॥
अनुमति पूर्ण आमुची तयासी। रुचो कौरवांसी न्याय्य पक्ष ॥ ६ ॥
भ्रातृभाववृद्धि वीरांचें रक्षण। दुर्योधन शम करील तरी ॥ ७ ॥
तैसें न घडतां दूत नृपाळांसी। पाठवूनि अंतीं कळवा आम्हां ॥८॥
आमात्यांसमेत पावेल विनाश। क्रुद्ध होतां पार्थ दुर्योधन ॥९॥
द्वारकेसी जातां कृष्ण, सैन्यभार। करिती परस्पर सिद्ध दोघे ॥१०॥
वासुदेव म्हणे ज्ञान-वयोवृद्ध। जावो पुरोहित गजपुरा ॥ ११ ॥

अध्याय ६ वा

११

विप्रवरालागीं पांचाळ नृपाळ। बोलला मधुर वचन ऐका ॥ १ ॥
श्रेष्ठ भूतांमाजी प्राणि, बुद्धिमंत- प्राण्यांत वरिष्ठ द्विजोत्तमा ॥ २ ॥
बुद्धिमंतांमाजी मानव वरिष्ठ। तयांमाजी द्विज श्रेष्ठ असे ॥ ३ ॥
द्विजांत वरिष्ठ जाणा विद्यावंत। त्याहूनि वरिष्ठ सिद्धान्तज्ञ ॥ ४ ॥
तयाहूनि कर्ता, ब्रह्मज्ञ, त्याहूनि। सर्वश्रेष्ठ ज्ञानी तूंचि विप्रा ॥५॥
विप्रश्रेष्ठा, तुझी बुद्धि शुक्रासम। उभयांचें ज्ञान तुजलागीं ॥ ६ ॥
वंचना वीरांची जाणसी तूं पूर्ण। कौरवां जाणून कार्य करीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे द्रुपद विप्रासी। अत्यादरें कथी निज हेतु ॥ ८ ॥

१२

धर्मज्ञा, भाषण ऐसें करीं तेथ। होवोत निवृत्त वीर रणा ॥ १ ॥
मानील विदुर प्रथम हें मत। करील तो भेद वीरांमाजी ॥ २ ॥
ऐक्यास्तव यत्न करितील जेव्हां। तदा अवधी आम्हां सिद्धतेची॥
सेनाकर्मी तेणें व्यत्यय येईल। धृतराष्ट्र मानील वचन तुझें ॥ ४ ॥
पांडवांचे क्लेश सांगें दयावंता। कुलधर्म वृद्धां निवेदावा ॥ ५ ॥
निर्भय तूं विप्र वृद्ध ज्ञानवंत। पुष्य नक्षत्रास कार्य साधीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे शिष्यांसमवेत। गेला पुरोहित गजपुरा ॥ ७ ॥

अध्याय ७ वा

१३

देशोदेशीं दूत सैन्यार्थ धाडिले । वृत्त सर्व कळे धृतराष्ट्रासी ॥ १ ॥
द्वारकेसी तदा जाई दुर्योधन । पातला अर्जुन त्याच दिनीं ॥ २ ॥
दोघेही कृष्णाच्या प्राप्त ते भवना । निद्रावश कृष्णा अवलोकिती ॥
कौरवेंद्र भेटे प्रथम तयासी । बैसला उशाशीं पीठावरी ॥ ४ ॥
मागूनि अर्जुन पातला त्या स्थानीं । तिष्ठला जोडोनि दोन्हीं कर ॥
जागृत कृष्णानें, प्रथम अर्जुन । पाहिला, मागून दुर्योधन ॥ ६ ॥
माधवा, हो साह्य बोले दुर्योधन । पातलों प्रथम मीचि एथें ॥७॥
प्रथम जे येती तयां साह्य होती । सज्जनांची नीति ऐसी ख्यात ॥
वासुदेव म्हणे स्नेह, आप्तभाव । समानाचि राव वदला कृष्णा ॥९॥

१४

कृष्ण म्हणे राया, असेल हें सत्य । परी मी पार्थास अवलोकिलें ॥
सी साह्य यास्तव होईन । श्रुति म्हणे सान तोषो आधीं ॥२॥
तुझ्याहूनि राया, सान हा अर्जुन । प्रथम पुरवीन हेतु त्याचे ॥ ३ ॥
नारायण नामें सैनिक ते अब्ज । अथवा मागो मज निःशस्त्रासी ॥४॥
लाभो मज कृष्ण बोलला अर्जुन । हर्षे दुर्योधन ऐकूनि तें ॥ ५ ॥
बलरामाप्रति भेटला येऊनि । तटस्थ तो रणीं वदला राया ॥ ६ ॥
कृत वर्मा देई अक्षौहिणी सैन्य । गेला दुर्योधन सदनीं हर्षें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे आवडीसमान । हर्ष, शोक जाण मानवांसी ॥ ८ ॥

१५

यादवेंद्र म्हणे पार्था । हेतु कथावा जो तुझा ॥ १ ॥
युद्धहीन मी जाणूनि । काय लाभ स्वीकारूनि ॥ २ ॥
पार्थ म्हणे मुकुंदासी । विजय सामर्थ्य तुजसी ॥ ३ ॥
मीहि संहारीन यांतें । ख्यात जनीं यश तुझें ॥ ४ ॥
नित्य यशस्वी तो जेथें । यश लाभ घडे तेथें ॥ ५ ॥
यश हेतु आणूनि मनीं । स्वीकारिलें तुजलागुनि ॥ ६ ॥
बहुत काळ हेतु ऐसा । कृष्णा सारथी हो माझा ॥ ७ ॥
कृष्ण म्हणे उचित स्पर्धा । हेतु पुरवीन तुझा ॥ ८ ॥

कृष्णासवें तदा पार्थ । येई धर्माच्या सन्निध ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण । अर्जुनासी करी धन्य ॥ १० ॥

अध्याय ८ वा १६

वृत्त ऐकूनियां 'शल्य' मद्रपति । पांडवसाह्यासी सिद्ध होई ॥ १ ॥
अर्धयोजन तें पसरलें सैन्य । विचित्रभूषण अलंकार ॥ २ ॥
आभरणें सर्व स्वदेशी लेऊनि । पांडवांसी रणीं साह्य इच्छी ॥ ३
ऐकूनि तें वृत्त दक्ष दुर्योधन । भक्ष्य, भोज्य, पान, पुढती नेई ॥
रत्नजडित त्या निर्मियेल्या सभा । मार्गी मद्रराजा तोषविलें ॥५॥
अमात्यांसी म्हणे शल्य, शिल्पकार । पार्थाचे सत्वर पुढती आणा॥
पारितोषिक त्यां देईन आनंदें । तदा राव मोदें पुढती येई ॥ ७ ॥
पाहोनि तयासी उदार तो शल्य । आलिंगी, नृपाळ वर मागे ॥८॥
सेनापति माझा होई मद्राधिपा । तथास्तु हे वाचा वदला शल्य ॥
वासुदेव म्हणे उदार शल्यासी । कपटवैभवेंसी वश केलें ॥ १० ॥

१७

शल्य म्हणे दुर्योधना । सुखें जाई तूं स्वस्थाना ॥ १ ॥
येतां धर्मासी भेटूनि । गेला वचन देऊनि ॥ २ ॥
उपप्लव्य नगरीं आला । कुशल विचारी धर्माला ॥ ३ ॥
करूनियां उपदेश । कथिलें दुर्योधनवृत्त ॥ ४ ॥
धर्म म्हणे हें सत्कर्म । पाळीं आपुलें वचन ॥ ५ ॥
आम्हांस्तव एक करीं । कर्णसारथ्य स्वीकारीं ॥ ६ ॥
करीं कर्णतेजोभंग । कृष्णासम तव सारथ्य ॥ ७ ॥
कार्य शल्यासी तें मान्य । म्हणे होसील तूं धन्य ॥ ८ ॥
क्लेश बहुत साहिले । दैव कोणासी न टळे ॥ ९ ॥
भार्येसवें तो देवेंद्र । दुःखी झाला हें प्रसिद्ध ॥ १० ॥
वासुदेव म्हणे शल्य । बोले सांत्वनार्थ बोल ॥ ११ ॥

अध्याय ९ वा १८

धर्म म्हणे शल्या, इंद्र भार्येसह । कैसा दुःखाकुल झाला वदें ॥१॥

शल्य म्हणे पूर्वी त्वष्टा प्रजापति । 'विश्वरूपा'प्रति निर्मीतसे ॥२॥
इंद्रवध तेणें करावा हें मनीं । शिरत्रय जनीं ख्यात त्यासी ॥ ३ ॥
एक पढे वेद, अन्य प्राशी सुरा । प्राशितो विश्वाला तृतिय मुखें ॥
नित्य तीव्र तपें इंद्र भयाकुल । म्हणे हा घेईल इंद्रपद ॥ ५ ॥
तपोभ्रष्ट व्हावा यास्तव अप्सरा । धाडितांही इंद्रा अपयश ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे निराश देवेंद्र । सिद्ध होई वज्र फेंकावया ॥ ७ ॥

१९

दुर्बलहि शत्रु कदा नुपेक्षावा । चिंतूनियां वज्रा सोडीतसे ॥ १ ॥
त्रिशिरस मृत होई तया वेळीं । व्याकुळ अंतरीं परी इंद्र ॥ २ ॥
इतुक्यांत 'तक्षा' येई तया स्थानीं । इंद्र म्हणे छेदीं शिरें याचीं ॥
तक्षा म्हणे माझा परशु भंगेल । निंद्य हें ठरेल कार्य जनीं ॥ ४ ॥
इंद्र म्हणे जाणें देवराज मज । परशु अभेद्य होवो तुझा ॥ ५ ॥
महेंद्रवचनें तक्षा तोंडी शिर । कलविंक, तित्तिर, निघती पक्षी ॥६॥
वासुदेव म्हणे स्वर्गी जाई इंद्र । पुत्रास्तव विप्र रुष्ट झाला ॥ ७ ॥

२०

कोपोनियां त्वष्टा बोले इंद्राप्रति । वधिला निरपराधी पुत्र माझा ॥
ऐसें बोलूनियां तपोबळें वृत्र । निर्मूनियां, इंद्रा वधीं म्हणे ॥ २ ॥
ऐकूनियां वृत्र धांवूनियां गेला । उचलूनि टाकिला वदनीं इंद्र ॥३॥
पाहूनियां देव निर्मिती जृंभिका । मुखांतूनि इंद्रा सोडवी ते ॥ ४ ॥
पुनरपि घोर जाहला संग्राम । इंद्र रणांतून निवर्तला ॥ ५ ॥
इंद्रासवें देव मंदराद्रीवरी । अव्यय श्रीहरी स्मरती मनीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे संकटांत कोण । देवावीण अन्य साह्य लोकीं ॥ ७ ॥

अध्याय १० वा

२१

इंद्रादिक सकल देव । स्तवितां तुष्ट देवदेव ॥ १ ॥
म्हणे संधि करा त्यासी । तेणें हेतु पूर्ण होती ॥ २ ॥
ऐकूनियां देववाणी । संगें घेऊनियां मुनि ॥ ३ ॥
इंद्र येई दैत्यापाशीं । मुनि म्हणती करीं संधि ॥ ४ ॥
दैत्य म्हणे शुष्क, आर्द्र । काष्ट, पाषाण, शस्त्रास्त्र ॥ ५ ॥

वध न करो दिवा-रात्रीं । ऐसा वर द्याल जरी ॥ ६ ॥
तरी करीन मी संधि । होई मान्य तें मुनींसी ॥ ७ ॥
पुढती सागरतीरातें । दैत्य दिसला देवेंद्रातें ॥ ८ ॥
संध्यासमय तो होता । चिंती शक्र वृत्रश्रेष्ठा ॥ ९ ॥
इतुक्यांत जळांतून । येई वाहूनियां फेन ॥ १० ॥
वज्रासवें तो फेंकिला । प्राण दैत्याचा हरिला ॥ ११ ॥
वासुदेव म्हणे शक्र । ब्रह्महत्त्येनें संत्रस्त ॥ १२ ॥

२२

त्रिशिर तैं वृत्र वधिले इंद्रानें । ब्रह्महत्त्या तेणें जांच करी ॥ १ ॥
देवेंद्राचें भान हरे त्या दुष्कर्में । उदकवास्तव्यानें क्लेश सोशी ॥
शक्रहीन स्वर्ग भूमि शुष्क झाली । आटूनियां गेलीं सरोवरें ॥ ३ ॥
देवऋषि त्रस्त, माजे अराजक । देव भयभीत होती तदा ॥ ४ ॥
ऐशा वेळीं त्राता कोण आम्हांप्रति । अमर चिंतिती ऐसें मनीं ॥ ५ ॥
इंद्रपदास्तव सिद्ध नसे कोणी । वासुदेव मनीं हरि स्मरे ॥ ६ ॥

अध्याय ११ वा

२३

देवऋषि तदा नहुष रायासी । इंद्रपद देती रक्षणार्थ ॥ १ ॥
परस्पर तयां भय सकलांचें । नहुष स्वर्गीचे भोग भोगी ॥ २ ॥
एकदां इंद्राणी दर्शनासी येतां । होई कामबाधा नहुषाप्रति ॥ ३ ॥
सदस्यांसी म्हणे इंद्रपदप्राप्ति । होतां हे मजसी प्राप्त व्हावी ॥ ४ ॥
ऐकूनि नहुषवाणीतें इंद्राणी । गुरूसी येवोनि वंदीतसे ॥ ५ ॥
म्हणे देवगुरो, पतिव्रत्यास्तव । पूर्व आशीर्वाद सफल करीं ॥ ६ ॥
बृहस्पति म्हणे राहें तूं निर्भय । स्वस्थानीं येईल त्वरित इंद्र ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे वृत्त हें कळतां । नहुषाच्या चित्ता क्रोध येई ॥ ८ ॥

अध्याय १२ वा

२४

नहुषासी क्रुद्ध पाहूनियां देव । म्हणती हें अकार्य करूं नको ॥ १ ॥
देवांप्रति म्हणे नहुष, अहल्या । भ्रष्टितां हा केला काय बोध ॥ २ ॥
ब्रह्महत्या कैसी क्षमिली इंद्राची । फसवूनि वृत्रासी वधिलें कैसी

त्याच परी लाभो मज हे इंद्राणी । गुरूसी येवोनि कथिती देव ॥४॥
ऐकूनि इंद्राणी करी बहु शोक । म्हणे शरणागत जाणें मज ॥ ५ ॥
देवांप्रति गुरु बोले तया वेळीं । अभयता दिली इंद्राणीसी ॥६॥
शरणागतासी अर्पी जो शत्रूसी । यश न तयासी कार्यामाजी ॥ ७॥
संकटीं तयातें कोणीहि न साह्य । धान्य जें पेरील उगवे न तें ॥८॥
शेतावरी त्याच्या वृष्टि नच होई । अकालींच येई मृत्यु बाळां ॥९॥
पितर तयाचे जाती अधोगति । वासुदेव चिंती नारायणा ॥ १० ॥

२५

जाणूनियां ऐसे दोष । त्यागूं केंवी इंद्राणीस ॥ १ ॥
कांहीं उपाय योजितां । साह्य होईन तत्वतां ॥ २ ॥
देव म्हणताती आम्हांसी । मार्ग दावो बृहस्पति ॥ ३ ॥
गुरु म्हणे नहुषाप्रति । अवधी मागेल हे शची ॥ ४ ॥
वरदानें तो वलिष्ठ । झाला बहुत गर्विष्ठ ॥ ५ ॥
ऐसें ऐकूनि वचन । लज्जायुक्त शची जाण ॥ ६ ॥
गेली नहुषाच्या सन्निध । नृप जाहला मोहित ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे चित्तीं । हर्ष वाटे नहुषासी ॥ ८ ॥

अध्याय १३ वा

२६

नहुष म्हणे मी देवेंद्र । सुंदरी, तूं मज स्वीकार ॥ १ ॥
देवी कदलीसम कांपे । अवधी तयाप्रति मागे ॥ २ ॥
शक्राचा मी करितें शोध । बोले इंद्राणी नहुषास ॥ ३ ॥
नच कळतां वृत्त कांहीं । येईन मी कथितें पाहीं ॥ ४ ॥
हर्षे बोलला नहुष । ध्यानीं धरीं हेचि शब्द ॥ ५ ॥
नहुषअनुज्ञा घेऊनि । गेली इंद्राणी स्वस्थानीं ॥ ६ ॥
देव प्रार्थिती विष्णूसी । होवो इंद्रदोषमुक्ति ॥ ७ ॥
विष्णु म्हणे अश्वमेध । करितां होईल तो शुद्ध ॥ ८ ॥
दुष्कर्मेंचि हा नहुष । त्वरित पावेल विनाश ॥ ९ ॥
अल्पकाळ सहन करा । देव भेटले तैं इंद्रा ॥ १० ॥
वासुदेव म्हणे यज्ञ । करिती वचन आठवून ॥ ११ ॥

२७

ब्रह्महत्यादोष, वृक्ष, नद्या, गिरी । स्त्रियांत सत्वरी विभागिला ॥
निष्पाप तैं इंद्र येई भानावरी । सकल अंतरीं चिंतीतसे ॥ २ ॥
सामर्थ्यसंपन्न नहुष, वरदानें । अशक्याचि होणें पदच्युत ॥ ३ ॥
जाणूनियां ऐसें इंद्र होई गुप्त । पुनरपि शोक इंद्राणीसी ॥ ४ ॥
सत्कर्मेंचि जरी कंठिला मी काळ । होवो हा सफळ हेतु म्हणे ॥५॥
पातिव्रत्य माझें अभंग असावें । विनवी ते भावें देवीप्रति ॥ ६ ॥
'आनोयाहि मंत्रें उपश्रुतीप्रति । प्रार्थीतसे शची मनोभावें ॥ ७ ॥
सत्याची प्रतीति सत्यधर्मे येवो । इंद्रलाभ होवो म्हणे मज ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे संकटीं सत्कर्म । आठवूनि मन धैर्य पावे ॥ ९ ॥

अध्याय १४ वा २८

इंद्राणीची स्तुति ऐकूनियां देवी । प्रगट जाहली मूर्तिमंत ॥ १ ॥
घेऊनि शचीतें जाई उत्तरेसी । लंघूनियां मार्गीं विविध स्थळें ॥
वनामाजीं एका सरोवरातीरीं । येऊनि राहिली देवी उभी ॥ ३ ॥
प्रवेशली एका कमलनालांत । दावियेला इंद्र शचीलागीं ॥ ४ ॥
सूक्ष्मरूपें शची स्तवी तयाप्रति । संतोषूनि चित्तीं इंद्र म्हणे ॥ ५ ॥
कासयासी प्रिये पातलीस एथें । दाविलें कोणी हें स्थान तुज ॥
ऐकूनियां वृत्त निवेदूनि शची । बोले इंद्राप्रति रक्षीं मज ॥ ७ ॥
अभिलाष माझा केला त्या खलानें । वधूनि तेजानें रक्षीं देवा ॥८॥
वासुदेव म्हणे विनवूनि शची । बोले इंद्राप्रति नम्रभावें ॥ ९ ॥

अध्याय १५ वा २९

इंद्र म्हणे प्रिये ऐकें । काल प्रतीकूल असे ॥ १ ॥
हव्य-कव्यें बलवत्तर । नहुष जाहलासे थोर ॥ २ ॥
गुह्यमार्ग कथितों तुज । भेटे एकांतीं तयास ॥ ३ ॥
येई म्हणे ऋषिवाहनीं । तेणें तुजसी वश मी ॥ ४ ॥
ऐकूनियां भेटे शची । जाऊनियां नहुषाप्रति ॥ ५ ॥

पाहूनियां तो हर्षित । म्हणे मागें जें मनांत ॥ ६ ॥
शची म्हणे हे नृपाळा । अपूर्वता लाभो तुला ॥ ७ ॥
मुनिवाहन शिबिकेंत । बसूनि येईं मंदिरांत ॥ ८ ॥
समर्था, हे पुरवीं इच्छा । लाभ तेणें होई माझा ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे राजा । करी बुद्धीची प्रशंसा ॥ १० ॥

३०

पाठवूनि शचीलागीं सदनाप्रति । नहुप नृपति कार्या लागे ॥ १ ॥
शची येऊनियां विनवी गुरूसी । शोधावें इंद्रासी त्वरित आतां ॥
गुरु म्हणे खलविनाशार्थ इष्टि । करूनि इंद्रासी सुखवीन ॥ ३ ॥
ऐसें बोलूनियां हवन मांडिलें । अग्नीसी विनविलें शोधास्तव ॥ ४ ॥
क्षणामाजीं अग्नि पातला शोधूनि । जलावीण जनीं हिंडला तो ॥ ५ ॥
उदकेंचि अग्नि विप्रेंचि क्षत्रिय । पाषाणेंचि लोह नाश पावे ॥ ६ ॥
कारणांत कार्य लीन हा निश्चय । कथी वासुदेव अग्निवाक्य ॥ ७ ॥

अध्याय १६ वा

३१

बृहस्पति करी स्तवन अग्नीचें । कारण विश्वाचें तूंचि देवा ॥ १ ॥
अविदित काय तुज त्रिभुवनीं । इंद्रासी शोधूनि आणीं देवा ॥ २ ॥
अनन्य श्रद्धेतें पाहोनियां अग्नि । उदकीं प्रवेशूनि शोधी इंद्रा ॥ ३ ॥
येऊनियां शोध कथिला गुरूसी । स्तविती इंद्रासी देव तदा ॥ ४ ॥
प्रगटूनि देवां बोलला देवेंद्र । वधीयेला वृत्र, कार्य काय ॥ ५ ॥
नहुषाचें वृत्त कथिलें गुरूनें । याचिलें इंद्रानें साह्य तदा ॥ ६ ॥
तैसेचि इंद्रानें अर्पिले विभाग । वरुणासी उदक इत्यादिक ॥ ७
महाक्रतुमाजीं अग्नि इंद्रां एक । लाभेल विभाग कथीतसे ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे तोषवी देवांसी । इंद्र संतोषेंसी तया वेळीं ॥ ९ ॥

अध्याय १७ वा

३२

इंद्रादिक ऐसा करिती विचार । अगस्ति दयाळ तोंचि येई ॥ १ ॥
पदभ्रष्ट म्हणे नहुष जाहला । निष्कंटक केला मार्ग तुझा ॥ २ ॥
मुनीलागीं इंद्र सन्मानी प्रेमानें । वृत्त आनंदानें पुशीतसे ॥ ३ ॥

मुनि म्हणे त्याची वाहतां शिविका । वेदप्रामाण्यता पुशिली तया
मूढ नहुष तो वदला अप्रमाण । आम्हांसी प्रमाण म्हणती मुनि ॥
विवाद हा ऐसा करितां मजसी । ताडिलें चरणेंसी उन्मत्तानें ॥६॥
तदा तेजोहीन तया नृपाळासी । वदलों भूमीसी पतन पावें ॥ ७ ॥
अप्रमाण तुज पूर्वजांची कृति । वाहनीं जोडिसी तपस्व्यांसी ॥ ८ ॥
मस्तकीं ताडन करिसी मजला । पुण्यक्षय झाला दुष्कर्में या ॥ ९ ॥
अर्बुद वत्सरें होईं महासर्प । ऐसा तया शाप दिधला असे ॥ १० ॥
ऐकूनि हें इंद्र येई स्वस्थळासी । वासुदेव त्यासी वंदीतसे ॥ ११ ॥

अध्याय १८ वा ३३

शल्य म्हणे धर्मा, इंद्र आनंदानें । देवांसमागमें स्वर्गी येई ॥ १ ॥
इंद्राणीची भेट घेऊनि संतोषें । पालन स्वर्गाचें करीतसे ॥ २ ॥
स्तवितां अंगिरा, इंद्र त्या सन्मानी । आनंदित मनीं होती देव ॥
युधिष्ठिरा, इंद्र अज्ञात यापरी । राहिला अंतरीं धैर्य धरीं ॥ ४ ॥
इंद्रासम तूंहि भोगिसील राज्य । वधिसील शत्रूंस वृत्रासम ॥५॥
नहुषासम दुष्ट पावती पतन । कथिलें आख्यान विजयप्रद ॥ ६ ॥
इहलोकीं सौख्य, शत्रूचा विनाश । पुत्रपौत्रलाभ पठणमात्रें ॥ ७ ॥
आपत्ति तयांसी न बाधे सर्वदा । जय, आरोग्यता प्राप्त होई ॥ ८ ॥
धर्म म्हणे शल्या, तेजोभंग करीं । कर्णाचा, संगरीं धरूनि ध्यानीं ॥
अनुमोदन तें देऊनियां शल्य । सेनेसह मार्ग क्रमीतसे ॥ १० ॥
वासुदेव म्हणे अहित तें हित । करिताती संत धैर्यबळें ॥ ११ ॥

अध्याय १९ वा ३४

महारथ तो सात्यकी । आणी चतुरंग सेनेसी ॥ १ ॥
शूल, पाशही मुद्गर । गदा परशु तोमर ॥ २ ॥
आयुधांनीं ते मंडित । धृष्टकेतु, चेदिराज ॥ ३ ॥
जयत्सेन तो मागध । येती अक्षौहिणीयुक्त ॥ ४ ॥
पांड्य यमुनातीरवासी । येई ससैन्य साह्यासी ॥ ५ ॥
द्रुपद, मत्स्यराज-सेना । अक्षौहिणी सप्त जाणा ॥ ६ ॥

सकल युद्धासी उत्सुक । तोप देती पांडवांस ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐसे । वीर सज्जले रणातें ॥ ८ ॥

३५

इकडे धार्तराष्ट्र करिती सिद्ध सेना । भगदत्त जाणा साह्य त्यांसी ॥
चीन, किरातादि भूरिश्रवा शूर । कृतवर्मा, भोज, अंध तेंवी ॥ २ ॥
जयद्रथादिक सिंधु सौवीरहि । कांपविती मही सेनाबळें ॥ ३ ॥
सुदक्षिण, शक, यवन, कांबोज । तेंवी नीलायुध दाक्षिणेचा ॥ ४ ॥
माहिष्मतीवासी 'नील' शूर नृप । विंद, अनुविंद, अवंतीचे ॥ ५ ॥
केकयाधिपति येती पंचभ्राते । अक्षौहिणी ऐसे एकादश ॥ ६ ॥
पंचनद, मरूभूमि कुरुजांगल । तेंवी गंगाकूल भरलें सैन्य ॥ ७ ॥
रोहितकारण्य, वारण अहिच्छत्र । तैसें यमुनातीर वाटधान ॥८॥
ऐसे सकलदेश व्यापिले सैन्यानें । अवलोकिलें जाण पुरोहितें ॥९॥
वासुदेव म्हणे सिद्धता सैन्याची । होई उभयांची ऐशापरी ॥१०॥

---

## संजययानपर्व २

अध्याय २० वा

३६

द्रुपदाचा पुरोहित । येई कौरवसभेंत ॥ १ ॥
राजा करी कुशलप्रश्न । पुढती विप्राचें भाषण ॥ २ ॥
सनातन धर्मवेत्ते । सदस्य हो, तुम्हीं ज्ञाते ॥ ३ ॥
भ्राते, पंडु-धृतराष्ट्र । सम अधिकार उभयांस ॥ ४ ॥
ऐसें असतां पूर्वधन । भोगीतसे दुर्योधन । ॥
यत्न नाशार्थहि झाला । दैवें विफल तो केला ॥ ६ ॥
पुढती केलें कपटद्यूत । हरिलें वैभव समस्त ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे विप्र । कथितो सभासदां सर्व ॥ ८ ॥

३७

सदस्य हो, दुष्कर्मासी । तुम्हीं दिधली अनुमति ॥ १ ॥
क्लेश दारुण सोशिले । परी महात्मे विसरले ॥ २ ॥

साम इच्छिताती वीर । उपदेशावा राजपुत्र ॥ ३ ॥
युद्ध इच्छील तो जरी । न मिळो प्रोत्साहन तरी ॥ ४ ॥
सात अक्षौहिणी सैन्य । समबल योद्धे अन्य ॥ ५ ॥
सकलां निवारील पार्थ । साह्य तयासी अच्युत ॥ ६ ॥
ऐसी जाणूनियां स्थिति । करा पार्थासवें संधि ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे विप्र । सकल निवेदितो वृत्त ॥ ८ ॥

अध्याय २१ वा ३८

सत्कारूनि भीष्म महा द्युतिमान । बोलला वचन सभेमाजी ॥ १ ॥
कुशल ऐकूनि आनंद चित्तासी । इच्छा ही संधीची योग्य वाटे ॥
ब्राह्मण्येंचि तीव्र वाटे तुझी वाणी । वीरांप्रति वनीं क्लेश झाले ॥३॥
एकाकी अर्जुन जिंकील त्रैलोक्य । महा बलवंत कृतास्त्र तो ॥ ४ ॥
ऐकूनियां कर्ण बोले क्रोधावेशें । त ,,पांडवांचें विदित जनां ॥ ५ ॥
पुनरपि तयां योग्य वनवास । जाहले प्रगट अवेळीं ते ॥ ६ ॥
मत्स्य पांचालांचें साह्य तयांप्रति । यास्तव मागती अर्धराज्य ॥७॥
न्याय्यमार्गें राजा अर्पील अवनी । अन्यायें छेदूनि न मिळे तृण ॥
होऊनियां पूर्णप्रतिज्ञ तयांनीं । झोपावें येवोनि अंकावरी ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे कर्णाचें वचन । ऐकूनियां भीष्म वदला ऐका ॥ १० ॥

३९

वडवड ऐसी करिसी कासया । विस्मृति राधेया, तुजसी होई ॥१॥
महारथी षट्क जिंकिले वीरानें । व्यर्थ मत्सरानें काय लाभ ॥ २ ॥
विप्रवाक्य जरी ऐकिलें न आतां । वदनीं मृत्तिका निश्चयेंसी ॥ ३ ॥
'प्रज्ञाचक्षु' देई भीष्मा अनुमोदन । वदे निर्भर्त्सून कर्णाप्रति ॥ ४ ॥
वाणी गांगेयाची जगाच्या हिताची । होईल आम्हांसी सौख्य तेणें
चिंतूनि करितों संजयप्रेषण । विप्रा संतोषून जाई आतां ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे राव संजयासी । पाचारूनि त्यासी वदला ऐका ॥७॥

अध्याय २२ वा ४०

संजया, पांडव उपप्लव्य पुरीं । पातले सत्वरी भेटें तयां ॥ १ ॥
त्रयोदश वर्षं भोगूनिहि क्लेश । इच्छिती आम्हांस सौख्य लाभ ॥ २॥

अनिंद्य ते जनीं, निर्दोप वर्तन । धर्म, अर्थ काम मर्यादा त्यां ॥ ३ ॥
तयां धार्मिकांसी सज्जन स्तविती । व्यर्थ त्यां निंदिती कर्णादिक ॥
आरंभशूर हे करिती निंद्य क्रिया । रणीं धनंजया कोण जिंकी ॥
सात्यकी, केशव, माद्रीपुत्रांसम । वीर ते स्मरून धाक वाटे ॥ ६ ॥
महाबळी भीम गदायुद्धश्रेष्ठ । क्रोधें सकलांस भस्म करी ॥ ७ ॥
भीष्मादिक जरी साह्य आम्हांप्रति । तयांच्या पुढती तुच्छ आम्हीं
धृष्टद्युम्नादिक अर्पितील प्राण । धर्माचे निःसीम भक्त बहु ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे धृतराष्ट्रनृप । स्वयें बलाबळ वर्णीतसे ॥ १० ॥

४१

द्रोण, पार्थ, कृप, वासुदेव, भीष्म । अस्त्रदाते जाण सात्यकी तो ॥
कृष्णाचा विक्रम स्मरतांचि भय । कौरवां विजय अशक्यचि ॥ २ ॥
कृष्ण तोचि विष्णु निर्धार हा माझा । त्याहूनि धर्माचा धाक मज ॥
कापट्यें पुत्रांच्या, धर्म जरी क्रुद्ध । करीलचि दग्ध क्षणीं आम्हां ॥
सत्य संकल्प तो युक्ताचि कोपतां । तेणें माझ्या चित्ता चिंता बहु ॥
संजया, त्या वीरा कुशल विचारीं । तेंवी महाबळी कृष्णालागीं ॥
इच्छितों मी संधि, सांगें तयाप्रति । आदरें कृष्णासी भजती वीर ॥
कुशल त्यापरी पुशीं सकलांसी । गोष्ट जे हिताची तेचि करीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे राजा संजयासी । साम पांडवासी करीं म्हणे ॥ ९ ॥

अध्याय २३ वा

४२

राजाज्ञेनें सूत भेटला धर्मासी । कुशल तयासी पुशीतसे ॥ १ ॥
निवेदूनि क्षेम सन्मानूनि धर्म । म्हणे आजि धन्य जाहलों मी ॥ २ ॥
गुरुजन भेटी जाहलीसें वाटे । कुशल वृद्धांचें कथीं मज ॥ ३ ॥
कर्णासवें राव असे कीं सौख्यांत । साह्य इष्टमित्र करिती कीं त्या ॥
पूर्ववत वृत्ति विप्रांची असे कीं । नच हरिले कीं अग्रहार ॥ ५ ॥
ब्राह्मणातिक्रम करिती तयांची । उपेक्षा नसे कीं राज्यामाजी ॥ ६ ॥
विप्रवृत्तिछेदें होतसे विनाश । वेतनें अमात्य संतुष्ट कीं ॥ ७ ॥
भेदें सुहृद्रूप नसती कीं अमात्य । न गाती कीं दोप पांडवांचे ॥ ८ ॥
स्मरती कीं कदा भीम अर्जुनांसी । रक्षिलें तयांसी द्वैतवनीं ॥ ९ ॥

दिधलें स्मरण वीरा सामास्तव । होतां निरुपाय सिद्ध सैन्य ॥१०॥
वासुदेव म्हणे साम, दान, भेद । व्यर्थ होतां, युद्ध करणें प्राप्त ॥११॥

अध्याय २४ वा ४३

म्हणे संजय धर्मासी । क्षेम असे कौरवांसी ॥ १ ॥
तुम्हांपाशीं करिती वैर । अपराध त्यांचा घोर ॥ २ ॥
मित्रद्रोहाचें पातक । जाणीतसे धृतराष्ट्र ॥ ३ ॥
भीमार्जुनांचें स्मरण । तयालागीं रात्रंदिन ॥ ४ ॥
धर्मा, तुजसम श्रेष्ठ । भोगीतसे जनीं कष्ट ॥ ५ ॥
न टळे आघात काळाचा । हाचि एक अर्थ त्याचा ॥ ६ ॥
अनुभवी तूंची धर्मा । नेई सिद्धीप्रति शमा ॥ ७ ॥
सकळ बंधु आज्ञांकित । तुम्हीं धार्मिक हे ख्यात ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे दूत । कथितां राजाचा निरोप ॥ ९ ॥

अध्याय २५ वा ४४

संजय बोलला धर्मरायाप्रति । धृतराष्ट्र शमासी सिद्ध असे ॥ १ ॥
यास्तव मजसी धाडिलें त्वरित । तुम्हीं कुलवंत दयाशील ॥ २ ॥
सज्जन हो, निंद्य तुम्हां हिंस्रकर्म । कृष्णविदुसम शुभ्र वस्त्रीं ॥ ३ ॥
पापावह क्षय, जया युद्धामाजी । कोण सुज्ञ राजी होईल त्या ॥ ४ ॥
कुलाभिमानें जे गंधर्वां जिंकिती । उद्युक्त ते होती रणीं कैंवी ॥ ५ ॥
पराजयरूप जय तो सर्वथा । मृत्यूचें जीवित्वा स्वरूप त्या ॥ ६ ॥
केशव, सात्यकी साह्य ज्या पक्षासी । पराभूत त्यांसी कोण करी ॥
तैसेंचि नृपाळा भीष्म, द्रोण, कृप । अश्वत्थामा जेथ, विजय तयां ॥
संगरांत ऐशा जय-पराजय । एकाचि आशय ध्यानीं असो ॥ ९ ॥
यास्तव प्रार्थना हेचि सकलांसी । योजावी सामाची युक्ति कांहीं ॥
कृष्ण दयावंत दीनास्तव प्राण । करील अर्पण निर्धार हा ॥ ११ ॥
वासुदेत म्हणे धृतराष्ट्रभाव । कथी सामास्तव चतुर दूत ॥ १२ ॥

अध्याय २६ वा ४५

धर्म म्हणे कां संजया । धरिसी संगराच्या भया ॥ १ ॥

अयुद्धाचे युद्धाहूनि । सर्वकाल श्रेष्ठ जनीं ॥ २ ॥
संकल्पेंचि कार्य होतां । कोण करी खटाटोपा ॥ ३ ॥
कोण सुखेच्छु या लोकीं । सज्ज होईल युद्धासी ॥ ४ ॥
होईल जो शापदग्ध । तोचि स्वीकारील युद्ध ॥ ५ ॥
धर्मवंत हे सुखैषी । पार्थ सत्पथा वरिती ॥ ६ ॥
विषयविस्मरणें सुख । जाणती न जे कामुक ॥ ७ ॥
घृताहुतीसम त्यांची । भोगइच्छा पावे वृद्धि ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे धर्म । वदे यथार्थ भाषण ॥ ९ ॥

४६

न्यून काय होतें धृतराष्ट्राप्रति । परी स्वार्थ त्यासी बाधा करी ॥१॥
अन्यायपथेंहि पावला वैभव । भाग्य तेणें थोर सिद्ध होई ॥ २ ॥
दैवहीन आम्हीं पावलों हें दैन्य । करी पूर्वपुण्य धन्य जगीं ॥ ३ ॥
तृष्णा ते वाढवी खिन्नता चित्ताची । स्वहितचि इच्छी सर्वकाळ ॥
निद्राधीं लावूनि अग्नि वनामाजी । दुर्योधन इच्छी सुटका आतां
मूढ, मंद, तैंवी कुटिलसंगति । दैन्य हें रायासी भोगविती ॥ ६ ॥
विदुरवचन अमृत, तें विष । भासलें रायास पुत्रमोहें ॥ ७ ॥
अहंमन्य दीर्घद्वेष्टा दुर्योधन । जाणूनिहि धर्म त्यजिला नृपें ॥ ८ ॥
विदुरवचन यदा अवमानिलें । नष्टचि जाहलें भाग्य तदा ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे विस्तारेंसी धर्म । करी निवेदन ऐका स्पष्ट ॥ १० ॥

४७

कर्ण, दुर्योधन, शकुनि ते दुष्ट । करिती उपदेश दुर्योधना ॥ १ ॥
चिंतूनिही मार्ग न दिसे सामाचा । विपरीत रायाचा दृष्टिकोण ॥
आम्हीं वनीं जातां राज्य जे भोगिती । इच्छा त्यां सामाची शक्य नसे
पार्थाप्रति कर्ण जिंकील हें व्यर्थ- । चिंतिती, मनांत मोहवश ॥४॥
स्वबळेंचि राज्यलाभ हा मानिती । होईल पुढती पश्चात्ताप ॥ ५ ॥
गर्जना भीमाची, पार्थचापघोष । ऐकिला न तोंच भ्रम ऐसा ॥६॥
चिंतील हें सर्व जरी दुर्योधन । तरीच हा साम शक्य असे ॥ ७ ॥
आजवरी बहु क्षमिले अपराध । संदेशाचें काज नाहीं आतां ॥ ८ ॥

परी आम्हांलागीं संजया तूं प्रिय । यास्तव अप्रिय वदलों नाहीं ॥
इंद्रप्रस्थराज्य, अर्पितां सुखानें । राज्य आनंदानें करितील ते ॥
वासुदेव म्हणे सात्विकहि धर्म । बोलला वचन स्पष्ट ऐसें ॥ ११ ॥

अध्याय २७ वा

४८

चतुर संजय धर्माप्रति बोले । यश संपादिलें जगतीं तुम्हीं ॥ १ ॥
अनित्याचि वय संपूनि जाईल । कोण हें जाणील, तुझ्याविण ॥ २ ॥
युद्धाहूनि भिक्षा श्रेष्ठ तुजप्रति । निश्चित हे मति समजें धर्मा ॥ ३ ॥
सौख्यलाभ काय बांधवां वधूनि । धर्मविरोधिनी कामना हे ॥ ४॥
सज्जन त्यागितो समूळ कामना । बंधन हे तृष्णा जगामाजी ॥५॥
विषयेच्छा, धर्म, अर्थहि ते नाशी । अल्प लाभें सुखी धार्मिक जो ॥
अधार्मिक दुःखी साम्राज्य लाभतां । धर्माची आकांक्षा सुजन करी ।
धर्मा तूंचि बहु केलेंसी सत्कर्म । नास्तिकांसी जाण सुख सदा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कर्मासम लोकीं । लाभतसे गति कर्त्यालागीं ॥ ९ ॥

४९

कर्माधीन प्राणी म्हणे गावल्गणि । भोगावीण जनीं न चुके कर्म ॥१॥
अथवा ज्ञानानें क्षीणत्व पावतें । भोग परलोकींचे अवशिष्ट ॥ २ ॥
न्यायार्जित धनें तोषवितां विप्रां । येई पुरुषार्थता मानवासी ॥ ३ ॥
राजसूयादिक घडलें बहु पुण्य । परलोकीं सत्कर्म न घडे कांहीं ॥४॥
क्षुद्रइच्छापूर्ति न करीं तूं एथें । हिंसाप्राप्त राज्यें काय लाभ ॥ ५ ॥
विषयवैराग्यें करीं योगाभ्यास । तेणें तूं कृतार्थ होसी धर्मा ॥ ६ ॥
गोत्रवधाहूनि वनवास श्रेष्ठ । भोगिले जे कष्ट योग्याचि ते ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे संजय यापरी । उपदेश करी पांडवांसी ॥ ८ ॥

५०

कासयासी वनीं क्लेश सोशियेले । कां न निर्दाळिले वैरी तदा ॥ १ ॥
बलवृद्धांप्रति, क्षीणबल धर्मा । कासया संग्रामा प्रवृत्ति हे ॥ २ ॥
मूढ, अधर्मज्ञ, युद्धें इच्छी राज्य । ज्ञाता दारिद्र्यास अवलंबितो ॥ ३ ॥

युधिष्ठिरा, क्रोधें आजवरी कदा। वरिलासी न पंथा अधर्माचा ॥४॥
आतांचि हे बुद्धि कोठोनि तुजसी। मदिरा प्राशिती असज्जन ॥५॥
आंवरूनि क्रोध शांत हो नृपाळा। सत्यचि तुजला क्षमा श्रेष्ठ ॥६॥
शांतनव भीष्म, पुत्रासवें द्रोण। कृपादि वधून काय सुख ॥ ७ ॥
जरा, मृत्यु, कदा न चुके या लोकीं। साम्राज्याधिपति असतांही तो
यास्तव न करीं युद्ध युधिष्ठिरा। रक्षीं निजगोत्रा अहिंसेनें ॥ ९ ॥
न ऐकती जरी अमात्य तयांसी। त्यागूनि वनासी जाईं सुखें ॥१०॥
वासुदेव म्हणे बोलतां संजय। ऐकूनियां राव वदला ऐका ॥ ११ ॥

अध्याय २८ वा

५१

विवेकें संजया बोले युधिष्ठिर। अजाणतां बोल बोलसी हे ॥ १ ॥
कदाकाळीं धर्म भासतो अधर्म। अधर्महि धर्म भासे कदा ॥ २ ॥
धर्म तोचि धर्म वसिष्ठादिकांचा। त्रिविध हा ऐसा धर्मबोध ॥ ३ ॥
कवण्या अर्थें मज म्हणसी धार्मिक। द्वय तें पूर्वोक्त प्रच्छन्नचि ॥
निश्चयासी त्यांच्या लागे दीर्घकाल। पाडी आपत्काल संदेहांत ॥५॥
स्वाध्याय-प्रवचन, शौर्य, पण्य, कृषि। यथाक्रम जगीं धर्म ऐसे ॥६॥
आपत्कालीं त्यांचा स्वरूपव्यत्यास। क्षात्रवृत्तिमार्ग विप्र-वैश्यां ॥
आपद्धर्म कदा नित्य न गणावा। षट्कर्मी न व्हावा क्षत्रिय कदा ॥
भूमि, शस्त्रादि तीं विनष्ट जीविका। स्वीकारिली भिक्षा याचि योगें
प्राणरक्षणार्थ स्वीकारितां भिक्षा। उपाय नसतां पाप नसे ॥ १० ॥
आपद्धर्म होई विपत्कालीं धर्म। निंद्यचि तें कर्म कारितां नित्य॥११॥
अनिंद्यचि जनीं जाणावें पांडव। कथी वासुदेव धर्मवाणी ॥१२॥

५२

मनोनाश जे इच्छिती। जीव-शिवतादात्म्यैंसी ॥ १ ॥
शिष्टसदनीं तयां भिक्षा। शास्त्रमान्य हे जीविका ॥ २ ॥
यज्ञास्तव पूर्वजांनीं। क्रमिला हाचि मार्ग जनीं ॥ ३ ॥
आस्तिक मी त्याचि पंथें। विपत्तींत गेलों सुखें ॥ ४ ॥
तुच्छ त्रैलोक्य मजसी। घडतां हानि स्वधर्माची ॥ ५ ॥
कर्म फलदाता कृष्ण। कुशल ज्ञाता नीतिमान् ॥ ६ ॥

तोचि आधार आम्हांसी । प्रिय सामचि मजसी ॥ ७ ॥
स्वधर्मचि मज इष्ट । कृष्ण आमुचा वरिष्ठ ॥ ८ ॥
कृष्णवचन आम्हांसी । मान्य सकळ वीरांसी ॥ ९ ॥
त्याचा अतिक्रम कोणा । न घडे स्वप्नांतहि आम्हां ॥ १० ॥
वासुदेव म्हणे धर्म । कथी स्पष्ट हें वचन ॥ ११ ॥

## अध्याय २९ वा

५३

संजयासी म्हणे कृष्ण । व्हावें धर्माचें कल्याण ॥ १ ॥
धार्तराष्ट्रांचेंहि हित । चिंतितों मी अहर्निश ॥ २ ॥
नित्य उपदेशावा शम । संजया, तूं त्यांलागून ॥ ३ ॥
अम्हांसवें युधिष्ठिर । तेंचि इच्छी निरंतर ॥ ४ ॥
परी धर्माची हे इच्छा । दुष्करचि वाटे चित्ता ॥ ५ ॥
परम तृप्त धर्मराज । लोभी धृतराष्ट्रसुत ॥ ६ ॥
राज्यलोलुप नृपाळ । कलहाचें तोचि मूळ ॥ ७ ॥
नित्य आम्हीं धर्मरत । दोष देसी कां धर्मास ॥ ८ ॥
गार्हस्थ्यांत तो तत्पर । काय तुजसी अधिकार ॥ ९ ॥
म्हणसी त्याचा धर्मलोप । व्यर्थ तुझे हे प्रलाप ॥ १० ॥
शुचि, अद्रोहि, गृहस्थ । नित्य स्वाध्यायांत रत ॥ ११ ॥
श्रेष्ठ जाणावें तयासी । वासुदेव ऐका कथी ॥ १२ ॥

५४

ब्रह्मचर्य श्रेष्ठ नैष्ठिक तें कोणी । अपरिग्रह कोणी स्तविती ज्ञाते ॥
संन्यास वा कोणी म्हणताती वरिष्ठ । गृहस्थाहि साध्य ज्ञान, परी ॥
यज्ञादि ते मात्र इतरां असाध्य । गृहस्थ समग्र धर्म साधी ॥ ३ ॥
अतृप्तचि ज्ञानी भोजनावांचोनि । गृहस्थ सदनीं यति सुखी ॥ ४ ॥
कर्मसाधक ते विद्या फलवती । विफल तें जगीं इतर ज्ञान ॥ ५ ॥
कर्मफलप्राप्ति घडे याचि लोकीं । जलपानें तृप्ति तत्काळाचि ॥ ६ ॥
ज्ञानासवें कर्म, साधक तें पाहीं । कर्मबाधा नाहीं तयाप्रति ॥ ७ ॥
ऐसें असूनियां कर्माहूनि शम । श्रेष्ठ हें भाषण व्यर्थ असे ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे दुर्बल प्रलाप । वदे हे अच्युत संजयाचे ॥ ९ ॥

५५

स्वर्गी प्रकाशती देव । कृतकर्मेंचि सदैव ॥ १ ॥
वायु वाहतो कर्मानें । सूर्य तळपे तेजानें ॥ २ ॥
मास, नक्षत्रें लंघूनि । चंद्र शोभवी रजनी ॥ ३ ॥
जातवेदा अतंद्रित । सुखवी लोकांसी समिद्ध ॥ ४ ॥
कर्मेंचि हे सकलाधार । धरा वाहतसे भार ॥ ५ ॥
शीघ्रवेगें या सरिता । तृप्ति देती सर्वभूतां ॥ ६ ॥
अतंद्रित मेघ वर्षे । इंद्रपद दिव्य तपें ॥ ७ ॥
देवगुरु रुद्रादिक । विश्वेदेव तें आदित्य ॥ ८ ॥
स्वकर्मेंचि प्रकाशती । तारकाही उंच नभीं ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे कर्म । कृष्णबोधामृत वर्म ॥ १० ॥

५६

वर्ण, आश्रमहि जाणसी संजया । बोलसी कासया पक्षपातें ॥ १ ॥
अश्वमेध तेंवी वेदाभ्यासप्रिय । यमासम शौर्य युधिष्ठिरा ॥ २ ॥
गज, अश्व, रथ, धनुष्य, कवचादि । विपुल सामग्री तयापाशीं ॥
अजिंक्य असोनि न करी तो हिंसा । मार्ग त्या सामाचा प्रिय बहु
दावील जो पंथा आंवराया भीमा । रक्षील तो धर्मा निश्चयेंसी ॥
ऐसें न घडतां दुर्दैवें युद्धांत । मृत्यूहि प्रशस्त तयालागीं ॥ ६ ॥
शम श्रेष्ठ तरी क्षत्रियांचा धर्म । संग्राम कीं शम निवेदावा ॥ ७ ॥
वर्णधर्म आधीं चिंतूनि स्वमनीं । पांडवांलागूनि दोष देई ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे सांगे वर्णधर्म । स्वयें भगवान संजयासी ॥ ९ ॥

५७

अध्ययनादि तीं कर्में ब्राह्मणांची । कर्में क्षत्रियांचीं रक्षणादि ॥ १ ॥
कृषि-वाणिज्य तो वैश्यधर्म साचा । शूद्रांसी सेवेचा अधिकार ॥
आश्रमांत जैसा गृहस्थ वरिष्ठ । पालकत्वें श्रेष्ठ क्षत्रिय तें ॥ ३ ॥
सर्व वर्ण तेणें रक्षावे स्वधर्मी । निष्काम तो जनीं श्रेष्ठ नृप ॥ ४ ॥
युधिष्ठिरामाजी सर्व हे सद्गुण । लेशही अधर्म नसे तेथें ॥ ५ ॥
ज्ञाता श्रेय जरी दावील याह्लानि । स्वीकारील जनीं आनंदें तो ॥
वासुदेव म्हणे अनाग्रहवृत्ति । नित्य ते धर्माची सत्यनिष्ठा ॥ ७ ॥

५८

संजया ऐकावी युद्धाची उत्पत्ति । तस्कराची कृति करितां राव ॥१॥
दुर्दैवें इच्छील वैभव अन्याचें । तरीच युद्धाचें प्रयोजन ॥ २ ॥
विधिप्रकोपें तो दुष्ट दुर्योधन । इच्छीतसे धन पांडवांचें ॥ ३ ॥
धर्मासी तो वध्य यास्तव जाहला । शस्त्रोद्भव झाला याचसाठीं
प्रच्छन्न तस्करनाशें युधिष्ठिर । स्वधर्म रक्षील निश्चयेंसी ॥ ५ ॥
लवही न दोष कर्में या तयासी । वाणी श्रीकृष्णाची निर्णायक ॥६॥
वासुदेव म्हणे तत्त्वविपर्यास । कैसा श्रीहरीस रुचेल तो ॥ ७ ॥

५९

अधार्मिक कौरवांनीं । केला अपराध जनीं ॥ १ ॥
न्यायप्राप्त हरिलें राज्य । मान्य करी कौरवराज ॥ २ ॥
राजधर्म सनातन । स्वार्थें अवमानिला जाण ॥ ३ ॥
चौर्य द्विविध जनांत । प्रगट तैसेंचि तें गुप्त ॥ ४ ॥
अविलंबिले मार्ग दोन्हीं । स्वार्थांध त्या कौरवांनीं ॥ ५ ॥
संपतांहि वनवास । न देती जें त्यांचें त्यांस ॥ ६ ॥
केवळ न अपहार । गणिती पांडवां वधार्ह ॥ ७ ॥
राज्य पूर्वजोपार्जित । परराज्याहूनि श्रेष्ठ ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण । क्रोधें बोलला वचन ॥ ९ ॥

६०

संजयासी म्हणे कृष्ण, दुर्योधना । सनातनधर्मा कथन करीं ॥ १ ॥
मत्त, मृत्युवश, मूढ, त्या नृपाळा । साह्यास्तव गोळा केलें तेणें ॥
अन्य पापकर्म आठवीं तयांचें । सभेंत साध्वीतें ओढियेलें ॥ ३ ॥
भीष्म प्रमुखांनीं उपेक्षिलें तदा । घडली न निंदा दुष्कृत्याची ॥ ४ ॥
निश्चयें त्या कृत्यें नाश कौरवांचा । अन्य मार्ग आतां न दिसे कांहीं॥
संकटीं त्या कृष्णा होऊनियां आर्त । पाहे सकलांस दीनवाणी ॥६॥
विदुर एकाकी तया संकटांत । धर्मज्ञ तो स्पष्ट वदला एक ॥ ७ ॥
स्मरूनि त्या कृत्यां चिंतीं स्वमनांत। बोलसी तें सत्य अथवा मिथ्या
सागरौघामाजी नौकेसम कृष्णा । दुष्कराचि पुण्या आचरी तें ॥९॥

निर्लज्ज त्या वेळीं बोलला जें कर्ण । अद्यापि अर्जुन स्मरूनि दुःखी॥
'दासी' ऐसा शब्द मर्मी झोंबतसे । वासुदेव सांगे कृष्णवाचा ॥

६१

दुःशासन तदा वदला वीरांसी । नर्कवास यांसी दीर्घकाल ॥ १ ॥
शकुनि म्हण धर्मा, जिंकिले बांधव । आतां पणा लाव याज्ञसेनी ॥
वंचक तीं वाक्यें स्मरतील तुज । हास्तिनापुरास येईन मीं ॥ ३ ॥
सकल प्रयत्नें हित पांडवांचें । साधूनि शमातें साधावया ॥ ४ ॥
दुर्योधनादिक ऐकतील जरी । तुटतील तरी यमपाश ॥ ५ ॥
न ऐकतां भीम देईल उत्तरें । अर्जुनाच्या शरें नाश त्यांचा ॥ ६ ॥
क्रोधमय दुष्ट दुर्योधनवृक्ष, । कर्ण तया स्कंद, शकुनि शाखा ॥७॥
पुष्प-फळें त्यांचीं दुःशासनादिक । मूळ त्या धृतराष्ट्र महाभूढ ॥८॥
इकडे धर्ममय महाद्रुम धर्म । स्कंद तो अर्जुन, भीम शाखा ॥ ९ ॥
पुष्प-फळें त्यांची उभय माद्रीपुत्र । मजसवें वेद मूळ त्यांचें ॥१०॥
वासुदेव म्हणे वेद, शास्त्र, कृष्ण । अविच्छेद्य जाण जगामाजीं ॥

६२

पुत्रांसवें धृतराष्ट्र । वन, पांडव ते व्याघ्र ॥ १ ॥
व्याघ्र रक्षिती वनासी । वन आधार व्याघ्रांसी ॥ २ ॥
वन व्याघ्रांसवें ऐसें । रक्षणीय जाणावें तें ॥ ३ ॥
धार्तराष्ट्र पुत्र लता । जाणें पांडवांसी वृक्षां ॥ ४ ॥
लता, वृक्षांच्या आश्रयें । सर्वकाल वृद्धि पावे ॥ ५ ॥
जाणें पांडवांआधीन । दूता, कौरवांचे प्राण ॥ ६ ॥
सिद्ध धृतराष्ट्रसेवेसी । प्राप्त तरी तो युद्धासी ॥ ७ ॥
धृतराष्ट्रासी रुचेल । तेंचि वीर आचरितील ॥ ८ ॥
हेंचि जाऊनि कौरवां । सांगें निर्भय संजया ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण । वदला भक्तकल्पद्रुम ॥ १० ॥

अध्याय ३० वा

६३

म्हणे संजय धर्मासी । देईं आतां अनुज्ञेसी ॥ १ ॥
जातों कल्याण असावें । प्रेम ठेवा नित्य नवें ॥ २ ॥

शब्द कठोर, दुरुक्ति । अभिषंगें मुखामाजी ॥ ३ ॥
आली असेल, हे धर्मा । तरी करा मजसी क्षमा ॥ ४ ॥
जनार्दनादि सकलांसी । मागतों मी अनुज्ञेसी ॥ ५ ॥
संजयासी म्हणे धर्म । देतों आम्हीं अनुमोदन ॥ ६ ॥
घडलें नाहींना अप्रिय । मध्यस्थ तूं शुद्धभाव ॥ ७ ॥
हितवक्ता शीलवंत । तुष्ट मोहशून्य दूत ॥ ८ ॥
आप्त तुझ्यासम आम्हां । प्रिय विदुर तो जाणा ॥ ९ ॥
दूतकर्मास्तव कोणी । अन्य न येवो या स्थानीं ॥ १० ॥
परम प्रिय तूं पार्थांचा । वासुदेव कथी वृत्ता ॥ ११ ॥

६४

ब्रह्मचर्यरत वनवासी विप्र । वंदूनि कुशल विचारीं त्यां ॥ १ ॥
ऋत्विज, आचार्य, त्रैवर्णिक जन । आम्हांवरी प्रेम विचारीं त्यां ॥२॥
द्रोणादि सकळ धृतराष्ट्रादिक । वडिलजनांस कुशल पुशीं ॥ ३ ॥
दुर्योधनादि ते मंदबुद्धि शठ । कुशल तयांस विचारावें ॥ ४ ॥
माता, पिता, सुहृत् विदुर आम्हांसी । कुशल तयासी विचारावें ॥
मातेसम स्त्रिया स्नुषाहि सकळ । विचारीं कुशल तयांलागीं ॥ ६ ॥
आशीर्वाद माझा सांगावा सानांसी । कन्या, बालकांसी बोध करीं ॥
विलासिनी वेश्या नसती ज्या बीभत्स । कुशल तयांस विचारावें ॥
अंध, वृद्ध, भिक्षुजनां धीर द्यावा । सांभाळीन तयां सत्वरी मी ॥
सर्व बलांहूनि धर्मबल श्रेष्ठ । ज्ञान कौरवांस नसे त्याचें ॥ १० ॥
साधूं न देईन स्वार्थांधता तुझी । दे इंद्रप्रस्थासी अथवा युद्ध ॥११॥
वासुदेव म्हणे दुर्योधनाप्रति । वदे, संजयासी सांगे धर्म ॥ १२ ॥

अध्याय ३१ वा

६५

संत असंत कीं बालवृद्ध कोणी । ईशाधीन जनीं बलवंतहि ॥ १ ॥
पांडित्य बाळासी बालत्व पंडिता । अर्पितो विधाता कर्मासम ॥२॥
जिज्ञासमानासी कथीं यथातथ्य । करूनि हा मंत्र सुखें जाईं ॥ ३ ॥
प्रभावें नृपाच्या नांदतों सुखानें । राज्यप्रसादानें प्राप्त ज्याच्या ॥४॥

१ मनःक्षोभानें

तोंचि कां उपेक्षा करी बालकांची । ऐसा नृपाळासी प्रश्न करीं ॥५॥
ब्रह्मांडाचें राज्य जरी कोणा प्राप्त । तरी तो अतृप्त राही सदा ॥ ६ ॥
यास्तव सुखानें नांदू उभयहि । वश नच होई कौरवां तूं ॥ ७ ॥
शंतनूचा वंश रक्षिला जयानें । पौत्रांसी तो प्रेमें मार्ग दावो ॥ ८ ॥
दुर्योधनालागीं उपदेश सामाचा । विदुर महाज्ञाता करो सुखें ॥९॥
वासुदेव म्हणे संजयासी धर्म । निरोपकथन ऐसें करी ॥ १० ॥

६६

धर्म म्हणे दूता, दुर्योधनाप्रति । संदेश हा कथीं सांत्वनानें ॥ १ ॥
राजपुत्रा, तुझे अक्षम्य अपराध । कुल रक्षणार्थ क्षमीन मी ॥ २ ॥
सोडूनियां, स्वार्थ विभाग आमुचा। अर्पूनि शमाचा मार्ग वरीं ॥३॥
शमास्तव आम्हीं तुझे पंचभ्राते । पंचग्राम सौख्यें मागतसों ॥४॥
'अविस्थल' देई 'वृकस्थल' तेंवीं । 'वारणावतही' 'माकंदी' तैं॥
पंचम देसील तोंचि करूं मान्य । परस्पर प्रेम, शांति नांदो ॥ ६ ॥
हांसूनि खेळूनि नांदू आनंदानें । हेंचि मनोभावें इच्छीतसें ॥ ७ ॥
संजया, मी मृदु, दारुणही, कृत्या। जाणावें सर्वथा सिद्ध असें ॥८॥
धर्म-अर्थज्ञ तो बोलला पांडव । म्हणे वासुदेव ऐशारीति ॥ ९ ॥

अध्याय ३२ वा

६७

अनुज्ञा घेऊनि संजय सत्वरी। गांठी गजपुरी निशाकाळीं ॥ १ ॥
आज्ञा घेऊनियां भेटला नृपासी । धर्मास्तव पदीं नम्र झाला ॥ २ ॥
कुशल कथूनि धर्माचें स्तवन । करूनि भाषण वदला ऐका ॥ ३ ॥
ईश्वराधीन हें मानव बाहुलें । तत्व उमगलें आजी मज ॥ ४ ॥
कौरवांचें पाप, अचल पांडव । पाहूनियां दैव श्रेष्ठ वाटे ॥ ५ ॥
बळवंत शत्रु स्वस्थ, तोंचि राजा । होतसे प्रशंसा दुर्बलांची ॥६॥
सर्पासम जीर्ण टाकूनियां त्वचा । शोभे धर्मराजा सत्कर्मानें ॥ ७ ॥
पुत्रां लाभे धन, सुहृदांसी पुण्य । पाप संपादन करिती शत्रु ॥ ८ ॥
धर्मार्थ संयुक्त वागताती आर्य । करावा विचार स्वकर्माचा ॥ ९ ॥
इहलोकीं नृपा पावसी तूं निंदा। पाप परलोका नडेल हें ॥ १० ॥
वासुदेव म्हणे धर्माचें महत्व । गाऊनि संजय वृत्त कथी ॥ ११॥

६८

संपादिलें पांडवांनीं । भाग्य, जिंकूनि अवनी ॥ १ ॥
तयांवीण इतरांसी । साम्राज्य हें अशक्यचि ॥ २ ॥
ऐसें असोनियां राजा । मोहें अधर्मचि तुझा ॥ ३ ॥
कुलहीनासम राया । द्रव्यास्तव करिसी क्रिया ॥ ४ ॥
मंत्री भीष्म-द्रोणांसम । असतां केलासी अधर्म ॥ ५ ॥
भवितव्य हेंचि जरी । नाश कौरवांचा तरी ॥ ६ ॥
दोष तुझ्याचि हा माथीं । तस्कराची तव कृति ॥ ७ ॥
काय अशक्य देवांसी । पार्थ गेला स्वर्गामाजी ॥ ८ ॥
मान्यता ज्या उभय लोकीं । वनीं झाले क्लेश त्यांसी ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे दूत । वदे वीर अलौकिक ॥ १० ॥

६९

कर्मानुसार ते शौर्यादि सद्गुण । क्षय वृद्धि जाण पावताती ॥ १ ॥
क्षणिकचि तैसें जाणावें ऐश्वर्य । बळीचा निर्णय ठरला हाचि ॥२॥
तृष्णाक्षयाविण इंद्रियांची तृप्ति । अशक्याचि लोकीं जाण राया ॥
कर्मासम फल लाभे मानवासी । होई निंदा-स्तुति कार्यासम ॥ ४ ॥
क्षयकारी कर्में निंदितों मी तुज । करील तो दग्ध पार्थ तुम्हां ॥५॥
कृतार्थता तदा वाटली तुजसी । कैसी ते फळासी आली पाहीं ॥
विदुरावमानें सन्मानिलें कर्णा । असमर्थ रक्षणा तया मानीं ॥७॥
विश्रांतीसी आतां अनुज्ञा दे, जातों । उद्यीक येतों सभास्थानीं ॥८॥
राव म्हणे सुखें जाई स्वस्थानासी । संदेश निवेदीं उद्यीक ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे संजय स्वस्थानीं । गेला निवेदूनि वृत्त ऐसें ॥ १० ॥

---

# प्रजागरपर्व २

## ( विदुरनीति )

अध्याय ३३ वा ७० श्लोक १ ते १२

जातां संजय सदनासी। अस्वस्थता धृतराष्ट्रासी ॥ १ ॥
द्वारपालासी कथूनि। आणी विदुरा पाचारूनि ॥ २ ॥
वंदूनियां रायाप्रति। विदुर म्हणे कार्य कथीं ॥ ३ ॥
राव म्हणे दूत आला। मजसी निंदूनियां गेला ॥ ४ ॥
उद्यीक तो संदेश। निवेदील कौरवांस ॥ ५ ॥
येई अस्वास्थ्य मजसी। श्रेयोमार्ग तूं उपदेशीं ॥ ६ ॥
काय कथील संजय। हाचि मनांत संशय ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे तदा। धृतराष्ट्रासी न निद्रा ॥ ८ ॥

७१ १३-१५

धृतराष्ट्रालागीं बोलला विदुर। कां तुज जागर सांगें मज ॥ १ ॥
बलाढ्य शत्रूच्या आक्रमणें निद्रा। न येई दुर्बला ऐसा न्याय ॥ २ ॥
अपहार ज्याच्या सर्वस्वाचा होई। निद्रा नच येई तयालागीं ॥ ३ ॥
कामासक्त जो कीं चौर्यकर्मीं रत। होई निद्राभंग जनीं त्याचा ॥ ४ ॥
परद्रव्यासक्ति संतप्त तुजसी-। करी, या क्षणासी नृपा काय ॥ ५ ॥
राजा म्हणे सांगें श्रेयाचें वचन। विदुरा तूंचि सुज्ञ कुळामाजी ॥
वासुदेव म्हणे विदुराची वाणी। ऐकावी देवोनि लक्ष आतां ॥ ७ ॥

७२ १६-२१

त्रैलोक्याधिपाचीं लक्षणें धर्मासी। लक्षणें तुजसी विपरीत ॥ १ ॥
ऐसें असोनियां सन्मानूनि तुज। भोगियेले क्लेश पांडवांनीं ॥ २ ॥
दुर्योधनादिक चौघेही ते मूढ। ज्ञातृत्वाचा गंध नसे तयां ॥ ३ ॥
केंवी त्यां पासूनि ऐश्वर्य इच्छिसी। लक्षणें भाग्याचीं धर्माप्रति ॥
धृतराष्ट्रा, ऐकें ज्ञात्याचीं लक्षणें। शास्त्रयुक्तज्ञानें मंडित तो ॥ ५ ॥
बलशाली कर्म, विरागें तितिक्षा। नित्य धर्मश्रद्धा पंडितासी ॥ ६ ॥
विरुद्ध धर्मांनीं मंडित तो मूढ। पुरुषार्थ भ्रष्ट जाणें तया ॥ ७ ॥

प्रशस्ताची सेवा त्याग निंदिताचा। आस्तिक्य तैं श्रद्धा पंडितासी॥
वासुदेव म्हणे पाठांतरमात्र। अथवा वक्तृत्व ज्ञान नव्हे॥ ९॥

७३ २२-२८

क्रोध, हर्ष, दर्प, अहंभाव, लज्जा। दोष हे पंडिता बाधती ना॥१॥
कार्य वा संकेत सिद्ध होतां ज्ञात। जयाच्या शत्रूस पंडित तो॥२॥
शीत, उष्ण, भय, संपत्ति, विपत्ति। बाधे न जयासी पंडित तो॥ ३॥
उभय साधक अर्थ-काम इच्छी। बुद्धि पंडिताची जाणावी ते॥४॥
काम, अर्थ, धर्म, यथाक्रम श्रेष्ठ। जाणोनियां मोक्ष वरी ज्ञाता॥५॥
इच्छा,कर्म, ज्याचें सामर्थ्यासमान। कोणाच्या अवमान न करी ज्ञाता
क्षिप्र जया ज्ञान, नित्य ज्या श्रवण। त्यजूनियां काम अर्थ सेवी॥७॥
असंपृष्टा बोध न करी सर्वथा। जाणें तोचि ज्ञाता धृतराष्ट्रा॥ ८॥
अप्राप्याची इच्छा नष्टास्तव शोक। मोह विपत्तींत न पावे तो॥९॥
वासुदेव म्हणे अनुभवी ज्ञाता। विवेक सर्वदा शांति भोगी॥१०॥

७४ २९-३४

पूर्ण विचारें जो आरंभी कार्यासी। नेई शेवटासी आरब्धातें॥ १॥
अवंध्यकाल जो सर्वदा वश्यात्मा। जाणावा महात्मा पंडित तो॥२॥
सत्कर्मी निरत ऐश्वर्यार्थ यत्न। परोत्कर्षे क्षीण नसे तया॥ ३॥
मानावमानें ज्या हर्ष-क्रोध नसे। गंगाह्रद भासे अक्षोभ्य तो॥४॥
भूतविनाशित्व परिणामज्ञाता। सर्वोपायवेत्ता पंडित तो॥ ५॥
अकुंठित वाणी तैंवी चित्रकथ। ऊहापोहज्ञ तो प्रतिभाशाली॥६॥
आशु ग्रंथसार निवेदी जाणूनि। पंडित तो जनीं जाण राया॥ ७॥
श्रुत प्रज्ञानुग[1], प्रज्ञा श्रुतानुगा[2],। त्यजी न मर्यादा पंडित तो॥ ८॥
वासुदेव म्हणे ज्ञात्यांचीं लक्षणें। दावी जो कृतीनें पंडित तो॥९॥

७५ ३५-४४

अश्रुत, उद्धत, दरिद्रि, आकांक्षी। दुष्कर्मेंचि इच्छी अर्थ जनीं॥
परार्थ स्वार्थाचा करील जो नाश। मित्रास्तव पाप मूढ करी॥२॥
सेवी प्रेमहीनां त्यागी अनुरक्तांसी। द्वेष बलवंतासी करी मूढ॥३॥

१ बुद्धियुक्त शास्त्रज्ञान. २ शास्त्रानुसारिणी बुद्धि.

अमित्र ज्या मित्र, मित्र-द्वेष-घात । दुष्टकर्मीं रत तोचि मूढ ॥ ४ ॥
दूतद्वारा करी दुष्कर्मप्रचार । दीर्घसूत्री नर मूढ जनीं ॥ ५ ॥
श्राद्ध, देवपूजा न करी, सुहृन्मित्र-। नसती, तो नर मूर्ख जाणा ॥६॥
अनाहूत जाई पराच्या सदनीं । न पुसतां कोणी बोले बहु ॥ ७ ॥
अविश्वस्तावरी ठेवी जो विश्वास । तोचि जनीं मूर्ख नराधम ॥ ८ ॥
निंदी ज्या कर्मांसी स्वयें करी तेंचि । अनीशान[1] क्रोधी तोचि मूर्ख
धर्मार्थरहित, यत्नेंविण इच्छी । दुष्प्राप्य वस्तूसी, दुर्बल जो ॥
अशिष्यासी बोध, शून्यउपासना[2] । सेवी दानहीना तोचि मूर्ख ॥
वासुदेव म्हणे लक्षणें मूर्खांचीं । विवेकें न त्यागी तोचि मूर्ख ॥१२॥

७६ ४५-५०

वित्त, विद्या, कीं वैभव । लाभें, न सोडी विनय ॥ १ ॥
तोचि जाणावा पंडित । गर्विष्ठ जो तोचि मूर्ख ॥ २ ॥
आश्रितांसी धिक्कारूनि । रमे वैभव सेवूनि ॥ ३ ॥
जोडी पापमार्गें धन । उपभोगिती बहुत अन्य ॥ ४ ॥
परी कर्ता दोषलिप्त । राया, सकल तुझा दोष ॥५॥
लक्ष वेधी न वा शर । दुर्बुद्धीनें नष्ट राष्ट्र ॥ ६ ॥
एकें[3] दोहोंचा[4] निश्चय । तिघां[5] जिंकोत ते चार[6] ॥ ७॥
यत्नें पंच[7] ते जिंकावे । षट्[8] जाणूनियां घ्यावें ॥ ८ ॥
तेंवी त्यागूनियां सप्त[9] । भोगीं अविनाशी सुख ॥ ९ ॥
प्राशनेंचि वधी विष । ताडनेंचि तेंवी खड्ग ॥ १० ॥
मंत्रभेदें वासुदेव । म्हणे नष्ट सकल राष्ट्र ॥ ११ ॥

७७ ५१-५६

स्वाद्वन्न वा अर्थचिंतन एकाकी । प्रवास एकाकी करूं नये ॥ १ ॥
सुप्तांमाजी एकें जागृत बैसणें । भयप्रद जाणें मूढकर्म ॥ २ ॥

---

१ सत्ताहीन, २ राजस्त्रियादींची अज्ञात-गुप्त-उपासना.
३ बुद्धीनें, ४ कार्याकार्यांचा, ५ मित्र, उदासीन व शत्रूंस, ६ सामादि ७ इंद्रियें ८ संधि, विग्रह, यान, आसन, द्वैध आणि आश्रय. ९ अभंग ८८ ओळ ३ व ४ पहा.

स्वर्गाचें सोपान, नौका ते तारक । सत्य, हाचि मोक्ष नेणसी तूं ॥
क्षमावंतालागीं दुर्बल मानिती । दोष हा एकचि क्षमेमाजी ॥ ४ ॥
गणूं नये दोष जाणें बल क्षमा । सद्गुण दुर्बलां, सबलां भूषा ॥५॥
वशीकरण ते शांति खड्ग ज्यासी । अशक्य तयासी काय जनीं ॥
काय तयाप्रति दुर्जन करील । अतृणें अनल स्वयें शमे ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे अक्षमाचि सर्वां । तापद हें धरा नित्य ध्यानीं ॥ ८ ॥

७८ ५७-६०

धर्मचि या जगीं श्रेयस्कर जाणा । श्रेष्ठतम क्षमा, हेचि शांति ॥१॥
तृप्ति एक विद्या, सुखद अहिंसा । कुलक्षय राजा करूं नको ॥ २ ॥
बिलस्थ मूपकांसम ग्रासी दोघां । जाणें हे वसुधा धृतराष्ट्रा ॥ ३ ॥
अविरोद्धा नृप, अप्रवासी विप्र । विनाश सर्वत्र जाण त्यांचा ॥ ४ ॥
दुष्टांचा सन्मान कठोर भाषण । त्यागितां हीं दोन परमोत्कर्ष ॥५॥
परप्रत्ययाचे विषय हे दोन । एक कामीजन ललनाप्रिय ॥ ६ ॥
अविचारें होई पूजिताचि पूजा । मूर्ख नाहीं दुजा तयांसम ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे परप्रत्ययानें । स्त्रिया, मूढ जाणें ऐशामार्गीं ॥८॥

७९ ६१-६३

अधनांची इच्छा अनीश्वरकोप । देह हें कंटकद्वय शोषी ॥ १ ॥
उदासीन गृही आसक्त संन्यासी । व्यत्यासेंचि होती निंद्य जनीं ॥
क्षमाशील प्रभु दरिद्री उदार । लंघूनियां पार स्वर्गा जाती ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे विदुराची वाणी । धरावी हे ध्यानीं कल्याणार्थ ॥४॥

८० ६४-६६

न्यायप्राप्तधनालागीं । अतिक्रमद्वय जगीं ॥ १ ॥
सत्पात्रासी अप्रदान । अपात्रींचें समर्पण ॥ २ ॥
धनवंत जो अदाता । दरिद्रीही न करी तपा ॥ ३ ॥
गळां बांधूनियां शिळा । उदकीं लोटावें त्यांजला ॥ ४ ॥
योगयुक्त परिव्राट् । झुंजतांचि मृत्यु ज्यास ॥ ५ ॥
सूर्यमंडळ भेदूनि । दोघे जाती पुण्यस्थानीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे शौर्य । मोक्षदायी हें द्विविध ॥ ७ ॥

६७-६९

८१

भेद, दान, तो मध्यम । साम उपाय उत्तम ॥ १ ॥
तृतीय तो मार्ग युद्ध । जाणा उपाय कनिष्ठ ॥ २ ॥
उत्तमादि उत्तमांत । जन योजावे कार्यांत ॥ ३ ॥
भार्या-दास-सुत-धन । नित्य स्वामीचेंचि जाण ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे धर्म । विदुर करितो कथन ॥ ५ ॥

७०-७४

८२

परदाराभिमर्शन । तैसें परस्वहरण ॥ १ ॥
सुहृदांचा परित्याग । क्षयकारक हे मार्ग ॥ २ ॥
नरकद्वारें विनाशक । त्याज्य काम, क्रोध, लोभ ॥ ३ ॥
वर, राज्य, पुत्रजन्म । शत्रुमोक्षें, समपुण्य ॥ ४ ॥
भक्त किंवा भजमान । अथवा येतो जे शरण ॥ ५ ॥
विपत्‌ झालींहि तयांसी । त्यागूं नये नीति ऐसी ॥ ६ ॥
मंदमति दीर्घसूत्री । चंचल जो करी स्तुति ॥ ७ ॥
मंत्रकर्मीं जाणें त्याज्य । क्षत्ता बोले धृतराष्ट्रास ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे बोध । विदुर करी हा प्रसिद्ध ॥ ९ ॥

७५-७६

८३

ज्ञातिबांधव ते [illegible] । कुलीन कीं आपद्ग्रस्त ॥ १ ॥
तेंवी मित्र द्रव्यहीन । अनपत्य भगिनी जाण ॥ २ ॥
सद्योलाभ यांपासोनि । नित्य असावीं सदनीं ॥ ३ ॥
देवगुरून इंद्रासी । कथिलें तेंचि वदतों आजी ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐसें । वचन साधार क्षत्त्याचें ॥ ५ ॥

७७-८८

८४

संकल्प तो देवतांचा । प्रभावहीं सज्जनांचा ॥ १ ॥
विद्यावंताचा विनय । नाश पापफलोद्भव ॥ २ ॥
सद्यः फलद हीं कर्में । राया चिंतीं विवेकानें ॥ ३ ॥
अध्ययन, अग्निहोत्र । मौन, यज्ञ, ऐसीं चार ॥ ४ ॥
अभयंकर कर्में जनीं । अयथाकृत भयद मानीं ॥ ५ ॥

मानास्तव आचरितां । पावे विनाश तो कर्ता ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसी । बोधवाणी विदुराची ॥ ७ ॥

८५ ७९-८३

पिता, माता, अग्नि, आत्मा, गुरु, ऐसी। सेवा पंचाग्नींची व्हावी यत्नें
देव, पितरहि मानव, ते यति । पुजितां अतिथि यश लाभे ॥ २॥
मित्रामित्र तैसे उपजीव्योपजीवि। मध्यस्थहि तैंवी अनुगामी ते ॥३॥
एकही इंद्रिय जरी छिद्ररूप । जलबुद्धिरूप न टिके तेथें ॥ ४ ॥
निद्रा, तंद्रा, भय, क्रोध, तें आलस्य । तें दीर्घसूत्रत्व षड् दोष हे ॥
वासुदेव म्हणे अभ्युदयेच्छूनें । त्यागावे प्रयत्नें सकल दोष ॥ ६ ॥

८६ ८४-८८

अप्रवक्ता तो आचार्य । अनध्यायी कीं ऋत्विज ॥ १ ॥
अरक्षिता तें नृपाळ । ग्रामप्रिय तो गोपाळ ॥ २ ॥
कांता अप्रियभाषिणी । नापित कीं वनकामी ॥ ३ ॥
भग्न नावेसम जाण । त्याज्य मानिती सज्जन ॥ ४ ॥
अनालस्य, दान, सत्य, । अनसूया, क्षमा, धैर्य, ॥ ५ ॥
गुण षट्क हें भाग्यार्थी । कदाकाळींही न त्यागी ॥ ६ ॥
अर्थागम, अरोगिता । प्रिया, प्रियवादिनी, कांता ॥ ७ ॥
आज्ञाधारक सुपुत्र । अर्थकरी विद्या देख ॥ ८ ॥
राजा, जाणावें हें षट्क । जीव लोकांतील सुख ॥ ९ ॥
षट्क काम-क्रोधादींचें । जिंकी तया सौख्य साचें ॥ १० ॥
वासुदेव म्हणे वाक्य । विदुराचें हें अमृत ॥ ११ ॥

८७ ८९-९४

चोरासी प्रमत्त चिकित्सका रोगी । कामिनीसी जगीं कामासक्त ॥
याचका यजमान, विवादी नृपासी । मूर्ख पंडितासी, उपजीविका ॥
धेनु, सेवा, कृषि, भार्या, विद्या, शूद्र । अलक्षेंचि घोर नाश क्षणीं ॥
कृतविद्य शिष्य, त्यजितो आचार्यासी । पुत्र मातेप्रति कृतदार ॥

१ गुरु २ शिष्य, ३ सर्वदा सर्वत्र दृष्टी ठेवून आपापलें कार्य बजावणारे
४ गांवांत वास आवडणारा. ५ वनांत वास आवडणारा.

विगतकाम ते इच्छिती न कांता । त्यजिती प्रयोजेंका कार्य होतां ॥
पैलतीरीं जातां घडे नौकात्याग । रोग जातां वैद्यत्याग घडे ॥ ६ ॥
आरोग्य, आनृण्य, अप्रवास तैसी । स्वाधीन स्ववृत्ति, संतसंग ॥
निर्भयनिवास, ऐसीं सुखें सहा । भोगील तो महा पुण्यवंत ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ऐसा हा मानव । जाणूनि स्वभाव हित साधा ॥ ९ ॥

८८ ९५-१००

ईर्षा-निंदाकारी, असंतुष्ट, क्रोधी । परभाग्यजीवी नित्यशंकी ॥ १ ॥
नित्यदुःखी ऐसे मानव या लोकीं । राया ईर्षा मोठी तुज असे ॥ २ ॥
स्त्रिया, अक्ष, तैवीं मृगया, तैं पान, । कठोर वचन, दंड घोर ॥ ३ ॥
द्रव्यदूषण, या सप्त दोषें नाश । समूळ नृपास विदुर कथी ॥ ४ ॥
पूर्व चिन्हें ऐकें विनाशकालाचीं । द्वेष ब्राह्मणासी प्रथम घडे ॥ ५ ॥
विरोध, अपहार, ताडन ते निंदा । न रुचे प्रशंसा विप्रांची त्या ॥
धर्मकृत्यामाजी न करी स्मरण । याचितां भाषण निंद्य करी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे दोष हे त्यजावे । कल्याण साधावें सत्कर्मानें ॥ ८ ॥

८९ १०१-१०५

मित्रसमागम, विपुल धनलाभ । आलिंगी पुत्रास, प्रियासंग ॥ १ ॥
समयोचित भाषा, ज्ञातीचा उत्कर्ष, । इष्ट वस्तुलाभ, मान लोकीं, ॥
सुखदायी जनीं प्रकार हे अष्ट । जैंवी नवनीत हर्षदायी ॥ ३ ॥
प्रज्ञा, कुल, दम, श्रुत, पराक्रम, । यथाशक्ति दान, मित भाषा, ॥ ४ ॥
कृतज्ञता, ऐसे प्रकाशक अष्ट । गुण या लोकांत प्रसिद्ध हे ॥ ५ ॥
शरीर, इंद्रियें, मन-बुध्यादिक । नवद्वार[२]युक्त सदन हें ॥ ६ ॥
स्तंभ[३]त्रय जया अविद्यादि दृढ । शब्दादि ते पंच साक्षी ज्याचे ॥ ७ ॥
चिदात्मा जयांसी एक अधिष्ठाता । जाणे ब्रह्मवेत्ता नृपाळा तो ॥
वासुदेव म्हणे क्षत्ता परोपरी । सन्मार्गचि दावी धृतराष्ट्रातें ॥ ९ ॥

९० १०६-११०

मत्त, प्रमत्त कीं उन्मत्त जो कोणी । श्रांत, क्रुद्ध जनीं बुभुक्षित ॥ १ ॥

---

१ कारणीभूत साह्यकर्त्यास २ मन, बुद्धि, अहंकार, शरीर व पांच इंद्रियें.
३ अविद्या, काम व कर्म.

उतावीळ लोभी भ्याड तैंवी कामी । जाणती न जनीं धर्म दश ॥२॥
सुधन्वा असुर पुत्रालागीं कथी । काम-क्रोध जिंकी नृपाळ जो ॥
सत्पात्रींचि दान, जाणे तारतम्य । करी क्षिप्रकर्म, प्रमाण तो ॥ ४ ॥
विश्वासार्हा जाणे, दंडी दोषी तेचि । यथापराधेंसी क्षमा जाणे ॥
अखंड तयाची लक्ष्मी करी सेवा । हर्ष वासुदेवा बोधामृतें ॥ ६ ॥

९१ १११-११३

नावमानी कदा सुदुर्बलांप्रति । उपकृत शत्रूसी स्वयें करी ॥ १ ॥
बलवंतासी जो न करी विग्रह । योग्यवेळीं शौर्य, धैर्य दावी ॥ २ ॥
संकटीं व्यथित न होतां प्रयत्न । करी जो सोसून क्लेश बहु ॥ ३ ॥
शत्रु पराभूत जाणावे तयाचे । वाक्य विदुराचें ध्यानीं असो ॥ ४ ॥
सदनाबाहेरी न हिंडे जो व्यर्थ । दुर्जनासी सख्य न करी कदा ॥५॥
परदाराभिलाप, पैशुन, कीं स्तैन्य । न करी मद्यपान, तोचि सुखी
वासुदेव म्हणे सुखेच्छा जयासी । तयासी हे उक्ति दिव्यौषध ॥७॥

९२ ११४-११७

त्रिवर्ग न सेवी क्रोधयुक्तचित्तें । पुशितां सर्वांतें तत्त्व कथी ॥ १ ॥
अल्पास्तव वाद न करी मित्रासी । क्रुद्ध मानासाठीं नच होई ॥ २ ॥
असूया त्यजोनि अनुकंपा वरी । विरोध न करी दुर्बलासी ॥ ३ ॥
क्षमाशील, वादामाजी जो अक्षुब्ध । प्रशंसिती नित्य ज्ञाते तया ॥
अनुद्धत वेष, विक्रमेंहि श्लाघा । न करी सर्वथा, क्रोधा जिंकी ॥५॥
प्रशांत वैरासी न करी उद्दीपित । उत्कर्षे ज्या दर्प नसे कदा ॥६॥
अपकर्षे लज्जित होवोनि न बैसे । विपत्तीच्या मिषें न त्यजी धर्म ॥
शीलसंपन्न तो नित्य समचित्त । वासुदेव हस्त जोडी तया ॥८॥

९३ ११८-१२२

आत्मसौख्य, परदुःख । न करी जयासी प्रहृष्ट ॥ १ ॥
दानोत्तर पश्चात्ताप । न करी तो पुण्यश्लोक ॥ २ ॥
देश, जाति, कुलधर्म । जाणे तोचि ज्ञाता मान्य ॥ ३ ॥
दंभ, मोह, मत्सरयुक्त । पापी राजद्वेष्टा शठ ॥ ४ ॥

मत्त, वहुतांवा वैरी । त्यासी विवाद न करी ॥ ५ ॥
दान मंगलाचरण । प्रायश्चित्त तें सत्कर्म ॥ ६ ॥
ऐशा नराचा उत्कर्ष । करिती देवता प्रत्यक्ष ॥ ७ ॥
विवाहादि सकल कर्म । समां सख्य, संभाषण ॥ ८ ॥
अग्रमान विशिष्टांसी । अर्पी पूर्णकाम तोचि ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे ज्ञाता । बोध मानी विदुराचा ॥ १०

९४ १२३-१२८

आश्रितां विभाग अर्पूनियां, मित-। अन्न, निद्रा ज्यास कार्य बहु ॥१॥
शत्रूहि याचितां इष्ट तया अर्पी । अनर्थ तयासी बाधती ना ॥ २ ॥
इष्ट, असिद्धाची वार्ता अन्याप्रति । न कळे, जयाची गुप्तक्रिया ॥३॥
अल्पहि तयाचें कार्य न विफल । सकलांचा मित्र सत्यवक्ता ॥ ४ ॥
शुद्धभावें करी आदर जनांचा । प्रकाश तयाचा रत्नासम ॥ ५ ॥
आत्मदोषें नित्य लज्जित जो मनीं । गुरु तोचि जनीं सकलां होई ॥
उदारात्मा तोचि समाहितचित्त । भानूचि प्रत्यक्ष शोभे जनीं ॥७॥
राया पांडवांचें वर्धन, शिक्षण । लालन-पालन त्वांचि केलें ॥ ८ ॥
अर्पी त्या वीरांसी राज्यभाग प्रेमें । साशंकित मनें शुद्ध होती ॥९॥
वासुदेव म्हणे विदुर महात्मा । बोलला पुण्यात्मा दिव्यौषध ॥१०॥

अध्याय ३४ वा ९५ १-७

धर्मार्थकुशल विदुरासी राजा । दाखवीं श्रेयाचा पंथ म्हणे ॥ १ ॥
सांगें मजप्रति उभयांचें हित । अपराधें चित्त खेद पावे ॥ २ ॥
पापशंकी मन चिंतितें अशुभ । सांगें मनोगत पांडवांचें ॥ ३ ॥
धृतराष्ट्रालागीं बोलला विदुर । कथितों साचार ऐकें नृपा ॥ ४ ॥
कथावें अप्रिय परी हित तया । पराभव जया येऊं नये ॥ ५ ॥
कुमार्गें जें प्राप्त यश तें अपयश । परिणामीं क्लेश वहुत तेणें ॥ ६ ॥
सन्मार्गीं अपयश लाभतांहि खिन्न । न होती सज्जन तेचि भले ॥
वासुदेव म्हणे सद्बुद्धि, सत्पंथ । जया त्या अपयश तेंही यश ॥८॥

९६ ८-१४

मुख्य कर्मालागीं गौणांगें असती। परिणामनिश्चिति प्रथम व्हावी ॥

विचारें आरंभ करावा कर्मासी । उतावीळ कृति त्याज्य जाणा ॥
दुर्ग, कोश, प्रजा, सैन्य, क्षय, वृद्धि । जाणे न तयासी राज्यच्युति ॥
लेख्यादिकें जया दुर्ग-कोशज्ञान । धर्मार्थचिंतन राज्य तया ॥ ४ ॥
सत्तांध होऊनि अयुक्त वर्तन । करूं नये जाण कदाकाळीं ॥ ५ ॥
जरा, रूप नाशी, अविनयें, राज्य-। होतसे विनष्ट, तैसें नृपा ॥ ६ ॥
ध्यानीं असो नित्य लोभग्रस्त मत्स्य । भक्षितां वडिश[1] नाश पावे ॥
वासुदेव म्हणे शक्याचाचि ग्रास । घ्यावा हितप्रद पचेल तो ॥ ८ ॥

१७ १५-१८

फल अपक्व तोडितां । रस-बीजही न होता ॥ १ ॥
पक्व फळें रस-बीज । लाभे मानवा सहज ॥ २ ॥
भ्रमरवृत्तीनेंचि धन । संपादावें हिंसेविण ॥ ३ ॥
राया अंगारकारक । करी वनाचा उच्छेद ॥ ४ ॥
पुष्पलाभें मालाकार । तोष पावे निरंतर ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे स्वार्थ । शास्त्रोक्तचि हितप्रद ॥ ६ ॥

१८ १९-२३

काय लाभ या कर्मानें । अलाभ कीं न केल्यानें ॥ १ ॥
ऐसें चितूनियां मनीं । रत व्हावें, न वा कर्मीं ॥ २ ॥
अस्थानीं जो यत्न देख । सर्वचि तो निरर्थक ॥ ३ ॥
विफल प्रसाद कीं क्रोध । प्रजा इच्छीना तो षंढ ॥ ४ ॥
अल्प यत्नें महाफळ । जोडी त्याचा न करी छळ ॥ ५ ॥
प्रेमदृष्टि, ऋजुभाव । स्वस्थहि तो प्रिय राव ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ज्ञान । ऐका अमृतासमान ॥ ७ ॥

१९ २४

वृक्ष व्हावा प्रफुल्लित । नच व्हावा फलयुक्त ॥ १ ॥
फल उंचचि वा यावें । पक्व नित्य तें भासावें ॥ २ ॥
संरक्षण ऐशा रीति । लाभे सर्वदा वृक्षासी ॥ ३ ॥
तैसा प्रसन्न सर्वदा । दृष्ट व्हावा सकलां राजा ॥ ४ ॥

---

१ भक्ष्ययुक्त गळ.

भृत्य न व्हावे बळिवंत । होऊं नये त्यांसी वश ॥ ५ ॥
नित्य भासे बळिवंत । कदा नाश न तयास ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे दाक्ष्य । तेंचि सुयश प्रत्यक्ष ॥ ७ ॥

१०० २५-२९

चक्षु, मन, वाचा, कर्म । राजी राखी जो जनमनें ॥ १ ॥
तोचि प्रिय सकलांसी । भाग्यवंत राव जगीं ॥ २ ॥
मृगव्याध जो जनांतें । साम्राज्यही नष्ट त्याचें ॥ ३ ॥
वडिलार्जितही साम्राज्य । अनीतीनें पावे नाश ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे धर्म- । रक्षी, मारक अधर्म ॥ ५ ॥

१०१ ३०-३३

परविमर्दनीं यत्न घडे जैसा । पालनींहि तैसा यत्न व्हावा ॥ १ ॥
राज्य संपादन धर्मेचि करावें । संरक्षण व्हावें स्वधर्मेचि ॥ २ ॥
धर्मप्राप्त धन न पावेचि क्षय । यद्यपि स्वभाव तैसा त्याचा ॥ ३ ॥
उन्मत्त कीं बाल जल्पे जरी सार । पाषाणीं भांगार तैसें जाणा ॥
कण कण ज्ञान संग्रह करावा । शिलाहारी[1] शिला[2] वेंची जेंवी ॥५॥
वासुदेव म्हणे संगृहीत कण । सुयोजित क्षण रक्षी नरा ॥ ६ ॥

१०२ ३४-३६

ज्ञानसाधन तें धेनूलागीं गंध । विप्रांप्रति वेद ज्ञानदाता ॥ १ ॥
चार तेचि नेत्र जाणावे नृपासी । इतरेजनांसी चर्मचक्षु ॥ २ ॥
दुर्दुहा धेनूसी क्लेश बहु होती । सुदुहा धेनूसी सौख्य सदा ॥३॥
अतप्त जे नम्र ताप न तयांसी । जाणूनि थोरांसी नम्र व्हावें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे बल तोचि इंद्र । राजासी विदुर कथन करी ॥ ५ ॥

१०३ ३७-४०

बलवंतासी नमतां । तोप देवेंद्राच्या चित्ता ॥ १ ॥
पशुबांधव पर्जन्य । मांत्रि बांधवराजन्य ॥ २ ॥
पति बांधव स्त्रियांसी । वेद बांधव विप्रासी ॥ ३ ॥
धर्माधार जाणें सत्य । विद्या संरक्षी अभ्यास ॥ ४ ॥

---

१ कण कण धान्य वेंचून तप करणारा, २ धान्य.

अभ्यंग तें रूपाप्राति । सद्वर्तन कुळा रक्षी ॥ ५ ॥
धान्य मापूनि ठेवितां । योग्य शिक्षा रक्षी अश्वां ॥ ६ ॥
धेनु नित्य अवलोकनें । स्त्रीरक्षण कुचेलानें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कृपा । कवच भक्तांचें सर्वदा ॥ ८ ॥

१०४ ४१-४२

वृत्तहीन कुळा मान । देती न कदा सज्जन ॥ १ ॥
कुळहीनहि सद्वृत्त । मान्य सज्जनांसी नित्य ॥ २ ॥
कुल, वित्त, पराक्रम । पाहूनि जो खिन्न मन ॥ ३ ॥
तोचि नित्य व्याधिग्रस्त । वासुदेव चिंती बोध ॥ ४ ॥

१०५ ४३-४४

अकार्य कीं कार्यत्याग । अकालींच मंत्रभेद ॥ १॥
भय ऐसें ज्यांच्या चित्तीं । मादक ते न सेविती ॥२॥
विद्या, धन, कुल, ऐसे । मादक हे मद साचे ॥ ३ ॥
परी मादक दुर्जना । विनयकारक सज्जना ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे नित्य । संतां एक हरिछंद ॥ ५ ॥

१०६ ४५-४६

कचित् यांची जरी साह्य । सुजन जाणूनि उपाय ॥१॥
तरी दुर्जनहि जनीं आपणासी संत मानी ॥ २ ॥
संत अथवा दुराचार । सकलां संतांचि आधार ॥ ३ ॥
दुर्जन ते सज्जनासी । नसे आधार कदापि ॥ ४ ॥
नैकाविध[3] उपकार । पांडवांचे तुम्हांवर ॥ ५ ॥
परी कदापि संकटीं । साह्य कौरव न होती ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे दुष्ट । स्वभावेंचि देती कष्ट ॥ ७ ॥

१०७ ४७-५१

महावस्त्रवंता[1] मान सभेमाजी । गोरसेंचि तृप्ति मिष्टान्नाची ॥ १ ॥
वाहनानें मार्ग जिंकी[2] पुण्यवंत । शीलवंता प्राप्त सकळ कांहीं ॥ २ ॥
श्रेष्ठ जनीं शील, भ्रष्ट तें जयाचें । वय, वित्त, त्याचे बंधु व्यर्थ ॥

---

१ जाड्याभरड्या वस्त्रानें (सभ्यतेनें), २ याचना करी, ३ नाना प्रकारचे.

आढ्यासी मांसान्न, गोरस मध्यमा । तैलान्न तें जाणा दरिद्र्यासी ॥४॥
ऐसें असोनियां दरिद्रि स्वाद्वन्न । नित्य भक्षी जाण क्षुधायोगें ॥
बहुधा श्रीमंतां नसे भोगशक्ति । काष्ठेंहि दरिद्रि पचवी बळें ॥६॥
वासुदेव म्हणे हिडिंबादि वध । पचले वीरास याचि न्यायें ॥ ७ ॥

१०८ ५२-५३

जीविकेचें भय सदा निकृष्टांसी । मृत्युभय ग्रासी मध्यमांतें ॥ १ ॥
अपमानभय उत्तमासी सदा । निर्लज्ज सर्वदा सुखी असे ॥ २ ॥
सर्व मदांमाजी ऐश्वर्याचा मद । जगामाजी निंद्य कौरवेंद्रा ॥ ३ ॥
अधः पातावीण येई न त्या भान । ऐसा हा दारुण मद जनीं ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे उन्मत्त नरासी । अधःपात हाचि शास्ता एक ॥ ५ ॥

१०९ ५४-५८

मोकाट इंद्रियें तापद नरासी । जैसी नक्षत्रांसी रविबाधा ॥ १ ॥
शुक्लेंदुसमान इंद्रियाधीनाची । नित्य पीडावृद्धि अनिर्बंध ॥ २ ॥
मनोजयें होई अमात्यांचा जय । त्यावीण विजयइच्छा व्यर्थ ॥३॥
स्वयेंचि आपणा शत्रूसम जिंकी । तोचि अमात्यांसी वश करी ॥
विजय तयासी लाभे सर्वकाळ । ऐश्वर्य अचल नित्य त्याचें ॥ ५ ॥
आत्मविजयी तो सर्वत्र अजिंक्य । वासुदेव त्यास वंदीतसे ॥ ६ ॥

११० ५९-६२

रथ शरीर नरासी । मन सारथी तयासी ॥ १ ॥
अश्व इंद्रियें जाणोनि । नित्य योजावीं संयमीं ॥ २ ॥
येणें मार्गें जातां नित्य । संपे संसाराचा पंथ ॥ ३ ॥
अश्व जेंवी उच्छृंखल । सारथ्याचें हरिती बल ॥ ४ ॥
तेंवी इंद्रियें अनियत । मानवाचा करिती नाश ॥ ५ ॥
दुःख तेंचि मानी सुख । अर्था अनर्थ तें मूर्ख ॥ ६ ॥
त्यागूनियां जो धर्मार्थ । होई इंद्रियां अंकित ॥ ७ ॥
वैभवेंसी प्राण, धन-। दारा, विनाश त्या पूर्ण ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे द्वार । रक्षी त्याचें भाग्य थोर ॥ ९ ॥

१११ ६३-६५

जरी जगाचा ईश्वर । इंद्रियांचा अनीश्वर ॥ १ ॥
भ्रष्ट ऐश्वर्य तयाचें । बल इंद्रियांसी ऐसें ॥२॥
यत्नें स्वयेंचि इंद्रियां । वश करी जिंकूनियां ॥ ३ ॥
स्वयें बंधु तो आपुला । स्वैरी आत्मघाती खरा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे नित्य । संयमेंचि परम हित ॥ ५ ॥

११२ ६६-६९

काम-क्रोध महामत्स्य । करिती नरा बुद्धिभ्रष्ट ॥ १ ॥
वैरीही ते जालगत । साह्य एकमेकां मत्स्य ॥ २ ॥
तैसी मोहवारणासी । बुद्धि साह्य जीवात्म्यासी ॥ ३ ॥
जाणोनियां धर्म अर्थ । मेळवी जो रणसाहित्य ॥ ४ ॥
तोचि पावे नित्य सौख्य । जया पंचेंद्रियें वश ॥ ५ ॥
पराधीन जो इंद्रियां । नित्य भोगी पराभवा ॥ ६ ॥
रावणादिकांचें जनीं । कर्म घ्यावें नित्य ध्यानीं ॥ ७ ॥
आत्मविजयी तो विश्व- । जिंकी, म्हणे वासुदेव ॥ ८ ॥

११३ ७०-७४

शुष्कांसवें आर्द्र काष्ठ दाह पावे । संत पाप्यासवें दुःखी तैसी ॥१॥
यास्तव दुर्जन संबंध टाळावा । ध्यासचि धरावा सत्संगाचा ॥२॥
विषयांच्या रानीं स्वैर जीं धांवती । इंद्रियें जिंकिती तेचि धन्य ॥
आपत्ति तयासी सर्वथा न ग्रासी । चांचल्यें विपत्ति तुजसी राया
अनसूया, शौच, संतोष, आर्जव । दम, प्रियवादित्व, सत्य, स्थैर्य ॥
अचांचल्य, आत्मज्ञान, ते तितिक्षा । संयमित वाचा गुप्तदान ॥६॥
सद्गुण हे ऐसे दुरात्म्याचे ठाईं । वसती न पाहीं कदाकाळीं ॥ ७ ॥
निंदा-कटुशब्दें मूर्ख सज्जनासी । ताडितां, तयासी दोष त्याचा ॥
वासुदेव म्हणे पांडवां निंदूनि । पापलिप्त जनीं दुर्योधन ॥ ९ ॥

११४ ७५-७८

हिंसा बल दुर्जनांचें । दंड, विधि, तें रायाचें ॥ १ ॥
पातिव्रत्यचि स्त्रियांसी । क्षमा, बल सज्जनासी ॥ २ ॥

दुष्कर तो वाक्संयम । कठिण वदणें अर्थपूर्ण ॥ ३ ॥
हितप्रद सुभाषित । दुर्भाषणेंसी अनर्थ ॥ ४ ॥
भरूनि येई शराघात । छिन्न वनहि समृद्ध ॥ ५ ॥
निंदा-कटु-शब्द-व्रण । कदा न येई भरून ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे निंदा । हाचि दुर्जनांचा धंदा ॥ ७ ॥

७९-८३

११५

कर्णी नाराचादि शर । घुसतां निघताती बाहेर ॥ १ ॥
वाक्शल्य हृदयस्थित । मर्मभेदी तें शाश्वत ॥ २ ॥
क्लेश देई रातंदिन । कदा न योजी सज्जन ॥ ३ ॥
जया दुर्जनाचा देव । इच्छिताती पराभव ॥ ४ ॥
बुद्धि त्याची कलुषित । करिती, भासे त्या विपरीत ॥ ५ ॥
नीचकर्म तो अवलंबी । अन्यायीं त्या न्यायबुद्धि ॥ ६ ॥
वैरभावें बुद्धिभ्रंश । म्हणे वासुदेव साच ॥ ७ ॥

८४-८६

११६

सुलक्षणी 'धर्म' राजा होवो या जगाचा ॥
अजातशत्रु तो योग्य राव त्रैलोक्याचा ॥ १ ॥
मिथ्या विरोध न दावी गुण सज्जनांचे ॥
दुर्योधनादिक भ्राते भक्ष्य तें काळाचें ॥ २ ॥
सर्व कौरवांहूनि तो श्रेष्ठ धर्मराज ॥
उचित तयासी देणें नृपा, अर्धराज्य ॥ ३ ॥
धर्म-अर्थ-वेत्ता, बुद्धि, स्वाभाविक दया ॥
पूज्यभाव, अक्रौर्यहि वसे जया ठाया ॥ ४ ॥
ऐशा सद्गुणांचि भोगी क्लेश आनंदानें ॥
राया भाग्यवंतासी त्या गौरवीं सुखानें ॥ ५ ॥
विदुर वचनें ऐशा तृप्ति नच होई ॥
अवीट हा बोध मना नवस्फूर्ति देई ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे हेचि प्रार्थना दयाळा ॥
करीं कल्याण जनांचें कृष्णा घननीळा ॥ ७ ॥

अध्याय ५ वा ११७ १-११

धृतराष्ट्र म्हणे अवीट भाषण । ऐकवीं सुजाण विदुरा मातें ॥ १ ॥
क्षत्ता म्हणे राया, सर्वतीर्थस्नान । तयाहूनि पुण्य समदृष्टीचें ॥ २ ॥
समभावें राया, संपादावी कीर्ति । तेणं स्वर्गप्राप्ति निश्चयेंसी ॥३॥
यावत्काल कीर्ति नांदतसे लोकीं । तावत्स्वर्गामाजी वास घडे ॥४॥
पुरातन ऐकें राया, इतिहास । वाद केशिन्यर्थ घडला थोर ॥ ५ ॥
स्वयंवरामाजी विरोचनाप्रति । श्रेष्ठ कोण लोकीं वदली कन्या ॥
विरोचन म्हणे कश्यपाचे सुत । श्रेष्ठ जनीं दैत्य सत्य जाण ॥ ७ ॥
सुधन्वा ब्राह्मण उद्‌ईक येई । कन्या म्हणे होई निर्णय तैं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे श्रेष्ठ कोण ऐसा । वाद हा जगाचा पुरातन ॥९॥

११८ १२-२०

अन्य दिनीं येतां सुधन्वा ब्राह्मण । आदरें सन्मान कन्या करी ॥१॥
विरोचन म्हणे वैसें अर्धासनीं । आसना स्पर्शूनि वदला विप्र ॥ २ ॥
विरोचना, तव राखितों सन्मान । वर्ज्य एकासन आपणातें ॥ ३ ॥
दैत्य म्हणे विप्रा, कनिष्ठ आसनीं । वैसावें तूं जनीं योग्य हेंचि ॥४॥
विप्र म्हणे पिता-पुत्र विप्र दोन । एकासनीं सम तेचि योग्य ॥ ५ ॥
वृद्ध, वैश्य, तैंवी शूद्र शूद्रासवें । एकत्र वैसावे अन्य गर्ह्य ॥ ६ ॥
अधःस्थित मज सेविलें पित्यानें । बालत्वें अज्ञानें न कळे तुज ॥७॥
वासुदेव म्हणे ऐकूनि भाषण । बोले विरोचन ऐका विप्रा ॥ ८ ॥

११९ २१-३१

विरोचन म्हणे श्रेष्ठत्व निर्णय । लावीन निश्चय ऐसा माझा ॥१॥
सकलहि धन लावितों पणातें । प्रश्न सज्जनातें करूं हाचि ॥२॥
विप्र म्हणे पण प्राणाचाहि लाऊं । पित्यापाशीं जाऊं दैत्या, तव ३॥
ऐसें बोलूनियां प्रल्हादासमीप । येतांचि तयास नवल वाटे ॥ ४ ॥
विरोचन म्हणे सत्यनिर्णयार्थ । पातलों मी एथ वचन ऐकें ॥५॥
प्रल्हाद, विप्रासी अर्पी मधुपर्क । विप्र म्हणे श्रेष्ठ कोण सांगें ॥६॥

ब्रह्मद्वेषदोष अथवा पुत्रघात । जाणोनि प्रल्हाद दीन होई ॥ ७ ॥
एकुलता एक पुत्र प्रल्हादाचा । निर्णय तो कैसा देई तरी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे प्रल्हाद सचिंत । बोलला विप्रास नम्रभावें ॥ ९ ॥

१२० ३२-३४

अन्याय निर्णय देईल जो कोणी । अथवा जो मौनी न्यायकाळीं ॥१॥
दोष तयालागीं काय वदें मज । बोलला प्रल्हाद विप्रालागीं ॥ २ ॥
विप्र म्हणे पति सपत्नीसन्निध । जातां जेंवी खेद पत्नीलागीं ॥३॥
द्यूत पराजिता, दुःखद रजनी । अतिश्रांता जेंवी दुःख अंगीं ॥ ४ ॥
अन्याय्य निर्णयें तैसें जनीं दुःख । कथीतसे विप्र प्रल्हादासी ॥५॥
द्वाराबाहेरी जो तिष्ठतो क्षुधार्त । बहु शत्रुव्याप्त दुःखी जैसा ॥
साक्ष जो असत्य देतसे तयासी । दुःख तैशारीति प्राप्त होई ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे अन्यायी ते जन । करिती सहन कैंवी दुःख ॥ ८ ॥

१२१ ३५-३६

अजालाभास्तव बोलतांचि मिथ्या । पंच पूर्वजांचा अधःपात ॥ १ ॥
धेनूस्तव दश अश्वादिकां शत । सहस्र पूर्वज नरास्तव ॥ २ ॥
सुवर्णार्थ मिथ्या भाषणें वंशज । तैसेचि पूर्वज नरका जाती ॥ ३ ॥
भूमीस्तव मिथ्या भाषणें विनाश । नृपा काशिन्यर्थ लोभ नको ॥४॥
वासुदेव म्हणे ऐकूनि प्रल्हाद । म्हणे बाळा, श्रेष्ठ विप्र आम्हां ॥५॥

१२२ ३७-४०

मजहूनि श्रेष्ठ अंगिरा ब्राह्मण । सुधन्वा हा जाण श्रेष्ठ तुज ॥ १ ॥
तव मातेहूनि श्रेष्ठ त्याची माता । जाणें हा प्राणांचा स्वामी तुझ्या॥
पुत्रालागीं ऐसें बोलूनि प्रल्हाद । मागतो विप्रास जीवदान ॥ ३ ॥
न्यायप्रीति ऐसी पाहूनियां विप्र । प्रल्हादासी पुत्रदान देई ॥ ४ ॥
राजकन्या लाभो विरोचनाप्रति । वाणी सुधन्व्याची ऐसी येई ॥
वासुदेव म्हणे धृतराष्ट्राप्रति । सत्याची महति विदुर सांगे ॥ ६ ॥

१२३ ४१-४६

क्षत्ता म्हणे राया, अनृत भाषणें । विनाश पावणें योग्य नसे ॥ १ ॥
गोपासम देव घेवूनियां यष्टि । नच संरक्षिती मानवातें ॥ २ ॥

सुबुद्धि देऊनि करिती रक्षण । सत्कर्मेंचि पूर्ण सकल हेतु ॥ ३ ॥
पिशुनासी वेद-शास्त्रही न रक्षी । नीड जेंवी पक्षी, त्यजिती तेंवी ॥
कलह, मद्यपान, वैर समूहाचें । अप्रिय रायाचें, ज्ञातिभेद ॥ ५ ॥
दांपत्यवियोग, पति-पत्निवाद । निंद्यचि हे मार्ग वर्ज्य सदा ॥ ६ ॥
चौर्ययुक्त कूट, तुलेचें वाणिज्य । करी सामुद्रिक, शकुनादिक॥७॥
चिकित्सक, अरि, मित्र, कुशीलव । साक्षीसी अयोग्य सदा राया
वासुदेव म्हणे विविध प्रकार । कथूनि विदुर बोध करी ॥ ९ ॥

१२४ ४७-५१

अग्निहोत्र, मौन, अध्ययन, यज्ञ । मानार्थ दारुण फल देती ॥ १ ॥
अगारदाहक, गरद कुंडाशी । पर्वकार, सूचि परदारिक ॥ २ ॥
सुराप तो द्विज, मर्मभेदी काक । वेदविरोधक नास्तिक तें ॥ ३ ॥
स्रुवप्रग्रहण, व्रात्य कीं कीनाश । सम ब्रह्मघ्नास ऐसे नर ॥ ४ ॥
तृणोल्का ते दावी वस्तु अंधारींची । आचारें धर्माची आस्था कळे॥
वर्तनें साधुत्व प्रसंगीं शूरत्व । धैर्य विपत्तींत कसा लागे ॥ ६ ॥
विपत्काळीं शत्रु-मित्र येई ध्यानीं । वासुदेव जनीं कथितो नीति ॥७॥

१२५ ५२

जरा रूपा, धैर्या आशा । मृत्यु घातक प्राणाचा ॥ १ ॥
असूयेनें धर्मनाश । क्रोधें ऐश्वर्यविनाश ॥ २ ॥
शील अनार्यसेवेनें । लज्जा नष्ट होई कामें ॥ ३ ॥
अभिमानें सर्वनाश । कथी क्षत्ता धृतराष्ट्रास ॥ ४ ॥
वासुदेव तृप्त होई । बोल अमोल ऐकवी ॥ ५ ॥

१२६ ५३-५५

शुभदर्शनानें वैभवाची प्राप्ति । प्रागल्भ्यानें वृद्धि पावतसे ॥ १ ॥
दृढमूलत्व त्या येई दक्षतेनें । वैभव संयमें स्थिर राही ॥ २ ॥

---

१ नट, २ विष घालणारा, ३ पति जिवंत असतां जारापासून झालेला तो कुंड होय. पतिनिधनोत्तर जारापासून झालेला तो गोळक होय. अशा या कुंड-गोळकांचें अन्न भक्षण करणारा तो कुंडाशी, ४ आयुधें करणारा, ५ चहाडखोर, ६ सत्ताबळानें कर घेणारा, ७ संस्कारहीन, ८ पापी लोकांशीं सहभोजन करणारा.

अष्टगुणें लोकीं प्रकाशे पुरुष । प्रज्ञा, कुल, श्रुत, पराक्रम, ॥ ३ ॥
मितभाषित्व, तें दम, कृतज्ञता । यथाशक्य पात्रां दान देणें, ॥ ४ ॥
राजसन्मानें ते अष्टहि एकत्र । दिसती सर्वत्र नसतां अंगीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कृत्रिम सद्गुण । मानितां दारुण दुःख अंतीं ॥ ६ ॥

१२७ ५६-५८

यज्ञ, दान, तप, अध्ययन, ऐसे । सद्गुण ज्ञात्याचे स्वाभाविक ॥ १ ॥
दम, सत्य दया, आर्जव, हे चार । प्रयत्नेंचि थोर संपादिती ॥ २ ॥
यज्ञादि ते चार, सत्य, क्षमा, घृणा । अलोभ, हे जाणा मार्ग अष्ट ॥
पूर्व चतुर्वर्ग दंभार्थेंहि घडे । उत्तर ते कडे चढती संत ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे सूक्ष्म ज्ञान ऐसें । परम हिताचें आणा ध्यानीं ॥ ५ ॥

१२८ ५९-६८

नव्हेचि ते सभा नसती जें वृद्ध । नव्हेत ते वृद्ध अधार्मिक ॥ १ ॥
नव्हेचि तो धर्म, जो सत्यावांचून । कापट्यविहीन तेंचि सत्य ॥ २ ॥
सत्य, रूप, श्रुत, विद्या, कुल, शील । शौर्य, धन, बल, कुशल भाषा
दश ते स्वर्गाचे मार्ग सुजनांसी । पापें पापवृद्धि पुण्यें पुण्य ॥ ४ ॥
पापें बुद्धिनाश तेणें पापवृद्धि । पुण्यें शुद्ध बुद्धि पुण्यप्रदा ॥ ५ ॥
मत्सरी, निष्ठुर, मर्मभेदी, वैरी । पापी, दुराचारी, दुःख भोगी ॥
निर्मत्सरी, नित्य विवेकी, सज्जन । संकटें पाहून पळती तया ॥
ज्ञात्यांपासूनि जो संपादितो ज्ञान । पंडित तो जाण सुख भोगी ८
वासुदेव म्हणे धर्मार्थज्ञ मोठा । तया काय तोटा जगामाजीं ॥ ९ ॥

१२९ ६९-७०

जेणें लाभे सुखनिद्रा । ऐसा दिवस क्रमावा ॥ १ ॥
ऐसें करा अष्टमास । जेणें सौख्य चातुर्मास्य ॥ २ ॥
पूर्ववयांत तें करा । वृद्धपणीं जो आसरा ॥ ३ ॥
वय कंठावें त्या कर्मीं । जेणें लाभ पुढिल जन्मीं ॥ ४ ॥
वासुदेव ऐसा नर । म्हणे ईश्वर साचार ॥ ५ ॥

१३० ७१-७४

प्रशंसिती जीर्णअन्ना । तेंवी कांता गतयौवना ॥ १ ॥

रणीं विजयी जो शूर । तपस्वी जो गतपार ॥ २ ॥
धनें अन्यायोपार्जित । छिद्र झांकितां न लाभ ॥ ३ ॥
पुढती तेंही वृद्धि पावे । छिद्र पुढती होई नवें ॥ ४ ॥
गुरु आत्मवंता शास्ता । शास्ता दुष्टांप्रति राजा ॥ ५ ॥
गुप्त पापांसी शासन । करी वैवस्वतयम ॥ ६ ॥
ऋषीकुळ नदीमूळ । महात्म्याचें जन्मस्थळ ॥ ७ ॥
दुराचरण स्त्रियांचें । यांचा अंत कोणा नसे ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ऐसें । विदुर कथी धृतराष्ट्रातें ॥ ९ ॥

१३१ ७५-७९

चिरकाल राज्य करी भाग्यवंत । विप्रसेवारत क्षत्रिय जो ॥ १ ॥
ऋजु सर्वकाळ ज्ञातिबांधवांसी । शील औदार्यादि गुण जया ॥ २ ॥
शूर, कृतविद्य, जो सेवा कुशल । तयासी भूतल कनकमय ॥ ३ ॥
बुद्धिबल जाण उत्तम साधन । बाहुबल जाण मध्यम तें ॥ ४ ॥
कपट तें जनीं कनिष्ठ साधन । नित्य जेणें विघ्न अधमाधम ॥ ५ ॥
राया, कर्णादिकां अर्पूनि ऐश्वर्य । उत्कर्ष तो काय इच्छितोसी ॥६॥
सर्वगुणयुक्त पांडव तुजसी । नित्य सन्मानिती पित्यासम ॥ ७ ॥
पुत्रांसम राया, वागवीं तयांसी । योग्य तुज हेंचि विदुर म्हणे ॥८॥
वासुदेव म्हणे विदुराची वाणी । नवरत्न खाणी सुजनां वाटे ॥९॥

अध्याय ३६ वा १३२ १-४

आत्रेय-साध्यांचा संवाद विदुर । कथीतसे थोर ऐका आतां ॥ १ ॥
हंसरूपी मुनीलागीं साध्यदेव । म्हणती ज्ञानठेव द्यावी आम्हां ॥२॥
केवळ दर्शनें न लाभेचि ज्ञान । अमृत वचन ऐकवावें ॥ ३ ॥
हंस म्हणे पूर्वा ऐकियेलें आम्हीं । धृति, शम, जनीं सत्यधर्म ॥४॥
आचरी जो त्याचा होई ग्रंथिभेद । विवेकाचा मार्ग आक्रमावा ॥
वासुदेव म्हणे ग्रंथिभेदाविण । ज्ञान तोचि शीण सत्य जनीं ॥ ६ ॥

१३३ ५-९

अवमान कुशब्दां उत्तर न द्यावें । तितिक्षेनें पावे नाश दुष्ट ॥ १ ॥
सुकृत दुष्टाचें लाभे क्षमाशीला । नीचजनसेवा त्याज्य जनीं ॥ २ ॥

मित्रद्रोह तैंवी अभिमान सांडावा । कदा न घडावा निंद्याचार ॥
अस्थि-प्राण-मर्मभेदी परुषवाणी । हृदया पीडूनि दुःख देई ॥ ४ ॥
मर्मभेदी क्रूर शब्दकंटकांनीं । दुखवी जो जनीं तोचि मृत ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे प्रखर-प्रदीप्त । सोशिता कुशब्द पुण्यवृद्धि ॥ ६ ॥

१३४ १०-१४

संत असंत कीं तपस्वी तस्कर । रंगासम वस्त्र नर तैसा ॥ १ ॥
निंदितां न निंदी ताडी न ताडितां । सूडाची जो इच्छा न करी मनीं
तया मानवाची घडावी संगती । इच्छा हे देवांची निरंतर ॥ ३ ॥
भाषणाहूनि तें मौन जनीं श्रेष्ठ । मौनाहूनि सत्य–वचन श्रेष्ठ ॥४॥
सत्य-प्रिय वाणी श्रेष्ठ सत्याहूनि । धर्ममयी वाणी श्रेष्ठतमा ॥ ५ ॥
सहवास, सेवा, इच्छा जया जैसी । होई तो तैसाचि सहजपणें ॥
जैसा जैसा दूर विषयांपासून । दुःख त्या त्यजूनि तैसें जाई ॥७॥
वासुदेव म्हणे विषयनिवृत्ति । होतां चिरशांति लाभतसे ॥ ८ ॥

१३५ १५-१६

अहो, विषयविरक्ता । नसे पराजय चिंता ॥ १ ॥
प्रत्याघात अथवा वैर । न रुचे अन्य पराभव । ॥ २ ॥
निंदा, स्तुति, हर्ष, शोक । समानचि तया देख ॥ ३ ॥
इच्छी सकलांचें कल्याण । सत्य वक्ता दांत जाण ॥ ४ ॥
उत्तम तो पुरुष लोकीं । सदा सौम्य वृत्ति ज्याची ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे जन । ऐका कनिष्ठ, मध्यम ॥ ६ ॥

१३६ १७-२०

मिथ्या शब्दें कोणा न करी संतुष्ट । वचन स्वदत्त नियमें पाळी ॥
पररंध्र जाणें, जन तो मध्यम । दुरात्मा अधम दुःशासन ॥ २ ॥
कृतघ्न तो क्रोधी गुरु-शास्त्रां निंदी । कल्याणाचे मार्गीं अविश्वास ॥
मित्र न कोणाचा स्वमित्रांसी त्यागी । अधम तो जगीं पुरुष जाणा
कल्याणेच्छु नरें सेवावा उत्तम । संकटीं मध्यम समीचीन ॥ ५ ॥
परी अधमासी कदा न सेवावें । वासुदेव भावें ग्रंथ सांगे ॥ ६ ॥

१३७ २१-२४

अन्यायपथानें घडे वित्तलाभ । परी सदुद्योग श्रेष्ठ लोकीं ॥ १ ॥
विवेक विक्रमावांचूनि सत्कीर्ति । कुलीनता लोकीं न लाभेचि ॥
धृतराष्ट्र म्हणे कुलीनसंगति । देवादि इच्छिती शास्त्रज्ञहि ॥ ३ ॥
यास्तव विदुरा, सत्कुळ कथावें । हेतु पुरवावे ज्ञानदानें ॥ ४ ॥
क्षत्ता म्हणे तप, दम, ब्रह्मवित्त¹ । अन्नदान जेथ नित्य घडे ॥ ५ ॥
पवित्र विवाह यागादिक क्रिया । आचार ज्या ठाया सत्कुळ तें ॥६॥
चारित्र्य जयांचें न भंगे कदापि । माता-पितरांसी दुखवीती ना ॥
धर्माचार प्रेमें सदा आचरिती । इच्छिताती कीर्ति सत्यनिष्ठ ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ऐसे पुण्यनर । जन्मती तें कुळ पुण्यवंत ॥ ९ ॥

१३८ २५-२८

यागराहित्य कीं विवाह ते निंद्य । वेदाचा उच्छेद धर्मत्याग ॥ १ ॥
जया कुळीं होई नाश त्या कुळाचा । राया धृतराष्ट्रा, सत्य जाणें ॥
देव-विप्र-धन-अपहार होई । अतिक्रम पाहीं ब्राह्मणांचा ॥ ३ ॥
जया कुळामाजी नाश त्या कुळाचा । राया धृतराष्ट्रा, सत्य जाणें ॥
ताडन कीं निंदा विप्रांची ज्या ठाई । ठेवीचा² कीं होई अपहार ॥५॥
जया कुळामाजी नाश त्या कुळाचा । राया धृतराष्ट्रा, सत्य जाणें ॥
विद्या, वित्त, ‘ पुण्यपुरुष ’ ज्या ठाई । सत्कुळ तें पाहीं नृपश्रेष्ठा ॥
वासुदेव म्हणे आचारभ्रष्टांची । कुलवंतांमाजी गणना नसे ॥ ८॥

१३९ २९-३५

अधनहि कुलवंत । जाणा नित्य जे सद्वृत्त ॥ १ ॥
यश, कीर्ति लाभे तयां । संपत्तीचा काय केवा ॥ २ ॥
यत्नें रक्षावा आचार । वित्त जाणावें अस्थिर ॥ ३ ॥
वृत्तहीन तो न नष्ट । नष्ट जाणा कर्मभ्रष्ट ॥ ४ ॥
धन-धान्याची समृद्धि । कदा न करी कुळशुद्धि ॥ ५ ॥
तेथें चारित्र्य कारण । पुत्र नसो वृत्तहीन ॥ ६ ॥
तृणभूमि मधुर वाणी । जल सज्जन सदनीं ॥ ७ ॥

---

१ अध्ययनाध्यापन. २ थोरवी.

लाभे अतिथींसी नित्य। ज्ञाते तेणेंची संतुष्ट ॥ ८ ॥
श्रद्धायुक्त ते धार्मिक। सन्मानिती अतिथींस ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे ज्ञाता। नित्य स्वधर्माचा भोक्ता ॥ १० ॥

१४० ३६-४२

सानहि स्यंदन बहुभार नेई। तैसें तरुश्रेष्ठाहि शक्य नसे ॥ १ ॥
तैसा कुलवंत भार वाही सुखें। सामान्यासी तैसें शक्य नसे ॥२॥
साशंकित मन अथवा क्रोध, भय। जयासी तो काय मित्र लोकीं ॥
पित्यासम जनीं ज्यावरी विश्वास। मित्र म्हणा त्यास इतर व्यर्थ ॥
अकारण मित्र, उपकार तयाचा। आधार तो साचा मार्ग दावी ॥
वृद्धसेवाहीना कुमित्र लाभती। संकटीं त्यागिती हंसासम ॥ ६ ॥
इंद्रियाधीनांसी संपत्ति त्यागील। दुर्जनाचें शील चंचलता ॥ ७ ॥
निर्निमित्त त्यांचा प्रसाद वा कोप। चंचल ते मेघ दुराचारी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कृतघ्न मित्रासी। व्याघ्रही न भक्षी पापभयें ॥ ९ ॥

१४१ ४३-४८

असो नसो धन मागावें मित्रासी। तेणें वृत्ति त्याची ध्यानीं येई ॥
रूप, बल, ज्ञान, आरोग्य-विनाश। संतापें, शत्रूस सुखवी शोक ॥
जनन-मरण दैन्य कीं उत्कर्ष। प्राप्त मानवास वारंवार ॥ ३ ॥
दाता याचक कीं सुख-दुःखभोक्ता। स्वभाव जीवाचा नित्य लोकीं
हर्ष शोकातीत होतसे विवेकी। छिद्रेंचि घटाचीं इंद्रियें हीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे इंद्रियलोलुप। होई मतिभ्रष्ट क्षणोक्षणीं ॥ ६ ॥

१४२ ४९-५३

काष्ठगर्भ अग्नि अव्यक्तचि जैसा। युधिष्ठिर तैसा शौर्ययुक्त ॥ १ ॥
कपटकृतीनें छळिलें मी त्यासी। वधील पुत्रांसी राव म्हणे ॥ २ ॥
अस्थिर हें विश्व वाटे भयप्रद। अभयाचा मार्ग विदुरा दावीं ॥
क्षत्ता म्हणे राया, विद्या, तप, दम। लोभत्याग जाण शांतिलाभ ॥
निर्भयता लाभे राया, आत्मज्ञानें। सिद्धि ते तपानें प्राप्त होई ॥५॥
गुरुशुश्रूषा ते ज्ञानालागीं मूळ। योगेंचि निश्चळ शांतिलाभ ॥ ६ ॥
निष्काम करितां दान, अध्ययन। राग-द्वेषशून्य महाज्ञाते ॥ ७ ॥

सुविद्य, सुयुद्ध, सुकृत, सुतप। अंतीं परम सौख्य देई जीव॥८॥
वासुदेव म्हणे अनासक्त योगी। विचरती जगीं जीवन्मुक्त॥ ९॥

१४३ ५४-५८

पुष्पशयनींहि निद्रा। नये, करितां ज्ञातिवैरा॥ १॥
सूत, मागध, स्तवितां। नसे सौख्य त्याच्या चित्ता॥ २॥
कुलविरोधें स्वधर्म। न घडे, घडे निंद्यकर्म॥ ३॥
तेणें उत्कर्ष न होई। हितवाक्य न रुचे कांहीं॥ ४॥
योगक्षेमही चालेना। विनाशचि ज्ञातिहीना॥ ५॥
दुग्ध संभाव्य धेनूसी। विप्रा तप, चापल स्त्रीसी॥ ६॥
वासुदेव म्हणे भय। तैसें ज्ञातीचें संभाव्य॥ ७॥

१४४ ५९-६५

संहत-विपुल-तंतुवृद्धिगत। सोशिती आयास बहुत जनीं॥ १॥
विरळ तीं काष्ठें होती धूम्रयुक्त। एकत्र प्रदीप्त ज्वालामय॥ २॥
विप्र, धेनूसी कीं स्वकीयां पीडितां। विनाशाचि हाता निश्चयेंसी॥
दृढमूलही तो उन्मळे एकाकी। सुस्थिति वृक्षाची वनामाजी॥४॥
तैसाचि एकाकी जरी गुणवंत। नेई विलयास तया वैरी॥ ५॥
परस्पराधारें ज्ञाति वृद्धि पावे। उदकीं उत्पलें जैशा रीति॥ ६॥
वासुदेव म्हणे स्वज्ञातिविरोध। करितांचि खेद अंतीं होई॥ ७॥

१४५ ६६-७०

विप्र, धेनु, शिशु, ज्ञाति। अन्नदाता ते स्त्री जाति॥ १॥
तैसाची तो शरणागत। अवध्य हे मानवास॥ २॥
धन-आरोग्यावांचूनि। दृश्य सद्गुण न जनीं॥ ३॥
मृततुल्य रोगी धनी। निरोगी तूं राव, जनीं॥ ४॥
जागरणें रोग होई। रोगी सर्व दुःखी पाहीं॥ ५॥
संतापेंचि जागरण। सुखी होई तो त्यजून॥ ६॥
द्यूत विरोधातें माझ्या। ऐकिलेंसी माहीं राजा॥ ७॥
वासुदेव म्हणे क्षत्ता। मांगे कितव न वरी ज्ञाता॥ ८॥

१४६ ७१-७४

करी विरोध सौम्यांसी । वळाचि तें नव्हे लोकीं ॥ १ ॥
सूक्ष्म धर्माचें सेवन । करी तेंचि वळ जाण ॥ २ ॥
नासे संपत्ति क्रूराची । वृद्धि पावे सज्जनाची ॥ ३ ॥
पुत्र-पौत्र घेती सुख । धन तेंचि वा सात्विक ॥ ४ ॥
पांडवांसी घडो सख्य । हाचि जाणावा भावार्थ ॥ ५ ॥
राया, कौरव-पांडव । होवोत ते एककार्य ॥ ६ ॥
कुरुकुळाचें जीवन । असे राया, तत्राधीन ॥ ७ ॥
सत्यनिष्ठ पांडववीर । करीं परावृत्त पुत्र ॥ ८ ॥
नसो भेदासी अवसर । होई पांडवां आधार ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे ऐसें । क्षत्ता विनवी धृतराष्ट्रातें ॥ १० ॥

अध्याय ३७ वा १४७ १-६

मुष्टयाघातें राया, नभासी ताडिती । वांकवूं पाहती इंद्रधनु ॥ १ ॥
धरूनियां आणूं म्हणताती भास्करा । । मनूचे सतरा मूर्ख ऐकें ॥
अशिष्या पढवी, जो अल्पसंतुष्ट । सेवी जो वैऱ्यास दीर्घकाल ॥३॥
ललनाधीनहित, अयाच्ययाचक । अल्पही स्वकृत्य प्रशंसी जो ॥
कुलवंत करी जनीं निंद्यकृति । दुर्बल वलवंतासी वैर करी ॥ ५ ॥
श्रद्धाहीना बोधी, अकाम्य तें इच्छी । मस्करी स्नुषेची कन्येसम ॥
विघ्ननिवारक व्याह्यागृहीं मान । इच्छी, तोचि जाण मूढ राया ॥
परस्त्रीशीं रत, निंदी जो कांतेसी । लाभ न सरेचि ऐसें वदे ॥ ८ ॥
याचकासी स्वल्प अर्पितांहि प्रौढी । असत्याची गुढी सत्यासम ॥
वासुदेव म्हणे ऐशा मूढ जनां । नरकयातना प्राप्त होती ॥१० ॥

१४८ ७-८

जैसें आपणासी वागेल जो तैसें । वर्तावें तयातें हाचि धर्म ॥ १ ॥
कापट्ययुक्त जो तयासी कपट । सुजनासी श्रेष्ठ सौजन्य तें ॥ २
जरा हरी रूपा आशा ते धैर्यासी । मृत्यु तो प्राणासी, द्वेष धर्मा ॥
काम तो लज्जेसी, हीनसेवा वृत्ता । क्रोध नेई अंता ऐश्वर्यासी ॥४॥
अभिमान करी नाश सर्वस्वाचा । ऐके बोध साचा वासुदेव ॥ ५ ॥

१४९ ९-११

आयुष्य सुतांचें असे दैवाधीन। विदुरा सन्मानून राव म्हणे ॥१॥
वेद कथीतसे पुरुष शतायु। मग कां अल्पायु होती नर ॥ २ ॥
क्षत्ता म्हणे अतिमान, अतिवाद,। योग्य तोहि त्याग न घडे जेव्हां ॥
क्रोध, स्वार्थ, तेंवी मित्रद्रोह जनीं। आयुष्याची हानी पडे दोषें या
नरेंद्रा, हे दोष प्राणविघातक। मृत्यु मानवास न वधी बापा ॥५॥
वासुदेव म्हणे जरी दोषहीन। कौरव ते जाण वांचतील ॥ ६ ॥

१५० १२-१३

रक्षणार्थ केली स्वाधीन जियेसी। अथवा गुरुपत्नीसी गमनकर्ता ॥
विप्र वृषलीपति[1], अथवा मद्यपी[2],। अज्ञ जो शकुनादि सांगतसे ॥२॥
विप्रवृत्तिहर्ता, तेंवी त्यां दास्यद। शरणागतवध करील जो ॥ ३ ॥
ऐसे हे सकळ ब्रह्मघ्नासमान। सहवासें जाण प्रायश्चित्त ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे पाप्यांचा सहवास। शिक्षाचि नरास कालकृत ॥५॥

१५१ १४

ज्ञाता, नीतिज्ञ वदान्य। नित्य भक्षी जो शेषान्न ॥ १ ॥
अहिंसक जो विवेकी। कृतज्ञ कीं सत्यभाषी ॥ २ ॥
स्वर्गप्राप्ति सौम्य नरां। जाणा अशक्य इतरां ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे जनीं। दुराचारें थोर हानि ॥ ४ ॥

१५२ १५-१९

नित्य प्रियवक्ते सुलभ या लोकीं। दुर्लभ पथ्याची कटुभाषा ॥१॥
श्रोताहि दुर्लभ ऐशा वचनासी। प्रियचि जनांसी हित वाटे ॥ २ ॥
प्रियाप्रिय दोन्हीं त्यागूनियां, धर्म। वदे, तोचि जाण साह्यकर्ता ॥३॥
कुळास्तव एक, कुळ ग्रामास्तव। ग्राम देशास्तव त्याज्य जाणें ॥४॥
आत्मलाभास्तव त्याग अवनीचा। करावा हे वाचा ध्यानीं असो॥
विपत्कालास्तव धनाचें रक्षण। कांता संरक्षण धनें व्हावें ॥ ६ ॥
धन-दारादिकीं आत्मा संरक्षावा। बोध हा ठसावा अंतर्यामीं ॥७॥
वासुदेव म्हणे द्यूत वैरकारी। कदा न स्वीकारी बुद्धिमंत ॥ ८ ॥

१ रजोदर्शन झालेल्या कन्येशीं विवाह करणारा विप्र, २ मद्यपान करणारा विप्र.

१५३ २०-२४

दिव्य औषधि रोग्यासी न रुचे नृपाळा ।।
हाचि द्यूतकाळीं तुज बोध आम्हीं केला ।। १ ।।
काकासम कौरवांनीं पांडव मयूरां ।।
जिंकितां नृपाळा, तुझ्या आनंद अंतरा ।। २ ।।
जंबुकांसी स्वीकारूनि शार्दूलाचा त्याग ।।
केलासी परी दुःखाचा येईल प्रसंग ।। ३ ।।
अनुरक्त, हितामाजी दक्ष जे सेवक ।।
धन्यावरी विश्वासती, न करितां क्रोध ।। ४ ।।
रक्षूनि सेवकां ऐशा ऐश्वर्य संपादीं ।।
सेवकगण न तया विपत्काळीं सोडी ।। ५ ।।
कार्य गणना करोनि आय-व्यय व्हावा ।।
योग्यतेसमान वृत्तिनिश्चय करावा ।। ६ ।।
वासुदेव म्हणे कार्य साह्याविण नासे ।।
जिवाभावें संरक्षण व्हावें सेवकांचें ।। ७ ।।

१५४ २५-२९

हेतु जाणूनियां दक्ष जो कार्यासी । प्रेमें हित कथी धन्यालागीं ।। १।।
सज्जन ओळखी सामर्थ्य आपुलें । ऐशासी रक्षिलें पाहिजेच ।। २।।
धन्याचा जो करी दूत अनादर । विरुद्ध साचार वदतसे ।। ३ ।।
निजबुद्धीचा ज्या असे अभिमान । त्यागावेंचि जाण सेवका त्या ।।
गर्वहीन बळी, दयाळु, जो दक्ष । सौम्य, निष्ठावंत, रोगहीन ।।५।।
युक्तियुक्त भाषा ऐसा अग्रगुणी । सेवक सद्गुणी म्हणती ज्ञाते ।।
अकालीं कोणाच्या गृहीं विश्वासानें । अयोग्यचि जाणें धृतराष्ट्रा ।।
लपूं नये रात्रौ कोणीहि चत्वरीं । त्यजावी ते नारी राजप्रिया ।।८।।
वासुदेव म्हणे दुष्टां अविश्वास । न दावितां मंत्र त्यजूनि जावें ।।

१५५ ३०-३२

व्यवहारीं वर्ज्य नृपाळ भिडस्त । अथवा सेवक नृपाळाचा ।। १ ।।
जारिणी, स्वपुत्र, भ्राता, तें विधवा-। बालपुत्रा, किंवा सेनाजीवि ।।

अधिकार भ्रष्ट, ऐसे नर त्याज्य। न्यायदानीं युक्त न करावे त्यां ॥३॥
प्रज्ञा, कुल, श्रुत, दम, पराक्रम। यथाशक्ति दान, मित भाषा ॥४॥
कृतज्ञता, ऐसे थोर अष्ट गुण। यश, कीर्ति, जाण वाढविती ॥ ५ ॥
राजसभेमाजी सन्मान लाभतां। सकल गुणांचा सहज लाभ ६।
वासुदेव म्हणे एकाचि सद्गुणें। सकळ लाभणें यश कीर्ति ॥ ७

१५६ ३३-३४

ऐका स्नानाचे सद्गुण। बल, रूप, शुद्धवर्ण, ॥ १ ॥
स्पर्श, गंध, विशुद्धता। शुद्ध ध्वनि, संपन्नता ॥ २ ॥
लावण्य, तैं प्रमदाप्राप्ति, । दश गुण स्नानामाजी ॥ ३ ॥
आयुर्बलारोग्य सुख। सुसंतान तैं लौकिक ॥ ४ ॥
ऐसा मिताहारी जना। सहज लाभ ध्यानीं आणा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मित। आहार तें नित्य हित ॥ ६ ॥

१५७ ३५-३६

निरुद्योगी, महाशन। जनीं निंद्य, कपटी पूर्ण ॥ १ ॥
वेष अनिष्ट जयाचा। देशकाल न जाणता ॥ २ ॥
गृहामाजी ऐसियासी। देऊं नये आश्रयासी ॥ ३ ॥
कृपण, निंदक, पारधी। क्रूर, कितव[1], वैरबुद्धि ॥ ४ ॥
सन्मान्यांसी न दे मान। मूढ त्यापरी कृतघ्न ॥ ५ ॥
विपत्कालींहि याचना। करूं नये ऐशा जनां ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे दैन्य। वाधूं न देती सज्जन ॥ ७ ॥

१५८ ३७-३८

करी गोंधळ कार्यांचा। नित्य प्रमादी जो साचा ॥ १ ॥
असत्याचें अवलंबन। नसे ज्याचें दृढ प्रेम ॥ २ ॥
स्नेह सोडिला जयानें। ज्ञाता आपणचि म्हणे ॥ ३ ॥
ऐसे जयाचे दुर्गुण। त्यजावा तो नराधम ॥ ४ ॥
अर्थ सहायकाधीन। सहाय्य तें अर्थाधीन ॥ ५ ॥
ऐसा अन्योन्य संबंध। वासुदेव म्हणे सिद्ध ॥ ६ ॥

[1] लबाड

१५९ ३९-४१

पुत्र अनृणी करोनि । द्यावे सन्मार्गी लावूनि ॥ १ ॥
योग्य वरा अर्पूनियां । कन्या, जावें वनीं राया ॥ २ ॥
तेथ घडो आत्महित । हाचि मनीं व्हावा हेत ॥ ३ ॥
सर्वभूतां हितप्रद । तेंवी आपणा सौख्यद ॥ ४ ॥
सिद्धिदात्या परमेश्वरा । चिंतूनियां कर्म करा ॥ ५ ॥
वृद्धि, शत्रुपराभव । शील, उद्योग तें शौर्य ॥ ६ ॥
दृढबुद्धि, जयापाशीं । वृत्तिभय नसे त्यासी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐसी । सन्मति हे विदुराची ॥ ८ ॥

१६० ४२-४६

क्षत्ता म्हणे राया, दोष अवलोकीं । वैर पांडवांसी करितां कैसे ॥१॥
इंद्रादींसी व्यथा, साशंकितजिणें । पुत्रवैर, जेणें कीर्तिनाश ॥ २ ॥
गृहछिद्रें ऐशा शत्रूलागीं हर्ष । ऐसे महादोष तया वैरें ॥ ३ ॥
भीष्म, द्रोण, धर्म, कोपतां विनाश । पावेल हें जग धृतराष्ट्रा ॥ ४ ॥
सागरमेखला पृथ्वीचें साम्राज्य । करिसील देख ऐक्यभावें ॥ ५ ॥
वन धार्तराष्ट्र, पांडव ते व्याघ्र । रक्षिती साचार परस्परां ॥ ६ ॥
वनावीण व्याघ्र, व्याघ्रावीण वन । नष्ट होती जाण उभयहि ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे वनींच व्याघ्रांनीं । वसावें हें जनीं हितप्रद ॥ ८ ॥

१६१ ४७-५१

दुर्जन पराचे दोषाचि जाणती । गुण न देखती स्वभावेंसी ॥ १ ॥
परिपूर्ण जया अर्थसिद्धि व्हावी । धर्माची धरावी कांस तेणें ॥ २ ॥
अमृताची प्राप्ति स्वर्गाविण नसे । धर्मातचि वसे अर्थ तेंवी ॥ ३ ॥
पापविमुख जो कल्याणनिरत । प्रकृतिविकृतीस[१] जाणे तोचि ॥ ४ ॥
धर्म, अर्थ, काम, यथाकाल सेवी । तयासी जाणावी पुण्यप्राप्ति ॥
हर्षशोकावेगसंयम जयासी । मोह न तयासी विपत्काळीं ॥ ६ ॥
माहेर जाणावें तेंचि वैभवाचें । वंदी विदुरातें वासुदेव ॥ ७ ॥

१ भरभराट, २ माया आणि तिचें कार्य

१६२ ५२-६२

पंचविध बल राया, घे ऐकूनि । कनिष्ठचि जनीं बाहुबल ॥ १ ॥
अमात्यांचें बल द्वितीय जाणावें । तृतीय मानावें द्रव्यबल ॥ २ ॥
द्रव्यबलाहूनि सत्कुळ तें श्रेष्ठ । प्रज्ञा ते वरिष्ठ सकळांहूनि ॥ ३ ॥
प्रज्ञाबळें प्राप्ति सकळ बळाची । जेणें मानवांसी सकलैश्वर्य ॥ ४ ॥
वैऱ्यापासूनि मी बहुतचि दूर-। मानी, तो पामर दुःख भोगी ॥५॥
नृपाळ, स्त्री, सर्प, स्वाध्याय, अधिकारी, । भोग, वय, वैरी दगा देती
प्रज्ञाशरविद्धा उपायचि नसे । मात्रा, मंत्र तेथें निरर्थक ॥ ७ ॥
सर्प, अग्नि, सिंह, कुलपुत्र तेंवी । अवज्ञा न व्हावी यांची कदा ॥
वासुदेव म्हणे काष्ठस्थित अग्नि । तैसेचि या जनीं धर्मादिक ॥ ९ ॥

१६३ ६३-६४

राया, दुर्योधनासवें । लताचि तूं ध्यानीं घ्यावें ॥ १ ॥
पांडुपुत्र महावृक्ष । वृक्ष आधार लतेस ॥ २ ॥
पांडव ते मानीं सिंह । वन सकल कौरव ॥ ३ ॥
आधार ते परस्परां । होवोत, हा मार्ग बरा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे क्षत्ता । करी उपदेश हिताचा ॥ ५ ॥

अध्याय ३८ वा १६४ १-४

येतां पाहूनि वृद्धासी । युवकप्राण उर्ध्व होती ॥ १ ॥
वंदनेंचि त्या स्वस्थिता । द्यावें आसन सद्वृत्ता ॥ २ ॥
सन्मानूनि निजस्थिति । कथूनि अन्न द्यावें त्यासी ॥ ३ ॥
लोभ, भय, वा कार्पण्यें । तुष्ट जेथ न सन्मनें ॥ ४ ॥
व्यर्थ जीवित तयाचें । ऐसें वाटे सज्जनातें ॥ ५ ॥
शस्त्रकर्ता, चिकित्सक । क्रूर, ब्रह्मचर्यभ्रष्ट ॥ ६ ॥
स्तेन, भ्रूणहा, मद्यपि, । सेनाजीवी, श्रुतिविक्रयी ॥ ७ ॥
कदा ऐशा अतिथींसी । देऊं नयेचि उदकासी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ऐसे । नर योग्य न मानातें ॥ ९ ॥

१ अनभ्यासानें स्वाध्यायही धोका देतो

१६५ ५-८

लवण, दधि, क्षीर, मधु, तैल, घृत । पक्क अन्न, मांस, तिल, शाक
फल, मूल, तैंवी रक्तवस्त्र, गंध । विकूं नये गुड, त्रैवर्णिकीं ॥ २ ॥
क्रोधहीन, तैंवी समलोष्ट-हेम । मित्रामित्रांसम, नष्टशोक ॥ ३ ॥
निंदा-स्तुति, प्रिय-अप्रिय, न जया । उदासीना तया म्हणती भिक्षु॥
नीवार, इंगुद, शाक, हे जीविका । वनवासी, जेता इंद्रियांचा ॥५॥
अग्निकार्यरत, आतिथि सेवक । तपस्वीवरिष्ठ जाणा तया ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे बुद्धिरूपी हस्त । दुरूनि शत्रूस पीडा देती ॥ ७ ॥

१६६ ९-१०

अविश्वस्तीं न विश्वासे । विश्वस्तींही सीमा असे ॥ १ ॥
अतिविश्वासें समूळ । नाश मानव पावेल ॥ २ ॥
नित्य मत्सर त्यागावा । भाग सकलांचा द्यावा ॥ ३ ॥
कांता संरक्षावी सदा । उच्चारावी मधुर वाचा ॥ ४ ॥
व्हावें उघड वर्तन । होऊं नये ललनाधीन ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे जन । न होतीचि शास्त्राधीन ॥ ६ ॥

१६७ ११-१२

पूज्य पवित्र या स्त्रिया । प्रकाशिती निजगृहा ॥ १ ॥
सदाभूषण गृहाचें । नित्य संरक्षावें त्यांतें ॥ २ ॥
पिता रक्षो अंतःपुर । महानस माता थोर ॥ ३ ॥
आत्मसदृशोंसी घोष । कृषिकर्म स्वयें देख ॥ ४ ॥
भृत्य करोत वाणिज्य । द्विजां सेवोत बा, सुत ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसी । नीति ऐका विदुराची ॥ ६ ॥

१६८ १३-२१

अग्नि उदकाचा, क्षत्रिय विप्राचा । उगम धातूचा अश्माचि तो ॥१॥
उगमस्थानीं तें तेज होई शांत । सिद्धांत ध्यानांत असो सदा ॥२॥
कुलवंत तैंवी क्षमा ज्याचे अंगीं । शांत काष्ठामाजी अग्निसम ॥३॥
मंत्र गुप्त ज्याचा स्व-पर देशांत । चार, कार्यदक्ष स्थैर्य तया ॥ ४ ॥
धर्म-अर्थ-कामां वाच्यता नसावी । कार्यैचि दिसावीं जनांलागीं ॥

पर्वत-प्रासादीं, तृणहीन वनीं । एकांतीं जाऊनि मंत्र व्हावा ॥ ६ ॥
अस्वाधीन चित्त अथवा मूढ मित्र । त्याज्यचि सर्वत्र मंत्रकार्यीं ॥७॥
परीक्षेवांचूनि मंत्रि योजूं नये । सकलहि कार्यें मंत्राधीन ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे मंत्र ज्याचा गुप्त । नृपाळ वरिष्ठ तोचि जनीं ॥ ९ ॥

१६९ २२-३०

अप्रशस्त कार्यें आरंभी मोहानें । त्या बुद्धिभ्रंशानें प्राणनाश ॥१॥
प्रशस्तचि कर्में सुखावह लोकीं । पश्चात्ताप अंतीं विपर्ययें ॥ २ ॥
संधि-विग्रहादि-षाड्गुण्यसंपन्न[1] । तोचि योग्य जाण मंत्रकर्मीं ॥ ३ ॥
स्व-पर ज्ञान तें जयालागीं योग्य । सर्वत्र जो वंद्य तोचि राव ॥ ४ ॥
अमोघ जयाचे हर्ष-क्रोध, जनीं । दृष्टि परिणामीं, वैभव त्या ॥ ५ ॥
अधिकार-छत्र-सन्मानें, संतुष्ट- । राहोनियां, वित्त सकलां द्यावें॥६॥
विप्रावि विप्रासी, भर्ता स्वस्त्रियेसी । नृप अमात्यासी जाणीतसे ॥
नृपाळासी नृप जाणे हा नियम । सदा ओळखून क्रिया घडो ॥८॥
शत्रू हातीं येतां वधचि त्या योग्य । शत्रु-सेवा योग्य संकटांत ॥
वासुदेव म्हणे शत्रूचा संहार । न करितां थोर विघ्न येई ॥ १० ॥

१७० ३१-३६

देव, नृप, विप्र, बाल, रोगी, वृद्ध । ऐसीयांसी क्रोध करूं नये ॥१॥
निरर्थ कलह वर्जावा सर्वदा । सुकीर्ति, संपदा, लाभे तेणें ॥ २ ॥
ज्ञानी धनवंत, अज्ञ धनहीन । ऐसा न नियम जगामाजी ॥ ३ ॥
प्रारब्धाआधीन लोकव्यवहार । ऐसाचि निर्धार सज्जनांचा ॥ ४ ॥
विद्या-वय-शील- ज्ञान- धन-वृद्ध । तेंवी कुलवृद्ध, निंद्य खलां ॥५॥
दुराचारी, क्रोधी तेंवी अधार्मिक । दुर्भाषणी मूढ मत्सरी जो ॥ ६ ॥
अनर्थ तयासी नित्य प्राप्त होती । वासुदेव चित्तीं खेद पावे ॥७॥

१७१ ३७-४०

ऋजु-दान[2], वचनपूर्ति । पूर्ण विचारोक्त उक्ति ॥ १ ॥
वश प्राणिमात्र तेणें । ऐसा गुण महिमा जाणें ॥ २ ॥

---

१ संधि, विग्रह, यान, आसन, द्वैधीभाव, समाश्रय. २ सरळबुद्धीनें दिलेलें दान.

अधनहि, निष्कपट । ऋजु, कृतज्ञ जो दक्ष ॥ ३ ॥
विवेकी, तो परिवार । सेवकादि मिळवी नर ॥ ४ ॥
धैर्य, शांति, शौच, दम, । दया, सप्रेम भाषण ॥ ५ ॥
द्रोह नसावा मित्रासी । सतद्वारें हीं भाग्याचीं ॥ ६ ॥
स्वार्थी, कृतघ्न, निर्लज्ज । दुष्ट, नृपाळ तो त्याज्य ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे नीति । आचरी तो सदा सुखी ॥ ८ ॥

१७२ ४१-४३

स्वयें नित्य जो सदोष । सदनीं इतरां देई दोष ॥ १ ॥
सर्पयुक्त सदनासम । निद्रा नसे त्या लागून ॥ २ ॥
योगक्षेम जयां हातीं । देव माना तयां चित्तीं ॥ ३ ॥
स्त्रिया, मत्त, पतित, दुष्ट । कार्य तेथें अनिश्चित ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे लोभ । अंतीं करीतसे क्षोभ ॥ ५ ॥

१७३ ४४-४८

बाल, स्त्री, कितव, जया देशीं राव । पाषाणाची नाव जाण तेथें ॥
वैशिष्ट्यदर्शन इच्छा न जयांसी । मग्न कार्यामाजी सेवक ते ॥ २ ॥
वैशिष्ट्यार्थ यत्न करितां सेवक । कलह प्रसंग निर्मितातीं ॥ ३ ॥
कितव, चारण, वेश्या, ज्यां स्तावक । तयां आयुर्भोग अल्प जाणा
भ्रष्ट बळीसम दुर्योधन दीन । त्वरितचि जाण पाहासील ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे विनवी विदुर । नृपा नीतिशास्त्र निवेदूनि ॥ ६ ॥

अध्याय ३९ वा १७४ १

राव म्हणे विदुरासी । निंदा त्यजूनि उपदेशीं ॥ १ ॥
पुरुष हा दैवाधीन । काष्ठपुतळीसमान ॥ २ ॥
पराधीन विधात्यानें । केला तयासी कर्मानें ॥ ३ ॥
जय-पराजय दोन्हीं । दैवाधीन असती जनीं ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ऐका । विदुर कथी त्या सिद्धान्ता ॥ ५ ॥

१७५ २-१०

अकालीं बोलला जरी बृहस्पति । अवमान त्यासी विदुर म्हणे ॥ १ ॥
स्तुति, दान, मंत्राविण, जें प्रियत्व । तेंचि जनीं नित्य धृतराष्ट्रा ॥

अप्रियाचे कोणा न दिसती गुण । प्रियाचे दुर्गुण गुणाचि ते ॥ ३ ॥
दुर्योधनत्याग पूर्वी जो कथिला । हेतु तो जाहला स्पष्ट आतां ॥४॥
हितप्रद-नाश, तोचि अभिवृद्धि । विनाशक वृद्धि तोचि नाश ॥ ५ ॥
गुणश्रेष्ठाहूनि द्रव्यश्रेष्ठ हीन । तयांसी त्यागून सुखी व्हावें ॥ ६ ॥
राव म्हणे जेथें, धर्म तेथें जय । परी करूं काय पुत्रमोह ॥ ७ ॥
क्षत्ता म्हणे गुणसंपन्न विनयी । न करीती अल्पही जनहानि ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे विदुर नृपासी । म्हणे कां प्रजेसी क्लेश द्यावे ॥ ९ ॥

१७६ ११-२२

परनिंदा-परक्लेश-तत्परता । प्रयत्नें विरोधा वाढविती ॥ १ ॥
दृष्टि, संगतीहि सदोष जयांची । देतां घेतां त्यांसी महादोष ॥ २ ।.
ऐशा घातक्यांचा त्यागचि करावा । संग न घडावा पातक्यांचा ॥
दुर्जनाच्या प्रेमें, प्रेम नष्ट होई । अल्प निमित्तेंही घात करी ॥ ४ ॥
संत जो कां ज्ञाता न करी हें कदा । साह्य आप्त-गोतां करितां वृद्धि
स्वज्ञातिरक्षणें कुलवृद्धि पावे । विगुणींहि व्हावे संरक्षित ॥ ६ ॥
पांडवांसमान वीर गुणवंत । तयांसवें भेद नसो राया ॥ ७ ॥
कांहीं ग्राम तयां अर्पूनि वृत्त्यर्थ । राया बहु यश संपादावें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे हिताचें वचन । प्रसंग जाणून विदुर वदे ॥ ९ ॥

१७७ २३-३०

कल्याणेच्छु नरें ज्ञातिबांधवांसी । कलह कदापि करूं नये ॥ १ ॥
भोजनादि गोष्टि एकत्र कराव्या । बहु विवराव्या हितकथा ॥ २ ॥
साधक-बाधक मानवासी ज्ञाति । सद्गुणाची वृद्धि हितकारी ॥ ३
ज्ञाति दैन्यें पाप जडे श्रीमंतासी । त्या त्या ज्ञातीमाजी जन्मती त्यां
पांडवांचें साह्य होतां तुज कोण । पाहील लेखून तुच्छ जगीं ॥ ५ ॥
वध पांडवांचा अथवा सुतांचा । खेदकर राजा उभय तुज ॥ ६ ॥
खाटेसी खिळूनि जेणें क्लेश भोग । संसारीं तो मार्ग धरूं नये ॥७॥
प्रमादशील हा मानव जाणूनि । पुलज्ञाति जनीं सांवरावी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे झालें तें तो गेलें । पुढती रक्षिलें पाहिजेचि ॥ ९ ॥

३१-३७

१७८

राया, पापक्षालनार्थ। अर्पी तयांचें त्यां राज्य ॥ १ ॥
तेणें लाभेल मान्यता। ऐके बोध तोचि ज्ञाता ॥ २ ॥
सदा लाभदाई ज्ञान। ज्ञानासमान वर्तन ॥ ३ ॥
क्रियेवीण व्यर्थ जाई। बोध, ज्ञात्याचाहि पाहीं ॥ ४ ॥
कर्में जया पापोदय। त्यजितां तें अभ्युदय ॥ ५ ॥
निवारित पूर्व पाप। नित्य असावें ध्यानांत ॥ ६ ॥
वारंवार तेंचि होतां। पंकमग्न तो सर्वथा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे नर। खळ, जया अविचार ॥ ८ ॥

३८-४१

१७९

मद, निद्रा, अविज्ञान[1]। व्यक्तविकारवदन ॥ १ ॥
दुष्ट अमात्य अपात्र। दूतावरी तें विश्वास ॥ २ ॥
मंत्रभेदें अर्थहानि। होई ऐशा षड्‌ द्वारांनीं ॥ ३ ॥
द्वारें रक्षूनि त्रिवर्ग-। युक्त होतां, विजयलाभ ॥ ४ ॥
न कळे धर्मार्थांचें ज्ञान। श्रुत, वृद्धसेवेविण ॥ ५ ॥
अन्य मार्गें बृहस्पति। असमर्थचि त्या ज्ञानासी ॥ ६ ॥
सागरांत व्यर्थ वृष्टि। तेंवी सद्‌बोध मूर्खासी ॥ ७ ॥
अविवेक्या शास्त्रज्ञान। अग्नि नसतांचि हवन ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे वस्तु। योजकाचे पुरवी हेतु ॥ ९ ॥

४२-४५

१८०

मतिमंतें तत्वपरीक्षा करावी। योग्यता जाणावी अनुभवें ॥ १ ॥
गांठ, भेट, नित्य संभाषण व्हावें। सख्यत्व जोडावें ज्ञात्यासवें ॥ २ ॥
विनयें अकीर्ति विक्रमें अनर्थ। क्रोधनाशमार्ग क्षमा एक ॥ ३ ॥
अशुभ लक्षणें सदाचारें नष्ट। विदुर हें स्पष्ट कथीतसे ॥ ४ ॥
वस्तुमात्र, स्थान, सदाचार, गृह। अन्न, वस्त्रें, कुल परीक्षावें ॥ ५ ॥
इष्ट, प्राप्तवस्तु मुक्तहि न त्यागी। तेथ कामुकाची कथा काय ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे नीतीचा सागर। भासतो विदुर सत्य सत्य ॥ ७ ॥

१ परकीय गुप्त हेरादिकांचें अज्ञान.

१८१ ४६-५१

प्राज्ञ सेवक, सुविद्य । प्रियदर्शन, धार्मिक ॥ १ ॥
मित्रवंत, शुभभाषी । रक्षावें त्या सुहृदासी ॥ २ ॥
नित्य मर्यादापालन । जनलज्जा, धर्मप्रेम ॥ ३ ॥
अकुलीनहि तो श्रेष्ठ । शतकुलीनां वरिष्ठ ॥ ४ ॥
मन, बुद्धि,गूढ गोष्टी । सम-समान जयांसी ॥ ५ ॥
नित्य मैत्री तयांमाजी । घातक्यासी न घडो मैत्री ॥ ६ ॥
तृणाच्छन्न कूपासम । जनीं जाणावा दुर्जन ॥ ७ ॥
मित्र कृतज्ञ धार्मिक । असो द्यावा दृढभक्त ॥ ८ ॥
क्षुद्र, मूर्ख, साहसिक, । नसो मित्र अधार्मिक । ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे मित्र । लाभो संयमी सत्शील ॥ १०

१८२ ५२-५४

अविवेकी जनां विषयानिवृत्ति । मृत्यूसम चित्तीं भय देई ॥ १ ॥
स्थानभ्रष्ट करी विषयाधीनता । अहो ज्या देवता तयांसीहि ॥ २ ॥
भूतदया, क्षमा, अनसूया, धृति । सत्कार मित्रासी आयुदायी ॥ ३ ॥
अन्याय्य कृतीचा प्रतिकार व्हावा । पुनः प्रस्थापावा न्याय जगीं ॥
कर्तव्य हें लोकीं नित्य सज्जनाचें । मानिताति ज्ञाते व्रतासम ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अन्यायाविरुद्ध । लढावया सिद्ध तोचि शूर ॥ ६ ॥

१८३ ५५-६०

अनागत दुःख प्रतिकार जाणे । निवारी धैर्यानें प्राप्त दुःख ॥ १ ॥
गत गोष्टीस्तव न करी जो शोक । वैभव त्या नित्य लाभे जनीं ॥
क्रिया, मन, वाणी, सेवील जें नित्य । आकर्षी नरास कर्म तेंचि ॥ ३ ॥
यास्तव सर्वदा कल्याण चिंतावें । कल्याण करावें गावें तेंचि ॥ ४ ॥
मंगलदर्शन, सहाय्य, ऋजुत्व, । विद्या, मान, संग सज्जनांचा ॥ ५ ॥
अभ्युदय होई ऐशा सद्गुणांनीं । उद्योगचि जनीं सौख्यदाई ॥ ६ ॥
लक्ष्मी,लाभ,तैंवी कल्याण प्रयत्नें । लाभे,अधिकारेंहूनें क्षमा कीजे ॥
दुर्बलां, सबलां, क्षमाचि सौख्यद । वासुदेव बोध ऐकें साचा ॥ ८ ॥

१८४ ६१-६५

धर्मार्थांसी जे अविरुद्ध । तेचि उपभोगावे भोग ॥ १ ॥
दुःखी, प्रमत्त, नास्तिक । अनुत्साही ज्या आलस्य ॥ २ ॥
नसे संयम जयांसी । तेथ लक्ष्मी वसे कैसी ॥ ३ ॥
ऋजुता ते अशक्तता । भासतसे जनीं मूढा ॥ ४ ॥
अति आर्यता, दातृत्व । अति तप, अति शौर्य ॥ ५ ॥
जेथ बुद्धीचा अभिमान । लक्ष्मी टाळिते तें स्थान ॥ ६ ॥
अति गुण किंवा दोष । कदा रुचती न पद्मेस ॥ ७ ॥
मत्त, अंध, धेनूसम । वरी यथेच्छ ती स्थान ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे लक्ष्मी । कमासम प्राप्त जनीं ॥ ९ ॥

१८५ ६६-७०

वेदाध्ययनाचें अग्निहोत्र फळ । सदाचार, शील शास्त्राभ्यासें ॥१॥
रति, पुत्रलाभ, पत्नीच्या लाभानें । लाभतसे धनें दान, भोग ॥२॥
अधर्मोक्तद्रव्यकृत पुण्यलाभ । देह त्यागोत्तर न लाभे तो ॥ ३ ॥
दटावूं शकेना धैर्यवंता काळ । विपत्ति सकळ कांपती त्या ॥ ४ ॥
उत्कर्षाचें मूळ विवेक या जनीं । दक्ष जो संयमी, यश तया ॥ ५ ॥
तापसांसी तप ब्रह्मवेत्त्यां ब्रह्म । हिंसाबल जाण दुर्जनांचें ॥ ६ ॥
सज्जनांचें बल अमोघ या जनीं । क्षमा श्रेष्ठ मानीं वासुदेव ॥ ७ ॥

१८६ ७१-७२

फल, मूल पय, जल । घृत, विप्र जें इच्छील ॥ १ ॥
गुरुवचन, औषध, । न घडे येणें व्रतभंग ॥ २ ॥
प्रतिकूल आपणासी । प्राप्त नसो तें कोणासी ॥ ३ ॥
हेंचि धर्माचें रहस्य । अन्य भासवी तो स्वार्थ ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे स्वार्थ । मूर्तिमंत तो अनर्थ ॥ ५ ॥

१८७ ७३-७४

अक्रोधेंचि क्रोध नृपाळा जिंकावा । दुर्जन जिंकावा सदाचारें ॥१॥
कृपणासी ज्ञाते जिंकिताती दानें । जिंकावें सत्यानें अनृतासी ॥ २ ॥
स्त्री, धूर्त, आळशी, पुरुषत्वाभिमानी । भीरु क्रूर तैंवी कृतघ्न जो ॥

परलोकभीति नसे ऐसियांसी । विश्वास कदापि धरूं नये ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे त्याज्यचि सर्वदा । तस्करविश्वासा म्हणती संत ॥

१८८ ७५-८१

वृद्धसेवारत, अभिवादनशील । आयुर्यश बल कीर्ति जोडी ॥ १ ॥
अधर्मोपार्जित, अतिश्रमपूर्ण । वैऱ्यासी नमून, द्रव्य नको ॥ २ ॥
विद्याहीन नर, संग प्रजाहीन । प्रजा वृत्तिहीन शोचनीय ॥ ३ ॥
अराजक राष्ट्र शोचनीय जाणा । प्रवासचि जनां जरा लोकीं ॥४॥
पर्वतांसी जलप्रवाह तो जरा । असंभोग जरा स्त्रियांप्रति ॥ ५ ॥
वाग्बाण मनासी आणिती ते जरा । मल तो वेदाला, अनभ्यास ॥
व्रतहीन विप्र पावे मलीनता । बाल्हीक[1] भूमीचा मल जाणा ॥ ७ ॥
अनृत नरासी, सतीसी उत्कंठा. । प्रवास स्त्रियांचा मल जाणा
वासुदेव म्हणे रौप्य, कथिल, सीस । मलस्वोच्च धातूस यथाक्रम

१८९ ८२-८६

शयनें निद्रा, कामें स्त्रीसी । अथवा इच्छित दानेंसी, ॥ १ ॥
इंधनेंसी अग्निजय । पानें सुरापी विजय ॥ २ ॥
ऐसें इच्छील जो मूढ । जाणा केवळ तो जड ॥ ३ ॥
दानें मित्र, समरीं वैरी । अन्नपानें जिता नारी ॥ ४ ॥
त्याचें सफल जीवित । राज्य नलगे जीवनार्थ ॥ ५ ॥
अल्प धनेंहि जीवित । कंठिताती सुखें लोक ॥ ६ ॥
त्रिभुवनलाभें तोष । कदापि न मानवास ॥ ७ ॥
तत्त्व जाणे जो हें सदा । मोह तयासी न कदा ॥ ८ ॥
राया, ऐकें पुनरपि । सम पांडवांसी लेखीं ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे क्षत्ता । वारंवार विनवी नृपा ॥ १० ॥

## अध्याय ४० वा

१९० १-३

यथाशक्य कार्य करी । अहंभाव न अंतरीं ॥ १ ॥
तया संत सन्मानिती । प्रसन्नता सुखद त्यांची ॥ २ ॥
महालाभहि अधर्मे । संपादी न, त्यागी स्वयें ॥ ३ ॥

---

१ या नांवाचा देश.

कांत सर्पासम त्याची । गळे, निद्रा ये सुखाची ॥ ४ ॥
जातिगोपन, चहाडी । नृपाजवळी ते कोणाची ॥ ५ ॥
मित्थ्या गुरूसी जो वदे । ब्रह्महत्या तया घडे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे बोध । ऐकतांचि हा आनंद ॥ ७ ॥

१९० ४-८

मत्सर तो मृत्यु, अतिवादें हानि । मूर्तिमंत जनीं वैभवाची ॥ १ ॥
गुरूची अवज्ञा, त्वरा, आत्मश्लाघा । विद्येचिया मार्गा विघ्नें तीन ॥
आलस्य, उन्माद चांचल्य तें गोष्टी । लोभ, गर्व पोटीं औद्धत्य तें ॥
विघातक सप्त दोष हे जाणावे । सर्वदा त्यागावे विद्यार्थ्यानें ॥ ४ ॥
विद्यार्थ्यासी सौख्य, सुखेच्छूसी विद्या । कदाही न लभ्या ध्यानीं असो
इंधनेसी अग्नि, सिंधु सरितांनीं । वधूनियां प्राणी असुखी, मृत्यु ॥६॥
कामुक स्त्रियांची कदा नव्हे तृप्ति । नसे कामुकासी तृप्ति कदा ॥७॥
आशा ते धैर्यासी, मृत्यु समृद्धीसी । क्रोध संपत्तीसी नष्ट करी ॥८॥
कृपणता कीर्ति नष्ट करी राया । अपालनें वाया पशु जनीं ॥ ९ ॥
क्रुद्ध विप्र एक राष्ट्रविनाशक । वासुदेव बोध ध्यानीं धरी ॥ १० ॥

१९१ ९-१२

अजा, कांस्य, रौप्य, विषपरीक्षक । चकोर, गृहांत नित्य असा ॥१॥
श्रोत्रीय, कसोटी, मधु, तैंवी वृद्ध, । अवसन्न[१] शुद्ध[२] सदनीं असो ॥२॥
शालिग्राम, शंख, चंदनादि शुभ । वस्तु, पूजनार्थ[३] सदनीं ठेवीं
सर्वश्रेष्ठ बोध एक हितप्रद । राया, पुण्यलोकप्राप्ति जेणें ॥ ४ ॥
काम, भय, लोभ अथवा प्राणेच्छा । धरूनि धर्माचा न घडो त्याग॥
अनित्य या जनीं राया, सुख दुःख । धर्म एक नित्य ध्यानीं धरीं ॥६॥
अज्ञान अनित्य आत्मा नित्य राया । नित्या त्यजूनियां हित नसे ॥७॥
संतोषासमान अन्यलाभ नसे । येई प्रत्ययातें वासुदेवा ॥ ८ ॥

१९२ १५-२०

चक्रवर्ती राजे तेही नष्ट होती । मृत पुत्र अंतीं चितेवरी ॥ १ ॥

१ विपत्तींत सांपडलेला, २ कुलीन, ३ देव, ब्राह्मण आणि अतिथि यांच्या पूजनासाठीं.

मृतांचें ऐश्वर्य भोगितानी पर। भक्षिती शरीर पशु-पक्षी ॥ २ ॥
पाप-पुण्य मात्र घेऊनि सांगातीं । जीव परलोकीं जात असे ॥ ३ ॥
पक्षी, पुष्प-फलहीन वृक्षासम । त्यजिती स्वजन सकल अंतीं ॥४॥
दग्ध देह होतां कर्मचि सांगातीं । यास्तव धर्मचि संग्रहावा ॥ ५ ॥
अधोभागीं असे तमोमय स्थान । नरक तोचि जाण मोहकारी ॥६॥
स्थान तें तुजसी न लाभोचि राया । इहपर ठाया अभय भोगीं ॥
वासुदेव म्हण इहपर कीर्ति । लाभे जया कृति धर्मयुक्त ॥ ८ ॥

१९४ २१-२३

ब्रह्मोद्भव जाण जीवरूप नदी । धैर्य हें तिजसी तीर असे ॥ १ ॥
धर्मतीर्थी शुद्ध दया ऊर्मीमाजी । सुस्नान जो जगीं पुनित तोचि ॥
नित्य अलोभता हेंचि खरें पुण्य । आचरूनि धन्य व्हावें जनीं ॥३॥
इंद्रिय उदकीं काम-क्रोध ग्राह । धृतिमयी नाव पार नेई ॥ ४ ॥
प्रज्ञा-धर्म-विद्या-तैंवी वयोवृद्ध-। बंधु, कार्याकार्य दाविती ज्यां ॥५॥
कदा न तयाचें विमोहित चित्त । कथी विदुरोक्त वासुदेव ॥ ६ ॥

१९५ २४-३२

धैर्यें शिस्नोदर, नेत्रें पाणिपाद । मनें चक्षुःश्रोत्र संरक्षावे ॥ १ ॥
रक्षावी संयमें नित्य मन-वाणी । धरावी हे ध्यानीं मति सदा ॥२॥
स्नान, आचमन, नित्य उपवीति । शुद्धअन्नभोजी, सत्यप्रिय ॥ ३ ॥
पतितान्नवर्जी, स्वाध्यायनिरत । गुरुसेवारत विप्र मुक्त ॥ ४ ॥
वेद, अग्निहोत्र-यज्ञ-कार्यदक्ष । गो-ब्राह्मणार्थ समरीं मृत्यु ॥ ५ ॥
ऐसा क्षत्रियासी घडे स्वर्गलाभ । क्रमितां धर्ममार्ग वैश्य शूद्रां ॥६॥
क्षात्रधर्मभ्रष्ट न करीं 'धर्मासी' । विदुर रायासी कथीतसे ॥ ७ ॥
राव म्हणे क्षत्त्या, सत्य तव वाणी । पुत्रासी देखूनि परी मोह ॥८॥
दैवोल्लंघन तें अशक्य जीवासी । पौरुष मजसी व्यर्थ वाटे ॥ ९ ॥
वासुदेव कथी प्रजागरपर्व । अनुलंघ्य दैव धृतराष्ट्रासी ॥ १० ॥

( विदुरनीति समाप्त )

---

## सनत्सुजातपर्व ४

अध्याय ४१ वा १९६ १-११

राव म्हणे विदुरासी । अगोचर जें वाचेसी ॥ १ ॥
ऐसें जरी ज्ञान गुज । कथीं बोलसी विचित्र ॥ २ ॥
म्हणे रायासी विदुर । कथितील तें कुमार ॥ ३ ॥
गूढ स्पष्ट सकल ग्रंथीं । श्रवणें विनाश पावती ॥ ४ ॥
ब्रह्मोपदेशा अधिकार । शूद्रा लागीं न साचार ॥ ५ ॥
ऐसें बोलूनियां क्षत्ता । चिंतीतसे ऋषिश्रेष्ठा ॥ ६ ॥
प्रकट होतांचि पूजून । विदुर म्हणे कथूनि ज्ञान-। ७ ॥
करा रायासी निर्द्वंद्व । होवो सकल ग्रंथिभेद ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे वृत्ति । ज्ञानें सकळ शांत होती ॥ ९ ॥

अध्याय ४२ वा १९७ १-२

अभिनंदूनियां राजा विदुरासी । सनत्सुजातांसी प्रश्न करी ॥ १ ॥
मृत्यु नसे ऐसें कथिसी, क्षत्ता म्हणे, । इंद्र विरोचनें केला यत्न ॥
अमरता लाभो हेचि तयां इच्छा । मृत्यु मुनिश्रेष्ठा सिद्ध तेणें ॥
निर्णय मजसी स्पष्ट निवेदावा । संशय छेदावा अंतरींचा ॥ ४ ॥
मुनि म्हणे कोणी मृत्यु मानूनियां । अमर व्हावया करिती कर्म ॥
विषयविषांचा तेंचि वाटे सुख । निर्विषय मोक्ष म्हणती व्यर्थ ॥
स्मशानीं शृगालजन्म ज्यां रुचे । मोक्ष सुख त्यांतें पटेचिना ॥७॥
म्हणती कोणी ज्ञान कर्म अन्तत्व । ब्रह्म एकमेव म्हणती कोणी ।
निर्णय रायासी कथी मुनिराव । गातो वासुदेव वंदूनि त्यां ॥ ९ ॥

१९८ ३-४

उभयहि पक्ष सत्य । राव म्हणे केसें शक्य ॥ १ ॥
मोह मृत्यु म्हणती मुनि । मानीवाचि म्हणती कोणी ॥ २ ॥
अविवेक जो अनादि । मोह नाम तया देती ॥ ३ ॥

---

१ योगकला द गूढ, व शमादि १८ धर्म सांगेल.

तोचि मृत्यु म्हणती कोणी । भिन्न मन्मत त्याहूनि ॥ ४ ॥
मृत्यु जाणावा प्रमाद । अमृतत्व अप्रमाद ॥ ५ ॥
प्रमाद ते स्थानच्युति । मूळ जाण अज्ञानासी ॥ ६ ॥
स्वास्थ्य तेंचि अमरत्व । काथलें स्पष्ट छांदोग्यांत ॥ ७ ॥
प्राप्ति, उत्पत्ति, संस्कार, । विकृति, हीं फळें चार ॥ ८ ॥
मोक्ष नव्हेचि या फळ । म्हणूनि कर्मादि निष्फळ ॥ ९ ॥
ज्ञानकर्मसमुच्चय । विफळ म्हणे वासुदेव ॥ १० ॥

१९९ ५-

राव म्हणे मुनिराया । बोध कैसा हा मानावा ॥ १ ॥
कांहीं द्यावें प्रमाण । जेणें शंकानिरसन ॥ २ ॥
इंद्र-विरोचनवृत्त । मुनि म्हणती तें प्रसिद्ध ॥ ३ ॥
अप्रमादें ब्रह्मीभूत । विजय पावलासे इंद्र ॥ ४ ॥
प्रमादेंचि विरोचन । असुरांसवें नष्ट जाण ॥ ५ ॥
तिर्यग्योनि असुरांसी । हाचि पराभव त्यांसी ॥ ६ ॥
आत्मज्ञ ते सुर देख । ज्ञानें होती ब्रह्मीभूत ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐसें । अन्य वचन न धावें ॥ ८ ॥

२०० ५

राव म्हणे मुनिवरा । मृत्यु ग्रासी चराचरा ॥ १ ॥
ऐसें सर्वत्र प्रसिद्ध । कैसा मृत्यु तो प्रमाद ॥ २ ॥
मुनि म्हणे व्याघ्रासम । न घडे मृत्यूचें दर्शन ॥ ३ ॥
राव म्हणे सावित्रीसी । दिसला यम, कथा ऐसी ॥ ४ ॥
मुनि बोले तें अज्ञान । मृत्युरूपें दिसलें जाण ॥ ५ ॥
राया मृत्यु तो अज्ञान । अमृत तें ज्ञान जाण ॥ ६ ॥
ऐसें बोलतसे श्रुति । सदा राहो आत्मस्थिति ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे मोक्ष । नव्हे नव्हे कर्मप्राप्त ॥ ८ ॥

२०१ ६-९

प्रमादाचे मृत्यु जाण ऐशारीति । अनात्मज्ञ ते कीं म्हणती यम ॥

[1] अप्रमाद हें अमरत्व व प्रमादच मृत्यु हा बोध.

पितृलोकीं वास म्हणती तयाचा । निर्णय यमाचा कर्मासम ॥ २ ॥
अज्ञान मृत्यूचें कार्य घेई ध्यानीं । अहंकार मनीं प्रथम घडे ॥ ३ ॥
काम त्तें होई अंतरीं प्रगट । प्रमाद, तो क्रोध विरोधितां ॥ ४ ॥
पुढती मोहानें विप्र, क्षत्रियादि । स्थूल-कृशबुद्धि, धरीतसे ॥ ५ ॥
राग-द्वेषें, श्रौत-स्मार्त धर्म सांडी । न लाभे समाधिसौख्य कदा ॥
वासुदेव म्हणे जन्म मृत्यु फेरा । न टळेचि नरा अज्ञानानें ॥ ७ ॥

२०२ १०-११

कर्मफलासक्ति नरा । लावी जन्म-मरण फेरा ॥ १ ॥
अविवेकी विषयासक्त । भ्रमण पावे संसारांत ॥ २ ॥
आसक्ति जे विषयांची । 'महामोहन' वा तेंचि ॥ ३ ॥
मिथ्यास्वरूप तयांचें । कळतां आत्मप्रेम वाटे ॥ ४ ॥
मानी विषय जो सत्य । तोचि होई बहिर्मुख ॥ ५ ॥
ऐशा मोहग्रस्ताप्रति । कदाही न आत्मस्थिति ॥ ६ ॥
करितां विषयचिंतन । विषयासन्निध नेई काम ॥ ७ ॥
पुढती क्रोधाची उत्पत्ति । मृत्यु पावतसे अंतीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे जाण । विषय विरागी तो धन्य ॥ ९ ॥

२०३ १२-१४

राजा म्हणे कैसे विषय जिंकावे । मुनि म्हणे व्हावें ज्ञान त्यांचें ॥१॥
अनित्य, अशुचि, दुःखरूप तयां । त्यागी, जाणूनियां दोषमय ॥ २ ॥
संप्राप्तविषयत्यागी जो विवेकी । मृत्यूसी या लोकीं तोचि मृत्यु ॥
भूतमात्राप्रति भक्षीतसे काळ । काळाचाहि काळ विवेकी तो ॥४॥
राव म्हणे कैसा देह प्रियतम । त्याज्य हें जाणून ध्यावें जनीं ॥ ५ ॥
मुनि म्हणे राया, कफ, वात, पित्त । दोष या देहांत दिसती स्पष्ट ॥
परी देहावरी जयाची आसक्ति । मृत्यु तोचि त्यासी ध्यानीं धरीं ॥
अविद्या कल्पित देह हा नरक । तृणाछन्न कूप अंधासी जैं ॥ ८ ॥
मृत्यूचा विनाश कैसा म्हणे राव । कथी वासुदेव पुढती ऐका ॥९॥

२०४ १५-१८

अनात्मज्ञ देह तृणव्याघ्रासम । व्यर्थचि तूं जाण नृपश्रेष्ठा ॥ १ ॥

क्रोध, लोभ, मोह, भयाकुल आत्मा । तोचि नरोत्तमा, समजें मृत्यु
काम-क्रोधोद्भव प्रमाद तो मृत्यु । जन्म-मरण हेतु तोचि एक ॥३॥
जाणूनियां ऐसें स्वस्वरूपस्थिति । पावे तो मृत्युसी वश नोहे ॥
आत्मज्ञानें कदा न घडे प्रमाद । ऐसा मृत्युभंग आत्मज्ञानें ॥ ५ ॥
सांसारिक जैसा मृत्युयोगें नष्ट । तैसाचि विनष्ट, ज्ञानें मृत्यु ॥ ६ ॥
राव म्हणे जरी बंधहेतु कर्म । मग कां वर्णन करी वेद ॥ ७ ॥
मुनि म्हणे अज्ञास्तव तें वर्णन । कामनिक कर्म अज्ञास्तव ॥ ८ ॥
ज्ञाता, ज्ञानरूप स्वयेंचि तो जाण । कदाही न कर्मफल इच्छी ॥९॥
वासुदेव म्हणे अमार्ग सकल । ज्ञानचि निष्कल निरंजन ॥ १० ॥

२०५ १९-२०

राव म्हणे भूतें निर्मूनियां आत्मा । स्वयें प्रवेशला तयांमाजी ॥ १ ॥
अथवा कोणी अन्य प्रेरक तयाचा । पुराणा त्या अजा असुख काय ॥
मुनि म्हणे राया, नियोज्य-योजक । प्रेरित, प्रेरक तेथ नसे ॥ ३ ॥
म्हणसी भेद तरी, ब्रह्मचि त्रिविध ? । जीव ब्रह्मभेद अथवा सांगें ॥
अस्थूल अनणु ऐसें श्रुतिवाक्य । पावेल विनाश, त्रिविध तरी ॥५॥
अद्वैतसिद्धांत होईल बाधित । राया प्रथम पक्ष स्वीकारितां ॥ ६ ॥
द्वितीयही पक्षीं द्वितीयाद्भय । वेदाचा आशय मिथ्या होई ॥ ७ ॥
अनादि अविद्या भेदत्रयातीता । आणी विविधता मायामय ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे जीवाचा संसार । नित्य निर्विकार परब्रह्म ॥ ९ ॥

२०६ २१

जीव मायामय जाण । वेद मायेसी प्रमाण ॥ १ ॥
मायायोगें महेश्वर । करी अखिल संसार ॥ २ ॥
मिथ्या मायायोगें आत्मा । विविधरूपें घेई जाणा ॥ ३ ॥
ऐसें प्रतिपादि श्रुति । स्मृति पुराणें तें गाती ॥ ४ ॥
राया, जाण हा प्रमाद । मृत्यु स्वरूप तें चांग ॥ ५ ॥
तेंचि अज्ञान नृपाळा । घडवी विविध अनर्थाला ॥ ६ ॥
त्याचा ज्ञानें परिहार । कथिती रायासी मुनींद्र ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे राव । प्रश्न करी ठेउनि भाव ॥ ८ ॥

२०७ २२

राव म्हणे मुनिश्रेष्ठा । प्रश्न अन्य एक माझा ॥ १ ॥
आचरिती कोणी धर्म । कोणी वरिताती अधर्म ॥ २ ॥
पापें धर्म नष्ट होई । अथवा धर्में पाप जाई ॥ ३ ॥
अथवा तुल्यवल दोन्हीं । विनाश न पावे कोणी ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे प्रश्न । राव करितो हा सुजाण ॥ ५ ॥

२०८ २३-२४

मुनि म्हणे राया. ईश्वरार्थ कर्म । जाण बलवान पापहारी ॥ १ ॥
ज्ञानेंतरेण धर्म आचरितां जाण । पापविनाशन न घडे तेणें ॥ २ ॥
ईश्वरार्थ कर्म न करी तयासी । भोगणें प्राप्तचि कर्मफल ॥ ३ ॥
पाप-पुण्य फल भोगितो तो नर । भोग्याचि साचार दोन्हीं तया॥४॥
ज्ञाना इहलोकीं पुण्यें नाशी पाप । धर्माचार श्रेष्ठ जाणें त्याचा ॥
वासुदेव म्हणे स्वर्गद तें एक । अन्य शुद्ध चित्त करी कर्म ॥ ६ ॥

२०९ २५-२६

विषयासक्त जन करिती ज्योतिष्टोम । अंतरीं धरून सुखस्पर्धा ॥
जनीं सकलांहूनि होईन मी सुखी । पुण्य आचरीति याचि भावें ॥
धूम्रादिक मार्गें स्वर्गात जाऊनि । नक्षत्रें होवोनि प्रकाशती ॥ ३ ॥
अनासक्तचित्तें ईश्वरप्रीत्यर्थ । करितां कर्म, चित्त शुद्ध होई ॥
शुद्धचित्त ऐसे ज्ञानें मुक्त होती । अवस्था गुणादि उल्लंघूनि ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वर्णाश्रमधर्मं । उद्धरती ज्ञानें तेही ऐका ॥ ६ ॥

२१० २७-३१

यथाक्रम न्यास करूनि कर्मांचा । बोध स्वरूपाचा ज्यांलागीं ॥ १ ॥
सम्यक्समाचार ऐसे भाग्यवंत । ते होती प्रगट स्वजनीं ही ते ॥
समृद्ध देशांत तयांचा निवास । अन्न दुर्वास संकटीं त्यां ॥ ३ ॥
देहयात्रा त्यांची नसे पराधीन । स्वरूपावस्थान न घडे ज्यांणें ॥ ४ ॥
अन्न, वस्त्र, मान, कदा न इच्छिती । जड मूढ वृत्ति पैशाच्य त्यां ॥५॥
सुख-सन्मानादि विघ्नचि तयांसी । गूढ चर्या त्यांसी सुखावह ॥
नित्य अप्रगट, ज्ञातींहूनि दूर । निर्लिंगाससाचार कोण जाणे ॥ ७ ॥

चैलाजिन, ग्रंथ हेंचि त्याचें वित्त। सदा आत्मनिष्ठ निर्द्वंद्व ते। ८॥
वासुदेव म्हणे परात्पराध्यास। नसे ज्ञानीयास कदाकाळीं॥ ९॥

२११ ३३

कर्ता भोक्ता सुखी दुःखी। म्हणे आत्म्यासी अविवेकी॥ १॥
ऐसा अज्ञानी तस्कर। सकल पापांचें माहेर॥ २॥
तया संसारनिवृत्ति। नव्हे नव्हेचि कल्पांतीं॥ ३॥
आत्मभाव अनात्म्याचा। त्याज्य जाणावा सर्वथा॥ ४॥
अवाच्य जें अगोचर। स्वरूपें त्या व्हावें स्थिर॥ ५॥
वासुदेव म्हणे ब्रह्म। निराकार तें निर्गुण॥ ६॥

२१२ ३४

मनोधर्म शोक-मोह। जरा मरणयुक्त देह॥ १॥
अशनाया तैं पिपासा। धर्म असे हा प्राणांचा॥ २॥
देहाध्यासें देहधर्म। येती आत्म्याकरीं जाण॥ ३॥
ऐसा अविवेक जया। नसे स्वास्थ्यलाभ तया॥ ४॥
अशानायादि षडूर्मि। जनीं तेचि श्रम मानीं॥ ५॥
क्रोध, हर्ष, लोभ, मोह। इत्यादि हे उपद्रव॥ ६॥
अश्रांत तो निरुपद्रव। जया नित्य ब्रह्मभाव॥ ७॥
ज्ञाते म्हणती तया शिष्ट। जडासम ज्ञाता नित्य॥ ८॥
वासुदेव म्हणे नम्र। वश तया विश्वंभर॥ ९॥

२१३ ३५-४०

महत्व आपुलें स्वयें न वर्णावें। गुप्तचि ठेवावें सर्वकाळ॥ १॥
स्ववीर्य वर्णूनि भोग जे भोगिती। भक्षिती ते वांती श्वानासम॥
दारा-धनादिकीं असक्ति न ज्यांची। परब्रह्ममूर्ति प्रत्यक्ष ते॥ ३॥
ब्रम्हचर्यादिकधर्मीं जे आसक्त। विप्र ते दुर्धर्ष दुष्प्रकंप्य॥ ४॥
अग्नि, इंद्रादिकां हवि जे अर्पिती। ज्ञात्यांचिया पुढती बापुडे ते॥
अग्नि, इंद्राहूनि ब्रह्मवेत्ता श्रेष्ठ। तेथ उपासकतुलना काय॥ ६॥
स्थितप्रज्ञा लागीं, पूजितांहि ज्ञाते। हर्ष न तयांतें कदाकाळीं॥ ७॥

१ भूक

जड, मूढ, गर्वें जरी अवमानिती । हे शहि न चित्तीं दुःख तयां ॥
वासुदेव म्हणे ऐसा स्थितप्रज्ञ । रद भाव जाणून, सम असे ॥ ९ ॥

२१४ ४१-४२

मान मौनाचे विषय । भिन्न कथिती मुनिराय ॥ १ ॥
विषय प्रपंच, मानाचा । ब्रह्म विषय मौनाचा ॥ २ ॥
मानें संसाराचा लाभ । मौनें ब्रह्मचि स्वयंभ ॥ ३ ॥
स्वर्गास्तव कर्में करी । आसक्त तो स्वर्गावरी ॥ ४ ॥
ऐश्वर्यें जो विषयधुंद । दुर्लभ त्या ब्रह्मानंद ॥ ५ ॥
सत्य, आर्जव, तो दम । लज्जा, शौच, ब्रह्मज्ञान ॥ ६ ॥
ब्राम्ही स्थितीचीं साधनें । सहा, वासुदेव म्हणे ॥ ७ ॥

अध्याय ४३ वा २१५ १-६

वाणीनिरोध कीं आत्मभाव मौन । कथावें संपूर्ण राव म्हणे ॥ १ ॥
मुनि म्हणे वद वर्णू न शकती । प्रत्यक्ष ब्रह्म्यासा अशक्य तें ॥२॥
वाङ्मनसातीत ब्रह्म तेंचि मौन । उत्पत्तिचें स्थान वेद-शास्त्रां ॥
शब्दागोचर हें सत्य मानूं कैसें । म्हणसी तरी तसें अनुभवा ये ॥
सत्-चित्-घन आत्मा अनुभव ऐसा । योगादि शास्त्रांचा सिद्धांत हा
आचरी जो पाप, स्वाध्याय तयासी । सांगा उद्धरी कीं मुनिराया
मुनि म्हणे कर्म वेदानें टळेना । वळ, अध्ययना नसे तैसें ॥ ७ ॥
शकुंत नीडासी त्यजूनियां जाती । मायाव्यासी अंतीं तैसी वेद ॥८॥
वासुदेव म्हणे राव करी प्रश्न । करिती अध्ययन व्यर्थचि कीं ॥९॥

२१६ ७

नव्हे नव्हे व्यर्थ राया, अध्ययन । मुनि म्हणे जाण साधन तें ॥ १ ॥
प्रमुख वेदार्थ मोक्षचि जाणावा । साधन गणावा अन्य भाग ॥ २ ॥
चित्तशुद्धि मुख्य, ज्ञानाचें साधन । उपासना, कर्म, शुद्धिप्रद ॥३॥
मोक्षचि परमपुरुषार्थ तो कैसा । चिंतिसील राजा तरी ऐकें ॥४॥
आत्मवेत्ता शोक तरूनियां जाई । ऐसें श्रुतिमाई कथीतसे ॥ ५ ॥
अनात्मज्ञालागीं अनर्थाची प्राप्ति । ऐसें वेद कथी वारंवार ॥ ६ ॥
जिज्ञासेनें ज्ञान, ज्ञानें मोक्षप्राप्ति । जिज्ञासा वेदेंचि पूर्ण होई ॥ ७॥

नामरूपें येई प्रत्ययासी जग । अलिप्तता बोध वेद करी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ईश्वरार्थ क्रिया । पुरुषार्थ, राया इतर व्यर्थ ॥ ९ ॥

२१७ ८-१३

ईश्वरार्थकर्मे पुण्य संपादूनि । पाप निवारूनि ज्ञान जोडीं ॥ १ ॥
कर्मासक्त भोगी तें तें कर्म फळ । अवशिष्ट इहलोकीं भोगी ॥ २ ॥
परलोकीं इहलोककृत तप । कर्ममार्गरत भोगिताती ॥ ३ ॥
आत्मज्ञाचें तप पावे समृद्धीतें । तप तें अज्ञाचें नाश पावे ॥ ४ ॥
राव म्हणे मुने केवळ तपाची । समृद्धि ते कैसी सांगा मज ॥ ५ ॥
मुनि म्हणे राया, तप जें निष्पाप । तेंचि 'केवळ तप' म्हणती ज्ञात
ऐसें तप घडे त्रिगुण साम्यानें । गुणाच्या वैषम्यें सदोष तें ॥ ७ ॥
सदसदात्मक सर्व तपोमूळ । वासुदेव बल, तप म्हणे ॥ ८ ॥

२१८ १४-१६

निष्कल्मष तप कैसें । राव म्हणे सांगा मातें ॥ १ ॥
तपामाजी जे जे दोष । कथिती मुनि ते रायास ॥ २ ॥
होतां कामासी प्रतिबंध । प्रथम तपोदोष क्रोध ॥ ३ ॥
विषय अभिलाषा काम । लोभ द्रव्यासक्ति जाण ॥ ४ ॥
अविवेक कर्तव्याचा । मोह, तपोदोष साचा ॥ ५ ॥
नित्य विषयांची इच्छा । दोष समजें तो 'विवित्सा' ॥ ६ ॥
अकृपा ते निष्ठुरता । असूया ते दोषरूपा ॥ ७ ॥
श्रेष्ठ मी हा जाणें मान । शोक, दोष तो नवम ॥ ८ ॥
विषयभोगेच्छा ते स्पृहा । ईर्षा असहिष्णुता महा ॥ ९ ॥
जुगुप्सा ते गुणनिंदा । दोष द्वादश हे तपा ॥ १० ॥
वासुदेव म्हणे दोष । तपस्व्यासी ऐसे त्याज्य ॥ ११ ॥

२१९ १७-१८

सहज सद्गुण असती विप्रासी । संधि साधिताती क्रोधादिक ॥ १ ॥
संधि साधूनियां व्याध मृगा नाडी । तैसेचि नाडिती दोष ज्ञात्या ॥
'संभोग-संवित्' आसक्त तो जाण । 'विषमेधमान' पीडाकारी ॥

'दत्तानुतापी' तो पस्तावे देऊन। मानाहूनि धन कृपणा श्रेष्ठ ॥४॥
'अबलीयान्' तो ज्ञानबलहीन। 'वनिताद्वेष्टा' जाण तैशापरी
'वर्गप्रशंसी' तो इंद्रियांसी स्तवी। सप्तक हें दावी वासुदेव ॥ ६ ॥

२२० १९-२०

ऐकें अतां द्वादश गुण। प्रथम तत्वार्थाचें ज्ञान ॥ १ ॥
हित यथार्थ तें सत्य। शास्त्र अध्यात्म तें श्रुत ॥ २ ॥
अमात्सर्य तैंवी दम। लज्जा अकार्यी ऱ्ही जाण ॥ ३ ॥
अनसूया तें तितिक्षा। यज्ञदान तैंवी राजा ॥ ४ ॥
असूनि सन्निध विषय। जाणें धृति जो निग्रह ॥ ५ ॥
शम, द्वादश हीं व्रतें। करिती कृतार्थ विप्रातें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे एक। व्रत तेंही साधी हित ॥ ७ ॥

२२१ २१-२५

दोष आष्टादश नरेंद्रा दमाचे। एकाहि या दोषें दम नासे ॥ १ ॥
अनृत, पैशून्य, प्रातिकूल्य, तृष्णा। अराति, तम, जाणा लोकद्वेष ॥
प्राणिपीडा, तैंवी अभिमान, वाद,। परिताप, अतिवाद, परिवाद, ॥
अक्षमा, अधृति, असिद्धि, तें पाप,। आचार निषिद्ध तैंवी हिंसा, ॥
इंद्रियदमनीं दोष हे न व्हावे। व्रतभंग पावे घडतां दोष ॥ ५ ॥
विपरीतभावें दोष हे सद्गुण। मदनिरसन करिती राया ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे त्याग तो त्रिविध। कथूनियां बोध करी क्षत्ता ॥७॥

२२२ २६-२८

योग्य याचकासी पुत्र-वित्तदान। त्याग तो प्रथम जाणें राया ॥१॥
देवांस्तव इष्ट पितरांतें पूर्त। दान तें वरिष्ठ द्वितीयत्याग ॥ २ ॥
शुद्धचित्त करी धन-कामत्याग। तयातें अमोघ फल जनीं ॥ ३ ॥
अप्रमाद घडे तया पुण्यवंता। अष्ट अप्रमादा गुण राया ॥ ४ ॥
सत्य, ध्यान, तैंवी समाधान नित्य। कोण, मी कोठील? विचार हा
वैराग्य, अस्तेय, तैंवी ब्रह्मचर्य,। म्हणे वासुदेव असंग्रह ॥ ६ ॥

२२३ २९-३४

ऐसे दोष हे दमाचे। त्याज्य सर्वथा ज्ञात्यातें ॥ १ ॥

राजा होई सत्यनिष्ठ । विश्व सत्यामाजी स्थित ॥ २ ॥
दम, त्याग, अप्रमाद । मोक्षही तो सत्याश्रित ॥ ३ ॥
दोषनिवृत्तानें सदा । आचरावें तप-व्रता ॥ ४ ॥
दोषहीन, गुणयुक्त । तेंचि जाणा केवळ तप ॥ ५ ॥
इंद्रियें ज्या विषयमुक्त । भावी-भूतहीन चित्त ॥ ६ ॥
नसे जन्म-मृत्यु-जरा । पापही न ऐशा नरा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे चित्त । चिंताहीन तेंचि सौख्य ॥ ८ ॥

२२४ ३५-३७

वेद-पुराणज्ञ कोणी । चतुर्वेदी असे कोणी ॥ १ ॥
तीन, दोन, कोणा वेद । ऋचाही न कोणा एक ॥ २ ॥
श्रेष्ठ कोण तयांमाजी । विप्र म्हणावें कोणासी ॥ ३ ॥
मुनि म्हणे रायाप्रति । इदं रूप तें विनाशी ॥ ४ ॥
सर्व वेद्यवेदन, जया । विशुद्ध तें जाण राया ॥ ५ ॥
तोचि वेद राया, एक । अद्वितीय ब्रह्मरूप ॥ ६ ॥
बोध तयाचा न होतां । ऋग्, यजु, हे भेद देखा ॥ ७ ॥
सत्ता, विचार, तें ज्ञान । लाभ, वेदार्थ हा जाण ॥ ८ ॥
सत्य स्वरूप ब्रह्माचें । अवलंबन एखाद्यातें ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे वेद । करूनि देती ब्रह्मबोध ॥ १० ॥

२२५ ३८

सत्य स्वरूप वेदाचें । जाणसी कीं राया सांगें ॥ १ ॥
ज्ञानें तद्रूपता येई । संकल्पानें सिद्धि पाहीं ॥ २ ॥
व्यर्थ संकल्प तयाचे । जया आत्मज्ञान नसे ॥ ३ ॥
वेदज्ञान नसतां पाहीं । कर्म विस्तारे त्या ठाई ॥ ४ ॥
अनात्मज्ञासी संसार । तापद तो भयंकर ॥ ५ ॥
रागद्वेषादिक दोष । मगर स्पर्शिती नरास ॥ ६ ॥
तेणें होतसे मोहित । करी असत्य संकल्प ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे हेय । साधनीं तो रंगूनि जाय ॥ ८ ॥

१ जें जाणण्यासारखें आहे त्या सर्वांचें ज्ञान

२२६ ३९-४२

केवळ पठण जयासी । तया वाचाळ बोलती ॥ १ ॥
सत्यब्रह्मज्ञानीं रत । तोचि मानीं मुख्य विप्र ॥ २ ॥
ब्रह्मप्रमाण ते वेद । कर्में नाहीं ब्रह्म सिद्ध ॥ ३ ॥
एकमेव ब्रह्म जनीं । वेदार्थ हा कथिती मुनि ॥ ४ ॥
सर्व कर्मपर्यवसान । मोक्ष स्वरूपाचें ज्ञान ॥ ५ ॥
वाङ्मनसातीत बोध । कैसा करितील वेद ॥ ६ ॥
वेद्य प्रपंचाचें ज्ञान । वेदज्ञानेंचि तूं जाण ॥ ७ ॥
राया, वेदवेदज्ञाहि । ब्रह्मबोध नसे पाहीं ॥ ८ ॥
प्रपंचाचें केवळ ज्ञान । आत्ममार्गीं तें अज्ञान ॥ ९ ॥
वेदमार्गें वेदवेत्ते । स्वयें अनुभविती ब्रह्मातें ॥ १० ॥
वासुदेव म्हणे बोधा मार्ग, दाविताती वेद ॥ ११ ॥

२२७ ४३-५०

शाखाचंद्रन्यायें वेद करी बोध । जाणे जो सन्मार्ग तोचि विप्र ॥
वेदप्रतिपाद्यमार्गें ब्रह्मज्ञान । म्हणूनि वेदज्ञ तोचि विप्र ॥ २ ॥
आत्मविरोधक देहेंद्रियां, तोष-। देती, त्या विषयांस चिंतूं नये ॥३॥
जीवब्रह्मैक्याचा वेदप्रतिपाद्य । अर्थ होई सिद्ध स्वानुभवें ॥ ४ ॥
केवळ ध्यानें वा अरण्यवासानें । मौन न, ज्ञानानें श्रेष्ठ मौन ॥ ५ ॥
ब्रह्मज्ञानी तोचि श्रेष्ठ मुनि जाणा । वैय्याकरण संज्ञा तयालागीं ॥
सर्वद्रष्टा पाहे सकळही लोक । सर्ववेत्ता देख "सत्यस्थित" ॥७॥
श्रवण चिंतनें ज्ञानमार्गस्थिता । लाभे ब्रह्मावस्था कौरवेंद्रा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ब्रह्मचिंतनानें । सर्वज्ञत्व बाणे साधकासी ॥ ९ ॥

अध्याय ४४ वा २२८ १-३

राजा म्हणे मुनिराया । वंदितों मी तुझ्या पायां ॥ १ ॥
कथीं दुर्लभ तें ज्ञान । मुनि कथी त्या साधन ॥ २ ॥
त्वरमाणासी न लाभे । लाभे ब्रह्मचर्यमार्गें ॥ ३ ॥
बुद्धिमाजी मन लीन । होतां करावें चिंतन ॥ ४ ॥
आद्य ऐसी सत्यविद्या । लाभे होतां गुरुकृपा ॥ ५ ॥

कैसें ब्रह्मचर्य, राव । पुशी, म्हणे वासुदेव ॥ ६ ॥

२२९ ४-९

शिष्यत्वें आचार्यां जाती जे शरण । व्रत स्वीकारून ब्रह्मचर्य ॥१॥
शास्त्रकार इह लोकींच ते होती । लाभ त्या देहान्तीं मोक्षश्रीचा ॥
जिंकूनि कामासी नित्य ब्राह्मीस्थितिः। निश्चलचित्तेंसी अभ्यासिती
मुंजादिषीकेंव देहींच या राया । आत्मबोध तयां धैर्यें घडे ॥ ४ ॥
माता, पिता देती देह मानवासी । गुरु जन्म देती तोचि सत्य ॥५॥
ब्रह्मज्ञान अर्पी तयासी कृतज्ञ । सर्वदा वंदन करी प्रेमें ॥ ६ ॥
देवांसम गुरु मानूनि सर्वदा । संपादावी विद्या नम्रभावें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ब्रह्मचर्यव्रत । ऐसा एक पाद, पुढती ऐका ॥ ८ ॥

२३० १०-१२

गुरुपुत्र, गुरूपत्नी । गुरूसम त्यां सन्मानी ॥ १ ॥
पाद द्वितीय हा जाण । आतां तृतीय कथीन ॥ २ ॥
आचार्यांचा उपकार । तैंवी वेदवचनाधार ॥ ३ ॥
नित्य आणूनि हें ध्यानीं । ज्ञानदृष्टि आठवूनि ॥ ४ ॥
अन्तरांत प्रसन्नता । राहे तैंवी कृतार्थता ॥ ५ ॥
ऐसे कथिले तीन पाद । वासुदेवासी आनंद ॥ ६ ॥

२३१ १३

प्राण धनही अर्पूनि । तोषवावें गुरुलागूनि ॥ १ ॥
कायावाचामनोभावें । सद्गुरूसी तोषवावें ॥ २ ॥
राया, पाद हा चतुर्थ । ऐसें ब्रह्मचर्यव्रत ॥ ३ ॥
एक पाद गुरूकृपा । काल पचवी द्वितीय पादा ॥ ४ ॥
उत्साहेंचि तृतीय पाद । शास्त्रें कळे तुर्यपाद ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसी । ज्ञानियाची पूर्ण स्थिति ॥ ६ ॥

२३२ १४-१९

द्वादशगुण तें मानवस्वरूप ॥ सत्य ध्यानादिक अंगें त्याचीं ॥ १ ॥
व्रतपरिपालन, बळ हें सकळ । गुरूकृपाबळ धृतराष्ट्रा ॥ २ ॥
रब्रह्मयोगें सफळ ब्रह्मचर्य । देवांसी देवत्व ब्रह्मचर्यें ॥ ३ ॥

ऋषि, गंधर्वहि अप्सरा सकळ । सूर्यही तेजाळ ब्रह्मचर्यें ॥ ४ ॥
ब्रह्मचर्यव्रत चिंतामणीसम । इष्ट वस्तु जाण अर्पीतसे ॥ ५ ॥
कर्मनिष्ठांलागीं नश्वराची प्राप्ति । ज्ञानें आत्मस्थिति लाभतसे ॥
धृतराष्ट्र म्हणे कैसें ब्रह्मरूप । शुक्ल, नील, पीत, सांगा मज ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे मुनि सांगे राया । शुक्लादिक तया रूप नसे ॥ ८ ॥ २०-२४

२३३

नाहीं नाहीं याचें रूप । तेज वसुधा जळांत ॥ १ ॥
चंद्र-सूर्य त्या देवता । लाभती न याच्या रूपा ॥ २ ॥
वेदादिकांमाजी नसे । व्रती विप्रांमाजी दिसे ॥ ३ ॥
गिरिराजाह्नि थोर । सूक्ष्माचें तें सूक्ष्म सार ॥ ४ ॥
अज्ञानाचा पार असे । रूप अपार जयाचें ॥ ५ ॥
जयामाजी विश्व लीन । संस्थित ही जेथ जाण ॥ ६ ॥
जगत्तद्रूपेंचि भासे । मोक्ष ऐसा ज्ञानियातें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ज्ञान । अमृतत्त्वाचें साधन ॥ ८ ॥

२३४

अध्याय ४५ वा

निरोधूनि चित्तवृत्ति । योगि त्वंपद जाणिती ॥ १ ॥
पुढती वेदान्तचिंतनें । तेंचि ब्रह्म अवलोकणें ॥ २ ॥
ब्रह्मविद्या ते प्रथम । अन्या, पालटितां क्रम ॥ ३ ॥
फल-साधनेंही त्यांचीं । एकचि हें दावितातीं ॥ ४ ॥
यास्तवचि कथिती हेय । तेंवी स्तविती उपादेय ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐका । स्थिर करूनियां चित्ता ॥ ६ ॥ १-४

२३५

शोकक्रोधादि ते पूर्वोक्त द्वादश[1] । प्राण विघातक दोष राया ॥ १ ॥
दोष हे मानवां नाडिती एकेक । संसर्गें विवेक नष्ट यांच्या ॥ २ ॥
पापकर्में तेणें आचरी मानव । स्पृहा ते निर्दय करी नरा ॥ ३ ॥
दाताहि कठोर भाषणी स्पृहेनें । क्रोधयुक्त मनें आत्मश्लाघा ॥ ४ ॥
धर्मपट्क[2] ऐसें जाणा नृसंसाचें । सप्त नृसंस ते कथिले पूर्वी ॥ ५ ॥

१ अध्याय ४३ श्लो. १८ पद्य. २ दुष्ट.

वासुदेव म्हणे अनुभवें बोध। जाणूनि कृतार्थ होती ज्ञाते ॥ ६ ॥

२३६ ५-७

धर्म, सत्य, तप, दम, अमात्सर्य, । अनसूया, धैर्य, तितिक्षा, ऱ्ही ॥
दान, श्रुत, क्षमा, व्रतें हीं द्वादश । विप्रासी कृतार्थ करिती लोकीं ॥
कदाहि या व्रतां न त्यागी जो विप्र । गुरु तो सकळ अवनीवरी ॥
एकास्तवही तो अर्पितो सर्वस्व । व्रतें ज्या द्वादश न्यून न त्या ॥
दम, त्याग, अप्रमाद तें अमृत । आदरिती मुख्य ब्रह्म जयां ॥ ५ ॥
सत्य मिथ्याही ते गातां विप्रदोष । जाणा नरकवास मानवासी ॥
वासुदेव म्हणे संभाव्य सद्गुण। आदरूनि स्थान रक्षावें तें ॥ ७ ॥

२३७ ८-११

अष्टादश दोष कथिले मदाचे । सूचित दमाचे तेंचि एका ॥ १ ॥
जननिंद्य कर्म, सत्कर्मांत विघ्न । असत्य भाषण, अभ्यसूया ॥ २ ॥
काम, क्रोध, पारतंत्र्य, तैंवी निंदा । पैशुन, वित्ताचा नाश जाणा ॥
वैर तैं मात्सर्य, अतिवाद, ईर्षा । मोद, प्राणिपीडा, संज्ञानाश ॥४ ॥
नित्य परद्रोह, ऐसे अष्टादश । मदोद्भव दोष त्याज्य सदा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे संकटींहि कदा। नावलंबीं मदा तोचि ज्ञाता ॥ ६ ॥

२३८ १२-१३

सुहृदाचे आतां ऐकावे षड्गुण । हर्षें हर्ष, खिन्न दुःखें होई ॥ १ ॥
अयाच्यहि तेणें याचितां अर्पावें । पुढती न वसावें सदनीं त्याच्या।
उपकारबुद्धि न धरावी कदा । तरीच स्नेहाचा भंग टळे ॥ ३ ॥
कष्टार्जित धनें असावें संतुष्ट । अतां ऐका अंत्य सुहृद्गुण ॥ ४ ॥
स्वहिताचा नाश मित्रहितास्तव । कथी वासुदेव मुनिची वाणी ॥

२३९ १४-१८

द्रव्यवंत ऐशा सद्गुणें सात्विक-। होऊनि, निवृत्त विषयां करी ॥१॥
इंद्रियें जयाचीं विषयनिवृत्त । केवळ तें तप सर्वोत्कृष्ट ॥ २ ॥
धैर्यच्युतिही ते होतां दिव्यभोग । नेऊनियां ऊर्ध्व अर्पीतसे ॥ ३ ॥
सत्यनिश्चयानें सत्यसंकल्पत्व । संकल्पेंचि सिद्ध यज्ञ त्यांचे ॥ ४ ॥

---

१ अध्याय ४३ श्लो. २१ ते २३ मधें पहा.

मंत्रोच्चाररूपी वाणीनेंचि अन्य । सि [illegible] होती यज्ञ, इतर कर्मे ॥ ५ ॥
सगुण चिंतनें जे सिद्धसंकल्प । लाभे त्यां संकल्पशून्य ब्रह्म ॥६॥
योगशास्त्र ऐसें शिष्यांसी कथावें । इतर जाणावें ज्ञान व्यर्थ ॥७॥
वासुदेव म्हणे सत्य संकल्पाचें । मर्म हेंचि साचें ध्यानीं घ्यावें ॥८॥

२४० १९-२१

योगीचि जगाचा आधार हें [illegible]ान । तोचि मुक्त जाण नृपश्रेष्ठा ॥१॥
केवळ पुण्यानें नसे ब्रह्मप्राप्ति । होम-हवनादि निष्फल ते ॥ २ ॥
एकांतीं बैसूनि देहेंद्रियें मन । सुस्थिर करून ध्यान करा ॥ ३ ॥
ब्रह्मोपासना ते ब्रह्माचें चिंतन । हर्ष क्रोधहीन होऊनियां ॥ ४ ॥
राया, याचि मार्गें जीवन्मुक्तिलाभ । उपाधीचा भंग घडतां मु[illegible]
वासुदेव म्हणे ब्रह्मरूप स्थिति । योगबळें ऐसी संपादावी ॥ ६ ॥

अध्याय ४६ वा २४१ १-४

शुद्धज्योतिरूप नामें महद्यश । भजती ज्या देव सकल देव ॥ १ ॥
सूर्य प्रकाशतो जयाच्या तेजानें । सनातनध्यानें, योग्यां गम्य ॥२॥
हिरण्यगर्भाचो उत्पत्ति तें जाण । प्रकाशक अन्य तया नसे ॥ ३ ॥
पूर्णामाजी पूर्ण घालितांहि पूर्ण । काढितांहि पूर्ण पूर्णांतूनि ॥ ४ ॥
पूर्णस्वरूप तो सनातन ईश । आकळे योग्यांस ध्यानयोगें ॥ ५ ॥
आकाशीं अवकाश, गंगेंत तरंग । स्थित, लीन जग तेंवी ब्रह्मीं॥६॥
तन्मात्रांपासूनि स्थूल पंचभूतें । जीव, शिव, दोघे वसती तेथें ॥७॥
उभयरूप तो देव सनातन । वासुदेव ध्यान करी त्याचें ॥ ८ ॥

२४२ ५-९

क्रिया अक्षय जयाची । त्रैलोक्य हा देह ज्यासी ॥ १ ॥
त्याचि रथीं अजरामर । प्रज्ञावंत असे जीव ॥ २ ॥
सारथी ते शुद्धबुद्धि । हांकी इंद्रियअश्वांसी ॥ ३ ॥
तेणें योगियांसी ज्ञान । इतरां नव्हे कदा जाण ॥ ४ ॥
एकमेव निरुपम । स्थूल दृष्टीसी न ज्ञान ॥ ५ ॥
शुद्धचित्त महायोगी । जाणूनियां अमर जगीं ॥ ६ ॥

गमनशील द्वादश पूग[1] । विषयीं रमतां दुःखभोग ॥ ७ ॥
वासुदेव मधुपासम । सेवी पूर्वार्जित अन्न ॥ ८ ॥

२४३ १०-१२

विप्रदेह हाचि सोन्याचा पिंपळ । एथ विषयमळ भक्षिती जे ॥१॥
जनन-मरण न चुके तयांसी । ज्ञानपंख त्यांसी फुटतां मुक्ति ॥ २ ॥
अपानासी प्राण, चंद्रमा प्राणातें । आदित्य चंद्रातें, आत्मा सूर्या-॥
गिळितांचि, योगी पावे आत्मरूप । जीवभाव हंस न त्यागीचि ॥ ४ ॥
जीवभावाविण संभवे न मोक्ष । खेळचि समस्त आटोपेल ॥ ५ ॥
लिंगदेहयोगें अंगुष्ठप्रमाण । संचरे, योगज्ञ जाणी तया ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे योगाचा महिमा । न कळेचि कोणा भाग्यहीना ॥७॥

२४४ १३-१६

दंश करूनियां सर्प । जैसे लपताती गुहेंत ॥ १ ॥
तैसी इंद्रियें स्वस्थानीं । लपती मोहित करूनि ॥ २ ॥
विषय-विषग्रस्त जन । होती संसारांत मग्न ॥ ३ ॥
ऐसे संसार कूपांत । मग्न तेचि जनीं भ्रष्ट ॥ ४ ॥
प्रत्यक्ष ते गर्दभचि । योग्यासीच ईशप्राप्ति ॥ ५ ॥
असाधक कीं साधक । आत्मरूपें अवघे एक ॥ ६ ॥
समानचि बद्ध-मुक्त । परी मुक्तासी आनंद ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे योग । आनंदाचा केवळ मार्ग ॥ ८ ॥

२४५ १७-२४

ज्ञानियासी होई उभय लोकप्राप्ति । परमपद अंतीं तेही लाभे ॥ १ ॥
अकृतहि कृत होती यज्ञयाग । ब्रह्मानंद भोग लाभो तुज ॥ २ ॥
कार्यकारण तें लीन जया ठाई । तया ज्ञानें होई अमरत्व ॥ ३ ॥
सत्कारिती जन सर्वदा तयासी । अमरता कैसी मृत्युवीण ॥ ४ ॥
सत्यानृता एक अधिष्ठान पाहीं । ऐसा बोध होई योगियासी ॥ ५ ॥
अंगुष्ठमात्र जो हृदयनिवासी । चिंती शाश्वतासी तोचि धन्य ॥ ६ ॥

[1] पंचकर्मेंद्रियें, पंचज्ञानेंद्रियें, मन, व बुद्धि हे द्वादश

उत्पत्ति स्थिति तो लयहि त्यामाजी । कारण विश्वासी एक तेंचि ॥
वासुदेव म्हणे अखिल भुवन । निर्मूनि धारण करी ब्रह्म ॥ ८ ॥

२४६ २५-२८

कोट्यवधि पंख करूनि धारण । करितां उड्डाण मनोवेगें ॥ १ ॥
अंतपार परी न लागे ब्रह्माचा । ठेवा योगियांचा ऐसा असे ॥ २ ॥
दृष्टिगोचर तें रूप न तयाचें । शुद्ध चित्त त्यातें अवलोकिती ॥ ३ ॥
रागद्वेषहीन बुद्धिबळें स्वस्थ । अवलोकी तयास महायोगी ॥ ४ ॥
अनात्मनि आत्मबुद्धि ते त्यजोनि । ज्ञाता होई जनीं शोकमुक्त ॥५॥
गंगास्नान होतां कूपाचें स्मरण । कासयासी कर्म तेंवी ज्ञात्या ॥६॥
वासुदेव म्हणे पावन तें ज्ञान । कैसें योगाविण प्राप्त होई ॥ ७ ॥

२४७ २९-३२

मुनि म्हणे राया, माता, पिता, पुत्र । तुम्हांसी सर्वत्र मीचि असें ॥
अस्ति, नास्ति सर्व मीचि जाण राया । कोणिही न किंवा कोणामाजी
आत्मा मम स्थान, जन्म-मृत्यु तोचि । ओतप्रोत जगीं मीचि एक ॥
अधिष्ठान माझें जरा-मृत्युहीन । नाहीं मज जन्म-मरण कांहीं ॥ ४ ॥
सर्वदा मी दक्ष करितां संचार । कृतकृत्य साचार होई ज्ञाता ॥ ५ ॥
सूक्ष्माहूनि सूक्ष्म निर्मल मानस । सर्वभूतस्थित मीचि असें ॥ ६ ॥
पिता सकळांचा हृदयकमळीं । नित्य वास करी म्हणती ज्ञाते ॥७॥
वासुदेव म्हणे पर्व हें सामप्त । वंदूं ब्रह्मसुत आत्यादरें ॥ ८ ॥

---

## यानसंधिपर्व ५

अध्याय ४७ वा २४८

बोलतां बोलतां दिशा प्रकाशल्या । आपुलाल्या स्थळा सकळ जाती
राजसभेमाजीं सकल नृपाळ । जाहले एकत्र उत्कंठेनें ॥ २ ॥
संजय कथील पांडववचन । सकलही जन इच्छिती हें ॥ ३ ॥
शुभ्रवर्णसभा, सुवर्णअंगण । शोभे चंद्रासम सभा तेणें ॥ ४ ॥
चंदनाचा सडा सर्वत्र शिंपिला । आसनें त्या स्थळा बहुविध ॥५॥
काष्ठ-स्वर्णमय, वाहु हस्तिदंती । रत्नें झळकती मनोहर ॥ ६ ॥

सुस्थित रचना। गालिचे ज्यावरी। ऐशा स्थानावरी वसले वीर ॥
भीष्म, द्रोण, कृप, शल्य, कृतवर्मा। विदुर, अश्वत्थामा युयुत्सूही
धृतराष्ट्र प्रमुख सकलहि राजे। दुर्योधन शोभे सपरिवार ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे सिंहगुहेसम। शोभलें तें स्थान नृपाळांनीं ॥१०॥

२४९

द्वारपाळ म्हणे सूतपुत्र येई। प्रवेशे त्या ठाईं संजय तें ॥ १ ॥
कौरवांसी म्हणे संजय, तो धर्म। वृद्धांसी वंदन करीतसे ॥ २ ॥
अभिवंदियेलें यथानुक्रमानें। बालकांसी प्रेमें आठविलें ॥ ३ ॥
रावकथित सर्व बोललों तयांसी। कथितों तुम्हांसी वृत्तांत तो ॥
वासुदेव म्हणे ऐका तो प्रसंग। कथेलागीं रंग पुढती बहु ॥ ५ ॥

अध्याय ४८ वा

२५०

युद्धप्रणेता अर्जुन। हरितो दुर्जनांचे प्राण ॥ १ ॥
वदला काय तेंचि कथीं। राव बोले संजयासी ॥ २ ॥
धर्म यादवाभिमत। ऐका वदला जें पार्थोक्त ॥ ३ ॥
मंदबुद्धि दुर्योधन। कालप्रेरित तें कर्ण ॥ ४ ॥
युद्धेच्छु ते इतर राजे। सकलां सांग वचन माझें ॥ ५ ॥
संपला न पापभोग। नच अर्पितां स्वराज्य ॥ ६ ॥
जाहलीच कार्यसिद्धि। जरी प्रवर्तील युद्धीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पार्थ। वदतां दिसे रक्तनेत्र ॥ ८ ॥

२५१

युधिष्ठिरालागीं दुःख जें वनांत। लाभो तें रणांत मरतां दुष्टां ॥ १ ॥
तप-धर्मशील युधिष्ठिरावरी। अन्याय हा करी दुर्योधन ॥ २ ॥
आर्जवी, तपस्वी, जरी धर्मराज। कपट तयास नुमगे परी ॥ ३ ॥
दीर्घकाळ क्लेश भोगी तितिक्षेनें। जाळील क्रोधानें परी अंतीं ॥ ४ ॥
महाभयंकर गदाघातें भीम। संहारील सैन्य क्रोधभरें ॥ ५ ॥
सव्यसाची वीर नकुल हा असे। सहदेव भासे यमासम ॥ ६ ॥
द्रौपदीनंदन तैसाचि सौभद्र। अकरावा रुद्र खवळतां ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐसे वीरश्रेष्ठ। लढतां पश्चात्ताप दुर्योधना ॥ ८ ॥

२५२

यादवकुमार प्रभद्रक वीर। विक्रमी साचार सिंहासम ॥ १ ॥
द्रुपद, वि ाट, लढतील जेव्हां। दिपतील तेव्हां कौरवनेत्र ॥ २ ॥
उत्तराचें शौर्य पाहतील दुष्ट। शिखंडी भीष्मास रणीं जिंकी ॥३॥
द्रोणगुरूवरी येतां धृष्टद्युम्न। खिन्न दुर्योधन होईल तैं ॥ ४ ॥
अग्रणी जयाचा कृष्ण भगवान्। धर्मासी त्या कोण अडवील ॥५॥
यास्तव संजया, कथीं दुर्योधना। विजयकामना नको धरूं ॥ ६ ॥
युद्धमंत्री आम्हां सात्यकि लाभला। किंतु न राहिला तेणें आम्हां॥
वासुदेव म्हणे वारंवार पार्थ। म्हणे पश्चात्ताप कौरवांसी॥ ८ ॥

२५३

गांडीवाचा टणत्कार। कांपवील थर थर ॥ १ ॥
छिन्न पाहूनियां शिरें। आठवेल कृत्य सारें ॥ २ ॥
क ळासम माझी गति। हरिल दुर्योधनमति ॥ ३ ॥
संहारितां सकळ सैन्य। होईल दुर्योधन दीन ॥ ४ ॥
स्वधर्मांचा उदय व्हावा। यास्तव वधीन कौरवां ॥ ५ ॥
संध्यावंदनसमयीं। विप्र कोणी म्हणे पाहीं ॥ ६ ॥
इच्छिसी तूं इंद्रसाह्य। अथवा रक्षो वासुदेव ॥ ७ ॥
ऐकूनि ती पुण्यवाणी। वर घेतला मागूनि ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण-। कृपा, मागे तैं अर्जुन ॥ ९ ॥

२५४

इच्छामात्रें करी संहार विश्वाचा। संरक्षील साचा संकल्पेंचि ॥१॥
जिंकील त्या कृष्णा कोण या जगांत। बोलूनि इतिहास कथिला पार्थें
सुदर्शनमुक्ति, पांड्यराजनाश। कालिंग निःपात केला जेणें ॥ ३ ॥
गगनसंचारी भौमासुरवध। नरकासुरोन्माद हरण केला ॥ ४ ॥
अघ-मुर दैत्यां संहारिलें जेणें। संपादिले तेणें वर बहु ॥ ५ ॥
पांडव-यादवां वैर व्हावें ऐसी। दुर्योधन युक्ति विफल जाणें ॥ ६ ॥
बंधु गुरु तेही वैऱ्या साह्य होतां। संहार तयांचा करीन मी ॥७
वासुदेव म्हणे प्रतिज्ञा पार्थांची। कौरववधाची कथिली सूतें॥ ८॥

२५५

कपटद्यूतेंही जिंकितां राजास । आम्हीं वनवास भोगियेला ॥ १ ॥
ऐसें असोनियां राज्य नच देती । पापें हीं भोगिती कोठें दुष्ट? ॥२॥
सत्कर्म नराचें जरी व्यर्थ होई । व्यर्थ तरी जाई प्रतिज्ञा हे ॥ ३ ॥
यास्तव कथावें कौरवसभेंत । करितां ते युद्ध नाश त्यांचा ॥ ४ ॥
कर्णासह सर्व संपूनि जातील । तोंवरी विषय भोगा सुखें ॥ ५ ॥
ज्ञाते विप्र, धर्म, स्वयें मी संजया । जाणितों निर्णया योगबळें ॥६॥
वासुदेव म्हणे होणारें पुढती । सुज्ञ तें जाणती विद्याबळें ॥ ७ ॥

२५६

गांडीवासी करितां स्पर्श । सहज होतसे ज्याघोष ॥ १ ॥
भात्यांतूनि तीक्ष्ण शर । स्वयें येताती बाहेर ॥ २ ॥
उसळे खड्ग कोशांतूनि । स्फूर्तिशब्द गगनांतूनि ॥ ३ ॥
' कदा जोडिसी स्यंदन '। ऐसें ऐकितों वचन ॥ ४ ॥
रात्रौ भालू ओरडती । क्रूर पक्षी मागें येती ॥ ५ ॥
ऐसें असोनियां साम । व्हावा हेचि इच्छा, जाण ॥ ६ ॥
अंतीं सांगतों मी एक । भीष्म, द्रोण तेंवी कृप ॥ ७ ॥
ज्ञाता विदुर, अश्वत्थामा । कथिती तें मान्य आम्हां ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे नम्र । विजयी, पूज्य जयां थोर ॥ ९ ॥

अध्याय ४९ वा

२५७

दुर्योधनालागीं शांतनव भीष्म । ऐकूनि भाषण कथिती स्पष्ट ॥१॥
कृष्णार्जुन वीर नरनारायण । इंद्रही वंदन करी तयां ॥ २ ॥
वरद, ते झाले पूर्वी देवां साह्य । वधिला कालखंज पौलोमहि ॥३॥
निवातकवच वधिले पार्थानें । तेंवी केशवानें वधिले दैत्य ॥ ४ ॥
एकाचि असोनि भिन्नरूपें ल्याले । नारद हें बोले मजलागीं ॥ ५ ॥
रणीं एका रथीं दिसतील जेव्हां । कळेल हें तेव्हां दुर्योधना ॥ ६ ॥
शापदग्धकर्ण, शकुनि-दुःशासन-। दुष्ट, हें जाणून वागें राया ॥ ७॥
ऐकसी न तरी निश्चयें विनाश । कथीं भीष्मवच वासुदेव ॥ ८ ॥

२५८

कर्ण म्हणे पितामहा । मज निंदितां कासया ॥ १ ॥
केला काय मी अधर्म । अथवा कौरव नाशकर्म ॥ २ ॥
भीष्मावीण मी एकाकी । संरक्षीन कौरवांसी ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे कर्ण । क्रोधें बोलला वचन ॥ ४ ॥

२५९

भीष्म म्हणे राया, पांडवां वधीन । बहुवार कर्ण वदला ऐसें ॥ १ ॥
परी त्या वीरांचें बल षोडशांश । नसेचि कर्णास महाराजा ॥ २ ॥
सर्व हा अनर्थ कर्णामुळें पाहीं । दुर्योधन देई मूर्खा थारा ॥ ३ ॥
अलौकिक कर्मे बहु पांडवांचीं । कथावें आम्हांसी एक कर्णें ॥ ४ ॥
वस्त्रें जैं हरिलीं विराटपुरींत । नव्हता कीं तेथ कर्ण सांगा ॥ ५ ॥
दुर्योधनाप्रति गंधर्वें बांधितां । कोठें गेला होता कर्ण तेव्हां ॥ ६ ॥
पोळासम व्यर्थ करी हा गर्जना । फोल त्या वल्गना ठरती याच्या ॥
वासुदेव म्हणे भीष्माचें वचन । ऐकूनियां द्रोण वदती ऐका ॥ ८ ॥

२६०

भरतश्रेष्ठा, पितामह । वदती तें सत्य जाण ॥ १ ॥
मिथ्यावादी कर्णादिक । केवळ इष्टार्थ लोलुप ॥ २ ॥
सख्य करावें वीरांसी । ऐसी स्पष्ट माझी मति ॥ ३ ॥
सत्यप्रतिज्ञ अर्जुन । वीर जगीं न त्यासम ॥ ४ ॥
दुर्लक्षूनि भीष्म-द्रोणां । राव बोलला वचना ॥ ५ ॥
कथीं संजया वृत्तांत । आम्हांलागीं तो समस्त ॥ ६ ॥
ऐसा पाहूनि अविवेक । सभा जाहली निराश ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐसी । नाशकाळ येतां मति ॥ ८ ॥

अध्याय ५० वा

२६१

धृतराष्ट्र म्हणे सूता । साह्य कोण पंडुसुतां ॥ १ ॥
काय योजना तयांची । कोण निवारी तयांसी ॥ २ ॥
म्हणे संजय, पांचाळ । केकय, मत्स्यही, सकळ ॥ ३ ॥
साह्य ब्राह्मणादि जाणा । हर्षे वीरां वधती कन्या ॥ ४ ॥

सूतालागीं धृतराष्ट्र । म्हणे कोण त्यां आधार ॥ ५ ॥
ऐकूनियां प्रश्न ऐसा । संजयासी येई मूर्छा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे क्षत्ता । वदला खेद बहु सूता ॥ ७ ॥

२६२

धृतराष्ट्र म्हणे सज्ज पांडवांसी । सूतें निश्चयेंसी अवलोकिलें ॥१॥
इतुक्यांत होई सावध संजय । आश्वासूनि काय वदला ऐका ॥२॥
पाहिलें मी वीरां राया धृतराष्ट्रा । देह कृश त्यांचा वनवासें ॥३॥
धृष्टद्युम्न, धर्म, भीम, सव्यसाची । माद्रिपुत्र होतीं सज्ज रणा ॥ ४ ॥
काशिराज कन्या भीष्माच्या कोपानें । शिखंडीरूपानें जन्म घेई ॥५॥
कैकेय, विराट, अभिमन्यु वीर । मुख्य यादवेंद्र कृष्णसाह्य ॥ ६ ॥
चेदिसुत, तेंवी जरासंधपुत्र । ससैन्य द्रुपद, साह्य झाला ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे नृपाळ बहुत । कथूनियां सूत स्वस्थ होई ॥ ८ ॥

अध्याय ५१ ते ५३ वा २६३

धृतराष्ट्र म्हणे महाबळी भीम । कौरवांचे प्राण हरिल सत्य ॥१॥
अष्टकोनी गदा घेऊनि करांत । येतां तो रणांत सकळां भय ॥२॥
पार्थालागीं रणीं जिंकी ऐसा कोण । हेंचि रात्रंदिन चिंतितों मी ॥३॥
पांचाळ, केकय, मत्स्य, मागधहि । कोण पुढें होई सात्यकीच्या ॥४॥
संकल्पेंचि विश्व जिंकील तो कृष्ण । साह्य, तेणें धर्म विजयी सत्य॥५॥
कौरवहो नसे युद्ध श्रेयस्कर । कुळाचा संहार युद्धें होई ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे साम जरी मान्य । राव म्हणे यत्न करूं आम्हीं ॥७॥

अध्याय ५४ वा २६४

म्हणे संजय नृपाळा । दिसे विनाश आम्हांला ॥ १ ॥
करिसी भाषण सामाचें । स्थैर्य त्यांत कांहीं नसे ॥ २ ॥
वडिलार्जित राज्यवृद्धि । केली पांडवांनीं साची ॥ ३ ॥
तेंचि वनामाजी जातां । हर्ष मानिलासी नृपा ॥ ४ ॥
पार्थ सिंधु आटवील । तुच्छ तया मानवबल ॥ ५ ॥
वीरांमाजी श्रेष्ठ पार्थ । चापांमाजी गांडिव श्रेष्ठ ॥ ६ ॥

आयुधांत सुदर्शन । जगामाजी श्रेष्ठ कृष्ण ॥ ७ ॥
ध्वजांमाजी कपिध्वज । ऐसी सामग्री जयांस ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे सूत । बोले राया, शोक व्यर्थ ॥ ९ ॥

अध्याय ५५ वा २६५

दुर्योधन म्हणे ताता, शोक भय । त्यागोनि निर्भय राहें सदा ॥ १ ॥
प्रथमदर्शनीं मजही वाटलें । आयुष्य संपलें कौरवांचें ॥ २ ॥
परी विचारान्तीं जाहला निश्चय । नसे आम्हां भय कदाकाळीं ॥३॥
भीष्मद्रोणांसम जनीं वीर कोण । 'कर्णा तूं मत्सम' वदला राम ॥४॥
गदा युद्धामाजी पुत्र तुझा ताता । एकमेव योद्धा म्हणती सर्व ॥ ५ ॥
मजपुढें भीम बापुडा तूं मानीं । जाणती हें मनीं धर्मादिक ॥ ६ ॥
पंचग्रामांवरी तुष्ट ते, यास्तव । ताता, नको भय तुजलागीं ॥ ७ ॥
धृष्टद्युम्न वीर सात्यकी पांडव । हेचि सप्त, नांव अन्य घेई ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे सैन्याची न्यूनता । दावूनियां पिता तोषविला ॥ ९ ॥

अध्याय ५६ वा २६६

दुर्योधनप्रश्नें कथितो संजय । हर्षित पांडव युद्धोत्सुक ॥ १ ॥
आपुल्या बलाची घ्यावया परीक्षा । जोडूनियां रथा दावी पार्थ ॥२॥
पाहूनियां घालों सभोंवार तेज । विजय सहज म्हणे पार्थ ॥ ३ ॥
दुर्योधन म्हणे द्यूतपराभूतां । प्रशंसिसी सूता, वर्णी अश्व ॥ ४ ॥
सूत म्हणे रथीं स्थापियेलीं इंद्रें । रूपें तीं विचित्रें अलौकिक ॥ ५ ॥
वायुतनय तो शोभे ध्वजावरी । नभांत फांकली ध्वजकांति ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे प्रतिबंध कोठें । नसेचि रथातें ध्वजासह ॥ ७ ॥

२६७

चित्ररथार्पित शत । अश्व जोडितां रथास ॥ १ ॥
अकुंठित त्याची गति । भूमि स्वर्ग अंतरिक्षीं ॥ २ ॥
वधितां श्वेत अश्वसख्या । कदा न पावे न्यूनता ॥ ३ ॥
शुभ्र हस्तिदंतासम । भीमाचेहि अश्व जाण ॥ ४ ॥
तित्तिरपक्षासम पृष्ठीं । अश्व सहदेवाचे रथीं ॥ ५ ॥

इंद्रदत्तअश्व पार्थें । प्रेमें अर्पिले नकुळातें ॥ ६ ॥
सौभद्रेयादींच्या रथां । चित्ररथ अर्पी अश्वां ॥ ७
वासुदेव म्हणे सूत । कथी दुर्योधना वृत्त ॥ ८ ॥

अध्याय ५७ वा २६८

धृतराष्ट्र म्हणे प्रेमें पांडवांसी । पातले साह्यासी कोण सांगें ॥ १ ॥
सूत म्हणे राया, अंधक, वृष्णीक । तैसाचि अच्युत पाहिला मी ॥
चेकितान, तैंवी सात्यकी, पांचाळ । अक्षौहिणी दल प्रत्येकासी ॥
सत्यजित तैसा वीर धृष्टद्युम्न । मागध, चेदि, जाण धृष्टकेतु ॥ ४ ॥
द्रुपद, विराट, केकयहि, आले । अक्षौहिणी झालें सैन्य सप्त ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे नांवें हीं वीरांचीं । कार्येंहि तयांचीं कथीतसे ॥ ६ ॥

२६९

शांतनव भाग म्हणती शिखंडीचा । मद्रपति साचा धर्मभाग ॥ १ ॥
शतभ्रात्यांसवें जाण दुर्योधन । प्राच्य ते दाक्षिण राजे भीमा ॥ २ ॥
कर्ण, अश्वत्थामा, विकर्ण, सैन्धव । जयद्रथादिक अर्जुनाचे ॥ ३ ॥
कौरवपुत्र तैं बृहद्बल राजा । भाग अभिमन्यूचा योजियेला ४॥
नकुळ-सहदेव-भागाहि योजिले । वृत्त निवेदिलें संजयानें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐकूनि धृतराष्ट्र । म्हणे सर्व नाश कौरवांचा ॥ ६ ॥

२७०

दुर्योधन म्हणे ताता । करिसी ऐसी कां निराशा ॥ १ ॥
आम्हीं एकाचि ज्ञातीचे । विजय एकासी हें कैसें ॥ २ ॥
भीष्म, द्रोण, कृप, कर्ण । अजिंक्य या जनीं जाण ॥ ३ ॥
यांचा विक्रम पाहूनि । कोण धजे अवेक्षणीं ॥ ४ ॥
धृतराष्ट्र म्हणे सूता । काय कथावें या मूढा ॥ ५ ॥
म्हणे संजय महाराजा । ऐकें धृष्टद्युम्नवाचा ॥ ६ ॥
भिऊं नको रे युद्धासी । एकटा मी वधिन त्यांसी ॥ ७ ॥
प्रशंसूनि युधिष्टिर । वदला मज 'जा-सत्वर ॥ ८ ॥
सांगे मागावया क्षमा '। हर्ष वासुदेव मना ॥ ९ ॥

अध्याय ५८ वा

२७१

राव म्हणे दुर्योधना । पूर्ण जाणितों मी धर्मा ॥ १ ॥
ब्रह्मचारी तो संयमी । शमचि तूं योग्य मानीं ॥ २ ॥
व्याधिग्रस्त तुझी सेना । कंडुपीडा ते अश्वांना ॥ ३ ॥
पराजयाचें लक्षण । तुज दिसेनाचि जाण ॥ ४ ॥
वीर भीष्म-द्रोणादिक । समर इच्छिती न देख ॥ ५ ॥
बाळा, तुझी न हे इच्छा । हट्ट शकुनी-कर्णाचा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे राजा । उपदेश करी ऐसा ॥ ७ ॥

२७२

दुर्योधन म्हणे भीष्म-द्रोणावरी । विश्वास अंतरीं नसे माझा ॥ १ ॥
रणयज्ञदीक्षा कर्णासवें माझी । मानितों धर्मासी यज्ञपशु ॥ २ ॥
कर्ण, दुःशासन, मुख्य हे आधार । करीन संहार पांडवांचा ॥ ३ ॥
प्रतिज्ञा हे माझी ऐक ऐक ताता । वध पांडवांचा करीन मी ॥ ४ ॥
अथवा ते माझा करूनियां वध । भोगितील राज्य आनंदानें ॥ ५ ॥
सूक्ष्म सूच्याग्रही व्यापील जियेसी । भूमी पांडवांसी लाभेना ते ॥
वासुदेव म्हणे दुर्योधनवाक्य । ऐकूनि धृतराष्ट्र खेद पावे ॥ ७ ॥

२७३

धृतराष्ट्र म्हणे दुर्योधन आशा । नसे मज आतां, वांचा तुम्हीं ॥१॥
पांडव हे जाणा मृगांमाजी व्याघ्र । वधितील वीर निवडोनि ॥२॥
छिन्नभिन्न सेना हे कोणी ललना । सात्यकी तो जाणा छळिल तिज
भयाकुल सेना करील जें भीम । तदा हें वचन आठवेल ॥ ४ ॥
दुर्योधना, करीं विचार अंतरीं । भीम महाबळी वधिल तुम्हां ॥५॥
वासुदेव म्हणे दुर्योधना, शम । करील कल्याण राव सांगे ॥ ६ ॥

अध्याय ५९ वा

२७४

राव म्हणे संजयासी । कृष्णार्जुनवचन कथीं ॥ १ ॥
म्हणे संजय नृपाळा । पाहिलें त्यां गुप्तस्थळा ॥ २ ॥
कृपेनेंचि झाली भेट । प्रेमें वंदिलें तयांस ॥ ३ ॥

प्राशियेली होती माध्वी । समीप त्या दोघी साध्वी ॥ ४ ॥
कृष्णचरण कोमल । होते पार्थअंकावर ॥ ५ ॥
पुशितां संदेश अर्जुन- । वदे, सांगेल श्रीकृष्ण ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण । ऐका वदला जें भाषण ॥ ७ ॥

२७५

कृष्ण म्हणे भीष्म-द्रोणांच्या समक्ष । कथावा संदेश नृपालागीं ॥
प्रथम श्रेष्ठांसी नमन कथावें । कुशलहि व्हावें विदित तयां ॥ २ ॥
कथावें पुढती करा यज्ञयाग । सपरिवार भोग उपभोगावे ॥ ३ ॥
विघ्न तुम्हांवरी येत असे मोठें । सैन्य पांडवांचें चाल करी ॥४॥
वस्त्रहरणकाळीं मारिली जी हांक । अद्यापि ऋणांत असें मी त्या ॥
कौरवांचा होतां समूळ उच्छेद । होईन तैं मुक्त अन्यथा न ॥ ६ ॥
विक्रमी पार्थासी असतां मी साह्य । कोण देव आर्य जिंकी तया ७॥
पळविलें सर्वां विराटपुरींत । तोचि गुणवंत एक जगीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे श्रीकृष्णसांवळा । साह्य जया झाला भाग्य त्याचें ॥

अध्याय ६० वा

२७६

सूतवचनें नृपाळ । झाला बहु चिंताकुल ॥ १ ॥
पूर्ण विचार करूनि । पुत्रालागीं बोले वाणी ॥ २ ॥
म्हणे बाळा दुर्योधना । नित्य चिंता माझ्या मना ॥ ३ ॥
दैव-मानुषबलानें । सुसंपन्न पांडव जाणें ॥ ४ ॥
साह्य तयां यमादिक । अग्नि खांडववनें तृप्त ॥ ५ ॥
अलौकिक शरसंधान । अजिंक्यचि पार्थ जाण ॥ ६ ॥
बाळा, पांडव बलाढ्य । शमाचि या समयीं श्रेष्ठ ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे राजा । पुत्रा बोध करी ऐसा ॥ ८ ॥

अध्याय ६१ वा

२७७

क्रोधाकुलचित्तें पित्यासी वचन । बोले दुर्योधन तेंचि ऐका ॥ १ ॥
देवादिक साह्य होतील पांडवां । भ्रम हा जाणावा ताता तुझा २ ॥

१ द्रौपदी व सत्यभामा

काम द्वेष-लोभ-द्रोहराहित्यानें । देवत्व तें जाणें देवांलागीं ॥ ३ ॥
ऐसें असोनियां आसक्त ते होतां । येई विफलता देवत्वासी ॥ ४ ॥
देवांहूनि श्रेष्ठ मंत्रबळ माझें । प्रदीप्त अग्नीतें शमवीन ॥ ५ ॥
सांवरीन धरा होतां ही विदीर्ण । घोरही शमवीन अश्मवृष्टि ॥ ६ ॥
स्तंभित उदकीं चालवीन रथ । अंतरीं विस्मित वासुदेव ॥ ७ ॥

२७८

अकुंठित गति माझ्या स्यंदनाची । व्याघ्र सर्पभीति नसे जनां ॥१॥
मंत्रबळें माझ्या श्वापदें जनांसी । कदा न पीडिती, कालवृष्टि ॥ २ ॥
व्याधिहिन देश धर्मनिष्ठ प्रजा । कैवारी शत्रूंचा नाहीं कोणी ॥ ३ ॥
शुभाशुभ इच्छा पूर्ण होई माझी । सत्यत्व वाणीसी कीर्ति ऐसी ॥
देवसाह्य तरी कष्ट कां भोगिते । ताता शांतचित्तें चिंतीं मनीं ॥५॥
आत्मश्लाघा नव्हे सांगतों हें सत्य । ताता विश्वासार्थ येई ध्यानीं ॥
द्रोणादिकांसम जाणतों मी अस्त्रें । राव संजयातें प्रश्न करी ॥ ७ ॥
कौरव विनाशें युयुत्सूसी राज्य । लाभे कीं, वीरांस अनुरक्त तो ॥
वासुदेव म्हणे पांडवांचें बल । विचारी नृपाळ संजयातें ॥ ९ ॥

अध्याय ६२ वा

२७९

उद्धत राधेय बोले दुर्योधना । दुर्लक्षूनि जाणा नृपाळासी ॥ १ ॥
ब्रह्मास्त्र भार्गवा फसवूनि जोडिलें । तयानें शापिलें मजलागीं ॥२॥
अंतकाळीं अस्त्रविस्मृति होईल । तोंवरी संपेल पार्थ रणीं ॥ ३ ॥
असो मजवरी भार विजयाचा । भीष्म म्हणे वाचा वदसी व्यर्थ ॥४॥
वैकर्तना, करीं आत्मसंरक्षणा । व्यर्थ या वल्गना करूं नको ॥ ५ ॥
वासवी ते शक्ति व्यर्थचि जाईल । श्रीकृष्ण हरील बल तुझें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐकूनि हें कर्ण । बोलला वचन ऐका काय ॥ ७ ॥

२८०

कर्ण म्हणे कृष्ण असो बलशाली । परी मी त्यागिलीं शस्त्रें आज ॥१॥
तेंवी सभेमाजी नच मी येईन । जोंवरी हा भीष्म भूमीवरी ॥ २ ॥
इहलोक भीष्म सोडील हा जेव्हां । विजयी मी तेव्हां सत्य जाण ॥
बोलूनियां ऐसें त्यागी सभास्थान । हांसूनियां भीष्म वदती ऐका ॥४॥

शिरावरी भार घेऊनि युद्धाचा । शस्त्रत्याग कैसा करी पहा ॥ ५ ॥
परावृत्त कैसा होतसे भयानें । शापिलें रामानें तेंचि भ्रष्ट ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे दुर्योधन भीष्मा । बोलला वचना तेंचि ऐका ॥ ७ ॥

अध्याय ६३ वा २८१

पितामहा काय न्यून । आम्हां धर्मादिकांहून ॥ १ ॥
मनुज तयांसम आम्हीं । ज्ञातिकुलसम मानीं ॥ २ ॥
वय, अध्ययन सम । युद्धकला, शरसंधान ॥ ३ ॥
ऐसें असूनियां कैसें । कळलें तेचि विजयी ऐसें ॥ ४ ॥
असो तुम्हांवरी माझा । मुळांतचि न भरंवसा ॥ ५ ॥
कर्ण· दुःशासनाधारें । जिंकीन मी पांडव सारे ॥ ६ ॥
नौका कर्णधाराविण । जाळ्यामाजी मृग जाण ॥ ७ ॥
तैसा पांडवांचा नाश । करूनि तोषवूं विप्रांस ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे दुष्ट । वधीन म्हणे कृष्णसर्प ॥ ९ ॥

२८२

अविचारी वाणी ऐकूनि विदुर । कुळाचा संहार म्हणे येणें ॥ १ ॥
दमें घडे दान, तपें अध्ययन । अध्ययनें ध्यान, साध्य होई ॥ २ ॥
व्याघ्रादिकांसम अदान्ताचें भय । यास्तव क्षत्रिय निर्मियेले ॥ ३ ॥
पुराप्रभृति त्यां धर्ममार्ग रुचे । संतोष तयांतें न्याय्यलाभें ॥ ४ ॥
नभामाजी खग जातां पादचिन्हें । न दिसती तें जाणें प्रज्ञातृप्त ॥ ५ ॥
वर्णाश्रमधर्में वागूनियां नित्य । तेजोमय शांत अंतीं होई ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अग्निष्टोमादिक । धरूनि अभिलाष नकरी ज्ञाता ॥ ७ ॥

अध्याय ६४ वा २८३

वृद्धमुखें आम्हीं आख्यायिका एक । ऐकियेली ऐक धृतराष्ट्रा ॥ १ ॥
जाळ्यासह पक्षी उडतां एक व्याध । करी पाठलाग पक्ष्यांचा त्या ॥
पाहूनियां मुनि म्हणती एक तया । व्याधा, हे कासया घेसी श्रम ॥ ३ ॥
व्याध म्हणे होतां कलह दोघांत । पक्षी दोन्ही प्राप्त मज होती ॥ ४ ॥
तावरी मी त्यांचा करितों पाठलाग । कलह सहज यांचा होई ॥ ५ ॥

इतुक्यांत पक्षी करिती विवाद । पडतां तयां व्याध सुखें धरी ॥ ६ ।
वासुदेव म्हणे विदुर नृपासी । कथा ह पूर्वीची कथन करी ॥ ७ ॥

२८४

ज्ञाति बांधवांनीं नांदावें सुखानें । परस्पर प्रेमें हितास्तव ॥ १ ॥
सहवास, गोष्ठी, कुशल ते प्रश्न । पान तैं भोजन एका ठाईं ॥ २ ॥
प्रसन्न मनानें व्हावी वृद्ध सेवा । ऐसा ध्यानीं घ्यावा ज्ञातिधर्म ॥३॥
एकत्रचि काष्ठें ज्वलन पावती । सामर्थ्याची वृद्धि ऐक्यें तैसी ॥४॥
पाहूनियां मधु पर्वतशिखरीं । धांवतां अविचारी पडे खालीं ॥ ५ ॥
विजय तो गोड परी विजयासी । गांठ रणामाजी ध्यानीं असो ॥६॥
जिंकिलें सकलां एकाचि रथानें । शम विवेकानें आचरावा ॥ ७ ।
वासुदेव म्हणे नाश उभयांचा । क्षत्ता म्हणे नृपा दुःखदचि ॥ ८ ॥

अध्याय ६५ वा

२८५

धृतराष्ट्र म्हणे वत्सा । कुमार्ग तो म्हणसी पंथा ॥ १ ॥
जनां पंचभूतांसम । अखिलाधार पांडव जाण ॥ २ ॥
मेरु गिरींत वरिष्ट । तैसा पार्थ वीरश्रेष्ठ ॥ ३ ॥
भीम धृष्टद्युम्नादिक । वीर एकेक अजिंक्य ॥ ४ ॥
कमलनयन श्रीकृष्ण । पार्थ त्याचा प्रियप्राण ॥ ५ ॥
ऐक सुहृदांचा बोध । कथिती कल्याणाचा मार्ग ॥ ६ ॥
ऐक एवढें वचन । भीष्म-द्रोण उभयां सम ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे राव । बोले तोपोत पांडव ॥ ८ ॥

अध्याय ६६ वा

२८६

संजयासी राव म्हणे धनंजय । वदला तैं काय, कथीं मज ॥ १ ॥
सूत म्हणे पार्थ, कुशल कथोनि । वदला ते वाणी ऐकें नृपा ॥ २ ॥
रणयज्ञामाजी रथचक्रनाद । शरांचा संघर्ष धूम्रकारी ॥ ३ ॥
चाप स्रुवा, अस्त्रबल विस्तारील । ऐसें न घडेल करा तेंचि ॥ ४ ॥

---

१ अर्जुनाशीं

अर्धराज्य न्याय्यप्राप्त तें धर्मासी । न देतां यमाची वाट दावूं ॥५॥
वासुदेव म्हणे, संदेश पार्थाचा । कथियेला साचा संजयानें ॥ ६॥

अध्याय ६७ वा • २८७

दुर्योधन अविचारी । संजयासी अनादरी ॥ १ ॥
पाहूनियां भीष्मादिक । त्यजिती राजसभा देख ॥ २ ॥
हळु हळु सकळ राजे । जाती मोडूनि सभेतें ॥ ३ ॥
तदा संजया एकांतीं । प्रश्न करितो नृपती ॥ ४ ॥
कृष्णार्जुनांचें सामर्थ्य । मज कथावें तें स्पष्ट ॥ ५ ॥
सूत म्हणे पत्नी-पिता । येतां कथिन मम मता ॥ ६ ॥
तुज न वाटो असूया । हाचि मनीं हेतु राया ॥ ७ ॥
व्यास गांधारी तत्काळ । शोभाविती सभास्थळ ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे व्यास । कथीं म्हणती संजयास ॥ ९ ॥

अध्याय ६८ वा २८८

धृतराष्ट्राप्रति बोलला संजय । अर्जुन माधव, पूज्य दोघे ॥ १ ॥
पूर्वार्जितकर्में जन्म न तयांचा । लोकानुग्रहाचा हेतु मनीं ॥ २ ॥
चक्र श्रीहरीचें अदृश्यचि राही । अतर्क्यचि पाहीं बल तयां ॥ ३ ॥
लीलामात्रें दुष्ट जिंकिले हरीनें । संकल्पें भुवनें वश तया ॥ ४ ॥
जग-जनार्दन तुळितां जगाचें । बल तुच्छ असे हरीपुढें ॥ ५ ॥
सत्य, धर्म, लज्जा आर्जव ज्या ठाई । तेथें नित्य राही जनार्दन ॥६॥
जनार्दन तेथें जय हा सिद्धांत । धरावा ध्यानांत नृपश्रेष्ठा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कालरूपें हरी । दुष्टांसी संहारी इच्छामात्रें ॥ ८ ॥

२८९

लीलामात्रें पुरुषोत्तम । सूत्रचालक तो जाण ॥ १ ॥
इच्छी संहार दुष्टांचा । नाश करी कौरवांचा ॥ २ ॥
पुरा धर्म चतुष्पाद । त्रेतायुगीं तो त्रिपाद ॥ ३ ॥
द्विपाद तो द्वापरांत । कलीमाजी एक पाद ॥ ४ ॥
काल संपवितो वय । मृत्यु विनाशील देह ॥ ५ ॥
करी नियमन त्यांचें । संयमन तें जगाचें ॥ ६ ॥

शरण जातील जे तया । कदा न बाधे त्यां माया ।। ७ ।।
वासुदेव म्हणे कृष्ण । कारणाचेंही कारण ।। ८ ।।

अध्याय ६१ वा

२१०

राव बोलला संजया । कैसें जाणिसी माधवा ।। १ ।।
काय ज्ञानाचें साधन । प्रतिबंधक ते कोण ।। २ ।।
म्हणे संजय महाराज । वाक्यजन्य बोध मज ।। ३ ।।
सुटतां निर्विषय स्थान । नसे केशवाचें ज्ञान ।। ४ ।।
तोचि कारण विश्वाचें । लय सकलांचा तेथें ।। ५ ।।
जेथ देहत्रयारोप । ज्ञाते म्हणती त्या त्रियुग ।। ६ ।।
वासुदेव म्हणे ज्ञान । हरिकृपेचें साधन ।। ७ ।।

२११

धृतराष्ट्र म्हणे गावल्गणपुत्रा । कैशी निराकारा चिंतिसी तूं ।। १ ।।
पृथग्रूपें किंवा साक्षिरूपें ध्यान । करिसी तें कथन करीं मज ।।२।।
सूत म्हणे राया, अविद्या त्यागून । करितों सर्वार्पण गोविंदासी ।।३।।
कामक्रोधहीन निष्काम मनानें । ध्यानें, तत्वज्ञानें, जाणितों त्या ।।४।।
धृतराष्ट्र म्हणे दुर्योधना, ताता, । हितार्थ गोविंदा शरण जाई ।।५।।
दुर्योधन म्हणे पार्थ अनासक्त । ताता मी आसक्त विषयांमाजी ।।६।।
आसुरवृत्ति हे माझी स्वाभाविक । केशवाचा बोध कैसा होई ।।७।।
वासुदेव म्हणे गांधारीसी राव । बोले हें दुर्दैव पहा कैसें ।। ८ ।।

२१२

माता म्हणे दुर्योधना । करिसी वृद्धांची अवज्ञा ।। १ ।।
हांव सुटली ऐश्वर्याची । दुष्टनाश परी अंतीं ।। २ ।।
रायालागीं द्वैपायन । म्हणती कृष्ण परब्रह्म ।। ३ ।।
करिती जे त्याचा द्वेष । कदापि न तयां सौख्य ।। ४ ।।
जन्म-मरण तयांसी । अभय कदाही न त्यांसी ।। ५ ।।
अंधामागूनि ते अंध । उद्धारक ज्ञानमार्ग ।। ६ ।।
विषय दोषांचें दर्शन । निष्कामता तें साधन ।। ७ ।।

तैसी जाणावी अहिंसा । निग्रहही इंद्रियांचा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे, व्यास । कथितो मार्ग हा रायास ॥ ९ ॥

अध्याय ७० वा

२९३

राव म्हणे सांगे संजया मजसी । यथार्थ कृष्णाचीं पुण्यनामें ॥ १ ॥
सूत म्हणे राया, वाचातीत कृष्ण । शक्य तें कथीन तुजलागीं ॥२॥
आच्छादी विश्वासी आधार भुवना । आश्रय देवांना ‘ वासुदेव ’ ॥
व्यापकत्वें ‘विष्णु,’ योग,मौन,ध्यानें ।‘माधव’या नामें विख्यात तो ॥
‘ मधुसूदन ’ तो मधुदैत्यवधें । सर्वतत्त्वयोगें ‘ मधुहा ’ नाम ॥ ५ ॥
कृषि तेचि सत्ता णकार आनंद । ‘ कृष्ण ’ तो आनंद-सत्तारूप ॥६॥
वासुदेव म्हणे हृदयांत वास । तेणें ‘पुंडरीकाक्ष’ म्हणती ज्ञाते ॥७॥

२९४

करी दस्यूंचें मर्दन । तोचि जाणा ‘ जनार्दन ॥ १ ॥
सत्वरूपें तो ‘ सात्वत ’। वेदें प्रकाशे ‘ आर्षभ ’॥ २ ॥
धर्मबोधक तो जाण । म्हणती तेणें ‘ वृषभेक्षण ॥ ३ ॥
सर्वजनक, जन्महीन । म्हणूनि ‘ अज ’ तया नाम ॥ ४ ॥
प्रकाशे जो इंद्रियांत । म्हणूनि म्हणती ‘ अनीकजित ’ ॥ ५ ॥
दमें, प्रकृष्ट प्रकाशें । ‘ दामोदर ’ म्हणती त्यातें ॥ ६ ॥
हर्ष, ऐश्वर्य, तें सुख । अर्पी तेणें ‘ हृषीकेश ’ ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे बाहु । विश्वाधारें ‘ महाबाहु ’ ॥ ८ ॥

२९५

अधोभागीं वास कदा न जयास । म्हणती ‘अधोक्षज’ तया देवा॥१॥
आयतन सर्वां तोचि ‘नारायण’ । जाणा ‘पुरुषोत्तम’ सकल श्रेष्ठ॥२॥
सर्वकाल सर्व ज्ञानें तो ‘ सर्वज्ञ’ । सत्यत्वेंचि कृष्ण ‘सत्य’ असे ॥३॥
विक्रमें तो ‘विष्णु,’ ‘जिष्णु’ विजयरूपें । शाश्वतस्वरूपें अनंत तो ॥४॥
इंद्रियें प्रकाशी म्हणोनि ‘गोविंद’ । असत्य तें सत्य भासवी तो ॥५॥
धर्म तेथें वास सर्वदा तयाचा । करावया कृपा येईल एथें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे संजय रायासी । कृष्णागमनाची वार्ता कथी ॥ ७ ॥

अध्याय ७१ वा

२१६

वासुदेव चित्स्वरूप । पाहती ते भाग्यवंत ॥ १ ॥
सभेमाजी तो येऊन । कथिल धर्माचें वचन ॥ २ ॥
होई कल्याण ऐकतां । अत्यादरें ज्याची वाचा ॥ ३ ॥
करी सकलांचा संहार । अच्युत तो भुवनाधार ॥ ४ ॥
शीर्षे सहस्र तयासी । आदिअंत नस ज्यासी ॥ ५ ॥
करी त्रैलोक्य रचना । फलदाता तोचि जनां ॥ ६ ॥
कीर्ति अनंत जयाची । सदा शरण मी त्यासी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे राजा । वंदी तया इंद्रानुजा[1] ॥ ८ ॥

---

## भगवद्यानपर्व ६

अध्याय ७२ वा

२१७

संजय तो जातां हस्तिनापुरासी । प्रेमें श्रीकृष्णासी धर्म म्हणे ॥१॥
मित्रवत्सला, तूं साह्य हो आम्हांसी । त्राता पांडवांसी तूंचि एक ॥
तुझ्याचि विश्वासें जिंकूं दुर्योधना । धरिली कामना ऐसी मनीं ॥
कृष्ण म्हणे धर्मा, सांगसील तें तें । करीन आनंदें स्नेहभावें ॥ ४ ॥
धर्म म्हणे कृष्णा इच्छिती कौरव । काय, तें संजयवचनें कळे ॥५॥
धृतराष्ट्रआज्ञा पाळियेली आम्हीं । जाणती हें जनीं सर्व ज्ञाते ॥६॥
लोभवश राजा आचरी अधर्म । पुत्राच्या आधीन होऊनियां ॥७॥
विदुर-कुंतीचें भरणसामर्थ्य । नसे आम्हां दुःख अन्य काय ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पंचग्रामें तुष्ट । धर्म, परी दुष्ट न करी मान्य ॥ ९ ॥

२१८

कुलवंत राव इच्छितां परवित्त । लोभें बुद्धिनाश म्हणती ज्ञाते ॥
तेणें लज्जा जातां धर्म नष्ट होई । अधर्मे न राही वैभव तें ॥ २ ॥
वैभवविहीन नर होई नष्ट । दारिद्र्यचि वध मानवाचा ॥ ३ ॥
दारिद्र्यासमान दुःख नसे जनीं । धर्म धनाहूनि अन्य नसे ॥ ४ ॥

---

१ अध्योक्षजा

बलात्कारें धन हरितां पराचें । धर्मादिक त्याचें हृत सर्व ॥ ५ ॥
ग्राम त्यागूनियां जातसे निर्धन । स्वीकारितो वन कोणी दुःखें ॥६॥
संन्यस्ताचि कोणी होतो अथवा वेडे । परवश, बापुडे दास, कोणी ॥
वासुदेव म्हणे दारिद्र्यसंतप्त । सुखें मृत्युपंथ वरिती कोणी ॥ ८ ॥

२९९

मरणाहूनि कष्टतर । मज वाटतें दारिद्र्य ॥ १ ॥
मरण अपरिहार्य एक । दारिद्र्यांत मरण नित्य ॥ २ ॥
वित्तवंत वित्तहीन । होतां अधिक क्लेश जाण ॥ ३ ॥
स्वयें करूनियां पाप । देवांप्रति लावी दोष ॥ ४ ॥
अध्ययन धनहीनाचें । संकटीं न तें कामाचें ॥ ५ ॥
अंतीं येऊनियां क्रोध । क्रूरकर्मी होई सिद्ध ॥ ६ ॥
तेणें होई पापबुद्धि । पा । नरकाची प्राप्ति ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे नर । सावध जो तोचि थोर ॥ ८ ॥

३००

धर्म म्हणे कृष्णा, अविद्या, विवेकें । निवारिती ज्ञाते प्रज्ञाबळें ॥ १ ॥
शास्त्रान्वेषण तो करी प्रज्ञावंत । होई तेणें बोध स्वधर्माचा ॥ २ ॥
अकार्याची लज्जा वाटे धर्मज्ञातें । लज्जाहीनधर्मे अधर्मचि ॥ ३ ॥
लज्जाहीन नर पशूचि जाणावा । धर्माचा न तया अधिकार ॥ ४ ॥
अकार्यी ज्या लज्जा नर तो भाग्याचा । देव पितरांचा संरक्षक ॥५॥
कृष्णा, याचि गुणें पांडव संयमी । न्यायास्तव आम्हीं अर्पू प्राण ॥
परी आम्हां शम वाटे सर्वश्रेष्ठ । पापमय वध स्वज्ञातीचा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे युद्ध तें कनिष्ठ । धर्म कथी स्पष्ट श्रीकृष्णातें ॥ ८ ॥

३०१

हिंसामयधर्म पापरूप दिसे । स्वधर्मचि असे शास्त्रोक्त तो ॥ १ ॥
मत्स्य मत्स्याप्रति भक्षी तैसे आम्हीं । क्षत्रियां वधूनि नांदतसों ॥
श्वानमांस जैसी भक्षीतसे श्वान । तैसाचि हा धर्म भासे मज ॥३॥
नीतिमार्गें कृष्णा, युद्ध मी करीन । जीवन-मरण दैवाधीन ॥ ४ ॥
एकाकीचि कोणी वधितो अनेकां । एकाचि अनेकां वध्य कदा ॥५॥

इष्टजनांघातें विजय तो व्यर्थ । पराजय स्पष्ट मरण वाटे ॥ ६ ॥
पुत्र सुहृदादि बांधव ते नष्ट । होतां काय सौख्य विजयाचें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐसा युद्धधर्म । वाटे मज हीन सर्वकाळ ॥ ८ ॥

३०२

नष्ट होती वीर, धीर, युद्धामाजी । क्षुद्र ते वांचती भ्याड, हीन ॥१॥
निःशेष न होई वैरी तो कदापि । दावी पुनरपि समर्थी बळ ॥ २ ॥
पराभवें दुःख, विजयानें वैर । उदासीन धीर तोचि सुखी ॥ ३ ॥
वैरभावें नसे सुखनिद्रा कोणा । कारितां निर्मूलना निंदा जनीं ॥४॥
वंशजांचें तेणें वाढतसे वैर । वैरें वाढे वैर ऐशारीति ॥ ५ ॥
विनाश एकाचा, होतां लाभे शांति । वदे युद्धरीति वासुदेव ॥६॥

३०३

छिद्रान्वेषणाचें सर्वकाल भय । व्यथित हृदय तेणें नित्य ॥ १ ॥
त्यागितां मनानें, अथवा मरणें । वैरशांति, जाणें यादवेंद्रा ॥ २ ॥
निर्मूलनें दुःख, राज्यत्यागें शंका । शमचि सुखाचा मार्ग असे ॥३॥
अशक्यचि शम होतां करूं युद्ध । अथवा दुर्बलत्व माथीं येई ॥४॥
श्वान–मानवांत भेद न सर्वथा । खाई दंत–ओष्ठा क्रोधावेशें ॥ ५ ॥
झुंजतां हे दोष, अन्यथा दौर्बल्य । पूज्यचि नृपाळ आम्हांलागीं ॥६॥
परी अनावर पुत्रमोह तया । बोधितां माधवा झिडकारील ॥७॥
धर्म म्हणे देवा, सन्मार्ग कथावा । वंदितो यादवा वासुदेव ॥ ८ ॥

३०४

कृष्ण म्हणे धर्माप्रति । जातों सामार्थ सभेसी ॥ १ ॥
होवो उभयांचें कल्याण । हाचि एक हेतु जाण ॥ २ ॥
धर्म म्हणे तें अशक्य । सुयोधन असे मूर्ख ॥ ३ ॥
तुझ्या अपमानें कृष्णा । देवत्वाहि नको आम्हां ॥ ४ ॥
कृष्ण म्हणे राया, यत्न । तेणें आपुले संपूर्ण ॥ ५ ॥
ज्ञाते दोष न देतील । तैसा शमाचा संभव ॥ ६ ॥
करितां माझा अपमान । क्षणार्धेंचि करिन भस्म ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे हरी । बळ तेंचि चराचरीं ॥ ८ ॥

३०५

इष्ट वाटे तरी कृष्णा । जाईं कौरवसदना ॥ १ ॥
कुशल, कृतार्थ न जसी । पाहीन हे इच्छा माझी ॥ २ ॥
बंधु, सखा तूंचि आम्हां । संशय न लवही मना ॥ ३ ॥
जाणसी तूं उभयांस । कुशलपणें वदसी हित ॥ ४ ॥
कौरवांसी समजावूनि । अर्धराज्य घे मागूनि ॥ ५ ॥
अंतीं घेऊं पंचग्राम । केवळ साधावया शम ॥ ६ ॥
अथवा सिद्ध असों द्यूता । जाणतों मी अक्षविद्या ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे धर्म । विनवी कृष्णा, करीं शम ॥ ८ ॥

अध्याय ७३ वा

३०६

धर्मराजाप्रति कृष्ण म्हणे मनीं । उभयांसी जाणोनि कथितों एक ॥
याचना ते कदा योग्य न क्षत्रियां । समरीं लढूनियां मरण श्रेष्ठ ॥२॥
परस्पर स्नेह, सैन्य, मित्रलाभ । अनावर लोभ, कौरवांसी ॥ ३ ॥
भीष्म-द्रोणबळें, मानिती स्वबळ । नम्रभावें खळ वश नोहे ॥ ४ ॥
धर्म, दयाभाव, नसे त्या मूढांसी । दुष्कर्में तयांचीं असती बहु ॥५॥
क्रूर, निर्दय तो वदला तुम्हासी । " बल, वीर्य यांसी नसे कांहीं ॥
नाम, गोत्र, शौर्य, होईल तें नष्ट । वर्षत्रयोदश क्रमितां वनीं " ॥७॥
वासुदेव म्हणे श्रीकृष्ण धर्मासी । कौरवांची बुद्धि ऐसी सांगे ॥८॥

३०७

ओढूनि सभेंत नेलें कृष्णेप्रति । उपहास किती केला तिचा ॥ १ ॥
सर्वभोग्य अर्थें ' गौ ' शब्दउच्चार । केला वारंवार दुःशासनें ॥२॥
तुझ्या प्रतिबंधें बंधु बलवंत । राहियेले स्वस्थ तयावेळीं ॥ ३ ॥
सांप्रत सर्वत्र निंदिती तयांसी । वधचि निंद्यांसी हितकारी ॥ ४ ॥
जनीं निंद्य तोचि मृत ऐसें मानीं । छिन्नमूळ वनीं वृक्ष जैसा ॥५॥
वध्य दुर्योधन सर्पासम जनां । न शिवेची मना शंका कांहीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कौरवांचा नाश । सुलभ धर्मास कृष्ण सांगे ॥ ७ ॥

३०८

वंदिसी तें योग्य वडिल जनांसी । क्षमा दुर्जनांसी न करीं धर्मा ॥१॥

द्विधाचित्तजनां दावीन मी स्पष्ट। दुर्योधन दुष्ट खळ ऐसें ॥ २ ॥
पांडवांचे गुण, दोष कौरवांचे। दावीन जनांतें निश्चयार्थ ॥ ३ ॥
शमयाचना हा दोष न तुम्हांसी। वृत्ति कौरवांची स्पष्ट तेणें ॥४॥
लोकनिंदाघातें मृतप्राय होतां। कौरवांच्या नाशा वेळ काय ॥ ५ ॥
यास्तव जाऊनि सर्व अवलोकन। करूनि येईन भाव त्यांचा ॥६॥
वासुदेव म्हणे भक्तकाजासाठीं। प्रेमें जगजेठी यत्न करी ॥ ७ ॥

३०९

पशु करिती भीषण शब्द। घोर दिसती अश्व गज ॥ १ ॥
ऐसीं दुश्चिन्हें सुचविती। वेळ मानवनाशाची ॥ २ ॥
व्हावें सावध वीरांनीं। सज्ज व्हावें शस्त्रास्त्रांनीं ३ ॥
यंत्रें, कवचें, रथ, गज। अश्वादिकीं व्हावें सज्ज ॥ ४ ॥
धर्मा, सिद्ध हो युद्धासी। मिळवीं न्याय्य वैभवासी ॥ ५ ॥
कपटें हरिलें जें राज्य। कैसें अर्पिती सहज ॥ ६ ॥
युद्धावीण न उपाय। असतां जिवंत कौरव ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे धर्म। ऐके कृष्णाचें वचन ॥ ८ ॥

अध्याय ७४ वा

३१०

भीम म्हणे कृष्णा, सुखें होई शम। ऐसोंचि भाषण करीं यत्नें ॥ १ ॥
मानी, असहिष्णु, दुर्योधन पापी जाणोनि तयासी बोध करीं ॥ २ ॥
दीर्घद्वेषी, क्रूर, सत्तामदें धुंद। तृणाच्छन्न सर्प दुर्योधन ॥ ३ ॥
क्रोधाग्नि तयाचा जाळील समस्तां। गतकाळीं सौख्या भोगियेलें ॥
कलिप्रादुर्भावें विनाशसमई। दुरात्माचि येई जन्म कुळीं ॥ ५ ॥
हैहय, चीनादि स्थानें अष्टादश। पावलीं विनाश याचि मार्गें ॥ ६ ॥
युगान्तसमयीं जन्मला अधम। सोसूं अपमान कुळास्तव ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे शमास्तव भीम। उत्सुक पाहून वदला कृष्ण ॥ ८ ॥

अध्याय ७५ वा

३११

भीमालागीं म्हणे कृष्ण। गिरि कार्पासासमान ॥ १ ॥
अथवा शीतल तो अग्नि। तैसी भासे तुझी वाणी ॥ २ ॥

मार्गप्रतीक्षा युद्धाची । रात्रंदिन तूं करिसी ॥ ३ ॥
नित्य तुझा निद्राभंग । परितप्त असे अंग ॥ ४ ॥
श्वास सोडिसी एकांतीं । उत्तमांग जानूमाजी ॥ ५ ॥
क्रोधें चढवूनि भ्रुकुटी । दांत-ओंठ चावितोसी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण । देई भीमातें स्मरण ॥ ७ ॥

३१२

गदाघातें दुष्ट वधाची प्रतिज्ञा । विसरसी भीमा, कैसी तरी ॥ १ ॥
प्रसंगीं वीरांसी येतसे संशय । ऐसाचि प्रत्यय येई आजी ॥ २ ॥
भ्याडा, क्लीबासम अल्पहि विक्रम । करावया मन न धजे काय ॥
मोहव्याप्त भीमा, भयाकुल चित्तें । इच्छिसी शमातें आश्चर्य हें ॥४॥
धेनूनें वदावी मानवाची वाणी । तैसी हे करणी नवलकारी ॥ ५ ॥
अचल चळावा, ढळावा कीं ध्रुव । तैसें हें आश्चर्य मज वाटे ॥ ६ ॥
जन्म, कर्म, कुल, आठवोनि भीमा । करोनि विक्रमा यश जोडीं॥७॥
स्वयें संपादूनि वीर उपभोगिती । रुचते ही उक्ति वासुदेवा ॥ ८ ॥

अध्याय ७६ वा ३१३

जातिवंत अश्वासम । उसळूनि बोले भीम ॥ १ ॥
करिसी पूर्ण विपर्यास । कृष्णा, केंवी या समयास ॥ २ ॥
भीमसेनाप्रति कोण । वदे ऐसें तुजविण ॥ ३ ॥
करूं नये आत्मस्तुति । परी कथितों वस्तुस्थिति ॥ ४ ॥
कोसळतांही आकाश । अचल हा भीम देख ॥ ५ ॥
सिंधु, हिमाचल, इंद्र । एक होवोनि साचार ॥ ६ ॥
मम बाहूंतूनि कोणा । सोडवूं न शकती कृष्णा ॥ ७ ॥
समरांगणीं पाहसील । माझें अमर्याद बळ ॥ ८ ॥
नाहीं भय लवभरी । स्नेहें दयाचि अंतरीं ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे भीम । इच्छी कुळाचें रक्षण ॥ १० ॥

अध्याय ७७ वा ३१४

ष्ण म्हणे भीमा पांडित्य कीं क्रोध । दोषदर्शनार्थ वदलों नाहीं ॥१॥

सामर्थ्य मी जाणें तुझें भीमसेना। निंदेच्या कारणा कथितों ऐकें ॥२॥
भविष्यज्ञानाची इच्छा मानवासी। सत्यता सर्वांशीं नसे परी ॥३॥
प्रयत्नहि कदा विफल या जनीं। यत्न, दैव मानीं समबल ॥ ४ ॥
नसतां फलोन्मुख, प्रारब्धही टळे। शीतोष्ण निवळे साधनेंसी ॥५॥
प्रायश्चित्तें किंवा ज्ञानें पूर्वार्जित। टळे हा सिद्धांत ज्ञानीयांचा ॥६॥
कृषीवलासम दैव, यत्न, दोन्हीं। फलद हें ध्यानीं असो तुझ्या ॥७॥
वासुदेव म्हणे अपयश येतां। यास्तवाचि ज्ञाता दुःखी नसे ॥ ८ ॥

३१५

यत्नावीण दैव, दैवावीण यत्न। निष्फळाचि जाण वृकोदरा ॥ १ ॥
यास्तव नरानें उत्साह धरावा। यत्न न सोडावा कदाकाळीं ॥२॥
डिवचिलें तुज याचसाठीं भीमा। स्वीकारितां शमा सकलांसौख्य ॥
रथ तूं, अर्जुन अश्व या युद्धाचे। आधार सैन्याचे तुम्हीं दोघे ॥४॥
पार्थइच्छेस्तव त्यागूनियां रण। सारथ्याचें कर्म करीन मी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे भीमाचें भाषण। शंकेसी कारण मूळ झालें ॥ ६ ॥

अध्याय ७८ वा ३१६

जनार्दनालागीं पार्थ। म्हणे धर्म हेतु स्पष्ट ॥ १ ॥
कौरवांचा लोभ थोर। पांडवांसी क्लेश घोर ॥ २ ॥
ऐशा स्थितीमाजी शम। असंभाव्यचि तो जाण ॥ ३ ॥
समराची नसतां इच्छा। तोचि आम्हां गुरु साचा ॥ ४ ॥
सकल जाणसी तूं कृष्णा। पाळूं, करिसी ते आज्ञा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पार्थ। मानीं शम तो अशक्य ॥ ६ ॥

अध्याय ७९ वा ३१७

कृष्ण म्हणे पार्था, शमार्थ प्रयत्न। सफल हे जाण न होतीचि ॥
प्रतिकूल असे दैव या यत्नासी। कूपोदकें येती बीजें, परी ॥ २ ॥
कूपोदक असे पर्जन्याधीन। म्हणोनि हा यत्न व्यर्थ असे ॥३॥
लोक हितालागीं दैवोद्योग दोन्हीं। साधनें हें ध्यानीं असों द्यावें ॥
पराकाष्ठा माझी करीन मी पार्था। पालट दैवाचा न घडे मज ॥ ५ ॥
यथेष्ट वर्तन करी दुर्योधन। कर्ण, दुःशासन चेतविती ॥ ६ ॥

युद्धावीण राज्य न लाभे पांडवां। मान्य नसे तयां दास्यभाव ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे योगेश्वर कृष्ण। शमास्तव शम नच इच्छी ॥ ८ ॥

३१८

युधिष्ठिराचें वचन। दुष्ट करितील अमान्य ॥ १ ॥
तेणें अवघे जन वध्य। मानितील त्यां सहज ॥ २ ॥
हाचि हेतु अंतरींचा। यत्न याच साठीं माझा ॥ ३ ॥
कळतां सकळ जनांसी। साह्य होतील तुम्हांसी ॥ ४ ॥
विक्रमार्जित तें वैभव। पाहूं न शकती कौरव ॥ ५ ॥
भूमिभार हरण हेतु। पार्था सकळ जाणसी तूं ॥ ६ ॥
नाहीं संभव शमाचा। हेतु जाणसी तूं माझा ॥ ७ ॥
भीष्मादिकांचें वचन। ऐकेनाचि दुर्योधन ॥ ८ ॥
इच्छिलासी त्यांचा वध। तेंचि झाले पराभूत ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण। इच्छी धर्माचें कल्याण ॥ १० ॥

अध्याय ८० वा

३१९

नकुळ म्हणे देवा परस्पर भिन्न। मत सकारण होत असे ॥ १ ॥
कुलरक्षणार्थ वाटे व्हावा शम। दुष्कर्में स्मरून, क्रोध येई ॥ २ ॥
मानवाची मति अस्थिर सर्वदा। योग्य तें गोविंदा आचरावें ॥ ३ ॥
भिन्नबुद्धि देवा, होतों वनवासीं। सांप्रत राज्याची इच्छा आम्हां ॥
कोण पांडवांसी भिडेल रणांत। कृष्णा, कौरवांस समजावीं तूं ॥५॥
योगेश्वर वक्ता श्रोता तो विदुर। सहजचि कार्य सिद्ध होई ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे न ... कृष्णासी। सांगे कौरवांसी हेतु कथीं ॥ ७ ॥

अध्याय ८१ वा

३२०

सहदेव म्हणे कृष्णा। करीं युद्धाची योजना ॥ १ ॥
दुर्योधन वधावीण। न घडे क्रोधाचें शमन ॥ २ ॥
युद्ध नित्य ... धर्म। कथूं नको मजलागून ॥ ३ ॥
अथवा आवडेल शम। सुख वरेत ते धर्म ॥ ४ ॥

तेंचि बोलला सात्यकी । कृष्णाप्रति देई स्मृति ॥ ५ ॥
कृष्णा, कोप अनावर । झाला तुझाहि तें स्मर ॥ ६ ॥
ऐकूनि हे वीरशब्द । सभेमाजी सिंहनाद ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे धन्य । नादें कोंदलें गगन ॥ ८ ॥

अध्याय ८२ वा

३२१

शमयुक्त धर्मवाणी । ऐकूनियां याज्ञसेनी ॥ १ ॥
आमरतकपादकेशा । क्रुद्धा, बोले हृषीकेशा ॥ २ ॥
सत्कारूनि सहदेवासी । गौरविलें सात्यकीसी ॥ ३ ॥
भीम पाहूनियां शांत । होऊनियां खिन्नचित्त ॥ ४ ॥
म्हणे कृष्णा, माझें दुःख । सकल तुजलागीं ज्ञात ॥ ५ ॥
अर्धराज्यलाभाविण । कृष्णा, करूं नको शम ॥ ६ ॥
मूढ शत्रूलागीं दंड । जगीं एकचि हा मार्ग ॥ ७ ॥
नको करू यदुराया । नीच दुष्टांवरी दया ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कृष्णा । दुःखभारें वदे कृष्णा ॥ ९ ॥

३२२

कृष्णा, क्षत्रियानें लोभी संहारावा । परी तो असावा अब्राह्मण ॥ १ ॥
सर्व पापमग्न विप्र न वधावा । सन्मान करावा नित्य त्याचा ॥ २ ॥
अवध्यवधानें दोष जो, वधार्हा- । न वधितां, आर्या तोचि दोष ॥ ३ ॥
सकळ मिळोनि दोष हा टळेल । ऐसेंचि घडेल हेंचि इच्छा ॥ ४ ॥
विश्वासें तुजसी कथितें यादवा । दुःख वासुदेवा होई बहु ॥ ५ ॥

३२३

अगा देवकीनंदना । जन्मलें मी यज्ञस्थाना ॥ १ ॥
बंधु माझा धृष्टद्युम्न । सखा साक्षात् भगवान् ॥ २ ॥
पंडु नृपतींची स्नुषा । वीरपुत्रांची मी माता ॥ ३ ॥
सम्राज्ञी मी पांडवांची । मज ओढिलें सभेसी ॥ ४ ॥
अवघे असतांचि जिवंत । पाहियेला माझा अंत ॥ ५ ॥
क्रोधशून्य पाहूनि पती । देवा चिंतिलें तुजसी ॥ ६ ॥



विपुल, सुगंधयुक्त ते कुंतल । दावोनि व्याकुळशब्दें बोले ॥
विटाळिले केश हेचि त्या दुष्टानें । कृष्णा, या स्मरणें शम घडो ॥
—उद्योगपर्व अ. ८२, अभंग ३२४

धृतराष्ट्रें देऊनि वर । वनवासी केले वीर ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कृष्णा । याचितसे संरक्षणा ॥ ८ ॥

३२४

अक्षम्य जयांचे अपराध ऐसे । जिवंत ते कैसे अद्यावधि ॥ १ ॥
धनुर्धारित्व तें व्यर्थ गदाबळ । सर्वदा धिक्कार असो तयां ॥ २ ॥
कृपापात्र जरी द्रौपदी कृष्णास । घडो सर्वनाश कौरवांचा ॥ ३ ॥
ऐसें बोलूनियां जाऊनि समीप । ते केशकलाप दावी कृष्णा ॥ ४ ॥
विपुल, सुगंधयुक्त ते कुंतल । दावोनि व्याकुळ शब्दें बोले ॥ ५ ॥
विटाळिले केश हेचि त्या दुष्टानें । कृष्णा, या स्मरणें शम घडो ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे बोलूनियां ऐसें । अश्रु निजहस्तें पुशीतसे ॥ ७ ॥

३२५

दीनभावें भीमार्जुन । इच्छितील जरी शम ॥ १ ॥
सुखें कंठोत ते मार्ग । पिता माझा करिल युद्ध ॥ २ ॥
अभिमन्युप्रमुख बाळ । कौरवांचे होतिल काळ ॥ ३ ॥
दुःशासनाचा तो भुज । दावितील आणुनि मज ॥ ४ ॥
धूलिमग्न तो विछिन्न । पाहीन तैं शांत मन ॥ ५ ॥
कृष्णा पाहतें मी वाट । रुचतो शमचि भीमास ॥ ६ ॥
म्हणतें उगवो तो सुदिन । परी भीमा रुचे शम ॥ ७ ॥
ऐसें बोलूनि सुंदरी । दुःखावेगें रूदन करी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे हाय । देशी मोकलिते धाय ॥ ९ ॥

३२६

कृपेचा सागर कृष्ण भगवान् । अभय वचन देई तदा ॥ १ ॥
म्हणे हे कल्याणि, निराश न होई । हेतु पूर्ण पाहीं सफळ तुझे ॥२॥
कौरवअंगना टाहो फोडितील । कृष्णे, ऐकसील प्रत्यक्ष तूं ॥ ३ ॥
सिद्ध ते सामासी न होतील जरी । स्मशानीं सत्वरी जातील ते ॥
ढळेलहि मेरू, दुभंगेल धरा । पतन अंबरातेंहि घडे ॥ ५ ॥
परी कृष्णे, मम वाक्य हें सर्वदा । न घडेल मिथ्या सत्य जाण ॥६॥
आंवरीं हा शोक ऐश्वर्यसंपन्न- । पांडवां पाहून, सुखी होईं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे प्रतिज्ञापूर्वक । बोलला अच्युत तया वेळीं ॥ ८ ॥

अध्याय ८३ वा

३२७

पार्थ बोलला केशवा। बोध करीं तं कौरवां ॥ १ ॥
उभय पक्षांचा तूं आप्त। जाईं कौरवसभेंत ॥ २ ॥
द्वितीयदिनीं सिद्ध कृष्ण। मास कार्तिक तो जाण ॥ ३ ॥
वेळ मैत्र मुहूर्ताची। होतें नक्षत्र रेवती ॥ ४ ॥
स्नान, आन्हीक जाहलें। वस्त्रालंकार शोभले ॥ ५ ॥
करूनियां वृषभस्पर्श। कृष्ण वंदी ब्राह्मणांस ॥ ६ ॥
शुभ वस्तूही पाहिल्या। अग्नि प्रदक्षिणा केल्या ॥ ७ ॥
सात्यकीतें वदे, रथ। वरीं, शस्त्रास्त्रांनीं सज्ज ॥ ८ ॥
अबलहि दुर्लक्षित। करूं न शकती शत्रूंस ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे दूत। करिती दिव्य रथ सज्ज ॥ १० ॥

३२८

कालाग्नीचि दीप्ति सूर्यासम गति। चक्रें ते शोभती सूर्यचंद्र ॥ १ ॥
विचित्र आकृति नवरत्न शोभा। बालरविप्रभा झळके ज्याची ॥
रत्न-कनकाचें कौशल्य अपूर्व। साधनें सुंदर तयावरी ॥ ३ ॥
ध्वज, पताका तें व्याघ्रचर्मयुक्त। दिपवी जगास कृष्णरथ ॥ ४ ॥
शैब्य, सुग्रीव तो, मेघपुष्प तसा। वलाहक, अश्वां न वर्णवे ॥ ५ ॥
सुस्नातालंकृत अश्व ते दारुक-। जोडी, गरुडध्वज स्थापी रथीं ॥ ६ ॥
सात्यकीसवें त्या दिव्य रथावरी। बैसले श्रीहरी अत्यानंदें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे स्यंदनाच्या नादें। गगन निनादे क्रमितां मार्ग ॥ ८ ॥

३२९

झालें आकाश निरभ्र। सुटला वायु सुखकर ॥ १ ॥
रज जाहले प्रशांत। अपसव्य पक्षी जात ॥ २ ॥
हंस, सारस, ते शुक। करिताती मंगल शब्द ॥ ३ ॥
प्रदक्षिणिक अग्निज्वाला। मुनि भेटती हरीला ॥ ४ ॥
सहपरिवार धर्म। वदला पुढती येऊन ॥ ५ ॥
काम, भय, लोभ, अर्थ। न करी जया तत्वभ्रष्ट ॥ ६ ॥
ऐसा कृष्ण हा भगवान्। देवेंदेव सनातन ॥ ७ ॥

वासुदेव म्हणे धर्म । धृतिवंत हा धर्मज्ञ ॥ ८ ॥

३३०

प्रेमभावें धर्म कृष्णासी भेटला । आलिंगी तयाला परमानंदें ॥ १ ॥
म्हणे कृष्णा, केलें लालन-पालन । तेंवी उपोषण आम्हांस्तव ॥२॥
माता ती आमुची आम्हांलागीं प्रिय । देव-गुरुकार्यरत सदा ॥ ३ ॥
संकटीं आमुचें केलें संरक्षण । आम्हांस्तव दैन्य भोगिते ती ॥ ४ ॥
सर्वदा सुखासी पात्र, तीच दुःखी । कुशल मातेसी प्रथम पुसीं ॥५॥
वनामाजी जातां माय हंबारली । निष्ठुरता केली परी आम्हीं ॥६॥
अद्यापि ती जरी असेल जिवंत । तरी श्रेष्ठ भाग्य पांडवांचें ॥ ७ ॥
कृष्णा, मजसाठीं वंदूनि तियेसी । धैर्य दे वृद्धेसी आश्वासूनि ॥८॥
वासुदेव म्हणे धर्म यथाक्रम । कथूनि वंदन फिरला मार्गें ॥ ९ ॥

३३१

कृष्णसखा पार्थ पुढती जाऊनि । बोले नम्रवाणी कृष्णालागीं ॥१॥
सन्मानें माधवा, अर्धराज्यलाभ । घडेल तरीच शम व्हावा ॥ २ ॥
घातकी तो जरी विरुद्ध जाईल । सत्यचि पावेल नाश तरी ॥ ३ ॥
पार्थवचन तें एकूनियां भीम । आनंदें गर्जून नाद करी ॥ ४ ॥
ऐकूनि तो नाद कांपले प्रवीर । अश्व विष्ठा-मूत्र टाकिताती ॥ ५ ॥
बोलूनियां ऐसें निरोप ते घेती । श्रीकृष्ण पुढती जाई वेगें ॥ ६ ॥
मार्गामाजी विप्र भेटले तयासी । आदरें विप्रांसी कुशल पुसी ॥७॥
म्हणती कृष्णा, येतों तुझ्याचि मा[illegible]नि । तुझी मधुरवाणी ऐकावया
वासुदेव म्हणे प्रेमें तपोधन । गा[illegible] सभास्थान म्हणती जाई ॥ ९ ॥

अध्याय ८४ वा

३३२

महारथी दश कृष्णासवें येती । सेवक पदाति अश्व तेही ॥ १ ॥
अन्न सामुग्रीही विपुल सन्निध । शकुन मार्गांत घडले बहु ॥ २ ॥
निरभ्र आकाशीं विजा चमकती । गर्जना तैं वृष्टि मेघांविण ॥ ३ ॥
सप्त सरितांचा प्रवाह उलटे । नैऋत्येसी उठे झंजावात । ४॥
अंधार सर्वत्र व्यापूनियां जाई । भूकंप ते पाहीं जागोजाग ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कौरवनगरी । भासे लुप्त झाली वायुवेगें ॥ ६ ॥

३३३

ऐसीं दुश्चिन्हें अपार । परी सुखी शारङ्गधर ॥ १ ॥
पुष्प-कमळांची वृष्टि । मार्ग निष्कंटक होती ॥ २ ॥
विप्र सुवासिनी प्रेमें । सन्मानिती आनंदानें ॥ ३ ॥
जागोजाग मार्गावरी । पुष्पें वर्षिती नरनारी ॥ ४ ॥
'वृकस्थला' नगरीं येतां । रक्तवर्ण शोभे संध्या ॥ ५ ॥
संध्यावंदन करूनि । कंठियेली तें रजनी ॥ ६ ॥
ग्रामवासी विप्र आले । दाशार्हासी सदनीं नेलें ॥ ७ ॥
स्वीकारूनि तो सन्मान । देई सकलांसी भोजन ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे झाला । ऐसा आनंद त्या स्थळा ॥ ९ ॥

अध्याय ८५ वा ३३४

श्रीकृष्णागमनवृत्त नृपाळासी । कळतां तत्काळाचि उठला राव ॥१॥
दुर्योधनादिकां पाचारूनि आणी । म्हणे वृत्त ग्रामीं निवेदा हें ॥२॥
साक्षात् सनातन धर्म तो श्रीहरी । मार्गामाजी करीं सेवा त्याची ॥
भीष्मादिक तेही देती अनुमोदन । करी दुर्योधन मान्य सर्व ॥ ४ ॥
रत्नसभा मार्गी निर्मिल्या वहुत । दास-दासीयुक्त सकल होत्या ॥
अन्न-पान पुष्पमाला तें सुगंध । वस्त्रेंही विविध तयांमाजी ॥ ६ ॥
ऐसी रत्नसभा होती वृकस्थळीं । परी दुर्लक्षिली होती कृष्णें ॥७॥
वासुदेव म्हणे कृष्णभगवान् । चालला लक्षून निजमार्ग ८ ॥

अध्याय ८६ वा ३३५

राव बोलला विदुरास । कृष्ण येईल उद्यीक ॥ १ ॥
पालक तो त्रैलोक्याचा । होवो सन्मान तयाचा ॥ २ ॥
रथ सुवर्णाचे सोळा । मत्त गज अष्ट त्याला ॥ ३ ॥
अर्पीन मी दास-दासी । ऊर्णावस्त्रेंहीं मोलाचीं ॥ ४ ॥
अजिनें चीनदेशोद्भव । मणि नित्य दीप्तिमय ॥ ५ ॥
प्रतिदिनीं चतुर्दश । योजनें हा जया वेग ॥ ६ ॥
ऐसा एकचि स्यंदन । माझा प्रेमें त्या अर्पीन ॥ ७ ॥

अष्टगुण तृण-धान्य । तया परिवार पाहून ॥ ८ ॥
अर्पीन मी म्हणे राव । वृत्त कथितो वासुदेव ॥ ९ ॥

३३६

सामोऱ्या जातील अलंकारयुक्ता । त्या वारयोषिता मार्गी बहु ॥ १ ॥
अवगुंठन तें नसो कन्यकांसी । कृष्णदर्शनासी पावोत त्या ॥ २ ॥
सूर्योदयासम तो यदुनंदन । देईल दर्शन सकळांलागीं ॥ ३ ॥
ध्वज-पताकाही उभारा सर्वत्र । मार्ग सुगंधित सकल करा ॥ ४ ॥
सडा-संमार्जनें धूलिहीन करा । शोभवा आगारा कौशल्यानें ॥ ५ ॥
सकलश्रेष्ठ तें दुःशासनगृह । सुख-सोई सर्व करा तेथें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कृष्णाचें स्वागत । करी धृतराष्ट्र हर्षभरें ॥ ७ ॥

अध्याय ८७ वा

३३७

विदुर म्हणे महाराजा । सन्मान्य तूं सकल लोकां ॥ १ ॥
सन्मानिसी श्रीकृष्णातें । योग्यचि हें कर्म तुझें ॥ २ ॥
परी वदतों मी स्पष्ट । सर्व तुझें हें कपट ॥ ३ ॥
पांडवांसी पंचग्राम । देऊनि न करिसी शम ॥ ४ ॥
करूं पाहसी हा भेद । कृष्ण पांडवांसी शुद्ध ॥ ५ ॥
परी शल्य नव्हे कृष्ण । ध्यानीं असो रात्रंदिन ॥ ६ ॥
इच्छी कल्याण उभयांचें । ऐका वचन हिताचें ॥ ७ ॥
हाचि सन्मान कृष्णाचा । नसे लोभ त्या मानाचा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे क्षत्ता । बोले तूंचि पांडवपिता ॥ ९ ॥

अध्याय ८८ वा

३३८

दुर्योधन म्हणे अशक्यांचे भेद । कृष्ण पांडवांत कवणातेंही ॥ १ ॥
यास्तव नव्हे ही वेळ सन्मानाची । अस्वीकारें अंतीं असमाधान ॥
युध्दसमर्यी हें योग्य न आतिथ्य । भीष्म म्हणे, बोध ऐका त्याचा ॥
दुर्योधन म्हणे बांधितां कृष्णासी । पांडवांची शक्ति क्षीण होई ॥
पितामह, कांहीं उपाय कथावा । जेणें पूर्ण व्हावा हेतु माझा ॥ ५ ॥
धृतराष्ट्र म्हणे न घडो अन्याय । दूत, आप्त होय कृष्ण आम्हां ॥ ६ ॥

भीष्म म्हणे राया, पुत्राचें मरण। ओढवलें जाण निश्चयानें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे क्रोधाकुल भीष्म। सोडी सभास्थान तयावेळीं ॥

अध्याय ८९ वा ३३९

अन्यदिनीं प्रातःकाळीं। उठला आनंदें वनमाळी ॥ १ ॥
केलें सकल आन्हीक। घेई विप्रांचा निरोप ॥ २ ॥
आला हस्तिनापुरासी। सकळ कौरव स्वागतासी ॥ ३ ॥
नव्हता एक दुर्योधन। येती मोदें अवघे जन ॥ ४ ॥
लोटांगण मार्गावरी। कोणी घालिती नगरीं ॥ ५ ॥
जाई नगर फुलून। मंदिरांत येई कृष्ण ॥ ६ ॥
येई धृतराष्ट्र उठती। होती प्रेमें गांठी-भेटी ॥ ७ ॥
मधुपर्क, पाद्यपूजा। अर्पिताती अधोक्षजा ॥ ८ ॥
थट्टा-विनोद होऊन। विदुर गृहीं येई कृष्ण ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे क्षत्ता। म्हणे देवा, हर्ष चित्ता ॥ १० ॥

अध्याय ९० वा ३४०

वंदी कुंतीसी श्रीहरी। कुंती प्रेमें हृदयीं धरी ॥ १ ॥
होई पुत्रांचें स्मरण। करी सद्गद भाषण ॥ २ ॥
कृष्णा, सुखांत वाढले। वीर तेचि वनीं गेले ॥ ३ ॥
शंख-दुंदुभीच्या नादें। प्रातःकाळीं होत जागे ॥ ४ ॥
तेचि श्वापदांसमेत। कैसे राहिले वनांत ॥ ५ ॥
सत्यनिष्ठ माझा धर्म। महाबली वीर भीम ॥ ६ ॥
अद्वितीय योद्धा पार्थ। सहदेव धर्मदक्ष ॥ ७ ॥
नकुळ बहिश्चर प्राण। सुखी असती कीं सुजाण ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कुंती। वदे जिवंत भी कैसी ॥ ९ ॥

३४१

कृष्णा सर्वांहूनि प्रिय मज स्नुषा। थोर द्रौपदीचा अधिकार ॥ १ ॥
पुत्रांसी सोडूनि पतीसवें गेली। नाहीं मी पाहिली दीर्घकाळ ॥ २ ॥
पुण्यमार्गी सौख्य लाभेलचि ऐसें। कृष्णा न मनांत वाटे माझ्या ॥

ओढिलें तियेसी सभेमाजी जेव्हां। अनिवार तेव्हां दुःख मज ॥ ४॥
होते तयास्थानीं सकलहि वीर। तयांमाजी थोर विदुर वाटे ॥ ५॥
सत्कर्मेंचि येई श्रेष्ठता नरासी। धन, विद्या, त्याची व्यर्थ सर्व ॥
दुःखभोगें जरी होई पापक्षय। तरी आम्हां भय नसे त्याचें ॥ ७॥
वासुदेव म्हणे वस्त्रहरणाचें। स्मरण कुंतीतें क्लेश देई ॥ ८॥

३४२

कौरव-पांडवां समान लेखिलें। त्याचि पुण्यबळें विजय लाभो ॥
पुनरपि पुत्र ऐश्वर्यसंपन्न। केधवां पाहीन ऐसें वाटे ॥ २॥
बाळपणीं तातवियोगयातना। ऐसी ही वंचना पुढती माझी ॥ ३॥
जन्मतां अर्जुन अशरीरिणी वाणी। ‘ कौरवांसी रणीं जिंकील हा ॥
भ्रात्यांसवें तीन अश्वमेध कर्ता’। वंदन विधाता घेवो माझें ॥ ५॥
देववाणी सत्य करीं जनार्दना। वियोगयातना दूर करीं ॥ ६॥
चतुर्दश वर्षें नाहीं पुत्रभेटी। श्राद्धही आम्हांसी नसे कोणा ॥ ७॥
वासुदेव म्हणे कुंतीचें वचन। ऐकूनियां कोण हर्ष पावे ॥ ८॥

३४३

कृष्णा, पराभवें कंठितें जीवन। याहूनि मरण श्रेष्ठ वाटे ॥ १॥
क्षत्रिया प्रसवे ज्यास्तव सुतांसी। समय तो हाचि तनयां सांगें ॥
व्यर्थ ऐसी संधी घालवाल तरी। पातक हें शिरीं तुमच्या बसे ॥
ऐशा पातक्यांचा करीन मी त्याग। प्रसंगीं प्राणास तुच्छ लेखा ॥
जीविताहूनि ते पराक्रम प्राप्त-। भोग, जनीं श्रेष्ठ पांडव हो ॥ ५॥
वासुदेव म्हणे युधिष्ठिराप्रति। बोलली जें कुंती तेंचि ऐका ॥ ६॥

३४४

कृष्णा, सांग सांग जावोनि अर्जुना। अन्यथा स्त्रीकर्मा आचरावें ॥
क्रुद्ध भीमार्जुन अंतकासमान। शत्रुनिर्दलन करितील ॥ २॥
हाय अपमानित स्नुषा सभेमाजी। दुःख अंतरासी अन्य नसे॥ ३॥
कृष्णा, तुम्हीं सर्व असूनि जिवंत। कंठीतसे दुःख कुंती ऐसें ॥ ४॥
वासुदेव म्हणे कुंतीलागीं धीर। देई यदुवीर ऐका आतां ॥ ५॥

३४५

यदुश्रेष्ठ म्हणे पितृभगिनीसी । तुजसम जगीं कोण असे ॥ १ ॥
सरोवरांतूनि सरोवरामाजी । कमलिनी जैसी तैसीच तूं ॥ २ ॥
अजमीढकुळामाजी पातलीस । आनंद शूरांस देवोनियां ॥ ३ ॥
वीरपत्नी, वीरमाता तूं वरिष्ठ । साही सुख-दुःख अन्य कोण ॥ ४ ॥
द्वंद्वसहिष्णु ते पुत्र तुझे थोर । ग्राम्य सौख्य धीर त्यजिती सौख्यें ॥
राज्यैश्वर्य किंवा भोगितील वन । ब्रह्मानंद मग्न सुषुप्ति कीं ॥ ६ ॥
जागृति स्वप्न या दुःखावस्था दोन । आत्मा दुःखशून्य सुखरूप ॥
आगमापायी ते दुःख सोशिताती । सहन तुजहि तेंचि होवो ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे सोपाधिक दुःख । सोशिती ते श्रेष्ठ वंद्य जनीं ॥ ९ ॥

३४६

कृष्णेसवें पांडववीर । तुजसी वंदिती साचार ॥ १ ॥
पुशिलें तव अनामय । त्वरित पावती ऐश्वर्य ॥ २ ॥
भेटतील आनंदानें । पूर्णमनोरथ प्रेमें ॥ ३ ॥
ऐकूनियां हर्षे कुंती । वदे संतोषें कृष्णासी ॥ ४ ॥
शमकुशल तूं देवा । योग्य मार्ग आचरावा ॥ ५ ॥
आतां तूंचि परब्रह्म । पांडवांचा मुख्य प्राण ॥ ६ ॥
बोलसी तें होई सत्य । कृष्ण वंदितो कुंतीस ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे हरि । जाई नृपाच्या मंदिरीं ॥ ८ ॥

अध्याय ९१ वा

३४७

उल्लंघूनि तीन तट । शिरला प्रासादीं अच्युत ॥ १ ॥
विविध आसनसंयुक्त । शोभे स्वर्गीय प्रासाद ॥ २ ॥
राजमंडळामाझारीं । दुर्योधना पाहीं शौरी ॥ ३ ॥
मंत्र्यांसवें धृतराष्ट्र । पुढती येई स्वागतास ॥ ४ ॥
मधुपर्क स्वीकारूनि । बैसे कृष्ण उच्चासनीं ॥ ५ ॥
भोजनाचें आमंत्रण । देई तदा दुर्योधन ॥ ६ ॥
करितां अस्वीकार राजा । म्हणे अव्हेर कां ऐसा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण । स्पष्ट कथितो कारण ॥ ८ ॥

३४८

भोजन, सत्कारस्वीकार करिती । कृतकार्य होतां दूत यदा ॥ १ ॥
कृतार्थ मी होतां सन्मानावें मज । राव म्हणे नित्य मानार्ह तूं ॥२॥
युद्ध, वैर, कांहीं नसेचि तुजसी । आप्त तूं आम्हांसी कां रे ऐसें ॥
हांसोनियां बोले कृष्ण दयाघन । कदाकाळीं धर्म न सोडीं मी ॥४॥
आपत्काळ किंवा परस्पर प्रेम । कारणें हीं दोन भोजनासी ॥ ५ ॥
पांडवांसी व्यर्थ करिसी तूं द्वेष । माझें तयां ऐक्य जाण नित्य ॥६॥
एकही कारण नसे वा, सांप्रत । बोले शांतचित्त वासुदेव ॥ ७ ॥

३४९

ज्ञातिबांधवांचे सद्गुण वैरानें । दुर्लक्षी तो जाणें अधम नर ॥ १ ॥
ऐशा अधमाचें सेवूं नये अन्न । विदुरसदन प्रिय मातें ॥ २ ॥
ऐसें बोलोनियां महाबाहु कृष्ण । त्यजूनियां स्थान निघूनि गेला ॥
भीष्मादिक तया मागोमाग जाती । प्रेमें सन्मानिती यादवेंद्रा ॥४॥
बोळवूनि तयां, विदुरगृहांत । पवित्र षड्रस अन्न सेवी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अर्पूनि विप्रांसी । कृष्ण अन्न भक्षी अत्यानंदें ॥ ६ ॥

अध्याय ९२ वा ३५०

विदुर त्या रात्रीं बोलला कृष्णासी । देवा, पातलासी कासया तूं ॥
दुरात्मा तो मंद धर्मार्थमर्यादा । उल्लंघी सर्वदा कामचारी ॥ २ ॥
मानकामी करी अपमान जनांचा । मार्ग त्या श्रेयाचा कैसा रुचे ॥३॥
अनृतप्रिय तो चंचल सर्वदा । मार्ग त्या श्रेयाचा कैसा रुचे ॥ ४ ॥
तोषवी युद्धार्थ भीष्म द्रोणादिकां । मार्ग त्या श्रेयाचा कैसा रुचे ॥५॥
वासुदेव म्हणे असमर्थ पांडव । मानिती कौरव, विदुर कथी ॥ ६ ॥

३५१

एकटाचि कर्ण जिंकील पांडवां । मानी हा माधवा, मूढमति ॥ १ ॥
बधिरासी गान, ज्ञान चांडाळासी । तैसें कौरवांसी करितां बोध ॥
अशिष्ट ते दुष्ट, स्पष्ट वैरी मानीं । जाऊनि त्या स्थानीं काय लाभ ॥
दुर्जनसभेसी जाऊं नको कृष्णा । ऐसें माझ्या मना वाटतसे ॥४॥
वासुदेव म्हणे सप्रेम, सादर । बोलला विदुर कृष्णालागीं ॥ ५ ॥

अध्याय १३ वा

३५२

कृष्ण म्हणे सर्व जाणूनि विदुरा । पातलों या स्थळा कल्याणार्थ ॥
धर्मकार्यी यश लाभलें न जरी । पुण्यद तें तरी निश्चय हा ॥ २ ॥
चिंतूनिही मनीं पाप नाचरीतां । दोष नसे माथां म्हणती ज्ञात ॥
यास्तव प्रांजल प्रयत्न शमाचा । सफल न होतां दोष नसे ॥ ४ ॥
संकटीं मित्रासी साह्य सदा व्हावें । बुडत्यासी तारावें यथाशक्ति ॥
ऐशा सद्बुद्धीनें यत्न जो करील । अनिंद्य होईल तोचि जनीं ॥६॥
हितोक्ति कौरव ऐकतां त्यां लाभ । होतील ते निंद्य न ऐकितां ॥७॥
मज सिंहापुढें मृग ते बापुडे । लवही वांकुडें न करिती ते ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कथूनि श्रीहरी । सुखशय्येवरी पहुडला ॥ ९ ॥

अध्याय १४ वा

३५३

प्रातःकाळीं उठला कृष्ण । केलें सकल नित्यकर्म ॥ १ ॥
दुर्योधन शकुनि दोघे । इतुक्यांत येती तेथें ॥ २ ॥
भीष्मप्रभृति कौरव । धृतराष्ट्रादि ते राव ॥ ३ ॥
म्हणे इंद्रासम तुझी । कृष्णा वाट ते पाहाती ॥ ४ ॥
ऐकूनियां मधुर शब्दें । देव अभिवंदी तयांतें ॥ ५ ॥
अर्पूनियां विविध रत्नें । विप्र तोषविले कृष्णें ॥ ६ ॥
येतां सारथी स्यंदनीं । अग्नि, ब्राह्मणां वंदूनि ॥ ७ ॥
आरूढला जगन्नाथ । वासुदेव जोडी हात ॥ ८ ॥

३५४

विदुर बैसला कृष्णाच्या सन्निध । दुर्योधनरथ मागें जाई ॥ १ ॥
सात्यकि प्रमुख अन्य वृष्णिवीर । रथ, गज, अश्व, अनुसरती ॥ २ ॥
सुवासिकजलासिक्त राजमार्ग । शोभती अपूर्व तयावेळीं ॥ ३ ॥
वाद्यनादें तदा गगन कोंदलें । दर्शनासी आलें नगर सारें ॥ ४ ॥
हस्तिनापुरांत अपूर्व सोहळा । श्रीकृष्ण पातला राजद्वारीं ॥ ५ ॥
सात्यकि-क्षत्त्याचे धरूनियां हस्त । उतरे गोविंद रथाखालीं ॥६॥
वाद्यनाद तेव्हां अपूर्व जाहला । दिपवी सकलां कृष्ण तेजें ॥ ७ ॥

धृतराष्ट्रादिक देती उत्थापन । येती मुनिजन तयास्थानीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे मुनीलागीं भीष्म । प्रेमें सन्मानून आणिताती ॥ ९ ॥

३५५

रत्नजडित आसनीं । बैसतांचि सकळ मुनि ॥ १ ॥
देतां अर्घ्यादि त्यांजला । कृष्ण स्वस्थानीं शोभला ॥ २ ॥
कृतवर्मा तैं सात्यकी । कृष्णासमीप शोभती ॥ ३ ॥
कर्ण, दुर्योधन मानी । बसले एकाचि आसनी ॥ ४ ॥
स्पर्शूनियां कृष्णासन । विदुर शोभवी स्वस्थान ॥ ५ ॥
शकुनि पुत्रांसवें बैसे । सभा ऐसी ते विराजे ॥ ६ ॥
पीतांबरधारी शाम । करी सकलांसी तल्लीन ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे शांत । सभा सकल निःशब्द ॥ ८ ॥

अध्याय ९५ वा

३५६

घनगंभीर तैं बोलला वचन । उच्चस्वरें कृष्ण सभेमाजी ॥ १ ॥
कौरव-पांडव समेट घडादा । विनाश टळावा क्षत्रियांचा ॥ २ ॥
नृपाळा, पातलों यास्तवचि एथ । निश्रेयस तुज ज्ञात असे ॥ ३ ॥
राजकुळामाजी कुळ हें वरिष्ठ । दान्त दयावंत ऐसी ख्याति ॥ ४ ॥
ऐशा श्रेष्ठ कुळीं क्रिया हे विपरीत । धृतराष्ट्र निमित्त न घडो वाटे ॥
कुरुकुळामाजी नृपाळ तूं श्रेष्ठ । पुत्र, धर्म, अर्थ त्यागिताती ॥ ६ ॥
द्यूत, जतुगृह आदि कपटकृति । राया, तूं जाणसी आपत्ती हे ॥७॥
वासुदेव म्हणे तया शांत स्थानीं । बोले चक्रपाणी हितोक्ति ते ॥८॥

३५७

धृतराष्ट्रा महाराजा । आतां केल्यानें उपेक्षा ॥ १ ॥
सकल अवनीचा नाश । यास्तव निवारीं सुतांस ॥ २ ॥
अशक्य न वाटे शम । जरीं ऐकसी वचन ॥ ३ ॥
आंवरीन मी पांडवां । निवारीं वा, तूं कौरवां ॥ ४ ॥
येणें सकलांचें हित । सम्राट् तूं, होतां सख्य ॥ ५ ॥
उभयपक्ष हे बलवंत । होतां संगरीं विनष्ट ॥ ६ ॥

सांगें काय लाभ तुझा । चित्तीं अंतरीं महाराजा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण । रक्षीं म्हणे दीन जन ॥ ८ ॥

३५८

क्षत्रिय सकळ पातले त्या ठाया । कुलवंत राया, अवघे शूर ॥ १ ॥
आनंदें भोजन घडो या वीरांचें । सौख्यें स्वस्थानातें जावोत हे ॥२॥
परस्पर प्रेमें घडो वैरत्याग । इहपर भोग लाभो तयां ॥ ३ ॥
बालपणीं जैसें रक्षिलें पांडवां । वार्धक्यांत राया, घडो तेंचि ॥ ४॥
तदा प्रभृति ते तुझ्याचि आधीन । रक्षूनियां पुण्य जोडीं राया ॥५॥
वंदूनियां तुज कथिलें तयांनीं । 'राहियेलों वनीं आज्ञेसम ॥ ६ ॥
अज्ञातवासही कंठिलां सुखानें । ताता, विश्वासानें एक तुझ्या' ॥
सत्यप्रतिज्ञ तूं होईं आतां राव । म्हणे वासुदेव परिसा वृत्त ॥८॥

३५९

'क्लेश अपार साहिले । ताता वचन पूर्ण केलें ॥ १ ॥
करीं आतां संरक्षण । माता-पिता तूं होऊन ॥ २ ॥
आम्हीं वागलों विनयें । तूंही न्यायें वागवावें ॥ ३ ॥
चुकतां सन्मार्ग दावावा । स्वयें सद्धर्म वरावा' ॥ ४ ॥
पांडवांनीं कथिलें तुज । ऐकोत तें सभाजन ॥ ५ ॥
सभेमाजी जया धर्म । अधर्मानें होई हीन ॥ ६ ॥
सभ्य तेथें जे तटस्थ । पावताती ते विनाश ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे न्याय्य । स्पष्ट बोले तोचि आर्य ॥ ८ ॥

३६०

कृष्ण म्हणे राया, नम्रभावें वीर । कथिती तें सर्व निवेदिलें ॥ १ ॥
आजवरी धर्मनिष्ठ होते शांत । मागती राज्यास योग्यवेळीं ॥ २ ॥
कथन तयांचें सत्य, धर्म्य, न्याय्य । नसेचि उपाय अन्य कांहीं ॥ ३ ॥
अन्याय्यअपेक्षा केली असे जरी । वदो कोणी तरी सभेमाजी ॥ ४ ॥
प्रार्थना हे भद्रा, मान्य करूनियां । वांचवीं क्षत्रियां मृत्यूंतूनि ॥५॥
कोपूं नको राजा, होऊनियां शांत । न्यायें हो कृतार्थ सौख्य भोगीं ॥
वासुदेव म्हणे पार्थाचा सारथी । कौरवसभेसी न्याय मागे ॥ ७ ॥

३६१

कृष्ण म्हणे राजा. धर्म तो धार्मिक । साहिले असंख्य क्लेश तेणें ॥
पुत्र तुझे कैसे वागविती त्यासी । राया, तूं जाणसी सकळ कांहीं ॥
लाक्षागृह, द्यूत, विसरूनि राया । पातले आश्रया नम्रभावें ॥ ३ ॥
इंद्रप्रस्थामाजी सुखानें राहिले । कदा न घडलें उल्लंघन ॥ ४ ॥
ऐसें असूनियां केलें कपटद्यूत । कृष्णेसी सभेंत अवमानिलें । ५ ॥
साहूनि तें सर्व त्यागिला न धर्म । इच्छितों कल्याण उभयांचें मी॥
अनर्थासी अर्थ अनहिता हित । मानिती त्वत्सुत आंवरीं त्यां ॥ ७ ॥
सेवेसी कीं राया, युद्धासी ते सज्ज । वाटेल जें हित तेंचि करीं ॥
वासुदेव म्हणे अभिनंदी सभा । कोणी न विरोधा पुढती येई ॥९॥

अध्याय ९६ वा ३६२

रोमांचित स्तब्ध पाहूनि सकळां । राम तैं वदला जामदग्न्य ॥१॥
दंभोद्भव पूर्वी राजा सार्वभौम । जाहला उद्दाम निजबळें ॥ २ ॥
नित्य प्रातःकाळीं वदे, मजसम । जाणतसे रण कोण सांगा ॥ ३ ॥
मत्त तो यापरी करोनि संचार । प्रश्न वारंवार सकळां करी ॥ ४ ॥
वदले एकदां तयालागीं मुनि । जा गंधमादनीं, मुनि तेथें ॥ ५ ॥
ऐकूनि भेटला नर-नारायणां । घेऊनियां सेना दंभोद्भव ॥ ६ ॥
कृश तपस्व्यांनीं सन्मानिलें तया । दंभोद्भव तयां युद्ध मागे ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे टाळिती ते शांत । परी तो उन्मत्त नायकेचि ॥ ८॥

३६३

मुनि पाचारिती त्यासी । अंतीं घेऊनि तृणमुष्टि ॥ १ ॥
राव बोलला संग्राम । करिसी काय तृण घेऊन ॥ २ ॥
नर म्हणे म्हणसी तरी । तुझा दर्प तृण हरी ॥ ३ ॥
दंभोद्भव सोडी शरां । नर जपे ईषिकास्त्रा ॥ ४ ॥
अस्त्र व्यापी सकळ सैन्या । नयन, कर्ण, रोमरोमां ॥ ५ ॥
दंभोद्भव शरण येई । अभय घेऊनियां जाई ॥ ६ ॥
राम म्हणे बळ ऐसें । राया, एका त्या मुनीचें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे बोध । करी वीर तो प्रसिद्ध ॥ ८ ॥

३६४

राम म्हणे राया, नराचें तें कर्म । वळी नारायण तयाहूनि ॥ १ ॥
कांकुदीकादि तीं अष्टशस्त्रें त्याचीं । विद्ध मानवांसी करी तेणें ॥२॥
काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मान । मत्सर, मीपण कार्य त्यांचें ॥
वाढती विकार ऐसे त्या अस्त्रांनीं । वेभान होऊनि नष्ट वैरी ॥ ४ ॥
नारायण ऐसा सखा ज्या वीराचा । अजिंक्य तो साचा रणामाजीं ॥
केशव-अर्जुन-नर-नारायण । जाणूनियां शम करीं राया ॥ ६ ॥
प्रसिद्ध हें कुळ राहो ख्यातनाम । चिंतूनि कल्याण हित वरीं ॥७॥
वासुदेव म्हणे श्रेष्ठ कुल, भ्रष्ट-। न व्हावें, हें संत इच्छिताती ॥८॥

अध्याय ९७ वा ३६५

ऐकूनियां रामवाणी । वोलताती कण्वमुनि ॥ १ ॥
अशाश्वत चराचर । नर-नारायण स्थिर ॥ २ ॥
दुर्योधना, न करीं गर्व । जगीं थोरांहूनि थोर ॥ ३ ॥
सैन्यवळ तें कनिष्ठ । स्वाभाविक वल श्रेष्ठ ॥ ४ ॥
महाशौर्य पांडवांसी । स्वाभाविक बल त्यांसी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मुनि । कथा सांगे ध्या ऐकूनि ॥ ६ ॥

३६६

मातली इंद्राचा सारथी विख्यात । कन्या त्यासी एक 'गुणकेशी' ॥
लज्जित सकळ स्त्रिया त्या रूपानें । मातली चिंतेनें मग्न सदा ॥२॥
उच्च, ख्यात, तेंवी सात्विक कुळांत । वाटे खेदभूत कन्याजन्म ॥
मातृ-पितृ-कुळ तेंवी जेथ दान । साशंक तें स्थान करी कन्या ॥४
देव-गंधर्वादि शोधिले सकळ । अनुरूप स्थळ लाभेना त्या ॥ ५ ॥
कांता 'सुधर्मेतें' करूनि संकेत । म्हणे नागलोक शोधीन मी ॥
वासुदेव म्हणे बोलूनियां ऐसें । मातली त्या मार्गें गमन करी ॥७॥

---

१ काकुदिक, शुक, नाक, अक्षिमंतर्जन, संतान, नर्तन, घोर व आस्य-मोदक. यांनांच प्रस्तावन, मोहन, उन्माद, त्रासन, ऐंद्रादि, पैशाच, राक्षस आणि याम्य अशीं दुसरीं नांवें आहेत.

अध्याय ९८ वा ३६७

मातलीसी भेटे नारद मार्गांत । भेटूनि वरुणास पुढती जाती ॥ १ ॥
वरुणाचा सुत 'पुष्कर' प्रख्यात । सोमाचा जामात सुलक्षणी ॥२॥
'ज्योत्स्ना' नामें कांता सोमकन्या दुजी। कांता ते सूर्याची एकियेली
कार्यान्तीं करांत पूर्ववत येती । तीं हीं असुरांची हृत अस्त्रें ॥ ४ ॥
वारुणडोहांत अग्निज्वालायुक्त । एथ प्रतिबद्ध सुदर्शन ॥ ५ ॥
गेंडमृगपृष्ठसंभूत गांडीव । सामर्थ्य अपूर्व चापाचें या ॥ ६ ॥
अपूर्व हें जलधारावाही छत्र । वस्तु त्या अपूर्व एथें बहु ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कार्यासी विलंब । जाणोनि नारद पुढती गेले ॥ ८ ॥

अध्याय ९९ वा ३६

पाताळ हें नाभिस्थान । नागलोकाचें, तूं जाण ॥ १ ॥
अवशिष्ट सुधा एथ । क्षय-वृद्धि न चंद्रास ॥ २ ॥
जलप्रवाह विपुल । पात-अलं तें पाताल ॥ ३ ॥
ऐरावत मेघांप्रति । जळ एथूनि अर्पितो ॥ ४ ॥
तेंचि वर्षीतसे इंद्र । एथ आधार तो चंद्र ॥ ५ ॥
बद्ध दैत्य वसती एथ । आचरिलें शिवें तप ॥ ६ ॥
वसती तपस्वी गोव्रती । यदृच्छेनें जयां तुष्टी ॥ ७ ॥
ऐरावतादि ते गज । शोधीं वर रुचतां तुज ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे स्थान । प्रलयाग्नीचें त्यजितो जाण ॥ ९ ॥

अध्याय १०० वा ३६९

मातले, हिरण्यपुर अवलोकीं । मय नामें रची विश्वकर्मा ॥ १ ॥
निवातकवच वसती या ठाईं । पराभूत होई इंद्र एथें ॥ २ ॥
रत्न, कनक, तें नैक धातुमय । गृहें काष्ठमय असती बहु ॥ ३ ॥
मूल द्रव्य यांचें न कळेचि कोणा । अपूर्व रचना शास्त्रशुद्ध ॥ ४ ॥
मेघकांतिशील, प्रवाह जलाचे । शयनगृहें, पात्रें, अपूर्व हीं ॥ ५ ॥

कामपुष्प-फल-वृक्ष, कामचारी । शोधीं कोणीतरी वर एथें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वैऱ्यांचें तें स्थान । मातली जाणून त्याज्य मानी ॥

अध्याय १०१ वा　　३७०

गरुडलोकाप्रति पातले नारद । मातलीसी वृत्त कथिती सर्व ॥ १॥
विक्रम, गमन, भार, परिश्रम । लेशाचि न जाण एथ कोणा ॥ २ ॥
'सुमुख,' 'सुनामा, सुनेत्र, सुवर्चा । सुवल, सुरुच, ऐसा बंधुवर्ग ॥
पुत्रपद्र ऐसे विनता सुताचे । पुत्र-पौत्र त्यांचे वसती एथ ॥ ४ ॥
सुवर्णचूडादि बहुत सुपर्ण । भजती अनन्य विष्णूलागीं ॥ ५ ॥
बळवंत सर्पभक्षक ते शूर । योग्य तरी वर निवडीं एथें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे नकार जाणोनि । नेई अन्यस्थानीं मुनिश्रेष्ठ ॥ ७ ॥

अध्याय १०२ रा　　३७१

मुनि म्हणे आलों सप्तम तलासी । रसातल यासी नाम असे ॥१ ॥
अमृतोद्भवा ते सुरभि या स्थानीं । क्षीर प्रस्नविणी सर्वकाळ ॥२॥
अमृततृप्त त्या ब्रह्मवदनांतूनि । उत्पत्ति ते मानीं सुरभीची ॥ ३ ॥
क्षीरसंचय तो क्षीरसिंधु जाण । विस्तारला फेन तीरावरी ॥ ४ ॥
'फेनप' प्राशूनि फेन, करिती तप । दिशेसी एकेक कामधेनु ॥५॥
सुरूपा, सुभद्रा, तैंवी कामदुधा । हंसिका ते भद्रा दक्षिणेसी ॥ ६ ॥
पूर्व, पश्चिम त उत्तरानुक्रमें । सुरूपादि नामें ध्यानीं ध्यावीं ॥ ७ ॥
सुधा सर्पांप्रति, स्वधा पितरांसी । अमृत देवांसी धेनु अर्पी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे निवास एथींचा । सर्व श्रेष्ठ साचा म्हणती ज्ञाते ॥९॥

अध्याय १०३ रा　　३७२

सर्पपुरी भोगावती । दाविताती नारदऋषी ॥ १ ॥
करी धारण पृथ्वीचें । शेष वसतो तो एथें ॥ २ ॥
कद्रूतनयांचें स्थान । विविध रूपें तयां जाण ॥ ३ ॥
धनंजय, कर्कोटक । तक्षकादि नामें देख ॥ ४ ॥
पाहूनियां एक नाग । मातलीसी होई सौख्य ॥ ५ ॥
ऐरावतकुलोत्पन्न । मातामह ज्या वामन ॥ ६ ॥

आर्यकाचा असे पौत्र । पितृनाम 'नागत्रिकुर' ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे सूत । इच्छो जामात 'सुमुख' ॥ ८ ॥

अध्याय १०४ था ३७३

नारद जावोनि भेटे आर्यकासी । इच्छा मातलीची कथिली तया ॥
म्हणे गुणवंत पुत्र सुमुखासी । कन्या मातलीची योग्य असे ॥ २ ॥
खिन्नचित्त वदे आर्यक तयासी । वधील पौत्रासी वैनतेय ॥ ३ ॥
मर्यादा कथिली असे एक मास । संकटीं तुम्हांस केवी घालूं ॥४॥
आर्यकआज्ञेनें मातली सुमुखा । घेऊनियां स्वर्गा जाई सुखें ॥ ५ ॥
वृत्त तें सकळ इंद्रासी कथिलें । इतुक्यांत आले विष्णु तेथें ॥ ६ ॥
विष्णुवचें इंद्र अर्पी त्या आयुष्य । ऐसें होई कार्य मातलीचें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कृतार्थ मातली । कन्या अर्पियेली सुमुखाप्रति ॥८॥

अध्याय १०५ वा ३७४

वृत्त खगेंद्रासी कळतां खिन्न झाला । म्हणे इंद्रा केला अपमान हा
अनुजाचा दूत मानूनियां मज । करिसी सख्यभंग तुच्छतेनें ॥ २ ॥
परी मी विक्रमी असें विष्णूहूनि । नेतों त्या वाहूनि लीला मात्रें ॥
ऐकूनि हे वाणी विष्णु गरुडासी । म्हणे अंडजा, ही व्यर्थ प्रौढी ॥
तोलीं पाहूं माझा असव्य कर । कथूनि स्कंधावर कर ठेवी ॥ ५ ॥
गरुड त्या भारें मूर्छित जाहला । दया गोविंदाला येई तव्हां ॥ ६ ॥
नम्रभावें पक्षी शरण तें जाई । वासुदेव होई हरिसी नत ॥ ७ ॥

३७५

शरण येतां वैनतेय । विष्णु म्हणे न करीं गर्व ॥ १ ॥
ऐसें बोलूनि सुमुखासी । पदांगुष्ठें देव स्पर्शी ॥ २ ॥
गरुडवक्षीं अंगुष्ठानें । फेंकी तयासी लीलेनें ॥ ३ ॥
तदाप्रभृति गरुड । सांभाळितो सुमुखास ॥ ४ ॥
कण्व म्हणे दुर्योधना । कृष्णशक्ति आणीं ध्याना ॥ ५ ॥
नको करूं रे विरोध । शम श्रेयस्कर मार्ग ॥ ६ ॥
दुर्योधन म्हणे मुने । भाळीं लिहिलें तेंचि होणें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे दैव । घडवी इष्ट तेंचि कार्य ॥ ८ ॥

अध्याय १०६ वा ३७६

जनमेजय म्हणे वैशंपायनासी। सत्यचि अविवेकी दुर्योधन॥ १॥
परी कैसें तया वारिलें न कोणी। बोधिलें सकलांनीं म्हणतो मुनि
मुनि नारदादि तयासी बोधिती। कथा गालवाची कथिती ऐका॥
वसिष्ठवेषानें एकेकाळीं धर्म। मागतसे अन्न विश्वामित्रा॥ ४॥
कौशिक त्वरित चरु करी सिद्ध। धर्मा अन्यदत्त अन्नें तृप्ति॥ ५॥
चरु घेऊनियां येतां विश्वामित्र। बोलती वसिष्ठ थांब आतां॥ ६।
अन्यमुनिदत्त अन्नें होई तृप्ति। बोलूनि हे उक्ति त्यजिलें स्थान॥
वासुदेव म्हणे विश्वामित्र अन्न। मस्तकीं घेऊन उभा राहे॥ ८॥

३७७

वायु भक्षूनियां विश्वामित्र उभा। वर्षशत ऐसा काळ जाई॥ १॥
पुनरपि धर्म वसिष्ठवेषानें। येतांचि मुनीनें दिधलें अन्न॥ २॥
पूर्वीसम उभा पाहूनि तोषला। सेवूनियां गेला अन्न, धर्म॥ ३॥
आश्रमीं गालव कौशिकाची सेवा। करितां तोषला मुनि अंतीं॥४॥
गालवासी आज्ञा देतसे कौशिक। जा म्हणे गृहास आनंदानें॥ ५॥
मागूनि दक्षिणा कृतार्थ करूनि। पाठवा सदनीं गालव म्हणे॥ ६॥
विश्वामित्र म्हणे गालवा, तोषलों। सेवेनें पावलों दक्षिणा मी॥७॥
आग्रह पाहोनि म्हणे अष्टशत। शामकर्ण शुभ्र त्वरित आणीं॥ ८॥
वासुदेव म्हणे आपुलाचि हेका। दुराग्रह देखा तोचि जनीं॥ ९॥

अध्याय १०७ वा ३७८

मुनिवचन ऐकोनि। गालवासी खेद मनीं॥ १॥
अशक्य तें होतें त्यासी। निद्रा येईना तयासी॥ २॥
चिंतामग्न होई कृश। म्हणे जीवित हें व्यर्थ॥ ३॥
फिटतां न गुरूधन। मज म्हणतील कृतघ्न॥ ४॥
कृतघ्ना न प्रायश्चित। आतां त्यजीन प्राणांस॥ ५॥
सकलाधार विष्णूप्रति। अंतरांत गालव चिंती॥ ६॥
गरुड गालवाचा सखा। प्रगटूनि बोले वाचा॥ ७॥
सुहृदासी सुहृदानें। साह्य करावें प्रेमानें॥ ८॥

प्रार्थिलें मी विष्णूप्रति । इच्छा पुरवील तो तुझी ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे पक्षी । नेई कार्यार्थ मुनीसी ॥ १० ॥

अध्याय १०८ वा ३७९

गालवमुनीसी गरुड बोलला । कार्यी या मजला साह्य विष्णु ॥१॥
पूर्वेसी जो संध्या करी तयाप्रति । बुद्धि विश्वव्यापी प्राप्त होई ॥
दिनमुख हेचि. देवतपोभूमि । व्यापिली देवांनीं पूर्वीं हीच ॥ ३ ॥
ब्रह्मदेवें केला वेदपाठ येथें । गायत्रीलाभाचें स्थान हेंचि ॥ ४ ॥
याज्ञवल्क्या-प्रति यजुर्वेदप्राप्ति । पुण्य आचरिती देव एथें ॥ ५ ॥
वदसील तरी जाऊं या दिशेसी । अन्यहीं तुजसी कथितों दिशा ॥
वासुदेव म्हणे सुजनांचा संग । दाविते सहज ज्ञान जनां ॥ ७ ॥

अध्याय १०९ वा ३८०

यज्ञ करोनियां कश्यपासी दिली । 'दक्षिणा' प वळी नाम तेणें ॥
पितरांचा वास दक्षिण दिशेसी । निर्णय येथेंचि करी यम ॥ २ ॥
सकलहि प्राणी जाती या दिशेसी । दैत्य वास्तव्याची हेचि दिशा
वैतरणी नदी याचि दिशेप्रति । सकल भोगिती क्लेश एथें ॥ ४ ॥
दक्षिणायनीं ते सूर्यगति रुद्ध । गज-कच्छलाभ मज एथें ॥ ५ ॥
'कपिल' 'शिवा'ते ऋषि या दिशेसी । नगरी भोगावती दक्षिणेसी॥
अंतीं अज्ञानासी अर्पी हेचि दिशा । कथी गरुडवाचा वासुदेव ॥७॥

अध्याय ११० वा ३८१

दिशा वरुणाची गालवा, पश्चिम । दिनान्तीं किरण त्यागी सूर्य ॥१॥
षड्रस प्राशूनि सोम पावे पुष्टि । बल शुक्लपक्षीं येई तया ॥ २ ॥
संध्या, रात्र, निद्रा, अस्ताचल पथ । घोरतातो दैत्य वायुजित् ॥३॥
मरुद्गण याचि दिशेसी जन्मती । कमळें सुवर्णाचीं सरोवरीं ॥ ४ ॥
कामधेनु दुग्ध सोडी तया तीरीं । राहूची वसती याचि स्थळीं॥५॥
पश्चिमसागरीं त्रैलोक्यींचें जल । अनंत, कश्यप, वसती एथें ॥६॥
आद्यंत रहित विष्णूचें हें स्थान । वर्णी हे पश्चिम वासुदेव ॥ ७ ॥

अध्याय १११ वा ३८२

उच्चारेंचि तीच दिशा ते उत्तर। तेंचि स्वर्गद्वार धनदस्थान ॥ १ ॥
बदरिकाश्रमीं नर-नारायण। पुण्यवंत जन उत्तरेसी ॥ २ ॥
उमा-महेश्वर कैलासीं वसती। गंगेची उत्पत्ति उत्तरेसी ॥ ३ ॥
चैत्ररथ वन वैखानसाश्रम। कल्पवृक्ष जाण 'संतानक' ॥ ४ ॥
गुप्त वेषें 'धामा' महात्मे वसती। दिसे जीमूतासी कनकाकर ॥५॥
जैमूत कनक प्रसिद्ध तें लोकीं। दिक्पाल म्हणती कार्य काय ॥ ६ ॥
सर्वकर्मालागीं दिशा ही वरिष्ठ। गालवा गरुड कथितसे ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे दिशाज्ञान होतां। रुचली गालवा पूर्व दिशा ॥ ८ ॥

अध्याय ११२ वा ३८३

गालववचनें पूर्वदिशेप्रति। गरुड मुनीसी नेत असे ॥ १ ॥
महावेग त्याचा न सहे गालवा। म्हणे गरुडा व्हावा अल्प वेग ॥
बधिर, अंध, झालों पडेन सागरीं। गुरुइच्छा पुरी कैसी होई ॥ ३ ॥
प्राणत्याग वाटे श्रेष्ठ तयाहूनि। अश्वदाता कोणी न दिसे मज ॥
पक्षी म्हणे मृत्यु नसे तुझ्या हातीं। व्यर्थंचि बोलसी अविचारें ॥
ऋषभ पर्वतीं घेऊनि विश्रांती। उपाय तुजसी कथितों ऐक ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे गालवा गरुड। दावीतसे मार्ग पुढती ऐका ॥ ७ ॥

अध्याय ११३ वा ३८४

ऋषभपर्वतीं शाण्डिलीआश्रमीं। भोजन करूनि करिती निद्रा ॥१॥
विश्रांती पावोनि उठतां गरुड। झालें अवघड तयाप्रति ॥ २ ॥
पंखहीन दिसे देह मांसमय। पाहूनि गालव खिन्न होई ॥ ३ ॥
म्हणे वैनतेया, काय ही अवस्था। किती काळ आतां वास एथें ॥
अपराध काय कळेना जाहला। पक्षी म्हणे झाला अविचार ॥ ५ ॥
शरण जाऊनि बोले शाण्डिलीसी। क्षमावें मजसी तपस्विनि ॥६॥
सुस्थळीं तुजसी न्यावें हें मनांत। आणिलें सामर्थ्य न जाणितां ॥
वासुदेव म्हणे मनांतचि आलें। परी तें भोवलें ध्यानीं असो ॥ ८ ॥

३८५

शरण येतांचि सुपर्ण। बोले शाण्डिली वचन ॥ १ ॥
परिणाम हा निंदेचा। अभय असो शरणागता ॥ २ ॥
निंदा मजसी असह्य। निंदकाचें पतन होय ॥ ३ ॥
धर्मफल तो आचार। लाभे आचारें ऐश्वर्य ॥ ४ ॥
आचारेंचि अशुभ नाश। सुपर्णा हो पूर्ववत् ॥ ५ ॥
निंद्य जणावी स्त्रीनिंदा। लाभे गरुड पूर्वपदा ॥ ६ ॥
पूर्वस्थळीं येतां मुनि। करिती अश्वांची मागणी ॥ ७ ॥
कालमर्यादा वाढवी। गरुड मित्रा अभय देई ॥ ८ ॥
गुरुदक्षिणेचा भाव। जाणीतसे वासुदेव ॥ ९ ॥

अध्याय ११४ वा ३८६

गालवा, हें जग हिरण्यप्रधान। भूमिसार जाण मोही जगा ॥ १ ॥
अजैकपाद तो अहिर्बुध्न्य तेंवि। धनदचि देई धन मुने ॥ २ ॥
ऐसें बोलूनियां ययातीसन्निध। पातला गरुड मुनिसवें ॥ ३ ॥
वृत्तांत कथूनि वदे राजश्रेष्ठा। अश्व या सत्पात्रा अर्पी सुखें ॥ ४ ॥
अर्पील हा विप्र पुण्य तुज राया। संपादीं या श्रेया पुण्यवंता ॥५॥
वासुदेव म्हणे अनुकूल काल। असतांचि लाभेल योग्य दाता ॥६॥

अध्याय ११५ वा ३८७

धन्य मानी आपणासी। वृत्त परिसूनि ययाति ॥ १ ॥
म्हणे याचक निराश। होतां घडे सकलनाश ॥ २ ॥
पातला हा मुनिश्रेष्ठ। जाऊं नये असंतुष्ट ॥ ३ ॥
पूर्वीसम धनवान। नसें गरुडा मी जाण ॥ ४ ॥
गालवा, कन्या हे 'माधवी'। भाग्यवती सुखें न्यावी ॥ ५ ॥
हिच्या योगें लाभे राज्य। अश्वप्राप्ति ते सहज ॥ ६ ॥
लाभो दौहित्र मजसी। मान्य असो इच्छा हेचि ॥ ७ ॥
कन्या घेवोनि हर्यश्व-। नृपा, भेटला गालव ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे राजा। होता कनवाळु प्रजेवा ॥ ९ ॥

अध्याय ११६ वा ३८८

देवर्षि नारद म्हणे धृतराष्ट्रा । हर्यश्व गालवा वचन बोले ॥ १ ॥
सोडूनि निश्वास म्हणे मुनिराया । सुलक्षणी कन्या स्पष्ट दिसे ॥ २ ॥
पाद, कर, पृष्ठ तैंवी वक्षस्थल । दिसती उन्नत सुचिन्ह हें ॥ ३ ॥
त्वचा, केश, दन्त, कर-पादांगुली । सूक्ष्म पर्वे सारीं स्पष्टपणें ॥४॥
स्वर, बुद्धि, नाभि, गंभीर हीं तीन । विद्या-कला पूर्ण जाणते ही ॥
जिव्हा, अधरोष्ठ तैंवी नेत्रकोण । तळहात जाण आरक्त ते ॥ ६ ॥
चक्रवर्ती पुत्र होईल हिजसी । शुल्क जें मागसी कथावें तें ॥ ७ ॥
मुनि म्हणे अष्टशत श्यामकर्ण । राया, दे आणून कन्येस्तव ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे अश्व चतुर्थांश । अधीन मी तुज म्हणे राजा ॥ ९ ॥

३८९

एका अपत्यार्थ अर्पी कन्या मज । पुरवीं मनोरथ राव म्हणे ॥ १ ॥
माधवी गालवासी म्हणे वर मज । होतांहि अपत्य कन्याांच मी॥
वरितील चार नृपाळ मजसी । मनोरथपूर्ति सहज तुझी ॥ ३ ॥
ऐकूनि हे वाणी हेतु हर्यश्वाचा । पुरतां पुत्राचा लाभ तया ॥ ४ ॥
'वसुमना' नामें भाग्यवंत सुत । लाभला तयास योग्य वेळीं ॥५॥
अष्टशत संख्यापूर्तीस्तव राव । झटला परी सर्व व्यर्थ यत्न ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कन्या कुमारिका । दानी दिवोदासा मुनिश्रेष्ठ ॥ ७॥

अध्याय ११७-११९ वा ३९०

प्रतर्दनपुत्र दिवोदासाप्रति । औशीनरालागीं शिबि झाला ॥ १ ॥
गरुडवचनें गालव पुढती । विश्वामित्राप्रति अर्पी कन्या ॥ २ ॥
दोनशतन्यून अष्टशत संख्या । अर्पूनि गुरूचा पुरवी हेतु ॥ ३ ॥
विश्वामित्रालागीं जाहला अष्टक । माधवी पित्यास अर्पी मुनि ॥४॥
कृतार्थ गालव यापरी जाहला । आनंदित झाला वासुदेव ॥ ५ ॥

अध्याय १२०-१२१ वा ३९१

नृपाळ ययाति माधवीसमेत । येई आश्रमांत गंगातीरीं ॥ १ ॥
आरंभी कन्येचें स्वयंवर प्रेमें । वन विरागानें कन्या वरी ॥ २ ॥

मृगांसवें राही वनांत ते धन्या । रागद्वेषशून्या काळ कंठी ॥ ३ ॥
कालवश राव स्वर्गामाजी जाई । दीर्घकाल राही आनंदानें ॥ ४ ॥
पुढती ययाति देवां तुच्छ लेखी । पडला भूमीसी पुण्यक्षयें ॥ ५ ॥
प्रतर्दनादिक दौहित्र तयाचे । करिती यज्ञातें वधती तया ॥ ६ ॥
इतुक्यांत कन्या माधवी येऊनि । सत्कर्म अर्पूनि तारिती त्या ॥७॥
गालवाहि अर्पी अष्टमांश पुण्य । वासुदेव धन्य म्हणे राव ॥ ८ ॥

अध्याय १२२ वा ३९२

चरणें भूमीलागीं स्पर्श । घडला नाहीं ययातीस ॥ १ ॥
स्वर्गीं जातां वरचेवर । ऐकवीती त्या दौहित्र ॥ २ ॥
अर्पीतसे वसुमना । दान-क्षमेचिया पुण्या ॥ ३ ॥
शौर्यप्राप्त सकल पुण्य । अर्पीतसे प्रतर्दन ॥ ४ ॥
शिवि म्हणे औशीनर । सत्यें होई स्वर्गी स्थिर ॥ ५ ॥
आली अष्टकाची वाणी । यज्ञपुण्य अर्पिलें मी ॥ ॥ ६ ॥
मातामहाचा उद्धार । करिती यापरी दौहित्र ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पुण्य । पितरां अर्पिती ते धन्य ॥ ८ ॥

अध्याय १२३ वा ३९३

नारद म्हणे कुरुश्रेष्ठा । चढतां ययाति तो स्वर्गा ॥ १ ॥
सन्मानिती त्यासी देव । भेटे तया ब्रह्मदेव ॥ २ ॥
राव म्हणे चतुरानना । पावलों मी कां पतना ॥ ३ ॥
ब्रह्मा म्हणे अभिमान । तुझ्या पतनाचें कारण ॥ ४ ॥
उच्च, नीच, कनिष्ठासी । तुच्छ न लेखी कदापि ॥
तोचि सर्वकाळ शांत । अहंमन्य तो अशांत ॥ ६ ॥
पतनारोहण आख्यान । ऐकतील जे सुजाण ॥ ७ ॥
येतां विघ्नही तयांसी । यशलाभ होई अंतीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ब्रह्मा । वदला ययातीसी जाणा ॥ ९ ॥

३९४

नारद म्हणे दुर्योधना । सोडीं सोडीं अभिमाना ॥ १ ॥
दुराग्रहें तो गालव । अभिमानें दुःखी राव ॥ २ ॥
ध्यानीं घेऊनि हे कथा । मार्ग स्वीकारीं शमाचा ॥ ३ ॥
नर आचरी जें कर्म । न चुके तयासी तें जाण ॥ ४ ॥
मित्र भ्राते न भोगिती । ज्याची तयासीच कृति ॥ ५ ॥
सख्य करीं पांडवांसी । प्रेमें आख्यान जे गाती ॥ ६ ॥
तयां त्रिवर्गाचा लाभ । प्राप्त होती दिव्य भोग ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे धन्य । व्हावें भारत ऐकून ॥ ८ ॥

अध्याय १२४ वा

३९५

नारदासी म्हणे धृतराष्ट्र दुःखें । सत्य वच तुझें करूं काय ॥ १ ॥
सत्ताहीन मज जाणें अस्वतंत्र । केशवा, हा पुत्र ऐको तुझें ॥ २ ॥
भीष्म, विदुरांचें ऐकेना हा पाहीं । उपदेश कांहीं करीं यातें ॥ ३ ॥
प्रार्थना वृद्धाची ऐकूनियां कृष्ण । बोलला वचन दुर्योधन ॥ ४ ॥
ऐक दुर्योधना, कुलीन तूं ज्ञाता । उचित शमाचा मार्ग तुज ॥ ५ ॥
निर्लज्ज, दुरात्मे, अकुलीन नर । मार्ग हा अघोर आचरिती ॥ ६ ॥
स्वहितार्थ वीरा, मार्ग हा त्यजावा । वंदितो माधवा वासुदेव ॥ ७॥

३९६

श्रेष्ठ कुळामाजी जन्म तुझा राया । शमचि करावा पांडवांसी ॥ १ ॥
भीष्म; द्रोणादिक सकलही ज्ञाते । इच्छिती ज्ञातीचें संरक्षण ॥ २॥
माय-बाप तुज करिती जो बोध । आठवेल तुज विघ्न येतां ॥ ३ ॥
पश्चात्ताप अंतीं होईल तुजसी । कां रे अवमानिसी सुहृज्जनां ॥ ४ ॥
दुष्टसहवास सुजनावमान । निंद्य आचरण स्वजन दोष ॥ ५ ॥
परकीयस्नेह दोष जया ऐसे । त्यागिते तयातें धरणीमाता ॥ ६ ॥
त्यागूनि पांडवां कर्णादिकां मान । अर्पिसी हें कर्म कोण करी ॥ ७ ॥
छळितांहि प्रेमें वागती तुजसी । ऐशा स्वकीयांसी वैर नको ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे हित'मित' पथ्य । वचन कृष्णोक्त ऐका सुखें ॥ ९ ॥

३१७

धर्म, अर्थ, कामयुक्त । कार्य आरंभिती श्रेष्ठ ॥ १ ॥
त्रिवर्ग हे न लाभतां । त्यजिती न ते धर्मार्था ॥ २ ॥
जरी एकाचीच प्राप्ति । धर्म श्रेष्ठ ते मानिती ॥ ३ ॥
सकळ पुरुषार्थांचें मूळ । धर्म एकचि केवळ ॥ ४ ॥
आत्मघातकी तो जाणा । कपटें नाडी जो सज्जना ॥ ५ ॥
अकल्याणा लोभ मूळ । त्याज्य क्रोधादि सकळ ॥ ६ ॥
प्राकृताचाही अवमान । अनहित करी जाण ॥ ७ ॥
दोषमग्नासी विस्मृति । अंतीं ओढवे आपत्ति ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे संत- । संगती, तें जनीं श्रेष्ठ ॥ ९ ॥

३१८

दुःशासन, कर्ण पार्थापुढें दीन । पार्थासवें कोण झुंज घेई ॥ १ ॥
साह्य मी तयांसी असतां दुर्योधना । कोण समरांगणा सिद्ध होई ॥
स्वर्गांतूनि देवां ओढील जो नर । झेली वा भूगोल, जिंकी पार्था ॥
भरतश्रेष्ठांचा होऊं नये नाश । कौरवांचा शेष राहो जनीं ॥ ४ ॥
यौवराज्यलाभ होईल तुजसी । शम पांडवांसी करिसी जरी ॥ ५ ॥
नको अवमानूं प्राप्त ही संपत्ती । अर्ध राज्य अर्पी पांडवांसी ॥ ६ ॥
सुहृद्‌वचनानें पांडवांसी शम । करूनि कल्याण साधीं राया ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे सुजनांसी बोध । निमित्तासी मूढ दुर्योधन ॥ ८ ॥

अध्याय १२५ वा

३१९

वचन ऐकूनि केशवाचें भीष्म । बोलला वचन सत्य, हित ॥ १ ॥
दुर्योधना, ऐकें केशवाची वाणी । व्यर्थ क्रोध मनीं आणूं नको ॥२॥
अवमानूं नको लक्ष्मी हे भारती । प्रजाविनाशासी करूं नको ॥३॥
माता-पितरांच्या शोकाचें कारण । करूनियां रण, होऊं नको ॥४ ॥
द्रोण म्हणे मीही कथीतसें तुज । सांगे अधोक्षज तेंचि हित ॥ ५॥
कर्णादिक दोष लावितील आम्हां । याहूनि तयांना बळ नसे ॥७॥
क्षत्ता म्हणे राया, धृतराष्ट्र, गांधारी । होतील भिकारी तुझ्यामुळें ॥

धृतराष्ट्र म्हणे कृष्णाचें वचन । अमृतासमान मानीं बापा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कृष्णअनादर । करील तो घोर कष्ट भोगी ॥ ९ ॥

अध्याय १२६ वा ४००

धृतराष्ट्रशब्दें भीष्म-द्रोण दुःखी । वदती पुनरपि दुर्योधना ॥१॥
जोंवरी न सज्ज होती कृष्णार्जुन । गांडीव न स्थान सोडी निज ॥
आहुती सैन्याची जोंवरी न धौम्य । अर्पूनियां यज्ञ आरंभिती ॥
क्रुद्ध होऊनियां धर्म नच पाहे । तोंवरीच आहे शममार्ग ॥ ४ ॥
आरोळी न फोडी जोंवरी हा भीम । तोंवरीच शम आचरावा ॥५॥
नकुळ, सहदेव, सत्यकि, विराट । जोंवरी हे शांत शम तोंची ॥६॥
स्कंधावरी तुझ्या सुलक्षणी हस्त । धर्माचा शमार्थ दिसो राया ॥
वासुदेव म्हणे कौरव-पांडव । घोषणा ते होवो एक ऐसी ॥ ८ ॥

अध्याय १२७ वा ४०१

दुर्योधन म्हणे कृष्णा । व्यर्थ दोष देसी आम्हां ॥ १ ॥
विदुरासवें धृतराष्ट्र । मज दोष देती सर्व ॥ २ ॥
करितां माझा द्वेष व्यर्थ । नसतां कांहींच अपराध ॥ ३ ॥
वारंवारही चिंतूनि । दोष लवही नये ध्यानीं ॥ ४ ॥
हरले द्यूतामाजी राज्य । यांत काय मम दोष ॥ ५ ॥
व्यर्थ करिती विरोधा । कांहीं शोधूनि निमित्ता ॥ ६ ॥
काय आमुचा अपराध । आम्हां दाविता कां धाक ॥ ७ ॥
कर्ण, भीष्म, द्रोण-कृपां । वीर कोण जिंकी ऐसा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कैसें । पहा तत्त्व हें स्वार्थाचें ॥ ९ ॥

४०२

माधवा, आम्हांसी रण हा स्वधर्म । युद्धांत मरून स्वर्ग भोगूं॥१॥
केवळ जीवित रुचे न वीरासी । सदैव भ्याडासी मृत्युभय ॥ २ ॥
सर्वकाळ यत्न करणें तें पौरुष । प्रणाम शत्रूस मरण तेंचि ॥ ३ ॥
अस्थानींही भेद योग्य वेळूसम । लाभ न नमून आम्हांप्रति ॥ ४
धर्मास्तव वंदू केवळ ब्राह्मणां । नत अन्य कोणा वीर न हा ॥ ५

बालभावें पूर्वीं दिलें अर्धराज्य । केशवा न प्राप्त आतां कोणा ॥६॥
सूच्याग्रविद्धहि भूमि पांडवांसी । लाभे न कदापि निश्चय हा ॥७॥
वासुदेव म्हणे सिद्ध प्राणार्पणा । दुर्योधन कृष्णा वदला आम्हीं ॥

अध्याय १२८ वा

४०३

दुर्योधनवाक्य ऐकूनि श्रीकृष्ण । आरक्त नयन क्रोधें बोले ॥ १ ॥
युद्धामाजी इच्छा होईल ती पूर्ण । लाभेल शयन समरांगणीं ॥२॥
स्थिर करीं हेचि दुर्बुद्धि भारता । घोर संग्रामाचा योग तेणें ॥ ३ ॥
मूढा, पांडवांचा अपराध न कांहीं । निजांतरीं, पाहीं विचारूनि ॥
ऐश्वर्यें संतप्त होऊनियां द्यूत । आरंभिलें दुष्ट धरूनि हेतु ॥ ५ ॥
निष्पाप भ्रात्यांसी अविचारें द्यूत । खेळूनि वैरास आरंभिलें ॥ ६ ॥
प्राणाहूनि प्रिय पांडवांसी कृष्णा । स्मरें दुर्योधना दुष्कर्म तें ॥ ७ ॥
दुष्ट वचनें तीं ऐकिलीं सर्वांनीं । उद्वेगाचि मनीं वासुदेवा ॥ ८ ॥

४०४

धार्मिक बांधवां कोण ऐशापरी । अश्लाघ्य व्यवहारीं गुंतवील ॥१॥
दुर्योधना, कर्ण-दुःशासनासवें । वदलासी न वदावें अनार्य तें ॥ २॥
वारणावतासी लाक्षागृहीं दाह । व्हावया उपाय योजिलासी ॥ ३ ॥
विष-सर्पादिक कुमार्ग बहुत । योजूनि अपराध म्हणसी काय ॥ ४ ॥
पितृराज्यअंश मागतां न देसी । परी तें प्राप्तचि देणें तुज ॥ ५ ॥
गुरुजनांतेंही करिसी मिथ्यावाद । शम उभयांस श्रेयस्कर ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अधर्म, अयश । जोडिसी, रायास वदला कृष्ण ॥७॥

४०५

वदतां यापरी श्रीकृष्ण । उठूनि बोले दुःशासन ॥ १ ॥
राजा, न करिसील शमा । तरी कौरव आपणां ॥ २ ॥
बांधूनियां पांडवांसी । अर्पितील ऐसी मति ॥ ३ ॥
ऐकूनियां हें वचन । क्रोधें उठला दुर्योधन ॥ ४ ॥
अवमानूनि सकळांसी । जाई त्यागूनि सभेसी ॥ ५ ॥
अनुसरले सकळ भ्राते । अमात्यादि तेंवी राजे ॥ ६ ॥

दुःखाकुल भीष्म म्हणे । नाश क्षत्रियांचा येणें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण । बोले भीष्मादिकां जाण ॥ ८ ॥

४०६

वयोवृद्ध तुम्हीं असतां सभेसी । वार्ता निग्रहाची कां न येई ॥ १ ॥
प्रमादचि कैसा घडतो हा महा । पातलासे पहा निग्रहकाल ॥ २ ॥
हितार्थ तुम्हांसी कथितों तें ऐका । परिणामीं सौख्या प्राप्त व्हाल॥
पितृराज्य घेतां वधिलें कंसासी । स्थापिलें राज्यासी उग्रसेना ॥
देवासुरयुद्ध होतां पूर्वकाळीं । घोर वेळ आली संहाराची ॥ ५ ॥
प्रजापति तदा बोलला यमासी । दानव-दैत्यांसी बद्ध करा ॥ ६ ॥
अद्यापि ते बद्ध वरुणालयांत । याचिमार्गे सौख्य सकलां होई ॥
त्यापरी राया दुर्योधन, कर्ण । शकुनि, दुःशासन बद्ध व्हावे ॥८॥
कुळास्तव एका त्यजूनियां शम । आचरितां प्राण वांचतील ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे पांडवांआधीन । कैसा दुर्योधन सौख्य मानी ॥ १०॥

अध्याय १२९ वा

४०७

कृष्णवचन ऐकुनि । धृतराष्ट्र बोले वाणी ॥ १ ॥
जा जा विदुरा, त्वरित । घेऊनि ये गांधारीस ॥ २ ॥
ऐको तियेचें तो तरी । सौख्य नांदो माझ्या घरीं ॥ ३ ॥
तत्काळचि गांधारीसी । आणविलें सभेमाजी ॥ ४ ॥
राव म्हणे पुत्र तुझा । करूनि गेला सभात्यागा ॥ ५ ॥
वाटे पावेल विनाश । करीं तया कांहीं बोध ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे तदा । वदली साध्वी काय ऐका ॥ ७ ॥

४०८

राज्यलोलुप पुत्रासी । त्वरित आणा या स्थळासी ॥ १ ॥
महा उद्धत, अशिष्ट । नृपा, भोंवती हे लाड ॥ २ ॥
जाणूनिही तो प्रमत्त । पुरविले त्याचे कोड ॥ ३ ॥
मुख्य दोष हा नृपाचा । शक्य निग्रह न आतां ॥ ४ ॥
राज्य दुर्जनाच्या हातां । देतां परिणाम हा अंतीं ॥ ५ ॥

सामादि नीं होतां कार्य । योजी दंड तो अनार्य ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे माता । पाचारितां येई राजा ॥ ७ ॥

४०९

माता म्हणे वत्सा ऐक दुर्योधना । ज्ञात्यांच्या वचना मान देई ॥१॥
यथेच्छ वर्तनें नसे राज्यलाभ । अथवा उपभोग, रक्षणही ॥ २ ॥
जितेंद्रियालागीं चिरराज्यलाभ । हरिती कामक्रोध वैभवातें ॥ ३ ॥
इच्छिताती राज्य सकलही जन । परी संरक्षण कठिण असे ॥४॥
राज्येच्छु नरानें इंद्रियें जिंकावीं । धर्मार्थीं योजावीं निग्रहानें ॥ ५ ॥
मोकाट इंद्रियें अदान्त ते अश्व । नाशिती सर्वस्व सारथ्याचें ॥६॥
कामक्रोधाधीना कोणी न मानिती । विजयाची प्राप्ति नसे तया ७
वासुदेव म्हणे पांडव बलवान । साह्य भगवान् कृष्ण त्यांसी ॥ ८ ॥

४१०

बुद्धिवंता दुर्योधना । परिस्थिति आणीं ध्याना ॥ १ ॥
भेदभयें पांडवांस । दिधलें होतें अर्धराज्य ॥ २ ॥
निष्कंटक केलें त्यांनीं । भोगितसां तें घे ध्यानीं ॥ ३ ॥
इच्छिसी तूं जरी सौख्य । अर्पी तयां अर्धराज्य ॥ ४ ॥
वैर केलें आजवरी । सुज्ञपणा आतां वरीं ॥ ५ ॥
भीष्म-द्रोण उभयां सम । जरी जागतील अन्न ॥ ६ ॥
वत्सा, लोभानें संपत्ति । प्राप्त नसे कोणा जगीं ॥ ७ ॥
अनावर असे लोभ । शमाचा तूं वरीं मार्ग ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे माता । प्रेमें बोध करी सुता ॥ ९ ॥

अध्याय १३० वा

४११

मातृवचन तें लेखूनियां तुच्छ । त्यागूनि सभेस जाई दुष्ट ॥ १ ॥
संकल्प खलांनीं पुढती एक केला । बद्ध केशवाला म्हणती करूं ॥
भीष्म-धृतराष्ट्रासवें त्या बांधितां । धीर पांडवांचा गळेलचि ॥ ३ ॥
इंगित तें आणी सात्यकि ध्यानांत । कथिला संकेत कृष्णाप्रति ॥४॥
तैसेंचि रायासी कथिलें सभेमाजी । दूतनिग्रहाची इच्छा तयां ॥५॥

अग्निज्वाला जैंवी झांकूं म्हणे बाळ। तैसाचि हा खेळ मानिती हे ॥
क्षत्ता म्हणे राया, पुत्रांचा विनाश। पातला सन्निध निश्चयानें ॥७॥
इच्छितां क्षणार्धें करील संहार। परी शारङ्गधर विवेकी हा ॥८॥
वासुदेव म्हणे लोभाची झांपड। विनाश उघड, दासवींना ॥ ९ ॥

४१२

लीला विग्रही श्रीकृष्ण। वदला धृतराष्ट्रालागून ॥ १ ॥
कोण निग्रह कोणाचा। करितो पाहील ही सभा ॥ २ ॥
येवोत ते सुखें सर्व। हरीन मी त्यांचा गर्व ॥ ३ ॥
राजाज्ञेनें दुर्योधना। आणविलें सभास्थाना ॥ ४ ॥
केला उपदेश फिरूनि। 'क्रूरा' 'पातक्या' म्हणूनि ॥ ५ ॥
धरीन वाऱ्याची झुळुक। चंद्र झेलीन करांत ॥ ६ ॥
ऐसें वाटावें शिशूसी। म्हणे क्षुद्र इच्छा तैसी ॥ ७ ॥
विदुर म्हणे तो 'द्विविद'। नरकासुरही प्रसिद्ध ॥ ८ ॥
करितां यत्न पस्तावला। कृष्ण आधार जगाला ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे क्षत्ता। वर्णी कृष्णाच्या सामर्थ्या ॥ १० ॥

अध्याय १३१ वा

४१३

कृष्ण म्हणे मज एकाकी मानिसी। दुर्योधना, माझी शक्ति पहा ॥
ऐसें बोलूनियां हांसे जगन्नाथ। चमत्कार स्पष्ट होई तदा ॥ २ ॥
ललाटीं तो ब्रह्मा, वक्षस्थळीं रुद्र। दिसती लोकपाल भुजांवरी ॥
मुखांतूनि स्पष्ट येती अग्निज्वाला। दिसती त्या स्थळा सकळ देव
गंधर्व, राक्षस, एकरूप झाले। पांडव शोभले पृष्ठभागीं ॥ ५ ॥
शंख, चक्र, गदा, आयुधें शोभती। अन्यही झळकती असंख्यात ॥
रोमरोमीं शोभे सूर्यासम कांति। कंप दुर्जनांसी पाहूनि त्या ॥ ७ ॥
भीष्म, द्रोण, क्षत्ता, संजयादि तुष्ट। पुष्पवृष्टि, नाद दुंदुभीचा ॥८॥
वासुदेव म्हणे ऐका धृतराष्ट्र। विनवी कृष्णास तेंचि आतां ॥ ९ ॥

४१४

यादवेंद्रा हो प्रसन्न। मजलागीं दे दर्शन ॥ १ ॥
अन्य इच्छा नसे कांहीं। तुझें विश्वरूप दावीं ॥ २ ॥

घडो दिव्यदृष्टिलाभ । पुनरपि होवो लुप्त ॥ ३ ॥
अहो तदा चमत्कार । अंधासी त्या येतो नेत्र ॥ ४ ॥
झालें गंभीर तें स्थान । मुनि करिती स्तवन ॥ ५ ॥
पृथ्वी कांपे थरथर । क्षुब्ध जाहले सागर ॥ ६ ॥
सामर्थ्याचा उपसंहार । पुढती करी गदाधर ॥ ७ ॥
होते 'हार्दिक्य' 'सात्यकि' श्रीहरीच्या दोहोंभागीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे मुनि । गुप्त, उठता चक्रपाणी ॥ ९ ॥

४१५

कौरव तयाच्या मागोमाग जाती । दुर्लक्षूनि त्यांसी पुढती गेला ॥
सज्जचि दारुक जोडूनियां रथ । बैसे जगन्नाथ रथावरी ॥ २ ॥
हार्दिक्यादि तेही झाले रथस्थित । धृतराष्ट्र कृष्णास वदला तेव्हां ॥
जनार्दना, माझा न चले उपाय । सकल पार्थिव जाणती हें ॥ ४ ॥
लवही न शंका येवो तुज माझी । कृष्ण सकळांसी वदला तेव्हां ॥
सभात्यागी पुत्र, पिता हा दुर्बल । जाणती सकळ घडलें जें जें ॥
असो आतां येतों असावी अनुज्ञा । बोलूनि स्यंदना हांकीं म्हणे ॥
वासुदेव म्हणे विदुरगृहासी । कुंतीच्या भेटीसी जाई कृष्ण ॥ ८ ॥

अध्याय १३२ वा

४१६

त्वरित येवोनियां कृष्ण । वंदी कुंतीचे चरण ॥ १ ॥
निवेदूनि सकल वृत्त । म्हणे त्वरित कौरवनाश ॥ २ ॥
देई संदेश धर्मासी । कथीन मी तयाप्रति ॥ ३ ॥
कुंती म्हणे सांगें बाळा । क्षात्रधर्म कां त्यागिला ॥ ४ ॥
धनद मुचकुंदाप्रति । राज्य देतां न घेईचि ॥ ५ ॥
विक्रमें तें संपादितां । तोष वाटला धनदा ॥ ६ ॥
स्वर्ग, धर्मवंत नृपा । नरकपतन अधार्मिका ॥ ७ ॥
युगप्रवर्तक राव । न धरी यामाजी संदेह ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कुंती । दावी कर्मासम गति ॥ ९ ॥

४१७

नृपाळाचा दोष लागे प्रजेलागीं । नृपाळहि भोगी प्रजादोष ॥ १ ॥
यास्तव नृपाळा, श्रेष्ठ राजधर्म । जाणूनि स्वकर्म त्यागूं नको ॥ २ ॥
पूर्वजांची इच्छा विफल न करीं । संतोष अंतरीं सकलां देईं ॥ ३ ॥
एकमेव शौर्य क्षत्रियांचा धर्म । सेवा, धनार्जन शूद्र-वैश्यां ॥ ४ ॥
भिक्षाचरण तें विहित विप्रासी । जिंकूनि शत्रूसी राज्य जोडीं ॥ ५ ॥
वत्सा युधिष्ठिरा, तुझी वीरमाता । कसी उपजीविका करी पहा ॥ ६ ॥
भैक्ष्यचर्यत्यागें शौर्याचा अवलंब । करूनि आनंद पितरां देईं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पितृभगिनीचा । उपदेश ऐसा ऐके कृष्ण ॥ ८ ॥

अध्याय १३३ वा

४१८

कृष्णा, अन्य कथा सांगतें मी तुज । विस्तारें धर्मास कथन करीं ॥
विदुला गुणवती विख्यात सम्राज्ञी । बोलतसे वाणी पुत्रालागीं ॥
सिंधुराज तया जिंकी युद्धामाजी । दीन वदनेंमी बसला होता ॥ ३ ॥
माता म्हणे तुज दिधलासे जन्म । शोकासी कारण झालासी तूं ॥ ४ ॥
माता-पिता तुझे अन्याचि कीं सांग । ऐसा कैसा क्लीब जाहलासी ॥
अभिमानशून्य होऊं नको ऐसा । भार घे राज्याचा शिरावरी ॥ ६ ॥
ऊठ हो निर्भय विघ्नें निवारूनि । विजयाची मनीं ईर्षा धरीं ॥ ७ ॥
चार कणें भरे मूषकाची मुष्टि । होऊं नये तुष्टी स्वल्पें तैसी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे बंधु तपस्व्याचा- । संतोष, वीराचा परी वैरी ॥ ९ ॥

४१९

सर्पमुखीं घालीं हात । देईं आव्हान यमास ॥ १ ॥
उदार हो प्राणांवरी । कांहीं दिव्य कर्म करीं ॥ २ ॥
मारी भरारी गगनांत । श्येनाप्रमाणे घेईं झेंप ॥ ३ ॥
गुप्तमार्गे छिद्र शोधीं । ऊठ प्रेतभाव त्यागीं ॥ ४ ॥
नको होऊं अस्तंगत । विक्रमेंचि हो प्रसिद्ध ॥ ५ ॥
साम, भेद ते मध्यम । दानमार्ग तो अधम ॥ ६ ॥
युद्धभूषण शूरासी । अवलंबीं मार्ग तोचि ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे माता । स्फूर्ती देई निजसुता ॥ ८ ॥

४२०

बाळा, प्रज्वलित होई चकाकून । तुषाग्नीसमान धुमसूं नको ॥१॥
संग्रामेंचि होई धर्मऋणमुक्ति । क्रूर, मृदु,लोकीं होऊं नको ॥ २॥
जयापजयाचा नसे हर्ष शोक । जाणूनि सामर्थ्य यत्न करीं ॥ ३ ॥
केवळ धनेंसी न व्हावा संतोष । धारातीर्थी देह पुनित करीं ॥४॥
नष्ट राज्यैश्वर्य, नष्ट यश, कीर्ति । होतां जीवितेंसी काय लाभ ॥५॥
पडता-बुडतांहि ओढावें शत्रूसी । प्रयत्न कदापि सोडूं नये ॥ ६ ॥
ईर्षा धरी, जैंवी जातिवंत अश्व । म्हणे वासुदेव तैसा वीर ॥ ७ ॥

४२१

कोण्याहि सद्गुणें नसे जो विख्यात। मातेची तो स्पष्ट समजें विष्ठा
निरुत्साहें तुझ्या क्लेश सकलांसी । व्यर्थ या कलीसी जन्म दिला।
तुजसम पुत्र न होवो कोणासी । वीर जो अमर्षि पुरुष तोचि ॥३।
क्षणभरी तरी वांकवी शत्रूसी । वीर पुरुष तोचि म्हणती ज्ञाते।॥४॥
स्वाभिमानशून्य तोचि नपुंसक । संततीसी सौख्य मरतां शूर ॥५॥
पुत्र म्हणे माते, माझिया मरणें । तुज ऐश्वर्यानें काय सौख्य ॥ ६॥
माता म्हणे पक्वफलयुक्त वृक्ष । आधार जनांस तैसें व्हावें ॥७॥
वासुदेव म्हणे स्वबळें उत्कर्ष । पावे तोचि श्रेष्ठ कीर्तिवंत ॥ ८ ॥

अध्याय १३४ वा

४२२

जीविताची आशा धरूनि भीरुता । वरी तया ज्ञाता तस्कर म्हणे।
मरणोन्मुखासी न रुचे औषध । तैसे माझे शब्द तुजसी, वाटे ॥२।
सिंधुपतीलागीं प्रजा न अनुरक्त । दौर्बल्यें विनाश चिंती त्याचा।
साह्यकर्ते तुज साह्यास्तव सिद्ध । दुःखी आश्रयार्थ येतील जे ॥४।
संग्रह तयांचा करूनि हो सिद्ध । होई दुर्गस्थित समय शोधीं ॥
निश्चयें समय लाभेल त्वरित । नसे अमरत्व शत्रूलागीं ॥ ६ ॥
'संजय' हें नाम सार्थ करीं बाळा । भविष्य बोलला विप्र एक ॥
महत्संकटीं हा होईल यशस्वी । सत्य ते करावी विप्रवाणी ॥ ८॥
वासुदेव म्हणे कार्यासी लाभती । साह्यकर्ते जगीं निश्चय हा ॥९॥

४२३

लाभालाभसम मानूनि हो सिद्ध । युद्धपराङ्मुख होऊं नको ॥१॥
कर्तव्यत्यागानें दरिद्रता येई । मरणाचि पाहीं दारिद्र्य तें ॥ २ ॥
माता, भार्या, दुःखी केंवि पाहसील । त्यजितां परिवार सौख्य काय
आजवरी कोणी नकार याचका । दिला न बालका क्षत्रियानें ॥४॥
आधार, आश्रित होईल हा जरी । प्राणत्याग तरी करीन मी ॥५॥
वासुदेव म्हणे सद्गुण हे थोर । काय जाणे क्षुद्र दैन्यवाणा ॥ ६ ॥

४२४

होई सागरीं आधार । बाळा, दावीं परतीर ॥ १ ॥
होई बुडत्यालागीं नौका । आधार हो निराश्रितां ॥ २ ॥
आम्हां मृतां संजीवन । देई संजया लढून ॥ ३ ॥
पापी जीवनाचा त्याग । करीं न होई तूं क्लीब ॥ ४ ॥
यत्न करितां उत्साहें । विजय लाभेल निश्चयें ॥ ५ ॥
रणामाजीं शत्रुवध करी वीर तो प्रसिद्ध ॥ ६ ॥
वृत्रवधें इंद्र ख्यात । विजयें होई तूं विख्यात ॥ ७ ॥
समरीं मृत्यु कीं विजय । परम सौख्याचे उपाय ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे माता । सिद्ध करी धर्मयुद्धा ॥ ९ ॥

४२५

हीन पराधीन होऊं नको कदा । वैभवसंपदा संपादीं ते ॥ १ ॥
विद्या, कुलयुक्त होतां पराङ्मुख । अदान्त वृषभ भारवाही ॥ २ ॥
शत्रूंच्या मागूनि नम्रभावें जातां । तुजसी पाहतां वरिन मृत्यु ॥३॥
क्षत्रधर्मरत कोणीहि पूर्वज । शत्रूलागीं नत नाहीं झाला ॥ ४ ॥
निरंतर यत्न पुरुषार्थ तोचि । सिद्ध प्रयत्नासी होई बाळा ॥ ५ ॥
अस्थानींहि भंग वीराप्रति योग्य । नम्र हें मस्तक नसो कोठें ॥६॥
मत्त गजासम करावा संचार । वंद्य एक विप्र असो सदा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे खलासी शासन । वीरातें भूषण सर्वकाळ ॥ ८ ॥

अध्याय १३५ वा

४२६

पुत्र म्हणे माते, होऊनि निष्ठूर । कां वो तिरस्कार करिसी माझा ॥

क्षत्रवृत्ति अति निर्दय ही भासे। आपुल्या पुत्राचें मरण इच्छी ॥२॥
मायबो, तुझा मी एकुलता एक। शत्रूसम घात करिसी कैसा ॥३॥
माता म्हणे वत्सा, प्राणाहूनि धर्म। श्रेष्ठचि म्हणून कथिलें ऐसें ॥
अस्थानीं दया हें नसेचि वात्सल्य। गर्दभी दुर्बल करी पुत्रा ॥ ५ ॥
आत्मा अमर हें जाणूनि सर्वदा। मोह नश्वराचा धरूं नये ॥ ६ ॥
युद्ध, जय हेंचि क्षत्रियाचें साध्य। मरणेंहि स्वर्ग तेणें तया ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे स्वधर्मपालन। हाचि श्रेष्ठ धर्म सकळांसी ॥ ८ ॥

४२७

पुत्र म्हणे दया करीं मजवरी। माता तैं अंतरीं खिन्न होई ॥ १ ॥
म्हणे वत्सा, वध सैंधवाचा जेव्हां। करिसील तेव्हां सन्मान्य तूं ॥
पुत्र म्हणे माते, साह्यावीण रण। विजयद जाण कैंवी होई ॥ ३ ॥
माता म्हणे दैन्यें आपुला आपण। ऐसा अवमान करूं नये ॥ ४ ॥
प्राप्त अर्थ नष्ट, अप्राप्ताचा लाभ। अन्याचा विनाश होई जनीं ॥ ५ ॥
यास्तवचि क्रोधें न करीं आरंभ। विवेकाचा मार्ग वरिती ज्ञाते ॥ ६ ॥
कर्ममार्गीं यश-अपयश दोन्हीं। एकचि अकर्मीं अपयश। ७ ॥
अर्थ ते अनित्य जाणितां समृद्धि। सकल नासती विघ्नें त्याचीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे धरूनि विश्वास। आरंभितां यश कार्यामाजी ॥ ९ ॥

४२८

काल हाचि विक्रमाचा। पुत्रा, लाभ घेईं त्याचा ॥ १ ॥
क्रुद्ध, लोभी जे गर्विष्ठ। दुर्बल जे स्पर्धायुक्त ॥ २ ॥
तुझ्या असती जे आश्रया। वेतनादि अर्पीं तयां ॥ ३ ॥
करीं संग्रह तयांचा। लोभ जोडीं परिजनांचा ॥ ४ ॥
प्रातःकाळीं उठूनि नित्य। करीं सकलांसी संतुष्ट ॥ ५ ॥
ऐसे सिद्ध होतां जन। सहज लाभे यश जाण ॥ ६ ॥
सिद्ध होतां प्राणार्पणा। निद्रा न लाभे वैऱ्यांना ॥ ७ ॥
सामदानादि योजावे। समयीं शमें पुढती जावें ॥ ८ ॥
निर्धनासी त्यजिती मित्र। नसे वैरी विश्वासार्ह ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे युक्ति। जगामाजी परमशक्ति ॥ १० ॥

अध्याय १३६ वा ४२९

नृपाळानें सदा निर्भय असावें । भय दाऊं नये असतां मनीं ॥ १ ॥
दावितांचि भय ओढवे अनर्थ । सकलहि राष्ट्र भय पावे ॥ २ ॥
त्यागिता ति कोणी अवमानित क्रुद्ध । येती विनाशार्थ अंगावरी ॥ ३ ॥
एकनिष्ठ तेचि सेविती नयासी । ऊठ निराशा हो त्यागूनियां ॥ ४ ॥
राजनिष्ठ तुझ्या साह्यासी येतील । घेई उग्ररूप सज्ज होई ॥ ५ ॥
विपुल द्रव्य मी दावीन तुजसी । विपुल साह्यासी असती वीर ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कुंती कृष्णाप्रति । वदे विदुलेची वाणी ऐसी ॥ ७ ॥

४३०

म्हणे उत्साहें संजय । संपादिन माते, जय ॥ १ ॥
तुझ्यासम असतां माता । लवही न भय चित्ता ॥ २ ॥
सागरांत बुडतां भूमि । तेही उद्धरीन क्षणीं ॥ ३ ॥
पितृराज्यास्तव प्राण । आनंदानें हा अर्पीन ॥ ४ ॥
वज्रासम तुझें चित्त । वाणी अमृत प्रत्यक्ष ॥ ५ ॥
वदलों त्याची करीं क्षमा । सिद्ध जाहलों मी रणा ॥ ६ ॥
कृष्णा, संजय पुढती । शौर्यें विजय संपादी ॥ ७ ॥
नृप धैर्यहीन होतां । कथावी हे पुण्यकथा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे भाग्य । भारतीयां श्रेष्ठ बोध ॥ ९ ॥

४३१

विजयेच्छूनें हा ऐकावा इतिहास । नाम या प्रसिद्ध जय हेंचि ॥ १ ॥
श्रवणें विनाश होईल शत्रूचा । लाभे अजिंक्यता जगामाजी ॥ २ ॥
संस्कार हा असे वीरपुत्रदाता । होई वीरमाता गर्भिणी ते ॥ ३ ॥
विद्या, तप, दानें शूरत्व लाभेल । श्रद्धा वळावेल धर्मावरी ॥ ४ ॥
दुर्जननियंता, सत्यपराक्रमी । क्षत्रियजननी पुत्रलाभे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे संजय-विदुला । संवाद हा भला परिसा नित्य ॥ ६ ॥

अध्याय १३७ वा ४३२

कुंती म्हणे कृष्णा, देववाणी पार्था । निवेदूनि युद्धा सिध्द करीं ॥
भीमादिकां तैसी देवोनि चेतना । सिध्द करीं रणा यादवेंद्रा ॥ २ ॥

योग्यशब्दें सर्वां कुशल कथोनि। निरोप देऊनि भीष्मादिकां ॥ ३ ॥
निजरथावरी कर्णासी घेवोनि। गजपुर सोडूनि पुढती गेला ॥ ४ ॥
कर्णासी बहुत करूनियां बोध। पुरी उपप्लव्य गांठीनसे ॥ ५ ॥
विनाशचि आतां मानिती कौरव। पुढती वासुदेव वृत्त कथी ॥ ६ ॥

अध्याय १३८ वा　　　४३३

भीष्म द्रोण पुनरपि। दुर्योधना स्मृति देती ॥ १ ॥
म्हणती करूनि विचार। स्वीकारीं तो शम थोर ॥ २ ॥
पांडवांची होवो भेटी। तेणें संतोष सर्वांसी ॥ ३ ॥
होती दुश्चिन्हें सदनीं। पुढती पश्चात्ताप रणीं ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे द्रोण। कथिती बोध धर्मपूर्ण ॥ ५ ॥

अध्याय १३९ वा　　　४३४

अधोमुख दुर्योधन। पाहूनियां वदती भीष्म ॥ १ ॥
हाय हाय पांडवांसी। आम्हां वेळ संगराची ॥ २ ॥
द्रोण म्हणती पुत्राहून। माझें पार्थावरी प्रेम ॥ ३ ॥
क्षत्रधर्मासी धिक्कार। प्रसंग हा वाटे घोर ॥ ४ ॥
निवारितांहि दुरात्मा। पापमार्ग तो सोडीना ॥ ५ ॥
पुण्यवंत तो आघात- । होतांही, न करी पाप ॥ ६ ॥
केला उपदेश सकळांनीं। परी आणिसी न ध्यानीं ॥ ७ ॥
पांडव ते कांतेसह। पुण्यें जोडिती वैभव ॥ ८ ॥
आम्हीं दोघे झालों वृद्ध। कां रे लोटितोसि सुख ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे द्रोण। वदती कर्तव्य जाणून ॥ १० ॥

अध्याय १४० वा　　　४३५

धृतराष्ट्र म्हणे श्रीकृष्ण कर्णासी। वदला तें मजसी सकळ सांग ॥
सूत म्हणे राया, राधेयासी कृष्ण। वदला कानीन कुंतीचा तू॥२॥
ज्येष्ठ बांधव तूं होसी पांडवांचा। अधिकारी राज्याचा तूंचि कर्णा
मजसवें येईं वास्तव कौंतेया। सकल वैभवा भोगीं सुखें ॥ ४ ॥
सकलहि आम्हीं तुझे अनुचर। प्रेमें युधिष्ठिर नमिल तुज ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण कर्णाप्रति। बोधूनि भेदाची युक्ति योजी ॥ ६ ॥

अध्याय १३१ वा ४३६

कर्ण म्हणे कृष्णा, सौहृद तुजसी । वद्वी भाषा तेंवी कल्याणेच्छा
पंडूचा मी पुत्र त्यागिलें कुंतीनें । सूर्याच्या वचनें कैसें मज ॥ २॥
योग्य न तो त्याग, तात अधिरथ । राधा माय देख पुढती माझी ॥
वसुषेण नामें वाढलों तेथेंचि । पुत्र-पौत्रप्राप्ति मज आतां ॥ ४ ॥
कृष्णा, राज्यास्तव त्याग मी तयांचा । न करीं सर्वथा सत्य जाण॥
दुर्योधनस्नेहें त्रयोदश वर्षें । राज्याचि आनंदें केलें जाण ॥ ६ ॥
विश्वासेंचि माझ्या पांडवांसी वैर । करी कौरवेंद्र जाणसी तूं ॥७॥
पार्थ मम, मीहि तयाच्या वधाची । प्रतिज्ञा ते साची केली असे ॥
आतां सख्य तेंचि दोघां अपयश । वासुदेव साच म्हणे तेंहि ॥ ९॥

४३७

हितबुद्धीनेंचि कथिसी हें मज । तुझी आ ता पार्थ ऐकेलहि ॥ १ ॥
कुंतीपुत्र मी हें परी धर्माप्रति । न कथीं हे माझी विनती तु त ॥२॥
कळतां तो मज अर्पील स्वराज्य । तेणें कौरवांस लाभेल तें ॥ ३ ॥
अधार्मिकां तयां साम्राज्य लाभतां । कारण जनांच्या नाशासि तें ॥
युधिष्ठिर होवो शाश्वत नृपाळ । पार्थ घननीळ साह्य जया ॥ ५ ॥
भीमादिक वीर साह्य तयाप्रति । सहज हे पृथ्वी वश तया ॥ ६ ॥
सकळ नृपाळ मानिती गोविंदा । युधिष्ठिर राजा मेदिनीचा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे यज्ञमय रण । वर्णीतसे कर्ण प्रेमभरें ॥ ८ ॥

४३८

वेत्ता अध्वर्यूही तूंचि या यज्ञाचा । कपिध्वज ‘ होता ’ अस्त्रें मंत्र ॥
गांडीव ते स्रुक, विक्रमचि आज्य । उद्गाता सौभद्र, भीम स्तोता ॥
ब्रह्मा युधिष्ठिर, वाद्यें आवाहक । ‘ शामित्र ’ सहदेव, नकुळहि ॥३॥
रथपंक्ति यूप, बाणचि बृंहण । तोमरादि सोमपात्रें कृष्णा ॥ ४ ॥
चापेंचि पवित्रें, कपाल तें खड्ग । तेथ पुरोडाश मस्तकांचि ॥ ५ ॥
रुधिर तो हवि, शक्ति-गदा काष्ठें । जाण द्रोणादि ते सदस्यहि ॥६॥
‘प्रतिप्रस्थानिक ’ सात्यकि जाणावा । दीक्षित गणावा दुर्योधन॥७॥

सेना पत्नी, घटोत्कच तो शामित्र । दक्षिणा द्रुपदसुत योद्धा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे शस्त्रयज्ञ ऐसा । त्या धार्तराष्ट्रांचा वर्णी कर्ण ॥ ९ ॥

४३९

कृष्णा, पश्चात्ताप होतसे मजसी । कटु वचनें तीं वदलों वीरां ॥१॥
पार्थहस्तें कर्णवध तोचि यज्ञ । रुधिरप्राशन 'सुत्या' जाणे ॥२॥
भीष्म-द्रोणवध यज्ञावसान तें । दुर्योधनवधें यज्ञपूर्ती ॥ ३
दुःखाश्रूंचा पूर तेंचि अवभृथ । करितील दुःख सकळ स्त्रिया ॥४॥
वासुदेव म्हणे भीषण हा यज्ञ । रोमांच ऐकून अंगावरी ॥ ५ ॥

४४०

वृद्धवीर रणाविना । मृत्यु न पावोत कृष्णा ॥ १ ॥
पावन या कुरुक्षेत्रीं । निधन पावो क्षत्रियमांदी ॥ २ ॥
घडो इष्ट जें तुजसी । तेणें वीरां स्वर्गप्राप्ति ॥ ३ ॥
जोंवरी हे सरिता, गिरी । कीर्ति राहील तोंवरी ॥ ४ ॥
मृत्यु, विक्रम, कीं जय । धन मानिती क्षत्रिय ॥ ५ ॥
सिद्धांत हा या युद्धाचा । विप्र कथितील साचा ॥ ६ ॥
घडवीं पार्थ-कर्णयुद्ध । राखीं जन्मवृत्त गुप्त ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण । ऐका वदला जें हांसून ॥ ८ ॥

अध्याय १४२ वा

४४१

कर्णा, राज्यलोभ जरी न तुजसी । तरी पांडवांसी विजय जाण ॥१
कपिध्वज श्रेष्ठ उभारिला पार्थें । योजन तयातें उंची एक ॥ २ ॥
शुभ्र अश्व, कृष्ण सारथी जयाचा । पाहसील त्याचा पराक्रम ॥३।
धर्म, अर्थ, काम, मोक्षही न तुज । मर्दील मातंग भीम दुष्टां ॥ ४ ॥
भीष्म-द्रोणादिकां भिडेल जें पार्थ । तैंवी नकुळादिक गर्जतील॥५॥
कर्णा, काय पाड कौरवांचा तेव्हां । निरोप कथावा द्रोणादिकां॥६॥

---

१ समूह

कार्तिक हा सौम ऋतु सुखावह । अमावास्या देख सप्तम दिनीं॥७॥
अमा ते इंद्राची सिद्ध व्हा रणासी । लाभेल सद्गति सकलां रणीं ॥
वासुदेव म्हणे कर्णाचें वचन । ऐका नवलपूर्ण पुढती आतां ॥ ९ ॥

अध्याय १४३ वा ४४२

जाणूनियां कृष्णा, पाडिसी मोहांत। पृथ्वीचा विनाश जवळी आला
दुर्योधनादिक निमित्तचि आम्हीं । रुधिर कर्दमीं भिजे भूमि ॥२ ॥
स्वप्नें, दुश्चिन्हें तीं दारुण उत्पात । कौरवांचा घात निश्चयेंसीं ॥
रोहिणीस पीडी शनि, मंगळहि-। वक्र ज्येष्ठागृहीं ज्येष्ठ नाश ॥४ ॥
क्षत्रियविनाश सुचविती ग्रह । कलाहीन चंद्र, ग्रहण सूर्या ॥ ५ ॥
चंद्र-सूर्य दोन्हीं वंश क्षत्रियांचे-। क्षीण, उल्कानादें गग न भरे ॥६॥
अश्रू अश्वनेत्रीं चीत्कार गजांचा। अल्पाहारें विष्ठा सकलां बहु ॥
वासुदेव म्हणे कौरवसैन्यांत । कथी राधासुत दुश्चिन्हें हीं ॥ ८ ॥

४४३

शुभाचिन्हें पांडवांसी । होती ऐसें बोलताती ॥ १ ॥
हंस, कारंडव तयां । अपसव्य यदुराया ॥ २ ॥
गृध्र, कंक, काक, श्येन । येती आमुच्या मागून ॥ ३ ॥
उमटे न भेरी नाद । पांडवांचा तो सहज ॥ ४ ॥
इंद्र करी रक्तवृष्टि । दिशा प्रदीप्त भासती ॥ ५ ॥
दुर्योधन ब्रह्मद्वेष । करी सुचवी तो विनाश ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ज्ञाते । अवमानिती न संतांतें ॥ ७ ॥

४४४

भ्रात्यांसवें युधिष्ठिर । गांठी प्रासादशिखर ॥ १ ॥
कनकपात्रीं पायस सेवी । भीम शोभे गिरिवरी ॥ २ ॥
गजारूढ कृष्णार्जुन । स्वप्नामाजी पाही कर्ण ॥ ३ ॥
कौरवांसी रक्त वस्त्र । उष्ट्ररथावरी वास ॥ ४ ॥
स्पष्ट दुश्चिन्हें हीं कृष्णा । भेट कैसी आतां पुन्हा ॥ ५ ॥
ऐसें बोलूनियां कर्ण । कृष्णासी दे आलिंगन ॥ ६ ॥

जाई अनुज्ञा घेऊनि । वेगें गेला चक्रपाणी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे वृत्त । सकल विस्मयकारक ॥ ८ ॥

अध्याय १४४ वा ४४५

उपप्लव्य पुरीं जातांचि श्रीकृष्ण । कुंतीसी वचन वदला क्षत्ता ॥१॥
अट्टाहासें शम करा हें कथितां । कौरवांच्या चित्ता न रुचे बोध ॥२॥
ज्ञातिस्नेहास्तव दुर्बलासमान । दुष्टांसवें धर्म, धर्म इच्छी ॥ ३ ॥
वृद्ध धृतराष्ट्र पुत्रमदें मत्त । प्रतिज्ञेचा भंग करी लोभें ॥ ४ ॥
अधर्मचि धर्म मानी दुर्योधन । न घडतांचि शम कृष्ण गेला ॥ ५ ॥
आतां निश्चयेंसी होई घोर रण । निद्रा रात्रंदिन मजसी नसे ॥ ६ ॥
ऐकूनियां कुंती खिन्नता पावली । मानी निजांतरीं दैव श्रेष्ठ ॥ ७ ॥
भीष्म-द्रोण ज्ञाते न करिती वैर । कर्णासी सत्वर भेटेन मी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे भागीरथीतीरीं । कर्ण जप करी गांठी तया ॥ ९ ॥

अध्याय १४५ वा ४४६

कर्ण म्हणे आर्ये, वंदितो राधेय । अधिरथतनय कार्य कथीं ॥ १ ॥
कुंती म्हणे वत्सा, कौंतेय तूं जाण । कानीन तूं मम पुत्र बाळा ॥२॥
सहस्ररश्मी तो सूर्य तुझा पिता । सिद्ध मंत्र होता मजपाशीं ॥३॥
धर्मज्ञा, तूं देईं मातेलागीं तोष । अन्यायप्रवृत्त कौरव ते ॥
वंदितील भ्राते तुजलागीं बाळा । भोगीं ऐश्वर्याला परमानंदें ॥ ५ ॥
वीर्यशाली पार्था, सूतपुत्र नाम । त्वरित त्यागून धन्य होईं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे गंगातीरीं कुंती । बोलली कर्णासी जन्मवृत्त ॥ ७ ॥

अध्याय १४६ वा ४४७

इतुक्यांत नभोवाणी । होई 'कर्णा सत्य मानीं ॥ १ ॥
मातृवचन ऐकतां । पावसील परमहिता ' ॥ २ ॥
कर्ण म्हणे राजमाते । कथिसी अधर्मचि मातें ॥ ३ ॥
सत्य जरी हें मानिलें । भ्रष्ट मजसी त्वां केलें ॥ ४ ॥
मज सूताचे संस्कार । काय याहूनि उपकार ॥ ५ ॥

तयावेळीं त्याग केला । आतां स्वार्थ पुढती झाला ॥ ६ ॥
आजवरी केलें काय । म्हणसी आतां 'वत्सा हाय' ॥ ७ ॥
काय लाभ मजप्रति । निश्चयेंसी अपकीर्ति ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कर्ण । कथितो ऐका तें भाषण ॥ ९ ॥

४४८

कृष्णार्जुनांप्रति भिऊनियां कर्ण । म्हणतील शरण तयां गेला ॥१॥
आजवरी कोठें होता भ्रातृभाव । प्रगटे समय जाणूनियां ॥ २ ॥
ऐसा उपहास होईल कर्णाचा । कृतघ्न मी कैसा नेंवी होऊं ॥ ३ ॥
सन्मान जयांनीं केला आजवरी । संकटीं त्यां दूरी कैंवी लोटूं ॥४॥
माझ्याचि विश्वासें आरंभिलें युद्ध । कैसा स्वामिघात करूं आतां ॥
प्राणपणें माते, लढेन रणांत । पांडवांविरुद्ध कथितों सत्य ॥ ६ ॥
माते, तुझ्यास्तव पार्थाविण अन्य । भ्राता न वधीन रणामाजी ॥
कर्ण किंवा पार्थ रणीं मृत होतां । पांचांची तूं माता त्याही काळीं
वासुदेव म्हणे दुर्दैव मानूनि । पातली स्वस्थानीं राजमाता ॥ ९ ॥

अध्याय १४७ वा

४४९

इकडे उपप्लव्यपुरीं । प्राप्त जाहला श्रीहरी ॥ १ ॥
कथिलें सकलहि वृत्त । करिती विचार समस्त ॥ २ ॥
युधिष्ठिरप्रश्नें कृष्ण । वदे सकलांचें वचन ॥ ३ ॥
सत्यवतीविवाहाची । कथा सकल भीष्म कथी ॥ ४ ॥
म्हणे पांडवाचें राज्य । तयां द्यावें अर्धराज्य ॥ ५ ॥
राज्य न लाभे अंधासी । म्हणूनि अधिकार पंडूसी ॥ ६ ॥
ऐसे पांडव अधिकारी । शम तयांसवें करीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण । कथी भीष्माचें वचन ॥ ८ ॥

अध्याय १४८ वा

४५०

ठेव राज्याची जे पंडु अर्पूनियां । गेला निघूनियां वनामाजी ॥ १ ॥
द्रोण म्हणे द्यावें पुत्रांसी तें आतां । त्यागूनियां स्वार्था कथितों स्पष्ट

भीष्म तेथें द्रोण तोचि अन्नदाता। कांहीं न अपेक्षा कौरवांची ॥३॥
दुर्योधना, ऐकें भीष्माचें वचन। तेणेंचि कल्याण सकलांचें ॥ ४ ॥
विदुर म्हणे भीष्मा, कौरवकुळासी। त्राता एक तूंचि उद्धारक ॥
सकलहि तुच्छ तुज पुढती हे। बद्धचि करावें दुर्योधना ॥ ६ ॥
काय अधिकार तुझा राज्यावरी। बोलली गांधारी पुत्रालागीं ॥७॥
भीष्म, पांडु, धर्म, हेचि अधिकारी। पितामहावरी भिस्त ठेवा ॥
वासुदेव म्हणे गांधारीवचन। ऐकूनियां कृष्ण पुढती सांगे ॥ ९ ॥

अध्याय १४९ वा ४५१

धृतराष्ट्र म्हणे वत्सा दुर्योधना। कनिष्ठचि राणा पुरु झाला ॥ १ ॥
देवापि, बाल्हिक, शांतनु, प्रतीपा। देवापि तो राज्या अनधिकारी ॥
कुष्ठग्रस्ता तया प्रजा न सन्मानी। मातुलसदनीं बाल्हिक गेला ॥
शांतनूसी राज्य लाभलें, तैसेंचि। राज्य हें पांडूसी प्राप्त झालें ॥४॥
अंधत्वें कदाही नसतां मी राव। कैसा अधिकार तुम्हांलागीं ॥ ५ ॥
परराज्यासक्ति अन्याय जाणोनि। समेट करोनि सौख्य भोगीं ॥६॥
वासुदेव म्हणे ऐसें धृतराष्ट्र-। भाषणतात्पर्य ध्यानीं घ्यावें ॥ ७ ॥

अध्याय १५० वा ४५२

कृष्ण म्हणे ऐसें ऐकूनि वचन। सोडी सभास्थान दुर्योधन ॥ १ ॥
सेनापत्य भीष्मा अर्पूनि सज्जले। वृत्त हें कथिलें सकळ तुज ॥ २ ॥
भेद, दान, तैंही योजिलें कर्णासी। पंचग्राम अंतीं मागितले ॥ ३ ॥
अतिमानुष तें विराट स्वरूप। दावितांहि व्यर्थ यत्न झाले ॥ ४ ॥
मृत्तिकाहि ते न देती सूच्यग्रींची। युद्धाविण गति नसे आतां ॥
रणावीण राज्य न लाभे सर्वथा। कथी या सिद्धांता वासुदेव ॥६॥

## सैन्यनिर्याणपर्व ७

अध्याय १५१ वा ४५३

वैशंपायन तो जनमेजयाप्रति । म्हणे भ्रात्यांलागीं धर्म सांगे ॥ १ ॥
ऐकिलेंती तुम्ही कौरवांचें मत । सेनेचा विभाग करा आतां ॥ २ ॥
द्रुपद, विराट, धृष्टद्युम्न, भीम । शिखंडी, चेकितान, सात्यकी तो ॥
ऐसे सेनापति सप्त त्या सेनेचे । शूर वेदवेत्ते नीतिमंत ॥ ४ ॥
सेनापति कोण सहदेवा, योजावा । येरु म्हणे व्हावा मत्स्यपति ॥
नकुळ द्रुपदा, धृष्टद्युम्ना, पार्थ । योजीं शिखंडीस, भीम म्हणे ॥६ ॥
धर्म म्हणे कृष्ण आधार आमुचा । वदेल जे वाचा तेचि सत्य ॥७॥
कृष्ण म्हणे योद्धे सकलहि श्रेष्ठ । योग्य या कार्यास धृष्टद्युम्न ॥८॥
वासुदेव म्हणे ऐकुनि ते वाणी । आनंदित मनीं सकल राजे ॥ ९ ॥

४५४

झाला सिंहनाद मोदें । म्हणती सज्ज व्हा रणातें ॥ १ ॥
अश्व खिंकाळती वेगें । उठले चीत्कार गजांचे ॥ २ ॥
रथनेमींचा तो घोष । झडती दुंदुभि ते शंख ॥ ३ ॥
गज, रथही पदाती । सेना सागरोपमा ती ॥ ४ ॥
अग्रभागीं भीमसेन । मध्यभागीं शोभे धर्म ॥ ५ ॥
बहु शकट व्यापाऱ्यांचे । शस्त्रवैद्य यंत्रायुधें ॥ ६ ॥
द्रव्य, रुग्णचिकित्सक । स्त्रिया जाती स्वस्थानास ॥ ७ ॥
रथ, अश्व, सेना, गज-। संख्या, लक्ष त्रयोदश ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे चाप । नादें घुमवी अंतरिक्ष ॥ ९ ॥

अध्याय १५२ वा ४५५

धान्य, जल, तृण, इंधन, विपुल । सम, स्निग्ध स्थल धर्म पाही ॥
कौरवप्रदेश आक्रमूनि जाती । पुण्य हिरण्वती तीरावरी ॥ २ ॥
विमानासमान स्थापिलीं शिबिरें । खंदक खणिले सभोंवार ॥ ३ ॥
असंख्यात शिल्पी रावती त्या स्थानीं । शस्त्रास्त्रांनीं भूमि व्याप्त होई

मधु, घृत, राळ, पर्वतासमान । साधनसंपूर्ण शिबिरें होतीं ॥ ५ ॥
शर, महायंत्रें, तोमर, धनुष्यें । कवच, खड्ग, भाते, असंख्यात ॥६॥
स्पर्शवेधी लोहझुली त्या गजांच्या । सकंटक साच्या, गजयोद्धे ॥
पांडवांचे मित्र, सान-थोर येती । वासुदेव कैसी गणना करी ॥ ८॥

अध्याय १५३ रा ४५६

श्रीकृष्णरक्षित पांडवांचें वृत्त मुनि नृपाळास कथितो ऐका ॥१ ॥
दुर्योधन म्हणे, कृष्ण अकृतार्थ । निश्चयेंसी सज्ज करील वीरां ॥२॥
आचारिलें आम्हीं कपट तयांसी । विराटादिकांसी वैर केलें ॥ ३ ॥
निश्चयेंसी आतां होई महायुद्ध । वीर हो व्हा सिद्ध त्वरित तुम्हीं ॥
शिबिरें त्वरित बांधा कुरुक्षेत्रीं । सकल सामग्री सज्ज करा ॥ ५ ॥
मार्ग निष्कंटक राखावे आपुले । वीर तें सज्जले आज्ञेसम ॥ ६ ॥
अन्यदिनीं निघे सैन्याचा सागर । क्षुब्ध जेंवीं चंद्र उदयें तेंवी ॥७॥
वासुदेव म्हणे बाहु थोपटूनि । शस्त्रास्त्रें नटूनि वीर गेले ॥ ८ ॥

अध्याय १५४ वा ४५७

पार्थ म्हणे कृष्णा, कौरवप्रतिज्ञा । ऐकूनियां मना दुःख वाटे ॥ १ ॥
सकलांचीं मतें ऐकूनियां आतां । चिंतूनि स्वमता कथन करीं ॥२॥
कृष्ण म्हणे धर्मा, केले सर्व यत्न । युद्धाविण अन्य मार्ग नसे ॥ ३ ॥
ऐकूनि ते आज्ञा करी धर्मराज । वीर हो व्हा सज्ज युद्धालागीं ॥४॥
आनंदें सैन्यांत कोलाहल तदा । धर्म म्हणे आतां युद्ध प्राप्त ॥ ५ ॥
ज्यालागीं भीमासी तदा आंवरिलें । तेंचि प्राप्त झालें कर्म आम्हां ॥
पार्थ म्हणे ताता, क्षत्ताही तें कथी । आतां युद्ध हाचि पंथ एक ॥
हांसोनियां कृष्ण अनुमती देई । वासुदेव होई सज्ज आतां ॥ ८ ॥

अध्याय १५५ वा ४५८

सेनेचा विभाग करी दुर्योधन । श्रेष्ठ जे मध्यम कनिष्ठाहि ॥ १ ॥
तूणीर, अनुकर्ष, तोमर, वरूथ । शक्ति, उपासंग, निषंगाहि ॥ २ ॥
ऋष्टिध्वज, पाश, परिच्छेदादिक । विषसर्प-घट, सिकता, गुड ॥३॥
खड्ग, पट्टे, सुऱ्या, बंदुकीच्या गोळ्या । गोफणी शोभल्या अंकुशहि

कुऱ्हाडी, कुदळी, रेशीम तैं घृत । गुप्त शस्त्रें प्रास कालखंड ॥ ५ ॥
अश्वजातिज्ञ ते सूत रथावरी । अश्वांचिया शिरीं दिव्योषधि ॥६॥
गज, अश्व, वीर, सालंकृत होते । स्यंदन शस्त्रास्त्रें सज्ज तदा ॥७॥
चक्ररक्षकाहि होते रथावरी । वासुदेव करी निरूपण ॥ ८ ॥

४५९

गिरीसम गज, घंटा मालाधारी । अष्ट-अष्टवरी वसले वीर ॥ १ ॥
अंकुश, धनु, तैं खड्गां दोन, दोन । त्रिशूळ घेऊन वैसे एक ॥ २॥
शक्तिधारी एक ऐसे वीर अ । दूर, समीपस्थ, शत्रूस्तत्र ॥ ३ ॥
मुख्य, मध्यम, ते कनिष्ठहि योद्धे । घेउनि सेनेतें सज्ज होती ॥४॥
कृप, द्रोण, शल्य, कांबोज कृतवर्मा । कर्ण, अश्वत्थामा, भूरिश्रवा ॥
जयद्रथ, तैंवी सुदक्षिण वीर । शकुनि हे शूर सेनापति ॥ ६ ॥
दुर्योधन नित्य सन्मानी तयांसी । वासुदेव कथी कौरवसैन्य ॥७॥

अध्याय १५६ वा

४६०

दुर्योधन म्हणे वंदूनि भीष्मांसी । नेता सेनेप्रति एक योग्य ॥ १ ॥
पूर्वी हैहयांसी लढले त्रैवर्णिक । परी पराभूत होती सर्व ॥ २ ॥
तयावेळीं विप्र पुशिती क्षत्रियां । संपादितां जया कैंवी सांगा ॥३॥
बोलले क्षत्रिय, आम्हां एक नेता । भिन्न भिन्न पंथा तुम्हांलागीं॥४॥
ऐकूनियां नेता योजिला विप्रांनीं । क्षत्रियां जिंकूनि सुखी झाले ॥
पितामहा होसी अवध्य तूं लोकीं । होई सेनापति यास्तव तूं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे शत्रुतुल्य ज्ञाता । अलौकिक योद्धा गंगासुत ॥ ७ ॥

४६१

तेजवंतांमाजी आदित्यासमान । नक्षत्रांत जाण चंद्र जैसा ॥ १ ॥
यक्षांमाजी सर्वश्रेष्ठ जैं कुबेर । देवांमाजी इंद्र तैसा भीष्म ॥ २ ॥
पर्वतांत मेरु, गरुड पक्षांत । तैसा कौरवांत पितामह ॥ ३ ॥
पितामहा, करीं आज्ञा कौरवांसी । बालवृषभचि आम्हीं तुज ॥ ४ ॥
भीष्म म्हणे मज दोन्हीही समान । संकेत पाळून लढेन मीं ॥ ५ ॥
मजसम कोणी नसे पार्थाविण । उघड तो रण न करी मज ॥ ६ ॥

निर्मनुष्य एका क्षणांत अवनी । करीन घे ध्यानीं बळ माझें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे स्पष्टपणें भीष्म । करिती कथन निज हेतु ॥ ८ ॥

४६२

पांडुपुत्रांचा विनाश । करणें मज तें अशक्य ॥ १ ॥
दशसहस्र प्रतिदिनीं । सैन्य संहारीन रणीं ॥ २ ॥
पांडवांचे येतां शर । देईन त्यां प्रत्युत्तर ॥ ३ ॥
स्वयें प्रहार तयांसी । मज करणें न कदापि ॥ ४ ॥
स्पर्धा करी मजसी कर्ण । जाणीतसे दुर्योधन ॥ ५ ॥
एका समर्थी यास्तव । न घडो आमुचें समर ॥ ६ ॥
तदा बोले वैकर्तन । भीष्मवधोत्तर कर्ण- ॥ ७ ॥
रण करील पार्थासी । तावत्काळ त्या विश्रांति ॥ ८ ॥
झाला भीष्मासी अभिषेक । वासुदेवा मनीं धाक ॥ ९ ॥

४६३

पितामह शोभे अभिषेक होतां । जाहला वाद्यांचा नाद बहु ॥ १ ॥
परी धरणीकंप होती तयावेळीं । मेघांवीण झाली रक्तवृष्टि ॥ २ ॥
उल्कापात, शब्द भालूंचे भयाण । दुश्चिन्हें तीं जाण बहुविध ॥३॥
अरिष्टविनाश व्हावया कारणें । विप्रांलागीं दानें दिधलीं बहु ॥ ४ ॥
कुरुक्षेत्रामाजी युक्त, समस्थळीं । शिबिरें स्थापिलीं तत्काळचि ॥
वासुदेव म्हणे दुजें गजपूर । शोभलें शिबिर कौरवांचें ॥ ६ ॥

अध्याय १५७ वा

४६४

बृहस्पतीसम बुद्धिमंत भीष्म । क्षमावंत जाण पृथ्वीसम ॥ १ ॥
गांभीर्य तयाचें सिंधूसम होतें । हिमाद्रीसारिखें स्थैर्य त्यासी ॥
औदार्य तयाचें प्रजापतीसम । भास्करासमान तेज जाणा ॥ ३ ॥
शौर्य महेंद्राचें, ध्वजचि नृपांचा । सेनापति, होतां कौरवांचा ॥ ४ ॥
सावध कौंतेय बोलला वीरांसी । सज्ज व्हा रणासी सिद्धतेनें ॥५॥
द्रुपदादिक ते सप्त सेनापति । प्रमुख तयांसी धृष्टद्युम्न ॥ ६ ॥

सेनापतींचा त्या अध्यक्ष अर्जुन । सारथी श्रीकृष्ण नेता तया ॥७॥
वासुदेव म्हणे सर्व नियामक । जाहला अच्युत तया रणीं ॥ ८ ॥

४६५

नील वस्त्रधारी बलराम पातला । भव्यता जयाला कैलासाची ॥१॥
आरक्त जयाचे नेत्र, सिंहगति । अक्रुर गदादि सर्वे त्याच्या ॥ २ ॥
उत्थापन तया देती धर्मादिक । नम्रभावें हस्त जोडिताती ॥ ३ ॥
विराट-द्रुपदां वंदी बलराम । शोभवूनि स्थान वदला ऐका ॥ ४ ॥
होईल या रणीं संहार वीरांचा । आमुचाचि राजा दुर्योधन ॥ ५ ॥
योग्य आम्हांलागीं साह्य होणें तया । परी तें माधवा न रुचे कांहीं ॥
पांडवां जाहला सर्वभावें साह्य । निश्चयें विजय तुम्हांप्रति ॥ ७ ॥
कौरवनाशाची न घडे उपेक्षा । म्हणूनि मी तीर्था जातों आतां ॥८॥
वासुदेव म्हणे बोलूनियां ऐसें । बळिराम यात्रेतें निघूनि जाई ॥९॥

अध्याय १५८ वा

४६६

भीष्मकाचा पुत्र रुक्मि याचवेळीं । ससैन्य त्या स्थळीं प्राप्त झाला ॥
विजयनामक इंद्राचें धनुष्य । लाभलें तयास विख्यात तें ॥ २ ॥
जिंकिलें कृष्णानें तयालागीं जेथें । भोजकट तेथें वसवी पुर ॥ ३ ॥
रुक्मि म्हणे पार्था, भ्यालासी तूं जरी । साह्य तुज तरी होईन मी ॥
भीष्म, द्रोण, कृप, मजपुढें तुच्छ । वधीन तयांस म्हणसी तरी ॥
साभिप्राय पार्थ, कृष्णासी पाहूनि । हांसोनियां वाणी वदला ऐका ॥
कुरुकुलोत्पन्न शिष्य मी द्रोणाचा । वासुदेव माझा साह्यकर्ता ॥ ७ ॥
निवातकवच, कालकेयदैत्य । वधिले तदा मज कोण साह्य ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे निर्भय अर्जुन । स्वीकारील दैन्य केंवि ऐसें ॥ ९ ॥

४६७

रुक्मीलागीं पार्थ वदे मी निर्भय । अपेक्षीं न साह्य ऐशा शब्दें ॥१॥
राहीं किंवा जाईं इच्छिसील तेथें । करीं रुचेल जें तुजलागीं ॥ २ ॥
ऐकूनि ती वाणी रुक्मि त्यजी स्थान । कौरवां भेटून प्रौढी सांगे ॥३॥
मानी दुर्योधन साह्य न स्वीकारी । रुक्मि तैं माघारीं सदनीं जाई

रुक्मि, बळिराम ऐसे दोघे वीर। जातांचि विचार करी धर्म ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पांडवांची सभा। सनक्षत्र नभासम शोभे ॥ ६ ॥

अध्याय १५९ वा  ४६८

संजयासी धृतराष्ट्र। म्हणे कथीं सर्व वृत्त ॥ १ ॥
मोह अनावर माझा। योग अटळ दैवाचा ॥ २ ॥
पाहतांचि दुर्योधना। भ्रांति पडे माझ्या मना ॥ ३ ॥
रणामाजी देहत्याग। अंतीं वीरांसी हा मार्ग ॥ ४ ॥
सूत म्हणे विश्वासानें। क्लेश सोशिले धर्मानें ॥ ५ ॥
अंतीं सिद्ध झाला रणा। पुरुष पराधीन जाणा ॥ ६ ॥
पूर्वकर्म कीं यदृच्छा। मानिताती कोणी ईशा ॥ ७ ॥
असो कारण कोणीही। राया, स्थिर, शांत होईं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे सूत। कथन करी ऐका वृत्त ॥ ९ ॥

---

## उलूकदूतगमनपर्व ८

अध्याय १६० वा  ४६९

उलूक नामक पाचारूनि दूत। पाठवी निरोप कथूनि तया ॥ १ ॥
दुर्योधन म्हणे दूता पांडवांसी। सांगें प्रतिज्ञा ती पूर्ण करा ॥ २ ॥
म्हणविसी धर्मा, धार्मिक तूं आतां। कैसी निर्दयता वरिसी सांगें ॥
धर्माच्छन्न पापें,व्रत तें बैडाल। प्रल्हादाचे बोल कथितों ऐक ॥४॥
नारदें पित्यासी कथिलें, मार्जार। गंगातीरावर एक राहे ॥ ५ ॥
ऊर्ध्वबाहु तिष्ठे तपस्व्यासमान। 'आचरितों धर्म' सकलां कथी ॥
प्रशंसिती तया पशु-पक्षी यदा। कृतकार्य तदा बिडाल तो ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे दूतमुखें धर्म-। सांगे, दुर्योधन पांडवांसी ॥ ८ ॥

४७०

मूषक त्या स्थानीं बहुत पातले। मातुल मानिलें बिडालासी ॥१॥
मानूनियां ऐसें मार्जारा विनविती। शरण तुजसी असों आम्हीं ॥

त्राता तूंचि आम्हां धार्मिका, एकाकी । संरक्षीं आम्हांसी सर्व ठाईं
येरु म्हणे तप, संरक्षण कैसें । घडेल हें मातें विविध कार्य ॥ ४ ॥
तथापि मजसी नित्य गंगास्नान । घालितां रक्षण करीन मी ॥ ५ ॥
ऐसा निमित्तानें साधूनियां कार्य । जाहला मार्जार त्वरित पुष्ट ॥
पुढती डिंडिक मूषका वधितां । मूषकांसी शंका येई त्याची ॥ ७ ॥
विनाश जाणूनि मूषक पळाले । परी कार्य झालें मार्जाराचें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे दुर्योधन दूता । सांगे धर्म ऐसा दंभ करी ॥ ९ ॥

४७१

दांभिक तूं धर्मा, सज्ज हो रणासी । आव्हानार्थ कृति केली घोर ॥
जतुगृहदाह तेंवी द्यूतकर्म । स्मरूनि संग्राम करीं आतां ॥ २ ॥
उलूका, कृष्णासी निरोप कथावा । आधार पांडवां होई यत्नें ॥३॥
इंद्रजाल तुझें व्यर्थ विश्वरूप । आम्हींही सहज दावूं तैसें ॥ ४ ॥
महद्यश तुझें मूढ जनीं गाती । दावीं ती प्रतीति समरांगणीं ॥ ५ ॥
षंढवृषभशृंगें, तेंवी तुझी कीर्ति । उलूका, भीमासी कथीं ऐसें ॥६॥
दुःशासनरक्त प्राशीं रे बल्लवा । नसे लड्डु-खवा समरांगण ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे सहदेव-नकुळां । निरोप कथिला हाचि दुष्टें ॥ ८ ॥

४७२

द्रुपद, विराट, धृष्टद्युम्नाप्रति । तेंवी शिखंडीसी कटु बोले ॥ १ ॥
हांसूनियां म्हणे उलूका, पार्थासी । सांग ये युद्धासी त्वरित आतां॥
स्वातंत्र्य कीं राज्य हेतु हे युद्धाचे । साधीं ते युद्धातें अवलंबूनि ॥
कृष्णेचा अवमान सभेमाजी केला । लाज ती तुम्हांला वाटो कांहीं
कूपमंडूक तूं करिसी वल्गना । रणीं भीष्म-द्रोणां गांठ असे ॥ ५ ॥
आत्मश्लाघा जरी साधन जयाचें । तरी कोण कोठें पराभूत ॥ ६ ॥
दंडिलें तुम्हांसी विराटसदनीं । घालूनियां वेणी नाचलासी ॥ ७ ॥
शतसंख्य पार्थ, सहस्र केशव । समरांगणीं काय करिती आम्हां ॥
महाग्राहयुक्त सेनासिंधु माझा । स्वस्थ राहीं पार्था राव म्हणे ॥९॥
वासुदेव म्हणे उन्मत्त होऊनि । दुर्योधन वाणी बोले ऐसी ॥ १० ॥

अध्याय १६१ वा ४७३

शकुनीचा सुत उलूक धर्मातें । येऊनियां वदे काय ऐका ॥ १ ॥
धर्मज्ञ तूं धर्मा, संदेशानुवाद । करीतसे दूत जाणसी तूं ॥ २ ॥
यास्तव मजवरी होऊं नको क्रुद्ध । धर्म म्हणे सिद्ध श्रवणा आम्हीं
वासुदेव म्हणे यथार्थ कथन । ऐकूनि वचन वदती वीर ॥ ४ ॥

अध्याय १६२ वा ४७४

उसळे सर्पासम पार्थ । नेत्र भीमाचे आरक्त ॥ १ ॥
कृष्ण बोलला कैतवा । सांग जाऊनि कौरवां ॥ २ ॥
कळला आशय आम्हांसी । पुरवू इच्छा रणामाजी ॥ ३ ॥
कथिला निरोप पुनरपि । क्रोध ऐकूनि सर्वांसी ॥ ४ ॥
भीम म्हणे मुढा सांग । दुर्योधना आम्हीं सिद्ध ॥ ५ ॥
हितास्तव सभमाजा । पाठविलें माधवासी ॥ ६ ॥
परी कैसा वांचशील । पाचारितो मू । काळ ॥ ७ ॥
येतां देवहीं सह्यासी । प्राशीन मी रुधिरासी ॥ ८ ॥
क्रोधें बोले सहदेव । ऐका म्हणे वासुदेव ॥ ९ ॥

४७५

पापिष्टा, वचन ऐकें दुर्योधना । कुलविध्वंसना जन्मलासी ॥ १ ॥
बालपणीं त्याग करिता जरि पिता । प्रसंग न येता ऐसा कोणा ॥२॥
उलूका, त्वत्पिता अनहित आमुचें । इच्छी तुजसवें वधिन त्यासी ॥
ऐकूनियां पार्थ वदे भीमसेना । सोडील रे प्राणा वैरी तुझा ॥ ४ ॥
वीरांची अनुज्ञा घेऊनियां कथीं । रणीं चाप यासी प्रत्युत्तर ॥ ५ ॥
'तुष्यतु दुर्जन' न्यायें हें ऐकूनि । कथितों, येईं रणीं स्वयें भ्याडा ॥
कृष्ण म्हणे रथ हांकीन मी परी । समर्थी सेना सारी संहारीन ॥७॥
न येतोचि ऐसा प्रसंग हे इच्छा । संरक्षक तुझा नसे कोणी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे दुर्योधनाप्रति । तुच्छचि लेखिती धर्मादिक ॥ ९ ॥

अध्याय १६३ वा ४७६

आवेशें सत्वरी उठूनियां पार्थ । जाहला संतप्त वदला दूता ॥ १ ॥
कैतव्या, जा सांगें धार्तराष्ट्रांप्रति । स्वबलावलंबी पुरुष तोचि ॥२॥

परबलावरी विश्वासूनि युद्ध। आरंभी तो शुद्ध पुरुषाधम ॥ ३ ॥
मूढा, भीष्मादिकां मृत्युदीक्षा देसी। कृतार्थ तूं होसी तेणें मनीं ॥४॥
द्रोणसाह्याविण पांडवां जिंकीन। हें भीष्मवचन कवच तुझें ॥ ५ ॥
परी भीष्म-द्रोणां वधीन मी जेव्हां। आठवेल तेव्हां वचन माझें ॥६॥
इच्छेसम तुझ्या उद्‌ईक युद्ध। पाहसील सिद्ध वचन आम्हीं ॥७॥
अहंभाव, वैर, अधर्म जयासी। बिडाल तो लोकीं मूर्तिमंत ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पार्थ दुर्योधना। संगरीं प्रतिज्ञा दावूं म्हणे ॥ ९ ॥

४७७

युधिष्ठिर म्हणे सुयोधनाप्रति। सांग रे आमुची मति स्थिर ॥ १ ॥
मानिसी आपणासम सकलांसी। हत्या कीटकांची न रुचे जया ॥
ज्ञातिवध कैवी रुचेल तयातें। यास्तव सामातें अवलंबिलें ॥ ३ ॥
कृष्णवचनहि रुचलें न तुज। पूर्ण मनोरथ होती रणीं ॥ ४ ॥
गर्जोनियां भीम म्हणे गृध्रोदरीं। अथवा गजपुरीं वास मज ॥ ५ ॥
सकळ कौरव विभाग तो माझा। पुत्र अभिमन्यूचा भाग सर्व ॥६॥
फोडूनियां अंक तुडवीन मस्तक। धर्माच्या समक्ष धार्तराष्ट्रा ॥ ७ ॥
उचित भाषण ऐसें सकलांचें। उलूक रायातें शिबिरीं सांगे ॥ ८ ॥
ऐकूनियां सिद्ध होई दुर्योधन। वासुदेव धर्मवचनें तृप्त ॥ ९ ॥

अध्याय १६४ वा ४७८

जातां उलूक स्वस्थानीं। युधिष्ठिर बोले वाणी ॥ १ ॥
न्यावी[1] समरांगणीं सेना। सज्ज होई धृष्टद्युम्ना ॥ २ ॥
आज्ञा रायाची ऐकूनि। हर्ष पावले सेनानी ॥ ३ ॥
आपआपुलालें भक्ष्य। स्मरूनि रणीं होती दक्ष ॥ ४ ॥
भीष्म, द्रोण, कर्णादिक-। नाश योजनापूर्वक ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सिद्ध। धृष्टद्युम्न संगरार्थ ॥ ६ ॥

---

१ वध्यतीर.

# रथातिरथसंख्यानपर्व ९

अध्याय १६५ वा ४७९

पुशितां राव संजयासी । सूतवृत्त कथी त्यासी ॥ १ ॥
सेनापत्य गांगेयाचें । अभय वचन तयाचें ॥ २ ॥
ऐकूनियां दुर्योधन । म्हणे वीर कोण कोण ॥ ३ ॥
पितामहा सेनेमाजी । वर्णूनि तें करीं राजी ॥ ४ ॥
भीष्म म्हणे सकल भ्राते । दुर्योधना तुम्हीं योद्धे ॥ ५ ॥
महारथी तूं नव्हेसी । कृतवर्मा तो अतिरथी ॥ ६ ॥
शल्य अतिरथी वाटे । स्पर्धा करी तो कृष्णातें ॥ ७ ॥
भूरिश्रवा तो कृतास्त्र । सौमदत्ती अतिरथ ॥ ८ ॥
पूर्ववैरें जयद्रथ । राया, लढेल रणांत ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे भीष्म । आपुले न कथिती गुण ॥ १० ॥

अध्याय १६६ वा ४८०

सुदक्षिण नीलराज एकरथ । विंद-अनुविंद महारथी ॥ १ ॥
श्रेष्ठ रथी भ्राते पंच ते त्रिगर्त । दोघे[1] राजपुत्र श्रेष्ठरथी ॥ २ ॥
दंडधार तेंवी बृहद्बल रथी । कृप अतिरथी शारद्वत ॥ ३ ॥
ऐसे पांडवांचे पूर्ववैरी योद्धे । समर्थी शौर्यातें दावितील ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे पूर्वावमानित । पातले साह्यार्थ कौरवांसी ॥ ५ ॥

अध्याय १६७ वा ४८१

एकरथ वीर मातुल शकुनि । अतिरथ मानीं द्रोणपुत्र ॥ १ ॥
जीविताचा लोभ हाचि तया दोष । त्रैलोक्यांत श्रेष्ठ योद्धा परी ॥
अतिरथ्यांचा तो अतिरथी द्रोण । परी त्या अर्जुन परमप्रिय ॥ ३ ॥
राजसिंहश्रेष्ठ रथी तो पौरव । एकांशेंचि वीर सत्यश्रवा ॥ ४ ॥
वृषसेन महायोद्धा तो जाणावा । बाल्हिक गणावा अतिरथ ॥ ५ ॥

---

१ दुर्योधन-दुःशासनपुत्र.

जलसंध माधव वीर तो तेजस्वी । योद्धा सेनापति सत्यवान ॥६॥
अलंबुष क्रूरकर्मा महारथ । मायावी तो दैत्य पूर्व वैरी ॥ ७ ॥
गजयुद्धज्ञ तो भगदत्त श्रेष्ठ । वासुदेव स्पष्ट नामें कथी ॥ ८ ॥

अध्याय १६८ वा

४८२

गांधार देशींचे प्रमुख राजपुत्र । अचल, वृषक रथी दोघे ॥ १ ॥
आवडता तुझा उच्छृंखल कर्ण । सहज कवचहीन अर्धरथी ॥ २ ॥
भीष्मवचनासी देतां अनुमोदन । ज्ञाते गुरुद्रोण तयावेळीं ॥ ३ ॥
कर्ण म्हणे भीष्मा, द्वेषें मजप्रति । कां रे अवमानिसी व्यर्थ ऐसा ॥
तेजोभंग ऐसा करिसी आमुचा । पराजय इच्छा धरूनि मनीं ॥५॥
पलित वय, वित्त, आप्त, परिवारें । बलाविण ठरे कैसा शूर ॥६ ॥
मंत्रबळें विप्र, धनानें तो वैश्य । वयानेंचि शूद्र श्रेष्ठ होई ॥ ७ ॥
समान वीरांत भेद पाडूनियां । द्वैताचे या ठाया माजवीसी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कर्ण पांडवांसी । जिंकीन एकाकी म्हणे रणीं ॥ ९ ॥

४८३

कोठें युद्ध कोठें हातघाई राजा । संकेत रणाचा, बोध कोठें ॥ १ ॥
कालप्रेरित हा जरठ मंद कोठें । मंत्रबळ याचें क्षीण जाणें ॥ २ ॥
ऐकावें वृद्धांचें परी हा अतिवृद्ध । मानिती बालक अतिवृद्धा ॥३ ॥
वधीन मी रणीं पांडवां एकाकी । परी श्रेय यासी लाभेल तें ॥ ४॥
यास्तव राजेंद्रा, करीन मी युद्ध । भीष्मवधोत्तर निश्चयेंसी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कर्णाचें भाषण । ऐकूनियां भीष्म क्रुद्ध होय ॥ ६ ॥

४८४

सागरासम हा भार सूतपुत्रा । शिरावरी माझ्या घेतलासे ॥ १ ॥
ऐशावेळीं भेद करूं कासयासी । कर्णा, वांचलासी भेदभयें ॥ २ ॥
अभिमान तुझा क्षणार्धें हरीन । निष्प्राण करीन निमिषमात्रें ॥ ३ ॥
रामाचेंहि शर झालिले सहज । कर्णा, काय मज करिसील तूं ॥ ४॥
काशिराजकन्या सकलवीरांसी । लढूनि एकाकी हरण केल्या॥५॥
कर्णा, संगरीं या वांचलासी ऐसें । दाखवीं आम्हातें अहंमन्या ॥६॥
दुर्योधन म्हणे ताता, कोपूं नका । प्रसंग हा बाका मार्ग दावा ॥७॥

उभयहि तुम्हीं साधाल कार्यातें । थोर पांडवांचे कथन करा ॥८॥
वासुदेव म्हणे वर्णन ऐकूनि । श्रेष्ठ कोण ध्यानीं सहज येई ॥ ९ ॥

अध्याय १६९ वा ४८५

भीष्म म्हणे राजा, श्रेष्ठ रथी धर्म । अष्टधा तो जाण भीम रथी ॥१॥
माद्रीपुत्र श्रेष्ठ रथी ते जाणावे । श्रेष्ठचि गणावे सकळकर्मीं ॥ २ ॥
दुर्योधना, युद्ध करूं नको त्यांसी । वेळ संकटाची येई तेणें ॥ ३ ॥
पार्थाचें तें चाप भीमसेनगदा । उचलील ऐसा वीर कोण ॥ ४ ॥
पार्थासम वीर नसे त्रैलोक्यांत । साह्य भगवंत तयाप्रति ॥ ५ ॥
लढूं तयासवें दोघेचि रे आम्हीं । परी वृद्ध मानीं आम्हां आतां ॥६॥
वासुदेव म्हणे ऐकूनि तें वृत्त । होई मंदोत्साह सकलांचा ॥ ७ ॥

अध्याय १७० वा ४८६

द्रौपदेय महारथी । अभिमन्यु तो अतिरथी ॥ १ ॥
वासुदेव पार्थासम । थोर तयाचा विक्रम ॥ २ ॥
अतिरथी तो सात्यकि । द्रुपद, विराट महारथी ॥ ३ ॥
युधामन्यु उत्तमौजा । रथी जाणावे ते राजा ॥ ४ ॥
अनुकूल दैव होतां । अंगीं तेज चढे श्रेष्ठां ॥ ५ ॥
प्रतिकूल होतां दैव । शूरासही वाटे भय ॥ ६ ॥
द्रुपद विराट ते वृद्ध । परी करिती घोर युद्ध ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे भीष्म । करी वीरांचें वर्णन ॥ ८ ॥

अध्याय १७१ वा ४८७

शिखंडी तो मानीं राया मुख्य रथी । जाणें अतिरथी धृष्टद्युम्न ॥१॥
क्षत्रधर्म सुना सर्व अर्धरथी । तैसा महारथी धृष्टकेतु ॥ २ ॥
क्षत्रदेव तोही श्रेष्ठ रथी असे । पांचाळ श्रेष्ठ ते महारथी ॥ ३ ॥
अज, भोज तेही महारथी जाण । केकयहि जाण रथी राया ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे भीष्मोक्त ही वाणी । वीर घेती ध्यानीं युद्धास्तव ॥

४८८

काशिक सुकुमार, नील, सूर्यदत्त । मदिराश्व, शंख, सकल रथी
वार्धक्षेमि चेकितान, सत्यधृति । वीर महारथी पांड्यही तो ॥ २ ॥
चित्रायुध, व्याघ्रदत्त, चंद्रसेन । श्रेष्ठ रथी जाण दुर्योधना ॥ ३ ॥
सेनाबिंदु, क्रोधहंता भीमासम । समरश्लाघी जाण रथी एक ॥४॥
सत्यजित जाणें अष्टधा तो रथी । जाणें महारथी धृष्टधन्वा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वसुदान तेंवी । वसुमान तोही अतिरथ ॥ ६ ॥

अध्याय १७२ वा ४८९

रोचमान महारथ, अतिरथ । पुरुजित्कुंतिभोज मातुल[1] तो ॥ १ ॥
घटोत्कच योद्धा मायावी अतिरथी । प्राणपणें त्यांसी लढेन मी ॥२॥
ऐसे प्रतियोद्धे कथिले समस्त । निवारीन त्यांस रणांगणीं ॥ ३ ॥
परी शिखंडीस न निवारीं कदा । लाभला पुरुषत्वाअसूनि कन्या
व्रतभंग माझा न होवो सर्वथा । यास्तवाचि ऐसा नियम असे ॥५॥
संहारीन जे जे येतील पुढती परी पांडवांसी न वधीं । कदा॥ ६
वासुदेव म्हणे दुर्योधना भीष्म । करी निवेदन सकल ऐसें ॥ ७ ॥

---

## अम्बोपाख्यानपर्व १०

अध्याय १७३ वा ४९०

पितामहा, कां रे शिखंडीसी युद्ध । न करिसी सांग राव म्हणे ॥१॥
भीष्म म्हणे ऐक वृत्त तें समस्त । चित्रांगदा राज्य पित्यामागें-॥२॥
अर्पिलें, परी तो अल्पायु जाहला । कनिष्ठ भ्रात्याला राज्य दिलें ॥३॥
विचित्रवीर्याचा विवाह पुढती । योजितां वृत्तासी ऐकियेलें ॥ ४ ॥
अंबा, अंबिका ते अंबालिका धन्या । काशिराजकन्यास्वयंवर ॥५॥
ऐकूनि तें वृत्त गेलों तया स्थानीं । घेतल्या स्यंदनीं कन्या वरा ॥६॥
आव्हान नृपासी देऊनि एकाकी । जिंकूनि सकळांसी विजयी झालों

---

१ भीमाचा मामा.

भ्रात्यास्तव कन्या आणिल्या हें वृत्त । कथिलें मातेस आनंदानें ॥८॥
वासुदेव म्हणे पराक्रमशुल्कें । जिंकियेल्या भीष्में कन्या तीन ॥९॥

अध्याय १७४ वा ४९१

वृत्त ऐकूनियां माता । प्रेमें अर्पी आशीर्वादा ॥ १ ॥
इतुक्यांत म्हणे अंबा । ऐका वृत्तांत हा माझा ॥ २ ॥
वरिलें मनीं शाल्वाप्रति । वरिलें तेणेंही एकांतीं ॥ ३ ॥
धर्मज्ञ तूं करीं कृपा । योग्य तेंचि करीं आतां ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे कन्या । ऐसें वृत्त कथी भीष्मा ॥ ५ ॥

अध्याय १७५ वा ४९२

ऐकूनि तें वृत्त मंत्री पुरोहितां । निवेदूनि अंबा शाल्वाप्रति-॥ १ ॥
लाभो, या हेतूनें सहपरिवार । धाडिली सत्वर सदनीं त्याच्या
अंबा म्हणे राया, स्वीकारीं मजसी । नसें मी भार्यार्थी शाल्व म्हणे ॥
बलात्कारें स्पर्श करितां भीष्मानें । प्रसन्न मनानें गेलीस तूं ॥ ४ ॥
धर्मज्ञ मी कैंवी वरूं तुजप्रति । इच्छित स्थळासी त्वरित जाईं ॥५॥
अंबा म्हणे राया, भीष्में मजप्रति । पाहूनियां दुःखी साश्रु नेत्रा ।६॥
पुसूनियां वृत्त देऊनि अनुज्ञा । त्वरित या स्थाना पोंचविलें ॥
वासुदेव म्हणे घेऊनि शपथ । अंबा म्हणे शुद्ध, जाणें मज ॥ ८ ॥

४९३

परोपरी कन्या विनवी शाल्वासी । परी तो अंबेसी स्वीकारीना ॥
अंतीं निजदोष मानूनि तळमळे । प्रारंभीं कथिलें नाहीं म्हणे ॥२॥
भीष्मासी धिक्कार म्हणे तैं पित्यासी । मज विधात्यासी तेंवी शाल्वा
मानव भोगिती निजकर्म फल । परी यासी मूळ गंगासुत ॥ ४ ॥
यास्तव तयाचा सूड घ्यावयासी । तपोभूमीप्रति दुःखें जाई ॥ ५ ॥
वृत्तांत सकळ निवेदी मुनींतें । सांत्वन तियेचें करिती मुनि ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अंबा तयादिनीं । राहिली आश्रमीं दुःखा ॥

अध्याय १७६ वा ४९४

भीष्म म्हणे राया विप्र अन्यदिनीं । पित्याच्या सदनीं म्हणती जाईं ॥

कन्या म्हणे घोर तप आचरीन । पापाचें क्षालन करीन येथें ॥ २ ॥
इतुक्यांत होत्रवाहन राजर्षि । येई त्या स्थळासी सहजपणें ॥ ३ ॥
ऐकूनि अंबेचें वृत्त. होई खिन्न । बोलला वचन अंबेप्रति ॥ ४ ॥
मातामह जाणें कन्ये मजप्रति । भार्गवरामासी शरण जाई ॥ ५ ॥
अकृतव्रण तो भार्गवाचा शिष्य । येई त्या स्थळास तयावेळीं ॥ ६ ॥
होत्रवाहनानें कथितां वृत्तांत । कन्या म्हणे मार्ग दावो राम ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे अंबा रामावरी । विश्वास अंतरीं धरूनि राहे ॥ ८ ॥

अध्याय १७७ वा ४९५

मातामहासह विचार करूनि । म्हणे निज मनीं भीष्म दोषी ॥ १ ॥
ऐशा स्थितीमाजी येवोनियां राम । शोभवी तें स्थान दैवयोगें ॥ २ ॥
दुःखाकुल अंबा पाहूनि द्रवला । वृत्तांत ऐकिला सकल रामें ॥ ३ ॥
चिंतूनियां म्हणे भीष्मा किंवा शाल्वा । वदसील तया आज्ञापीन ॥
अंबा म्हणे शाल्व स्वीकारी न मज । शासन भीष्मास व्हावें वाटे ॥
अन्यास्तव केलें हरण तयानें । सदर्प चित्तानें वध्य तोचि ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अंबा रामाप्रति । विनवी भीष्मासी शिक्षा करीं ॥ ७ ॥

अध्याय १७८ वा ४९६

राम म्हणे कन्ये, विप्रार्थोचि शस्त्र । चालवीन व्रत ऐसें माझें ॥ १ ॥
इच्छिसी भीष्माचा अवमान जरी । वंदील तो तरी चरण तुझे ॥ २ ॥
अंबा म्हणे त्याचा वधाचि करावा । हेतु पुरवावा माझा हाचि ॥ ३ ॥
अकृतव्रण तो शिष्य म्हणे देवा । भीष्म वध्य व्हावा अथवा नत ॥
विप्रद्वेष्टा किंवा अजिंक्य जो जनीं । वधीन त्या रणीं पण तुझा ॥ ५ ॥
शरणागतासी अभय सर्वदा । ऐसा पण तुझा स्मरतो मज ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे तदा भीष्माप्रति । वधावें, म्हणती सकळ, रामा ॥ ७ ॥

४९७

राम म्हणे व्हावा साम । हेंचि इच्छिती सज्जन ॥ १ ॥
कार्य अवघड असे । प्रथम कथीन भीष्मातें ॥ २ ॥
मान्य न होतां वचन । हठी रणांत वधीन ॥ ३ ॥
ऐसें बोलूनियां राम । कन्येसवें सोडी स्थान ॥ ४ ॥

येतां कुरुक्षेत्रामाजी । सन्मानिलें मी तयासी ॥ ५ ॥
राम बोलला हे भीष्मा । स्वीकारीं ही राजकन्या ॥ ६ ॥
तुझ्या सहज कृतीनें । ओढवलीं बहुत विघ्नें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे भीष्म । वदला अवश्य हें कर्म ॥ ८ ॥

४९८

क्रोधाविष्ट राम वदतसे भीष्मा । गुरूच्या वचना ऐकसीना ॥ १ ॥
गतप्राण तुज करीं तत्क्षणीं । अमात्यांसमेत रणीं तेणें ॥ २ ॥
राम म्हणे गुरो, अधर्म कन्येचा । स्वीकार मी कैसा करूं सांगे ॥
विनवितीं बहु नायकेचि राम । सज्ज होई भीष्म अंतीं रणा ॥ ४ ॥
कुपंथगामी तो गुरूही त्यजावा । निर्णय हा घ्यावा ध्यानीं गुरो ॥
अर्थाहूनि श्रेष्ठ धर्मचि या जनीं । दोष न वधूनि तुजही तेणें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे भीष्म भार्गवाची । इच्छा संगराची पुरवूं म्हणे ॥

४९९

भीष्म म्हणे रामा, दर्प । तुझा हरीन रणांत ॥ १ ॥
जिंकिलेंसी तूं क्षत्रियां । नव्हता भीष्म त्या समया ॥ २ ॥
हांसूनियां म्हणे राम । गंगा होवो पुत्रहीन ॥ ३ ॥
ऐसे कुरुक्षेत्रामाजी । वीर सज्जले युद्धासी ॥ ४ ॥
प्रगट होवोनियां गंगा । भीष्मा बोध करी तदा ॥ ५ ॥
कळतां सकळ वृत्तांत । विनवी जावूनि रामास ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वीर । अंतीं सज्ज समरधीर ॥ ७ ॥

अध्याय १७९ वा

५००

भीष्म म्हणे रामा आतां होई रथारूढ ॥
कवच लेऊनि अंगीं करीं घोर युद्ध ॥ १ ॥
राम म्हणे रथ पृथ्वी, वेद तेचि अश्व ॥
सरस्वती गायत्र्यादि माता ते कवच ॥ २ ॥
ऐसें बोलूनियां शर सोडिले रामानें ॥
संकल्पमात्रेंचि शोभे दिव्य स्यंदनानें ॥ ३ ॥

अकृतव्रणानें केलें सारथ्य तयाचें ॥
ये रे ये म्हणूनि रामें आव्हानिलें मातें ॥ ४ ॥
सन्निध जाऊनि वेगें वंदिलें पदांसी ॥
शापदग्ध करितां जरी न वंदितों त्यासी ॥ ५ ॥
तुष्ट राम म्हणे भीष्मा, करीं धर्मयुद्ध ॥
विजयाचा कैंवी देऊं तुज आशीर्वाद ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे नम्र भीष्म रथारूढ ॥
होऊनि आनंदें करी दिव्य शंखनाद ॥ ७ ॥

५०१

युद्ध झालें बहुत दिन । न कळे विजयी होइ कोण ॥ १ ॥
भीष्म म्हणे आचार्यांसी । लढतों वधूनि क्षात्रवृत्ति ॥ २ ॥
ऐसें बोलूनियां चाप । तोडियेलें क्षणार्धांत ॥ ३ ॥
शर असंख्य सोडिले । नागासम जे शोभले ॥ ४ ॥
रुधिर वाहे भळभळां । राम पलाश शोभला ॥ ५ ॥
क्रुद्ध राम सोडी शर । निवारिले भीष्में सर्व ॥ ६ ॥
केलें व्याकुळ रामासी । दुःख अंतरीं भीष्मासी ॥ ७ ॥
इतुक्यांत अस्तमान । युद्ध जाहलें संपूर्ण ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे भीष्म । कथी दारुण संग्राम ॥ ९ ॥

अध्याय १८० वा

५०२

शल्योद्धार करूनि सूतें । केलें सुस्नात अश्वांतें ॥ १ ॥
रात्रौ घेऊनि विश्रांती । युद्ध भानुउदयासी ॥ २ ॥
प्रतिदिनीं ऐसें युद्ध । क्षुब्ध आजि गंगासुत ॥ ३ ॥
वंदूनियां भार्गवातें । केलें बाणवर्षावातें ॥ ४ ॥
छेदूनियां सकल बाण । अस्त्रें योजितसे राम ॥ ५ ॥
अस्त्रामागूनि तें अस्त्र । येतां होई प्रतिकार ६ ॥
अंतीं गांगेय मूर्छित । पडतां दूर नेई सूत ॥ ७ ॥
अंबा हर्षित जाहली । शुद्धि शांतनवा आली ॥ ८ ॥
ताडितांचि प्रखर बाण । मूर्छायुक्त होई राम ॥ ९ ॥
उठतां होई घोरयुद्ध । वासुदेव म्हणे अस्त ॥ १० ॥

अध्याय १८१ वा ५०३

अन्यदिनीं होई दारुण सङ्ग्राम । क्रोधाकुल राम शक्ति सोडी ॥ १ ॥
प्राणहारी शक्ति येतांचि देखिली । त्रिखंड तैं केली गंगासुतें ॥२ ॥
अवलोकूनि तें भार्गव संतप्त । करी शक्त्याघात वारंवार ॥ ३ ॥
कालानलासम विविध त्या शक्ति । निष्फळचि होती भीष्मापुढें॥४॥
शराघातें होती विव्हल ते वीर । उभयांच्या रुधिर अंगीं वाहे ।५॥
वासुदेव म्हणे ऐसा तोही दिन । समर दारुण करितां गेला ॥ ६ ॥

अध्याय १८२ वा ५०४

अन्यदिनीं राम क्रुद्ध । सारथ्याचा करी वध ॥ १ ॥
भयाकुल असतां भीष्म । येई एक रामबाण ॥ २ ॥
वक्षस्थलामाजी घुसे । पाडी रणीं गांगेयातें ॥ ३ ॥
हर्षे गर्जतसे राम । सदय अष्टवसु जाण ॥ ४ ॥
विप्रवेषें सन्निध येती । भीष्मा उचलूनि घेती ॥ ५ ॥
धीर देतांचि सावध । भीष्म अवलोकी मातेस ॥ ६ ॥
करी सारथ्य आपुलें । भीष्म वंदी तैं पाउलें ॥ ७ ॥
गेली देऊनियां धीर । भीष्म सोडी प्रखर शर ॥ ८ ॥
तेणें भार्गव मूर्छित । उठतां बाण योजी एक ॥ ९ ॥
निवारिती तया मुनि । वासुदेव हृष्ट मनीं ॥ १० ॥

अध्याय १८३ वा ५०५

तेविस दिन तें युद्ध होई घोर । शांतनूचा पुत्र चिंता करी ॥ १ ॥
प्रार्थूनि झोपतां विप्र स्वप्नामाजी । 'प्रस्वाप' अर्पिती अस्त्र तया ॥
म्हणती हें अस्त्र अज्ञात रामासी । योजितां हेतूसी पुरविल ॥ ३ ॥
चिरंजीव राम होईल निश्चेष्ट । मारितां तूं हांक उठेल तो ॥ ४ ॥
ऐसें बोलूनियां वसु गुप्त झाले । भीष्मानें पाहिलें स्वप्न ऐसें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे तत्काळचि भीष्म । हर्षित होऊन उठता झाला ॥६ ॥

अध्याय १८४ वा ५०६

पुढती झालें घोर युद्ध । शस्त्र सोडी राम क्रुद्ध ॥ १ ॥

भीष्म मूर्छित जाहला । पुढती रामही घावरा ॥ २ ॥
अंतीं सोडितां ब्रह्मास्त्र । भीष्म सोडी तेंचि अस्त्र ॥ ३ ॥
नभीं परस्पराघातें । तेज प्रगटलें मोठें ॥ ४ ॥
देव-दानव व्याकुळ । भीष्म चिंती प्रस्वापास्त्र ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अस्त्र । स्फुरलें भीष्मासी तत्काळ ॥ ६ ॥

अध्याय १८५ वा ५०७

प्रस्वापस्मरण होतांचि भीष्मासी । अंतरिक्षामाजी शब्द येई ॥१॥
नको नको भीष्मा सोडूं प्रस्वापास्त्र । तपस्वी हा विप्र वंद्य जनीं ॥
प्रत्यक्ष नारद बोलले भीष्मासी । आंवरी अस्त्र मी भीष्म तदा ॥३॥
संतुष्ट भार्गव सहज तें बोले । भीष्मानें जिंकिलें मजलागीं ॥ ४ ॥
निवारिती तदा पितर रामासी । परी नो रणासी त्यागीचिना ॥५॥
भीष्मही निवृत्त न होतां पितर । म्हणती तूं विप्र सदय रामा ॥६॥
अवध्य तूं लोकीं भीष्महि अवध्य । वसु म्हणती युद्ध पुरे भीष्मा ॥
ऐकूनियां भीष्म वंदी रामाप्रति । राम म्हणे लोकीं धन्य भीष्मा ॥८॥
वासुदेव म्हणे अंबेप्रति राम । बोलला वचन परिसा काय ॥ ९ ॥

अध्याय १८६ वा ५०८

भीष्म म्हणे राजा दुर्योधना, राम । वदे हा वचन अंबेप्रति ॥ १ ॥
तुजसाठीं कन्ये शक्तिसर्वस्वानें । लढलों भीष्मानें हरिलें परी ॥२॥
यास्तव तुजसी आधार तो एक । शरण तयास जाई अंबे ॥ ३ ॥
अंबा म्हणे रामा, म्हणसी तें सत्य । परी मी रणांत वधीन भीष्मा
होईल हें कार्य जाईन त्या स्थानीं । अंबा हें बोलूनी निघूनि जाई ॥
अनुज्ञा भीष्मासी देऊनियां राम । गेला निजस्थान लक्षूनियां ॥६॥
वासुदेव म्हणे भीष्म स्वस्थानासी । जाऊनि मातेसी वृत्त कथी ॥

५०९

भीष्म म्हणे राजा, येऊनियां दूत । अंबेचा वृत्तांत कथिती मज ॥१॥
नारदें व्यासासी कथिला वृत्तांत । म्हणतां तें निश्चिंत राहीं भीष्मा
पुढती अंबेनें केलें घोर तप । वर्षें द्वादश विविध मार्गें ॥ ३ ॥

कळतां वृत्तांत तियेच्या गंगेसी । होई रुक्ष नदी म्हणे गंगा ॥ ४ ॥
पुनरपि अंबा करी बहु तप । होता देहपात नदी होई ॥ ५ ॥
अर्धशरेतीं जाहली सरिता । आचरिलें व्रता अर्धदेही ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे क्रूरभावें अंबा । खडतर तपा अविलंबी ॥ ७ ॥

अध्याय १८७ वा ५१०

अन्य जन्मीं पूर्वजन्मस्मृति तिज । आचरी तपास क्रूर भावें ॥ १ ॥
कारण मुनींसी सांगे भीष्मवध । नको परावृत्त करूं म्हणे ॥ २ ॥
तपोवनीं तिज भेटे शूलपाणी । इच्छा पुरवोनि धन्य करी ॥ ३ ॥
पुरुषभावासी मागूनियां घेई । शिव तेंही देई अन्य जन्मीं ॥ ४ ॥
म्हणे द्रुपदाची कन्या तूं होशील । पुरुषत्व लाभेल पुढती तुज ॥ ५ ॥
बोलूनियां ऐसें विप्रांच्या समक्ष । महादेव गुप्त होई वनीं ॥ ६ ॥
मेळवूनि काष्ठें अंबा अग्निमाजी । प्रवेशूनि राजी अन्य जन्मा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे यमुनेच्या तीरीं । कथा ही जाहली आश्रमांत ॥ ८ ॥

अध्याय १८८ वा ५११

भीष्म म्हणे राया, पांचाळ, द्रुपद । आचरितां तप पुत्रास्तव ॥ १ ॥
वर तयालागीं शिवानें दिधला । कन्यालाभ झाला पुढती तया ॥ २ ॥
पुत्रचि लाभला ऐसें कथी राणी । शिखंडी ठेवोनि नाम त्याचें ॥ ३ ॥
दूतद्वारा वृत्त कळलें मजसी । वार्ता हे अन्यासी नव्हती ज्ञात ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे विचित्र घटना । ऐकूनियां जनां नवल वाटे ॥ ५ ॥

अध्याय १८९ वा ५१२

शस्त्रास्त्रसंपन्न जाहला शिखंडी । दाशार्णक त्यासी अर्पी कन्या ॥
यौवनांत येतां कन्याभाव दिसे । दाशार्णक क्रोधें दूत प्रेषी ॥ २ ॥
येऊनियां दूत द्रुपदासी म्हणे । वंचना हें जाणे नृपा माझी ॥ ३ ॥
अमात्यांसमेत करीन उच्छेद । आतां होई सिद्ध संगरासी ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे विश्वास रायासी । परी परीक्षेची वेळ येई ॥ ५ ॥

अध्याय १९०-१९१ वा ५१३

कन्येच्या वचनें दाशार्ण तो क्रुद्ध । द्रुपदवधार्थ सिद्ध होई ॥ १ ॥
निश्चयार्थ दूत गेला होता वेगें । येऊनियां सांगे वृत्त सत्य ॥ २ ॥
भयाभीत राव द्रुपद कांतेसी । म्हणे या प्रसंगीं काय करूं ॥ ३ ॥
पुत्र किंवा कन्या कथावें तें सत्य । वंचना ही योग्य नव्हे ऐसी ॥४॥
कांता म्हणे राया संकटीं ईश्वर- । उपासना थोर साधन हें ॥ ५ ॥
दैवानुकूल तो यत्न होई सिद्ध । दैव ज्या विरुद्ध अयश तेथें ॥ ६ ॥
जाणूनि विपत्ति प्राणत्यागास्तव । कन्या घेई धांव वनामाजी ॥७॥
'स्थूणाकर्णयक्ष' मूर्तिमंत भय । परी तोचि साह्य शिखंडीसी ॥८॥
वासुदेव म्हणे निवेदूनि वृत्त । मागे पुरुपत्व यक्षाप्रति ॥ ९ ॥

अध्याय १९२ वा ५१४

ऐकूनि तें वृत्त सदय तो यक्ष । देईन पुरुपत्व म्हणे स्वयें ॥ १ ॥
माझें मज लाभो जातां हे विपत्ति । निर्बंध कन्येसी ऐसा घाली ॥२॥
मानितां तियेसी, निज पुरुषत्व । अर्पूनि स्त्रीभाव घेई तदा ॥ ३ ॥
ऐसा तो जाहला शिखंडी पुरुप । निजनगरास येई सुखें ॥ ४ ॥
क्रुद्ध दाशार्णासी निवेदी द्रुपद । परीक्षेसी दूत धाडीं नृपा ॥ ५ ॥
ऐकूनियां नृप पाठवी स्त्रियांसी । परीक्षा सुताची होई ऐसी ॥ ६ ॥
आनंदें दाशार्ण यज्ञसेनाप्रति । भेटूनि संपत्ति अर्पी बहु ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे संदेह निवृत्ति । होतां सन्मानिती एकमेकां ॥ ८ ॥

५१५

दैवगती ते न कळे विचित्र दैवाची ॥
यक्षगृहीं सहज येई स्वारी धनदाची ॥ १ ॥
सामोरा न येई स्थूणाकर्ण तें पाहून ॥
यक्षराज क्रुद्ध होतां कळें वर्तमान ॥ २ ॥
जन्मभरी राहीं ऐसा बोलला कुबेर ॥
यक्ष सर्व तयावेळीं जोडिती त्या कर ॥ ३ ॥
नम्रभाव पाहूनियां म्हणे हा शिखंडी ॥
पंचत्व पावतां यासी पुरुपत्व प्राप्ति ॥ ॥

बोलूनि कुबेर ऐसें गेला स्वस्थळासी ॥
कार्य होतांचि शिखंडी भेटला यक्षासी ॥ ५ ॥
पाहूनि ऋजुत्व त्याचें यक्ष संतोषला ॥
म्हणे जन्मभरी लाभ तुजसी हा झाला ॥ ६ ॥
भीष्म म्हणे दुर्योधना, ऐसा हा शिखंडी ॥
भीष्म कदाही न तेणें वधील तयासी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे राव ऐकूनि तें वृत्त ॥
चिंती पितामह करी तेंचि तया युक्त ॥ ८ ॥

अध्याय १९३ वा ५१६

दुर्योधन म्हणे सेना पांडवांची । विनाशार्थ किती काल सांगा ।१।
भीष्म म्हणे रणीं लढतां एक मास । सैन्य हें रणांत संहारीन ॥२॥
द्रोणांसी पुशितां कथिती काल तोचि । कृपाचार्य कथी दोन मास॥
अश्वत्थामा म्हणे संहारीन सैन्य । करूनि संग्राम दशदिनीं ॥ ४ ॥
दिनपंचकचि पर्याप्त मजसी । वाणी हे कर्णाची सहज येई ॥ ५ ॥
हांसोनियां भीष्म बोलले कर्णासी । वल्गना हे तुझी दुरूनीच ॥६॥
वासुदेव म्हणे प्रत्यक्ष प्रसंग । कसोटी ते चांग मानवाची ॥ ७ ॥

अध्याय १९४ वा ५१७

दूतमुखें वृत्त कळलें धर्मासी । धर्म, बांधवांसी प्रश्न करी ॥ १ ॥
मर्यादा वीरांनीं दुर्योधना प्रति । कथिली पार्थाची शक्ति कळो ॥
पार्थ म्हणे धर्मा, होतां कृष्णकृपा । क्षणार्धांत यांचा करिन नाश ॥
तरी पाशुपत जाणती न कोणी । त्याविनाचि रणीं लढेन मी ॥ ४ ॥
धर्मा, महाराजा, अजिंक्य हे वीर । साह्य थोर थोर आम्हांलागीं ॥
त्रैलोक्याचा नाश करिसील कोपें । बल तव ऐसें राजश्रेष्ठा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे धर्मराजाप्रति । सुभद्रेचा पति वदला ऐसें ॥ ७ ॥

अध्याय १९५ वा ५१८

रम्य प्रातःकाळीं कौरवांचें सैन्य । करीतसे स्नान, दान प्रेमें ॥१॥
स्वस्तिवाचनही करूनि निघाले । वीर ते शोभले मालाधारी ॥२॥
विजयेच्छु योद्धे विंद-अनुविंद । शकुनि, जयद्रथ भीष्मादिक ॥३॥

किरात, यवन, शक, दाक्षिणात्य । कुरुक्षेत्रीं स्थित पश्चिमेसी ॥४॥
गजपुरासम भासलें शिबिर । परिवार सकळ सिद्ध तेथें ॥ ५ ॥
सूत, शिल्पि तैंवी अगणित दूत । अन्नपानादिक सामग्री ते ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कुरुक्षेत्रामाजी । कौरव रणासी सिद्ध होती ॥ ७ ॥

अध्याय १९६ वा ५१९

धर्मआज्ञा होतां पांडवांचें सैन्य । शस्त्रास्त्रें घेऊन सज्ज होई ॥ १ ॥
धृष्टद्युम्नादिक वीर सज्ज झाले । शोभती कुंडलें कर्णामाजी ॥ २ ॥
योजूनि विभाग हर्षोत्फुल्ल सेना । चालली संग्रामा राजाज्ञेनें ॥ ३ ॥
नूतन योजिले धर्मानें विभाग । झाला वृत्तभेद म्हणूनियां ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे जो राजकारणीं । दक्ष तोचि रणीं विजय पावे ॥ ५ ॥

५२०

द्रुपद, विराट, अभिमन्युबाळ । सात्यकि नकुळ शोभताती ॥१॥
सकळां मागूनि धर्मराज जाई । सामग्री ते पाहीं तयामागें ॥ २ ॥
रथ, अश्व, गज पर्वतासमान । मदस्राव जाण गंडस्थळीं ॥ ३ ॥
शंख भेरीनाद दुंदुभीचा ध्वनि । कोंदला गगनीं तयावेळीं ॥ ४ ॥
सिद्ध ऐसें सैन्य जाहलें युद्धार्थ । समाप्त हें पर्व साररूप ॥ ५ ॥
वैकुंठनायका अर्पितों हें पर्व । म्हणे वासुदेव तुझ्या पायीं ॥ ६ ॥

## उद्योगपर्व समाप्त

या उद्योगपर्वाची एकंदर अभंगसंख्या ५२०

या द्वितीय खंडांत आलेल्या एकदर अभंगांची संख्या १४१४

---

### पुढील भीष्मपर्वाचा आद्य श्लोक

जनमेजय उवाच—

कथं युयुधिरे वीराः कुरु पांडव सोमकाः ॥
पार्थिवाः सुमहात्मानो नानादेश समागताः ॥ १ ॥

॥ भगवान् गोपालकृष्णार्पणमस्तु ॥

